# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
# विद्यावाचस्पती (पीएच.डी.) राज्यशास्त्र पदवीसाठी
# सादर केलेला प्रबंध

## अहमदनगर जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकासात राजकीय नेतृत्वाच्या योगदानाचा अभ्यास : १९९३ ते २०१०


**संशोधक**

बाळासाहेब जगन्नाथ बोठे पाटील

**मार्गदर्शक**

प्राचार्य डॉ. बाळ कांबळे
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत
ता. कर्जत जि. अहमदनगर

**संशोधन केंद्र**

राज्यशास्त्र विभाग
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे


**एप्रिल –२०१६**

**Date :**

# Certificate of the Guide

Certified that the work incorporated in the thesis titled **''अहमदनगर जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकासात राजकीय नेतृत्वाच्या योगदानाचा अभ्यास : १९९३ ते २०१०''** that is being submitted by **Mr. Balasaheb Jagannath Bothe Patil** has been carried out by the candidate under my supervision and guidance. The material in the thesis is his original work and material that has been obtained from other sources has been duly acknowledged in the thesis.

Principal Dr. Bal Kamble
(Research Guide)
Dada Patil Mahavidhyalaya, Karjat
Ta. Karjat. Dist. Ahmednagar

Date : April - 2016

Place : Pune

Date :

# Declaration by the Candidate

I hereby declare that the work incorporated in the thesis entitled **''अहमदनगर जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकासात राजकीय नेतृत्वाच्या योगदानाचा अभ्यास : १९९३ ते २०१०''** that is being submitted by me for the degree Doctor of Philosophy in Political Science to the Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune is original and has not being previously submitted for any other degree of any university in India or abroad

I further declare material obtained from other sources has been duly acknowledged in the thesis.

Mr. Balasaheb Jagannath Bothe Patil
(Research Student)
Department of Political Science
Tilak Maharashtra Vidyapeeth
Pune

Date: April – 2016
Place : Pune

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या सामाजिकशास्त्र विद्याशाखेअतंर्गत राज्यशास्त्र विषयांमध्ये **''अहमदनगर जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकासात राजकीय नेतृत्वाच्या योगदानाचा अभ्यास : १९९३ ते २०१०''** या विषयावर पीएच. डी पदवी करीता शोध प्रबंध सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. म्हणून मी प्रथमत: विद्यापीठाचे आभार मानतो. प्रस्तुत संशोधन प्रबंध लिहिण्यासाठी मार्गदर्शन केले, सहकार्य केले, प्रेरणा दिली त्या सर्वांची कृतज्ञता व्यक्त करणे मी महत्त्वाचे मानतो. माझे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. बाळ कांबळे यांनी विषय सूचविण्यापासून ते संपूर्ण काम करून घेण्यापर्यंत या संशोधन प्रबंधाच्या कार्यास बहुमोल मार्गदर्शन केले. तसेच त्यांच्या प्रोत्साहनामुळे व मार्गदर्शनामुळे हा प्रबंध पुर्ण होऊ शकला. संशोधन कार्याची दिशा, अचूकता व नेमकेपणा तसेच अभ्यासातील सातत्य याबद्दल नेहमीच सरांचा कटाक्ष असायचा. संशोधन प्रबंधासाठी आवश्यक संदर्भ साहित्य, प्रबंधाची मांडणी, संपादन, संशोधनाबद्दलची नेमकी दिशा, महत्त्वपूर्ण सूचना या कामी वेळोवेळी सरांचे मार्गदर्शन मला लाभले. माझ्या संशोधनाचे सर्व श्रेय त्यांनाच आहे. त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत आभारी आहे.

संशोधन प्रबंधाची रूपरेषा निश्चित करण्यासाठी डॉ. शरद घोडके यांनी मदत केली. मी त्यांची मन:पूर्वक आभारी आहे. तसेच प्रबंध सादरीकरणाच्या पुर्व समितीच्या बैठकीत डॉ. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे शाख्येचे आधिष्ठाता डॉ. बी. डी. कुलकर्णी यांनी सुचना केल्या. त्या प्रबंध लिखाणात मौलिक ठरल्या. त्याबद्‌ल त्यांचा देखील अत्यंत आभारी आहे.

या संशोधन कार्यासाठी अनेकांची मदत मिळाली. अनेकांनी मार्गदर्शन केले त्यांच्या सहकार्य व प्रोत्साहनामुळे हे कार्य पूर्ण करण्याची प्रेरणा मिळाली. या संशोधनासाठी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. माणिक सोनावणे यांचे संशोधन कार्यात मला मार्गदर्शन मिळाले. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.  या शिवाय प्रत्यक्षात आणि

अप्रत्यक्षात मदत करणारे यशंवतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागाचे प्रमुख डॉ. सुधीर गव्हाणे, डॉ. डी.एम भोसले, डॉ. संभाजी पठारे, डॉ. भास्करराव झावरे, प्राचार्य राजकुमार देशपांडे, प्राचार्य डॉ. ए. के कुरेशी, जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज शिक्षण संस्थेचे सचिव जी. डी. खानदेशे, मुळा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रशांत पाटील गडाख, अहमदनगर येथील न्यू आर्टस् कॉमर्स ॲन्ड सायन्स महाविद्यालयातील राज्यशास्त्राचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. बाळासाहेब पवार अहमदनगरचे प्रसिध्द स्त्रीरोगतज्ञ डॉ. निलेश शेळके, राज्यशास्त्राचे संशोधक विद्यार्थी सचिन कांबळे, दै. पुण्यनगरीचे वरिष्ठ पत्रकार प्रदिप पेंढारे, माझे स्नेही योगेश मालपाणी, अशोकराव मांडगे पाटील, सतीश पठारे, सचिन तवले, मकरंद बिडवाई, महेश तनपुरे, प्रा. राहुल पाटोळे, प्रणित मेढे, महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखेपाटील यांचे जनसंपर्क अधिकारी प्रशांत कांबळे या सर्वांचा अत्यंत आभारी आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी लागणारी माहिती अनेक संस्था व ग्रंथालयातुन मिळवली आहे. त्यात विशेषत: सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ग्रंथालय, कर्जतच्या दादा पाटील महाविद्यालयाचे ग्रंथालय या ग्रंथालयाचा मुक्तपणे वापर केलेला आहे. या ग्रंथालयाच्या कर्मचारी वर्ग आणि ग्रंथपाल यांचा अत्यंत आभारी आहे. हा प्रबंध संगणकावर व्यवस्थित टंकलिखित करून प्रस्तुत प्रबंधाची अंतिम प्रति पर्यंतचे टंकलेखन जय शंकर डी. टी. पी.चे संचालक महेश गिते यांनीही विशेष मदत केली त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

पीएच. डी. च्या कामात कुटुंबातील माझी पत्नी ॲड. सविता बोठे पाटील, माझा मुलगा यश बोठे पाटील यांनी वेळोवेळी मला साथ आणि मदत केल्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

बाळासाहेब जगन्नाथ बोठे–पाटील

# अनुक्रमणिका


| अ. क्र | प्रकरणे | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | १ ते ४१ |
| २ | अहमदनगर जिल्ह्याची ऐतिहासिक आणि भौगोलिक पार्श्वभूमी | ४२ ते ६८ |
| ३ | राज्यातील निवडणुका आणि पक्षीय राजकारण | ६९ ते ११३ |
| ४ | जिल्हा राजकारणाच्या विकासाचे टप्पे | ११४ ते १६२ |
| ५ | आर्थिक विकास आणि नेतृत्व | १६३ ते १८६ |
| ६ | सहकाराचा विकास आणि नेतृत्व | १८७ ते २२८ |
| ७ | सामाजिक आणि आर्थिक चववळी आणि नेतृत्व निर्मिती | २२९ ते २७९ |
| ८ | ग्रामीण राजकारण आणि नेतृत्व | २८० ते ३४८ |
| ९ | निवडणुका आणि राजकीय नेतृत्व विकास | ३४९ ते ४२५ |
| १० | निष्कर्ष | ४२६ ते ४६३ |
| | १. संदर्भसूची<br>२. मुलाखती घेतलेल्या व्यक्तींची यादी<br>३. प्रश्नावली | ४६४ ते ४७६<br>४७७ ते ४८०<br>४८१ ते ४८४ |

# तक्त्यांची यादी


| अ. क्र | तक्ता क्र | तक्त्यांचे नाव | पृष्ठे |
|---|---|---|---|
| १ | २.१ | अहमदनगर जिल्ह्यातील प्रशासकीय सेवांचे ठिकाण | ४३ |
| २ | २.२ | अहमदनगर जिल्ह्यातील शेत जमिनीचे प्रमाण | ४४ |
| ३ | २.३ | अहमदनगर जिल्ह्यातील पीकरचना | ४५ |
| ४ | २.४ | अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी संस्थांची प्रगती | ५६ |
| ५ | ३.१ | कोकण विभाग : १९९० ते २०१४ पक्षनिहाय जागांची स्थिती | ९२ |
| ६ | ३.२ | मुंबई : १९९० ते २०१४ पक्षनिहाय जागांची स्थिती | ९४ |
| ७ | ३.३ | मराठवाडा: १९९० ते २०१४ पक्षनिहाय जागांची स्थिती | ९७ |
| ८ | ३.४ | उत्तर महाराष्ट्र : १९९० ते २०१४ पक्षनिहाय जागांची स्थिती | ९९ |
| ९ | ३.५ | विदर्भ : १९९० ते २००९ पक्षनिहाय जागांची स्थिती | १०३ |
| १० | ३.६ | पश्चिम महाराष्ट्र : १९९० ते २००९ पक्षनिहाय जागांची स्थिती | १०६ |
| ११ | ३.७ | १९९० च्या विधानसभा निवडणुकीतील विभागनिहाय पक्षीय स्थिती | १०७ |
| १२ | ३.८ | १९९५ च्या विधानसभा निवडणुकीतील विभागनिहाय पक्षीय स्थिती | १०८ |
| १३ | ३.९ | १९९९ च्या विधानसभा निवडणुकीतील विभागनिहाय पक्षीय स्थिती | १०९ |
| १४ | ३.१० | २००४ च्या विधानसभा निवडणुकीतील विभागनिहाय पक्षीय स्थिती | १११ |
| १५ | ३.११ | २००९ च्या विधानसभा निवडणुकीतील विभागनिहाय पक्षीय | ११२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | स्थिती | |
| १६ | ४.१ | १९६२ च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल | ११५ |
| १७ | ४.२ | १९६२ च्या विधानसभा निवडणुकीत निवडून आलेले पक्षनिहाय नेतृत्व | ११६ |
| १८ | ४.३ | १९६७ च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल | ११७ |
| १९ | ४.४ | १९६७ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत अहमदनगर जिल्ह्यातील मतदारसंघात निवडून आलेले पक्षनिहाय नेतृत्व | ११८ |
| २० | ४.५ | १९७२ च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल | १२० |
| २१ | ४.६ | १९७२ विधानसभा निवडणुकीतील पक्षनिहाय निकालाची स्थिती | १२१ |
| २२ | ४.७ | १९७८ च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल | १२२ |
| २३ | ४.८ | १९७८ विधानसभा निवडणुकीतील पक्षनिहाय निकालाची स्थिती | १२३ |
| २४ | ४.९ | १९८० च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल | १२४ |
| २५ | ४.१० | १९८० च्या विधानसभा निवडणुकीतील अहमदनगर जिल्ह्याची पक्षनिहाय स्थिती | १२६ |
| २६ | ४.११ | १९८५ च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल | १२७ |
| २७ | ४.१२ | १९८५ च्या विधानसभा निवडणुकीतील अहमदनगर जिल्ह्याची पक्षनिहाय स्थिती | १२८ |
| २८ | ४.१३ | १९९० च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल | १२९ |
| २९ | ४.१४ | १९९० च्या विधानसभा निवडणुकीतील अहमदनगर जिल्ह्यातील मतदारसंघनिहाय निकाल | १३० |
| ३० | ४.१५ | १९९५ च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल | १३१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | ४.१६ | १९९५ च्या विधानसभा निवडणुकीतील अहमदनगर जिल्ह्यातील मतदारसंघनिहाय निकाल | १३२ |
| ३२ | ४.१७ | १९९९ च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल | १३४ |
| ३३ | ४.१८ | १९९५ च्या विधानसभा निवडणुकीतील अहमदनगर जिल्ह्यातील मतदारसंघनिहाय निकाल | १३५ |
| ३४ | ४.१९ | २००४ च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल | १३६ |
| ३५ | ४.२० | २००४ च्या विधानसभा निवडणुकीतील अहमदनगर जिल्ह्यातील मतदारसंघनिहाय निकाल | १३८ |
| ३६ | ४.२१ | २००९ च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल | १३९ |
| ३७ | ४.२२ | २००९ च्या विधानसभा निवडणुकीतील अहमदनगर जिल्ह्यातील मतदारसंघनिहाय निकाल | १४० |
| ३८ | ४.२३ | १९६२ ते २००९ निवाानसभा निवडणूक आणि राजकीय पक्षाचे चित्र | १४५ |
| ३९ | ४.२४ | अहमदनगर जिल्ह्यातील आमदारांचे पक्ष व जातीगटांचे वर्गीकरण : (१९९० निवडणूक) | १४६ |
| ४० | ४.२५ | अहमदनगर विधानसभा निवडणूक (१९९५) | १४७ |
| ४१ | ४.२६ | अहमदनगर विधानसभा निवडणूक (१९९९) | १४९ |
| ४२ | ४.२७ | अहमदनगर विधानसभा निवडणूक (२००४) | १५० |
| ४३ | ४.२८ | अहमदनगर विधानसभा निवडणूक (२००९) | १५६ |
| ४४ | ४.२९ | अहमदनगर जिल्ह्यातील खासदारांचे राजकीय पक्ष व जातीगटाचे वर्गीकरण | १५९ |
| ४५ | ४.३० | अहमदनगर जिल्ह्यातील प्रमुख राजकीय पक्षांचे अध्यक्ष : जातीगटांचे वर्गीकरण(२००९—२०१०) | १६१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४६ | ५.१ | जिल्ह्यातील एकुण कृषि पतसंस्था | १६४ |
| ४७ | ५.२ | जिल्ह्यातील बिगर कृषि पतसंस्था | १६५ |
| ४८ | ५.३ | एकुण उत्पादक सहकारी संस्था | १६८ |
| ४९ | ५.४ | सामाजिक सेवा सहकारी संस्था | १६९ |
| ५० | ५.५ | सहकारी साखर कारखाना आणि उत्पादन क्षमतेचा आलेख | १७१ |
| ५१ | ५.६ | अकोले तालुक्यातील भंडारदरा धरणाचा विकासात्मक तपशील | १७३ |
| ५२ | ५.७ | राहुरी तालुक्यातील मुळा धरणाचा विकासात्मक तपशील | १७४ |
| ५३ | ५.८ | शिरूर तालुक्यातील घोड प्रकल्प/धरणाचा विकासात्मक तपशील | १७५ |
| ५४ | ५.९ | दिडोरी तालुक्यातील उर्ध्व गोदावरी प्रकल्प/धरणाचा विकासात्मक तपशील | १७७ |
| ५५ | ५.१० | जिल्ह्यातील सिंचनाच्या व पाणी उपसा करण्याच्या सोयी | १८० |
| ५६ | ५.११ | अहमदनगर जिल्ह्यातील विविध वाढत गेलेल्या संस्थाची संख्या | १८२ |
| ५७ | ५.१२ | अहमदनगर जिल्ह्यातील विविध संस्थामधील सभासदाचे प्रमाण | १८४ |
| ५८ | ६.१ | अहमदनगर जिल्ह्यातील साखर कारखाने असणारे तालुके व संख्या | २०२ |
| ५९ | ६.२ | अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखाने, राजकीय पक्ष व जातीगटांचे वर्गीकरण : (२००९—२०१०) | २०४ |
| ६० | ६.३ | अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन आणि व्हाईस चेअरमन १९५८ ते २०१० | २२५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६१ | ८.१ | १९६२ ते २०१० या काळात जिल्हा परिषदेत नेतृत्व रूपाने राहिलेले अध्यक्ष | २८७ |
| ६२ | ८.२ | अहमदनगर जिल्हा परिषद मतदारसंघ स्वरूपानुसार वर्गीकरण : (१९९२) | २८९ |
| ६३ | ८.३ | जिल्हा परिषद सदस्यांचे राजकीय पक्ष निहाय वर्गीकरण : (१९९२) | २९० |
| ६४ | ८.४ | जिल्हा परिषद सदस्यांचे जातीनिहाय वर्गीकरण : (१९९२) | २९३ |
| ६५ | ८.५ | जिल्हा परिषद सदस्यांचे मतदारसंघ स्वरूपानुसार वर्गीकरण : (१९९७) | २९५ |
| ६६ | ८.६ | जि. प सदस्यांचे राजकीय पक्षानुसार वर्गीकरण : (१९९७) | २९७ |
| ६७ | ८.७ | जि. प. सदस्यांचे जातीगटानुसार वर्गीकरण : (१९९७) | २९९ |
| ६८ | ८.८ | जिल्हा परिषद सदस्यांचे मतदारसंघ स्वरूपानुसार वर्गीकरण : (२००२) | ३०२ |
| ६९ | ८.९ | जिल्हा परिषद सदस्यांचे राजकीय पक्षानुसार वर्गीकरण : (२००२) | ३०४ |
| ७० | ८.१० | जि.प. सदस्यांचे जातीगटांनुसार वर्गीकरण : (२००२) | ३०६ |
| ७१ | ८.११ | अहमदनगर जि. प. सदस्यांचे मतदार संघ स्वरूपानुसार वर्गीकरण : (२००७) | ३०८ |
| ७२ | ८.१२ | अहमदनगर जि. प. सदस्यांचे राजकीय पक्षानुसार वर्गीकरण : (२००७ निवडणूक) | ३१० |
| ७३ | ८.१३ | जिल्हा परिषद सदस्यांचे जातीगटानुसार वर्गीकरण : (२००७ निवडणूक) | ३११ |
| ७४ | ८.१४ | जि.प.मतदारसंघस्वरूपानुसार वर्गीकरण (१९९२, १९९७, | ३१३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २००२, २००७ निवडणुका) | |
| ७५ | ८.१५ | १९९२ ते २००७ जिल्हा परिषद नेतृत्व आणि राजकीय पक्ष | ३१५ |
| ७६ | ८.१६ | १९९२ ते २००७ या काळातील जिल्हा परिषदेचे नेतृत्व आणि नेतृत्वाचे जातीगट | ३१८ |
| ७७ | ८.१७ | जि.प. सदस्यांचे राजकीय पक्षानुसार राजकीय नेतृत्वाची संख्या आणि टक्केवारी : (१९९२, १९९७, २००२, २००७ निवडणुका) | ३२० |
| ७८ | ८.१८ | जिल्हा परिषद सदस्यांचे पक्ष व जातीगटांचे वर्गीकरण | ३२३ |
| ७९ | ८.१९ | पक्षनिहाय मतांची टक्केवारी (२००३) | ३३१ |
| ८० | ८.२० | नगरसेवकांचे पक्षनिहाय वर्गीकरण (२००३) | ३३२ |
| ८१ | ८.२१ | अहमदनगर महानगरपालिका निवडणूक निकाल | ३३३ |
| ८२ | ८.२२ | नगरसेवकांचे जातीगटानुसार वर्गीकरण (२००३) | ३३६ |
| ८३ | ८.२३ | नगरसेवकांचे पक्ष व व्यवसायानुसार वर्गीकरण (२००३) | ३३७ |
| ८४ | ८.२४ | महिलांचे पक्ष व जातीनिहाय वर्गीकरण (२००३) | ३३९ |
| ८५ | ८.२५ | अहमदनगर जिल्हा पंचायत समित्या निवडणूक (२००७) | ३४३ |
| ८६ | ८.२६ | अहमदनगर नगरपालिका निवडणुका (२००२, २००७) | ३४५ |
| ८७ | ९.१ | १९९० ते २००९ या काळातील पक्षनिहाय उमेदवारी | ३५० |
| ८८ | ९.२ | सर्व पक्षांची जातींनिहाय उमेदवारी | ३५२ |
| ८९ | ९.३ | सर्व पक्षाची जातींगटानिहाय नेतृत्वाला मिळालेली संधी | ३५३ |
| ९० | ९.४ | राजकीय नेतृत्व आणि त्यांचे शिक्षण | ३५४ |
| ९१ | ९.५ | राजकीय नेतृत्व आणि त्यांचे व्यवसाय | ३५६ |
| ९२ | ९.६ | राजकारणात कार्यरत असलेले नेतृत्व | ३५७ |
| ९३ | ९.७ | ग्रामपंचायत निवडणुकीत उमेदवारी केलेले नेतृत्व | ३५८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९४ | ९.८ | पंचायत समितीच्या निवडणुकीत उमेदवारी केलेले नेतृत्व | ३५८ |
| ९५ | ९.९ | जिल्हा परिषद निवडणुकीतील नेतृत्वाचा अनुभव | ३५९ |
| ९६ | ९.१० | राजकीय पक्षातील पक्षांतर | ३६२ |
| ९७ | ९.११ | जिल्हा पातळीवरील नेतृत्वाला मिळालेले स्थान | ३६३ |
| ९८ | ९.१२ | सहकार क्षेत्रात सक्रिय असणारे नेतृत्व | ३६४ |
| ९९ | ९.१३ | अहमदनगर जिल्ह्यातील नेतृत्वाला राजकीय घराण्याचा वारसा | ३६५ |
| १०० | ९.१४ | अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय नेतृत्व कार्यरत असलेले विविध प्रकारच्या संघटना | ३६६ |
| १०१ | ९.१५ | अहमदनगर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास | ३७० |
| १०२ | ९.१६ | अहमदनगर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास | ३७३ |
| १०३ | ९.१७ | अहमदनगर उत्तर विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास | ३७४ |
| १०४ | ९.१८ | अहमदनगर उत्तर विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास | ३७६ |
| १०५ | ९.१९ | शेवगाव विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास | ३७७ |
| १०६ | ९.२० | शेवगाव विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास | ३७९ |
| १०७ | ९.२१ | पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास | ३८० |
| १०८ | ९.२२ | पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास | ३८२ |
| १०९ | ९.२३ | कर्जत विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास | ३८३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११० | ९.२४ | कर्जत विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास | ३८५ |
| १११ | ९.२५ | राहुरी विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास | ३८६ |
| ११२ | ९.२६ | राहुरी विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूकनिहाय नेतृत्व विकास | ३८९ |
| ११३ | ९.२७ | श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास | ३९० |
| ११४ | ९.२८ | श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास | ३९२ |
| ११५ | ९.२९ | पारनेर  विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास | ३९३ |
| ११६ | ९.३० | पारनेर विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूकनिहाय नेतृत्व विकास | ३९५ |
| ११७ | ९.३१ | कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास | ३९६ |
| ११८ | ९.३२ | कोपरगाव  विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास | ३९८ |
| ११९ | ९.३३ | श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास | ४०१ |
| १२० | ९.३४ | श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास | ४०२ |
| १२१ | ९.३५ | शिर्डी विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास | ४०५ |
| १२२ | ९.३६ | शिर्डी विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास | ४०८ |
| १२३ | ९.३७ | संगमनेर विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास | ४०९ |
| १२४ | ९.३८ | संगमनेर विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या | ४१२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास | |
| १२५ | ९.३९ | अकोले विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास | ४१३ |
| १२६ | ९.४० | अकोले विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास | ४१५ |
| १२७ | ९.४१ | कोपरगाव लोकसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास | ४१७ |
| १२८ | ९.४२ | कोपरगाव लोकसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास | ४२० |
| १२९ | ९.४४ | अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास | ४२१ |
| १३० | ९.४५ | अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास | ४४३ |

# प्रकरण – १

# प्रस्तावना

जिल्हा पातळीवरील अभ्यासातून स्थानिक पातळीवर राजकीय प्रक्रिया घडताना राजकीय आणि आर्थिक घटकांच्या आधारे राजकारणाला आकार येतो. या प्रक्रियेत नेतृत्वाची भूमिका ही मध्यवर्ती राहते. राजकीय आणि आर्थिक मुद्दे हे नेतृत्वाच्या निर्णयानुसार फिरत असतात. त्यात बदल घडून येतो. तसेच नव्याने हे मुद्दे पुढे येतात. एक मुद्दा संपतो की नाही दुसरा मुद्दा निर्माण होत राहतो. राजकीय नेतृत्व आणि राजकीय आणि आर्थिक मुद्दे/विकास हे एकमेकांमध्ये पुर्णपणे गुंतलेले असतात. ते वेगळे करता येत नाहीत. परिणामी राजकीय नेतृत्वाच्या आधारेच राजकीय आणि आर्थिक विकास घडून येतो.

सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घटकांच्या आधारावरच राज्य पातळीवरील राजकीय विकास आकाराला येतो. त्यात योग्य प्रकारे दिशा देणारे नेतृत्व हे गरजेचे असते. सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय अशा तिन्ही पातळीवर नेतृत्वाची भूमिका ही मध्यवर्ती राहत असते. या नेतृत्वाच्या अंगाने राजकीय आणि आर्थिक घटकांवर प्रकाश टाकता येऊ शकतो. एका बाजूने १९९० नंतर राज्य पातळीवरील राजकारणाचे स्थानिकीकरण होत असल्याचे दिसून येते. स्थानिक राजकारणात मध्यवर्ती अनेक सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घटक महत्त्वाचे आणि परिणामकारक ठरलेले आहेत. या विषयीचा जिल्हा पातळीवरील राजकीय नेतृत्वाच्या अभ्यासातून उलगडा होणे शक्य आहे. अनेक अभ्यासकांकडून राज्य पातळीवरील अभ्यास करताना जिल्हा पातळीवरील नेतृत्वाच्या घडामोडी हे एक युनिट पकडण्यात येत आहे. अलीकडच्या काळात स्थानिक पातळीवरील अभ्यास करण्यास गती मिळालेली आहे. १९७० पूर्वी देश पातळीवरील आणि राज्य पातळीवरील घटक हे राज्य पातळीवरील राजकारण घडून येण्यात प्रभाव

टाकत होते. पण जसे जसे राज्य पातळी आणि जिल्हा पातळीवरील राजकारणात स्थानिक घटकांनी आग्रहीपणे सहभाग नोंदवण्यास सुरूवात केली, तसे स्थानिक पातळीवरील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घटक हळूहळू पुढे येत गेले.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. त्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागाचेही महत्त्व वाढले. स्थानिक स्वराज्य संस्थाची निर्मिती १ मे १९६२ साली करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थाची निर्मिती करण्याच्या मागे सत्तेचे विकेंद्रीकरण करणे हा प्रमुख उद्देश होता. पण महाराष्ट्रात आर्थिक क्षेत्रातील सबलीकरणाचा प्रयोग सहकार क्षेत्राच्या माध्यमातून पुढे येत होता. महाराष्ट्रात सहकार क्षेत्राची सुरूवात ही १९२० च्या दशकात झाली होती. सहकार क्षेत्राच्या माध्यमातून राज्यात सहकारी साखर कारखाने, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सहकारी दुध संघांची निर्मिती तालुका आणि जिल्हा पातळीवर करण्यात आली होती. अशा विविध संस्था ह्या कार्यरत होत्या. या संस्थामध्ये सर्वसामान्यांच्या आर्थिक सबलीकरणाचा विचार प्रथम केंद्रस्थानी ठेवण्यात येत होता. (व्होरा व पळशीकर, १९९६) सहकारी संस्थाची वाटचाल ही पूर्णपणे जिल्हा पातळीवरील नेतृत्व विकासाच्या चौकटीत झालेली दिसून येते. मात्र नंतरच्या काळात सहकारी संस्थावर वर्चस्व मिळवण्यासाठी निवडणुकीच्या माध्यमातून राजकारण पुढे आलेले दिसून येते. या संस्थाच्या माध्यमातून स्थानिक पातळीवरील नेतृत्वाचे स्थान, सत्ता, अधिकार आणि संपत्तीतील भागीदारी हितसंबंधाच्या आधारावर पुढे येत होती. सहकार क्षेत्राची प्रथम वाटचाल ही ग्रामीण भागात साखर कारखान्याच्या माध्यमातून झालेली दिसत असली तरी नंतरच्या काळात इतर क्षेत्रातील अनेक सहकारी संस्थांनी सहकाराच्या माध्यमातून सहकार क्षेत्रात प्रवेश केला. मात्र या सहकार क्षेत्राच्या माध्यमातून एक राजकीय नेतृत्वाचा वर्ग उदयाला आलेला आहे. हा वर्ग स्थानिक पातळीवरील राजकारणात अतिशय सक्रियपणे कार्यरत असताना दिसून येतो. किंबहुना असे म्हणावे लागेल की, स्थानिक नेतृत्वाच्या आधारे स्थानिक पातळीवर राजकीय गतीशिलतेने मोठी पकड निर्माण केली आहे.

अनेकदा स्थानिक राजकारणात या स्थानिक नेतृत्वाची भूमिका आणि कार्यशैली ही राजकीय गतीशिलता आणि राजकीय प्रक्रिया घडवून आणण्यात मध्यवर्ती राहते. स्थानिक निवडणुका ह्या स्थानिक नेतृत्वाच्या हस्तक्षेपातून पार पडत असतात. स्थानिक नेतृत्वाला नियंत्रणात ठेवण्याचे काम जिल्हा आणि राज्य पातळीवरील नेतृत्वाला पार पाडावे लागते.

ग्रामीण भागातील जमीन मालकी, सहकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून एक नवीन वर्ग उदयाला आलेला होता. या सर्व महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रियेच्या जडणघडणीत जिल्हा राजकारणाचे एक प्रारुप तयार झालेले आहे. अनेक वेळा असे मानण्यात येते की, स्थानिक राजकीय प्रक्रियेच्या माध्यमातून राज्य पातळीवरील राजकारणाचे प्रारुप तयार झालेले आहे. जिल्हा राजकारणावरील नियंत्रण तपासण्यात येते त्यावेळी असे दिसून येते की, जिल्हा पातळीवर एक नेतृत्व आणि त्या नेतृत्वाच्या नियंत्रणात सर्व जिल्ह्याच्या राजकारणाची सुत्र एकवटलेली दिसून येतात. जिल्हा राजकारणात स्थानिक नेतृत्व हे त्या नेतृत्वाच्या पुढे दुय्यम भूमिका घेत तालुका पातळीवरील नियंत्रणात समाधान मानलेले असते. अशा राजकारणाच्या प्रारुपामध्ये तालुका पातळीवरील नेतृत्वाला जिल्हा पातळीकडून राजकारणात पुढे येऊ दिले जात नाही. (लेले, १९९०, पृ. ६५ ते ८५) जिल्हाच्या राजकारणावर वर्चस्व टिकवण्यासाठी नेतृत्वाकडून तालुका पातळीवरील सहकारी संस्था, इतर प्रकारच्या संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या माध्यमातून वर्चस्व टिकवण्याचे पुरेपुर प्रयत्न केले जातात. या कारणांनी महाराष्ट्र पातळीवरील राजकारणाच्या प्रारुपाचा उलगडा करण्यासाठी जिल्हा पातळीवरील राजकीय प्रक्रियेचा अभ्यास करणे फार महत्त्वाचे आहे.

महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेचा अभ्यास करणारे अभ्यासक असे मानतात की, जिल्हा पातळीवरील राजकीय प्रक्रियेचा अभ्यास न करता महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेचा अभ्यास करता येत नाही. महाराष्ट्र पातळीवरील राजकीय प्रक्रियेचा अभ्यास करताना असे दिसून येते की, राज्य पातळीवर नेतृत्वाचा प्रभाव हा जिल्हा पातळीवरील

नेतृत्वावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतात. जिल्हा पातळीवरील नेतृत्व तालुका पातळीवरील नेतृत्वावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न करतात. तालुका पातळीवरील नेतृत्व स्थानिक पातळीवर नेतृत्वाच्या आधारे नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न करतात. या माध्यमातून एक श्रेणीबध्द् नियंत्रणाची साखळी निर्माण झालेली पाहण्यास मिळते. जिल्हाभर सापडणारी आणि संख्येने मोठी असणाऱ्या जातींतून नेतृत्व पुढे येताना दिसून येते. अर्थात प्रस्थापित जातीतून नेतृत्व पुढे येते. आर्थिक सुलभतेच्या माध्यमातून उच्च जातींतील काही नेतृत्व राजकारणात पुढे येत असताना दिसून येते. पण त्यांच्या नेतृत्वाला अनेक मर्यादा असल्याचे दिसून येते.

तालुका पातळीवरील राजकारणात प्रभाव निर्माण करणे आणि तो प्रभाव कायम टिकवण्यासाठी तालुक्यात कार्यरत असणाऱ्या नेतृत्वाला विविध सहकार संस्था आणि उद्योगावर वर्चस्व ठेवणे अपरिहार्य असते. स्थानिक पातळीवरील वर्चस्वाची स्पर्धा ही एकाच किंवा अनेक जातींतील अनेक नेतृत्वामध्ये चालू असताना दिसून येते. अनेकवेळा वर्चस्व निर्माण करणे आणि टिकवणे यासाठी विविध मार्ग वापरले जातात. स्थानिक पातळीवरील अनेक सत्ताकेंद्र अस्तित्वात असतात. त्या सत्ताकेंद्रात सहभाग घेण्यात येतो. उदा. गावातील सांस्कृतिक मंडळ, भजनी मंडळ, गाव विकास सोसायटी, सहकारी बचत गट इत्यादी अस्तित्वात असतात. यावर प्रत्यक्षात गावातील नेतृत्वाचे वर्चस्व असते. हे वर्चस्व सदरील गाव पातळीवरील राजकारणावर पंचायत समितीच्या सदस्यांकडून नियंत्रण ठेवण्यात येते. पंचायत समितीच्या सदस्यांवर जिल्हा परिषदेच्या सदस्यांचे नियंत्रण असते. तर जिल्हा परिषदेच्या सदस्यांवर विधानसभेत नेतृत्व करणारे नेतृत्व नियंत्रित करत असते. यापुढे गेले तर दिसून येते की, आमदारांवर खासदारांचे नियंत्रण असते अशा प्रकारे निवडणुकीच्या राजकारणात एक साखळी घडून आलेली असते. एक प्रकारे नेतृत्वामध्ये नियंत्रणाची कंत्राटी पध्द्त आलेली दिसून येते. या साखळी खेळात आर्थिक हितसंबंध आणि प्रभाव निर्माण करणारे स्थानिक नेतृत्व कार्यरत असल्याचे दिसून येते. नियंत्रण, प्रभाव आणि आर्थिक हितसंबंधाचे धागेदोरे असल्याने

वर्चस्वाच्या साखळीतील कार्यशैलीमध्ये लवचिकता आणि हितसंबंधाची बाजू मोठ्या प्रमाणात राहते. शहरी भागात उच्च पातळीवरून खालच्या पातळीवर नियंत्रण ठेवण्यात येते. उदा. खासदारांकडून आमदारांवर तर आमदारांकडून नगरसेवकांवर नियंत्रण ठेवण्यात येते. पण निवडणुकीच्या काळात दोन्ही पातळीवर अनेक बदल घडून येतात. नियंत्रणाचा प्रकार ज्या प्रकारे असतो, त्याच प्रकारे एकमेकांना मदत करण्याचा प्रकार देखील असतो. खालच्या पातळीकडून उच्च पातळीकडे मदत करण्याचा कल दिसून येतो. एक प्रकारे उच्च पातळीपासून स्थानिक पातळीपर्यंत मदत आणि नियंत्रण याद्वारे सत्ता, संपत्ती आणि अधिकार यांचे सुनियोजित वाटप करण्यात येते. परिणामी राज्याच्या राजकीय आणि आर्थिक विकासात जिल्हा पातळीवरील नेतृत्वाची भूमिका आणि वास्तवाचा घटक पुढे येतो.

राज्याच्या पातळीवरील अभ्यास करताना जिल्हा राजकारण आणि अंतर्गत असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था, सहकार संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, कृषि उत्पन्न बाजार समिती, शिक्षण संस्था यांचा संबंध कशा प्रकारे राजकीय प्रक्रियेशी येतो हे अभ्यासणे गरजेचे आहे. या शिवाय जमीन मालकी आणि जात यांचा आर्थिक उत्पादनात संबंध येतो. (पळशीकर, २००४) या सर्व संस्थात्मक बाबीतून जिल्हा पातळीवरील राजकारण उभे राहताना दिसून येते. त्यामुळे अहमदनगर जिल्ह्याच्या राजकीय प्रक्रियेचा अभ्यास करण्यात आलेला आहे. जमीन मालकीच्या आधारे स्थानिक राजकारणात वर्चस्व आल्याचे अनेक अभ्यासात दिसून आले आहे. स्थानिक पातळीवर ज्या जातींकडे जमीन मालकी जास्त प्रमाणात असते. त्या जातींच्या नेतृत्वाकडे सत्तेच्या आणि प्रभावाच्या वाहिन्या वाहत राहतात. अशा विविध घटकांच्या माध्यमातून स्थानिक पातळीवरील आर्थिक आणि राजकीय विकासात नेतृत्वाचे योगदान कोणत्या प्रकारचे राहते याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## नेतृत्वाच्या संकल्पेनेविषयीच्या सैध्दांतिक बाजू :

जगातील सर्व देशांत व सर्व क्षेत्रात नेतृत्वाची संकल्पना विकसित झालेली किंवा होताना दिसते. प्रत्येक मानवी समुहातच वस्तुतः नेतृत्व या सामाजिक व मानसिक प्रक्रियेचे अपरिहार्य अस्तित्व आढळते. १. तथापि, विभिन्न क्षेत्रांमधील स्वरूप, उद्देश इत्यादी घटकांनुरूप नेतृत्वाच्या स्वरूपातील वैविध्य निर्माण होते. २. प्राचीन काळी गुहांमधून वास्तव्य करणारा अप्रगत मानवी समूह असो किंवा आधुनिक पुढारलेला मानवी समुदाय असो. नेतृत्व या वैश्विक संकल्पनेचे अस्तित्व, प्रभाव व महत्त्व सर्वत्र प्रत्ययास येते. त्यामुळेच नेतृत्वविहीन समाज हा समाजच नव्हे, असे मत फ्रॅकलिन हायमन यांनी व्यक्त केले आहे. ३. धोरण ठरविणे व निर्णय घेण्याच्या कुठल्याही जनसमुदायातील प्रक्रियेवर नेतृत्वाचाच अंतिम व सर्वोच्च प्रभाव असतो. ४. कुठल्याही क्षेत्रातील विशिष्ट मानवी समुहाचे हित किंवा अहित अंतिमतः नेतृत्वाच्या निर्णय व धोरणांवरच अवलंबून असते. नेतृत्वाचे अनुकरण करण्याचा जागतिक समाजाचा मुलभूत नैसर्गिक स्वभाव आहे. ५. त्यामुळे 'यथा राजा तथा प्रजा' किंवा 'नेते तसे लोक' या उक्ती व्यवहारात जगात सर्वत्र अनुभवास येतात. विशिष्ट समुदायाची मानसिक जडणघडण, विचारपध्द्ती व प्रस्थापित नीतीमूल्यांच्या चौकटीवर नेतृत्वाचा महत्तम प्रभाव आढळतो. ६. त्यामुळे समुद्रात गलबतावरील शिडाचे जे महत्त्व असते, तसेच जागतिक मानवी समाजात नेतृत्वाचे महत्त्व असल्याचे आढळुन येते. एखाद्या संस्थेची विशिष्ट उदिष्ट्ये साध्य करण्यासाठी स्वतः कार्यरत राहून लोकांना किंवा सह्योगी कर्मचाऱ्यांना कामाची प्रेरणा व योग्य दिशा देण्याचा प्रयत्न नेतृत्वाकडून किंवा व्यवस्थापक वर्गाकडून केला जातो. नेत्यांनी हीच मध्यवर्ती भूमिका पार पाडायची असते. त्यांच्या नेतृत्व क्षमतेवरच संघटना, तिचे सभासद आणि अन्य अवलंबी घटकांची यशस्विता अवलंबून असते. ७. नेतृत्वात किंवा व्यवस्थापकीय वर्गात ते ज्यांचे नेतृत्व करतात त्यांना विशिष्ट उद्देशांच्या प्राप्तीसाठी प्रोत्साहित करण्याचे कौशल्य असणे आवश्यक असते. ८. नेते आणि त्यांचे नेतृत्व मानणारे यांच्यात परस्परविश्वास आणि सद्भाव असेल, तसेच नेत्यांच्या आदेशामागील

हेतूबद्दल श्रमिक वर्गात किंवा संस्थेच्या भागधारकांत कुठलाही किंतु नसेल, तर अपेक्षित उदिष्ट्ये वेगाने आणि दर्जेदारपणे साधली जातात. नेतृत्वाखाली काम करणाऱ्यांना बरोबर घेऊन जाण्याच्या दृष्टीने त्यांची नाडी ज्यास सापडते, तो नेता अशक्य कोटीतील साहसे यशस्वी करू शकतो. ९. कुठल्याही मानवी किंवा प्राणीसमुहाला देखील विशिष्ट सामुहिक उदिष्ट्ये प्राप्त करावयाची असतील, तर नेतृत्वामागे जावे लागते. समुहांचा नेता हा इतरांपेक्षा काही विशिष्ट गुणांनी युक्त असतो. त्याच्याकडे दूरदृष्टी, धाडस, बुध्दिमत्ता, समुहाचा विश्वास संपादन करण्याची पात्रता, विचारक्षमता इत्यादी खास गुण असतात. याशिवाय समूहाचा विश्वास संपादन करण्याची विशेष पात्रता त्यांच्या अंगी असते. त्यामुळे नेतृत्व सर्वसामान्य किंवा कमविलेल्या विशेष गुणांच्या आधारे लोकोत्तर नेतृत्व निर्माण झाली. १०. नेपोलियन बोनापार्ट, जॉर्ज वाशिंग्टन, अब्राहम लिंकन, फॅन्कलिन रूझवेल्ट, जोसेफ स्टॅलिन, व्लादिमीर लेनिन, विन्स्टन चर्चिल आदी पाश्चात्त्य नेतृत्वांत अनेक अतिविशिष्ट गुणांचा समुच्चय होता. त्यांनी इतिहास घडविला. ११. भारतातही १५० वर्षांच्या प्रदीर्घ स्वातंत्र्य लढ्यात पितामह दादाभाई नौरोजी, लोकमान्य टिळक, राष्ट्रपिता महात्मा गांधी आदींनी प्रभावी नेतृत्व दिले. आपल्याला हवी असणारी उदिष्ट्ये किंवा सामाजिक, राजकीय बदल घडवून आणण्याची क्षमता या नेत्यांमध्ये आहे, असा विश्वास वाटल्याने लोकांनी या नेत्यांसाठी तळहातावर शिर घेऊन त्यांच्या आदेशाचे पालन केले. ९ ऑगस्ट १९४२ रोजी 'करा अथवा मरा' हा महात्मा गांधीचा आदेश शिरसावंद्य मानून भारतीय जनतेने अभूतपूर्व चळवळ ३ वर्षे चालविली. मोठे नेते तुरूंगात असतानाही केवळ महात्मा गांधी यांच्या आदेशामुळे १९४२ ची चळवळ देशात जोशाने चालविली गेली. परिणामी, भारतास स्वातंत्र्य मिळणे अपरिहार्य झाले. जगातील अन्य महान राजकीय, आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन तसेच क्रांतीमध्येही नेतृत्वानेच मध्यवर्ती भूमिका बजावल्याचे दिसते.

कुटुंब–ग्राम–शहर–तालुका–जिल्हा–राज्य आणि राष्ट्र अशा सर्व पातळ्यांवर त्या–त्या पातळीवर नेतृत्व सुकाणूची भूमिका बजावित विशिष्ट जनसमुदायात सर्वमान्य,

सर्वहितैशी किंवा बहुजन हितैशी उदिष्टांच्या प्राप्तीसाठी प्रोत्साहित करीत असते. त्यामुळे घडलेली कुठलीही वैश्विक घटना ही नेतृत्वाचा विशिष्ट प्रभाव म्हणून जन्मते, असेही मत मांडले जाते. साराशंत: नेतृत्वाचा मानवी समुदाय, मानवी विकास, मानवी घडामोडी यांच्याशी निकटचा अपरिहार्य आणि अनन्यसाधारण संबंध असतो. कुठल्याही प्रकारचा देश, जात, धर्म, पंथ, लिंग आणि व्यावसायिक भिन्नत्व असणारा मानवी समुदाय हा प्रस्थापित नेतृत्वामुळे घडत असतो, पुढे जात असतो आणि प्रगती किंवा अधोगती करीत असतो. मानवी समूह करीत असलेल्या प्रत्येक प्रक्रियेत नेतृत्वाचे महत्त्व अनन्यसाधारण असते.

## नेतृत्वाची व्याख्या:—

नेतृत्वाची सर्वमान्य व्याख्या अद्याप निर्माण झालेली नाही. नेतृत्वाच्या अनेकविध व्याख्या जगातील विविध देशांत स्थलकालमापनापरत्वे केल्या गेल्या. नेतृत्वाचे स्वरूप, उद्देश, कार्यपध्द्ती इत्यादी अंगांनी त्याचा विचार करणाऱ्या विचारवंतांनी नेतृत्वाच्या विविध प्रकारच्या व्याख्या केल्या. व्याख्याकारांच्या व्यक्तिगत भूमिकांचा या व्याख्यांवर प्रभाव पडला. तसेच नेतृत्वाबद्दलच्या लोकांच्या अपेक्षा लक्षात घेऊन काहींनी त्याचा अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. या व्याख्येसंबंधी मत—मतांतराचा आढावा घेणे, ही संकल्पना अधिक चांगल्या प्रकारे समजण्यासाठी अत्यावश्यक आहे.

रॉबर्ट टेंननबॉम आणि फ्रेड मातरिक यांनी नेतृत्वाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली. विशिष्ट गुण किंवा कसोट्या आणि लोकांवरील प्रभाव या मुद्दांच्या आधारे नेतृत्वाची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. बर्नार्ड यांच्या मते, ''सामान्य जनांपेक्षा अधिक कार्यक्षम आणि आपल्या विचारांना लोकसहमती मिळविण्यात यशस्वी होणाऱ्या असामान्य व्यक्तीला नेता म्हणता येईल. अशा नेत्यांकडून केल्या जाणाऱ्या तदनुषंगिक कृती म्हणजे नेतृत्व''.

नेतृत्व ही एक सामाजिक व मानसिक प्रक्रिया आहे. त्यामुळे काही विचारवंतांनी नेतृत्वाचे गुण किंवा कसोट्या आणि लोकांवरील प्रभाव या मुद्दांच्या आधारे नेतृत्वाची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. ऑलपार्ट या विचारवंताने नेतृत्वाचा असणारा व्यक्तिगत प्रभाव महत्तम समजून त्याची व्याख्या केली. त्यांच्या मते, ''नेता व संबंधित जनसमुदायाचा परस्परसापेक्ष प्रत्यक्ष संपर्क किंवा पुढारी व त्यास मानणारे त्याचे भक्तजन यांचा समोरासमोर प्रत्यक्ष संबंध असणे आणि नेत्यांच्या आज्ञांचे पालन म्हणजेच नेतृत्व. समाजावरील एखाद्याचे व्यक्तिगत नियंत्रण म्हणजेच नेतृत्व''.

पिंगोरे या विचारवंताने समान व सर्वमान्य उदिष्ट साधण्यासाठी विशिष्ट समुदायास प्रवृत्त करण्याची हातोटी हा निकष मानून नेतृत्वाची व्याख्या केली. त्यांच्या मते, ''समान ध्येय प्राप्त करण्यासाठी लोकचेतनेवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याची आणि व्यक्तिभेद विसरण्यास भाग पाडून विशिष्ट समुदायाकडून समान ध्येयप्राप्तीसाठी कार्यक्षमतेने कार्य घडवून आणण्यासाठी मानवी प्रक्रिया म्हणजेच नेतृत्व''.

## राजकीय विचार या संदर्भातील अर्थ आणि व्याप्ती :—

आधुनिक काळात विकासाची संकल्पना ही सर्वच क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण मानली जाते. राज्यशास्त्रामध्ये विकास या संकल्पनेला अनुसरून राजकीय विकास ही संकल्पना समोर आली. राजकीय विकासाच्या अनुषंगाने विचार करून विकसित, विकसनशिल व अविकसित अशी राज्याची वर्गवारी करण्यात आली. त्यानुसार राजकीय विकासाचे निकष निर्धारित करण्यात आले. आधुनिक राज्यशास्त्रात राजकीय विकासासंबंधी विविध विचारकांनी आपआपल्या दृष्टिकोनातून राजकीय विकासाची संकल्पना स्पष्ट केलेली आहे. समाजात सतत वाढत जाणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या संस्था आणि संरचनांचे जाळे विणणे म्हणजे राजकीय विकास, असा नवा अर्थ त्याला प्राप्त झाला. आल्मंडच्या मते, प्रत्येक राजकीय व्यवस्था आधुनिकीकरणाकडे वाटचाल करीत असते व त्या संक्रमणाच्या प्रक्रियेला विकास ही संज्ञा देता येईल.

आधुनिकीकरणातून निर्माण होणाऱ्या समस्यांची सोडवणूक करण्याच्या राजकीय व्यवस्थेच्या क्षमतेमधील वाढ म्हणजे राजकीय विकास, असाही राजकीय विकासाचा अर्थ काही विचारक प्रतिपादित करतात. राज्यबांधणीच्या समस्येत राजकीय व्यवस्थेची संपूर्ण समाजावर पकड असणे, ही गोष्ट मुख्यत्वेकरून असते. यासाठी राजकीय व्यवस्थेत विविध यंत्रणा उभाराव्या लागतात. समाजाकडून राज्यकारभारासाठी आवश्यक असलेली साधन–सामग्री जुळविणे, त्यासाठी विविध यंत्रणा निर्माण करणे व नोकरशाहीची भक्कम चौकट निर्माण करून लोकांना राजकीय कर्तव्यासाठी बाध्य करणे इत्यादी बाबी राज्यबांधणीसाठी आवश्यक ठरतात. साधन–सामग्री समाजाकडून वसूल करण्याचे कार्य महत्त्वाचे आणि आव्हानात्मक असते.

राष्ट्रबांधणीसाठी समस्येत नागरिकांची राष्ट्राप्रती निष्ठा, ऐक्यभावना व राष्ट्राप्रती बांधिलकी यांचा समावेश होतो. लोकांमध्ये राष्ट्रीय ऐक्याची भावना त्यासाठी निर्माण होणे आवश्यक असते. सहभागाच्या समस्येमध्ये निर्णय निर्धारणप्रक्रियेत सहभाग प्राप्त करण्याचा प्रयत्न राजकीय व्यवस्थेतील अनेक गट, समुहकरिता असतो. नवनवीन मागण्या घेऊन नवनवीन गट निर्माण होत असतात. राजकीय व्यवस्थेत कार्यरत असणारे राजकीय पक्ष, दबावगट, हितसंबंधी गट इत्यादी दबावकारी संरचनांच्या माध्यमातून सुयोग्य सुसूत्रीकरण व अविष्कार होत गेल्यास या समस्येतून मार्ग काढणे राजकीय व्यवस्थेला सहज शक्य होते.

वितरणाची समस्या ही देखील महत्त्वाची समस्या असते. राष्ट्रीय संपत्तीमध्ये न्याय्य वाटा मिळणे व विकासाच्या संधी सर्वांना समान रीतीने उपलब्ध व्हाव्यात, ही सर्वांची रास्त मागणी असते. राष्ट्रीय संपत्तीचे न्याय्य वाटप साध्य करणे, हे काम तितकेसे सोपेही नसते, ते एक आव्हानात्मक समस्येच्या स्वरूपात राजकीय व्यवस्थेपुढे ठाकलेले असते.

## राजकीय विकासाची काही वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे नोंदवता येतील

१. राजकीय व्यवस्था ही विकासशील आहे असे तेव्हाच म्हणता येईल, की ज्या वेळी तिच्यात यशस्वीपणे टिकून राहण्याच्या क्षमतेत सतत वाढ होत राहील, नवनवीन प्रकारच्या सामाजिक उद्दिष्टांमध्ये सतत वाढ होत राहील आणि नवनवीन स्वरूपाच्या संघटना निर्माण होत राहतील.

२. राजकीय विकास निरंतर होत राहण्यासाठी समाजातील निरनिराळी क्षेत्रे व प्रदेश यांतील साधनसामग्री अधिपत्य व त्यावर शक्ति प्रदर्शन या स्वरूपात विभागीय व केंद्रित राजव्यवस्था अस्तित्वात येणे आवश्यक आहे.

३. राजकीय विकासात नवीन उदिष्ट्ये व मागण्या सुरू असणे याचा अर्थ असा की, राजकीय सत्तेचे वाटप समाजात व्यापक प्रमाणावर होत आहे व अंतिमतः सर्व व्यक्ती गट निर्णयनिर्धारण प्रक्रियेत सहभागी होत आहेत. तसेच मागण्यांची पूर्तता लवचिक पध्द्तीने करणे म्हणजे राजकीय विकास होय.

## विकासाचा अवलंबन किंवा आश्रित सिध्दांत

विकासाचा अवलंबन किंवा आश्रित सिध्दांत असे प्रतिपादन करतो की, तिसऱ्या जगातील देश अविकसित राहिल्याचे मुख्य कारण म्हणजे, त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या शक्तीबाहेरील शक्ती ठरवीत होत्या. त्या पूर्णतः बाहेरील शक्तींवर अवलंबून होत्या. भूतकाळात हे देश पुढारलेल्या भांडवलशाही देशांच्या वसाहती होत्या. त्यांची मोठ्या प्रमाणात लूट आणि शोषण या बड्या देशांनी केल्यामुळे ते देश अविकसित राहिले. वास्तविकता ही आहे की, प्रथम जगाच्या औद्योगिक विकास हा अविकसित देशातील माल आणि मानवी संसाधनाच्या शोषणातून झाला आहे. वसाहतींचा अंत झाल्यानंतरही पुढारलेले देश तिसऱ्या देशाची शोषणप्रक्रिया असमान विनिमयातून सुरू ठेवू इच्छितात व त्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आग्रह धरतात.

## सामाजिक विकास व्याख्या आणि वैशिष्ट्ये

समाज हा परिवर्तनशील आहे. समाजात होणारे परिवर्तन विविध घटकांमुळे होते हे आपण पाहिले आहेच. या घटकांबरोबरच आपण विकास, आधुनिकीकरण आणि जागतिकीकरण यामुळे समाजात होणारे परिवर्तन पाहणार आहोत. विकास ही संकल्पना रिमांड विल्सन यांनी सांगितली आहे व ती दुसऱ्या महायुध्द्‌ानंतर मोठ्या प्रमाणात वापरात येऊ लागली आहे. विल्सन यांच्या मते, विकास ही संकल्पना आर्थिक बदलातून उदयास आली आहे. तरीही विकास या संकल्पनेची बौध्दि्क पार्श्वभूमी पाहणे महत्त्वाचे ठरते. समाजशास्त्रातील अनेक विचारवंत विकास या संकल्पनेशी संबंधित आहेत. उदाहरणार्थ, ऑगस्त कॉम्त यांचे स्थिरशीलता आणि गतिशीलतेसंबंधीचे विचार, तीन अवस्थांचा सिध्द्‌ांत, कार्ल मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवादाचा सिध्द्‌ांत समाजातील परिवर्तन स्पष्ट करतो. चार्ल्स डार्विनचा उत्क्रांतीचा सिध्द्‌ांत १८५९ विकास संकल्पनेशी संबंधित आहे. त्याचबरोबर उल्फ, हेगेन या विचारवंतांचे विचारही विकास संकल्पनेशी संबंधित आहेत.

## संकल्पनेचा अर्थ

संकल्पनेचा अर्थ म्हणजे केवळ आर्थिक वृध्दी किंवा प्रगती एवढेच अभिप्रेत नाही, तर माणसांचा समाजाचा विचार होतो. आपण आर्थिक प्रगतीलाच विकास समजण्याची किंवा आर्थिक वृध्दीलाच केवळ विकास समजण्याची चूक करतो. विकास या संकल्पनेत साधारणत: जीवन जगण्यास अगदी अपरिहार्य असणाऱ्या बाबींचा समावेश होतो. तसेच विकास या संकल्पनेचा 'वाढ' व 'उत्क्रांती' या अर्थाने वापर होतो. कधी—कधी हाच विकास मानला जातो. समृध्दी, वैभव व संपन्नता म्हणजेच विकास म्हटला आहे. अशा विकासाची वेगळी कल्पना नसते. उदयोन्मुख समाजातही याच अर्थाने विकास या शब्दाचा वापर होतो, मात्र विकासाचा अर्थ आर्थिक प्रगतीच्या अर्थाने वापरला जात नाही, तर सर्वांगीण विकास या अर्थी वापरला जातो.

दारिद्र्य निर्मूलन. उदाहरणार्थ भूक, असुरक्षितता, अज्ञान, आरोग्य इत्यादी. १९८० मध्ये असे प्रतिपादन केले की मानवी विकास ही अशी प्रक्रिया आहे की, जी वाढत्या आर्थिक विकासाशी संबंधित आहे. १९९३ मध्ये UPDP यांनी असे प्रतिपादन केले की मानवी विकास हा व्यक्तिगत आशा–आकांक्षा याचाच एक भाग आहे. विकासाचे एक ध्येय असे ही असले पाहिजे, की ज्यात सुप्त शक्तीचा उपयोग करून समाजाला योगदान दिले पाहिजे. याद्वारे व्यक्ती ही स्वतःच्या क्षमतेला न्याय देऊन स्वाभिमानाने जगून कणखर समाज निर्माण करू शकेल. अशाप्रकारे आर्थिक वाढ, न्याय आणि जीवनमान दर्जा हे विकासाचा त्रिकोण पूर्ण करतात.

## पूर्वी झालेले साहित्य अभ्यासाचा आढावा

१९६० च्या नंतर वर्तनवादी अभ्यास पध्द्ती विकसित झाल्यानंतर स्थानिक पातळीवरील अभ्यास करण्यात सुरूवात झालेली दिसून येते. काही अभ्यासकांनी राज्य पातळीवरील अभ्यास करण्यासाठी राज्य हेच घटक पकडून अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. या अभ्यासातून पुर्ण राज्याला केंद्रस्थानी ठेवत निबंध लिहिण्यात आले होते. अगदी १९६० ते १९७० च्या दशकात प्रा. सिरसीकर (१९६५) आणि राम जोशी (१९६८) यांनी महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियाचा अभ्यास ठळकपणे केला. या अभ्यासात अगदी खोलवर विभागनिहाय प्रक्रियेचा अभ्यास न करता पुर्ण राज्याला केंद्रस्थानी ठेवत राजकीय संस्था कशा प्रकारे कार्यरत आहे याचा आढावा घेतला. या आढाव्यात विधिमंडळ, पक्षीय नेतृत्व आणि राजकारणाची वाटचाल या विषयीची मांडणी करण्याचा प्रयत्न केला. १९७० च्या दशकात कार्टर (१९७४), करॅस (१९७२) यांनी राज्यसंस्थेला केंद्रस्थानी न ठेवता राजकीय श्रेष्ठजन, पक्षातंर्गत गटबाजी, स्थानिक पातळीवर होणारी गटबाजी अशा काही मुद्दांना केंद्रस्थानी ठेवत अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. या अभ्यासातून प्रथम स्थानिक पातळीवरील काही राजकारणातील प्रश्न आणि प्रक्रिया कशी

घडते याचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. याच्या पुढे जात या राजकीय धोरणाचा स्थानिक पातळीवरील नागरी समाजावर काय परिणाम होतो. त्यातून राजकीय प्रक्रिया घडण्यास हातभार लागतो का? याचा अभ्यास रोझेन्थाल यांनी १९७७ साली केला होता. हे सर्व अभ्यासाचा आढावा घेण्यामागे राजकीय प्रक्रियेचा अभ्यास करत असताना या अभ्यासाची सुरूवात कशा प्रकारे होत होती हे पाहण्यासाठी आढावा घेतलेला आहे. मात्र या अभ्यासातून असे पुढे येते की, राजकीय प्रक्रिया ही स्थानिक पातळीवरून घडत असताना दिसून येते. पण अभ्यासरूपाने त्यावर चांगल्या प्रकारे प्रकाश टाकण्यात आला नाही. देश पातळीवर करण्यात येणाऱ्या राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासाच्या अनुषंगााने राज्य पातळीवरील राजकीय प्रक्रियेचे अभ्यास करण्यात आल्याचे दिसून येते. स्थानिक पातळीवरील घटक घेऊन सखोल अभ्यास करण्याची परंपरा ही १९८० च्या दशकानंतर सुरू झालेली दिसून येते. स्थानिक पातळीवरील जातींच्या अंगाने अनेक अभ्यासकांनी अभ्यास केल्याचे दिसून येते. त्यात रजनी कोठारी (१९७०), रूडॉल्फ आणि रूडॉल्फ (१९६७), एम. एन. श्रीनिवास (१९६२) यांनी १९६० आणि १९७० च्या दशकात अभ्यास केले आहेत. यांच्या अभ्यासानंतर स्थानिक पातळीवरील अनेक अभ्यास पुढे आलेले आहेत.

१९८२ साली जयंत लेले यांनी महाराष्ट्रातील राजकारणाची वैशिष्ट्ये ''Elite Pluralism and Class Rule'' या ग्रंथाच्या आधारे सांगण्यात आले आहेत. या अभ्यासाला एक सैध्द्ांतिक अशी चौकट आहे. (जयंत लेले, १९८२) या चौकटीत अभ्यास करताना जयंत लेले यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात प्रस्थापित समाजाचे वर्चस्व हे जातींचे राजकारणातील श्रेष्ठत्व स्थानिक पातळीवरील असणारे समाजाच्या स्थानामुळे येते. आर्थिक संस्था व आर्थिक व्यवहार हे प्रस्थापित समाजाच्या हातीच एकवटलेले असतात. राजकारणातून येणारी सत्ता आणि अराजकीय संस्थांच्या माध्यमातून येणारी सत्ता असे अनेक स्वरूपात सत्ताकेंद्र नागरी समाजात कार्यरत असतात. ही येथील प्रस्थापित समाजातील सत्ताभूक भागवणारी केंद्र असतात असे काहीसे निष्कर्षात्मक

अभ्यासातून पुढे येते. पण या अभ्यासाने स्थानिक पातळीवरील राजकीय प्रक्रिया कशा प्रकारे घडते हे विश्लेषणात्मक रूपाने पुढे आलेले दिसून येते.

१९७० पासून राजकारणातील आणि सामाजिक पातळीवरील जी स्थित्यांतरे असतात ते झपाट्याने पुढे आलेले दिसून येते. राज्याच्या राजकारणात स्पर्धा असलेली दिसून येते. मंडल आयोगाच्या नंतर तर मागास जातीं ह्या राजकारणात सक्रियपणे पुढे आल्या. या सक्रियतेला सामावून घेण्यासाठी राजकीय पक्षांत स्पर्धा सुरू झालेली दिसून येते. राष्ट्रीय पक्ष आणि राज्य पातळीवरील पक्ष देखील या प्रक्रियेचा भाग बनलेले होते. महाराष्ट्रात सर्वसाधारणपणे काँग्रेस, जनतादल, शिवसेना, भाजपा या पक्षांनी या मागास जातींतील नवअभिजनांना सामावून घेण्यासाठीचे प्रयत्न केले. पण भाजपाने जाणीवपुर्वक माधव माळी, धनगर आणि वंजारी या जातींना सामावून घेण्याचे प्रयत्न केले. त्यास यश आलेले दिसून येते. अर्थात जातींच्या अंगाने राजकीय प्रक्रिया घडवून आणण्याचे प्रयत्न हे राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटना यांनी हाती घेतल्याचे दिसून येते.

या बदलत्या राजकीय प्रक्रियेत राजकीय पक्ष, सामाजिक चळवळी, सामाजिक संघटना, आर्थिक हितसंबंध असणारे गट अशा अनेक पातळीवर छोटे छोटे अनेक अभ्यास पुढे आलेले दिसून येतात. पण १९८० मध्ये कमी प्रमाण आहे. १९९० नंतर अभ्यास पुढे येण्यास गती मिळालेली दिसून येते. पण अभ्यास करण्याचे निकष बदलेले होते. राजकीय पक्ष, जातीगट, वर्ग, स्थानिक पातळीवरील प्रश्न, आंदोलने, स्थानिक राजकारणातील निवडणुका अशा अनेक प्रश्नाला घेऊन अभ्यास करण्यात येत होते. काही अभ्यासकांनी जातींगट आणि राजकीय पक्ष अशा घटकांना घेऊन अभ्यास करण्याची सुरूवात ही १९९० च्या काळात सुरू केलेली दिसून येते. जातींच्या अंगाने राजकीय, आर्थिक आणि सामाजिक स्थानाचा अभ्यास करण्यात येऊ लागला. त्यात व्होरा व पळशीकर (१९९०) साली संयुक्तपणे अभ्यास केलेला दिसून येतो. महाराष्ट्राच्या राजकीय अर्थव्यवस्थेचा अभ्यास करण्याची सुरूवात ही १९८० पासून सुरू

झालेली दिसून येते. पण पळशीकर आणि देशपांडे (२००३) यांनी हा प्रश्न पुढे आणत एक प्रकारची अभ्यासाची चौकट तयार करून दिलेली दिसून येते.

२००० नंतर पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाने विविध विषयावर राजकीय प्रक्रियेचा अभ्यास करण्याची एक परंपरा सुरू केलेली दिसून येते. त्यात राजेंद्र व्होरा (२००३), सुहास पळशीकर (२००७), राजेश्वरी देशपांडे (२००४), नितिन बिरमल (१९९७), विवेक घोटाळे (२००५), हर्ष जगझाप (१९९६) याचा उल्लेख करावा लागेल. या मंडळीने एका एका विषयाला घेऊन राजकीय प्रक्रिया राज्य पातळीवर आणि जिल्हा पातळीवर कशा प्रकारे घडत आहे याचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे. सुहास पळशीकर आणि राजेश्वरी देशपांडे यांनी निवडणुकीच्या राजकारणाचा सविस्तर विश्लेषणात्मक अभ्यास केलेले आहेत. या अभ्यासाचा थोडक्यात आढावा घेतला असता असे दिसून येते की, सुहास पळशीकर आणि राजेश्वरी देशपांडे (२००३) यांनी त्यांच्या "Maharashtra challenges before congress system" या अभ्यासात पक्षीय राजकारण आणि राजकीय अर्थव्यवस्था यांच्या परस्परसंबंधाची चिकित्सा केली आहे. सहकारावर बावीस्कर (१९८०) मध्ये अभ्यास केला आहे. पक्षीय राजकारणाचा अभ्यास भा. ल. भोळे, सुहास पळशीकर यांनी विविध लेखाच्या माध्यमातून केलेला आहे. महाराष्ट्राचा राजकीय इतिहास सांगण्याचे काम य. दि. फडके यांनी आठ खंडाच्या माध्यमातून केला आहे.

राज्य पातळीवर ज्या प्रकारे अभ्यास करण्यात आलेले दिसून येतात. त्याच प्रकारे स्थानिक पातळीवर देखील अनेक अभ्यास झालेले दिसून येतात. शिवसेना या पक्षांच्या हिंदूत्ववादी भूमिका आणि वैशिष्ट्येपुर्ण स्थानामुळे अभ्यास पुढे आलेले आहेत. जयंत लेले (१९९६), सुहास पळशीकर (१९९९) यांनी हे अभ्यास केलेले आहेत. त्याच प्रमाणे राजकीय पक्षाला केंद्रस्थानी ठेवून अभ्यास करण्याची एक परंपरा विकसित करण्याची प्रमुख भूमिका सुहास पळशीकर आणि सुहास कुलकर्णी (२००७) यांनी संपादित केलेल्या 'सत्ता संघर्ष' या ग्रंथातून पुढे येते. या ग्रंथात पक्षाला केंद्रस्थानी ठेवत

कॉंग्रेस, भाजपा, राष्ट्रवादी, शिवसेना, डावे पक्ष, रिपाई अशा विविध पक्षांचा निवडणुकांचा आणि वाटचालीचा आढावा घेतलेला आहे. (पळशीकर, २००८) अलीकडच्या काळात निवडणुकीच्या विश्लेषणाचे देखील अभ्यास करण्यात येऊ लागले आहेत. त्यात स्थाानिक पातळीवरील निवडणुकापासून देश पातळीवरील निवडणुकांचे विश्लेषण करण्यात येत आहे. महाराष्ट्रातील निवडणुकीतील जागा आणि राजकीय पक्षाला मिळालेले मते यांचा अभ्यास हा पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाच्या माध्यमातून पुढे आलेला आहे.

जातींला केंद्रस्थानी ठेवून राजकारणाकडे पाहण्याची दीर्घकाळापासून एक परंपरा आहे. जातींला केंद्रस्थानी ठेवून राजकीय प्रक्रिया कशा प्रकारे घडून येते याचा अभ्यास १९९० नंतर पुढे येण्यास सुरूवात झाली आहे. पूर्वी जातींच्या विविध अंगाने राजकारणाचे सैध्दांतिकीकरण करण्यात येत होते. पण अलीकडे जातींच्या वर्तणुकीतील विविध भूमिकेचा निवडणुकीच्या राजकारणावर काय परिणाम होतो याचा वेध घेण्यात येऊ लागला आहे. त्यातून जमीन मालकी आणि जातींचे वर्चस्वाचा अभ्यास हर्ष जगझाप १९९७ आणि नितिन बिरमल १९९६ साली यांनी केला आहे. या अभ्यासात स्थानिक पातळीवर जमीन मालकी असणाऱ्या जातीं राजकारणात वर्चस्वशाली ठरत असल्याचे दिसून आले आहे. प्रस्थापित जातींबरोबरच शेतकरी ओबीसी जाती जमीनमालकीच्या आधारे राजकारणात पुढे येत असताना दिसून येते. जयंत लेले यांच्यापासून मराठा वर्चस्वाचे अभ्यास करण्यात येत आहे. मराठा समाजाचे राजकारणावर वर्चस्व आहे हे मान्य असले तर सुव्यवस्थित आणि नियोजनात्मक संशोधन पातळीवर पहिला अभ्यास हा जयंत लेले यांनी १९८० साली केला. या अभ्यासात ग्रामीण भागातील वर्चस्वाच्या सीमा आणि व्याप्ती ही तपासण्यात आली आहे.

मराठा वर्चस्वाचा अभ्यास करताना फक्त काही घटक घेऊन अभ्यास करता येणार नाही. तर त्यासाठी स्थानिक पातळीवर उपलब्ध साधनामध्ये सत्ताकेंद्र पुढे येत होते. त्या सत्ताकेंद्राचा देखील अभ्यास पुढे येणे आवश्यक होते. ते अभ्यास काहीसे

पुढे आलेले आहेत. तर काही करण्याच्या प्रक्रियेत आहेत. उदा. सहकार क्षेत्रातील अभ्यासात सहकार क्षेत्रावर मराठा समाजाचे वर्चस्व कसे आले आहे हा अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासात जयंत लेले, बास्वीकर (१९८०), राजेंद्र व्होरा (१९९९) यांनी पुढाकार घेतला होता. पण जातींच्या अंगाने राजकीय प्रक्रियाचा अभ्यास करण्याची व्याप्ती ही वाढवण्याचे काम सुहास पळशीकर, राजेंद्र व्होरा, राजेश्वरी देशपांडे यांनी विविध अभ्यासातून केल्याचे दिसून येते. शहरी भागातील राजकीय घटकांचा अभ्यास झाल्याचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, शहरी आणि निमशहरी भागाचा अभ्यास हा राजेंद्र व्होरा यांनी १९९६ साली केला. सेवा क्षेत्राचा अभ्यास हा राजेश्वरी देशपांडे यांनी १९९९ साली शहरातील असंघटिताचे राजकारण (हमाल पंचायत आणि संलग्न संघटनांचा अभ्यास) केलेला आहे. पुणे शहरातील सामाजिक आणि आर्थिक पिढीजात गतीशिलता कशा प्रकारे आहे याचा अभ्यास सुहास पळशीकर आणि राजेश्वरी देशपांडे यांनी २००७ – २००८ मध्ये सर्वेक्षणाच्या माध्यमातून अभ्यास केला आहे. अशा प्रकारे विविध अभ्यास राजकीय प्रक्रियेवर करण्यात आलेले आहेत. एक प्रकारे स्थानिक पातळीवरील राजकीय प्रक्रिया कशा प्रकारे विविध एककाच्या माध्यमातून घडून येत आहे याचा अभ्यास करण्यात आला आहे. पण एकत्रितरित्या विशिष्ट जिल्हा या भौगोलिक क्षेत्रातील राजकीय प्रक्रिया कशा प्रकारे घडून येत आहे?. कोणकोणते घटक एकाच वेळी राजकारणावर प्रभाव टाकत असतात? दुय्यम भूमिकेत दिसणारे घटक स्थानिक राजकारणात प्रभावी आणि जिल्हा राजकारणात दुय्यम भूमिका का घेतात? अशा विविध प्रकारच्या प्रश्नांची उकल ही जिल्हा पातळीवरील राजकारणातून होत असते. ती पुढे आणण्यात आलेली नाही. ती पुढे आणण्यासाठी अहमदनगर जिल्हा पातळीवरील राजकीय प्रक्रिया कशा प्रकारे घडून येत आहे याचा अभ्यास केला आहे.

## १९९० नंतर राजकारणात घडून येत असलेले बदल

राज्य पातळीवरील राजकारणाचा अभ्यास करताना देश पातळीवर १९९० च्या दशकात जे बदल घडून आले ते प्रथम लक्षात घ्यावे लागतात. जिल्हा पातळीवरील राजकारण राज्य पातळीवरील राजकारणाचा एक महत्त्वाचा घटक बनला आहे. दुसरे म्हणजे जागतिकीकरणाच्या धोरणामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाचा आर्थिक–राजकीय चौकटीत बदल घडून आला. तिसरे म्हणजे मंडल आयोगानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात मागास जाती पुढे आलेल्या दिसून येतात. चौथे म्हणजे राज्य पातळीवर प्रादेशिक पक्षांचा उदय होऊन राष्ट्रीय पक्षाला पर्यायी शक्ती म्हणून उदय झाला. या सर्व घटकांचा इतर घटकांबरोबर परिणाम हा स्थानिक राजकारणावर होतो. यातून प्रादेशिक अस्मितांचे राजकारण प्रादेशिक आणि राजकीय पातळीवर व्यक्त होऊ लागले. प्रादेशिक पक्षांकडून जातीवर आणि स्थानिक हितसंबंधावर आधारित अस्मिता जपण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न केले जाऊ लागले. त्यामुळे राज्य पातळीवरील राजकारणाचे प्रादेशिकीकरण/स्थानिकीकरण झाले. ओबीसी जातीमध्ये ज्या संख्येने मोठ्या आहेत, त्या स्थानिक पातळीवर इतर जातींच्या मदतीने राज्यातील राजकारणात मध्यवर्ती स्थान मिळवण्याचे प्रयत्न करू लागले. स्थानिक पातळीवर प्रस्थापित जातींना स्पर्धा करत असताना ओबीसी जातीं दिसून येतात. त्याच प्रमाणे जिल्हा पातळीवर देखील अशाच प्रकारे ओबीसी जातीं ह्या जिल्हा राजकारणात मध्यवर्ती येताना दिसून येतात. पण पुर्ण जिल्हा आणि मतदारसंघ पातळीवर वर्चस्व निर्माण करण्यात कमी पडत आहेत. प्रस्थापित नेतृत्वाच्या आश्रयाने मतदारसंघ स्थानिक पातळीवर पुढे येत आहेत. स्वतंत्र राजकारण करणे किंवा नेतृत्व विकसित करण्यास मर्यादा येत असताना दिसून येते.

**राज्य पातळीवरील राजकारणाचे अभ्यास करताना जिल्हा पातळीवरील राजकारणातून संदर्भ महत्त्वाचे असतात. ते पुढील प्रमाणे आहेत.**

- प्रादेशिक राजकारणातील जात हा घटक प्रभावी व मध्यवर्ती असतो.
- राजकीय नेतृत्वाची जडण–घडण प्रादेशिक पातळीवर होते. त्यात जातींची भूमिका महत्त्वाची असते.
- सामाजिक शक्ती या प्रादेशिक सीमांमध्येच अस्तित्वात येताना दिसतात. त्यांचा आधार हे वेगवेगळे जातींचे गट असतात.
- राजकीय पक्षांना निवडणुकांच्या दृष्टीने समाजसंघटन करण्याच्या प्रक्रियांमध्ये प्रादेशिक/स्थानिक पातळीवरच जातीगटाचा आधार अधिक उपयोगी ठरतो.
- जाती केंद्री आधारावर तयार झालेले प्रादेशिक राजकीय पक्ष प्रादेशिक पातळीवर विशिष्ट जात समुहाला केंद्रस्थानी ठेवून जनाधार मिळवण्याचा प्रयत्न करतात. तर काहीचा विरोध केला जातो या धोरणाला मुख्यत: जात हा आधार असतो.
- नव्याने पुढे येणारे अनेक उद्योग, सेवा क्षेत्र, औद्योगिकीकरणाचे उद्योग, शिक्षण, स्थानिक पातळीवर छोटे छोटे उद्योग, विविध समाज घटकांतून होणारे स्थलांतरीत समाज, शेती प्रश्न, शेती उत्पादन प्रश्न, स्थानिक पातळीवरील विविध प्रकारच्या निवडणुका आणि स्थानिक राजकारणातून हाती येणारे अधिकार पदे या सर्व घटकांच्या माध्यमातून राजकारणाचे स्थानिकीकरण घडून येत असताना दिसून येते. पण सर्व घटकांत सर्वच राजकीय पक्षांनी स्वीकारलेल्या जातकेंद्री भूमिकेमुळे आपोआप संख्येने मोठ्या असलेल्या जातीला प्रादेशिक पातळीवर राजकीय प्रभाव निर्माण करणे सोयीचे झालेले आहे. तसेच संख्येने असणाऱ्या ओबीसी जाती आणि आर्थिक ताकदीमुळे पुढे आलेल्या उच्च जाती ह्या काही प्रमाणात राजकीय सत्तेत भागीदारीच्या स्वरूपात पुढे आलेल्या आहेत. पण प्रस्थापित जातींना डावलता आलेले नाही.

## स्थानिक राजकारणात जात आणि नेतृत्वाचा सहसंबंध

अगदी स्थानिक स्तरावर जाऊन पाहिले असता असे दिसते की, जात आणि वर्ग यांचा सहसंबंध सहजपणे पुढे येईल. यामध्ये सत्य असे सापडते की, भांडवली व्यवसायातील वर्गवारीमध्ये सामाजिक वर्णव्यवस्थेतील उच्च जातीतील व्यक्ती उच्च व्यवसाय करताना दिसतात, तर कनिष्ठ जातीतील व्यक्ती कनिष्ठ व्यवसायात असताना दिसतात. पण कनिष्ठ समाजातूनही भांडवली व्यवसायात गुणवत्तेच्या आधारे प्रत्येक जातींत मध्यम प्रतिष्ठित व्यवसाय करणारा एक वर्ग तयार झालेला आहे. हा वर्ग आकाराने मोठा आहे असे नाही. तर तो छोटासा का होईना हा वर्ग तयार झालेला आहे. भांडवली विकासाचा आणि सामाजिक श्रेणी मधील प्रत्येक जातीतील अनेक लोकांनी (विशिष्ट वर्गाने) पारंपारिक जातीचा व्यवसाय सोडून नवीन व्यवसाय स्वीकारलेला आहे. या वर्गाने जात टिकवून ठेवलेली आहे. तर तो वर्ग आर्थिक बळकटी स्वत:ला प्राप्त करण्यासाठी हमेशा जातींचा आधार घेतो. त्यासाठी जातींचा आधार त्या वर्गाला उपयुक्त ठरणारा असतो. तसेच आर्थिक सुरक्षेसाठी जातींचे भांडवल वापरणे त्या वर्गाला परवडणारे असते, कमी खर्चाचे असते. मात्र अशा प्रक्रियेमुळे असे दिसते की, प्रत्येक जातींमध्ये आर्थिक बाजूनी स्तरीकरण झालेले दिसते. (देशपांडे २००७, पृ. ६१ ते ७०) प्रत्येक जातींच्या इतर लोकांना आपल्या जातीतील कोणी तरी मोठ्या प्रमाणावर भांडवलदार किंवा मोठी प्रतिष्ठा प्राप्त केलेली आहे. तो उच्च वर्णीय व श्रीमंत लोकांबरोबर वावरत असल्याचे समाधान वाटत असते. त्यामुळे त्यांची सुरक्षेची जबाबदारी आपली आहे असे वाटत असते. मात्र प्रत्येक जातीतून भांडवलांच्या आधारावर निर्माण झालेला हा वर्ग जातीं अंतर्गत गरीबीवर पांघरून घालण्याचे काम करत असतो. भांडवली आधारावर निर्माण झालेल्या उच्च व्यवसायात व सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करण्यासारख्या असलेल्या व्यवसायाचा स्वीकारणारा हा मध्यम वर्ग तयार झालेला आहे. जाती अस्मितेचा आधार आणि प्रतिकांचे वापर हा वर्ग मोठ्या प्रमाणावर करत आहे. या वर्गाकडूनच जातींच्या अस्मिता व प्रतिकांच्या मागण्या तयार करून पुढे रेटण्यासाठी व

जातीमध्ये प्रतिष्ठा मिळवण्याचे कार्य करत आहे. अगदी लोकसंख्येने छोट्या असलेल्या जातींही अशा स्वरूपाच्या कार्यात गुंतलेल्या आहेत. अर्थात सर्वच जातींमध्ये आर्थिक पातळीवर विभागणी झालेली आहे. त्यातून आर्थिक स्तरावर गरीब आणि श्रीमंत अशी दरी वाढत जाऊन समाजातील भौतिक संघर्ष पुढे येत आहे. हा संघर्ष जातींतील आर्थिक बाबतीत पुढारलेल्या वर्गाकडून 'जातीं अस्मितेचे' व्यापक भांडवल राजकीय सत्तेत येण्यासाठी वापरण्यात येत आहे. एक प्रकारे जातीचा राजकारणात व समाजकारणात शस्त्र असल्याप्रमाणे वापर होत आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात जातींच्या आधारावर संस्थात्मक बांधणी करण्यात सोपे गेलेले आहे. त्या माध्यमातून जात आणि राजकारण सहसंबंध अगदी सार्वजनिक जीवनात येऊन त्यांचे प्रतिमान सत्ता केंद्रात पडत असताना दिसून येते. त्यात राज्याने जातींच्या आधारावर मागासलेपणाची ओळख मान्य केल्याने त्या संदर्भांतील चर्चा पुढे आलेली होती. या चर्चातून जातींच्या आधारावरच आरक्षणाची मागणी मान्य करण्याचा निकष वापरण्यात आला होता. त्यामुळे अनेक जातींना आरक्षण मिळवणे हा आपला हक्क आहे असे वाटू लागलेले होते. त्या संदर्भातून अनेक वर्चस्वशाली जातींनी व्यवस्थितरीत्या तशी आखणी केलेली होती. दुसरे असे की, जात हा समाजाचे संघटन करण्यासाठीचा मुद्दा मिळालेला होता. त्याचा फायदा अनेक वर्चस्वशाली जातींच्या नेतृत्वाने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष उचलण्याचा प्रयत्न केला. शासनाकडून आरक्षणाचे धोरण हे फक्त राज्याच्या अधिकार क्षेत्रात असलेल्या नैसर्गिक या धनसंपत्ती व नोकऱ्या या पुरतेच मर्यादित करण्यात आलेले आहे. शासकीय नैसर्गिक व धनसंपत्तीवर अनेक जातींकडून वाढीव अधिकार असल्याचे दावे आले आहेत.

## १९९० नंतर जात आणि राजकीय नेतृत्वामधील स्थित्यंतरे

एका पातळीवर जातींचे आधुनिकीकरण होत होते. त्यात शहरीकरणासारखे ठिकाणाचे आणि ग्रामीण भागातील आधुनिकीकरण यात दोन टप्पे असताना दिसतात. अनेक समाज घटकांमध्ये शिक्षणाचा प्रचार व प्रसार होत होता. त्यात जातींनी

ऐहिकीकरणाची भूमिका स्वीकारलेली होती. ती महत्त्वाची ठरत होती. दुसऱ्या बाजूला भांडवली उत्पादनांतून होणाऱ्या विकासाचा फायदा अनेक जातीं स्वीकारत होत्या. तसेच वेगवेगळ्या पातळ्यावरील भांडवली उत्पादन पध्द्ती जातीं स्वीकारत होत्या. उदा. भांडवली आधारावर तयार झालेला मालाचे स्थंलातर करण्यासाठीचे हातावरील काम करण्याची जीवन पध्द्ती (माथाडी, ऊसतोड इ.) काम हे ओबीसी मधील अनेक जातींनी स्वत:चे पारंपारिक व्यवयाय सोडून स्वीकारले आहे.

दुसरे असे की अनेक पक्ष पध्द्तीच्या स्पर्धेच्या स्थानिक राजकारणात जातींचे आणि लोकशाही राजकारणाचा सहसंबंध समजून घेणे गरजेचे आहे. जातींची भूमिका स्थानिक राजकारणात नेहमीच महत्त्वाची राहिलेली आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील राजकारणात भाषेच्या घटकांशिवाय प्रादेशिक/स्थानिक पातळीवर प्रस्थापित/वर्चस्वशाली असणाऱ्या जातींची भूमिका महत्त्वाची राहिलेली होती. तर मंडल आयोगाने अनेक मागास जातींमध्ये नव्याने राजकीय अविष्कार निर्माण केला. यातून लोकसंख्येने मोठ्या असलेल्या जातींतील नेतृत्व पुढे आलेले आहे. त्यामुळे या मागास जातीं स्थानिक राजकारणात नंतरच्या काळात प्रभावी आणि सत्तेत सहभागी झालेल्या आहेत.

तिसरे असे की बहुसंख्येने असलेल्या पण सामाजिक श्रेणीत मागास असलेल्या जातींमध्ये मंडल आयोगाने राजकारणात सहभागी होण्याची भावनिक आधारावर गती दिल्याने राजकारणाचे स्वरूपच बदलून गेलेले होते. मात्र प्रत्येक राज्यात एक प्रकारे राजकारणात कनिष्ठ जाती पुढे येत असताना या जातींनी जात आघाडी केलेली नाही. एका एका स्वतंत्र जातींनी शासनाशी व राजकीय पक्षांशी दोन्ही पातळीवर सौदेबाजी करण्याचा प्रयत्न झालेला आहे. मात्र मंडल आयोगापासून मागास जातींच्या पक्षांची पीछेहाट झालेली होती. तर मागास जातीं ह्या राष्ट्रीय पक्षाकडे वळलेल्या आहेत. तर काही राज्यात मागास जातींचे पक्ष सत्तेत जाण्यास यशस्वी ठरलेले होते. मात्र महाराष्ट्र पातळीवर मागास जातींच्या आधारावर राजकारण करण्याची खेळी यशस्वी झालेली नाही. कारण राजकीय पक्षांनी स्वतंत्र जातीच्या लोकसंख्येच्या आधारावर राजकारण करण्याचा

प्रयत्न केलेला होता. या राजकारणात राजकीय पक्षांचा सामाजिक पाया अगदी प्रादेशिक व स्थानिक पातळीवर तयार झाला होता. तो राज्य स्तरावर निर्माण करता आलेला नाही. कारण कोणतीही एक जात ही मराठा वगळता अखिल राज्यपातळीवर सापडणारी नाही. परिणामी सर्वच राजकीय पक्षामध्ये एकाच जातींचे विभाजन झालेले दिसून येते. एक प्रकारे राजकीय पक्षाचा पाया एक किंवा दोन जातीपुरताच मर्यादित स्वरूपाचा असताना दिसून येत नाही. मराठा समाजाचे नेतृत्व सर्वच राजकीय पक्षात असताना दिसून येते. ओबीसीतील नेतृत्वाने जिल्हा राजकारणात दुय्यम भूमिका घेत पुढे येत असताना दिसून येते. तर दलित नेतृत्व आरक्षणाच्या कारणाने जिल्ह्याच्या राजकारणात असताना दिसून येते. तर उच्च जातींचे नेतृत्व हे सौदेबाजी आणि भूमिका या आधारावर मराठा समाज नेतृत्वाबरोबर कार्यरत असताना दिसून येते.

राज्याच्या राजकारणाचा विचार करता जात आणि सरंजामदारी असणारे घराणे यांचा राजकारणाशी असणारा संबंधातून पारंपारिक स्वरूपातील संबंधाप्रमाणे राजकारणाचे संघटनात्मक स्वरूपातून सामाजिक श्रेणी प्रमाणे काही साचे उदयाला आलेले आहेत. या साच्याने राजकारणात सुरूवातीचे काही दशके पक्के वर्चस्व निर्माण केले होते. त्या जोखडातून बाहेर पडण्याची प्रक्रिया ही १९८० च्या दशकात मागास जातींच्या (ओबीसीच्या) बेरजेच्या राजकारणातून पुढे येण्यास सुरूवात झाली आहे. मात्र त्यास काही राज्यात जोरदार प्रतिसाद मिळालेला आहे तर काही राज्यातील स्थानिक पातळीवरच ही प्रक्रिया थांबलेली आहे. दुसरे असे की, राज्यात स्वातंत्र्योत्तर काळातील राजकारणात जाती आधारावर व सरंजामशाही आधारावर पारंपारिक पध्द्तीचे राजकीय स्वरूपात कप्पेबंद साचे उदयाला (Building block of political organization) आले आहेत. जात नेतृत्वाकडून उभ्या व आडव्या अशा दोन्ही प्रकारे संघटन करून जातीमध्ये गतीशिलता (Mobility) निर्माण केलेली आहे. (रूडॉल्फ, १९७०, पृ.२४ ते ७०) भारतातील काही भागात ठरणाऱ्या सामाजिक दर्जाबाबत काही आघाड्या, जातीच्या विकासासाठीची रणनिती व पुर्नबांधणी करण्यासाठी झालेल्या होत्या. त्यातून आधुनिक

निर्माण झालेल्या राजकीय उद्योजक (Political Entrepreneurs) पुढे आले आहेत. या राजकीय नेतृत्वाकडून स्वतंत्र जातीच्या माध्यमातून मतदारसंघाची परिणामकारकरीत्या बांधणी केली जात आहे. तसेच जात सहकाऱ्यांच्या माध्यमातून आर्थिक, उत्पादन व व्यापार हितसंबंध या माध्यमातून नेतृत्वाला वर्चस्व निर्माण करणारी मतदार बांधणी तयार झालेल्या आहेत. (चंद्रा – २०००) उदा. उत्तर भारतात पुढे आलेली बहुजन समाज पक्षाने शहरी भागातील आपला पक्ष पाठिंबा आर्थिकदृष्ट्या सधनता प्राप्त केलेल्या मागास जातीतील अभिजनांना संधी देत नवीन राजकीय उद्योजक (Agent) पुढे आणले. या नवीन राजकीय उद्योजकांनी स्वत:च्या जातीची पुर्नबांधणी जातीच्या आधारावरच व्यवस्थितरीत्या केलेली होती. (चंद्रा – २०००) यामुळे भारतात कमी अधिक प्रमाणात जात हा घटक राजकीय गतीशिलता/संघटन करण्यासाठी मुख्य व प्रभावी असे साधन आहे. जातींनी येथील समाजाला एक प्रकारे संरक्षण आणि राजकीय गती (force) दिलेली आहे. दुसऱ्या बाजूला जातीच्या आधारावर चालणाऱ्या राजकारणाला उतरती कळा लागली आहे असे म्हणावे लागते. परंतु वैध स्वरूपात जाती संघटित स्वरूपात वावरू लागल्याने राजकीय निवड (Political Choice) आणि राजकीय संघटन (Political Organization) अशा संधी उभ्या राहिलेल्या आहेत.

## स्थानिक प्रश्नांचा राजकीय नेतृत्वावर पडणारा प्रभाव

१९७१ च्या निवडणुकीच्या वेळी इंदिरा गांधी (काँग्रेस) ने 'गरिबी हटाव' ची घोषणा केली होती. या घोषणेपासून सर्वच राजकीय पक्षांनी आपल्या कार्यक्रम अजेंड्यावर अशा स्वरूपाचे आश्वासने कार्यक्रम पत्रिकेवर आणले आहेत. अशा स्वरूपाचे कार्यक्रम हे लोकांपर्यंत कसे जाईल याचा पवित्रा घेतलेला दिसतो. त्यामुळे केंद्रीय पातळीवर लोकांना विकासाचे मिळणारे अजेंडा आणि स्थानिक पातळीवरील उमेदवारांकडून मिळणारी घटकांची भर पडलेली आहे. त्यामुळे लोकांना मिळणाऱ्या आश्वासनांचे फुगवटे वाढत गेले आहेत. या आश्वासनात गाव पातळीवर शाळा बांधणी, रस्ता कामे, नवीन रस्ता कामे, आरोग्याच्या सुविधा देणे, समाज मंदिरांचे काम, गावांतील

मंदिरांचे काम, मंदिराला बांधकामाची देणगी देणे, पाणी पुरवठा व वीज उपलब्धता इ. प्रकारच्या कामाचे आश्वासने देण्यातून मतांवर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केला जातो. या प्रश्नांच्या व आश्वासनांच्या माध्यमातून जातींच्या विकासाची भाषा केली जाते. दुसरीकडे ही दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी ज्या वेळी वेळ येते त्यावेळी ज्या नेतृत्वाकडून आश्वासने पूर्ण करत आहे. त्याच्य नेतृत्वाकडून स्वतःच्या जातीच्या व्यक्तीला त्या कामाची ठेकेदारी दिली जाते. जर तसे होत नसेल तर ठेका मिळण्यासाठी मोर्चा बांधणी करण्यात येते. संघटन करून राजकीय नेतृत्वावर प्रभाव टाकण्याचे प्रकार पुढे आले आहेत.

राजकीय पक्षाच्या कार्यक्रमांना गर्दी करण्यासाठी स्थानिक जातींच्या नेतृत्वावर दबाव आणला जातो. त्यामुळे स्थानिक नेतृत्व स्वतःच्या जातीच्या लोकांना जो की ज्याच्या प्रभावाखाली आहेत, अशा लोकांना कार्यक्रमात सहभागी होण्यास भाग पाडतात. कारण नेतृत्वाला स्वतःची शक्ती प्रदर्शन करत पक्षांच्या वरिष्ठ पातळीवर स्वतःचे प्रभाव क्षेत्र दाखवयाचे असते. यातून दोन बाबी पुढे येतात. एक म्हणजे अशा कार्यक्रमामुळे लोकांचा राजकारणातील सहभाग वाढतो. लोकांना राजकीय शिक्षण मिळत जाते. दुसरे म्हणजे राजकीय पक्ष स्थानिक पातळीवरील नेतृत्वावर खूष होऊन त्यांची शासकीय कामे मार्गी लावली जातात. अलीकडे राजकीय पक्षांनी आपले कार्यक्रम अगदी स्थानिक पातळीवर करण्यास सुरूवात केली आहे. या कार्यक्रमामुळे स्थानिक पातळीवर नेतृत्व, संघटनांचे पदाधिकारी यांची युती होत असताना दिसते. मात्र लोकांचा या कार्यक्रमामुळे अगदी जवळून परिचय होताना दिसतो.

## सामाजिक संघटनाचा राजकीय नेतृत्व आश्रयाने वावर

लोकांचा कल हा राजकीय पक्षात संघटित होण्याऐवजी सामाजिक संघटनांच्या माध्यमातून जास्त आहे असे दिसते. कारण राजकीय पक्षाकडून आश्वासने देऊन पाळली जात नाहीत. कारण प्रचारात ही आश्वासने मतदान मिळवण्यासाठी दिलेली असतात ही सर्व आश्वासने पूर्ण केली जात नाहीत. ही आश्वासने पुढील निवडणुकीत देखील

वापरण्यात येतात असे चालू राहताना दिसते. मात्र सामाजिक संघटनाकडून या आश्वासनांसाठी पाठपुरावा करण्यात येतो. कारण लोकांचा पाठिंबा याच मागणीला पकडून दिलेला असतो. सामाजिक संघटना आपली मागणी ही राजकीय पक्ष राजकीय नेतृत्व, राज्य संस्था यांच्याकडे करत आहे. त्यामुळे नेहमीच संघटना व इतर संस्था यांच्यात मतांच्या आधारावर सौदेबाजी होत असते. सामाजिक संघटनांच्या माध्यमातून व्यक्तीचे प्रश्नांना पुढे आणण्यात येत आहेत. व्यक्तीचे कोणते प्रश्न आहेत हे व्यक्तीला न ठरवता सामाजिक संघटना ठरवत आहेत. त्यामुळे व्यक्तींच्या दैनंदिन जीवनात संघटनांचा मोठा हस्तक्षेप होत आहे. तसेच राजकीय जाणीवा आणि गतीशिलता आणण्याचे काम ह्या संघटना करत आहेत.

## राजकीय नेतृत्व आणि राजकारणाचे प्रादेशिकीकरण

१९८० नंतर जातींच्या आधारे नव्याने सामाजिक शक्ती उदयाला येण्यास सुरूवात झालेली दिसते. या सामाजिक घटकांना दोन घटकांनी मोठा हातभार लावलेला आहे. एक म्हणजे प्रादेशिक पक्ष. दुसरे म्हणजे ओबीसी व तत्सम संख्येने असलेल्या जाती. हे दोन पूर्वीदेखील राजकारणात कार्यरत होते. मात्र काँग्रेस पक्ष हा मजबूत असल्याने या घटकांचे अस्तित्व जाणवत नव्हते. पण जसा जसा काँग्रेस पक्ष कमकुवत होत गेलेला दिसतो तसे तसे हे दोन घटक राजकारणात पुढे आलेले दिसतात. जातींचे प्रादेशिक पातळीवर नवे राजकारण, प्रादेशिक घटकांच्या आधारावर प्रादेशिक पक्षाचा उदय, आघाडीची संमिश्र सरकारे, राष्ट्रीय पक्षांनी देखील प्रादेशिक पक्षाप्रमाणे जातीवर आधारित करण्यात येणारे संघटन करण्यास सुरूवात झाल्यावर हे दोन घटक राजकारणात पुढे आले आहेत.

काही प्रादेशिक पक्षांचा उदय जरी काही जातींच्या Exclusion मधून असला तरी नंतर अशा पक्षांना आपला जातीच्या Exculusion चा विचार प्रणाली बदलावी लागलेली आहे. या पक्षांना इतर समदर्जा व सामाजिकदृष्ट्या काही बाबतीत समान असणाऱ्या समाजाकडे या पक्षाकडे वळावे लागले आहे. त्यामुळे अशा पक्षांना काही प्रमाणात उभे

राहता आले आहे. उदा. महाराष्ट्रात रिपाईला ओबीसी समाजाचा पाठिंबा मिळवण्यासाठी बहुजन महासंघाकडे वळावे लागले आहे. तर उत्तर प्रदेशात बसपाला दलित समाजाबरोबरच ओबीसी व उच्च जातींना बरोबर घ्यावे लागले आहे. रिपाई व बसपा या दोन्ही पक्षांनी प्रथम दलित मतांवर नियंत्रण करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र नंतर या दोन्ही पक्षाला ओबीसी मताकडे वळावे लागले आहे.

१) राज्यातील राजकारणाचे क्षेत्र हे अखिल राज्य पातळीवर कमी कमी होत जात घटकाच्या आधारे स्थानिक क्षेत्र बनले आहे. घटक राज्यातील राजकारणात निवडणुकीतील स्पर्धा, उमेदवारांची निवड, विकासाचा अजेंडा, निवडणुकीतील अस्मिता, इ. घटक पुढे आलेले आहेत. त्यातून राज्य पातळीवरील राजकारणाचे प्रादेशिकीकरण झालेले आहे. त्यामुळे राज्य पातळीवरील विषय हे अलीकडे खूप कमी प्रमाणावर झाले आहेत. स्थानिक घटक, प्रश्न, समस्या हे राज्याच्या राजकारणात मध्यवर्ती आले आहेत. २) नेतृत्वाची जडण–घडण स्थानिक पातळीवर होते. आता राज्य पातळीवरील नेत्यांचा फारसा प्रभाव न पडता प्रादेशिक नेतृत्व साकारताना दिसते. राज्या–राज्यातील निवडणुका म्हणजे प्रादेशिक नेतृत्वाविषयीचा जनमानसाचा कौल असतो. ३) प्रादेशिक शक्ती प्रादेशिक पातळीवरच सीमामध्येच अस्तित्वात येताना दिसतात. त्यामुळे पक्षाचा आधार स्थानिक पातळीवर वेगवेगळे असतात. ४) निवडणुका, जनसंघटन या राजकीय प्रक्रियेत लोकांपुढील पर्याय हे स्थानिक पातळीवरील असतात. ५) राजकीय स्पर्धा स्थानिक पातळीवर होत असल्यामुळे स्पर्धेच्या निष्पत्ती प्रादेशिक संदर्भ असतात. या पाच मुद्यांच्या आधारे सुहास पळशीकर यांनी प्रादेशिक पातळीवर राजकारण घडते असा निष्कर्ष काढला आहे. (पळशीकर, २००४, पृ. १०४) एकूणच प्रादेशिक पातळीवर जात आणि प्रादेशिक राजकारण समजावून घेताना अंतर्गत जो गुंता असतो त्याचा सहसंबंध प्रादेशिक व राज्य पातळीवरील राजकारणातून समजावून घ्यावा लागतो. मध्यम व कनिष्ठ जाती राजकारणात पुढे येण्यास सुरूवात झाल्यावर प्रादेशिक पातळीवर जात व आणि राजकारण याचा संबंध येऊ लागला असे काही अभ्यासातून पुढे आले आहे.

प्रादेशिक पातळीवरील राजकारण हस्तगत करण्यास सुरूवात झाली. तशीच प्रादेशिक पातळीवरील वर्चस्व कमी होऊ नये यासाठी राष्ट्रीय पक्षांनी देखील जातींकेंद्री भूमिका घ्यावी लागली आहे. राजकारणापासून वंचित घटकांकडे प्रादेशिक पक्षाकडे वळण्यास सुरूवात केलेली होती. मात्र नंतर राज्याच्या राजकारणात सक्रिय असणारे समाज देखील प्रादेशिक पक्षाकडे वळले आहेत. या सर्व माध्यमातून स्थानिक पातळीवरील राजकीय नेतृत्वाच्या प्रक्रियेच्या माध्यमातून आर्थिक आणि राजकीय योगदानाचे अभ्यास पुढे येणे अपरिहार्य झाले आहे. त्या दृष्टिकोनातून प्रस्तुत प्रबंधात ''अहमदनगर जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकासात राजकीय नेतृत्वाच्या योगदानाचा अभ्यास : १९९३ ते २०१०'' हा अभ्यास करण्यात आला आहे.

## अहमदनगर जिल्हा निवडीचे कारणे

१९९० नंतर राज्य पातळीवरील राजकारणात जिल्हा पातळीवरील राजकारण हे एककाच्या भूमिकेत पुढे आले आहे. स्थानिक पातळीवर घडून येणाऱ्या छोट्या–छोट्या भूमिका देखील जिल्हा पातळीवरील राजकारणात परिणामकारक ठरत असताना दिसून येतात. तेव्हा प्रत्येक जिल्हा पातळीवरील राजकारणाची प्रक्रिया ही वेगवगेळ्या पातळीवर साकारताना दिसून येते. जिल्हा पातळीवरील राजकीय नेतृत्व जिल्ह्याच्या अंतर्गत असणारे समाज वास्तव, सामाजिक जडणघडणीची वाटचाल, आर्थिक उत्पादनाचे स्त्रोत, कच्चा माल निर्मिती आणि या कच्च्या मालाच्या निर्मितीवर प्रक्रिया करणारे पक्क्या मालाची प्रक्रिया करणारी कारखानदारी, सांस्कृतिक वाटचाल, राजकीय नेतृत्व निर्मितीची साधने आणि जिल्ह्याच्या अंतर्गत असणारे नैसर्गिक साधनसंपत्ती इ. घटक पुढे येत असताना दिसून येते.

महाराष्ट्र राज्याचे झपाट्याने शहरीकरण होत आहे. निमशहरीकरणाचा विस्तार वाढत आहे. यात अहमदनगर जिल्हा हे एक उदाहरण आहे. या शहरीकरणाच्या चौकटीत राजकारणाचा आणि राजकीय नेतृत्वाचा मुळ गाभा हा काहीसा बदलत असताना दिसून येतो. शहरीकरणाच्या चौकटीत राजकारणात मुलगामी बदल होत

असताना येथील राजकीय नेतृत्व देखील स्वत:त बदल घडवून आणत असताना दिसून येते. पण आर्थिक आणि राजकीय बदलाचे नेतृत्व अनेकदा राजकीय नेतृत्वाच्या हाती असताना दिसून येते. आर्थिक विकासासाठीच्या दबावाचा जोर वाढत असताना देखील जिल्हा पातळीवरील राजकीय नेतृत्वाकडून राजकारणावरील वर्चस्व कमी होऊ दिले जात नाही. अनेकवेळा आर्थिक शक्ती ही राजकीय शक्तीपुढे कमी पडेल असे दिसत असताना देखील राजकीय शक्ती ही सातत्याने निर्णायक आणि परिणामकारक ठरलेली आहे. नवीन नेतृत्व उदयाला येत असताना सामाजिकपेक्षा आर्थिक निकष हा जास्त महत्त्वाचा बनत आहे. तरीही सामाजिक आणि सांस्कृतिक असणारा आशय कमी होत नाही. तर नेतृत्वाला बहुआयामी होत नेतृत्व विकसित करावे लागते. या चौकटीत सामाजिकदृष्ट्या प्रस्थापित जातींतूनच नेतृत्व पुढे येण्याचा वेग जास्त असताना दिसून येतो.

राज्याच्या राजकारणाचे एकक हे जिल्हा घटक आहे असे मानून जिल्हा पातळीवरील राजकीय नेतृत्वाचा जिल्हा राजकारणातील सामाजिक आणि आर्थिक क्षेत्र विकासासाठी कोणत्या स्वरूपातचे योगदान राहिलेले आहे?. या बाबीचा अभ्यास करणे आवश्यक आहे. यासाठी अहमदनगर जिल्ह्याच्या आर्थिक आणि राजकीय विकास प्रक्रियेत राजकीय नेतृत्वाचे योगदान कोणत्या स्वरूपात राहिले आहे?. कोणत्या पातळीपर्यंत नेतृत्वाच्या भूमिका राहिल्या आहेत? अशा अंगाने हा अभ्यास करण्यासाठी निवडलेला आहे. राज्याच्या राजकारणात अहमदनगर जिल्ह्याच्या राजकारणाचा संबंध मोठ्या प्रमाणावर येतो. स्थानिक पातळीवरील राजकीय नेतृत्वाचा आढावा घेताना असे दिसून येते की, ग्रामपंचायत पातळीपासून जिल्हा पातळीपर्यंत अनेक घडामोडी घडून येत आहेत. तसेच विविध संस्था, सहकारी संस्था, स्थानिक सहकारी इतर संस्था ह्या राजकीय नेतृत्वाच्या प्रभावातून विकसित झालेल्या आहेत. या राजकीय नेतृत्वाच्या अनुषंगाने राजकारणात ज्या संस्था प्रभाव निर्माण करण्यासाठी असतात त्या सर्व संस्था अहमदनगर जिल्ह्यात असल्याचे दिसून येते.

अहमदनगर जिल्हा हा शहरी भागापेक्षा ग्रामीण पातळ्याचे प्रतिनिधित्व करत आहे. अलीकडे निमशहरी आणि काहीसे औद्योगिक परिसरात सेवा क्षेत्राचा आणि शहरीकरणाचा विस्तार होत आहे. तंत्रज्ञान आणि माहिती या क्षेत्राचा वेग शहरी आणि निमशहरी भागात वाढत आहे. त्याचा अप्रत्यक्षात परिणाम हा राजकारणावर होत आहे. ग्रामीण भागात सहकार आणि इतर सेवा क्षेत्राचा पसारा वाढत असला तरी जातींच्या राजकारणाला जास्त प्रमाणात महत्त्व आहे. विकासाचा मुद्दा हा मध्यवर्ती राहात आहे. सर्वच राजकीय पक्षाकडून विकासाच्या प्रश्नाला हात घालण्यात येतो. पण जो पक्ष प्रत्यक्षात विकासाची कामे करत राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहे त्याच पक्षाला स्थानिक पातळीवर यश येत आहे.

पक्षीय राजकारणात विविध पक्ष राजकारणात सक्रिय असताना दिसून येतात. पण मतदारसंघनिहाय एकाच कोणत्या तरी पक्षाचे वर्चस्व मतदारसंघ पातळीवर असताना दिसून येते. स्थानिक पातळीवरील राजकारणात तीव्र अशी स्पर्धा असताना दिसून येते. या स्पर्धेत पक्षीय राजकारण ज्या प्रकारे असते त्याच प्रकारे जातींय आधारावरील राजकारण देखील असताना दिसून येते. राखीव मतदारसंघात प्रस्थापित जात नेतृत्वाचा पाठिंबा असल्याशिवाय राजकारण यशस्वी करता येत नाही. या सर्व अभ्यासाचा उदाहरण म्हणून अहमदनगर जिल्ह्यातील स्थानिक पातळीवरील राजकारणाकडे पाहता येईल.

अहमदनगर जिल्ह्यात सांस्कृतिक आणि विविध समाजाच्या असंख्य संघटना कार्यरत आहेत. याशिवाय आर्थिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या देखील असंख्य संघटना आहेत. या संघटना राजकारणात सकारात्मक हस्तक्षेप करण्याच्या भूमिकेत सातत्य असल्याचे दिसून येते. एक प्रकारे दबाव गटाप्रमाणे संघटना कार्यरत आहेत. आर्थिक नाही पण सामाजिक प्रश्नावर या संघटना समाजाचे संघटन घडवून आणत आहेत. तसेच निवडणुकीच्या काळात संघटनेतील पदाधिकारी किंवा संघटनेच्या सदस्याला उमेदवारी

मिळावी यासाठी सकारात्मक भूमिका घेत असतात. याचा परिणाम हा राजकीय पक्षावर होत राहतो. एक प्रकारे संघटना ह्या राजकीयीकरण घडवून असण्याच्या भूमिकेत असल्या तरी व्यक्तीच्या वैयक्तिक आयुष्यात प्रभावीपणे हस्तक्षेप केलेला आहे. कारण व्यक्तीच्या गरजा आणि समस्या कोणत्या आहेत. त्या व्यक्तीने न मांडता संघटनाकडून मांडण्यात येऊ लागल्या आहेत. यातून व्यक्तीचा स्वतंत्रपणे राजकारणात सहभाग होण्याऐवजी संघटित स्वरूपातील राजकीय सहभाग होत असताना दिसून येतो. सामाजिक संघटनामध्ये नेतृत्वाची भूमिका ही राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या नेतृत्वाला मदत करण्याच्या भूमिकेची आहे. अशा विविध कारणानी अहमदनगर जिल्ह्यातील सामाजिक आणि आर्थिक विकासात राजकीय नेतृत्वाचे योगदानाचा अभ्यास करण्यास पुरेसा वाव आहे.

स्थानिक पातळीवरील सहकारी साखर कारखाने, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, प्रत्येक तालुक्यातील कृषि उत्पन्न बाजार समिती, विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यां, गाव पातळीवर गाव सोसायट्या, सहकारी दुध संघ अशा स्थानिक पातळीवरील सहकारी संस्था स्थानिक पातळीवरील निवडणुकीच्या राजकारणावर प्रभाव टाकत आहेत. या संस्थाचे जाळे अहमदनगर जिल्ह्यात चांगल्या प्रकारे आहे. या संस्थाच्या राजकारणात तीव्र स्पर्धा पहाण्यास मिळते. या संस्थांच्या आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर एक प्रकारे राजकीयीकरण होत असताना दिसून येते. या सर्वाचा अभ्यास अहमदनगर जिल्ह्याच्या स्थानिक राजकीय प्रक्रियेचा अभ्यास या आधारे पाहता येणे शक्य असल्याने अहमदनगर जिल्ह्याची निवड करण्यात आलेली आहे.

## अभ्यासाची उदिष्ट्ये :–

१. महाराष्ट्राचे राजकारण आणि स्थानिक राजकारण यांचा संबंध आहे. त्यात राजकीय नेतृत्वाची भूमिका ही मध्यवर्ती आहे. या मध्यवर्ती भूमिकेचा समिक्षात्मक अभ्यास करणे.

२. जिल्हा पातळीवरील आर्थिक क्षेत्रातील विकासाच्या माध्यमातून राजकीय विकासाची वाटचाल घडून येत आहे. या वाटचालीचा आढावा घेणे.

३. जिल्हा राजकारणात दोन प्रकारे राजकीय नेतृत्वाची भूमिका पुढे येते. एक म्हणजे शहरी भागातील राजकारण आणि दुसरे म्हणजे ग्रामीण भागातील राजकारण. या दोन्ही भागात सत्ता, संपत्ती आणि अधिकार, प्रभावक्षेत्र या वरून संघर्ष आणि स्पर्धा असताना दिसून येते. या स्पर्धेचे, संघर्षाचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे हे अभ्यासणे.

४. ग्रामीण, निमशहरी आणि शहरी अशा तिन्हीही भागातील राजकारणात जात घटक हा महत्त्वाची भूमिका बजावत असताना दिसून येतो. त्यामुळे जातींची नेमकी कोणत्या प्रकारची भूमिका आहे हे अभ्यासातून तपासता येईल.

५. ग्रामीण भागातील राजकारणामध्ये विविध पक्षांतर्गत गट तयार झालेले आहेत. एका गटाकडे आर्थिक सधनता आणि दुसऱ्या गटाकडे नसताना दिसून येते. यापैकी ज्या गटाकडे आर्थिक सधनता आहे तो बागायती परिसरातील आहे. त्यामुळे शेतीतून विविध प्रकारचे नगदी पिकांचे उत्पादन घेताना दिसून येतो. या पिकांच्या उत्पादनाच्या आधारे तो जिल्ह्याच्या राजकारणावर प्रभाव, वर्चस्व निर्माण करून आहे. दुसरा गट कोरडवाहू परिसरातील आहे. या गटाला उत्पादनाचे साधने फारशी मिळत नसल्यामुळे मजूरी करणारा आहे. परिणामी सधन गटाच्या मागे जावे लागत आहे. यातून पुढे येणारे राजकारण नव्याने पुढे येत आहे. त्यामुळे या राजकारणाचे विविध आयाम तपासता येतील.

६. शहरी राजकारणात नव्याने होणारे आर्थिक विकास आणि नवीन राजकीय समीकरणांचा उदय याचा अभ्यास करता येईल.

७. १९९० नंतर महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये स्थित्यंतर झाले. ग्रामीण भागाचे रूपांतर निमशहरी आणि निमशहरी भागाचे रूपांतर शहरी भागात होत चालले

आहे. नव्याने विविध उद्योग पुढे येत आहेत. शहरी आणि निमशहरी भागात नव्याने विविध सेवा आणि औद्योगिक विकास करणारे घटक पुढे येत आहेत. त्यातून राजकारण समीकरण घेऊन पुढे येत आहे. अशा प्रकारे पुढे येणारी समीकरणे तपासण्यात येतील.

८. राजकीय पक्ष, नेतृत्व, विविध प्रश्न—समस्या, प्रभावक्षेत्र, नव अभिजनांचे उदयाची पार्श्वभूमी, बदलती सत्ताकेंद्र, विविध पक्षांतील नेतृत्वाचे सहसंबंध, संस्थात्मक संघटन बांधणी अशा विविध घटकांच्या माध्यमातून राजकीय नेतृत्व घडून येत आहे.

## संशोधनाचे गृहितके :–

१. अहमदनगर जिल्ह्यातील नेतृत्व हे शेतीक्षेत्राबरोबरच इतर क्षेत्रांतूनही पुढे आले आहे.

२. जिल्ह्यातील नेतृत्व राजकीय पक्षाच्या आधारापेक्षा सामाजिक चळवळीतून व जनआंदोलनातून पुढे आले.

३. अहमदनगर जिल्ह्यातील नेतृत्वाने स्थापन केलेल्या विविध संस्था, तसेच सामाजिक व आर्थिक चळवळींच्या माध्यमातून जिल्ह्यात विकासकामे झालेली दिसतात.

४. अहमदनगर जिल्ह्यातील नेतृत्वाने शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान दिले. सामाजिक विकासाचा हाच पाया ठरला.

५. अहमदनगर जिल्ह्यात सहकारी तत्त्वावर सुरू झालेल्या बँकिंग चळवळीने सामाजिक व राजकीय विकासात मोठे योगदान दिले.

## अभ्यासाचे महत्त्व

स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात राष्ट्रीय विकास व लोकशाही विकेंद्रीकरणाचा प्रयोग सुरू झाला. 'पंचायतराज'च्या निर्मितीमुळे सत्तेच्या विकेंद्रीकरणाने समाजातील सर्व

घटकांच्या विकासासाठी प्रयत्न करण्यात आला. तळागाळातील अगदी शेवटच्या घटकाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठीच 'पंचायतराज' ची निर्मिती केली गेली. यामध्ये स्थानिक घटकाला एक वेगळेच महत्त्व प्राप्त झाले. पंचायतराज व त्यामुळे आलेले सत्ता विकेंद्रीकरणाचे तत्त्व आणि २० व्या शतकात टप्या–टप्प्याप्रमाणे वाढलेली व नंतर सर्वत्र पसरलेली सहकारी चळवळ यामुळे तालुका व जिल्हा पातळीवर घडून आलेला बदल यांचा १९९३ ते २०१० या १७ वर्षाचा आढावा घेतला आहे. यासाठी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्याची निवड केली आहे.

जिल्हा व स्थानिक राजकारण हे काळाच्या ओघात बदलत चालले आहे. जागतिकीकरण, शासनाची बदलणारी धोरणे, वाढते शहरीकरण, स्थानिक समस्यांत झालेली वाढ, लोकांची जाणीवजागृती, शिक्षणाचे होत असलेले खाजगीकरण, बेरोजगारी यांचा परिणाम अगदी शेवटच्या घटकापर्यंत झालेला आहे. त्यामुळे राजकीय संदर्भ बदलेले आहेत. त्या अनुषंगाने नेतृत्व निर्माण झाले. या नवनेतृत्वाचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. राजकीय नेतृत्वाच्या फक्त राजकीय बाजूवर टीका–टिप्पणी होत असताना एक बाब महत्त्वाची आहे की, सामाजिक विकासात योगदान दिल्याशिवाय जनता नेतृत्वावर विश्वास ठेवत नाही. अहमदनगर जिल्ह्यातील जनता पिढ्यान् पिढ्या या नेतृत्वाबरोबर आहे, तर कधी संघर्षशील नेत्यामागे उभी राहते. या सामाजिक व राजकीय विकासातील योगदानाचा नेतृत्व हा सैध्दांतिक केंद्र बिंदू म्हणून चिकित्सक अभ्यास केला आहे.

जनतेच्या राजकीय सहभागात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यानेही जिल्हा व स्थानिक राजकारणात काही मूलगामी बदल घडत आहेत. विकासाची गती वाढलेली आहे. तथापि, हा विकास अद्यापही एका विशिष्ट स्तरावरच येऊन थांबला आहे. त्या अनुषंगानेही अभ्यास करण्यात आला आहे.

अहमदनगर जिल्ह्यातूनच कम्युनिस्ट चळवळीने योगदान दिले व त्यानंतर अहमदनगर जिल्ह्याच्या नेतृत्वाचा विचार करता, ज्येष्ठ नेते भाऊसाहेब थोरात, बाळासाहेब विखे पाटील, शंकरराव कोल्हे, यशवंतराव गडाख, शिवाजीराव नागवडे, बबनराव ढाकणे, मधुकर पिचड या जेष्ठ नेत्यांबरोबर राधाकृष्ण विखे पाटील, बाळासाहेब थोरात, बबनराव पाचपुते, जयंतराव ससाणे, भानुदास मुरकुटे, विजय औटी, दिलीप गांधी, नंदकुमार झावरे आदी दुसऱ्या फळीतील नेते तयार झाले. सन १९९० ते २०१० या दरम्यानच्या कालखंडात आणखी तिसऱ्या फळीतील नेते उदयाला आले, परंतु वर नमूद दुसऱ्या फळीतील नेत्यांची कारकिर्दही जिल्ह्यात प्रभावी ठरली. या तिसऱ्या फळीतील नेत्यांमध्ये राजीव राजळे, नरेंद्र घुले, चंद्रशेखर घुले, अशोक भांगरे आदी नवोदित नेतृत्वाचा सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व वित्तीय योगदानाचा चिकित्सक अभ्यास केला आहे.

वरीलप्रमाणे राज्य व राष्ट्रीय पातळीवर राजकीय स्वरूपाचे लिखाण झाले आहे. आतापर्यंत जो अभ्यास उपलब्ध आहे, तो राष्ट्रीय व राज्य पातळीवरील नेतृत्वाचा अभ्यास आहे. एखाद्या जिल्हा व स्थानिक पातळीवरील नेतृत्वाचा सखोल अभ्यास केलेला दिसत नाही.

## संशोधनाची अभ्यास पध्द्ती/संशोधन पध्द्ती

''अहमदनगर जिल्ह्याच्या राजकीय आणि आर्थिक विकासात राजकीय नेतृत्वाच्या योगदानाचा अभ्यास: १९९३ ते २०१०'' हा अभ्यास ऐतिहासिक आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनातून करण्यात आलेला आहे. या अभ्यासासाठी प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन्ही साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच राजकीय नेतृत्वाच्या कार्याचे विश्लेषणात्मक दृष्टिकोन समोर ठेवून राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिपेक्षात समीक्षात्मक अभ्यास करण्यात आला आहे. राजकीय नेतृत्वांच्या कार्याची व वाटचालीची नोंद ही ऐतिहासिक दृष्टिकोनातून चढत्या क्रमाने घेतली आहे.

त्यातून जिल्ह्यातील राजकीय आणि आर्थिक विकास कशा प्रकारे विकसित होत गेला. त्याचे दृष्य स्वरूपात चित्र या अभ्यास पध्द्तीतून उभे करण्यात आले आहे.

ऐतिहासिक अभ्यास पध्द्ती वापरताना राजकीय नेतृत्व आणि त्यांच्या समकालीन राजकारण, समाजकारण, आर्थिक विकासाचे वाटचालीचे टप्पे यांचे तथ्य संकलित केली आहेत. त्यात राजकीय नेतृत्वाने केलेल्या कार्याची आणि बदलत्या परिस्थितीशी सांगड समकालीन काळात घडून येत असलेला आर्थिक आणि राजकीय विकास यांच्याशी घालण्यात आली आहे. दुसरे असे की, राजकीय नेतृत्व विविध टप्प्यावर बदलते, नवीन नेतृत्व पुढे येते. ते नेतृत्व आर्थिक आणि राजकीय विकासाची नव्याने मांडणी करत विकास करण्याचे प्रयत्न करत राहते. राजकीय नेतृत्वाच्या विकासाचा आणि निवडणुकीचा क्रम तयार करत विचारांचे विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच स्वातंत्र्योत्तर काळात चालणाऱ्या राजकारणाचा सविस्तर ऐतिहासिक परिपेक्षातून विश्लेषणात्मक अभ्यास केला आहे. त्या राजकारणात अहमदनगर जिल्ह्यातील नेतृत्वाच्या राज्य पातळीवरील राजकारणाची आणि आर्थिक विकासाची समीक्षा करण्यात आली आहे. त्यातून आर्थिक आणि राजकीय विकासात नेमक्या कोणत्या प्रकारच्या योगदानाची भर टाकली आहे. त्याची पडताळणी करण्यात आली आहे. तिसरे असे की, तत्कालीन काळातील सर्व सामाजिक चळवळींची नोंदी करण्यात आल्या आहेत. सामाजिक, आर्थिक आणि इतर प्रकारच्या सांस्कृतिक चळवळींच्या नेतृत्वाचे योगदान आणि या विविध चळवळीच्या नेतृत्वामुळे नेमक्या कोणत्या प्रकारे आर्थिक आणि राजकीय विकासासाठी राहिलेल्या दृष्टिकोनाचा विचार देखील करण्यात आला आहे. परिणामी विविध चळवळीच्या नेतृत्वाने केलेल्या कार्याचे तथ्याचे संकलन केले आहे. तसेच तत्कालीन काळात घडून येत असलेल्या राजकारणाला चळवळीचे कोणते योगदान राहिले आहे याचा आढावा घेण्यात आला आहे. जेणेकरून अहमदनगर जिल्ह्याच्या राजकीय आणि आर्थिक विकासात राजकीय नेतृत्वाचे योगदान कोणत्या

स्वरूपात राहिले आहे. याचा ऐतिहासिक परिपेक्षात टप्पे तपासत योगदानाचे सविस्तर विश्लेषण केले आहे.

## प्राथमिक साधने

प्राथमिक साधनांमध्ये जिल्ह्यातील आमदार, खासदार, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, काही राजकारणात सक्रिय असलेल्या सरपंच व राजकीय व सामाजिक सक्रिय कार्यकर्ते, संघटनांचे पदाधिकारी व सभासदांच्या सविस्तर यांच्या अनौपचारिक चर्चेच्या आधारावर मुलाखती घेण्यात आल्या आहेत. तसेच स्थानिक पातळीवरील राजकारणाचे जाणते व्यक्ती, नेतृत्व व यांच्याशी सविस्तर औपचारिक आणि अनौपचारिकरीत्या चर्चा करण्यात आलेली आहे. अभ्यासासाठी जास्तीत जास्त भर नेतृत्वाच्या मुलाखती आणि अनौपचारिक मुलाखतीवर देण्यात आलेला आहे. तसेच विविध सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक संघटनांचे प्रकाशित व अप्रकाशित साहित्य, (नियतकालिके, पत्रके, प्रकाशित व अप्रकाशित भाषणे) विविध साखर कारखान्यांचे अहवाल इ. तसेच राजकीय नेतृत्वाच्या स्मरणिका, आत्मचरित्रे, कार्याचे अहवाल इत्यादी साहित्याचा मुख्यत्वेने उपयोग केला आहे.

## दुय्यम साधने

दुय्यम साधनांमध्ये वर्तमानपत्रांनी प्रसिध्द् केलेल्या बातम्या, विविध अभ्यासकांनी महाराष्ट्र राज्यातील राजकारणावरील अभ्यास केलेले संदर्भ ग्रंथ, वर्तमान पत्रातील लेख, जनगणना अहवाल, जिल्हा सामाजिक आणि आर्थिक पाहणी अहवाल, जिल्हा परिषदेचे वार्षिक अहवाल, गॅझेट, शासकीय अहवाल यांचा वापर केला आहे.

## संशोधनाचे क्षेत्र

भारतीय लोकशाही व्यवस्थेतील अनेक राज्य आहेत. या प्रत्येक राज्यातील राजकीय प्रक्रिया ही वेगवेगळ्या स्वरूपातून घडत असते. त्यामुळे ही प्रक्रिया समजावून घेण्यासाठी भारतीय लोकशाही व्यवस्थेतील अनेक घटकांपैकी जिल्हा हे एक घटक

घेऊन अभ्यास करण्यात आलेला आहे. जिल्हा पातळीवर राजकीय प्रक्रिया घडून येण्याचे एकक कोणते? हे एकक कोणत्या प्रकारे तपासले असता राजकारणाची आणि प्रभाव क्षेत्राची उकल होईल? या दृष्टिकोनातून विचार करत अभ्यासासाठीच्या संस्थांची निवड करण्यात आलेली आहे. त्यात जिल्हा पातळीवर सहकार साखर कारखाने, जिल्हा मध्यवर्ती बँक, कृषि उत्पन्न बाजार समित्या, विविध सहकारी आणि कार्यकारी सोसायट्या या राजकीय प्रक्रिया घडण्याच्या बाबतीत कशा प्रकारे प्रभाव टाकण्याचे काम करत आहेत?. याची उकल ही जिल्हा पातळीवरील राजकारणाच्या माध्यमातून होणे शक्य होते. त्यामुळे जिल्हा एक युनिट राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासासाठी निवडलेले आहे.

१९९० ते २००९ या काळातील विधानसभा आणि लोकसभा निवडणुका, १९९२ ते २००७ या काळातील स्थानिक स्वराज्य संस्थामधील पंचायत समिती, जिल्हा परिषद, काही गाव ग्रामपंचायत यांची निवड केलेली आहे. मतदारसंघाच्या राजकारणाचा आढावा घेताना त्या मतदारसंघात येणारे साखर कारखान्यांच्या निवडणुकीचा आणि नेतृत्वाचा देखील विचार करण्यात आलेला आहे. मतदारसंघातील विविध जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या वार्डात महत्त्वपुर्ण लढती कोणकोणत्या राहिल्या आणि त्या महत्त्वपुर्ण राहण्याची कारणे कोणती होती याचा आढावा घेण्यात आलेला आहे. साखर कारखान्यांवरील वर्चस्व कशा प्रकारे आणि कोणत्या माध्यमातून आलेले आहे याचा आढावा घेण्यासाठी अहमदनगर जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांची निवड करण्यात आलेली आहे. निवडक पंचायत समितीच्या वार्डची, निवडक जिल्हा परिषदेच्या वार्डाची, निवडक नगर परिषदेची निवड केली आहे. त्याचे विश्लेषण हे त्या त्या मतदारसंघाच्या राजकारणाचा आढावा घेताना केलेले आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील डाव्या चळवळीच्या नेतृत्वाचा आणि योगदानाचा देखील अभ्यास केला आहे. हा अभ्यास काहीसा जुना असल्याप्रमाणे आहे. मात्र अहमदनगर जिल्ह्यातील डाव्या पक्षांचे आणि चळवळीचे योगदान मोठे राहिलेले आहे. या चळवळीने

राजकीय नेतृत्वाला सर्वसामान्याच्या हिताचे अनेक निर्णय घेण्यास भाग पाडलेले आहे. त्यामुळे डाव्या चळवळी आणि राजकारण यांचा ज्या प्रकारे संबंध आला आहे. त्या प्रकारे या अभ्यासाच्या कक्षा रूदांवत आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. दुसरे असे की, सहकार क्षेत्राचा ग्रामीण भागात खूप मोठ्या प्रमाणावर विकास झाल्याचे दिसून येते. सहकार क्षेत्रात एक प्रकारचे राजकारण दडलेले आहे. त्याच प्रमाणे अर्थकारण देखील दडलेले आहे. मतदारसंघातील दुय्यम राजकीय नेतत्वाला खुश करण्याचे साधन म्हणून प्रभावशाली नेतृत्वाने सातत्याने सहकार क्षेत्रातील पदाचा वापर केलेला आहे. सहकार क्षेत्रातील अधिकाराच्या पदाकडे सातत्याने दुय्यम पद याच आधारावर पाहण्यात येते. उदा. मतदारसंघात निवडणुकीत उमेदवारी द्यायची नसेल तर सहकारी साखर कारखान्यांतील संचालक पदावर नेतृत्वाची वर्णी लावत निवडणुकीतून माघार घेण्यास भाग पाडणे. अशा प्रकारचे राजकारण सहकार क्षेत्राच्या माध्यमातून घडून येते. साखर कारखान्यांचा त्या त्या तालुक्याच्या राजकारणावर प्रभाव कशा प्रकारे आहे? याचा सविस्तर आढावा घेण्यात आलेला आहे. अशा प्रकारे विविध घटकांची अभ्यासासाठी निवड करत अभ्यासाचे क्षेत्र निश्चित करत त्याच क्षेत्राच्या चौकटीत राहत हा अभ्यास करण्यात आलेला आहे. त्यामुळे सहकार क्षेत्रातील जिल्हा मध्यवर्ती बँक आणि सहकारी साखर कारखाने यांचा आढावा घेण्यात आला आहे. अभ्यासाच्या क्षेत्र चौकटीत राहत अभ्यास करण्यात आला असल्याने काही अभ्यासाच्या मर्यादा पुढे येतात. त्या पुढील प्रमाणे सांगता येतील.

## अभ्यासाची मर्यादा

अहमदनगर जिल्ह्यात कार्यरत असणारे सर्व राजकीय पक्षांचा स्वतंत्र आढावा घेण्याऐवजी ज्या—त्या मतदारसंघात पक्षीय बलाबल ज्या प्रकारे आहे त्याचा आढावा घेण्यात आलेला आहे. स्वतंत्र पक्षांचा नेतृत्वाचा आढावा घेण्यात आलेला नाही. ही एक या अभ्यासाची मर्यादा आहे. दुसरी मर्यादा म्हणजे विविध सामाजिक संघटना कार्यरत

आहेत. पण त्या संघटनांचा ओझरता आढावा त्या त्या मतदारसंघाच्या संदर्भाच्या अनुषंगाने आलेला आहे. पुर्ण सविस्तर स्वतंत्ररित्या संघटनेचा आणि चळवळीचा आढावा घेण्यात आलेला नाही. उदा. जात संघटनांचा सविस्तर आढावा घेण्यात आलेला नाही ही दुसरी मर्यादा आहे. तिसरी मर्यादा अशी की, प्रत्येक जातींच्या नेतृत्वाचा स्वतंत्ररित्या प्रभाव निर्माण करण्यात आलेला आहे. त्यांचा आढावा घेण्यात आलेला नाही. तर नेतृत्व विकासाचा आढावा हा मतदारसंघात घडणाऱ्या राजकारणाच्या संदर्भातून घेण्यात आला आहे. त्यामुळे एका नेतृत्वाची जडणघडण कशी झाली याचा वेध हा त्या मतदारसंघातील स्थानिक राजकारण कोणत्या वातावरणात घडून आले यातून येतो. स्वतंत्ररित्या घेण्यात आला नाही. हा अभ्यासात स्थानिक राजकीय प्रक्रिया केंद्रस्थानी ठेवून अभ्यास करण्यात आल्याने स्थानिक पातळीवर स्थानिक नेतृत्व कशा प्रकारे पुढे आले याचा आढावा घेण्यात आलेला नाही. चौथी मर्यादा स्थानिक पातळीवर विविध घटक एकाचवेळी राजकारणावर प्रभाव टाकत असतात पण त्यापैकी काही मोजकेच घटक विचारात घेण्यात आलेले आहेत. सर्व घटकांची फक्त नोंद करण्यात आलेली आहे. पण सविस्तर विश्लेषण करण्यात आलेले नाही. पाचवी मर्यादा म्हणजे माहिती जमा करताना जास्तीत जास्त हा अनौपचारिक चर्चेवर भर दिलेला आहे. लिखीत स्वरूपात फार कमी प्रमाणात माहिती मिळते. त्यामुळे विविध क्षेत्रातील कार्यरत असणाऱ्या व्यक्तींच्या मुलाखतीतून मिळणारी माहितीवर जास्त भर आहे. अर्थात लिखित स्वरूपातील माहिती जास्त प्रमाणावर मिळत नसल्याने मुलाखती आणि चर्चा हे माहिती उपलब्ध असणारे स्त्रोत आहेत. सहावी मर्यादा अशी की, अनेक राजकीय नेतृत्व प्रत्यक्षात सक्रियपणे कार्यरत आहेत. पण त्यांची काही कारणास्तव मुलाखती घेता आल्या नाहीत ही एक मर्यादा पुढे येते.

# प्रकरण – २

## अहमदनगर जिल्ह्याची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी

संतांची भूमी म्हणून ओळखला जाणारा अहमदनगर जिल्हा महाराष्ट्राच्या मध्यभागी वसलेला आहे. या जिल्ह्याचे क्षेत्रफळ १७,४१२ चौरस कि. मी असून, ते राज्याच्या क्षेत्रफळाच्या ५.६६ टक्के आहे. पश्चिमेकडील डोंगराळ भाग व पूर्वेकडील सखल भाग हे जिल्ह्याचे स्वाभाविक विभाग आहेत. पश्चिम भागातील हवामान थंड व कोरडे, तर पूर्व भागातील हवामान उष्ण व कोरडे आहे. जिल्ह्यातील सरासरी पर्जन्यमान ५६६ मिली मीटर एवढे आहे. गोदावरी, भीमा व सीना या जिल्ह्यातील प्रमुख नद्या आहेत. जिल्ह्याच्या उत्तर सीमेवरून गोदावरी नदी वाहते. प्रवरा व मुळा या तिच्या उपनद्या आहेत. दक्षिण भागातून सीना, हंगा, घोड या नद्या दक्षिणेकडे वाहतात. काळी, लालसर, काळी–बरड व पांढरी या चार प्रकारात जिल्ह्याची जमीन विभागलेली आहे. जिल्ह्यातील १,५८१ खेडी १४ तालुक्यांत विखुरलेली आहेत. १४ पंचायत समित्या, १,३०९ ग्रामपंचायती, ८ नगरपालिका, १ नगरपंचायत व १ महानगरपालिका आहे. २,५०९ लोकसंख्येमागे १ ग्रामपंचायत असे प्रमाण जिल्ह्याच्या ग्रामीण भागात आढळते.

### क्षेत्रफळ व प्रशासकीय सेवा–

महाराष्ट्र राज्याच्या मध्यभागी उर्ध्व गोदावरी आणि भीमा या नद्यांच्या खोऱ्यात वसलेल्या अहमदनगर जिल्ह्याचे उत्तर अक्षांश १८ अंश २ ते १९ अंश ९ व पूर्व रेखांश ७३ अंश ९ ते ७५ अंश ५ असे भौगोलिक स्थान आहे. अहमदनगर जिल्हाच्या पूर्वेस बीड व उस्मानाबाद हे जिल्हे, दक्षिणेस सोलापूर जिल्हा, पश्चिमेस ठाणे व पुणे हे जिल्हे आहेत. अहमदनगर जिल्ह्याचे क्षेत्रफळ १७, ४१२ चौरस कि. मी असून

प्रशासकीय सोयीसाठी महसूल खात्याने जिल्ह्यातील १४ तालुक्यांची विभागणी चार उपविभागात केलेली आहे.

**तक्ता क्र. २.१**

**अहमदनगर जिल्ह्यातील प्रशासकीय सेवांचे ठिकाण**

| **उपविभाग** | **ठिकाण** |
|---|---|
| अहमदनगर | अहमदनगर, पारनेर, पाथर्डी, शेवगाव |
| कर्जत | कर्जत, श्रीगोंदा, जामखेड |
| श्रीरामपूर | श्रीरामपूर, नेवासा, राहुरी, राहता |
| संगमनेर | अकोले, संगमनेर, कोपरगाव |
| आधार: जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर जिल्हा २००१–०२, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई. | |

ग्रामीण विकासासाठी जिल्हा परिषद प्रशासनाखाली जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात प्रत्येकी एक या प्रमाणे एकूण १४ पंचायत समित्या आहेत. मार्च २०१० अखेर अहमदनगर जिल्ह्यात १,३०९ ग्रामपंचायती कार्यान्वित आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात पुढीलप्रमाणे १८ नागरी भाग आहेत. कॅन्टोन्मेट प्रशासनाखाली अहमदनगर कटक मंडळ असून राहुरी, कोपरगाव, राहता या नगरपालिका आहेत. शिर्डी ही नगरपंचायत आहे, तर अहमदनगरला सन २००५–०६ मध्ये महानगरपालिका स्थापन झाली आहे.

सन २०००–०१ या वर्षात एकूण पिकाखालील क्षेत्र १३,६४,२८६ हेक्टर होते. त्यापैकी निव्वळ पिकांखालील क्षेत्र १,५३,१७८ हेक्टर होते. एकूण लागवडीखालील क्षेत्राशी दुबार पिकाच्या क्षेत्राचे प्रमाण ११.२३ टक्के एवढे होते. अहमदनगर जिल्ह्यात खरीप हंगामात बाजरी, ज्वारी, तांदूळ, नाचणी ही धान्यपिके तर तुर, मठ, मूग ही कडधान्ये आणि भुईमूग व सूर्यफूल ही गळिताची पिके घेतली जातात. तांदूळ व नाचणी ही पिके बहुतांशी अकोले तहसीलमध्ये घेतली जातात. रब्बी हंगामात ज्वारी, गहू, हरभरा

ही पिके घेतली जातात. त्याचप्रमाणे उन्हाळी हंगामात सामान्यपणे ज्या ठिकाणी ओलिताची व्यवस्था आहे, अशा ठिकाणी उन्हाळी भूईमूग, मका, सूर्यफूल, भाजीपाला व चाऱ्याची पिके घेतली जातात. अहमदनगर जिल्ह्यात बागायती पिकांचे क्षेत्र जरी जास्त प्रमाणात असले तरी खरीप आणि रब्बी अशा दोन हंगामात घेतले जाणारे पिकांचे प्रमाण जास्त राहते. सिंचनाच्या परिसरात ऊसाचे पिक मोठ्या प्रमाणावर घेण्यात येते. मात्र सर्वात दुष्काळी तालुक्यात भुसारी मालाचे पिके घेण्यात येतात. अलीकडे दुष्काळी तालुक्यात देखील ऊसाचं पिक घेण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यात विविध सहकारी बँक, सहकारी सोसायट्यां, सहकारी साखर कारखाने यांनी कर्ज देण्यासाठी पुढाकार घेतलेला आहे.

**तक्ता क्र. २.२**

**अहमदनगर जिल्ह्यातील शेत जमिनीचे प्रमाण**

| अ.क्र | तपशील | क्षेत्र हेक्टर | एकूण क्षेत्राशी प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | जंगलव्याप्त क्षेत्र | १,४५,०६३ | ८.३० |
| २ | शेतीलायक नसलेले क्षेत्र | १,५२,३६५ | ८.७५ |
| ३ | लागवड न केलेली इतर जमीन | १,०७,०९८ | ६.१५ |
| ४ | एकूण पड (चालू व इतर) | १,२५,६३७ | ७.२२ |
| ५ | निव्वळ पिकांखालील क्षेत्र | १२,११,१०८ | ६९.५५ |
| ६ | एकूण | १७,४१,२७१ | १००.०० |
| | आधार: जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, अहमदनगर जिल्हा २०१०—११, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई. | | |

## अहमदनगर जिल्ह्यातील पीक रचना–

सन २०००–०१ या वर्षात जिल्ह्याचे लागवडीखालील एकूण क्षेत्र १३,६४,२८६ एवढे होते. त्यापैकी १०,२२,२६२ हेक्टर (७४.९६) टक्के क्षेत्र तृणधान्यांखाली, ९१,३६९ हेक्टर (६.७०) टक्के कडधान्यांखाली होते. ऊस व गळिताच्या पिकांखालील क्षेत्र १,३९,३१९ हेक्टर (१०.२१) टक्के फळे, भाजीपाला व मसाल्यांच्या पिकाखाली केवळ ३७,२२४ हेक्टर (२.७३) क्षेत्र होते, तर उर्वरित ७४. १२० हेक्टर (५.४३) टक्के क्षेत्र अखाद्य पिकाखाली होते. जिल्ह्याची सन १९९७–९८ व सन २०००–०१ या वर्षाची महत्त्वाच्या पिकाखालील क्षेत्राची तुलनात्मक माहिती तक्ता क्र. २.३ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

### तक्ता क्र. २.३
### अहमदनगर जिल्ह्यातील पीकरचना

| अ.क्र | तपशील | **पिकांखालील क्षेत्र (हेक्टर)** | | |
|---|---|---|---|---|
| १ | पिकाचा प्रकार | १९९७–९८ | २०००–०१ | वाढ/घट |
| २ | तृणधान्य | १०,४१,७२६ | १०,२२,२६८ | –१.८७ |
| ३ | कडधान्ये | १,०२,५७२ | ९१,३६१ | –१०.९३ |
| ४ | ऊस | ४६,८०१ | ७९,२१८ | ६९.२६ |
| ५ | मसाल्यांची पिके | ५,०८२ | ३,३९० | –३३.२९ |
| ६ | फळे व भाजीपाला | ३५,००८ | ३३,८३४ | –३.३५ |
| ७ | कपाशी व तंतुमय | ४,४८४ | ६,७६९ | ५०.९६ |
| ८ | गळिताची पिके | ८४,९१२ | ६०,१०१ | –२९.२२ |
| ९ | इतर अखाद्य पिके | ६०,८०४ | ६७,३५१ | १०.७७ |
| **१०** | **एकूण सर्व पिके** | **१३,८१,३८९** | **१३,६४,२८६** | **–१.२४** |
| | जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, अहमदनगर जिल्हा २०१०–११, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई. | | | |

अशा प्रकारचे अहमदनगर जिल्ह्यातील महत्त्वाचे पीक घेतले जातात. जिल्हा हा नैसर्गिकदृष्ट्या सक्षम आणि सबळ असल्याचे दिसून येते. शेतकरी, व्यापारी,

उद्योगधंदे यांना या जिल्ह्यात वाव असून जिल्ह्यातील खेडेगाव हे सधन असल्याचे जाणवते. त्यांच्या सामाजिक आणि राजकीय जीवनातून मानव मुक्तीच्या हितासाठी शासकीय योजनेतून त्यांचा विकास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## वाहतूक व व्यापार :—

## राष्ट्रीय महामार्ग :

पुणे ते नाशिक हा राष्ट्रीय महामार्ग जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातून जातो. या मार्गावर जिल्ह्यातील बोटा, धारगाव, डाळासने, संगमनेर ही ठिकाणे आहेत. पुणे ते औरंगाबाद हा मार्ग जिल्ह्यातील पारनेर, अहमदनगर व नेवासा या तालुक्यातून जातो. अहमदनगर ते मनमाड हा रस्ता राहुरी, कोल्हार, बाभळेश्वर, राहता, शिर्डी व कोपरगाव मार्गे पुढे मनमाडला जातो. अहमदनगर, पैठण हा रस्ता तिसगाव व शेवगावमार्गे पैठणला जातो. अहमदनगर ते सोलापुर हा रस्ता मिरजगाव मार्गे करमळ्याला जातो व पुढे सोलापूरला जातो. श्रीरामपूर ते घोटी हा मार्ग जिल्ह्यातील बाभळेश्वर, लोणी, संगमनेर, अकोले व राजूरमार्गे पुढे घोटीकडे जातो. अहमदनगर शहरापासून तालुक्याच्या ठिकाणी अनेक जोडणारे रस्ते आहेत.

## लोहमार्ग :

दौंड ते मनमाड लोहमार्ग जिल्ह्यात दक्षिणेकडून उत्तरेकडे जातो. या मार्गावर जिल्ह्यातील श्रीगोंदा, विसापूर, अहमदनगर, बेलापूर, पुणतांबा इ. रेल्वे स्थानके आहेत.

## व्यापार :

अहमदनगर जिल्ह्यातून साखर, धान्य, दूध, गूळ, कापड, साड्या, दूरदर्शन संच, मोपेड, शेवंतीची फुले इ. माल बाहेर पाठवला जातो. तसेच विविध प्रकारचे कापड, मीठ, यंत्रे, मोटार सायकली, सायकली इ. माल बाहेरून जिल्ह्यात येतो. अशा प्रकारे अहमदनगर जिल्हा वाहतूक आणि व्यापाऱ्याच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो.

## साखर कारखाने

अहमदनगर जिल्हा हा साखर उत्पादनाच्या बाबतीत महत्त्वाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यामधून साखरेची आयात अनेक ठिकाणी होत असते. अहमदनगर जिल्ह्यात अगस्तीनगर, संगमनेर, कोळपेवाडी, टाकळी कोरेगाव, राहुरी, भेंडे, सोनई, पाथर्डी, शेवगाव, देवी भोयरी, श्रीगोंदे, बोधेगाव राशीन, बारगाव व सुद्रीक या ठिकाणी साखर कारखाने आहेत. ऊसाच्या चिपाडांपासून कागद तयार करण्याचे कारखाने जिल्ह्यात संगमनेर, राहुरी, कोपरगाव, प्रवरानगर येथे आहेत. जिल्ह्यात अहमदनगर, श्रीरामपूर, कोपरगाव व संगमनेर येथे औद्योगिक वसाहती आहेत.

## कुटीर लघु उद्योग :

अकोले तालुक्यातील हातसडीचे तांदूळ तयार करणे, औषधी वनस्पती गोळा करणे हे उद्योग चालतात. हातमागांवर व यंत्रमागांवर कापड विणण्याचा उद्योग अहमदनगर, भिंगार, पाथर्डी, संगमनेर, खर्डा येथे चालतो. श्रीगोंदे तालुक्यात घायपातापासून व अंबाडीपासून दोर वळण्याचा धंदा चालतो. अहमदनगर, अकोले व संगमनेर तालुक्यांत विड्या वळण्याचा उद्योग चालतो. जिल्ह्यात कोपरगाव, राहता, अहमदनगर व राहुरी येथे गुळाच्या बाजारपेठा आहेत. या ठिकाणच्या शेजारच्या परिसरात गूळ तयार केला जातो. श्रीरामपूर, संगमनेर, अहमदनगर, वांबोरी येथे तेल गिरण्या आहेत. (गॅझिटर अहमदनगर, १९७६)

## लघु उद्योग :

अहमदनगर, कर्जत, कोपरगाव, बाभळेश्वर, संगमनेर इत्यादी ठिकाणी दूध शीतकरण केंद्रे आहेत. तसेच आयुर्वेदिक देशी औषधे तयार करण्याचा अहमदनगर येथे कारखाना आहे. या शिवाय देशी औषधे तयार करण्याचा अहमदनगर येथे कारखाना आहे. या शिवाय दूरदर्शन संच तयार करण्याचा व मोपेड वाहने तयार करण्याचा कारखाना आहे. कोपरगाव व कान्हेगाव येथे औषधांचे कारखाने आहेत. श्रीरामपूर येथे

इंजिने व पंप बनवितात. श्रीरामपूर, हरेगाव, राहुरी येथे सूत गिरण्या आहेत. संगमनेर, अहमदनगर, पाथर्डी व शेवगाव येथे जिनिंग प्रेसचा उद्योग चालतो.

## नद्या :

अहमदनगर जिल्ह्यात उत्तरेकडील गोदावरी व दक्षिणेकडील भीमा या दोन मोठ्या नद्या जिल्ह्याच्या सीमेवरून वाहतात. या शिवाय जिल्ह्यात प्रवरा, मुळा, सीना व नेहा या महत्त्वाच्या नद्या आहेत. प्रवरा ही गोदावरीची उपनदी आहे. प्रवरा नदीचे पाणी उंचीवरून पडते. तेथे रंधा धबधबा आहे. या नद्यांच्या अनेक पात्रांमुळे अहमदनगर जिल्हा शेतीच्या दृष्टिकोनातून विचार केला तर इतर जिल्ह्यांपेक्षा प्रगत जिल्हा म्हणून ओळखला जातो. अनेक पाटांद्वारे शेतकऱ्यांच्या शेतीपर्यंत पाणी पोहचल्याचे दिसून येते.

## धरणे:

जिल्ह्यात अकोले तालुक्यात प्रवरा नदीवर भंडारदरा हे मोठे धरण आहे. राहुरी, बारगाव, नांदूर, पारनेर, मांडओहळ, पाथर्डी, पारगाव, घाटशिला मध्यम प्रकारची धरणे आहेत.

## अहमदनगर जिल्हा — सामाजिक प्रक्रिया :—

अहमदनगर जिल्ह्याची सामाजिक रचना ही भारताच्या इतर भागांपेक्षा वेगळी नाही. येथे ही हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, नवबौध्द व इतरही धर्माचे लोक राहतात. ते सांस्कृतिक परंपरा, रीतिरिवाज, सण—उत्सव उत्साहात साजरे करतात.

अहमदनगर शहर सीना नदीच्या उत्तर तीरावर वसलेले आहे. दौंड—मनमाड रेल्वेमार्गावर व पुणे—औरंगाबाद राज्यमार्गावर हे शहर आहे. या शहराला ऐतिहासिक वारसा आहे. बहामनी साम्राज्यातून फुटून अहमदशाह बहिरी याने १४८९ मध्ये येथे निजामशाही स्थापन केली. माळीवाडा, मोरचूदनगर, नालेगाव, सर्जेपुरा, चाहुराणा इत्यादी खेड्यांना साधून अहमदशहाने शहर वसविले. दक्षिणेच्या मोहिमेवर असताना औरंगजेब बादशहा भिंगार या सध्याच्या कॅन्टॉन्मेंट विभागाच्या स्थळी मृत्यू पावला. मोगलांकडून

१७५९ मध्ये शहर मराठ्यांकडे व त्यांच्याकडून इंग्रजांकडे गेले. शहराचे लष्करी महत्त्व ओळखून इंग्रजांनी येथे कॅन्टॉन्मेंट विभाग ठेवला. १९४२ च्या आंदोलनामध्ये अनेक अग्रगण्य पुढारी येथील किल्लात कैदेत ठेवले होते. यामुळे या शहरात अहमदशहाची कबर, फराहबाग, हस्ताबिहिस्त बाग, औरंगजेब बादशहाचा दर्गा व चांदबिबीचा महाल आहे. याशिवाय शहरात दगडी मशीद व टोली मशीद आहे. (जोशी लक्ष्मण, १९७६, पृ. ६८२) यामुळे शहरात हिंदू व मुस्लिम असे स्तरीकरण झाले आहे. अहमदनगर जिल्ह्यात शहरी लोकसंख्येचे प्रमाण १९८० पर्यंत कमी होते. १९८१ नंतर शहरी लोकसंख्या वाढत गेली. १९८१ मध्ये १२.९५, १९९१ मध्ये १५.८२ व २००१ मध्ये १९.६६ टक्के शहरी लोकसंख्या अहमदनगर जिल्ह्यात होती. (भारत सरकार, जनगणना अहवाल, पृ. १४) २००१ च्या जनगणना अहवालानुसार अहमदनगर शहराची लोकसंख्या २,३४,४४१ होती. त्यामध्ये अनुसूचित जातींची लोकसंख्या ११.७३ टक्के तर अनुसूचित जमातीची लोकसंख्या ०.७२ टक्के आहे. यापैकी लक्षणीय लोकसंख्या झोपडपट्टीत राहते. अहमदनगर शहरात २५ झोपडपट्ट्या आहेत. या लोकसंख्येचे हिंदू, मुस्लिम, अमराठी, ख्रिश्चन अशा सामाजिक गटात स्तरीकरण झाले आहे. अहमदनगर शहरात ७२.५० टक्के हिंदू समाज आहे. तर हिंदू वगळून २७.५ टक्के समाजाची वस्ती आहे. २७.५ टक्केमध्ये १५.६ टक्के मुस्लिम, ५.५२ टक्के जैन, २.२५ टक्के बौध्द, ३.९ टक्के ख्रिश्चन व ०.१८ टक्के शीख समाज येथे आहे. जवळजवळ ५ टक्के उर्दु भाषिक, ८९.१४ टक्के मराठी भाषिक व २.५७ टक्के हिंदी भाषिक लोकवस्ती आहे. अहमदनगर शहरात ब्राम्हण, मराठा, ख्रिश्चन, जैन, मारवाडी, गुजराथी, पारशी, साळी, माळी या जाती धर्मांची लोकवस्ती आहे. (अहमदनगर जिल्हा गॅझेटिअर, १९७६, पृ. १८७, बाळ कांबळे, २००३) शहरात तांबट, बागवान, कसाई या सारख्या पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या जाती धर्मांत्तरीत झालेल्या आहेत. हिंदी व्यापारी वर्गाकडे व्यापार व सेवा व्यवसाय एकवटत चालला आहे. शहरातील व्यापार व सेवा व्यवसायात मुस्लिम विरोधी जैन, मारवाडी, शीख अशी स्पर्धा आहे. या आर्थिक स्पर्धेचे रूपांतर हिंदू व

मुस्लिम तणावात झाले आहे. शहरी भागात जैन, मारवाडी, शीख व मुस्लिम यांच्या हितसंबंधाची स्पर्धा हा घटक शहराचे राजकारण गतिमान करणारा आहे. शहरी हितसंबंध हे हिंदी भाषिक गट, जैन, मारवाडी, शीख व मुस्लिम यांच्या स्पर्धेचे आहेत. या गटांना १९८० नंतरच्या बदलत्या अर्थव्यवस्थेने बळ दिले आहे. अहमदनगर शहरात नव्याने विकसित होऊ लागलेल्या कारखानदारीतूनही या समाजाचे हितसंबंध बळकट झाले. त्या तुलनेत मराठा, इतर मागासवर्गीय व दलित जाती मागे पडल्या आहेत. या समाजाच्या हितसंबंधाचे दावेदार पक्ष काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भारिप हे आहेत. तर हिंदी भाषिक गट जैन, मारवाडी, शीख यांच्या हितसंबंधाचे वाहक भाजप, शिवसेना हे पक्ष आहेत. त्यामुळे प्रबळ हितसंबंधाचा दावा अहमदनगर शहरात भाजप, शिवसेना या पक्षांकडून केला जातो. तर हिंदी भाषिक गट जैन, मारवाडी, शीख व मुस्लिम यांच्या हितसंबंधाचा दावा काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून केला जात नाही. त्यांच्या हितसंबंधाचा दावा केला तरी तो या वर्गाकडून मान्य होत नाही, असे एक राजकीय चित्र अहमदनगर शहरात १९९० नंतर पुढे आले आहे.

महाराष्ट्राच्या इतर भागाप्रमाणे या धर्मांच्या अनेक जाती–पोटजातींचे लोक इथे वास्तव्यास आहेत. नोकरी, व्यवसाय या निमित्ताने जिल्हाभर विविध जाती, पंथांचे लोक या ठिकाणी राहतात. अनेक जाती इथे दिसत असल्या तरी त्यांच्यात एकात्मकता दृढ झाल्याचे दिसते. शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने जिल्ह्यामध्ये आहे. तो सर्वच जाती धर्मामध्ये विभागलेला दिसतो. (मुंदडा संजय, २००७, पृ. ३४)

अहमदनगर जिल्हा अनेक बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण जिल्हा आहे. तसा हा पर्जन्य छायेतील प्रदेश म्हणून ओळखला जातो. परंतु जिल्ह्यातील मुळा, मांडओहळ, भंडारदरा धरणांमुळेच शेतीचा विकास झपाट्याने घडून आला. त्यातून सहकारी क्रांतीचे बीज रोवले गेले. या जिल्ह्याने स्वांतत्र्योत्तर संपुर्ण देशात सहकारी क्षेत्रात सर्वप्रथम क्रांती घडवली. देशातील नव्हे तर आशिया खंडामध्ये सर्वात प्रथम सहकारी तत्त्वावरील साखर कारखान्यांची सुरूवात सन १९४९ मध्ये कै. पद्मश्री विठठ्लराव विखे पाटील यांनी

केली. आशिया खंडातील सर्वांत मोठी सहकारी बँक हा सन्मान ही अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती बँकेला प्राप्त होतो. हा जिल्ह्याचा होत जाणारा विकास दर्शवितो. अहमदनगर जिल्ह्यामध्ये एकूण २० साखर कारखाने असून त्यापैकी १८ सहकारी व दोन खाजगी तत्त्वावर चालतात. सहकारी चळवळीच्या माध्यमातून जिल्ह्यातील शेतकरीवर्ग सधनतेच्या मार्गावर आहे. साखर कारखान्यांव्यतिरिक्त सहकारी तत्त्वावर दूध संस्था, पतसंस्था, महिला बचतगट, सहकारी सेवा गट, ग्राहक भांडारे, पाणी पुरवठा संस्था, खरेदी विक्री संघ आणि इतर संस्था यांची जवळपास १०,५०० इतकी संख्या आहे. शैक्षणिक क्षेत्रात जिल्ह्याचे योगदान चांगले आहे. मात्र इतर औद्योगिक विकास मर्यादित स्वरूपाचा आहे. जिल्ह्याच्या शेती विकासास सहकार क्षेत्राबरोबर राहुरी येथील म. फुले विद्यापीठाचा चांगला हातभार लागला आहे.

अहमदनगर जिल्ह्यामध्ये मुख्यत: मराठी भाषा बोलली जाते. मराठी भाषा दोन प्रकारे बोलली जाते. ती म्हणजे ग्रामीण मराठी आणि शहरी मराठी असे भाषाबदल या ठिकाणी आढळतात. तसेच इतरांमध्ये मुस्लिम व इतर महाराष्ट्रीयन परंतु स्थानिक हे हिंदी, उर्दु भाषांचा वापर करतात. तरीही मुख्य भाषा मराठीचा वापर सर्वत्र जास्त प्रमाणात दिसतो.

गुजराती, मारवाडी, सिंधी यांची अहमदनगर शहरासह संपूर्ण जिल्ह्याच्या उद्योगधंद्यात वास्तव्य दिसून येते. महाराष्ट्रीयन सुध्दा कमी जास्त प्रमाणात उद्योगधंद्यात आहेत. परंतु प्रगती मात्र तितकीशी झालेली दिसत नाही. पोशाखाच्या बाबतीत या ठिकाणी जास्त करून पुरूषांना गांधी टोपी, खुला शर्ट, धोतर व स्त्रियांना नऊवारी, सहावारी साडी वेगवेगळ्या रंगांत ज्या त्या परंपरेनुसार हा पेहरावाचा वापर करताना दिसतो. याहीपेक्षा आधुनिक प्रकारच्या वेगवेगळ्या प्रकारच्या पोशाखांचाही वापर येथील स्त्री पुरूष करताना दिसतात.

पारंपारिकरित्या तेथील धर्मांच्या अनुषंगाने स्त्रिया सोन्या–चांदीचे अलंकार अंगावर घालतात. त्यामध्ये विविध प्रकारचे नक्षीकाम असलेल्या अलंकारांचा वापर करतात.

पुरूषही काही सोन्या चांदीचा वापर करतात. जसे उदा. अंगठी, लॉकेट, कानामध्ये बाळी भारतासह सोने चांदीचे अलंकार हे एक भूषण, प्रतिष्ठा म्हणून याही ठिकाणी मानले जाते. त्यामुळे येथील सर्वच जाती धर्माचे लोक आर्थिक ऐपतीनुसार सोने चांदी खरेदी करताना दिसून येतात. धार्मिक स्थळांचा अभ्यास करताना असे दिसते की, अहमदनगर जिल्ह्यामध्ये हिंदू समाजाची लोकसंख्या अधिक असल्यामुळे त्यांचे देवस्थान विठोबा, खंडोबा, नवनाथ, महादेव, देवी इत्यादी जिल्ह्यातील लोकप्रिय व जागृत देवस्थानाला मानतात दिसतात. विशेष म्हणजे विमुक्त भटक्या जमाती, नवबौध्द् हे त्यांच्या पध्द्तीने त्यांच्या महामानवाची उपासना करतात. तसेच इथे हिंदू समाज जास्त प्रमाणात राहत असल्यामुळे जिल्हाभर किर्तन, प्रवचन, धार्मिक व्याख्यान, धार्मिक प्रबोधन माध्यमातून जनजागृतीचे कार्य चालते. तसेच सर्व धर्मामध्ये विविधतेत एकता दिसत आहे.

या शिवाय या जिल्ह्यात सांस्कृतिक एकात्मता मोठ्या प्रमाणावर वाढीस लागलेली आहे. कला, नक्षीकाम, पारंपारिक अवजारे करणारे प्रसिध्द् नक्षीकार लोक या जिल्ह्यात वास्तव्यास आहेत. त्यामुळे त्यांच्या कलागुणांचा आणखी जास्त प्रमाणात वाव देण्यासाठी जिल्हाभर सांस्कृतिक केंद्रांची उभारणी महाराष्ट्र सरकारने केली आहे. समाजाच्या कल्याणाचा भाग म्हणून १९५६ पासून सामाजिक कल्याण विभागाची या ठिकाणी स्थापना केली आहे. त्यामार्फत आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या समाजासाठी हा विभाग नेहमी कार्यरत असताना दिसून येतो.

अहमदनगर जिल्ह्यात सामाजिक विकास करण्यासाठी अनेक सामाजिक संघटनांनी भाग घेऊन येथील सर्वच जातीतल्या लोकाना न्याय, समता, बंधुता या तत्वाखाली सुरक्षित जीवन जगता यावे यासाठी सामाजिक संघटनेने भाग घेतलेला दिसून येतो. सामाजिक परिवर्तनाचे अनेक प्रकल्पही अहमदनगर जिल्ह्यात आहे. डॉ. रजनीकांत आरोळे यांना जामखेड ग्रामीण आरोग्य व शिक्षण प्रकल्पासाठी दोन दशकांपूर्वी 'रॅमन मॅगसेस' पुरस्कार मिळाला. अण्णा हजारे यांचा राळेगणसिध्दी प्रकल्प, पोपटराव पवारांचा हिवरे बाजार प्रकल्प, फादर बखर यांची पाणलोट क्षेत्र विकासाची

मेंढवन (ता. संगमनेर) येथील राष्ट्रीय कार्यशाळा प्रशिक्षण केंद्र 'वॉटर आणि सोशल सेंटर' या संपूर्ण महाराष्ट्रात कार्यरत पाणलोट क्षेत्र विकास संस्था, म. वि. कौडिण्य यांचा संगमनेरचा मुक्तांगण प्रकल्प (शिक्षण आणि रोजगाराची सांगड घालणारा), डॉ. गिरीष कुलकर्णी यांचा स्नेहाकाय प्रकल्प नॅकसेंट कार्यजाळे (अल्पवयीन मुलींची वेश्या व्यवसायातील भरती रोखणारा उपक्रम), बालिकाश्रम (दलित आदिवासी) इ. प्रकल्प प्रसिध्द आहेत. ९१ गावांमधून ग्रामसुधारणेचे, ग्राम परिवर्तनाचे मोठे कार्य चालू आहे. लोकसहभाग उस्फुर्त असल्याने भारताच्या सर्व राज्यांतून स्वयंसेवी संस्था व शेतकऱ्यांचे गट ही कामे पाहण्यासाठी रोज येतात.

नगरची रावसाहेब पटवर्धन स्मारक समिती सामाजिक व सांस्कृतिक चळवळीत राज्यात जागृती आहे. राज्यातील अनेक राजकीय आणि सामाजिक चळवळीची संचालने नगरमधून होतात. उदा. अण्णा हजारे यांचे राज्य भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन, लाल निशाण पक्षाची आंदोलने, राज्य शेतमजूर, युनियन, किसान संघ, ऊस उत्पादक संघटना, ऊस तोडणी कामगार संघटना, राज्य साखर कामगार महासंघ, अ. भा. विडी कामगार महासंघ, राज्य कोतवाल संघ, राज्य नगरपालिका कर्मचारी युनियन, राज्य अंगणवाडी सेविकांची संघटना इ. मध्यवर्ती कार्यालये नगरला आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम विभागाचे संघचालक (गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक राज्याचे प्रमुख) माणिकराव पाटील राज्याचे संघचालक के. एस. सहाने नगरलाच राहतात. यामुळे नगर सामाजिक जन आंदोलनाच्या केंद्रस्थानी असते. राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय घडामोडीचे संचालन अनेकदा नगरमधून होते. (पळशीकर सुहास, २००४, पृ. २२८)

अहमदनगर जिल्ह्याचा सामाजिक कार्याचा अभ्यास केला तर सामाजिक विकास हा केंद्रबिंदू मानून जिल्ह्यातील सामाजिक संघटनेने केलेले परिवर्तन आणि जिल्ह्यात अस्तित्वात असलेल्या संघटना यावरून अहमदनगर जिल्हा सामाजिक दृष्टीने किती विकसनशील आहे यांचा आपणास विचार करावा लागतो. अशा प्रकारे जिल्ह्याची सामाजिक परिस्थिती आहे.

## अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळ–

अहमदनगर जिल्हा सद्य: स्थितीला सहकाराचे केंद्र मानला जातो. सहकार चळवळीमुळे अहमदनगर जिल्ह्यात उद्योगव्यवसाय भरभराटीस येत आहेत. अहमदनगर जिल्ह्यामध्ये सहकारी चळवळ रूजविण्यासाठी पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, भाऊसाहेब थोरात, आबासाहेब निंबाळकर, मारूतरावजी घुले पाटील या विभूतींचा मोलाचा वाटा होता. महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना सन १९५० मध्ये पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी प्रवरानगर येथे उभारला. या साखर कारखान्यांमुळे आजूबाजूच्या परिसराच्या विकासाला नवसंजीवनी मिळाली. शेतकरी वर्गाच्या समस्या सुटण्यास मदत झाली. सहकार तत्त्वावर अनेक उद्योग त्या काळात उभारले जाऊ लागले. विखे पाटलांचे अनुकरण करत अनेक नेत्यांनी सहकाराची कास धरली. यशवंतराव चव्हाणांच्या विचारांची शिदोरी कै. आबासाहेब निंबाळकर, भाऊसाहेब थोरात, माननीय खासदार श्री. बाळासाहेब विखे पाटील या महान सहकारी विभूतींनी पुढे जनसामान्यांपर्यंत पोहचवून ती कायमस्वरूपी टिकवली. प्रवरानगर पाठोपाठ संगमनेर, शेवगाव, नेवासा, कोपरगाव, श्रीरामपूर, अकोला, राहुरी, राहता, नगर, कर्जत, श्रीगोंदा, पारनेर येथे सहकारी साखर कारखाने उभारले होते. देशातील साखर उत्पादनाच्या ५ टक्के साखर अहमदनगर जिल्ह्यामध्ये तयार होते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही राज्यातील सर्वाधिक उलाढाल करणारी बँक समजली जाते. आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना येथे स्थापन झाला. आशिया खंडातील सर्वात मोठी सहकारी बँक म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची ओळख आहे.

## अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी संस्थांची प्रगती–

सन १९९५–९६ ते सन २००७–०८ या कालावधीतील अहमदनगर जिल्ह्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांनी केलेली प्रगती तक्ता क्र. २.४ मध्ये दर्शविलेला आहे. तक्ता क्र. २.४ वरून असे स्पष्ट होते की, अहमदनगर जिल्ह्यात सन २००७–०८ मध्ये कृषि पतसंस्थांची संख्या १,२८७, आदिवासी सहकारी संस्था ३८, व इतर सहकारी संस्था कार्यरत होत्या. वरील सहकारी संस्था प्रामुख्याने शेती व शेती क्षेत्रातील उद्योगांना कर्जपुरवठा करतात. सन २००७–०८ मध्ये अहमदनगर जिल्ह्यामध्ये बिगर कृषि पतसंस्थामध्ये नागरी सहकारी बँका २३, नागरी सहकारी पतसंस्थांची संख्या ३०९, कर्मचारी सहकारी पतसंस्था २१५, इतर बिगर कृषि पतसंस्था ६३२ होत्या. तर एकूण बिगर कृषि पतसंस्थांची संख्या १,१७९ एवढी होती. खालील बिगर कृषि पतसंस्था प्रामुख्याने शेतीव्यतिरिक्त इतर लहान उद्योग, व्यापार सेवा क्षेत्रास कर्जपुरवठा करतात. अहमदनगर जिल्ह्यामध्ये एकूण पणन सहकारी संस्थांची संख्या ६२ एवढी होती. त्यामध्ये जिल्हा पणन सहकारी पतसंस्था १, प्राथमिक पणन सहकारी पतसंस्था १४ व इतर पणन सहकारी संस्थाची संख्या ४७ एवढी होती. खालील पणन सहकारी संस्था प्रामुख्याने कापूस एकाधिकार संस्थाना कापूस खरेदी विक्रीसाठी मदत करतात. सन २००७–०८ मध्ये अहमदनगर जिल्ह्यामध्ये एकूण उत्पादक सहकारी संस्था ४,४२३ एवढ्या होत्या. त्यामध्ये सहकारी साखर कारखाने १५, इतर शेतीप्रक्रिया सहकारी पतसंस्था ६, विणकर सहकारी संस्था ३, औद्योगिक वसाहती सहकारी पतसंस्था ७, इतर औद्योगिक सहकारी संस्था ८४, दुग्ध सहकारी संस्था २,७९९, मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था ६१, उपसा जलसिंचन सहकारी पतसंस्था ६१०, इतर उत्पादक सहकारी पतसंस्था ८३८ एवढ्या होत्या. खालील उत्पादक सहकारी संस्थांचा उद्देश उत्पादन क्षेत्रातील मक्तेदारीला लगाम घालणे व सहकारी उद्योग स्थापन करणे व उद्योग, व्यापार क्षेत्राला आर्थिक सहकार्य करणे होय. सन २००७–०८ मध्ये अहमदनगर जिल्ह्यामध्ये सामाजिक सेवा सहकारी संस्थाची संख्या २,५४८ एवढी होती.

त्यामध्ये ग्राहक भांडारे ६३, गृहनिर्माण सहकारी संस्थांची संख्या ७२०, कामगार कत्रांटद्वारे सहकारी संस्था ८२१ तर इतर सहकारी संस्था ९४४ एवढ्या होत्या. सामाजिक सेवा सहकारी संस्थांचा उद्देश सामाजिक गरजांचे व प्रश्नांचे न्याय्य वाटप केले जावे व सर्वांना सामाजिक सेवा समान, न्याय्य पध्द्तीने मिळाल्या पाहिजेत. वरील विश्लेषणावरून अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी संस्थांची प्रगती समाधानकारक असल्याचे दिसते. जिल्ह्यातील शेती, उद्योग, व्यापार, सेवा क्षेत्रातील विकासासाठी सहकारी संस्थांनी मोठया प्रमाणात जिल्ह्यात शाखाविस्तार करून प्रगती करण्याचा प्रयत्न केला आहे.

**तक्ता क्र २.४**

## अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी संस्थांची प्रगती

| अ.क्र | सहकारी संस्थेचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| **१** | **कृषि पतसंस्था** | ३ |
| १.१ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका | १ |
| १.२ | विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था | १,२८७ |
| १.३ | शेतकरी सेवा संस्था | ० |
| १.४ | आदिवासी सहकारी संस्था | ३८ |
| १.५ | धान्य सहकारी संस्था | ० |
| १.६ | इतर | २ |
| | एकूण | १,३२६ |
| **२** | **बिगर कृषि पतसंस्था** | |
| २.१ | नागरी सहकारी बँका | २३ |
| २.२ | नागरी सहकारी पतसंस्था | ३०९ |

| | | |
|---|---|---|
| २.३ | कर्मचारी सहकारी पतसंस्था | २१५ |
| २.४ | इतर बिगर कृषि पतसंस्था | ६३२ |
| | एकूण | १,१७९ |
| **३** | **पणन सहकारी संस्था** | |
| ३.१ | जिल्हा पणन सहकारी संस्था | १ |
| ३.२ | प्राथमिक पणन सहकारी संस्था | १४ |
| ३.३ | इतर पणन सहकारी संस्था | ४७ |
| | एकूण | ६२ |
| **४** | **एकूण उत्पादक सहकारी संस्था** | |
| ४.१ | सहकारी साखर कारखाने | १६ |
| ४.२ | इतर शेती प्रक्रिया सहकारी संस्था | ६ |
| ४.३ | विणकर सहकारी संस्था | ३ |
| ४.४ | औद्योगिक वसाहती सहकारी संस्था | ७ |
| ४.५ | इतर औद्योगिक सहकारी संस्था | ८४ |
| ४.६ | दुग्ध व्यवसाय सहकारी संस्था | २,७९९ |
| ४.७ | मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था | ६१ |
| ४.८ | सहकारी सूतगिरण्या | ० |
| ४.९ | उपसा जलसिंचन सहकारी संस्था | ६१० |
| ४.१० | इतर उत्पादक सहकारी संस्था | ८३८ |
| | एकूण | ४,४२३ |
| **५** | **सामाजिक सेवा सहकारी संस्था** | |
| ५.१ | ग्राहक भांडारे (सहकारी) | ६३ |
| ५.२ | गृहनिर्माण सहकारी संस्था | ७२० |

| | | |
|---|---|---|
| ५.३ | कामगार, कंत्राटदार सहकारी संस्था | ८२१ |
| ५.४ | इतर सहकारी संस्था | ९४४ |
| | एकूण | २,५४८ |
| | **एकूण १ ते ५ संस्था** | **९,४९७** |
| जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, अहमदनगर जिल्हा २००१–०२, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई. | | |

अहमदनगर जिल्ह्यासाठी सहकार चळवळीचा इतिहास आहे. त्याच प्रेरणेने जिल्ह्यातील नेतृत्वांनी सहकारी चळवळीला बळकटी देण्याचा यशस्वी प्रयत्न केल्याचे दिसून येते.

## आर्थिक घटक

भारतात १९०४ च्या सहकार कायद्याने प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्थाद्वारे पतपुरवठा सुरू करण्यात आल्याचे आढळते. भारतात शेतीला स्वस्त दराने कर्जपुरवठा करण्यासाठी आणि सावकारी कर्जापासून शेतकऱ्यांची मुक्तता करण्याच्या हेतूने प्रयत्न करण्यात आले. विळख्यातून सुटका करणे आणि त्यांना उत्पादक कामासाठी अल्प व्याजदराने कर्जपुरवठा करणे या हेतूने सहकारी पतसंस्था स्थापन करण्यात सुरूवात झाली. तेव्हापासून ग्रामीण भागातील शेतकरी आणि कारागीर वर्गासाठी अनेक प्रकारच्या सहकारी पतसंस्था स्थापन झाल्या. त्यामध्ये विविध कार्यकारी सेवा, सहकारी संस्था ही सर्वात महत्त्वाची संस्था मानली जाते. कारण, तिच्यामार्फत शेतकऱ्यांना प्रत्यक्षपणे कर्जपुरवठा केला जातो. शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करावे, लोकांना काटकसर व बचत करण्याची सवय लागावी, एकमेंकाना मदत आणि परस्पर सहकार्यात वाढ करणे आणि ग्रामीण कर्जबाजारीपणा कमी करणे. सावकाराच्या मगरमिठीतून ग्रामीण शेतकऱ्यांची सुटका करणे इत्यादी विविध हेतू सहकारी चळवळीच्या पाठीमागे होते.

प्राथमिक सहकारी शेती पतसंस्थाना ग्रामीण सहकारी पतपुरवठ्याच्या रचनेत महत्त्वाचे स्थान आहे. सन १९५१—५२ मध्ये या संस्थाची संख्या १.०८ लाख एवढी होती. ती सन १९९६—०१ मध्ये २.१२ लाख एवढी झाली. नंतरच्या काळात प्राथमिक सहकारी पतसंस्थेची पुनर्रचना केल्यामुळे कमी होऊन सन १९८०—८१ मध्ये ती ९४,४८४ एवढी झाली होती तर सन १९९३—९४ मध्ये त्यांची संख्या ९१,००० पर्यंत घटली. भारतामध्ये सर्व स्तरांतील कार्यरत असलेल्या सहकारी पतसंस्थाच्या प्रगतीचा आलेख वाढत गेल्याचे दिसून येते. सन १९५१ मध्ये प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्थांचे खेळते भांडवल केवळ ४१.३८ कोटी रूपये एवढे होते ते सन २००० मध्ये ३२८७०. ८३ कोटी रूपयांपर्यंत वाढले. प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्थांनी सन १९५१ मध्ये दिलेली कर्जे व अग्रीमे २९.१३ कोटी रूपये ऐवढी होती. सन २००० मध्ये प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्थांनी दिलेली कर्जे व अग्रीमे १९०२३.७९ कोटी रूपये वाढल्याचे दिसून येते. भारतातील कृषि क्षेत्राला करण्यात आलेल्या एकूण पतपुरवठ्याच्या संख्यात्मक स्त्रोतात सहकारी पतपुरवठा हा एक महत्त्वाचा स्त्रोत आहे.

भाषावर प्रांतरचनेनुसार मुंबई प्रांताचे विभाजन झाले व महाराष्ट्र राज्य १ मे १९६० रोजी स्थापन झाले. महाराष्ट्र राज्याची स्थापना जरी सन १९६० या वर्षी झाली असली तरी पूर्वीच्या मुंबई प्रांतातील पुणे व अहमदनगर या भागातील काही शेतकऱ्यांनी सावकरांविरूध्द बंड पुकारून सावकाराला लिहून दिलेल्या वचनचिठ्या फाडण्यास सुरूवात केली. यामधून जी दंगल उद्‌भवली, त्याचा परिणाम लक्षात घेऊन सरकारने सावकारी नियंत्रण व तिला तुल्यबळ अशी संघटित संस्था निर्माण करण्यावर भर दिला. त्यातूनच भारतात सहकाराचा पहिला कायदा अस्तित्वात आला, असे म्हणता येईल. महाराष्ट्रात सहकाराची सुरूवात त्या काळात झाली. अल्प व मध्यम मुदतीचा पतपुरवठा करण्यासाठी सन १९०५ मध्ये पूर्वीच्या मुंबई प्रांतात पहिली कृषि पतपुरवठा संस्था स्थापन झाली होती. महाराष्ट्रातील सहकार चळवळीच्या उगमास जवळजवळ शतक पूर्ण झाले. या काळात महाराष्ट्रात सहकार चळवळीचा आलेख वाढतच गेला. सहकारी

चळवळीमुळे महाराष्ट्राची सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रगती मोठया प्रमाणावर झाली. महाराष्ट्रात सन १९६१ मध्ये १८,९९८ प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्था अस्तित्वात होत्या. सन २००० मध्ये प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांची संख्या २०,५०० पर्यंत वाढली. महाराष्ट्रातील सहकारी पतपुरवठयातील कर्जे व अग्रीमचे स्थान महत्त्वाचे आहे. अभ्यासकाळात त्यामध्ये प्रगती झाल्याचे दिसून येते. सन १९६१ मध्ये प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांनी दिलेली कर्जे व अग्रीमे ४,०२६ लाख रूपये होती. सन २००० मध्ये ३,०२,६४५ लाख रूपये एवढी झाली. महाराष्ट्र राज्यातील पतपुरवठा संस्थांच्या खेळत्या भांडवलात मोठया प्रमाणावर वाढ झाली असली तरी त्यांच्या वसुलीचे प्रमाण मात्र कमी होऊन थकबाकीत मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. अहमदनगर जिल्ह्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या प्रगतीमध्ये अभ्यासकाळात संस्थासंख्या दरवर्षी सरासरी १२३९, सभासद संख्या दरवर्षी सरासरी ७.१२ लाख, शासकीय भागभांडवल दरवर्षी सरासरी ५७.५८ लाख रूपये, राखीव निधी दरवर्षी सरासरी ३६.३९ कोटी रूपये, भागभांडवल दरवर्षी सरासरी १०४. ६७ कोटी रूपये, स्वनिधी दरवर्षी सरासरी १४२.०६ कोटी रूपये, तर खेळते भांडवल दरवर्षी सरासरी ६८१.०२ कोटी रूपयांनी वाढल्याचे दिसून येते, अहमदनगर जिल्ह्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांनी घेतलेल्या कर्जात दरवर्षी सरासरी ४३९.०० कोटी रूपये, दिलेल्या कर्जामध्ये दरवर्षी सरासरी २५६.६७ कोटी रूपये, येणे कर्जात दरवर्षी सरासरी ४९१.३१ कोटी रूपये, तर थकबाकी दरवर्षी सरासरी १२८. ३७ कोटी रूपये वाढ झाल्याचे दिसून येते. तसेच जिल्ह्यातील तालुकानिहाय विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची संख्या अभ्यासकाळात दरवर्षी सरासरी १२, सभासद संख्या दरवर्षी सरासरी ३,०२८, थकबाकी दरवर्षी सरासरी १२८.३७ कोटी रूपये, राखीव निधी दरवर्षी सरासरी २.८२ कोटी रूपये, भागभांडवल दरवर्षी सरासरी ६.८२ कोटी रूपये तर खेळते भांडवल दररवर्षी सरासरी ६१.१३ कोटी एवढे होते. या संस्थांनी दरवर्षी घेतलेले कर्ज दरवर्षी सरासरी ३३.८२ कोटी रूपये दिलेले कर्ज दरवर्षी सरासरी

३८.४८ कोटी रूपये, दिलेले पीक कर्ज दरवर्षी सरासरी ५.०१ कोटी रूपये आणि येणे कर्ज दरवर्षी सरासरी ४७.३३ कोटी रूपयांनी अभ्यासकाळात वाढल्याचे दिसून येते.

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान अर्थव्यवस्था असून, देशातील सर्वाधिक लोक शेतीव्यवसायावर अवलंबून आहेत. त्यामुळे आजच्या स्पर्धेत खाजगीकरण आणि जागतिकीकरणामुळे बँक व्यवसायात मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे. उदारीकरणामुळे नवीन बँका स्थापन करणे सोपे झाले व त्यामुळे बँक व्यवसायात स्पर्धात्मक वातावरण निर्माण झाले आहे. कृषि पतपुरवठ्यात प्राथमिक कृषि पतपुरवठ्याचे प्रमाण धोक्यात आली आहे. कृषि पतपुरवठ्यात प्राथमिक कृषि पतपुरवठ्याचे प्रमाण तुलनात्मकदृष्ट्या मोठे आहे. या संस्थाकडे स्वतच्या भांडवलाचा अभाव आहे. जिल्हा सहकारी बँकाकडून येणाऱ्या रकमांचा कर्जपुरवठा अवलंबून असतो. त्यामुळे ५० टक्के सभासदांना कर्ज मिळू शकत नाही. ज्यांना मिळते, त्यांना वेळेवर मिळत नाही आणि पुरेसे नसते. त्यामुळे या संस्थाना शासकीय भांडवलाचा मोठा आधार देणे गरजेचे आहे.

## अहमदनगर जिल्ह्यातील उद्योग क्षेत्र

सहकार क्षेत्रात अहमदनगर जिल्हा प्रथमपासूनच अग्रेसर असून, भारतातील सहकारी साखर कारखाना सन १९५० मध्ये प्रवरा नगर येथे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी उभारला. जिल्ह्यात सन २००१–०२ वर्षाअखेर सर्व प्रकारच्या मिळून ८,७१३ सहकारी संस्था आहेत. उद्योग क्षेत्रात जिल्हा प्रगतिपथावर आहे. महाराष्ट्र राज्याच्या निम्म्याहून अधिक साखरेचे उत्पादन एकट्या नगर जिल्ह्यात केले जाते. औद्योगिक मद्यार्क कागद व देशी दारू ही उत्पादने साखरेच्या उत्पादनाबरोबर घेतली जातात. लुना मोपेड (वाहने) तसेच व्हिडीओकॉन टि. व्ही इत्यादी इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन अहमदनगर जिल्ह्यामध्ये घेतली जातात.

सन २००२ अखेर जिल्ह्यात १६ साखर कारखाने व ३ सूतगिरण्या चालू असून, ५९४ नोंदणीकृत कारखाने आहेत. कृषि शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात

उल्लेखनीय प्रगती केलेले पारनेर तालुक्यातील राळेगणसिध्दी हे आदर्श खेडे म्हणून प्रसिध्द आहे. भारतातील विविध राज्यांचे प्रशासकीय अधिकारी व सामाजिक कार्यकर्ते तेथे अभ्यासासाठी भेट देत असतात. श्री. साईबाबांची शिर्डी व अवतार मेहेरबाबांचे मेहेराबाद ही अहमदनगर जिल्ह्यातील धार्मिक स्थळे भारतातील तसेच जगातील अनेक भक्तांची श्रध्दास्थाने बनली आहेत. शिवाय श्री ज्ञानेश्वर मंदिर (नेवासा), श्री शनिशिंगणापूर, श्री दत्त मंदिर देवगड, श्री सिध्दिविनायक सिध्दटेक ही तीर्थक्षेत्र अहमदनगर जिल्ह्यात आहेत.

## अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय प्रक्रिया :—

अहमदनगर जिल्हा व क्षेत्रफळाचा विचार करता राज्यातील सर्वात मोठा जिल्हा आहे. अहमदनगर जिल्हामध्ये १ महानगरपालिका, ८ नगरपालिका, १ नगर पंचायत, १ जिल्हा परिषद, १४ पंचायत समित्या तर १,३०८ ग्रामपंचायती आहेत. अहमदनगर जिल्हामध्ये साक्षरतेचे प्रमाण ७३ टक्के आहे तर महिलांचे दर हजारी प्रमाण ९७१ एवढे आहे. १९५१ मध्ये आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना अहमदनगर जिल्ह्यामध्ये सुरू झाला. थोडक्यात अहमदनगरचे राजकारण ग्रामीण व शहरी अशा दोन भागांमध्ये विभागण्याची राजकीय प्रक्रिया सुरू आहे. या पार्श्वभूमीवर अहमदनगर महानगरपालिकेच्या राजकारणाचे विश्लेषण केले आहे.

अहमदनगर जिल्हा क्षेत्रफळ व आकारमानाचा विचार करता राज्यातील सर्वात मोठा जिल्हा आहे. महाराष्ट्रात सर्वात मोठा व्यापक असलेला जिल्हा म्हणून अहमदनगर जिल्ह्याची ओळख आहे. अहमदनगर जिल्ह्याला अभूतपूर्व इतिहासाची जोड लाभली आहे. मध्ययुगात निजामशाही सत्ता अहमदनगरमध्ये होती. ऐतिहासिक प्रसिध्द स्थळामध्ये शहराच्या पूर्वेला असणारा भुईकोट किल्ला व चाँद बीबीचा महाल त्या इतिहासाची साक्ष म्हणून उभी आहेत. याच भुईकोट किल्ल्यामध्ये स्वतंत्र भारताचे रचनाकार व देशाचे पहिले पंतप्रधान प. जवाहरलाल नेहरूनी इंग्रज राजवटीत तुरूंगवास भोगला. (जोशी भागवत, २००४) जिल्ह्यातील सद्य परिस्थितीचा विचार केला तर अहमदनगर जिल्हा हा

सांस्कृतिकदृष्ट्या किती महत्त्वाचा आहे. ऐतिहासिक दृष्टीने या जिल्ह्याचे ऐतिहासिकतेतून किती महत्त्व आहे हे आपणास दिसून येते.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून अहमदनगर जिल्हा राजकीयदृष्ट्या प्रसिध्द् आहे. ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीपासून मुक्त होण्यासाठी देशाच्या इतर भागांबरोबर या जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणावर चळवळी, उठाव झाले. उदा. रामोशी उठाव, सावकारांविरूध्दचा उठाव, शेतकरी उठाव हे आजही इतिहासामध्ये प्रसिध्द आहेत. त्यामुळे राजकीय विचार मोठ्या प्रमाणावर या ठिकाणी स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच रूजलेले दिसते. (विखे विठ्ठलराव, २००१, पृ. १४)

भारताला १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राज्याच्या इतर भागांबरोबर अहमदनगर जिल्ह्यात राजकारणाची तीव्रता वाढ होण्यास सुरूवात झाली. केंद्र पातळीवर यशाचे पडसाद देशासह अहमदनगर जिल्ह्यामध्येही उमटले. परंतु त्याही अगोदर अनेक उठाव, चळवळी यामुळे कम्युनिस्ट पक्षाच्या विचाराने हा संपूर्ण जिल्हा प्रेरित झाला होता. त्या काळात मोठ्या प्रमाणावर जनमताची साथ त्यांना मिळाली. कार्यकर्त्यांचा मोठा संच कम्युनिस्टांमध्ये तयार झाल्यामुळे जिल्ह्याच्या अनेक भागांतून लहान मोठे नेतृत्व उभे राहिले. उदा. पारनेर, स्व. रावसाहेब पटवर्धन, ओ. इ. पाटील, बाबासाहेब ठुबे, गुलाबराव शेळके, श्रीगोंदा शिवाजीराव नागवडे, संगमनेर भाऊसाहेब थोरात, अरूण पाटील कडू, कॉ. मधुकर अत्रे, कॉ. राम रत्नाकर, अकोला भांगरे पाटील, जामखेड बन्सीसेठ कोठारी, कांबळे, लोखंडे, कर्जत भेरूव नाईक (माजी आमदार) नेवासा स्व. वकीलराव लंघे (दोनदा आमदार) इत्यादी निष्ठावंत मंडळींचा कम्युनिस्ट पक्षामध्ये संच निर्माण झाला होता. त्यामुळे १९५० ते जवळपास १९७५ पर्यंत कमी जास्त प्रमाणात या पक्षाचे वर्चस्व अहमदनगर जिल्ह्याच्या राजकारणावर दिसते.

एकीकडे कम्युनिस्ट पक्षाचा प्रभाव वाढत असताना दुसऱ्या बाजूला सहकार चळवळीची मुहूर्त मेढ जिल्ह्यामध्ये स्व. विठठ्लराव विखे, धनंजयराव गाडगीळ, कै. वैकुंठभाई मेहता यांनी रोवली. त्यामुळे पुढे हळूहळू जिल्ह्यातील राजकारणात बदल

निर्माण झाला. त्यावेळेस नेहरूंच्या मिश्र अर्थव्यवस्थेच्या धोरणामुळे देशामध्ये औद्योगिकीकरणास प्रारंभ झाला होता. त्याचा फायदा देशासह नगर जिल्ह्यालाही फार मोठा झाला. सरकारला केंद्र शासनाच्या धोरणाची जोड मिळाल्यामुळे आशिया खंडातील पहिला सहकारी तत्त्वावरील साखर कारखाना १९५१ मध्ये उभारला गेला. त्याचा फायदा जिल्ह्यातील अनेक साखर उद्योग उभे राहण्यास व सहकार चळवळ या ठिकाणी रूजण्यास मदत झाली. अगोदर समाजकारण हा केंद्रबिंदू मानल्यामुळे सहकारी क्षेत्रातील नेत्यांचा प्रभाव वाढत गेल्यामुळे पुढे कम्युनिस्ट पक्षाच्या एकछत्री अमलाला तडे जाण्यास सुरूवात झाली. (लिमये मधू, १९९१, पृ. ११४ ते ११५)

केंद्र राज्याच्या काँग्रेस नेत्यांच्या प्रभावामुळे येथील काँग्रेस पक्षाचा प्रभाव उत्तरोत्तर वाढत गेला. कम्युनिस्टांमधील अनेक थोर मंडळी काँग्रेसमध्ये गेली. त्यातून जिल्ह्यामध्ये काँग्रेसचे अनेक नेतृत्व लाभले गेले. उदा. डी. बी. कुलकर्णी, संगमनेरमध्ये भाऊसाहेब थोरात, नेवाशामध्ये कै. मारूतराव घुले, यशवंतराव गडाख, कोपरगावमधून शंकरराव कोल्हे, ना. न. कराळे, श्रीगोंदामध्ये शिवाजीराव नागवडे, बबनराव पाचपुते, अकोल्यात मधुकरराव पिचड, दादासाहेब रूपवते, राहुरीत प्रसाद तनपुरे, श्रीरामपुरात गोंविदराव आदिक, भानुदास मुरकुटे, पाथर्डीत अप्पासाहेब राजळे, राहत्यात अण्णासाहेब शिंदे, शेवगावात बाळासाहेब भारदे असे काँग्रेस नेतृत्व जिल्ह्याच्या अनेक भागांमधून उदयास आले. या सर्व मंडळीनी सहकार चळवळीच्या माध्यमातून राजकारण केले. त्यामुळे त्यांना ज्या–त्या भागामध्ये राजकीय एकछत्री अंमल निर्माण करण्यात मोठ्या प्रमाणात यश आले.

महाराष्ट्राच्या 'शुगरलॉबी' मध्ये अहमदनगर जिल्ह्याच्या सहभाग महत्त्वाचा ठरला आहे. येथील जिल्हा शुगर लॉबीने जिल्ह्याच्या स्थानिक राजकारणासह राज्य व केंद्र पातळीच्या राजकारणालाही योग्य दिशा देण्याचे काम केले आहे. (काळे शंकरराव, २००५, सकाळ विशेषांक) सहकारी तत्त्वावर वित्त पुरवठा करणाऱ्या अनेक सहकारी संस्था, बँका निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे अर्थकारणाचा पाया हळूहळू सुधारत गेला.

यामध्ये सहकार चळवळींची भूमिका महत्त्वाची ठरलेली दिसते. त्यामुळे जिल्ह्यातील राजकारणाची सुत्रे शुगर लॉबीकडे प्रामुख्याने राहिल्याचे दिसते. सहकाराच्या माध्यमातून या जिल्ह्यामध्ये राजकारणाचे खूप मोठे जाळे तयार झालेले आहे. या सर्व राजकीय जाळ्यावर शुगर लॉबी राजकारण्यांचे नियंत्रण असलेले दिसून येते.

काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसबरोबरच भाजप, शिवसेनेसह इतर पक्षांचा प्रभाव जिल्ह्यामध्ये दिसत नाही. परंतु जिल्ह्यामध्ये या पक्षाचे नेतृत्व निर्माण झाल्याचे दिसते. त्यांना परिस्थितीनुसार राजकारणात यशही मिळालेले आहे. मात्र ते टिकून ठेवण्यात त्यांना यश आलेले दिसत नाही. परंतु जिल्ह्यामध्ये या पक्षाचे सद्य परिस्थिती पाहता पारनेर तालुक्यात आ. विजय औटी, अहमदनगर शहरात आ. अनिल राठोड यांनी आपआपल्या क्षेत्रात राजकीय वर्चस्व टिकवून ठेवण्यात यश मिळविले आहे. कारण त्यांना काँग्रेसमधील गटबाजीचा नेहमीच फायदा झालेला आहे.

शुगर लॉबीच्या नेतृत्वाची फळी जिल्हाभर असतानाही इतरही काही नेतृत्व घडत गेले. त्यांचे राजकारणही समाजमान्य झाले. त्यामध्ये बबनराव ढाकणे, काँग्रेसमधील मधु दंडवते, अण्णासाहेब शिंदे, शिवाजीराव कर्डिले, दिलीप गांधी, माजी मंत्री यांनी राज्याचा व केंद्राचा मंत्रिमंडळात काही काळापुरते आदर्श स्थान निर्माण केले. यांच्याकडे सहकारी क्षेत्रातील उद्योगधंद्याचे कोणतेही माध्यम नसताना त्यांनी नेतृत्व सिध्द करण्यात यश मिळवले. परंतु त्यांना फार काळ एकछत्री राजकीय वर्चस्व जिल्ह्यामध्ये ठेवता आले नाही. कारण गटातटांच्या राजकारणात फारसे वर्चस्व स्थापन करता आले नाही.

अहमदनगर जिल्ह्याच्या राजकारणाची महत्त्वाची चार वैशिष्ट्ये दिसतात. त्यातील पहिले असे की, या जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणावर नात्या–गोत्यांचे राजकारण झालेले आहे. (समाज प्रबोध प्रत्रिका, २००७, पृ. १४१) अगोदर कुटुंब, नातेवाईक यापैकी व्यक्तींना राजकारणात संधी दिली जात होती किंवा आरक्षित घटकांतील व्यक्तींना स्वनियंत्रित ठेवले जाते. येथील राजकारणावर प्रचंड खर्च होतो. नियोजनबध्द प्रचार यापुढे शुगर लॉबी सोडून इतर पक्षांतील नेत्यांना येथील राजकारणावर फारसे

वर्चस्व स्थापन करता आले नाही. यशवंतराव चव्हाणांच्या प्रभावी राजकारणाचा फायदा जिल्ह्यामध्ये चांगला झालेला आहे. त्यापुढे काँग्रेसचा प्रभाव जिल्हाभर मोठ्या प्रमाणात दिसून येतो. पुढे शरद पवारांचे नेतृत्व असतानाही या जिल्ह्याने पवारांच्या विचारांना नेहमीच भरभरून साथ दिलेली आहे. पवारांच्या 'पुलोद' सह स्वतंत्र राष्ट्रवादी पक्षालाही जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर जनमतातून साथ दिलेली आहे. सध्या राष्ट्रवादी पक्षाचे बऱ्याच प्रमाणात विकास झालेला आहे. बहुजन राजकारण व नात्यागोत्यांचे राजकारण यामुळे जिल्ह्याला चांगलाच फायदा झालेला आहे.

दुसरे वैशिष्ट्य असे की, जिल्ह्याच्या राजकारणात ओ. बी. सी. समाज सर्वात जास्त असतानाही या समाजाचे प्रभावी नेतृत्व झाले नाही. जिल्हा पातळीवर त्यांना आरक्षणाने संधी मिळाली. परंतु ती संधी टिकविण्यात त्यांना यश आले नाही. उदा. माळी, वंजारी, धनगर इत्यादी. कारण या समाजाच्या अर्थकारणाचा पाया पक्का नाही. आरक्षणाची संधी असेल तरच ते पुढे होतात, त्यामुळे सत्तेत सहभाग मिळाल्यानंतर फारसा फायदा त्यांना झाला नाही. कारण जिल्ह्यातील शुगर लॉबीने नियंत्रित राजकारण ठेवले आहे.

तिसरे वैशिष्ट्य असे की, येथील शुगर लॉबीच्या राजकारणात नेहमी दोन गट पडलेले दिसतात. त्यामुळे अनेक वेळा मुख्यमंत्रिपदाची संधी जिल्ह्याला असतानाही गटागटांच्या राजकारणामुळे ते पद जिल्ह्याला मिळाले नाही. उदा. अण्णासाहेब शिंदे, गोंविदराव आदिक यांच्या बाबतीतही हेच झाले. त्यामुळे पक्षांतर्गत ही गटबाजी जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात जाणवते.

चौथे वैशिष्ट्य असे की, जिल्ह्यातील राजकारण एका पिढीतून दुसऱ्या पिढीत रूपांतर होताना दिसत आहे. आज वास्तव स्थिती अशी आहे की, जिल्ह्याच्या मुख्य घराण्यांतील काही भागांत दुसरी पिढी तर काही भागांत तिसरी पिढी राजकारणांत वर्चस्व निर्माण करीत आहे. म्हणजेच या ठिकाणी घराणेशाहीच्या राजकारणाचे प्राबल्य सातत्याने दिसते. उदा. नेवासा विठ्ठलराव लंघे, शंकरराव गडाख, शेवगाव नरेंद्र घुले, संगमनेर

बाळासाहेब थोरात, राहता राधाकृष्ण विखे, पाथर्डी राजीव राजळे, प्रताप ढाकणे, श्रीरामपुर सिध्दार्थ मुरकुटे, कोपरगाव बिपिन कोल्हे, अशोक काळे, अकोला वैभव पिचड इत्यादी मध्ये घराणेशाहीचे राजकारण या जिल्ह्यात दिसते. जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या प्रश्नांच्या बाबतीत झालेली आंदोलने (वीज, पाणी, रस्ते) त्यामुळे राजकीय जाणीव जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. (गोखले पु. मा. १९९४, पृ. ६७)

जिल्ह्यातील सद्य परिस्थितीचा आढावा घेता असे दिसते की, विखे आणि थोरात गटामध्ये सध्या जिल्ह्याचे राजकारण विभागले गेले आहे. त्याला काही प्रमाणात भाजप, सेना, ज्या त्या परिस्थितीनुसार मदत करताना दिसते. याशिवाय घुले, गडाख, तनपुरे यांचाही अप्रत्यक्ष गट असल्याचे जिल्ह्याच्या स्थानिक निवडणुकीच्या राजकारणावरून दिसते.

वरील जिल्ह्याच्या सर्व माहितीवरून असे स्पष्ट होते की, अहमदनगर जिल्ह्यामध्ये जातीभेदांचे राजकारण होत नसून अर्थकारण आधारित समाजकारण केल्याने या ठिकाणच्या राजकारणामध्ये वर्चस्व स्थापन करण्याची संधी मिळते. असे म्हटले जाते की, ''राजकारणात कोणीही कोणाचा शत्रू नसतो आणि मित्रही'' या प्रमाणे आजचा मित्र उद्याचा मित्र हा आजचा राजकारणातील शत्रू असतो. (थोरात भाऊसाहेब, १९९९, पृ. ११७)

याप्रमाणे जिल्ह्यातील राजकारण प्रत्येक दिवसाला बदलताना दिसत आहे. जितक्या प्रमाणात राजकीय असमतोल आढळतो. तितक्याच प्रमाणात राजकीय विकास प्रक्रियेत जनमताचा सहभाग मात्र दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे अहमदनगर जिल्ह्याचे हे राजकीय वेगळेपण महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यांच्या राजकारणापेक्षा वैशिष्ट्यपूर्ण तसेच राजकीय विविध रंगांनी भरलेले दिसते. (पै. नाथ, १९७२, पृ. ११६)

अहमदनगर जिल्ह्याची माहिती बघत असताना त्यांची भौगोलिक स्थिती ही अहमदनगर जिल्ह्याला लाभल्यामुळे तेथील सामाजिकीकरणाच्या आणि राजकारणाला बऱ्याच प्रमाणात यश आल्याचे दिसून येते. जिल्ह्यातील नैसर्गिक संपत्ती, उद्योगधंदे,

वाहतूक व व्यापार, पर्यटन स्थळे, अहमदनगर जिल्ह्यातील सांस्कृतिक आणि पर्यटन स्थळांनी महाराष्ट्रात नव्हे तर जगात या जिल्ह्याची ओळख झालेली आहे. या सर्व स्थळांमुळे अहमदनगर जिल्ह्याला एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. व जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय क्षेत्रात अहमदनगर जिल्ह्याचे बऱ्याच प्रमाणात प्रगती केलेली आहे.

सारांशरूपाने असे दिसून येते की, अहमदनगर जिल्हा हा भौगोलिकदृष्ट्या राज्यात सर्वात मोठा असा असणारा जिल्हा आहे. हा जिल्हा आर्थिक आणि राजकीय विकासाच्या बाबतीत स्वातंत्र्यपुर्व काळापासून एक वेगळे स्थान असणारा असा राहिलेला आहे. आर्थिक विकासाच्या बाबतीत असे दिसून येते की, कृषि क्षेत्रावर अवलंबून असणारा असा जिल्हा आहे. मात्र कृषि क्षेत्राच्या विकासास सहकाराची साथ दिलेली आहे. तसेच सिंचन क्षेत्र, साखर कारखाने, जिल्हा सहकारी बँक व इतर नागरी संस्थाच्या माध्यमातून विकास साधन्याचा प्रयत्न केला. सहकार क्षेत्र आणि सिंचन क्षेत्र विकास या दोन कारणांनी जिल्ह्यातील पिक पध्दतीतील पॅटर्न पुर्णपणे बदलेला आहे. रस्ते निर्मिती, वाहतूक, रेल्वे, व्यापार, कुटीर लघुउद्योग अशा कारणांनी आर्थिक विकासास गती मिळालेली दिसून येते. त्याच बरोबर औद्योगिक विकास हा शहराप्रमाणेच ग्रामीण भागात घेऊन जाण्यास प्रभावी असे नेतृत्व लाभलेले दिसून येते. तर राजकीय विकासाच्या बाबतीत असे दिसून येते की, एक पक्षीय वर्चस्वाकडून बहुपक्षीय राजकीय विकास घडून आलेला आहे. परिणामी लोकशाहीकरण झालेले दिसून येते. दुसरे असे की, राजकीय पार्श्वभूमीप्रमाणे बिगर राजकीय पार्श्वभूमीचे नेतृत्व देखील पुढे आलेले दिसून येते. राजकीय विकास घडून येण्यासाठी सहकार क्षेत्राचे ज्या प्रकारे योगदान राहिले त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्था, कृषि उत्पन्न बाजार समिती, पक्ष कार्यकारणी, निवडणुका या कारणांनी राजकीय विकास घडून आलेला दिसून येतो.

# प्रकरण – ३

# निवडणुका व पक्षीय राजकारण

## प्रस्तावना

अहमदनगर जिल्हा हा राजकीय पक्षांच्या निर्मिती आणि रणनीतीचे केंद्र स्वातंत्र्यपुर्व काळापासून राहिलेले आहे. पक्षीय राजकारण हे अहमदनगर जिल्ह्याला नवीन नव्हते. सुरूवातीपासून अहमदनगर जिल्हा हा पक्षीय राजकारणात अग्रेसर राहिलेला होता. जिल्ह्यात स्वातंत्रपुर्व काळात जरी काँग्रेस या पक्षांचे वर्चस्व राहिले असले तरी इतर पक्ष देखील कार्यरत होते. अर्थात सर्वच प्रकारचे पक्ष अहमदनगर जिल्ह्यात कार्यरत होते. प्रत्येक पक्षाला थोडा का होईना पाठिंबा अहमदनगर जिल्ह्यात राहिलेला होता.

संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेस पक्ष प्रभुत्वशाली पक्ष होता. इतर पक्षांमध्ये शेतकरी कामगार पक्ष, हिंदू महासभा, जनसंघ, भारतीय रिपब्लिकन पक्ष यांचे अस्तित्व होते. परंतु या पक्षांचा काँग्रेस पक्षांच्या तुलनेत जास्त प्रभाव दिसून येत नाही. तरीही नवबौध्दाची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार ११ लाख आहे. या संख्येचा काँग्रेस पक्षाला फायदा सातत्याने होत आहे. (बिरमल, २००७) परंतु उरलेले पक्ष सामाजिक आधार मर्यादित असणारे होते. शेतकरी कामगार पक्षांला चांगले दिवस होते. पण नेतृत्वच (जेधे) काँगेसमध्ये गेल्याने हळूहळू आधार कमी होत गेलेला दिसून येतो. स्वातंत्र्योतर काळातील पहिले तीन दशके काँग्रेसला चांगल्या प्रकारे वर्चस्व टिकवता आले होते. १९८० नतंर मात्र यामध्ये हळूहळू बदल झालेला दिसून येतो. जनसंघाचेच रूपांतर भाजपामध्ये झाले. तर १९६६ साली स्थापन झालेल्या शिवसेनेने १९८४ नंतर हिंदुत्ववादी विचारप्रणाली स्वीकारून विस्तार केला. या दोन्ही हिंदुत्ववादी पक्षांनी विस्तार वेगवेगळ्या पातळ्यावर वाढवलेला आहे. अशा विविध पक्षाच्या सामाजिक पाठिंब्यातील बदलामुळे महाराष्ट्राचे राजकारण बदलले. शिवसेना

आणि भाजपाचे राजकारण हे शहरी भागाला पूरक झाले. ही गोष्ट अहमदनगर जिल्ह्याच्या राजकारणावरही परिणाम करणारी आहे. प्रस्तुत या प्रकरणात राज्य पातळीवर स्वातंत्र्योत्तर काळातील सर्व राजकीय पक्षांचा आढावा घेतलेला आहे.

१९६० नंतर काँग्रेसने राजकारणामध्ये सत्तेच्या दिशेने वाटचाल केलेली दिसते. १८८५ साली मुंबई शहरात स्थापन झालेल्या इंडीयन नॅशनल काँग्रेसची स्थापना २८. १२.१८८५ साली मुंबई शहरात झाली. मात्र या पक्षाच्या राजकारणाचे केंद्र सातत्याने पुणेच राहिलेले आहे. कारण काँग्रेस पक्षाची कोणतीही कृती ही इतर होत असली तरी त्या कृतीचा मुळ उगम हा पुणे शहरात निर्माण झालेला आहे. बहुतांश मंडळी ही पुणे शहरातील या पक्षात होती. या पक्षाच्या स्थापनेत आणि सनदशीर मार्गाने शासनाकडे आपल्या समस्या मांडण्यात यावीत असे नव्याने सुशिक्षित झालेल्या मंडळींना वाटत होते. त्यामुळे ब्रिटिश निवृत्त अधिकाऱ्यांनी मांडलेल्या संकल्पनेला मान्यता देण्यात आली होती.

काँग्रेसची लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडीत नेहरू आणि यशवंतराव चव्हाणांचा पक्ष अशी महाराष्ट्रातील जनमाणसातील प्रतिमा होती. अभ्यासकांच्या मताप्रमाणे मराठा कुणबी जातीसमुहाच्या हितसंबधाचे आणि त्यातल्या त्यात श्रीमंत शेतकरी वर्गाचे संवर्धन करणारा पक्ष म्हणजे काँग्रेस पक्ष आहे. राजकारणाचा आणि निवडणुकीच्या राजकारणाचा प्रथम अभ्यास करण्याची सुरूवात करणाऱ्यां प्रा. सिरसीकर यांनी याबाबत असे म्हटले आहे की, महाराष्ट्रात एका पक्षाचे एका जातीसमुहाचे आणि वर्गाचे प्रभुत्व आहे आणि ते पुर्णपणे एकरूप झालेले आहेत असे समीकरण मांडले आहे. (शिरसीकर व्ही. एम, १९९५) ज्या पक्षाचे प्रभुत्व आहे तो काँग्रेस पक्ष ज्यांचे महाराष्ट्र काँग्रेसवर वर्चस्व आहे तो मराठा जातीसमूह आणि मराठा जातीचे धुरिणत्व ज्यांच्याकडे आहे ते म्हणजे ग्रामीण भागातील सहकारी चळवळीमधून श्रीमंत झालेले बागायतदार शेतकरी होत. बहुजन समाज व कुणबी मराठा हे सतत काँग्रेसला अनुकूल आहेत. दुसरे असे की, काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाने या महाराष्ट्रातील समाज व्यवस्थेची

नाळ ओळखत जास्तीत जास्त पदे ही मराठा समाजाला देण्याकडे कल ठेवला होता. त्यामुळे आपोआप मराठा समाज हा काँग्रेसकडे आकर्षित झालेला होता. याशिवाय दलित जातीपैकी बहुसंख्य जाती काँग्रेसला अनुकूल आहेत. नवबौध्द रिपब्लिकन पक्षास मदत करतात. रिपब्लिकन व काँग्रेसमध्ये सतत युती राहिली आहे. धर्मनिरपेक्षतावादी पक्ष असल्याचे जाणीवपुर्वक तयार केलेल्या प्रतिमामुळे अल्पसंख्याकांचा व मुस्लिमांचा काँग्रेसला पाठिंबा आहे. १९९० पर्यंत काँग्रेस पक्ष विविध समाज घटकांना हाताशी धरून वर्चस्व टिकवून होता. मात्र सेना—भाजप स्पर्धेत येत राहिल्याने काँग्रेस या पक्षाची समाजावरील पकड काहीसी सैल झालेली दिसून येते. अहमदनगर जिल्ह्यातील नेतृत्वाकडून सेना—भाजपाला पाठिंबा हा टप्प्या—टप्प्याने मिळालेला आहे. अहमदनगर जिल्ह्यातील भाजपा हा शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात पुढे आला. त्यातही दुष्काळी, कोरडवाहू आणि ओबीसी समाज घटक जास्त असलेल्या परिसरातून पुढे आला. कर्जत—जामखेड, राहुरी, पाथर्डी या तीन मतदारसंघातून भाजपाचे उमेदवार निवडून आले. तर शहरी भागातील अहमदनगर शहरी मतदारसंघातून १९९० पासून सातत्याने शिवसेनेचा उमेदवार निवडून आला. याशिवाय २००४ नंतर कोपरगाव आणि पारनेर या मतदारसंघातून उमेदवार निवडून येत आहे. त्यामुळे किमान काँग्रेसत्तेर या दोन पक्षाला मर्यादित यश मिळालेले आहे. १९९९ नंतर राष्ट्रवादीला देखील काँग्रेस विभाजनातून यश मिळत गेलेले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य पातळीवरील पक्षाच्या स्थितीचा आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

१९९२ साली बाबरी मशीद पाडल्यानंतर मुस्लिम मतदारात संदिग्धता निर्माण झालेली होती. तरी त्यांनी अपरिहार्यपणे काँग्रेसला पाठिंबा दिलेला आहे. मुलायमसिंग यादव यांच्या समाजवादी पक्षांमुळे त्यांना वेगळा पर्याय उपलब्ध करून दिला. पण उत्तर प्रदेशातील वास्तव आणि महाराष्ट्रातील समाज वास्तव यात जास्त प्रमाणावर फरक आहे. तरीही मुस्लिम मतांची विभागणी काँग्रेस व समाजवादी या पक्षांमध्ये झालेली दिसून येते. पण ही विभागणी शहरी भागात दिसून येते. पण समाजवादी पक्षाला

महाराष्ट्रातील काही मतदारसंघाचा अपवाद वगळता यशस्वी होता आले नाही. शहरी भागातील मुस्लिम मतदारांना काही प्रमाणात पर्याय निर्माण झाला असला तरी ग्रामीण भागात मुस्लिम समाजाला पर्याय मिळालेला नाही. काँग्रेसचे तात्विक अधिष्ठान निवडणुकांची कामगिरी संघटनात्मक रचना ह्या बाबी महत्त्वाच्या आहेत. राष्ट्रीय पातळीवर काँग्रेसच्या राजकारणामध्ये म. गांधी, प. नेहरूंचा प्रभाव जाणवतो. महाराष्ट्रात बहुजन समाजाची विचारसरणी म्हणजेच महात्मा फुले, शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव असलेली आहे. १९६० नंतर इंदिरा गांधीनी सामाजिक न्याय, आर्थिक विकास आणि दारिद्रय निमूर्लन या मुद्यांचा विचार केलेला आहे. या माध्यमातून बहुजनवादी विचारांची कृतीशीलतेची पाऊले उचलेली होती. पण या वाटचालीत सातत्य ठेवण्यात अपयश आलेले दिसून येते. (घोटाळे, २००५) त्यामुळे काही पर्याय राजकारणाचा विचार पुढे येत गेलेले दिसून येतात.

काँग्रेस हा डावीकडे झुकलेला मध्यम मार्ग घेणारा पक्ष आहे. समाजवादी समाजरचना हा या तात्विक आधारावर हा पक्ष वाटचाल करीत होता. कसेल त्याची जमीन, मिश्र अर्थव्यवस्था, आर्थिक नियोजनाचे समर्थन आणि सामाजिक वास्तवातील बेरजेचे राजकारण या गोष्टीना काँग्रेसने प्राधान्यक्रम दिलेला होता. धर्मनिरपेक्षता हे मुल्य काँग्रेसने जोपासले. धर्मनिरपेक्षतेबरोबर समाजवाद, आर्थिक नियोजन, लोकशाही आणि अलिप्ततावादी परराष्ट्र धोरणावर काँग्रेसची श्रद्धा आहे. १९९० नंतर या पक्षांनी वरील सर्व विचारप्रणाली सोडल्याचे दिसून येते. (व्होरा राजेंद्र आणि सुहास पळशीकर, १९९६,) तसेच अस्तित्व टिकवण्याची भूमिका घेतल्याचे पुढे येते.

काँग्रेस या पक्षाचे स्वातंत्र्योत्तर कालखंडात नेतृत्व यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शंकरराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शरद पवार, विलासराव देशमुख इत्यादींनी केले. या नेतृत्वावर व पक्षावर टिळक, गांधी, नेहरू यांचा प्रभाव होता. तसेच महाराष्ट्रातील जनमानसात १९६० मध्ये टिळक, गांधी, नेहरू यांच्याबद्दल आदराची भावना होती. पक्षाने महाराष्ट्रातील मराठा आणि मराठेत्तर नेतृत्वाला संधी देऊन

बहुजनांचा पक्ष आहे अशी पक्षाची प्रतिमा महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण यानी निर्माण केली. या पक्षाचे विठ्ठलराव विखे पाटील, काळे घराणे, सासणे, झावरे घराणे, संगमनेर मतदारसंघातील बाळासाहेब थोरात या सर्व केंद्रीय पातळीवरील नेतृत्वाच्या प्रभावाखाली राहणारे होते. यात विखे घराणे आणि थोरात घराणे हे पुर्णपणे केंद्रीय पातळीवरील काँग्रेस नेतृत्वाच्या आधीन होते. मात्र इतर काँग्रेस नेतृत्व हे यशवंतराव चव्हाण आणि शरद पवार यांच्या प्रभावाखाली होते. यामुळे अहमदनगर जिल्ह्यातील काँग्रेसमध्ये निष्ठावंत काँग्रेसतंर्गत होते. १९७८ साली शरद पवारांनी समाजवादी काँग्रेस पक्ष स्थापन केल्यानंतर हे रूप स्पष्टपणे दिसून आले. निष्ठावंत काँग्रेसमध्ये पारनेरचे झावरे घराणे, कोपरगावचे काळे आणि कोल्हे घराणे, इ. चा समावेश होता. या काँग्रेस पक्षाचे नेतृत्व, विचारप्रणाली, निवडणुकीतील यशापयश व त्यांनी हाती घेतलेले प्रश्न यांचा आढावा पुढीलप्रमाणे आहे. सर्व धर्म समभाव या तत्वाला विशेष महत्त्व दिले होते. शोषणविरहीत समाज निर्माण व्हावा अशी काँग्रेसची ध्येय धोरणे होती. तसे करण्याचे जाणीवपुर्वक प्रयत्न केले. त्यामुळे पक्षाला तळागाळात जाता आले. विशेषत: पक्षाच्या नेतृत्वाने गरीबीची भाषा बोलण्याने तळागाळातून व्होट बँकेच्या स्वरूपात पाठिंबा देणारा वर्ग तयार केला होता. तो वर्ग आजतागायत काँग्रेसच्या बाजूने टिकून असताना दिसून येतो. काँग्रेस पक्षामध्ये अखिल भारतीय काँग्रेसही राष्ट्रीय समिती ही राष्ट्रीय पातळीवर काम करणारी तर महाराष्ट्र प्रांतिक समिती आहे. यातूनच पक्षाच्या कार्यकारी व संसदीय मंडळाची रचना तयार होते.

स्वांतत्र्यपुर्व काळापासून काँग्रेस पक्ष राजकारणात सक्रिय होता. विविध नेतृत्वाच्या माध्यमातून या पक्षाने सर्वसामान्याच्या मनात स्थान निर्माण केले होते. त्यास महाराष्ट्र अपवाद नव्हता. महाराष्ट्रात हा पक्ष ग्रामीण भागापासून सर्वसामान्यापर्यंत पाठिंबा मिळवण्यात यशस्वी ठरला होता. त्यामुळे या पक्षांची मुळे ग्रामीण भागात सर्वसामान्यात जोडली गेली होती. या पक्षाने सर्वसामान्यात देखील प्रस्थापित जातींना जास्त प्रस्थापित जातींच्या नेतृत्वाला जास्त प्रमाणात पदे देण्यात आली होती. परिणामी महाराष्ट्रभर

व्यापणारा हा पक्ष होता. स्वातंत्रपुर्व काळापासून या पक्षाने निवडणुकांच्या राजकारणाचा पैस व्यापलेला होता. विरोधी पक्ष म्हणून कोणताही एकही पक्ष प्रभावी नव्हता. पण छोटे छोटे पक्ष हे काही मतदारसंघात पॉकेटस्च्या स्वरूपात काँग्रेस पक्षाला विरोध करत होते. त्यामुळे काँग्रेस पक्ष त्या मतदारसंघात कमकुवत होता. पण विरोधाचे स्वरूप जसे जसे बदलत होते तसे छोटे छोटे पक्षांनी रणनिती बदलली नाही. परिणामी काही नेतृत्व काँग्रेस पक्षात गेले. त्यामुळे सर्व राजकीय क्षेत्र याच पक्षाने व्यापलेले होते.

## निवडणुकीच्या राजकारणाचा आढावा

१९६२ सालच्या निवडणुकीमध्ये काँग्रेसला ५१टक्के मते महाराष्ट्रात मिळाली. २६४ पैकी २१५ जागा मिळाल्या. १९६७ साली ४९ टक्के मते मिळाली कारण विदर्भामध्ये महाविदर्भ व नागविदर्भच्या प्रश्नामुळे २०३ जागा काँग्रेसला मिळाल्या. काँग्रेसमध्ये सेवा दल, महिला काँग्रेस इंटक अशा विविध संघटना विविध क्षेत्रात काम करतात. या काळात काँग्रेसचे जरी वर्चस्व असले तरी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीने विभाजन झालेले दिसून येते. त्याचा परिणाम हा निवडणुकीतून देखील पुढे आला होता.

१९७२ च्या निवडणुकीमध्ये ५६ टक्के मते मिळाली असून प्राप्त जागा २२२ एवढ्या होत्या. आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसमध्ये फूट पडली. १९७७ च्या विधानसभेच्या निवडणुकीत २८४ पैकी २३३ जागा काँग्रेसला मिळाल्या. १९८५ च्या निवडणुकीत दोन्ही काँग्रेसला ६१ टक्के मते मिळाली. १९९० च्या निवडणुकीमध्ये भाजपा शिवसेना युतीने व पुलोद काँग्रेसच्या विरोधात होते. काँग्रेसला ३९ टक्के मते मिळाली. १९९५ च्या विधानसभा महाराष्ट्रात काँग्रेस अपयशी ठरली. फक्त ८० जागा काँग्रेसला मिळाल्या आणि काँग्रेस विरोधी पक्ष बनला. विद्यमान लोकशाही आघाडी सरकारने राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस व इतर सहा मित्रपक्षांचे सरकार नंतरच्या काळात आले. १९९९ च्या निवडणुकीमध्ये सर्वाधिक ५६ जागा काँग्रेसला मिळालेल्या आहेत. २००४ च्या निवडणुकीत ६९ जागा मिळाल्या होत्या. तर २००९ च्या निवडणुकीत ८२ जागा मिळाल्या होत्या. (निवडणूक आयोगाचे अहवाल १९६२ ते २००९) काँग्रेसच्या

संदर्भात असे दिसून येते की, १९९५ चा अपवाद वगळता जरी जागा कमी मिळाल्या असल्या तरी इतर पक्षांशी युती करून काँग्रेस पक्ष सत्तेत राहिला होता. १९९९ पासून काँग्रेस पक्षाला राष्ट्रवादीशी युती करावी लागली. त्यामुळे काँग्रेस पक्षाने या युतीमध्ये थोरल्या भावाची जागा घेतली आहे. २००४ च्या निवडणुकीत राष्ट्रवादीपेक्षा काँग्रेस या पक्षाला जागा कमी मिळाल्या असल्या तरी मुख्यमंत्रीपद हे स्वतःकडे ठेवले होते. त्यामुळे १९६२ पासून २००९ प्रयत्न पुलोद आणि १९९५ चा सेना–भाजपाच्या युतीचा अपवाद वगळता सतत सत्तेत राहणारा पक्ष काँग्रेस आहे.

## शेतकरी कामगार पक्ष :

इतर राज्यांमध्ये ज्याप्रमाणे काँग्रेसच्या खालोखाल इतर मित्र पक्ष आहेत. तशाच प्रकारचा प्रादेशिक पक्ष म्हणून शेकापची भूमिका आहे. काँग्रेसप्रमाणेच शेतकरी कामगार पक्षाचे नेतृत्व बहुजन समाजातून आलेले असल्यामुळे ग्रामीण भागात या पक्षाला बेताचाच पाठिंबा होता. दुसऱ्या पातळीवर असे म्हणावे लागेल की बहुजन समाजातील नेतृत्वाने शेकाप पेक्षा काँग्रेसच्या बाजूने कल दिला असल्याने पक्षाचा पाठिंबा हा मर्यादित राहिला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीनंतर या पक्षातील कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर काँग्रेसमध्ये आले. त्यामुळे पक्षवाढ ही कमी झालेली दिसते. काँग्रेस पक्षाने जाणीवपूर्वक शेकाप या पक्षातील नेतृत्वाला काँग्रेस पक्षातील पदे आणि उमेदवारी देत शेकापचे खच्चीकरण केले. या खच्चीकरणातून शेकापला सावरता आले नाही. पण काही नेतृत्वाच्या माध्यमातून राज्यात अस्तित्व टिकवून आहे. आता काही मतदारसंघात पॉकेट्सच्या स्वरूपात हा पक्ष वावरताना दिसून येतो. दुसरे असे की, या पक्षाला त्या मतदारसंघात विशिष्ट अशा सामाजिक समुदायाचा पाठिंबा असल्याने टिकून आहे. (घोटाळे, २००५)

शेकाप या पक्षाचा उगम ब्राम्हणेतर चळवळीत झालेला आहे. या चळवळीचे नेतृत्व कोल्हापुरचे शाहू महाराजांनी केले. बहुजन समाजातील असंतोष प्रभावीपणे संघटित करण्याकरिता काँग्रेस पक्षातंर्गत शेतकरी कामगार संघाची स्थापना करण्यात

आली. १९४८ साली पक्ष श्रेष्ठींनी ही संघटना बरखास्त करावी असा आदेश दिल्याने केशवराव जेधे यांच्या नेतृत्वाखाली बहुजन समाजातील बहुसंख्य नेते काँग्रेस पक्षाबाहेर पडले व जून १९४८ मध्ये शेकापची स्थापना करण्यात आली. बहुजन समाजातील ज्येष्ठ नेते शेकापमध्ये सामील झाल्याने महाराष्ट्र काँग्रेस पक्षासमोर मोठे आव्हान उभे राहिले. स्वातंत्र्योतर काळातील पहिल्या दशकाच्या काळात पक्षाने विधिमंडळातील संख्येच्या जोरावर प्रमुख विरोधी पक्ष असल्याचे पुढे आले होते. (भोळे, २०१२) पण विधिमंडळातील संख्येत सातत्य राखण्यात पक्षाला अपयश आले.

शेतकरी कामगार पक्ष स्वत:ला अखिल भारतीय व डाव्या विचारसरणीचा म्हणवितो. म्हणून पक्षाचे संपूर्ण नाव अखिल भारतीय शेतकरी कामगार पक्ष असे ठेवलेले आहे. या पक्षाच्या निवडणूक कार्यक्रमास संयुक्त महाराष्ट्राची स्थापना किंवा बेळगाव, कारवार इ. वादग्रस्त मराठी भाषिक प्रदेशांचा महाराष्ट्रात करावा असे या पक्षाने प्रादेशिक प्रश्नांनाच प्राधान्य दिले. या पक्षातील नेते आपला पक्ष डाव्या विचारसरणी मार्क्स व लेनिनच्या साम्राज्यवादाच्या तत्त्वज्ञानावर श्रध्दा असणारा आणि समाजातील नाही रे घटकांचे प्रतिनिधित्व करणारा त्याकरीता संघर्ष करणारा पक्ष आहे असा दावा केला जातो. शेकापने आंतरराष्ट्रीय साम्यवादी चळवळीचे वैचारिक नेतृत्व स्वीकारले आहे. (भोळे, २०१२) या पक्षाची विचारसरणी दाभाडी प्रबंधामध्ये सांगण्यात आली आहे. रिचर्ड पार्क या विचारवंताने शेकापबद्दल असे म्हटले आहे की, “Although the leadership looked upon the the party as communist in that it was communit " पक्षाच्या नेतृत्वाने असा दावा केला असला तरी वास्तविक स्वरूप जातीयवादी आहे. प्राचार्य कोगेकर यांच्या मते शेकाप जरी वर्गसंघर्षाची भाषा बोलत असला तरी वास्तविकरीत्या आहे व नाही रे वर्गातील संघर्ष शेटजी भटजी विरूद्‌ध बहुजन समाज असे शोषिक व शोषित जातीय संघर्षाचे मार्क्सवादी स्पष्टीकरण या पक्षाने दिले आहे. (मोरे, १९९०) बहुजन समाजाच्या काँग्रेस नेत्यांकडून सावत्रपणाची वागणूक मिळत होती. मराठी भाषिक प्रदेशातील बहुजन समाजाचा वापर या नेत्यांकडून होत होता. त्यामुळे

त्यांच्या राजकीय महत्वकांक्षा पूर्ततेसाठी करण्यात आला. त्यामध्ये शे.का.प. अयशस्वी झाला होता. वर्गसंघर्षाचे लोण ग्रामीण भागापर्यंत पोहचले होते. शे. का. प. हा ग्रामीण बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करणारा पक्ष आहे. प्रादेशिक व डाव्या विचारसरणीने तो चालतो.

## निवडणुकीतील कामगिरी :

दत्ता देशमुख, काकासाहेब वाघ इ. समर्थकांनी कामगार किसान पक्षाची स्थापना केली. म्हणजेच १९५१ साली ''लाल निशाण'' पक्ष सुरू झाला. या फुटीचा परिणाम १९५२ च्या निवडणुकीवर झाला. लोकसभेच्या ५ व विधानसभेच्या ३१ जागा मिळाल्या. १९६२च्या विधानसभेच्या निवडणुकीत १५ जागा मिळाल्या. लोकसभा निवडणुकीमध्ये जागा मिळाली नाही. १९६७ च्या निवडणुकीमध्ये १९ उमेदवार व २ जागा लोकसभेवर निवडून आल्या. १९७१ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीमध्ये पक्षाचा धुव्वा उडाला. १९७७ साली जनता पक्षाशी शेकापने युती केली. या निवडणुकीमध्ये लोकसभेवर ५ व विधानसभेवर १३ जागा निवडून आल्या. १९८० च्या निवडणुकीत पक्षाचा एकही उमेदवार निवडून आला नाही. विधानसभेवर ५ जागा जिंकता आल्या. १९८४ च्या लोकसभेमध्ये काँग्रेस पक्षातील स्थानिक पातळीवरील मतभेदाचा फायदा पक्षाला मिळाला. १९८५ साली पुरोगामी लोकशाही आघाडीचा घटक पक्ष म्हणून १३ उमेदवार विधानसभेवर निवडून आले. १९८९ व १९९१ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये अपयश आले. हा पक्ष काही प्रमाणात इतिहास जमा झाला आहे असेही म्हटले जाते. १९९१ च्या निवडणुकीमध्ये जनता दलाशी युती होती. या निवडणुकीमध्ये २ टक्के मते मिळाली. १९९६ च्या निवडणुकीमध्ये तशीच परिस्थिती होती. १९९८ साली २ टक्के मते मिळवून १ जागा जिंकता आली. १९९० नंतर पक्षाला लोकसभेच्या निवडणुकीत यश मिळवता आले नाही. पण विधिमंडळात किमान ४ ते ५ सदस्य असल्याचे सातत्य राखलेले आहे. (निवडणूक आयोग अहवाल १९६२ ते २००९)

## समाजवादी विचारसरणीचे राजकीय पक्ष :

भारतामध्ये राष्ट्रीय महासभेअंतर्गत प्रांतिक विचारांच्या तरूण नेत्यांनी काँग्रेस समाजवादी पक्ष गट Congress cosialist party १९३४ साली स्थापन केली. समाजवादी विचारसरणीच्या नेत्यांनी १९४५ साली सेवादल सुरू केले. महाराष्ट्रात काँग्रेस सोसालिस्ट पक्षाचे नेतृत्व अचुतराव पटवर्धन, युसुफ मेहरअली व अशोक मेहता यांच्याकडे होते. सुरूवातीला भाऊसाहेब रानडे, साने गुरूजी, एस.एम. जोशी यांनी सेवा दल स्थापनेत पुढाकार घेतला. १९४७ साली ''इंटक'' ही नवी संघटना सुरू झाली. १९४८ साली नाशिक येथे पक्षाने काँग्रेसबाहेर पडण्याचा विचार केला व समाजवादी पक्ष स्थापन झाला. या पक्षाचे नेतृत्व आचार्य नरेंद्र देव जयप्रकाश नारायण यांनी केले होते. हा पक्ष त्यावेळी अखिल भारतीय पातळीवर विचारधारा अंगीकृत केलेल्या आणि वास्तवातील स्थानिक पातळीवर बंदिस्त झालेल्या शेकाप या पक्षाशी या पक्षाच्या नेत्यांनी हातमिळवणी केली होती. १९५३ साली प्रजा समाजवादी पक्ष अस्तित्वात आला. काँग्रेसने समाजवादी समाज रचनेचा कार्यक्रम स्वीकारला होता. एस. एम जोशी, ना. ग. गोरे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात आघाडीवर होते. सयुंक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर इतर डाव्या पक्षांप्रमाणेच प्रजा समाजवादी पक्षातील बहुसंख्य नेते व काँग्रेस कार्यकर्ते काँग्रेसमध्ये गेले. नंतर वाराणसी येथे समाजवादी पक्ष दुभंगला. अखिल भारतीय प्रजा समाजवादी पक्षाचे अध्यक्ष ना. ग. गोरे. व अखिल भारतीय संयुक्त समाजवादी पक्षाचे अध्यक्ष एस. एम जोशी होते. १९७७ च्या निवडणुकीमध्ये जनता पक्ष व त्यांचे मित्र पक्ष डावे कम्युनिस्ट व शेकाप यांना ४८ जागा पैकी २८ जागा मिळाल्या. त्यामुळे महाराष्ट्रात काँग्रेसला पराभूत करणे शक्य आहे असे विरोधकांना वाटत होते. १९७८ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये जनता पक्षाला १०३ जागा मिळाल्या. इतर पक्षांना ३२ जागा मिळाल्या. १९७८ च्या मंत्रिमंडळामध्ये १३ मंत्री जनता पक्षाचे होते. नंतरच्या काळात मात्र जनता पक्षाचे तीन गट अस्तित्वात आले. मृणाल गोरे यांचा लोकदल मूळ समाजवादाच्या जनता व जनसंघाचा गटांची भारतीय जनता पक्ष असे तीन गट होत.

१९८० ते १९८९ या काळात जनता पक्षाची ताकद कमी होत गेली. १९८८ साली राष्ट्रीय पातळीवर राजकीय पक्षांची फेर जुळवाजुळव करून जनता दल स्थापन झाले. महाराष्ट्रातील समाजवादी जनता दलात सामील झाला. काँग्रेस विरोधी मतदारांनी शिवसेना–भाजपा युतीस मते दिली. १९९० च्या निवडणुकीमध्ये शिवसेनेशी मृणाल गोरे यांच्या अट्टाहासामुळे युती होऊ शकली नाही. नंतर जनता दलात फूट पडून समाजवादी जनता दल स्थापन झाले. उर्वरित ९ आमदार काँग्रेसमध्ये गेले. परिणामी समाजवादी पक्षाच्या विस्ताराची आशा मावळली. (मुलाखत : कुमार सप्तर्षी, दि. ०९.१०.२०१०)

समाजवादी पक्षातील कार्यकर्त्यांची उत्तरोत्तर दुर्बलता दिसून येत होती. त्याची कारणे शोधली असता असे दिसते की, नेतृत्वातील वैचारिक गोंधळ, पक्षाचे विलिनीकरण, फूट आणि विलिनीकरण ही प्रक्रिया सतत घडत गेली. अनेक ज्येष्ठ नेते वैफल्यातून काँग्रेसमध्ये गेले. सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे नेत्यांनी संघटना बांधणीकडे केलेले दुर्लक्ष होय. महाराष्ट्रामध्ये डाव्या आणि समाजवादी विचारसरणी पक्षाची पूर्ण पिछेहाट झाली असून काँग्रेस, शिवसेना–भाजपा असे ध्रुवीकरण झाले आहे. काँग्रेसला पर्याय देणारे पक्ष महाराष्ट्रात जोराने आणि जोमाने पुढे आले. तसेच त्यांनी विशिष्ट असा जनाधार निर्माण करून तो टिकवून ठेवला. परिणामी डाव्या पक्षाकडील पाठिंबा कमी होऊन तो शिवसेना–भाजपा या हिंदूत्ववादी पक्षाकडे वळल्याचे दिसून येते.

समाजवादी पक्ष लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, आर्थिक नियोजन आणि घटनात्मक मार्गाने शोषणमुक्त समाजाची कल्पना करून स्थापना करण्यात आली होती. या पक्षाला समाजवादी विचारसरणीचा तत्त्वज्ञानात्मक पाया मानला गेला आहे. हा पाया दिवसेंदिवस कमकुवत होताना दिसून येतो. तसेच प्रतिगामी शक्तींने प्रभाव निर्माण केल्याने डाव्या पक्षांचा विचारसरणीचा पाया कमकुवत झालेला दिसून येतो. डाव्या विचारांच्या पक्षांनी येथील समाज वास्तव समजावून न घेता फक्त वर्गीय लढ्याच्या पातळीवर पाठिंबा टिकवण्याचा प्रयत्न केला. परिणामी अस्तित्वात असलेला पाठिंबा घसरत गेलेला दिसून येतो.

१९४८ ते १९७७ या कालखंडामध्ये हा पक्ष प्रजा समाजवादी म्हणून ओळखला जात असे. सर्वकष साम्यवादाची पध्द्तीचे राजकारण प्रजा समाजवाद्यांना मान्य नव्हते. सार्वजनिक व्यवहारामध्ये लोकशाही विकेंद्रीकरण हा यशस्वीतेचा मार्ग मानला गेला आहे. नियोजित अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला आहे. कोळसा, लोखंड व पोलादाच्या संपूर्ण क्षेत्राचे राष्ट्रीयीकरण करण्यात यावे असे त्यांचे मत होते. राष्ट्रकुल परिषदेचे सदस्य भारताने होऊ नये. अशियन राष्ट्रांचा एक तिसरा गट स्थापन करण्यात यावा. विद्यार्थी असंतोष संपविण्यासाठी विद्यार्थ्यांशी संवाद साधला जावा असे नेत्यांचे मत होते. शोषणविरहीत समाज आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्माण व्हावा असे त्यांना वाटत होते. व्यक्तींचे व्यक्तीकडून, समाजाचे समाजाकडून व राष्ट्रांचे राष्ट्रांकडून शोषण होऊ नये हे या पक्षाचे धोरण होते. शांततामय चळवळी व निदर्शने हा मार्ग पक्षाने आखला होता. १९७७ ते १९८९ या कालखंडातील समाजवादी विचारसरणीचे पक्ष जनता पक्षात विलिन झाले होते. लोकशाहीच्या फेरस्थापनेमध्ये मुलभूत अधिकारांची जोपासना, न्यायमंडळाचे स्वातंत्र्य, वृत्तपत्राचे स्वातंत्र्य, संसदेच्या प्रतिष्ठेची जोपासना, हुकुमशाही प्रवृत्तीवर नियंत्रण इ. गोष्टींना प्राधान्यक्रम दिला गेला. या विचारसरणीमध्ये सामाजिक न्याय, गांधीवादी अर्थव्यवस्था, सामाजिक सुधारणा व आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये वाढ इ. गोष्टींना महत्त्व देण्यात आले. १९९१ च्या निवडणुकीमध्ये एकही जागा जनता दल ह्या पुरोगामी लोकशाही आघाडीस मिळाली नाही. याचीच पुनरावृत्ती १९९६ व १९९८ च्या निवडणुकीमध्ये झाली. विधानसभा १९९० च्या निवडणुकीमध्ये २८८ पैकी २४ जागा मिळाल्या. त्यावेळी १२.९ टक्के मते मिळाली. १९९५ च्या निवडणुकीमध्ये जनता दल ह्या पुरोगामी लोकशाही आघाडीसह या पक्षास ११ जागा मिळाल्या असून ५.७ टक्के मते मिळाली. (निवडणूक आयोग अहवाल १९९० व १९९५)

## साम्यवादी पक्ष :

डावे पक्ष १९२४ साली साम्यवादी चळवळ खऱ्या अर्थाने भारतात सुरू झाली. कॉमिंटर्न या आंतरराष्ट्रीय साम्यवादी संघटनेच्या पुढाकाराने भारतीय कम्युनिस्ट पक्षाची

स्थापना झाली. पक्ष स्थापनेमध्ये रणदिवे, मिरजकर, श्रीपाद अमृत डांगे इ. नेत्यांनी पुढाकार घेतला. ''All Indian Trade Union Congress'' ची व किसान सभा या कामगार व शेतकरी वर्गातील संघटनेत डाव्या विचारसरणीचे नेते आघाडीवर होते. मुंबईच्या गिरगाव भागामध्ये या संघटनेचे वर्चस्व होते. मुस्लिम लीगच्या पाकिस्तान मागणीला देखील डाव्या नेत्यांनी अप्रत्यक्षरित्या पाठिंबा दिला. १९५६ पर्यंत भारतीय साम्यवादी पक्ष क्रांतीच्या मार्गाने सत्ता बळकावू शकतो असे त्यांना वाटत होते. भारतातील साम्यवादी पक्षाची प्रतिमा डागाळलेली असल्याने राष्ट्रवादाची परंपरा असलेल्या महाराष्ट्रात हा पक्ष मुळ धरू शकला नाही. जम बसविण्याचा प्रयत्न केला. शे.का.प.शी सहकार्य करून ग्रामीण भागात शिरकाव करता येऊ शकेल अशी या पक्षाची धारणा होती. मंबईतील कामगार वर्ग व आदिवासी वर्गाइतकाच साम्यवादी पक्षाचा प्रभाव राहिला.

१९५२ च्या निवडणुकीमध्ये पक्षाच्या जाहीरनाम्यामध्ये राज्याची भाषावार पुनर्रचना यास प्राथमिकता देण्यात आली. कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांचा संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन करण्यामध्ये सहभाग आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर या पक्षाला १९५७ च्या निवडणुकीमध्ये लोकसभेच्या ५ व विधानसभेच्या १३ जागा मिळाल्या. काँग्रेसमध्ये आण्णासाहेब शिंदे, खताळ पाटील, एकनाथ निंबाळकर हे नेते गेले. चिनी आक्रमणाच्या प्रश्नांवरून साम्यवादी पक्षाच्या अंतर्गत असलेले मतभेद वाढत गेले. ठाणे जिल्ह्यातील जव्हार मतदारसंघ व नाशिक जिल्ह्यातील सुरगणा मतदारसंघ साम्यवादी पक्षाचे अखेरचे बालेकिल्ले ठरले. त्यानंतर आदिवासी क्षेत्रात काँग्रेस विश्व हिंदु परिषदेच्या कार्यामुळे ठाणे व धुळे जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात भाजपाने शिरकाव केला. साम्यवादी पक्षाचा मार्क्स व लेनिनच्या विचारावर विश्वास आहे. रक्तरंजित क्रांतीऐवजी लोकशाही मार्गाने वर्गविहीन समाज स्थापन करता येईल अशी या पक्षाची धारणा आहे. पक्ष धर्मनिरपेक्ष असून जातीयवादाच्या विरोधी आहे. आदिवासी क्षेत्रात व औद्योगिक क्षेत्रात कामगार संघटनावर त्यांचा प्रभाव आहे. उजव्यांच्या विचारप्रणालीच्या अनेक संघटना कार्यरत

होत्या. तसेच डाव्यांची सीटू या कामगार संघटना मुंबई शहरात पुणे, नाशिक, इचलकरंजी या औद्योगिक शहरात कार्यरत आहेत. मुंबई शहराच्या कामगार वर्गावर दत्ता सामंत व शिवसेनेचा खऱ्या अर्थाने प्रभाव आहे. डाव्या कामगार संघटनांचा प्रभाव हा शिवसेनेच्या वाढीपासून हळूहळू कमी झालेला दिसून येतो. मराठी कामगारांना संघटित करण्यासाठी शिवसेना पुढे आल्याने हे कामगार शिवसेनेकडे आकर्षित झाले. दुसरे असे की, डाव्या कामगार संघटनातून प्रभावी असे नेतृत्व पुढे आले नाही. ही एक उणीव समजावी लागेल.

भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष हे साम्यवादावर निष्ठा असणारे राजकीय पक्ष आहेत. १९९१ च्या निवडणुकामध्ये व १९९८ च्या निवडणुकामध्ये लोकसभेची १ जागा मिळाली. १९९६ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये व १९९८ च्या निवडणुकीमध्ये साम्यवादी पक्षाला एकही जागा मिळविता आली नाही. १९९० च्या विधानसभा जागा साम्यवादी पक्षाला मिळाल्या. १९९५ च्या निवडणुकीमध्ये ३ जागा पक्षाला मिळाल्या. १९९९ मध्ये ०१ जागा मिळाली. तर २००४ व २००९ जागा मिळाल्या नाहीत. (निवडणूक आयोग अहवाल १९९० ते २००९)

डाव्या विचारांच्या आधारावर चालणाऱ्या या राजकीय पक्षाला अपयश येण्यामागे असे दिसून येते की, एक ठोस असा स्थानिक पातळीवरील आधार मिळवण्यास अपयश आले. दुसरे असे की, या पक्षांनी येथील सामाजिक वास्तव समजून न घेता जगात काय चालले आहे या बाबींचा जास्त विचार केला. उदा. चीनमधील घडामोडींच्या आधारावर येथील पक्षात फूट पडणे हे एक ज्वलंत उदाहरण आहे. तिसरे येथील जात वास्तव विसरून वर्गीय आधारावर संघटन करण्याचे प्रयत्न केला. या प्रयत्नाला यश मिळवता आले नाही. परिणामी दोन ते तीन ठिकाणच्या मतदारसंघाचा अपवाद वगळता इतर ठिकाणी त्यांना ठोस असा पाठिंबा निर्माण करता आला नाही.

## भारतीय जनता पक्ष :

पूर्वाश्रमीचा भारतीय जनसंघ व सध्याचा भाजप हा हिंदुत्ववादी राजकीय पक्ष आहेत. १९९५ साली पंडीत मदन मोहन मालवीय व लाला लजपतराय यांनी हिंदू महासभेची स्थापना केली होती. इस्लाम धर्मियांनी १९०६ साली मुस्लिम लीगची स्थापना केली. महात्मा गांधीच्या उदयानंतर हिंदू महासभेचा कॉंग्रेस विषयीचा दृष्टीकोन टिकात्मक होत गेला. न. चि. केळकर, अण्णासाहेब भोपटकर, धर्मवीर मुंजे, लोकनायक अणे, खापर्डे इ. नी हिंदूना संघटित करण्याचे प्रयत्न केले. १९३७ सालानंतर हिंदू महासभेची सूत्रे सावरकरांकडे गेली. त्यांना बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व मान्य नव्हते. सावरकरांनी गांधी व कॉंग्रेसला मुस्लिम धार्जिणे संबोधले होते. १९४८ साली एका मराठी भाषिक उच्च वर्णीय आणि आर.एस.एस. व हिंदू महासभेशी निगडीत माथेफिरूकडून गांधीची हत्या झाली. त्याचे पडसाद महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात उमटले. त्यामध्ये असंख्य ब्राम्हण लोकांना त्रास झाला. त्यानंतरच्या काळामध्ये आर.एस.एस. हिंदू महासभा जनसंघ व भाजपाची जनमाणसात गांधीचे खूनी अशी प्रतिमा झाली होती. त्याचप्रमाणे या पक्षाचे नेतृत्व ब्राम्हणी होते. काही दिवसांमध्ये भाजपने माळी, धनगर, वंजारी नेत्यांना पक्षातील व सत्तेतील संधी देऊन ही प्रतिमा बदलण्याचा प्रयत्न केला. (मुलाखत: किशोर ढमाले, दि. १२.०६.२००८) १९५७ च्या निवडणुकीमध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीच्या उमेदवाराचा प्रचार करण्याचे त्यांनी नाकारले. लोकसभेच्या २ व विधानसभेच्या ४ जागा मिळाल्या. मतांची टक्केवारी २ टक्के एवढी होती. (निवडणूक आयोग अहवाल १९९० ते २००९) संयुक्त महाराष्ट्र समितीमध्ये जनसंघ एकाकी पडला.

१९६२ च्या निवडणुकीमध्ये जनसंघाने स्वबळावर उमेदवार उभे केले होते. १२७ उमेदवार यावेळी पराभूत झाले होते. १९६७ च्या निवडणुकीमध्ये लोकसभेच्या २७ व विधानसभेच्या १६५ मतदारसंघमध्ये आपले उमेदवार उभे केले होते. विधानसभेच्या ४ जागांवर यश मिळाले असून ८ टक्के मते मिळाली. १९७१ निवडणुकीमध्ये १३ जागांवर पराभव स्वीकारावा लागला व ५ टक्के मते मिळाली.  १९७२ च्या निवडणुकीमध्ये

१२२ जागा लढवल्या व ५ जागा जिंकल्या असून ६ टक्के मते मिळाली. (निवडणूक आयोग अहवाल १९६२ ते १९७२) या टप्यामध्ये १९५२ ते १९७७ मध्ये संघटनात्मक जाळे पसरविण्याचा प्रयत्न झाला. १९७७ पर्यंत भाजपाचे जाळे महाराष्ट्रभर पसरविण्याचा प्रयत्न झाला आहे. १९७५ च्या आणीबाणीचा फटका सर्वाधिक जनसंघास बसला. या काळात पक्षाला पाहिजे त्या प्रमाणात यश संपादन करता आले नाही.

१९७८ च्या पुलोद आघाडी सरकारमध्ये काही पुर्वाश्रमीच्या जनसंघीयाना मंत्रीपदे मिळाली. १९७९ साली जनता पक्ष अखिल भारतीय पातळीवर फुटला. १९८० च्या निवडणुकीत जनता पक्षाचा घटक असलेल्या पुर्वाश्रमीच्या जनसंघाचे २ उमेदवार निवडून आले. १९८० च्या लोकसभा निवडणुकीनंतर जनता पक्षामध्ये फुट पडली. एप्रिल १९८० साली अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी या नावाने पूर्वाश्रमीच्या जनसंघाची फेरस्थापना करण्यात आली. १९८० च्या लोकसभा निवडणुकीत केवळ २ उमेदवार भाजपाचे निवडून आले होते. पण महाराष्ट्रात विधानसभेचा विचार करता असे दिसून येते की, १९८० च्या दरम्यान महाराष्ट्रातील पुलोद सरकार बरखास्त झाले होते. १९८० च्या विधानसभा निवडणुकामध्ये १४ उमेदवार विजयी झाले असून ९ टक्के मते मिळाली. (निवडणूक आयोग अहवाल १९८०) धुळे जिल्ह्यात आदिवासी भागात विदर्भातील भंडारा व बुलढाणा जिल्ह्यात बऱ्यापैकी यश मिळाले. १९८४च्या लोकसभा निवडणुकीमध्ये २० म्हणजे सर्व उमेदवार पराभूत झाले असून १० टक्के मते मिळाली. (निवडणूक आयोग अहवाल १९८४) १९८५ साली शरद पवारंच्या नेतृत्वाखाली पुरोगामी लोकशाही आघाडीची नव्याने स्थापना करण्यात आली. भाजपा हा आघाडीचा घटक पक्ष होता. त्यावेळी १६ जागा जिंकल्या. १९८४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये पक्षाच्या दारूण पराभवाचे विश्लेषण केल्यानंतर राष्ट्रीय स्तरावरील पक्ष नेत्यांनी गांधीवादी समाजवादाचा त्याग करून उघड उघड हिंदुत्वाची भूमिका स्वीकारण्याचा व त्या करिता आक्रमक पवित्रा घेण्याचा निर्णय घेतला. १९८९ मध्ये भाजपा व शिवसेनेशी युती झाली. भारतीय जनता पक्ष जरी अखिल भारतीय

जनता पक्ष असला तरी व्यावहारीक शहाणपण म्हणून युतीमध्ये साथ देण्याचे मान्य केले. १९८९ च्या निवडणुकीमध्ये १० जागा जिकल्या. २८ टक्के मते सेना—भाजपास मिळाली. (निवडणूक आयोग अहवाल १९८९) ग्रामीण महाराष्ट्रात शिरकाव करण्यास त्यांनी प्रयत्न सुरू केला. १९९० च्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपास ४२ जागा व शिवसेनेस ५२ अशा एकूण ९४ जागा युतीला मिळाल्या. (निवडणूक आयोग अहवाल १९९०) काँग्रेसला एक समर्थ पर्याय अशी युतीची प्रतिमा झाली. १९८९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये ५ जागा मिळाल्या. १९९२ च्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीमध्ये सेना भाजपास यश मिळाले. मुंबई महानगरपालिका, नगरपालिका, पंचायत राज संस्थाच्या निवडणुकीमध्ये सेना भाजपास यश मिळाले. १९९५ च्या निवडणुकाही संयुक्तपणे लढविल्या. या निवडणुकामध्ये १०५ जागांपैकी ६५ जागा भाजपा युतीस मिळाल्या. या निवडणुकीमध्ये अधिक जागा मिळाल्यामुळे सत्ता भाजपा सेनेची स्थापन झाली होती. १९९९ च्या विधानसभा निवडणुकीत ५६ जागांवरच समाधान मानावे लागले. तसेच सत्तेतून पायउतार देखील व्हावे लागले. २००४ च्या निवडणुकीत पुन्हा पक्षाला ५६ जागा मिळाल्या. २००९ च्या निवडणुकीत पुन्हा जागा कमी होऊन केवळ ४६ जागावर समाधान मानावे लागले. (निवडणूक आयोग अहवाल १९९० ते २००९)

भाजपा या पक्षाला एका विशिष्ट पातळीपर्यंत यश मिळवता आले. त्यानंतर जास्त जागावर यश मिळवता आले नाही. दुसरे असे की, शिवसेनेशी युती करून स्वत:चा विस्तार करावा लागलेला आहे. तिसरे असे की, जाणीवपूर्वक बहुजन समाजातील नेतृत्व पुढे आणावे लागले. त्यात वंसत भागवतांचे 'माधव' समीकरण यशस्वीरित्या केले. विभागनिहाय जात वास्तव समजावून घेत प्रस्थापित समाजाला देखील संधी निर्माण करून देण्याचे प्रयत्न करावे लागले आहेत. या पक्षाला दलित समाजाकडून पाठिंबा कमी प्रमाणात मिळत असल्याने जाणीवपूर्वक हिंदू दलित समाजाला जवळ केलेले आहे. त्यात चर्मकार आणि मांतग समाजाची नेतृत्वाला संधी

निर्माण करून दिलेली आहे. आदिवासी परिसरात पाठिंबा मिळवण्यासाठी हिंदुत्वादी विचारांच्या विविध संघटना पोहचवण्याचे काम केले. त्या संघटनांच्या माध्यमातून आदिवासी बहूल परिसरात विस्तार केला आहे. अशा प्रकारे आज या पक्षांची विशिष्ट अशा परिसरात विशिष्ट अशा समाजाच्या माध्यमातून ताकद निर्माण करून पक्ष महाराष्ट्रभर पसरलेला आहे.

## शिवसेना :

शिवसेना हा प्रादेशिक पक्ष आहे. सुरूवातीला ग्रामीण भागातून शहरामध्ये आलेल्या तरूणांना नोकरी मिळवून देण्यासाठी ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण अशी परिस्थिती असणारी संघटना दीर्घकाळ राजकारणापासून अलिप्त राहू शकली नाही. नंतर या संघटनेचे प्रादेशिक पक्षात रूपांतर झाले. १९७१ पासून शिवसेना उमेदवार उभे करीत होती. परंतु सत्ता मिळविण्याच्या  दृष्टिने १९९० नंतरच प्रयत्न झालेले दिसतात. १९९५ साली या पक्षाने भाजपाच्या साथीने राज्याची सत्ता काबीज केली.

मराठी माणसावरील अन्यायाचे निवारण करण्याकरीता लढाऊ संघटनेची गरज होती. या निष्कर्षाप्रत पोहचल्यानंतर बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेना या अराजकीय संघटनेची सुरूवात केली. शिवसेनेला मुंबई शहरातील मराठी भाषिक तरूणांचा पाठिंबा मिळाला होता. शिवसेना प्रादेशिक अस्मितेची चळवळ बनली होती. बिनराजकीय निवडणुकीच्या राजकारणापासून अलिप्त असणारी मराठी माणसाच्या न्याय हक्कांसाठी संघर्ष करणारी चळवळ आहे अशी प्रतिमा होती. १९६७ साली झालेल्या निवडणुकीमध्ये दक्षिणात्य अपक्ष बंडखोर काँग्रेस उमेदवार आणि माजी संरक्षण मंत्री व्ही. के. कृष्णमेनन यांच्या मृत्यूनंतर त्यांच्याभगिनी तारा सप्रे यांना पाठिंबा दिला होता. शिवसेना ही बिगरराजकीय संघटना आहे हे विधान वापरणाऱ्या शिवसेनेला मुंबई महानगरपालिकेच्या राजकारणात रस घ्यावासा वाटला आणि त्या निवडणुका लढवून डॉ. हेमचंद्र गुप्ते महापौर बनले. त्यानंतर सलग ३ वर्षे महापौर पद शिवसेनेकडे राहिले.

१९७३ च्या निवडाणुकीमध्ये ७३ नगरसेवक शिवसेनेचे निवडून आले. ठाणे नगरपालिकेत यश मिळवले. वसंतराव मराठे नगराध्यक्ष झाले. डॉ. हेमचंद्र गुप्ते, दत्ता प्रधान यांनी संघटनेचा राजीनामा दिला. एकूणच १९६८ नंतरच्या काळात शिवसेना ही एक प्रभावी शक्ती म्हणून वाटचाल करू लागली. १९८५ नंतर संघटनेने राज्याच्या ग्रामीण भागात रस घेण्यास सुरूवात केली. १९७८ च्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये पक्षाला काठावरचे बहुमत मिळाले. हिंदुत्वाच्या प्रश्नावर शिवसेनेने भारतीय जनता पक्षाबरोबर युती करून १९८९ व १९९१ च्या लोकसभा निवडणुका लढवल्या. या निवडणुकीमध्ये ४ उमेदवार विजयी झाले. १९९० च्या विधानसभा निवडणुकीमध्ये ५२ उमेदवार विजयी झाले. युतीचे एकूण ९४ उमेदवार विजयी झाले. त्यावेळी शिवसेना ही काँग्रेसच्या खालोखाल एक प्रभावी राजकीय शक्ती म्हणून उदयास आली. १९९० ते १९९५ या कालावधीमध्ये बऱ्याच वेळा युतीमध्ये मतभेद निर्माण झाले. परंतु युती टिकवण्याचे व्यावहारिक शहाणपण नेत्यांनी दाखविले. या पक्षाकडे तरूण वर्ग आकर्षित करण्यासाठी ठाकरेंनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. काँग्रेसमधील असंतुष्ट नेते शिवसेनेत गेले. कोकण, विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये शिवसेनेला जनाधार सापडला. काँग्रेसच्या नेत्यांच्या मलीन प्रतिमेवर शिवसेनाप्रमुखांनी टीका केली. गो. रा. खैरनार व अण्णा हजारे यांची भ्रष्टाचाराविरोधी आंदोलने शिवसेनेस उपयुक्त ठरली. १९८५ च्या निवडणुकीमध्ये युतीला सर्वाधिक जागा मिळाल्या आणि प्रादेशिक अस्मितेची चळवळ असणारी शिवसेना ही संघटना एक राजकीय पक्ष बनली.

१९९१ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये ४ जागा जिंकून ७.५ टक्के मते भाजपाशी युती करून मिळाली. १९९६ च्या निवडणुकीत १५ जागा मिळून ११ टक्के मते मिळाली. १९९८ च्या निवडणुकीमध्ये ६ जागा मिळून ११ टक्के मते लोकसभा निवडणुकीत मिळाली. विधानसभा १९९१ च्या निवडणुकीमध्ये ५२ जागा मिळून १५.९ टक्के मते मिळाली. १९९५ च्या निवडणुकीमध्ये ७३ जागा व १५.६ टक्के मते मिळाली. १९९९ च्या निवडणुकीत ६२ जागा मिळवल्या. तर २००४ च्या निवडणुकीत

६९ जागा मिळवल्या. २००९ च्या निवडणुकीत केवळ ४४ जागा मिळवल्या. तसेच विरोधी पक्षनेते पद देखील गमवावे लागले. (निवडणूक आयोग अहवाल १९९० ते २००९)

शिवसेना वाढीची कारणमीमांसा करताना असे दिसून येते की, शिवसेना ही संघटना शहरी भागात वाढणारी संघटना होती. त्या संघटनेचे राजकीय पक्षात रूपांतर झाले तरी शहरी पक्ष अशी प्रतिमा होती. पण १९९० नंतर जाणीवपूर्वक ग्रामीण भागात जाण्याचा प्रयत्न केला. घराणेशाही आणि प्रस्थापित यांना आव्हाने दिली. ही आव्हाने देत असताना सर्वसामन्याला सामावून घेण्यात आले. विशेषत: ग्रामीण भागातील शेतकरी आणि कारागीर ओबीसींना जवळ करत प्रभाव निर्माण केला. पण जसे जसे प्रस्थापित समाजातील नवअभिजन पुढे येत राहिले तसे ओबीसींना बाजूला करत प्रस्थापिताना संधी दिली. १९९५ नंतर तर पक्षांचे स्वरूप हे प्रस्थापिताचा पक्ष असे झाले. घराणेशाही आणि प्रस्थापिताना विरोध करणारा हा पक्ष एक प्रकारे घराणेशाही आणि प्रस्थापितांचे वारस बनलेला आहे. आज मराठा समाजाचा एक पक्ष म्हणून या पक्षाकडे महाराष्ट्रात पाहिले जाते.

## भारतीय रिपब्लिकन पक्ष :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांचा अनेक गटात विभागलेला भारतीय रिपब्लिकन पक्ष हा दलित अस्मितेच्या प्रतिनिधीत्वाचा दावा करणारा राजकीय पक्ष आहे. दलित अनुसूचित जाती, जमाती, नवबौद्ध, मातंग, चर्मकार इ. लोक या पक्षात अधिक प्रमाणात आहेत. त्यापैकी केवळ नवबौध्दाचा पक्ष अशी प्रतिमा निर्माण झाली आहे. पक्षांतर्गत गटबाजीचे राजकारण या पक्षामध्ये अधिक आहे. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या २२ टक्के पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या दलितापैकी ६.५ टक्के नवबौद्धांचा या राजकीय पक्षाला पाठिंबा आहे. मुंबई शहर व उर्वरित महाराष्ट्रामध्ये ही दलितांची मते विभागलेली दिसतात. राजकीय वैफल्यातून रिपब्लिकन पक्षाचे विविध गट राजकारण करताना दिसतात. स्वत:ला संपूर्ण भारतातील मागास लोकांचे प्रतिनिधीत्व

करणारा पक्ष आहे असे नेते निवडणूक आयोगाने एक राज्यपक्ष म्हणून मान्यता दिली आहे. १९६२ नंतर सत्तारूढ काँग्रेसशी सहकार्य करण्याचे धोरण रिपाईने ठेवले. गायकवाड व खोब्रागडे गटास सहकार्य मान्य होते. परंतु काँग्रेसमध्ये विलिनीकरण मान्य नव्हते. आर. डी. भंडारे यांचा गट काँग्रेसमध्ये विलिन झाला. त्यांच्यापाठोपाठ रूपवते गट विलिन झाला. १९६७ च्या निवडणुकीच्या वेळी रिपब्लिकन पक्षाशी अखिल भारतीय पातळीवरील समझोता केला गेला. त्यावेळी यशवंतराव चव्हाणांनी पुढाकार घेतला. त्यावेळी ५ जागा मिळाल्या. १९७१ साली दादासाहेब गायकवाड यांच्यासाठी १ जागा काँग्रेसने सोडली. गायकवाड व खोब्रागडे यांच्यात फूट पडली. गायकवाडच्या मृत्यूनंतर त्या गटाचे नेतृत्व रा. सू. गवई यांनी केले. काँग्रेसच्या सहकार्याने गवई विधानपरिषदेवर निवडून आले. १९७७ च्या निवडणुकीमध्ये गायकवाड गट काँग्रेस तर कांबळे व खोब्रागडे गट जनता पक्षाबरोबर होते. बी. सी. कांबळे जनता पक्ष पुरस्कृत लोकसभेवर राजाभाऊ खोब्रागडे राज्यसभेवर निवडून आले. १९७८ मध्ये बी. सी. कांबळे गटाचे जनता पक्ष पुरस्कृत २ उमेदवार निवडून आले. १९८० साली १ उमेदवार निवडून आला. १९८० ते १९९५ या कालावधीमध्ये पक्षाचा एकही उमेदवार लोकसभा अथवा विधानसभेवर निवडून आला नाही. त्याचे कारण म्हणजे पक्षांतर्गत गटबाजी व आत्मकेंद्रीत राजकारण. १९९८ च्या निवडणुकीमध्ये ४ जागा मिळाल्या. यावेळी काँग्रेस व समाजवादी पक्षाशी युती होती. अशी राजकीय व सामाजिक शक्तीचे ध्रुवीकरण झालेले दिसते.

## महाराष्ट्रातील १९९० नंतरच्या राजकारणाचा विभागनिहाय थोडक्यात आढावा

## कोकण विभागाचे राजकारण

कोकण विभागात ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्याचा समावेश होतो. स्वातंत्र्योतर काळात या परिसरात काँग्रेसचे वर्चस्व होते. पण १९८०च्या

दशकात शिवसेना राजकारणात उतरल्यानंतर काँग्रेस आणि शिवसेना यांच्यातील स्पर्धेतून राजकारण घडून आलेले दिसून येते. मात्र भाजपा—शिवसेना या पक्षांत युती झाल्यानंतर काँग्रेसला चांगलाच पर्याय निर्माण केला गेला. शहरी भागातील काही मतदारसंघाचा अपवाद वगळता काँग्रेस ही हद्दपार होण्याच्या मार्गावर होती. पण २००९ च्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेमध्ये प्रथम नारायण राणे यांच्या रूपाने फूट पडल्याने काँग्रेसला काहीसा प्रभाव निर्माण करता आला होता.

१९९९ मध्ये काँग्रेसच्या मतदारांमध्ये विभाजन घडून आले आहे. शहरी भागापेक्षा राष्ट्रवादीने ग्रामीण भागात विस्तार केलेला दिसून येतो. शहरी भागातील काही मतदारसंघात काँग्रेस अस्तित्व ठेऊन होती. तर राष्ट्रवादीला गणेश नाईक यांच्या रूपाने ठाणे शहराच्या काही भागात वर्चस्व निर्माण करता आलेले आहे. काँग्रेसला कोकणात उभारी मिळाली ती शिवसेनेतील नारायण राणे यांच्या प्रवेशानंतर. पण त्यांना २००९ च्या निवडणुकीत कोकणावरील वर्चस्व टिकवून ठेवता आले नाही. उलट राष्ट्रवादीने चांगल्या प्रकारे वर्चस्व टिकवून ठेवलेले आहे. शिवसेनेचे ग्रामीण भागात चांगल्या प्रकारे वर्चस्व आहे. तसेच शहरी भागात शिवसेना आणि भाजपा यांच्यात विभाजन होत जागा विभागून घेतल्या आहेत. या पक्षांशिवाय कोकणात रायगड जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्ष (जयंत पाटील), पालघर जिल्ह्यात बहुजन विकास आघाडी (हितेंद्र ठाकुर) कल्याण भिवंडी परिसरात समाजवादी पक्ष (अबू आझमी) या पक्षांचे देखील स्थानिक राजकारणात वर्चस्व आहे. या वर्चस्वाच्या आधारे हे पक्ष त्या त्या परिसरातील विधानसभा मतदारसंघात जागा घेत असतात.

कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील ग्रामीण भागातील राजकारणावर मराठा (कुणबी) समाजाचे वर्चस्व राहात आलेले आहे. रायगडमधील विशिष्ट मतदारसंघावर आगरी समाज वर्चस्व राखून आहे. तर ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात आदिवासी तर शहरी भागात मराठा आणि आगरी या समाजाचे वर्चस्व राहत आलेले होते. मात्र अलीकडे शहरीकरण आणि औद्योगिक विकास

या आधारावर अमराठी आणि उच्च जाती देखील राजकारणात चांगल्या प्रकारे आल्या आहेत. मात्र गवळी, आगरी, शिख, मुस्लिम, ख्रिश्चन, मराठा, ब्राम्हण, सीकेपी, सिंधी, गुजराती, मारवाडी, कानडी अशा विविध जातींचे प्राबल्य शहरी भागात वाढलेले आहे.

या विभागातील प्रश्नांच्या बाबतीत दोन विभाग करावे लागतात. कारण शहरी भागातील राजकारण हे शहरी भागातील विकास प्रश्न, शहरातील रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रेटीकरण, सांडपाण्याची व्यवस्था, स्थानिक नेतृत्वाचे जनसंपर्क, तरूणांना रोजगारांची संधी निर्माण करून देणे, तरूणांचे संघटन करणे, झोपडपट्ट्यीतील प्रश्न आणि जातींचे राजकीय समीकरण या आधारावर होते. या शिवाय शहरी राजकारणात पक्षीय पातळीवर आणि वैयक्तिक पातळीवर संस्थात्मक माध्यमातून करण्यात येणारे संघटनात्मक आधार आणि शहरातील दीर्घकाळ परिणाम करणारे विकासाचे 'व्हीजन' अशा आधारे होताना दिसून येते.

तर ग्रामीण भागातील राजकारण हे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा (पर्यावरण, रस्ते, पाणी, वीज), औद्योगिक विकास समर्थन/विरोध, आदिवासी परिसरात त्यांच्या जमिनीचे प्रश्न, वाढती बेरोजगारी, सांस्कृतिक अंगाने येणारे प्रश्न, सिंचनाच्या नियोजनाचा प्रश्न, शहरी भागाला पायाभूत साधनांचा पुरवठा करणारे, प्रकल्पाच्या जागेचा प्रश्न (उदा. जैतापूर सारख्या प्रकल्पाच्या आधारे होणारे राजकारण), समुद्र किनारपट्टी भागातील मासेमारी व्यावसायिकांचे प्रश्न, कोकण पर्यटन क्षेत्राच्या विकासाचा प्रश्न आणि जातीय आधारावर घडून येणारे समीकरणे अशा घटकांच्या अंगाने घडून येते. (पहा. तक्ता. क्र ३.१)

**तक्ता क्र. ३.१**

**कोकण विभाग : १९९० ते २०१४ पक्षनिहाय जागांची स्थिती**

| अ.क्र | राजकीय पक्ष | १९९० | १९९५ | १९९९ | २००४ | २००९ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०९ | ०३ | ०१ | ०२ | ०३ |
| २ | राष्ट्रवादी | — | — | ०४ | ०९ | १० |
| ३ | भाजपा | ०५ | ०६ | ०५ | ०४ | ०५ |
| ४ | शिवसेना | ११ | १५ | १५ | १२ | ०९ |
| ५ | इतर | ०६ | ०५ | ०५ | ०३ | १० |
| ६ | अपक्ष | ०० | ०२ | ०१ | ०१ | ०२ |
| ७ | एकूण | ३१ | ३१ | ३१ | ३१ | ३९ |
| | आधार : निवडणूक आयोग अहवाल — १९९० ते २००९ | | | | | |

## मुंबईचे राजकारण

मुंबई शहराच्या राजकारणावर संयुक्त महाराष्ट्र चळवळी आधी आणि नंतरही नव्वदीच्या दशकापर्यंत काँग्रेसचे वर्चस्व होते. डावे पक्ष आणि कामगार संघटनांचे काँग्रेसला आव्हान होते. कामगार चळवळ मोडीत काढण्यात काँग्रेसने शिवसेनेची मदत घेतली. मात्र तिने सेना नंतर काँग्रेसलाही हद्दपार केली. शिवसेना संघटन करण्यास सुरूवात झाल्यापासून शहराच्या राजकारणात बदल घडून आला. मराठी भाषिकांचे हिंतसंबंध जोपासण्याच्या भूमिकेतून निर्माण झालेल्या या संघटनेने राजकारणात उतरल्यापासून हळूहळू प्रभाव निर्माण केला. शिवसेनेने १९९० नंतर मुंबई महानगरपालिका ताब्यात घेतली. शिवसेनेने १९९० च्या दशकात भाजपाशी युती करत हिंदुत्वाचा स्वीकार केला. बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली दक्षिणात्यांना विरोध, उत्तर भारतीयांना विरोध करीत मराठी भाषिकांना संघटित करीत दुसऱ्या बाजूला

१९९२—९३ मधील मुंबई बॉम्ब स्फोटाचा फायदा उठवत हिंदू—मुस्लिम दंगलीचा उपयोग हिंदू संघटित करण्यात घेतला. आज घडीला काँग्रेस मुंबई शहराच्या राजकारणात पॉकेटस्च्या स्वरूपात शिल्लक आहे. २००९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी राज ठाकरे हे शिवसेनेतून बाहेर पडल्याने सेना आणि मनसेतील मतविभाजणीचा फायदा उठवत काँग्रेस—राष्ट्रवादी आघाडीने १८ जागा मिळवल्या. तर शिवसेनेला २००९ च्या निवडणुकीत केवळ ४ जागा मिळता आल्या होत्या. अर्थात १९८० च्या दशकात मराठी भाषिकांच्या आधारे मुंबईत पाय रोवणाऱ्या शिवसेनेने मराठी भाषिकांच्या हितसंबंधाशी बांधिलकी बाळगून प्रभाव टिकवून ठेवलेला आहे. तर भाजपाने विकासाचा प्रश्न, आर. एस.एस च्या माध्यमातून मजबूत संघटन आणि गुजराती व उत्तर भारतीय मतांचा पाठिंबा, व्यापारी वर्गाच्या पाठिंब्याच्या आधारे चांगलाच शिरकाव केला आहे. मुंबई शहराच्या राजकारणात दुसऱ्या क्रमांकांची मते तपासली तर असे दिसून येते की, काँग्रेसचे पॉकेटस् मतदारसंघ वगळता इतर मतदारसंघात खरी लढत ही शिवसेना आणि भाजपात झालेली दिसून येते.

काँग्रेस आघाडी सरकारने मुंबईसाठी अनेक मोठे प्रकल्प राबविले शिवाय झोपडपट्टी परिसरातही अनेक कल्याणकारी योजना राबविल्या. तरीही त्यांना आपला आधार टिकवता आला नाही. मुस्लिम, दलित आणि उत्तर भारतीय मतदार हा काँग्रेसचा पाया होता. काँग्रेस आणि राष्ट्रवादीला भाजपाच्या वाढीवर प्रभावी असे मुद्दे निर्माण करता आले नाहीत. दुसरे असे की, मुंबई शहराचे नेतृत्व उत्तर भारतीय नेतृत्वाकडे दिल्याने स्थानिक मतदार हे विरोधात गेले. परिणामी मुंबई शहराच्या राजकारणात काँग्रेस—राष्ट्रवादीला अपयश आलेले दिसून येते. मनसेचा प्रभाव ओसरल्याने यावेळी मतविभाजनाचा काँग्रेसला फायदा होऊ शकला नाही. शिवाय मुंबईतील मराठी टक्का कमी झाल्यानेही सेनेचा टक्का घसरला.

२००९ च्या विधानसभा निवडणुकीत मुंबईच्या राजकारणात विकास, भाषिकवाद हे मुद्दे मध्यवर्ती होते. विकासाच्या प्रश्नामध्ये पायाभूत सुविधांचा विकास हा

प्रमुख मुद्दा होता. तर झोपडपट्टी परिसरात झोपडपट्टीतील समस्या आणि संघटन हे प्रमुख मुद्दे होते. मुंबई शहराच्या राजकारणात वाहतुकीचा प्रश्न, मेट्रोचा प्रश्न, समुद्रकिनारी भागातील नगररचना, बिआरटीच्या वाहतूकीचा प्रश्न, स्थानिक नगररचनेच्या संदर्भातील विविध प्रकल्पाचे प्रश्न हे मध्यवर्ती होते.

**तक्ता क्र. ३.२**

**मुंबई : १९९० ते २०१४ पक्षनिहाय जागांची स्थिती**

| अ.क्र | राजकीय पक्ष | १९९० | १९९५ | १९९९ | २००४ | २००९ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०९ | ०१ | १२ | १५ | १७ |
| २ | राष्ट्रवादी | — | — | ०१ | ०४ | ०३ |
| ३ | भाजपा | ०९ | १२ | ०८ | ०५ | ०५ |
| ४ | शिवसेना | १५ | १८ | ११ | ०९ | ०४ |
| ५ | इतर | ०१ | ०३ | १२ | ०१ | ०६ |
| ६ | अपक्ष | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ७ | एकूण | ३४ | ३४ | ३४ | ३४ | ३६ |
| | आधार : निवडणूक आयोग अहवाल — १९९० ते २००९ | | | | | |

## मराठवाड्याचे राजकारण

मराठवाडा या विभागात औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, नांदेड, लातूर, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांचा समावेश होतो. या विभागावर स्वातंत्र्योतर काळात काँग्रेसचा प्रभाव राहत आलेला होता. मात्र या विभागात सद्दस्थितीत काँग्रेस, भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी हे चारही पक्ष आपआपली ताकद जिल्हानिहाय बाळगून आहेत. पण एक वैशिष्ट्ये असे सापडते की, १९९० नंतर आघाडीचे राजकारण सुरू झाले असल्याने मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात आघाडीकडील एक आणि

युतीकडील एक अशी पक्षीय स्पर्धा राहत आलेली होती. उदा. परभणी, हिंगोली, उस्मानाबाद आणि औरंगाबाद या जिल्ह्यात शिवसेनेचा प्रभाव तर बीड, लातूर, जालना, नांदेड या जिल्ह्यात भाजपाचा प्रभाव आहे. तर नांदेड, लातूर, परभणी या जिल्ह्यावर काँग्रेसचा प्रभाव तर उस्मानाबाद, बीड, जालना, परभणी आणि औरंगाबाद या जिल्ह्यात राष्ट्रवादीचा प्रभाव आहे.

जातीय आधारावर मराठवाड्यात मराठा समाजापाठोपाठ धनगर, माळी, वंजारी लिंगायत येल्लम, बंजारा हे समाज घटक मोठ्या प्रमाणावर आहेत. मराठवाड्याच्या राजकारणाचे वैशिष्ट्ये असे सापडते की, जरी ओबीसी समाजाचे काही 'पॉकेट्स' पुढे आले असले तरी मराठा समाजाच्या करंगळीला धरूनच राजकारण करावे लागते. त्याचे उत्तम उदाहरण हे बीड जिल्ह्याच्या राजकारणाचे आहे. ओबीसी समाजाला स्वतंत्र राजकारण तयार करता आले नाही. पक्षांतर्गत राहून मराठा समाजाच्या नेतृत्वाच्या सहाय्याने राजकारण करावे लागते.

१९८० नंतर मराठवाड्यातून ओबीसी समाजातील नेतृत्व पुढे आले. त्यात गोपीनाथ मुंडे यांचे नेतृत्व पुढे महाराष्ट्र पातळीवर गेले. पारंपारिकदृष्ट्या ओबीसी समाज हा काँग्रेसचा पाठीराखा होता. पण भाजपातून गोपीनाथ मुंडे आणि शिवसेनेने कारागीर आणि सेवा क्षेत्रातील ओबीसीला दिलेल्या संधीमुळे ओबीसी मोठ्या प्रमाणावर सेना भाजपाकडे वळल्याचे दिसून येते. मराठवाड्यात नांदेड, उस्मानाबाद, लातूर या जिल्ह्यात लिंगायत समाजाची लोकसंख्या जास्त प्रमाणात आहे. या जिल्ह्यातील काही मतदारसंघात पॉकेट्स च्या स्वरूपात लिंगायत नेतृत्व पुढे आले आहे. लातूर, नांदेड आणि उस्मानाबाद या जिल्ह्यात दलित समाजाचे प्रमाण जास्त प्रमाणावर आहे पण वेगळे राजकारण न करता काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या बाजूने राहिलेले आहेत. मुस्लिम समाजाचे नांदेड, बीड, औरंगाबाद, परभणी या शहरात लक्षणीय प्रमाण आहे. पण काँग्रेस आणि राष्ट्रवादीकडे यांचा कल राहिला आहे. मराठा वगळता इतर कोणताही समाज पूर्ण मराठवाड्यात समसमान संख्येने पसरलेला नसल्याने मराठेतर नेतृत्व त्या त्या

जिल्ह्यापुरतेच मर्यादित राहिलेले आहे. मराठा समाजातून नेतृत्व पुढे येण्याचे प्रयत्न झाले पण समाजातंर्गत असणाऱ्या गटबाजीमुळे मर्यादा आल्या आहेत.

२००९ च्या निवडणुकीत मराठवाड्यात जातीय राजकारणाचे समीकरण आणि स्थानिक प्रश्न या घटकांच्या आधारे राजकारण घडून आले. परिणामी काही प्रमाणात काँग्रेस आणि राष्ट्रवादी या पक्षांकडचा पाठिंबा हा भाजपाकडे सरकलेला दिसून येतो. संपूर्ण मराठवाड्याचा विचार करता आतापर्यंत काँग्रेसचे वर्चस्व राहिलेले होते. पण विकासकामाला ज्या प्रकारे गती मिळणे अपेक्षित होते त्या प्रमाणात मिळाली नाही. मराठवाड्यातील औद्योगिक विकास, शैक्षणिक विकास, दुष्काळ, सिंचनांचा प्रश्न, शहरी भागातील पायाभूत विकासाचा प्रश्न, सहकार क्षेत्राचा विकास हे प्रश्न निवडणुकीच्या काळात प्रचारात मध्यवर्ती येतात. याशिवाय दुष्काळ, सहकार आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांतील भ्रष्टाचार, गेल्या निवडणुकीत दिलेली आश्वासने पूर्ण न करणे या कारणांनी मतदार काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या विरोधात गेले असल्याचे दिसून येते. तरीही ज्या काँग्रेस आणि राष्ट्रवादी या पक्षांतील नेतृत्वाची संस्थात्मक पातळीवर मजबूत संघटन बांधणी केली आहे. त्या मतदारसंघात भाजपा—सेनेला धक्का लावता आलेला नाही.

जिल्हा आणि राजकारण हे घटक घेऊन २००९ च्या निवडणुकीकडे पाहिले असता असे दिसून येते की, प्रत्येक जिल्ह्यातील स्थानिक प्रश्न आणि जातीय समीकरण वेगवेगळे आहे. तसेच २००९ ची विधानसभा निवडणूक जरी सर्व पक्षांनी स्वबळावर लढलेली असली तरी पक्षीय पातळीवरील स्पर्धेचे स्वरूप देखील वेगवेगळे असल्याचे पुढे येते. उदा. उस्मानाबाद जिल्ह्यात राष्ट्रवादी आणि शिवसेना या पक्षात स्पर्धा राहिली. (पहा. तक्ता. क्र ३.३ ) भाजपा आणि काँग्रेस या पक्षांना साधे स्पर्धेत उतरता आले नाही. तर बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी आणि भाजपा या दोनच पक्षांत स्पर्धा राहिली. या जिल्ह्यात काँग्रेस आणि शिवसेनेला स्पर्धेच्या जवळ जाता आले नाही. इतर जिल्ह्याचे चित्र थोडेफार फरकाने असेच असल्याचे दिसून येते. फार थोडे मतदारसंघ असे सापडतात की त्या मतदारसंघात तिहेरी अथवा चौरंगी स्पर्धा झालेली आहे.

**तक्ता क्र. ३.३**

**मराठवाडा: १९९० ते २०१४ पक्षनिहाय जागांची स्थिती**

| अ.क्र | राजकीय पक्ष | १९९० | १९९५ | १९९९ | २००४ | २००९ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | २३ | १२ | १० | ०७ | १८ |
| २ | राष्ट्रवादी | — | — | ०५ | ११ | १२ |
| ३ | भाजपा | ०५ | ०९ | १० | ११ | ०२ |
| ४ | शिवसेना | ११ | १५ | १६ | १४ | ०७ |
| ५ | इतर | ०६ | ०४ | ०१ | ०० | ०२ |
| ६ | अपक्ष | ०१ | ०६ | ०४ | ०४ | ०५ |
| ७ | एकूण | ४६ | ४६ | ४६ | ४६ | ४६ |
| | आधार : निवडणूक आयोग अहवाल — १९९० ते २०१४ | | | | | |

## उत्तर महाराष्ट्रातील राजकारण

उत्तर महाराष्ट्रमध्ये नाशिक, जळगाव, धुळे, नंदूरबार या जिल्ह्यांचा समावेश होतो. या विभागात पारंपारिकरित्या काँग्रेस पक्षांचे वर्चस्व राहत आले आहे. १९९० नंतर मात्र शिवसेना आणि भाजपाने काँग्रेसला चांगल्या प्रकारे पर्याय दिलेला दिसून येतो. त्यात १९९९ साली काँग्रेस फुटीतून निर्माण झालेल्या राष्ट्रवादीने प्रवेश केल्याने चौरंगी अशा स्वरूपाचा हा प्रदेश बनलेला आहे. नाशिक जिल्ह्यात काँग्रेसकडून सर्व पाठिंबा राष्ट्रवादीकडे चांगल्या प्रकारे सरकलेला आहे. तर शिवसेना ही युतीमध्ये प्रभावी होती. मात्र २००९ मध्ये शहरी भागात भाजप आणि ग्रामीण भागात राष्ट्रवादी आणि शिवसेना पुढे आली आहे. धुळे, जळगाव आणि नंदूरबार या जिल्ह्यातील काही मतदारसंघाचा अपवाद वगळता भाजपाला चांगल्याप्रकारे प्रतिसाद मिळालेला आहे. या

विभागातील जागांचा विचार करता राष्ट्रवादीकडून भाजपाकडे जागा सरकल्या आहेत. (पहा तक्ता. ३.४ )

या विभागावर मराठा समाजाचे वर्चस्व दिसत असले तरी नंदूरबार, नाशिक, धुळे या जिल्ह्यातील काही मतदारसंघाचे राजकारण हे आदिवासी जमाती प्रभावी असणारे आहे. शिवाय लेवा पाटील, गुजर, धनगर, माळी वंजारी या जातीं प्रभावी आहेत. नाशिक जिल्ह्यातील राजकारण मराठा आणि ओबीसी यांच्यातील स्पर्धेतून साकारलेले आहे. पण त्यात मराठा समाजाचे वर्चस्व कायम राहत आलेले आहे. मात्र २००९ च्या विधानसभा निवडणुकीपासून ओबीसी समाज घटकांना शहरात चांगले पाठबळ मिळालेले आहे. नंदूरबार आणि धुळे जिल्ह्यातील आदिवासीसाठी राखीव असलेल्या मतदारसंघात आदिवासी समाजातील अंतर्गत स्पर्धेतून राजकारण साकारलेले आहे. शिवाय आदिवासी विरूध्द बिगर आदिवासी असेही स्पर्धा घडून येते. धुळे शहराचे राजकारण हे शहरी भागाचा विकास आणि सांप्रदायिक हल्ले या आधारावर साकारलेले आहे. जळगाव जिल्ह्याचे राजकारण हे मराठा आणि ओबीसी या समाजातील स्पर्धेतून पुढे आले आहे. या जिल्ह्याच्या राजकारणावर मराठा आणि ओबीसी या जातीशिवाय मारवाडी, गुजर या जातींतील नेतृत्वाचा देखील प्रभाव राहिलेला आहे.

आदिवासी परिसरातील राजकारण हे आदिवासी विकास, पाणी प्रश्न, जमिनमालकीचे लढे, २००९ निवडणुकीत आरक्षण बचावासाठी निर्माण करण्यात आलेले आंदोलने या घटकांनी प्रभावीत झालेले आहे. आदिवासी उर्वरित प्रदेशात सिंचनाचा प्रश्न, दुष्काळ, ग्रामीण भागातील पायाभुत सुविधाचा प्रश्न (रस्ते, पाणी, वीज), शहरी भागात पिण्याचा पाणी प्रश्न (जळगाव, धुळे, नंदूरबार), पायाभूत सुविधाचा प्रश्न, सपूर्ण शहराच्या विकासाच्या 'व्हीजन'चा प्रश्न, शेती मालाला हमीभावाचा प्रश्न, ऊस लागवड पट्ट्यातील ऊसाच्या भावाचा प्रश्न, सहकार क्षेत्र मोडकळीस येत आहे त्यास तारण्याचा प्रश्न अशा विविध प्रश्नाच्या अंगाने राजकारण घडून येताना दिसते.

**तक्ता क्र. ३.४**

**उत्तर महाराष्ट्र : १९९० ते २०१४ पक्षनिहाय जागांची स्थिती**

| अ.क्र | राजकीय पक्ष | १९९० | १९९५ | १९९९ | २००४ | २००९ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | २१ | १० | ०८ | ०९ | ०६ |
| २ | राष्ट्रवादी | — | — | ०७ | १० | ०९ |
| ३ | भाजपा | ०८ | १० | ०७ | ०६ | ०४ |
| ४ | शिवसेना | ०२ | ०५ | १० | ०७ | ०७ |
| ५ | इतर | ०५ | ०४ | ०३ | ०१ | ०६ |
| ६ | अपक्ष | ०० | ०७ | ०१ | ०३ | ०३ |
| ७ | एकूण | ३६ | ३६ | ३६ | ३६ | ३५ |
| | आधार : निवडणूक आयोग अहवाल — १९९० ते २००९ | | | | | |

## विदर्भाचे राजकारण

विदर्भाचे पूर्व विदर्भ आणि पश्चिम विदर्भ असे विभाजन करण्यात येते. पूर्व विदर्भात नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, वर्धा, आणि गोंदिया या सहा जिल्ह्याचा समावेश होतो. तर पश्चिम विदर्भात बुलढाणा, अकोला, वाशीम, यवतमाळ, अमरावती या पाच जिल्ह्याचा समावेश होतो. या दोन्ही विभागात भौगोलिक आणि सामाजिकदृष्ट्या वेगळेपण असताना दिसून येते. पूर्व विदर्भ हा भौगोलिकदृष्ट्या डोंगराळ, आदिवासी, नक्षलग्रस्त आणि जास्त प्रमाणात जंगल परिसर असणारा आहे. तर पश्चिम विदर्भ हा शेती प्रधान आणि सपाट प्रदेश असणारा आहे. सामाजिकदृष्ट्या या विभागाकडे पाहिले तर पुर्व विभागात आदिवासी, मराठा—कुणबी, उच्च जाती, दलित आणि ओबीसी असा मिश्र स्वरूपात आहे. पश्चिम विदर्भात मराठा, कुणबी आणि ओबीसी जातींचे प्रमाण जास्त प्रमाणावर आहे. चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोदिंया या

जिल्ह्यात आदिवासीचे प्रमाण जास्त आहे. तर यवतमाळ आणि अमरावती या जिल्ह्यातील काही तालुक्यात आदिवासी बहुसंख्येने आहेत. त्यामुळे या जिल्ह्यांतील काही मतदारसंघावर आदिवासी समाजाच्या राजकारणाचे प्राबल्य आहे. ओबीसी अंतर्गत विविध ओबीसी जाती व दलितांतर्गत विविध दलित जातींचे केवळ अस्तित्वच नव्हे तर राजकीयदृष्ट्या त्यांचा निर्णायक प्रभावही हे विदर्भाच्या राजकारणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये होय.

या विभागावर पारंपारिकदृष्ट्या काँग्रेसचे वर्चस्व होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत काँग्रेसच्या बाजूने हा विभाग होता. मात्र १९८० नंतर भाजपाच्या प्रवेशाने या विभागात काँग्रेसला चांगलाच पर्याय निर्माण करून दिला. १९९० नंतर या विभागात शिवसेना आली. तर १९९९ नंतर राष्ट्रवादी आली. पण या विभागात या दोन्ही पक्षांना फारसा पाठिंबा मिळाला नाही. मुख्य स्पर्धा ही भाजपा आणि काँग्रेस या पक्षांमध्ये राहत आलेली आहे. अकोला जिल्ह्यात भारिप–बहुजन महासंघ या पक्षांच्या माध्यमातून आव्हान देण्यात आले. हा प्रयोग फक्त जिल्ह्यापुरता मर्यादित राहिलेला आहे. अमरावती जिल्ह्यात रिपाई (गवई गट) चा प्रभाव दिसतो. गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यात काही आदिवासी नेतृत्वाकडून स्थानिक पातळीवर आदिवासी पक्षांच्या माध्यमातून प्रयोग केले गेले. पण ते यशस्वी करता आले नाही.

चंद्रपूर, वर्ध्यात शेतकरी संघटनेचा नव्वदीच्या दशकांपर्यंत प्रभाव होता. तर नागपूर, भंडारा व गोंदिया जिल्ह्यात बसपाचे संघटन दिसते. रिपाई कवाडेगट नागपूर परिसरात अस्तित्व टिकवून आहे. काँग्रेसच्या साथीने राष्ट्रवादी आणि भाजपाच्या साथीने शिवसेना ही दुय्यम भूमिका घेऊन होती. १९९० नंतर व २००९ सालच्या निवडणुकीत विदर्भातील पक्षीय स्पर्धा ही काँग्रेस आणि भाजपामध्ये होताना दिसते.

विदर्भात मराठा आणि कुणबी समाजाचे राजकारणावर वर्चस्व राहिले असले तरी पूर्व विदर्भात तेली, पोवार, कोमटी, ब्राम्हण, आणि आदिवासीचे काही मतदारसंघात प्राबल्य आहे. लोकसंख्येच्या आणि जमीनमालकीच्या आधारे ओबीसी जाती हे

राजकारणात प्रभावी आहेत. मात्र कुणबी आणि तेली या दोन ओबीसीतील स्पर्धा ही नागपूर, वर्धा आणि चंद्रपूर या जिल्ह्यातील ग्रामीण भागात पाहण्यास मिळते. तर विभागातील शहरी भागात ब्राम्हण, मराठा–कुणबी, तेली आणि उत्तर भारतीय जातींय स्पर्धा असताना दिसून येते. गडचिरोली या जिल्ह्यात आदिवासी अतंर्गत स्पर्धा राहाते. भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यात पोवार, कुणबी, पाटीदार आणि आदिवासी या जातींमध्ये स्पर्धा असताना दिसून येते. नागपूर जिल्ह्यात ग्रामीण भागात तेली, कुणबी आणि दलित या जातींतर्गत राजकीय स्पर्धा घडून येते. तर नागपूर शहरात ब्राम्हण, कुणबी, मुस्लिम, मारवाडी, उत्तर भारतीय आणि दलित अशी स्पर्धा राहते. चंद्रपूर जिल्ह्यात कुणबी, तेली, कोमटी आणि आदिवासी अशी स्पर्धा राहाते. वर्धा जिल्ह्यात प्रामुख्याने कुणबी आणि तेली या समाज घटकांत स्पर्धा राहते. अर्थात प्रत्येक जिल्ह्यात समाज घटकांत चालणारी स्पर्धा ही वेगवेगळी असताना दिसून येते.

पश्चिम विदर्भावर मराठा आणि कुणबी समाजाचा प्रभाव आहे. तर ओबीसीतील काही समाज घटक पॉकेटस् तयार करून राजकारणात प्रभाव निर्माण करून आहेत. त्यात माळी, धनगर, बंजारा आणि तेली या समाज घटकांचा समावेश होतो. भारिप–बहुजन महासंघ पक्षाच्या प्रयोगाने धनगर आणि माळी समाजाला अकोला जिल्ह्यात संधी मिळत होती. बुलढाणा जिल्ह्यातील चिखली मतदारसंघात लिंगायत समाजाचे उमेदवार सातत्याने निवडून येत आहे. जिल्हानिहाय पाहता असे दिसून येते की, अकोला जिल्ह्यात मराठा आणि मराठेत्तर अशी स्पर्धा भरिप–बहुजन पक्षामुळे दिसून येते. प्रस्थापित पक्षांतून मराठा–कुणबी या पक्षांतर्गत स्पर्धा दिसून येते. मात्र २००९ च्या निवडणुकीत ही स्पर्धा फक्त दोन मतदारसंघापुरतीच मर्यादित राहिली. पश्चिम विदर्भातील ओबीसीचे पॉकेटस् मतदारसंघ वगळता मराठा–कुणबी अतंर्गत स्पर्धा असल्याचे दिसून येते. पॉकेटस्मध्ये पूसद मतदारसंघाचा अपवाद वगळता मराठा–कुणबी आणि ओबीसी अशी स्पर्धा राहाते. यवतमाळ आणि वाशिम या जिल्ह्यात मराठा–कुणबी आणि बंजारा या समाजातंर्गत काही मतदारसंघात स्पर्धा राहते. तर

अकोला, वाशिम, बुलढाणा आणि अमरावती या जिल्ह्यात मराठा—कुणबी अतंर्गत स्पर्धा राहते.

२००९ च्या निवडणुकीत विभागातील मध्यवर्ती येणारे प्रश्न पाहिले असता असे दिसून येते की, विदर्भाच्या स्वतंत्र राज्याच्या मागणीचा मुद्दा हा निवडणुकीत चांगलाच मध्यवर्ती आलेला होता. या मुद्दांच्या बाबतीत भाजपाने दुय्यम भूमिका घेत मतदारांना संभ्रमात पाडले होते. कारण काही नेते विदर्भांच्या स्वतंत्र राज्याच्या मागणीला पाठिंबा देत होते तर काही नेते विरोध करत होते. विशेत: पूर्व विभागातून स्वतंत्र विदर्भाच्या मागणीला पाठिंबा होता. तर पश्चिम विदर्भातून विरोध होता. पश्चिम विदर्भातील राजकीय नेतृत्वाची नाळ ही मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील नेतृत्वाशी जोडली गेली असल्याने हा विरोध होत होता. दुसरे असे की, देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री पदाचे उमेदवार आहेत ही बाब सुप्त स्वरूपात सर्व मतदारसंघात प्रचारात आणली होती. त्यामुळे भाजपाला मतदारांचा पाठिंबा मिळवण्यात यश आले. (पहा. तक्ता. क्र ३.५)

या विभागातीत प्रश्नांच्या बाबतीत पाहिले असता असे दिसून येते की, विभागाचा मागासलेपणा, सिंचनाचा अनुशेष आणि पायाभूत सुविधांचा प्रश्न हा मध्यवर्ती आणण्यात आले होते. मात्र प्रश्नांचे स्वरूप हे जिल्हानिहाय वेगवेगळे असताना दिसून येते. अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम, अमरावती या जिल्ह्यातील शेती क्षेत्रातील सिंचनाचा अनुशेष आणि ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा (रस्ते, पाणी, वीज), शेतमालाचा प्रश्न, कापसाच्या हमीभावाचा प्रश्न, शेतकरी आत्महत्या प्रश्न, विविध पाणी प्रकल्पाचे प्रलंबित प्रश्न हे मध्यवर्ती आणण्यात आले होते. तर शहरी भागातील पायाभूत सुविधा त्यात रस्त्यांचे कॉंक्रेटीकरण, वीज, पाणी पुरवठा, सांडपाण्याची व्यवस्था आणि झोपडपट्टी भागातील समस्या या प्रश्नांना मध्यवर्ती आणण्यात आले होते. पूर्व विदर्भ विभागात ग्रामीण भागातील भात उत्पादनाच्या भावाचा प्रश्न, संत्री उत्पादकांचा प्रश्न, आदिवासी कल्याण निधीचा प्रश्न, नक्षलग्रस्त भागातील समस्या, सिंचनाचा प्रश्न,

मिहान प्रकल्पाची मंदगती, सहकार क्षेत्राची पडझड, पायाभूत सुविधांचा प्रश्न असे अनेक प्रश्न मध्यवर्ती आणण्यात आले होते. हे सर्व प्रश्न प्रचारात आले असले तरी स्वतंत्र विदर्भाच्या मागणी, विदर्भाचे मागासलेपण आणि सिंचनाचा अनुशेष हे प्रश्न जास्त प्रभावी दिसतात.

**तक्ता क्र. ३.५**

**विदर्भ : १९९० ते २००९ पक्षनिहाय जागांची स्थिती**

| अ.क्र | राजकीय पक्ष | १९९० | १९९५ | १९९९ | २००४ | २००९ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | २५ | १७ | २६ | १९ | २४ |
| २ | राष्ट्रवादी | — | ०० | ०५ | ११ | ०४ |
| ३ | भाजपा | १३ | २२ | ०२१ | २० | १९ |
| ४ | शिवसेना | ०९ | ११ | ०८ | १० | ०८ |
| ५ | इतर | १२ | ०३ | ०४ | ०२ | ०१ |
| ६ | अपक्ष | ०७ | १३ | ०२ | ०३ | ०६ |
| ७ | एकूण | ६६ | ६६ | ६६ | ६५ | ६२ |
| | आधार : निवडणूक आयोग अहवाल — १९९० ते २००९ | | | | | |

## पश्चिम महाराष्ट्रातील राजकारण

पश्चिम महाराष्ट्रात प्रामुख्याने पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर आणि अहमदनगर या जिल्ह्याचा समावेश करण्यात येतो. या विभागावर पारंपारिकरित्या काँग्रेसचे वर्चस्व राहत आलेले होते. मात्र १९९९ साली काँग्रेसच्या फुटीतून राष्ट्रवादीच्या स्थापनेनंतर काँग्रेस आणि राष्ट्रवादी या दोन पक्षांच्या स्पर्धेच्या स्वरूपात राजकारण पुढे आले. तरी सेना—भाजपाला या विभागात शिरकाव करता आला नव्हता. मात्र गेल्या दोन विधानसभा निवडणुकीपासून या विभागातील दुष्काळी मतदारसंघाच्या रूपाने

सेना—भाजपाने शिरकाव केलेला आहे. २००९ च्या निवडणुकीत तर सातारा जिल्हा आणि सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भाग वगळता सर्वच परिसरात चांगल्या लढती देत तब्बल २४ जागा जिंकण्याची किमया भाजपाने केली आहे. तर शिवसेनेने १३ जागा जिंकल्या आहेत. कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी या पक्षांचे संस्थात्मक संघटन असणारे मतदारसंघ वगळता इतर मतदारसंघ हे भाजपा सेना या पक्षाकडे सरकलेले आहेत. विशेत: ग्रामीण भागातील कोरडवाहू आणि बागायती अशा दोन्ही परिसरात ही भाजप—सेना या पक्षांचा शिरकाव झालेला आहे. पुणे शहरात तर भाजपाने मुसंडी मारलेली आहे. (पहा. तक्ता. क्र. ३.६)

पश्चिम महाराष्ट्र या विभागात सिंचनांची कामे आणि सहकारी साखर कारखाने हे सुरळीत आणि व्यवस्थित ज्या मतदारसंघात चालवण्यात आलेले होते, त्या मतदारसंघात सेना भाजपाला कोणत्याही प्रकारे मुद्दे हातात घेता आले नाही किंवा उतरता आले नाही. तसेच या विभागात भाजपा आणि शिवसेनेकडून कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी या प्रस्थापित पक्षांत तोडफोड केली गेली. त्यास काही मोजक्याच मतदारसंघात यश मिळवता आले. मात्र संस्थात्मक संघटनांचा आधार असणाऱ्या मतदारसंघात काहीच करता आले नाही.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पश्चिम महाराष्ट्रात पक्षांतर हे मोठ्या प्रमाणावर झाले होते. त्यात राष्ट्रवादीकडून भाजपात येण्याचे प्रमाण जास्त होते. उदा. सांगली आणि अहमदनगर जिल्ह्यात प्रमाण जास्त प्रमाणावर होते. कोल्हापूर जिल्ह्यात शिवसेनेत जाण्याचे प्रमाण जास्त होते. मात्र काही मोजक्याच मतदारसंघात पक्षांतर करणाऱ्या उमेदवारांना यशस्वी होता आले. ग्रामीण भागात मोदी लाटेचा काही परिणाम दिसून आलेला नाही. पण शहरी भागात प्रभाव दिसून आला. परिणामी शहरी भागातील जागा ह्या भाजपाकडे सरकण्याचे प्रमाण जास्त आहे.

या विभागात जरी मराठा समाजाची संख्या जास्त असली तरी माळी, धनगर, लिंगायत, जैन, लोणारी, गुरव, पद्मसाळी, वाणी, वंजारी, मुस्लिम आणि दलित जातीं

प्रभावी आहेत. या जाती लोकसंख्या आणि जातींय अस्मितेच्या आधारावर कार्यरत आहेत. तसेच सामाजिक संघटनांच्या आधारे प्रभाव निर्माण करून आहेत. या विभागावर प्रामुख्याने मराठा समाजाचे राजकारणावर वर्चस्व आहे. मात्र सोलापूर आणि कोल्हापूर या जिल्ह्यातील काही मतदारसंघात लिंगायत समाजाचे प्रमाण जास्त असल्याने काही आमदार निवडून येत आहेत. ओबीसीतील धनगर आणि माळी समाजाचे प्रमाण देखील काही मतदारसंघात जास्त प्रमाणात आहे. त्यात धनगर समाजाच्या लोकसंख्यामुळे काही मतदारसंघ हे पॉकेटस् आहेत. त्या आधारावर मराठा समाजाला शह देत आहेत. माळी समाज हा पुणे जिल्ह्यात शह देत आहे. लिंगायत समाज हा कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्यात मराठा समाजाला शह देत आहे.

हा विभाग इतर विभागाच्या तुलनेत ऊस लागवड आणि बागायती असण्याचे प्रमाण जास्त असलेला आहे. त्यामुळे साखर कारखानदारी ही सहकारी आणि खाजगी अशा दोन्ही माध्यमातून पुढे आली आहे. शहरी परिसरात औद्योगिकीकरणाचे आणि ग्रामीण भागात सहकार क्षेत्राचे जाळे निर्माण झालेले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील राजकारण सहकार आणि जातींच्या आधारे होते. तर शहरी भागातील राजकारण हे शहरातील पायाभूत सुविधांचा विकास आणि राजकीय नेतृत्व, जात या अंगाने होते. ग्रामीण भागातील सहकार क्षेत्र मोडकळीस आलेले आहे. त्यात सहकारी साखर कारखाने हे कर्जबाजारी होण्याने बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. काही बोटावर मोजण्याऐवढेच साखर कारखाने अगदी व्यवस्थित आणि सुरळीत चालत आहेत. मात्र खाजगी साखर कारखानदारी ही जोरात पुढे येत आहे. ग्रामीण भागात या साखर कारखान्यांतील कर्जबाजारी आणि भ्रष्टाचार हे मुद्दे चांगलेच प्रचारात आले होते. शुगर लॉबी विरोधात आंदोलनाची भूमिका घेणारा स्वाभिमानी पक्ष महायुतीत आल्याने भाजपाचा ह्या विभागात फायदा झालेला दिसतो.

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीत या विभागात सहकार क्षेत्रात होणारा भ्रष्टाचार, दुष्काळी भाग, सिंचन क्षेत्राची वाढ, राजकीय नेतृत्व, सिंचन घोटाळा,

दुष्काळाच्या काळातील भ्रष्टाचार, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधाचा विकास (वीज, रस्ते, पाणी) या घटकांना मध्यवर्ती घेत राजकारण घडून आले. तर शहरी भागात औद्योगिक विकास, शहरातील बेरोजगारांचे प्रश्न, पायाभूत सुविधाचा प्रश्न, झोपडपट्टीतील समस्या, राजकीय पक्ष संघटन करण्याचे कौशल्य आणि जातीय आधारावर निर्माण करण्यात आलेली समीकरणे या घटकांना मध्यवर्ती आणण्यात आले होते.

**तक्ता क्र. ३.६**

**पश्चिम महाराष्ट्र : १९९० ते २००९ पक्षनिहाय जागांची स्थिती**

| अ.क्र | राजकीय पक्ष | १९९० | १९९५ | १९९९ | २००४ | २००९ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | ५४ | ३७ | १८ | १७ | १४ |
| २ | राष्ट्रवादी | — | — | ३६ | २६ | २४ |
| ३ | भाजपा | ०२ | ०६ | ०५ | ०८ | ११ |
| ४ | शिवसेना | ०४ | ०९ | ०९ | १० | ०९ |
| ५ | इतर | १० | ०५ | ०३ | १५ | ०४ |
| ६ | अपक्ष | ०५ | १८ | ०४ | ०९ | ०८ |
| ७ | एकूण | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७० |
| | आधार : निवडणूक आयोग अहवाल — १९९० ते २००९ | | | | | |

## १९९० नंतर महाराष्ट्र पातळीवरील राजकीय पक्षांची विधिमंडळातील जागा मिळण्याची स्थिती

१९९० च्या निवडणुकीत कॉंग्रेस या पक्षाचे पुर्णपणे वर्चस्व होते. मात्र भाजपा आणि शिवसेना हे दोन पक्ष कॉंग्रेस या पक्षाला स्पर्धक आणि विरोधक म्हणून पुढे येत होते. जनता दल आणि शेकाप या दोन पक्षाला चांगल्या जागा मिळाल्या नव्हत्या. जनता पक्ष काही विभागात पॅकेट्सच्या स्वरूपात होता. त्यात विदर्भ आणि पक्ष महाराष्ट्रात चांगल्याप्रकारे होता. मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर ताकद होती असे नव्हते. शेकाप हा कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा या तीन विभागातील काही मतदारसंघात अस्तित्व असताना दिसून येते. माकप हा पक्ष मुंबई वगळता सर्व विभागात एक एक जागा राखून अस्तित्व ठेवून होता.

**तक्ता क्र. ३.७**

**१९९० च्या विधानसभा निवडणुकीतील विभागनिहाय पक्षीय स्थिती**

| अ.क्र | विभाग | कॉंग्रेस | जद | भाजपा | शेकाप | शिवसेना | माकप | इतर | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोकण | ९ | २ | ५ | ३ | ११ | १ | — | — |
| २ | मुंबई | ९ | — | ९ | — | १५ | — | १ | — |
| ३ | उ.म | २१ | ३ | ८ | — | २ | १ | १ | — |
| ४ | विदर्भ | २५ | १० | १३ | — | ९ | १ | १ | ७ |
| ५ | मराठवाडा | २३ | २ | ५ | ३ | ११ | १ | — | १ |
| ६ | प.म | ५४ | ७ | २ | २ | ४ | १ | — | ५ |
| ७ | एकुण | १४१ | २४ | ४२ | ०८ | ५२ | ०५ | ०३ | १३ |
| | आधार : निवडणूक आयोग अहवाल — १९९० | | | | | | | | |

१९९५ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्ष सर्वात मोठा पक्ष म्हणून निवडून आला होता. पण सत्तेतून खाली जावे लागले होते. सेना–भाजपाच्या युतीला जास्त जागा मिळाल्या होत्या. काँग्रेस पक्षाला सर्वाधिक ८० जागा मिळाल्या होत्या. त्यानंतर शिवसेनेला ७३ जागा मिळाल्या होत्या. तर भाजपाला ६५ जागा मिळाल्या होत्या. सेना–भाजपाला एकत्रित १३५ जागा मिळाल्या होत्या. काही अपक्ष आमदारांची साथ घेत सेना–भाजपा सत्तेत आला होता. जनता दल आणि शेकाप या दोन पक्षांची पुन्हा पिछेहाट झालेली दिसून येते. भाजपा विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि मुंबई या परिसरात चांगल्यापैकी पाया रोवून पुढे आलेला दिसून आले. शिवसेना ही मुंबई, कोकण, विदर्भ आणि मराठवाडा या परिसरात पुढे आली होती. काँग्रेस या पक्षांची पश्चिम महाराष्ट्र या विभागात हानी झाली नाही. नाहीतर इतर सर्व विभागात जागा कमी झाल्या होत्या. कोकण आणि मुंबई या दोन विभागात मोठी हानी काँग्रेस पक्षाची झाल्याचे दिसून येते. छोट्या पक्षातील माकप या पक्षाची हानी होत केवळ तीन जागावर समाधान मानावे लागले. एकंदर या निवडणुकीत काँग्रेसच्या विरोधात कल प. महाराष्ट्र वगळता इतर विभागातून आलेला दिसून येतो.

**तक्ता क्र. ३.८**

## १९९५ च्या विधानसभा निवडणुकीतील विभागनिहाय पक्षीय स्थिती

| अ.क्र | विभाग | काँग्रेस | जद | भाजपा | शेकाप | शिवसेना | माकप | इतर | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोकण | ०३ | ०० | ०६ | ०३ | १५ | ०१ | ०१ | ०२ |
| २ | मुंबई | ०१ | ०१ | १२ | ०० | १८ | ०० | ०२ | ०० |
| ३ | उ.म | १० | ०३ | १० | ०० | ०५ | ०० | ०१ | ०७ |
| ४ | विदर्भ | १७ | ०२ | २२ | ०० | ११ | ०० | ०१ | १३ |
| ५ | मराठवाडा | १२ | ०२ | ०९ | ०२ | १५ | ०१ | ०० | ०५ |
| ६ | प.म | ३७ | ०३ | ०६ | ०१ | ०९ | ०१ | ०० | १८ |
| ७ | एकुण | ८० | ११ | ६५ | ०६ | ७३ | ०३ | ०५ | ४५ |
| | आधार : निवडणूक आयोग अहवाल – १९९५ | | | | | | | | |

१९९९ च्या निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेस पक्षात फूट पडलेली होती. त्यामुळे शिवसेना –भाजपा, काँग्रेस आणि राष्ट्रवादी या तीन पक्षांत तिहेरी स्वरूपाची स्पर्धा असल्याचे दिसून आले. काँग्रेस या पक्षांच्या फूटीतून राष्ट्रवादी पक्षांची निर्मिती झाली होती. त्यामुळे या निवडणुकीत सेना –भाजपा सहज निवडून येईल असे सेना–भाजप या पक्षांच्या नेतृत्वाला वाटत होते. पण तसे न होता कोणत्याही पक्षाला बहुमताच्या जवळ जाता आले नाही. सेना–भाजपाला एकत्रितरित्या १२५ जागा मिळाल्या होत्या. २३ आमदार अपक्ष आणि इतर पक्षांचे निवडून आले होते. या निवडणुकीत काँग्रेस पक्ष ७५ जागा निवडून येत सर्वात मोठा पक्ष ठरला होता. शिवसेनेला त्या पाठोपाठ जागा मिळाल्या होत्या. राष्ट्रवादीला ५८ जागा मिळाल्या होत्या. या काँग्रेस आणि राष्ट्रवादीने एकत्रित येत सत्ता स्थापन केली. सेना–भाजपाला सत्तेपासून खाली यावे लागले. या निवडणुकीत इतर पक्षामध्ये शेकाप आणि भाकप या पक्षांची ताकद पुन्हा मर्यादित झालेली दिसून येते.

**तक्ता क्र. ३.९**

## १९९९ च्या विधानसभा निवडणुकीतील विभागनिहाय पक्षीय स्थिती

| अ.क्र | विभाग | काँग्रेस | राष्ट्रवादी | भाजपा | शिवसेना | शेकाप | माकप | इतर/अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोकण | ०१ | ०४ | ०५ | १५ | ०३ | ०१ | ०२ |
| २ | मुंबई | १२ | ०१ | ०८ | ११ | ०० | ०० | ०२ |
| ३ | उ.म | ०८ | ०७ | ०७ | १० | ०० | ०१ | ०३ |
| ४ | विदर्भ | २६ | ०५ | २१ | ०८ | ०० | ०० | ०६ |
| ५ | मराठवाडा | ११ | ०५ | १० | १६ | ०० | ०० | ०५ |
| ६ | प.म | १७ | ३६ | ०५ | ०९ | ०२ | ०० | ०५ |
| ७ | एकुण | ७५ | ५८ | ५६ | ६९ | ५ | २ | २३ |
| | आधार : निवडणूक आयोग अहवाल – १९९९ | | | | | | | |

२००४ च्या विधानसभा निवडणुकीत दोन मोठ्या आघाड्या निर्माण झाल्या होत्या. एक काँग्रेस–राष्ट्रवादी आणि रिपाईचे आठवले गट अशी होती. तर दुसरी सेना–भाजपाची होती. या शिवाय अनेक पक्ष निवडणुकीच्या राजकारणात उतरलेले होते. इतर राजकीय पक्षाला ताकद दाखवता आली नाही. २००४ च्या विधिमंडळाच्या निवडणुकीत सेना–भाजपा निवडणूक जिंकेल असे काही वातावरण निर्माण झालेले होते. पण काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे स्थानिक पातळीवरील संघटन बांधणी आणि पक्ष उमेदवारी यांच्या आधारे सत्ता राखण्यास कायम राहिली होती. राष्ट्रवादी–काँग्रेस या दोन्ही पक्षामध्ये राष्ट्रवादीने जास्त जागा मिळवल्या होत्या. तरीही काँग्रेसला मुख्यमंत्री पद सोडत राज्यात दुय्यम भूमिका घेतली होती. शिवसेनेला भाजपापेक्षा जास्त जागा मिळाल्या होत्या. शेकाप, माकप आणि इतर काही छोटे पक्ष यांना त्यांची ताकद दाखवता आली नाही. पण या निवडणुकीने पुन्हा महाराष्ट्रात काँग्रेस–राष्ट्रवादीने मजबूत पाय रोवले.

२००४ च्या विधानसभा निवडणुकीत असे दिसून येते की, काँग्रेस आणि राष्ट्रवादी या पक्षाला समसमान जागा मिळाल्या होत्या. प्रत्यक्षात निवडणुकीत काँग्रेसला ६९ जागा मिळाल्या होत्या पण पोटनिवडणुकीत २ जागा मिळाल्या होत्या. त्यामुळे समसमान झाल्या होत्या. या दोन्ही पक्षानी आघाडी करून निवडणुकीला सामोरे गेले होते. या आघाडीला बहुमत मिळाले होते. पण विभागनिहाय पक्षीय पातळीवर वेगळेपण दिसून येते. कारण आघाडी आणि युती यांच्यातील एक एक पक्ष प्रत्येक विभागात प्रभावी राहिला होता. उदा. विदर्भात काँग्रेस आणि भाजपा यांच्यात स्पर्धा दिसून येते. कोकणात शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन पक्षात स्पर्धा होती. मुंबईत शिवसेना आणि काँग्रेस या पक्षात स्पर्धा दिसून येते. पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेस आणि राष्ट्रवादी या पक्षांच्या प्रभाव दिसून येतो. पण भाजपाने लक्षणीय जागा मिळवलेल्या दिसून येतात. मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात मिश्र स्वरूपातील जागा जिंकण्याचे प्रमाण असताना दिसून येते. शेकाप आणि माकप हे पक्ष पॉकेटस् असल्याचे दिसून येते. पण पक्षीय जागा जिकंण्याचे सातत्य असताना दिसून येते.

**तक्ता क्र. ३.१०**

**२००४ च्या विधानसभा निवडणुकीतील विभागनिहाय पक्षीय स्थिती**

| अ.क्र | विभाग | काँग्रेस | राष्ट्रवादी | भाजपा | शिवसेना | शेकाप | माकप | इतर | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोकण | ०२ | ०९ | ०४ | १२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| २ | मुंबई | १५ | ०४ | ०५ | १० | ०० | ०० | ०० | ०० |
| ३ | उ.म | ०९ | १० | ०६ | ०७ | ०० | ०१ | ०० | ०३ |
| ४ | विदर्भ | १९ | १२ | २० | ०९ | ०० | ०० | ०३ | ०३ |
| ५ | मराठवाडा | ०७ | ११ | ११ | १४ | ०० | ०० | ०० | ०३ |
| ६ | प.म | १९ | २५ | ०८ | ०९ | ०१ | ०१ | ०३ | ०९ |
| ७ | एकुण | ७१ | ७१ | ५४ | ६१ | ०२ | ०३ | ०७ | १९ |
| | आधार : निवडणूक आयोग अहवाल – २००४ | | | | | | | | |

२००९ ची निवडणूक ही नवीन मतदारसंघ पुर्नरचनेनुसार झालेली होती. त्यामुळे या निवडणुकीत कोण निवडून येईल आणि कोण पराभूत होईल याविषयी कोणत्याही नेतृत्वाला सांगता येणे शक्य नव्हते. तरीही सर्व पातळ्याचा विचार करता काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेस आणि सेना– भाजपा या पक्षामध्ये आघाड्या झाल्या होत्या. रिपाई आणि डावे सर्व एकत्र येत रिडारोस चा प्रयोग केला होता. रिडारोस काँग्रेस या आघाडीचे मते घेईल आणि सेना–भाजपा पराभूत होईल असे काही अंदाज राजकीय नेतृत्वाकडून करण्यात येत होते. पण शिवसेनेत फुट पडून नारायण राणे यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. तो त्यांना फायदेशीर ठरलेला होता. दुसरे शिवसेनेत राज ठाकरे यांनी शिवसेनेला रामराम करत महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा नवीन पक्ष काढला होता. या दोन्ही शिवसेना नेतृत्वाने पक्ष सोडणे शिवसेनेला फारच महागात पडले. या निवडणुकीत काँग्रेस पक्ष हा सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला. काँग्रेस आघाडीला सर्वात जास्त जागा मिळाल्या होत्या. शिवसेना ही गेल्या निवडणुकीत विरोधी पक्ष होता. पण या निवडणुकीत भाजपाने कमी जागा लढवून देखील शिवसेनेपेक्षा जास्त जागा जिंकल्या होत्या. रिडारोस या आघाडीला आपली ताकद दाखवता आली नाही. मनसे

पथम निवडणुकीत उतरलेला होता. १३ जागा मनसेला मिळाल्या. ३० आमदार हे इतर पक्ष आणि अपक्ष असे निवडून आले होते. २००९ च्या निवडणुकीच्या निकालाचा आढावा घेताना असे दिसून येते की, काँग्रेस आणि राष्ट्रवादी या दोन पक्षीय आघाडीला बहुमत मिळाले होते. शिवसेनेपेक्षा भाजपाने युतीमध्ये जागा कमी लढवलेल्या असताना जास्त जागा जिंकल्या होत्या. २००४ च्या निवडणुकीप्रमाणे या निवडणुकीत देखील पक्षीय स्पर्धा विभागनिहाय राहिलेली दिसून येते. दुसरे असे की, या निवडणुकीत रिपाई आणि इतर डाव्या आघाडीचे पक्षांनी एकत्र येत रिडारोसचा प्रयोग केला होता. पण या रिडारोसच्या आघाडीला पुर्णपणे अपयश आले होते.

**तक्ता क्र. ३.११**

**२००९ च्या विधानसभा निवडणुकीतील विभागनिहाय पक्षीय स्थिती**

| अ.क्र | विभाग | काँग्रेस | राष्ट्रवादी | भाजपा | शिवसेना | मनसे | रिडारोस | इतर/अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोकण | ०३ | १० | ०५ | ०९ | ०२ | ०६ | ०४ |
| २ | मुंबई | १७ | ०३ | ०५ | ०४ | ०६ | ०१ | ०० |
| ३ | उ.म | ०६ | ०९ | ०४ | ०७ | ०३ | ०१ | ०५ |
| ४ | विदर्भ | २४ | ०४ | १९ | ०८ | ०० | ०० | ०७ |
| ५ | मराठवाडा | १८ | १२ | ०२ | ०७ | ०१ | ०१ | ०५ |
| ६ | प.म | १४ | २४ | ११ | ०९ | ०१ | ०२ | ०९ |
| ७ | एकुण | ८२ | ६२ | ४६ | ४४ | १३ | ११ | ३० |
| | आधार : निवडणूक आयोग अहवाल – २००९ | | | | | | | |

**साराशंरूपाने** असे दिसून येते की, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतून महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात १९६२ साली केवळ काँग्रेस या पक्षाचे वर्चस्व होते. तर इतर पक्षांमध्ये शेतकरी कामगार पक्ष, हिंदू महासभा, जनसंघ, भारतीय रिपब्लिकन पक्ष यांचे अस्तित्व होते. परंतु या पक्षांचा काँग्रेस पक्षांच्या तुलनेत जास्त प्रभाव दिसून येत नाही. हीच स्थिती १९८० पर्यंत होती. मात्र १९६५ साली स्थापन झालेल्या शिवसेना राजकारणात उतरल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणाची स्थिती बदलत असताना दिसून येते. १९९० पर्यंत काँग्रेस पक्ष विविध समाज घटकांना हाताशी धरून वर्चस्व टिकवून होता. मात्र सेना—भाजप स्पर्धेत येत राहिल्याने काँग्रेस या पक्षाची समाजावरील पकड काहीसी सैल झालेली दिसून येते. महाराष्ट्राच्या राजकारणाचा १९९० नंतरचा विचार करता असे दिसून येते की, प्रत्येक विभागात काँग्रेसला स्पर्धा करणारा विरोधी पक्षातून एक पक्ष पुढे आलेला दिसून येतो. १९९९ नंतर काँग्रेस विभाजनातून चार पक्ष प्रबळ झालेले दिसून येतात. पश्चिम महाराष्ट्र विभागात काँग्रेस राष्ट्रवादी या दोन पक्षांत स्पर्धा होत होती. मात्र आता भाजपा—सेना कोरडवाहू परिसरात शिरलेला आहे. कोकण विभागात काँग्रेस आणि शिवसेना नेतृत्वामध्ये स्पर्धा राहते. उत्तर महाराष्ट्रात शिवसेना—भाजप विरोधी राष्ट्रवादी या पक्षाच्या नेतृत्वाची स्पर्धा राहते. मराठवाडा विभागात जिल्हानिहाय स्पर्धा असताना दिसून येते. मात्र काँग्रेस आणि राष्ट्रवादी नेतृत्वाची बीड जिल्ह्याचा अपवाद वगळता स्पर्धा असताना दिसून येते. विदर्भात काँग्रेस आणि भाजपा नेतृत्वाची स्पर्धा राहत आलेली आहे. मुंबईत शिवसेना आणि काँग्रेस या पक्षांच्या नेतृत्वाची स्पर्धा राहिलेली आहे. त्यामुळे राज्य पातळीवर जरी पक्षीय पातळीवरील नेतृत्व स्पर्धा असलेली दिसून येत असली तरी नेतृत्वामध्ये पाठिंबा आणि आर्थिक विकास याचा सहसंबंध राज्य पातळीवरील नेतृत्वाने घातला असल्याने राज्य पातळीवरील नेतृत्व करण्याची संधी मिळालेली आहे.

# प्रकरण —४

# अहमदनगर जिल्हा — राजकारणाच्या विकासाचे टप्पे

## जिल्ह्यातील सत्तेवर पक्ष व नेतृत्व विकासातील टप्पे :

अहमदनगर जिल्ह्यातील जातीचा विचार करता जिल्ह्याच्या सामाजिक आणि राजकीय प्रक्रियावर मुख्यत: सामाजिकदृष्ट्या मराठा आणि आर्थिकदृष्ट्या व्यापारी समुदाय यांचाच प्रभाव दिसून येतो. त्या खालोखाल माळी, धनगर आणि वंजारी समाज प्रभावी आहे. विशिष्ट तालुक्यात काही बिगर मराठा जमातींचे प्राबल्य राजकीय व सामाजिक व्यवहारातून दिसून येते. उदा. पाथर्डी तालुक्यात वंजारी समाज असल्याने त्यांचे प्राबल्य आहे. दुर्गम अकोले तालुक्यातील महादेव कोळी या आदिवासी जमातीचा वरचष्मा आहे. अहमदनगर शहरावर जैन—मारवाडी, माहेश्वरी—माळी यांचा मराठा—मुस्लिमांच्या बरोबरीने प्रभाव आहे. नगरचे आमदार अनिल राठोड राजस्थानी व्यापारी समाजाचे तर माजी नगराध्यक्ष अजित आगरकर माळी आहेत. श्रीरामपूर—श्रीगोंदा, नेवासा भागात मराठा समाजाला माळी समाज राजकारणात टक्कर देतो.

अहमदनगरच्या जिल्ह्याच्या राजकारणाचे विकासाचे टप्पे तपासत असताना असे दिसून येते की, १६६२ साली जिल्ह्याचे राजकारण हे पुर्णपणे कॉंग्रेस या पक्षांच्या बाजूने झुकलेले होते. पूर्ण जिल्हा हा कॉंग्रेस या पक्षांच्या बाजूने होता. पण पाथर्डी या मतदारसंघात आरपीआय या डाव्या पक्षाची ताकद असल्याचे निवडणुकीतून पुढे आले होते. इतर पक्षाला संधी मिळाल्याचे दिसून येत नाही. (पहा तक्ता क्र. ४.१) १९६० च्या नंतर अहमदनगर जिल्ह्यात डाव्या चळवळी आणि समाजवादी या पक्षाचे नेतृत्व विविध माध्यमातून कार्यरत होते. मात्र त्यांनी निर्माण केलेले संघटन हे मताच्या राजकारणात

उतरवता आले नाही. ही या परिवर्तनवादी राजकारणाची उणीव होती. दुसरे असे की, या काळात डावे आणि परिवर्तनावादी नेतृत्व राजकारणापेक्षा समाजकारण आणि संघटनावादी राजकारणात जास्त प्रमाणात उतरलेले होते. राजकारणापेक्षा संघटनात्मक दबावाच्या राजकारणातून विकास कामे आणि सामाजिक प्रश्न आणि समस्या सोडवण्याच्या पातळीवर डावे आणि समाजवादी अडकलेले होते.

**तक्ता क्र.४.१**

**१९६२ च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल**

| अ.क्र | राजकीय पक्ष | मिळालेल्या जागा |
|---|---|---|
| १ | काँग्रेस | १० |
| २ | सीपीआय | ०१ |
| ३ | अपक्ष | ०१ |
| ४ | एकूण | १२ |

आधार : निवडणूक आयोग अहवाल १९६२

या पक्षाची ताकद ही येथील वंजारी समाजाच्या नेतृत्वाकडे होती. या परिसरात दुष्काळी परिसर आणि मजूरांच्या माध्यमातून ही ताकद सीपीआयचे नेते नारायण आव्हाड यांनी निर्माण केलेली होती. दुसरे असे की, मराठा समाजाचे वर्चस्व होते. १६६२च्या निवडणुकीत दोन जागा श्रीरामपूर आणि श्रीगोंदा हे मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव होते. श्रीगोंदा या मतदारसंघातून चर्मकार आणि श्रीरामपूर या मतदारसंघातून नवबौध्द् समाजाचे उमेदवार निवडून आले होते. खुल्या मतदारसंघाचा विचार करता असे दिसून येते की, एकमेव पाथर्डी मतदारसंघातून वंजारी समाजाचे उमेदवार निवडून आला होता. नाहीतर सर्व जागेवर मराठा समाजाचे उमेदवार निवडून आले होते. (पहा तक्ता क्र. ४.२) या निवडणुकीकडे सारांशरूपाने पाहिले असता काँग्रेस आणि मराठा समाजाचे वर्चस्व असल्याचे सहज दिसून येते.

**तक्ता क्र. ४.२**

**१९६२ च्या विधानसभा निवडणुकीत निवडून आलेले पक्षनिहाय नेतृत्व**

| अ.क्र | मतदारसंघ | विजयी नेतृत्व | पक्ष | स्पर्धक नेतृत्व | पक्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाथर्डी | आव्हाड नारायण | सीपीआय | गर्जे त्रिबंक | काँग्रेस |
| २ | शेवगाव | घुले मारूती | काँग्रेस | भागवत एकनाथ | अपक्ष |
| ३ | श्रीरामपूर | चतुरभूज बाबूराव | काँग्रेस | वाघचौरे वामन | रिपाई |
| ४ | शिर्डी | रोहमारे कारभारी | काँग्रेस | गाडे मोहन | अपक्ष |
| ५ | पारनेर | भगत दत्तात्र्यय | काँग्रेस | औटी भास्कर | सीपीआय |
| ६ | संगमनेर | खटाळ भिकाजी | काँग्रेस | देशमुख दत्ता | अपक्ष |
| ७ | नगर अकोले | भांगरे यशवंत | काँग्रेस | देशमुख बापूराव | सीपीआय |
| ८ | राहुरी | तनपुरे बाबूराव | काँग्रेस | कडू पिंजाजी | सीपीआय |
| ९ | कर्जत | निबांळकर एकनाथ | काँग्रेस | भापकर हिराबाई | अपक्ष |
| १० | श्रीगोंदा | भारस्कर बाबूराव | काँग्रेस | रोहन प्रभाकर | रिपाई |
| ११ | अहमदनगर(द) | नागवडे बाळासाहेब | अपक्ष | नवशेरण रोजिठ्ठा | अपक्ष |
| १२ | अहमदनगर(उ) | भराडे त्रिंबक | काँग्रेस | कुठे विठ्ठल | काँग्रेस |

आधार : निवडणूक आयोग अहवाल १९६२

## १९६७ च्या निवडणुकीतील अहमदनगर जिल्हा

१९६७च्या निवडणुकीत १२ विधानसभेच्या जागेपैकी १० जागा काँग्रेस या पक्षाला मिळाल्या होत्या. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाने पुर्णपणे अहमदनगर जिल्ह्यावर वर्चस्व मिळवले होते. काँग्रेस पक्षाला या निवडणुकीत ज्या प्रकारे स्वतंत्र्य लढ्याची पार्श्वभूमी होती. त्याच प्रमाणे अनेक मतदारसंघात सहकारी साखर कारखाने नेतृत्वाच्या पुढाकाराने पुढे आले होते. त्यामुळे अनेक मतदारसंघात काँग्रेस पक्ष हा तळागाळापर्यंत पोहचलेला होता. त्याचाच प्रत्यय या निवडणुकीत आला होता. दुसरी

बाब अशी या निवडणुकीतून लोकांना लोकशाही राजकारणाची आणि निवडणुकांची सवय होत होती. (पहा तक्ता क्र. ४.३)

**तक्ता क्र.४.३**

**१९६७ च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल**

| अ.क्र | राजकीय पक्ष | मिळालेल्या जागा |
|---|---|---|
| १ | काँग्रेस | १० |
| २ | सीपीआय | ०१ |
| ३ | अपक्ष | ०१ |
| ४ | एकूण | १२ |

आधार : निवडणूक आयोग अहवाल १९६७

अहमदनगर जिल्हा राजकारणात पातळ्यावर काँग्रेस या पक्षाचे वर्चस्व असल्याचे पुढे आले. मात्र एका जागेवर (नगर अकोले) डाव्या विचारांच्या कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया या पक्षाचा उमेदवार निवडून आला तर दुसऱ्या एका जागेवर अपक्ष (शिर्डी) उमेदवार निवडून आला. हे दोन उमेदवार निवडून येण्यास स्थानिक पातळीवर वैशिष्ट्येपुर्ण असे काही कारणे पुढे आली होती. नगर–अकोले मतदारसंघात दत्ता देसाई आणि इतर डाव्या विचारांच्या संघटनांनी स्थानिक प्रश्न हे व्यवस्थितरित्या हाताळता पक्षांची संघटन ताकद वाढवलेली होती. त्यात बी. के. देशमुख या नेतृत्वाला पक्षाकडून उमेदवारी मिळाली. परिणामी काँग्रेसच्या बी. वाय भांगरे यांना त्यांच्याशी व्यवस्थितरित्या स्पर्धा करता आली नाही. तर शिर्डी या मतदारसंघातून गाडे आणि काळे या दोन घराण्यात स्पर्धा झाली. त्यात गाडे यांनी अपक्ष उमेदवारी करत निवडणुकीत विजय मिळवला. काळे यांच्यामागे काँग्रेसची पक्षीय संघटनात्मक ताकद असताना देखील विजय मिळवून देण्यास अपयशी ठरल्याचे दिसून येते. दुसरे असे की, १९६७ च्या विधानसभा निवडणुकीत अहमदनगर जिल्ह्यात काँग्रेसला स्पर्धत पाहिले असता ५ जागेवर मुख्य स्पर्धक हा कम्युनिस्ट पक्ष असल्याचे दिसून येते. यावरून अहमदनगर जिल्ह्यात कम्युनिस्ट पक्षांची मोठी ताकद असल्याचे पुढे येते. ज्या प्रमाणे काँग्रेस पक्षाला

अहमदनगर जिल्ह्यात चांगले नेतृत्व लाभले होते. त्याच प्रमाणे कम्युनिस्ट पक्षाला देखील नेतृत्व लाभले असल्याचे दिसून येते. त्यात नागवडे, काकडे, लंघे, देशमुख असे अनेक नेतृत्व लाभले होते. याशिवाय सीपीआय, प्रजा समाजवादी पक्ष, बीजेएस हे पक्ष देखील एक एक मतदारसंघात स्पर्धेत राहिल्याचे दिसून येते. एक प्रकारे काँग्रेसचे सर्व पातळ्यावर वर्चस्व दिसत असले तरी इतर पक्षांचे अल्प प्रमाणात का होईना अस्तित्व असल्याचे दिसून येते. (पहा तक्ता क्र. ४.४)

**तक्ता क्र.४.४**

**१९६७ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत अहमदनगर जिल्ह्यातील मतदारसंघात निवडूण आलेले पक्षनिहाय नेतृत्व**

| अ.क्र | मतदारसंघ | विजयी नेतृत्व | पक्ष | स्पर्धक नेतृत्व | पक्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | कर्जत | निबांळकर इ. बी | काँग्रेस | झरकार आर. एम | बीजेएस |
| २ | श्रीगोंदा (अ.जा) | भारस्कर बी.एम | काँग्रेस | शिंदे ए. जी | रिपाई |
| ३ | अहमदनगर(द) | निशाळ एस व्ही. | काँग्रेस | भापकर पी. के | अपक्ष |
| ४ | अहमदनगर(उ) | म्हस्के के. बी | काँग्रेस | नागवडे बी. एन | सीपीआय |
| ५ | पाथर्डी | भराडे टी. एस | काँग्रेस | काकडे जे. के | सीपीआय |
| ६ | शेवगाव | घुले एम एस | काँग्रेस | लंघे व्ही. बी | सीपीआय |
| ७ | श्रीरामपूर | बनकर जे. व्ही. | काँग्रेस | ओगळे जी. जे | पीएसपी |
| ८ | शिर्डी | गाडे एम. ए | अपक्ष | काळे एस. डी | काँग्रेस |
| ९ | राहूरी | तनपुरे बी.बी | काँग्रेस | थोरात बी. जी | सीपीआय |
| १० | पारनेर | गुंजाळ एन. टी. | काँग्रेस | औटी एस. टी | सीपीआय |
| ११ | संगमनेर | खाटाळ बी. जे | काँग्रेस | दुरवे बी. जी | एसएसपी |
| १२ | नगर अकोले | देशमुख बी. के. | सीपीआय | भांगरे वाय. एस | काँग्रेस |

आधार : निवडणूक आयोग अहवाल १९६७

## १९७२ च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल

१९७२ची निवडणूक ही इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वामुळे पुर्णपणे काँग्रेसमय वातावरणात झाली होती. या निवडणुकीत इंदिरा गांधी यांची (काँग्रेसची) संपुर्ण देशात लाट होती. ती लाट अहमदनगर जिल्ह्यात देखील असल्याची पाहण्यास मिळते. मात्र १२ जागा पैकी ६ जागेवर काँग्रेस पक्षाला विजय मिळवता आला. इतर ठिकाणी अपक्ष आणि डाव्या पक्षांनी विजय मिळवला. महाराष्ट्र पातळीवर केंद्रीय पातळीवरील नेतृत्वाने राज्यातील प्रभावी नेतृत्वाला बाजूला सारत इतर दुय्यम नेतृत्वाला राजकारणात महत्त्वाचे स्थान देण्याचा प्रयत्न केला होता. त्यात अहमदनगर जिल्हा अपवाद राहिला होता असे दिसून येत नाही. कारण १९७२च्या निवडणुकीत अनेक प्रस्थापित राजकीय नेतृत्वाला उमेदवारीच्या पातळीवर नाकारले होते. परिणामी प्रस्थापित नेतृत्व बंडखोरी करत निवडणुकीत पुढे आलेले दिसून येते. त्यात ४ अपक्ष नेतृत्व निवडून आले होते. स्पर्धक उमेदवार तपासले असता असे दिसून येते की, ३ ठिकाणी अपक्ष उमेदवार होते. दोन विधानसभा मतदारसंघात कम्युनिस्ट पक्षाने विजय संपादन केला होता. राज्य पातळीवरील प्रभावी आणि लोकनेतृत्वाला बाजूला करत नवीन व पुरेषा लोक पाठिंबा नसलेल्या नेतृत्वाला राजकारणात संधी देणे जेणेकरून राज्य पातळीवरील नेतृत्व हे केंद्रीय नेतृत्वाच्या प्रभावाखाली राहील अशा प्रकारे धोरण राबवण्यात आले होते. परिणामी अनेक प्रभावी नेतृत्वाला उमेदवारी काँग्रेसकडून नाकारण्यात आली होती. परिणामी या नेतृत्वाकडून बंडखोरी केली गेली. यामुळे निवडणुकीत काँग्रेसचा प्रभाव जिल्ह्यात असताना देखील निम्म्याच जागेवर समाधानी मानावे लागलेले दिसून येते. (पहा तक्ता क्र. ४.५)

**तक्ता क्र.४.५**

**१९७२ च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल**

| **अ.क्र** | **राजकीय पक्ष** | **मिळालेल्या जागा** |
|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०६ |
| २ | सीपीआय | ०२ |
| ३ | अपक्ष | ०४ |
| ४ | एकूण | १२ |

आधार : निवडणूक आयोग अहवाल १९७२

१९७२च्या निवडणुकीत अनेक प्रस्थापिताना काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी नाकारण्यात आली होती. मात्र हे नेतृत्व अपक्ष उमेदवारी करत निवडून आले. त्यात श्रीगोंदा, अहमदनगर दक्षिण, पाथर्डी, शिर्डी या हक्काच्या मतदारसंघात काँग्रेस बंडखोर निवडून आले होते. एक प्रकारे लोकशाहीकरणाचे तत्वे या निवडणुकीत पुढे येत होते. कारण मतदारांनी ज्या नेतृत्वाला पक्षाकडून उमेदवारी नाकारण्यात येत होती त्यांनाच निवडून देण्याची भूमिका घेतल्याचे दिसून येते. इतर मतदारसंघातून प्रस्थापित काँग्रेस नेतृत्वच निवडून आलेले दिसून येते. (पहा तक्ता क्र. ४.६) १९७२ साली झालेल्या निवडणुकीत मुख्य स्पर्धा ही काँग्रेस आणि सीपीआय या दोन पक्षाच्या नेतृत्वामध्ये राहिलेली होती. काँग्रेस पक्षाकडून प्रस्थापित राजकीय नेतृत्व असण्याच्या प्रक्रियेस या निवडणुकीने पाठबळ दिले होते. दुसरे असे की, बंडखोर काँग्रेस पक्षाच्या नेतृत्व अपक्ष उमेदवारी करत निवडून आले. परिणामी काँग्रेस नेतृत्वाला असे दाखवून दिलेले दिसून येते की, मतदारसंघात किमान पातळीवर बदल करणे हे पक्षाला महाग आहे. तिसरे असे की, काँग्रेस पक्षाकडून पक्षाच्या नेतृत्वाला उमेदवारी दिली गेली नाही. तरीही नेतृत्वाने इतर पक्षात न जाता अपक्ष उमेदवारी केली. परिणामी त्यांची पक्षनिष्ठा ही पुढे आलेली दिसून येते. चौथे असे की, अपक्ष नेतृत्व हे विकास कामे आणि मतदारसंघातील अधिमान्यता या आधारावर पुढे आलेले दिसून येते.

**तक्ता क्र. ४.६**

**१९७२ विधानसभा निवडणुकीतील पक्षनिहाय निकालाची स्थिती**

| अ. क्र | मतदारसंघ | विजयी नेतृत्व | पक्ष | स्पर्धक नेतृत्व | पक्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | कर्जत | निबांळकर रावसाहेब | काँग्रेस | झराकर राजाराम | बीजेएस |
| २ | श्रीगोंदा | भारस्कर बाबुराव | अपक्ष | शिंदे प्रभाकर | काँग्रेस |
| ३ | अहमदनगर(द) | बार्शिकर नारायणदास | अपक्ष | रानडे कलाबाई | काँग्रेस |
| ४ | अहमदनगर(उ) | म्हस्के किसनराव | काँग्रेस | म्हस्के बन्सी | सीपीआय |
| ५ | पाथर्डी | म्हस्के गणपत | अपक्ष | गर्जे मानिकबाई | काँग्रेस |
| ६ | शेवगाव | लंघे वकिलराव | सीपीआय | गडाख यशवंतराव | काँग्रेस |
| ७ | श्रीरामपूर | आदिक गोंविदराव | काँग्रेस | गलांडे भास्करराव | अपक्ष |
| ८ | शिर्डी | कोल्हे शंकरराव | अपक्ष | रोहमारे कारभारी | काँग्रेस |
| ९ | राहुरी | कडु पुंजाजी | सीपीआय | वाघ रामनाथ | काँग्रेस |
| १० | पारनेर | काळे शंकरराव | काँग्रेस | भगत दत्तात्रय | अपक्ष |
| ११ | संगमनेर | खटाळ भिकाजीराव | काँग्रेस | गाडे मोहनराव | अपक्ष |
| १२ | अकोले | भांगरे यशवंतराव | काँग्रेस | देशमुख बापुराव | सीपीआय |

आधार : निवडणूक आयोग अहवाल १९७२

## १९७८ ची विधानसभा निवडणूक आणि अहमदनगर जिल्हा

१९७८ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीचे अनेक परिणाम हे महाराष्ट्राच्या राजकारणावर झालेले दिसून येतात. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले होते. तरी विरोधी पक्षाची ताकद देखील चांगल्या प्रकारे असल्याचे दिसून आले. देश पातळीवर इंदिरा गांधी यांच्याकडून लादण्यात आलेल्या आणीबाणीमुळे काँग्रेस पक्षाच्या विरोधात वातावरण असल्याचे चित्र पाहण्यास मिळत होते. परिणामी विरोधी पक्षाला त्याचा फायदा झालेला दिसून येतो. यास अहमदनगर जिल्हा देखील अपवाद

राहिलेला दिसून येत नाही. कारण या निवडणुकीत १९७२ पेक्षा संख्याबळ हे दोनने वाढलेले असले तरी विजयी होण्यासाठीचा मतांचा फरक कमी असल्याचे दिसून येते. १२ पैकी ४ जागेवर इतर पक्षांचे उमेदवार निवडून आले. त्यापैकी २ जागेवर जनता दल आणि १ जागेवर डाव्या पक्षांचे उमेदवार निवडून आले होते. १ जागेवर आरपीआयचे उमेदवार निवडून आले होते. मात्र या निवडणुकीत सामाजिक पातळीवर बदलाचे वारे होते. ते पुर्ण निवडणुकीत जिल्हाभर पसरलेले होते. (पहा तक्ता क्र. ४.७)

**तक्ता क्र. ४.७**

**१९७८ च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल**

| **अ. क्र** | **राजकीय पक्ष** | **मिळालेल्या जागा** |
|---|---|---|
| १ | कॉँग्रेस | ०८ |
| २ | सीपीआय | ०१ |
| ३ | आरपीआय | ०१ |
| ४ | जनता दल | ०२ |
| ५ | एकूण | १३ |

आधार : निवडणूक आयोग अहवाल १९६२

१९७८च्या निवडणुकीत पक्षीय पातळीवरील स्पर्धेचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, आरपीआय या पक्षाला जनता दल या पक्षाचे स्पर्धक होते. कर्जत मतदारसंघ राखीव असल्याने ही स्पर्धा होणे सहाजिक होते. दक्षिण अहमदनगर जिल्हा मतदारसंघात जनता दल आणि कॉँग्रेस या पक्षामध्ये स्पर्धा झालेली दिसून येते. यात जनता दलाचे उमेदवार ब्राम्हण असताना देखील विजयी झालेले होते. त्यांना मराठा समाजाच्या पाऊलबुध्दे यांनी कॉँग्रेसकडून स्पर्धा दिली होती. पण पुरोगामी आणि युक्रांत या संघटनेच्या माध्यमातून मांडलेले विचार प्रभावी होत शहरी भागातील या मतदारसंघातून कुमार सप्तर्षी यांना विजय मिळवता आला. पाथर्डी मतदारसंघात वंजारी या ओबीसीतील उमेदवारामध्ये स्पर्धा झाली. या स्पर्धेत जनता दलाचे बबनराव ढाकणे

यांनी विजय मिळवला. इतर मतदारसंघात मराठा समाजातंर्गत स्पर्धा राहिल्याचे दिसून येते. (पहा तक्ता क्र. ४.८)

**तक्ता क्र.४.८**

**१९७८ विधानसभा निवडणुकीतील पक्षनिहाय निकालाची स्थिती**

| अ.क्र | मतदारसंघ | विजयी नेतृत्व | पक्ष | स्पर्धक नेतृत्व | पक्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | कर्जत | कांबळे बाजीराव | रिपाई | भास्करराव बाबुराव | जनता दल |
| २ | श्रीगोंदा | नागवडे शिवाजीराव | काँग्रेस | गाडे मोहनराव | जनता दल |
| ३ | अ. दक्षिण | कुमार सप्तर्षी | जनता दल | पाऊलबुध्दे नाथ | काँग्रेस |
| ४ | अ. उत्तर | शेळके मारूती | अपक्ष | म्हस्के किसनराव | काँग्रेस |
| ५ | पाथर्डी | ढाकणे बबनराव | जनता दल | खेडकर यादवराव | काँग्रेस |
| ६ | शेवगाव | लंघे वकिलराव | सीपीआय | निबांळकर एकनाथ | काँग्रेस |
| ७ | श्रीरामपूर | आदिक गोंविदराव | काँग्रेस | टेकावडे जनार्दनराव | जनता दल |
| ८ | शिर्डी | घोंगरे चंद्रभान | काँग्रेस | म्हस्के अण्णासाहेब | जनता दल |
| ९ | कोपरगाव | कोल्हे शंकरराव | काँग्रेस | जाधव पंडितराव | जनता दल |
| १० | राहुरी | पवार काशीनाथ | काँग्रेस | कदम लक्ष्मण | जनता दल |
| ११ | पारनेर | काळे शंकरराव | काँग्रेस | ठुंबे प्रभाकर | सीपीआय |
| १२ | संगमनेर | थोरात भाऊसाहेब | काँग्रेस | खटाळ भिकाजी | जनता दल |
| १३ | अकोले | भांगरे यशवंतराव | काँग्रेस | देशमुख एकनाथ | जनता दल |

आधार : निवडणूक आयोग अहवाल १९६२

## १९८० ची विधानसभा निवडणूक आणि अहमदनगर जिल्हा

१९८०च्या निवडणुकीत वैशिष्ट्यपुर्ण घटना महाराष्ट्राच्या राजकारणात घडल्या होत्या. शरद पवार यांच्या बंडखोरीमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात प्रथम बिगर काँग्रेस पक्षाचे सरकार अस्तित्वात आले होते. मात्र बिगर काँग्रेस सरकारला संस्कृती ही काँग्रेस पक्षाची होती. त्याच वातावरणात विधानसभेच्या निवडणुका झाल्या होत्या. या निवडणुकीत इतर पक्षापेक्षा काँग्रेस अंतर्गत झालेल्या विभाजनामुळे जिल्हा राजकारणात देखील विभाजन झालेले पाहण्यास मिळाले. तरीही काँग्रेस पक्षाने १३ पैकी ९ जागावर विजय संपादन केला. तर शरद पवार यांच्या काँग्रेस या पक्षाला केवळ १ जागेवर समाधान मानावे लागले. तर डाव्या विचाराच्या सीपीआय या पक्षाला १ जागेवर विजयी होता आले. जरी मुख्य स्पर्धा ही इंदिरा (काँग्रेस) आणि शरद पवार यांची युनाटेट काँग्रेस या पक्षामध्ये असली तरी जनता दलाला २ जागा मिळाल्या होत्या. त्यात पाथर्डी मतदारसंघातून बबनराव ढाकणे तर श्रीगोंदा मतदारसंघातून (बबनराव पाचपुत) जनता दल या पक्षाकडून निवडून आले होते. पारनेर या दुष्काळी आणि कोरडवाहू मतदारसंघातून बाबासाहेब ठुबे हे निवडून आले होते. (पहा तक्ता क्र. ४.९)

**तक्ता क्र.४.९**

**१९८० च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल**

| अ.क्र | राजकीय पक्ष | मिळालेल्या जागा |
|---|---|---|
| १ | काँग्रेस (आय) | ०९ |
| २ | काँग्रेस (यु) | ०१ |
| ३ | सीपीआय | ०१ |
| ४ | जनता दल | ०२ |
| ५ | एकूण | १३ |

आधार : निवडणूक आयोग अहवाल १९८०

१९८० च्या विधानसभा निवडणुकीत पक्षीय पातळीवरील स्पर्धा पाहिली असता असे दिसून येते की, मुख्य स्पर्धा ही चार मतदारसंघात झालेली दिसून येते.

त्यात इंदिरा (काँग्रेस), शरद पवार यांची संयुक्त समाजवादी काँग्रेस, जनता दल आणि सीपीआय या पक्षामध्ये स्पर्धा राहिलेली दिसून येते. त्यातही इंदिरा काँग्रेस आणि काँग्रेस यु या दोन पक्षामध्ये स्पर्धा राहिलेली दिसून येते. एक प्रकारे असे म्हणावे लागते की, शरद पवार यांच्या बंडखोरीमुळे काँग्रेस अंतर्गत स्पर्धा राहिली तरी इतर स्थानिक पातळीवर प्रभावी असलेल्या पक्षाचे अस्तित्व देखील कमी झालेले दिसून येत नाही. परिणामी जरी काँग्रेस पक्ष हा या निवडणुकीत मुख्य स्पर्धक असला तरी इतर पक्षांची संख्या वाढत काँग्रेसला पर्यायी पक्षांच्या रूपाने हळूहळू पुढे येत असल्याचे दिसून येते. (पहा तक्ता क्र. ४.१०)

अहमदनगर जिल्ह्यातील राजकारणाच्या विकासाची चर्चा करत असताना असे दिसून येते की, मराठा समाज हा काँग्रेसच्या प्रभावाखाली एकवटेला होता. त्यास शरद पवार यांनी बंडखोरी केल्याने काँग्रेस पक्षाला ज्या प्रकारे तडा गेला त्याच प्रमाणे मराठा समाजाच्या एकत्रीकरणास देखील तडा गेल्याचे दिसून येते. कारण अनेक नेतृत्व हे काँग्रेसधून बाहेर पडले. शरद पवार काही काळानंतर पुन्हा काँग्रेसमध्ये आलेले दिसून येते. मात्र इतर नेतृत्व हे परत आलेले दिसून येत नाही. काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या नेतृत्वाने पुन्हा पर्यायी राजकारण आणि पर्यायी संधीचा शोध घेतल्याचे दिसून येते. १९८० ची निवडणूक ही मुख्यत: काँग्रेस (आय) आणि काँग्रेस (यु) या दोन पक्षात झाल्याचे दिसून येते. या निवडणुकीत प्रथमच मराठा नेतृत्वाचे विभाजन झालेले पुढे आहे. त्याच प्रमाणे मराठा नेतृत्व हे काँग्रेस पक्षावर देखील नाराज असल्याचे दिसून आले. एका अर्थी अहमदनगरच्या राजकारणात प्रथमच घराणेशाहीच्या विरोधात सामान्य नेतृत्व आले होते. शरद पवार यांनी ही प्रस्थापित नेतृत्वाला आव्हान दिले होते. मात्र शरद पवार रणनीती आणि राजकीय डावपेचात कमी पडले परिणामी अनेकांना स्पर्धक नेतृत्वाच्या यादीतच थांबावे लागले. निर्णायक भूमिकेत उतरता आले नाही. मात्र अहमदनगरच्या राजकारणात प्रथमच राजकीय संक्रमण झाल्याचे दिसून आले. ही स्थिती राजकीय लोकशाहीकरणास पोषक अशी निर्माण झाल्याचे दिसून येते. कारण

घराणेशाहीच्या विरोधातील आवाज पुढे आला होता. त्यामुळे ही निवडणूक एक वैशिष्ट्येपुर्ण होती.

**तक्ता क्र. ४.१०**

**१९८० च्या विधानसभा निवडणुकीतील अहमदनगर जिल्ह्याची पक्षनिहाय स्थिती**

| मतदारसंघ | विजयी नेतृत्व | पक्ष | स्पर्धक नेतृत्व | पक्ष |
|---|---|---|---|---|
| कर्जत | निकाळजे दगडु | काँग्रेस (U) | बुधीवंत तुकाराम | सीपीआय |
| श्रीगोंदा | पाचपुते बबनराव | जनता दल | नागवडे शिवाजीराव | काँग्रेस (I) |
| अहमदनगर(द) | असिर एस. एम.आय | काँग्रेस (I) | पाअुलबुध्दे नाथ | काँग्रेस (U) |
| अहमदनगर(उ) | शेळके मारूती | काँग्रेस (I) | हराल किसनराव | काँग्रेस (U) |
| पाथर्डी | ढाकणे बबनराव | जनता दल | भापसे बाबुराव | अपक्ष |
| शेवगाव | फटाके संभाजीराव | काँग्रेस (I) | लंघे वकिलराव | सीपीआय |
| श्रीरामपूर | मुरकुटे भानुदास | काँग्रेस (I) | आदिक गोंविदराव | काँग्रेस (U) |
| शिर्डी | म्हस्के अण्णासाहेब | काँग्रेस (I) | जाधव भास्करराव | काँग्रेस (U) |
| कोपरगाव | कोल्हे शंकरराव | काँग्रेस (I) | काळे शंकरराव | काँग्रेस (U) |
| राहुरी | तनपुरे प्रसाद | काँग्रेस (I) | पवार काशिनाथ | काँग्रेस (U) |
| पारनेर | ठुबे बाबासाहेब | सीपीआय | पठारे ज्ञानदेव | काँग्रेस (U) |
| संगमनेर | खटाळ भिकाजी | काँग्रेस (I) | थोरात संभाजी | अपक्ष |
| अकोले | पिचड मधुकर | काँग्रेस (I) | मेगल साक्रु | सीपीआय |

आधार : निवडणूक आयोग अहवाल १९८०

## १९८५ ची विधानसभा निवडणूक आणि अहमदनगर जिल्हा

१९८५ च्या विधानसभा निवडणुकीवर १९८० साली झालेल्या काँग्रेस फुटीचे प्रतिबिंब पडलेले होते. परिणामी काँग्रेस पक्षाला केवळ ७ जागावर समाधान मानावे लागले. शरद पवार यांच्या संयुक्त काँग्रेसला २ जागा मिळाल्या. जनता दल आणि

अपक्ष पक्षाला प्रत्येकी २ जागा मिळाल्या. या निवडणुकीत पहिल्या वेळेस डाव्या विचारांच्या सीपीआय या पक्षाला एकही जागा मिळाली नाही. तसेच दुसऱ्या क्रमांकांची मते देखील मिळवता आली नाहीत. (पहा तक्ता क्र. ४.११)

**तक्ता क्र. ४.११**

**१९८५ च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल**

| अ.क्र | राजकीय पक्ष | मिळालेल्या जागा |
|---|---|---|
| १ | काँग्रेस (आय) | ०७ |
| २ | काँग्रेस (यु) | ०२ |
| ३ | जनता दल | ०२ |
| ४ | अपक्ष | ०२ |
| ५ | एकूण | १३ |

आधार : निवडणूक आयोग अहवाल १९८५

संपुर्ण जिल्ह्याचा निवडणुकीच्या बाजूने आणि पक्षीय पातळीवरून विचार करता असे दिसून येते की, काँग्रेसचे बालेकिल्ले असलेल्या मतदारसंघात काँग्रेस पक्षाचे उमेदवार निवडून आले. तर पाथर्डी आणि श्रीगोंदा या मतदारसंघातून जनता दलाचे उमेदवार निवडून आले. शरद पवार यांच्या संयुक्त समाजवादी काँग्रेस पक्षाचे दक्षिण अहमदनगर आणि श्रीरामपूर या मतदारसंघातून उमेदवार निवडून आले. तर ६ मतदारसंघात उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर राहिले. अर्थात पुन्हा काँग्रेस अंतर्गत स्पर्धा राहिल्याचे पुढे येते. (पहा तक्ता क्र. ४.१२)

**तक्ता क्र. ४.१२**

**१९८५ च्या विधानसभा निवडणुकीतील अहमदनगर जिल्ह्याची पक्षनिहाय स्थिती**

| मतदारसंघ | विजयी नेतृत्व | पक्ष | स्पर्धक नेतृत्व | पक्ष |
|---|---|---|---|---|
| कर्जत | निकाळजे दगडु | काँग्रेस | रूपवते प्रभाकरराव | अपक्ष |
| श्रीगोंदा | पाचपुते बबनराव | जनता दल | नागवडे शिवाजीराव | काँग्रेस |
| अहमदनगर(द) | कळमकर दादासाहेब | काँग्रेस (S) | असिर शेख मोहम्मद | काँग्रेस |
| अहमदनगर(उ) | कळमकर दादासाहेब | काँग्रेस | बापट अशोक | काँग्रेस (S) |
| पाथर्डी | ढाकणे बाबुराव | जनता दल | राजळे आपासाहेब | काँग्रेस |
| शेवगाव | फाटके संभाजीराव | काँग्रेस | मुंगसे मुरलीधर | काँग्रेस (S) |
| श्रीरामपूर | पवार दौलतराव | काँग्रेस (S) | जाठर सुरेश | काँग्रेस |
| शिर्डी | म्हस्के अण्णासाहेब | काँग्रेस | म्हस्के रावसाहेब | काँग्रेस (S) |
| कोपरगाव | रोहमारे दादासाहेब | काँग्रेस | काळे संभाजीराव | काँग्रेस (S) |
| राहुरी | तनपुरे प्रसाद | अपक्ष | धुमाळ रामदास | काँग्रेस (S) |
| पारनेर | झावरे नंदकुमार | काँग्रेस | ठुबे बाबासाहेब | अपक्ष |
| संगमनेर | थोरात बाळासाहेब | अपक्ष | होरात शंकुतला | काँग्रेस |
| अकोले | पिचड मधुकरराव | काँग्रेस | भांगरे राजाराम | काँग्रेस (S) |

आधार : निवडणूक आयोग अहवाल १९८५

## १९९० ची विधानसभा निवडणूक आणि अहमदनगर जिल्हा राजकारण

१९९०च्या निवडणुकीला राज्य पातळीवर अनन्य साधारण महत्त्व आहे. कारण या निवडणुकीत शिवसेना आणि भाजपा यांची राज्य पातळीवर युती झालेली होती. परिणामी काँग्रेस पक्षाला एक पर्याय देणारा पक्ष म्हणून पाहिले जात होते. त्यात शरद

पवार यांनी पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. त्यामुळे काँग्रेसमधील अनेक नेतृत्वाला काय करावयाचे हा प्रश्न निर्माण झाला होता. त्यात शिवसेना आणि भाजपा युती होत निवडणुकीच्या राजकारणात उतरलेले असल्याने काँग्रेस विरोधक नेतृत्वाला पर्याय मिळाला होता. परिणामी अनेक नेतृत्व प्रत्यक्षात शिवसेना – भाजप या युतीकडे वळलेले दिसून येते. अहमदनगर जिल्हा या राजकारणास अपवाद होता असे दिसून येत नाही. कारण या निवडणुकीत जरी काँग्रेसला १३ पैकी ९ जागा मिळाल्या असल्या तरी शिवसेनेला १ जागा मिळालेली होती. जनता दल या पक्षाला २ जागा मिळाल्या होत्या. अपक्ष १ जागेवर निवडून आले होते. (पहा तक्ता क्र. ४.१३)

**तक्ता क्र. ४.१३**

**१९९० च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल**

| अ.क्र | राजकीय पक्ष | मिळालेल्या जागा |
|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०९ |
| २ | भाजपा | ०० |
| ३ | शिवसेना | ०१ |
| ४ | जनता दल | ०२ |
| ५ | इतर पक्ष | ०० |
| ६ | अपक्ष | ०१ |
| ७ | एकूण | १३ |

आधार : निवडणूक आयोग अहवाल १९९०

१९९०च्या विधानसभा निवडणुकीत अहमदनगर दक्षिण मतदारसंघात शिवसेनेने प्रवेश केल्याचे दिसून येते. तसेच पारनेर आणि कोपरगाव या मतदारसंघात दुसऱ्या क्रमांकाची मते मिळवली. तर भाजपला एकाही जागेवर विजय मिळवता आला नाही. मात्र संगमनेर, राहुरी आणि कर्जत या मतदारसंघात दुसऱ्या क्रमांकाची मते मिळवली. जनता दल या पक्षाला २ जागा मिळाल्या तसेच शिर्डी, उत्तर अहमदनगर आणि शिर्डी या मतदारसंघात दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. अहमदनगर

जिल्ह्याचा १९९० मध्ये विचार करता असे दिसून येते की, जनता दलाला काही मतदारसंघात चांगले नेतृत्व लाभले होते. १९९०च्या निवडणुकीत बबनराव ढाकणे यांनी बीड लोकसभा मतदारसंघातून विजय मिळवल्याने पाथर्डी या मतदारसंघातून उमेदवारी न करता त्यांनी भापसे बाबुराव यांना उमेदवारी दिली. मात्र विजय मिळवता आला नाही. एक प्रकारे राजकीय नेतृत्वाला चांगलेच महत्त्व असल्याचे दिसून येते. कर्जत ही अनुसूचित जातींसाठीची आणि नगर–अकोले ही अनुसूचित जमातीसाठीची जागा वगळता इतर एकाही जागेवर मराठेतर उमेदवार निवडून आलेला दिसून येत नाही. (पहा तक्ता क्र. ४.१४)

**तक्ता क्र. ४.१४**

**१९९० च्या विधानसभा निवडणुकीतील अहमदनगर जिल्ह्यातील मतदारसंघनिहाय निकाल**

| मतदारसंघ | विजयी नेतृत्व | पक्ष | स्पर्धक नेतृत्व | पक्ष |
|---|---|---|---|---|
| कर्जत | भाईलुमे विठठ्ल | काँग्रेस | लोखंडे सदाशिव | भाजप |
| श्रीगोंदा | पाचपुते बबनराव | जनता दल | नागवडे शिवाजीराव | काँग्रेस |
| अहमदनगर(द) | राठोड अनिलराव | शिवसेना | कळमकर दादाभाऊ | काँग्रेस |
| अहमदनगर(उ) | शेळके मारूती | काँग्रेस | मुळे माधवराव | जनता दल |
| पाथर्डी | राजळे अप्पासाहेब | काँग्रेस | भापसे बाबुराव | जनता दल |
| शेवगाव | गडाख तुकाराम | अपक्ष | घुले मारूतीराव | काँग्रेस |
| श्रीरामपूर | मुरकुटे भानुदास | जनता दल | आदिक गोंविदराव | काँग्रेस |
| शिर्डी | म्हस्के अण्णासाहेब | काँग्रेस | घोंगरे एकनाथ | जनता दल |
| कोपरगाव | कोल्हे शंकरराव | काँग्रेस | काळे संभाजीराव | शिवसेना |
| राहुरी | तनपुरे प्रसाद | काँग्रेस | धुमाळ रामदास | भाजप |
| पारनेर | झावरे नंदकुमार | काँग्रेस | गायकवाड सबाजी | शिवसेना |
| संगमनेर | थोरात बाळासाहेब | काँग्रेस | गुंजाळ वसंतराव | भाजप |
| अकोले | पिचड मधुकर | काँग्रेस | भांगरे अशोक | जनता दल |

आधार : निवडणूक आयोग अहवाल १९९०

## १९९५ ची विधानसभा निवडणूक आणि अहमदनगर जिल्हा

१९९५च्या निवडणुकीत राज्यात सत्तांतर घडून येणारी निवडणूक होती. या निवडणुकीत राज्यात सेना–भाजप हे कॉंग्रेसला पर्यायी पक्ष असल्याचे पुढे आले. सेना भाजप युतीला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. मात्र अपक्ष सदस्यांच्या सहकार्याने सहज सत्तेवर येता आले. त्यामुळे राज्याच्या राजकारणाला कलाटणी देणारी ही निवडणूक होती. मात्र या निवडणुकीचा विचार करता असे दिसून येते की, अहमदनगर जिल्ह्यात हा प्रभाव जाणवला नाही. कारण कॉंग्रेसने १३ पैकी १० जागेवर विजय मिळवला होता. सेना–भाजप युतीला २ जागा मिळवता आल्या. तर अपक्ष १ जागेवर निवडून आला. या निवडणुकीतून इतर छोटे पक्ष निवडणूक स्पर्धेतून हळूहळू बाजूला जाताना दिसून येतात. जनता दल आणि सीपीआय या पक्षाला सातत्याने कोणत्यान कोणत्या मतदारसंघात जागा मिळत होती. मात्र या निवडणुकीत जागा मिळाली नाही. शिवसेनेला १ आणि भाजपाला १ अशा जागा मिळाल्या. (पहा तक्ता क्र. ४.१५)

**तक्ता क्र. ४.१५**

**१९९५ च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल**

| अ. क्र | राजकीय पक्ष | मिळालेल्या जागा |
|---|---|---|
| १ | कॉंग्रेस | १० |
| २ | भाजपा | ०१ |
| ३ | शिवसेना | ०१ |
| ४ | जनता दल | ०० |
| ५ | इतर पक्ष | ०० |
| ६ | अपक्ष | ०१ |
| ७ | एकूण | १३ |

आधार : निवडणूक आयोग अहवाल १९९५

१९९५ सालीच्या विधानसभा निवडणुकीचा विचार करत काही पातळ्यावर स्थानिक पातळीवर जाऊन पाहिले असता असे दिसून येते की, कर्जत या दुष्काळी परिसरात भाजपाने प्रवेश केल्याचे दिसून येते. तर अहमदनगर दक्षिण या शहरी

मतदारसंघात शिवसेनेने प्रवेश केल्याचे दिसून येते. तर उत्तर अहमदनगर जिल्ह्यात शिवाजी कर्डिले या अपक्ष उमेदवाराची ताकद असल्याचे दिसून येते. श्रीगोंदा, शेवगाव, श्रीरामपूर, राहुरी, पारनेर व संगमनेर या मतदारसंघात अपक्ष उमेदवारांने काँग्रेसच्या उमेदवाराला चांगलीच स्पर्धा दिल्याचे दिसून येते. एक प्रकारे या मतदारसंघात काँग्रेस अंतर्गत स्पर्धा असल्याचे दिसून येते. दोन मतदारसंघात शिवसेना आणि एका मतदारसंघात भाजप उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर राहिलेले दिसून येते. मात्र काँग्रेस या पक्षाला अहमदनगर या जिल्ह्यात पर्याय देण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून येत नाही. हे वैशिष्ट्ये असल्याचे दिसून येते. (पहा तक्ता क्र. ४.१६)

**तक्ता क्र. ४.१६**
**१९९५ च्या विधानसभा निवडणुकीतील अहमदनगर जिल्ह्यातील मतदारसंघनिहाय निकाल**

| मतदारसंघ | विजयी नेतृत्व | पक्ष | स्पर्धक नेतृत्व | पक्ष |
|---|---|---|---|---|
| कर्जत | लोखंडे सदाशिव | भाजप | रूपवते प्रेमानंद | काँग्रेस |
| श्रीगोंदा | पाचपुते बबनराव | काँग्रेस | भोस बाळासाहेब | अपक्ष |
| अहमदनगर(द) | राठोड अनिल | शिवसेना | कळमकर दादाभाऊ | काँग्रेस |
| अहमदनगर(उ) | कर्डिले शिवाजी | अपक्ष | कुटे विजयाताई | काँग्रेस |
| पाथर्डी | राजळे अप्पासाहेब | काँग्रेस | आंधळे विक्रमराव | भाजप |
| शेवगाव | अभंग पांडुरंग | काँग्रेस | गडाख तुकाराम | अपक्ष |
| श्रीरामपूर | मुरकुटे भानुदास | काँग्रेस | कांबळे अनिल | अपक्ष |
| शिर्डी | विखे राधाकृष्ण | काँग्रेस | गाडेकर धनंजय | शिवसेना |
| कोपरगाव | कोल्हे शंकरराव | काँग्रेस | सोनवणे भगतसिंग | शिवसेना |
| राहुरी | तनपुरे प्रसादराव | काँग्रेस | धुमाळ रामदास | अपक्ष |
| पारनेर | झावरे वसंतराव | काँग्रेस | झावरे नंदकुमार | अपक्ष |
| संगमनेर | थोरात बाळासाहेब | काँग्रेस | गुलवे बापुसाहेब | अपक्ष |
| अकोले | पिचड मधुकर | काँग्रेस | भांगरे अशोक | अपक्ष |

आधार : निवडणूक आयोग अहवाल १९९५

## १९९९ ची विधानसभा निवडणूक आणि अहमदनगर जिल्हा राजकारण

१९९९ च्या निवडणुकीत काँग्रेसमध्ये शरद पवार यांच्या रूपाने फुट पडलेली होती. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाची स्थापना करत महाराष्ट्राच्या राजकारणात प्रवेश केला होता. परिणामी शरद पवार यांचे समर्थक हे काँग्रेसमधून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले होते. परिणामी ही फुट राज्य पातळीवर पडलेली होती. त्यास अहमदनगर जिल्हा देखील अपवाद होता असे दिसून येत नाही. काँग्रेस पक्षाकडून ज्यांना डावलण्यात येत होते पण शिवसेना–भाजप मध्ये नको होते असे सर्व नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षामध्ये गेले होते. परिणामी काँग्रेस पक्षाची जिल्ह्यामध्ये फार मोठी हानी झाली होती. जी पारंपारिक काँग्रेसमध्ये घराणे होते तेवढेच घराणे काँग्रेस या पक्षामध्ये राहिलेली दिसून येतात. इतर राष्ट्रवादीचा पर्याय मिळाला असल्याने राष्ट्रवादीमध्ये गेल्याचे दिसून येते. परिणामी काँग्रेस पक्षाला १९९९च्या निवडणुकीत १३ पैकी केवळ ३ जागेवर समाधान मानावे लागले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाला प्रथम निवडणुकीत उतरलेला असला तरी ०५ जागा मिळाल्या. यावरून शरद पवार यांचा जिल्ह्यातील प्रभाव किती प्रमाणात आहे हे लक्षात येते. भाजपाला ०२ आणि शिवसेनेला ०२ जागा मिळाल्या. एक प्रकारे शिवसेना–भाजपाची काही मर्यादित ताकद जिल्ह्यामध्ये वाढत असल्याचे दिसून येते. उत्तर अहमदनगर विधानसभा मतदारसंघातून शिवाजी कर्डिले हे पुन्हा एकदा अपक्ष उमेदवार निवडून आले. (पहा तक्ता क्र. ४.१७)

## तक्ता क्र. ४.१७

### १९९९ च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल

| अ.क्र | राजकीय पक्ष | मिळालेल्या जागा |
|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०३ |
| २ | भाजपा | ०२ |
| ३ | शिवसेना | ०२ |
| ४ | राष्ट्रवादी काँग्रेस | ०५ |
| ५ | अपक्ष | ०१ |
| ६ | एकूण | १३ |

आधार : निवडणूक आयोग अहवाल १९९९

१९९९ च्या निवडणुकीचे विधानसभानिहाय पक्षीय चित्र पाहता असे दिसून येते की, जनता दल या पक्षाची ताकद पाथर्डी या मतदारसंघात असताना देखील या मतदारसंघात भाजपाचा उमेदवार निवडून आला. तर कर्जत पुन्हा एकदा भाजपाकडे गेला. राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाने सर्वाधिक जागा जिंकल्या होत्या. त्यात शेवगाव, कोपरगाव, राहुरी, पारनेर आणि नगर–अकोले या मतदारसंघात विजयी होता आले. तर श्रीरामपूर, शिर्डी, श्रीगोंदा आणि दक्षिण अहमदनगर या मतदारसंघात दुसऱ्या क्रमांकावर राहिला. शिवसेनेला २ जागा मिळाल्या होत्या. त्याच वेळी कोपरगाव, पारनेर, संगमनेर या ३ मतदारसंघात दुसऱ्या क्रमांकाची मते मिळवली. (पहा तक्ता क्र. ४.१८)

**तक्ता क्र. ४.१८**

**१९९९ च्या विधानसभा निवडणुकीतील अहमदनगर जिल्ह्यातील मतदारसंघनिहाय निकाल**

| मतदारसंघ | विजयी नेतृत्व | पक्ष | स्पर्धक नेतृत्व | पक्ष |
|---|---|---|---|---|
| पाथर्डी | बडे दगडु | भाजप | राजळे राजीव | काँग्रेस |
| शेवगाव | घुले नरेंद्र | राष्ट्रवादी | गडाख तुकाराम | भाजप |
| श्रीरामपूर | ससाणे जयंत | काँग्रेस | मुरकुटे भानुदास | राष्ट्रवादी |
| शिर्डी | विखे राधाकृष्ण | शिवसेना | म्हस्के रावसाहेब | राष्ट्रवादी |
| कोपरगाव | कोल्हे शंकरराव | राष्ट्रवादी | परजाने नामदेवराव | शिवसेना |
| राहूरी | तनपुरे प्रसाद | राष्ट्रवादी | कदम चंद्रशेखर | भाजप |
| पारनेर | झावरे पाटील | राष्ट्रवादी | गायकवाड सबाजीराव | शिवसेना |
| संगमनेर | थोरात बाळासाहेब | काँग्रेस | गुळवे बापुसाहेब | शिवसेना |
| अकोले | पिचड मधुकर | राष्ट्रवादी | भांगरे अशोक | काँग्रेस |
| कर्जत | लोखंडे सदाशिव | भाजप | काळोखे शाहुराव | अपक्ष |
| श्रीगोंदा | नागवडे शिवाजी | काँग्रेस | पचपुते बबनराव | राष्ट्रवादी |
| अहमदनगर(द) | राठोड अनिल | शिवसेना | कळमकर दादाभाऊ | राष्ट्रवादी |
| अहमदनगर(उ) | कर्डिले शिवाजी | अपक्ष | गडाख शंकरराव | राष्ट्रवादी |

आधार : निवडणूक आयोग अहवाल १९९९

## २००४ ची विधानसभा निवडणूक आणि अहमदनगर जिल्हा

२००४च्या निवडणुकीत पक्षीय स्पर्धेमुळे वैशिष्टपूर्ण ठरलेली होती. काँग्रेस पक्षाला १३ पैकी केवळ ४ जागा मिळाल्या. तर राष्ट्रवादी आणि शिवसेना या पक्षाला प्रत्येकी ३ जागा मिळाल्या. तर भाजपला २ जागा मिळाल्या. १ जागेवर अपक्ष उमेदवार निवडून आला. अर्थात या निवडणुकीत गेल्या निवडणुकीच्या तुलनेत काँग्रेसची एक जागा वाढली असली तरी एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाणाऱ्या जिल्ह्यात पुन्हा काँग्रेस काही मतदारसंघापुरतेच मर्यादित झालेला दिसून येतो. गेल्या

निवडणुकीच्या तुलनेत राष्ट्रवादीच्या देखील २ जागा कमी झाल्याचे दिसून येते. या निवडणुकीत शिवसेनेला जास्त फायदा झाल्याचे दिसून येते. या निवडणुकीतून एक प्रकारे चारही पक्ष एकमेकांना चांगल्याच प्रकारे स्पर्धक पातळीवर पुढे आले. शिवसेना—भाजपा युती असल्याने अहमदनगर जिल्ह्यात या पक्षाची ताकद प्रथमच वाढल्याचे पुढे आले. संथगतीने शिवसेना—भाजप अहमदनगर जिल्ह्यात पुढे येत होता. शिवसेना—भाजपा पुढे येण्यास काँग्रेस आणि राष्ट्रवादी या दोन पक्षांत असलेली गटबाजी कारणीभूत होती. हे देखील तितकेच स्पष्टपणे दिसून येते. कारण काँग्रेस राष्ट्रवादी यांच्या आघाडीमध्ये उमेदवारी न मिळाल्याने बंडखोरीचे प्रमाण वाढत होते. त्यामुळे मतांचे विभाजन होत थेट फायदा सेना —भाजपाला होत होता. (पहा तक्ता क्र. ४.१९)

**तक्ता क्र. ४.१९**

**२००४ च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल**

| अ.क्र | राजकीय पक्ष | मिळालेल्या जागा |
|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०४ |
| २ | भाजपा | ०२ |
| ३ | शिवसेना | ०३ |
| ४ | राष्ट्रवादी | ०३ |
| ५ | जनता दल | ०० |
| ६ | इतर पक्ष | ०० |
| ७ | अपक्ष | ०१ |
| ८ | एकूण | १३ |

आधार : निवडणूक आयोग अहवाल २००४

२००४च्या निवडणुकीत अहमदनगर जिल्ह्यातील मतदारसंघ आणि नेतृत्व यांचा विचार करता असे दिसून येते की, काँग्रेस नेतृत्वाने त्यांचे गड राखलेले होते. राष्ट्रवादीची पडझड होत शिवसेनेला संधी मिळालेली होती. मात्र भाजपला राहुरी या

मतदारसंघात अनपेक्षित यश मिळाले होते. श्रीगोंदा मतदारसंघातून राष्ट्रवादीचे पाचपुते बबनराव यांनी बंडखोरी करत विजय मिळवला होता. या निवडणुकीचे वैशिष्ट्ये असे की, जनता दल, डाव्या विचारांचे पक्ष हे पुर्णपणे परिघाच्या बाहेर फेकले गेले होते. त्यांची जागा ही सेना–भाजपाने हळूहळू घेतल्याचे पुढे आले. त्यात जनता दलाच्या अनेक नेतृत्वाने विविध पक्षामध्ये प्रवेश केला होता. परिणामी हे पक्ष संघटनात्मक पातळीपुरतेच मर्यादित राहिल्याचे दिसून येते. दुसऱ्या क्रमांकाचा विचार करता शिवसेना ४ जागेवर, भाजपा २, राष्टवादी ४, काँग्रेस २ आणि १ ठिकाणी अपक्ष उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर राहिले. अर्थात ही निवडणूक पुर्णपणे मुख्य चार पक्ष आणि बंडखोर यांच्यामध्ये राहिलेली दिसून येते. दुसरे असे की, श्रीरामपूर, शिर्डी, संगमनेर आणि पाथर्डी या मतदारसंघात विजय मिळाला. याचा अर्थ असा की, या मतदारसंघात काँग्रेसचे राजकीय घराणे हे प्रबळ असल्याने या मतदारसंघात विजयी होता आले. इतर मतदारसंघात काँग्रेस नेतृत्वाला फारसा प्रभाव टाकता आला नाही. श्रीगोंदा मतदारसंघाचा अपवाद वगळता इतर मतदारसंघात दुसऱ्या क्रमांकाची मते देखील मिळवता आली नाहीत. परिणामी विशिष्ट अशा काही मतदारसंघात काँग्रेसची नेतृत्वाची मर्यादित ताकद असल्याचे दिसून येते. इतर मतदारसंघ हे काँग्रेसत्तेर पक्षाने प्रभाव वाढवत हस्तगत केल्याचे दिसून येते. (पहा तक्ता क्र. ४.२०)

### तक्ता क्र. ४.२०

### २००४ च्या विधानसभा निवडणुकीतील अहमदनगर जिल्ह्यातील मतदारसंघनिहाय निकाल

| मतदारसंघ | विजयी नेतृत्व | पक्ष | स्पर्धक नेतृत्व | पक्ष |
|---|---|---|---|---|
| कर्जत | लोखंडे सदाशिव | भाजपा | काळोखे अरविंद | काँग्रेस |
| श्रीगोंदा | पाचपुते बबनराव | अपक्ष | नागवडे शिवाजीराव | काँग्रेस |
| अहमदनगर(द) | राठोड अनिल | शिवसेना | कळमकर दादाभाऊ | राष्ट्रवादी |
| अहमदनगर(उ) | कर्डिले शिवाजी | राष्ट्रवादी | पाटील मारूती | अपक्ष |
| पाथर्डी | राजळे राजीव | काँग्रेस | ढाकणे प्रताप | भाजपा |
| शेवगाव | घुले नरेंद्र | राष्ट्रवादी | लंघे विठठ्ल | भाजपा |
| श्रीरामपूर | सासणे जयंत | काँग्रेस | मुरकुटे भानुदास | शिवसेना |
| शिर्डी | विखे पाटील राधाकृष्ण | काँग्रेस | गाडेकर धनंजय | शिवसेना |
| कोपरगाव | काळे अशोकराव | शिवसेना | कोल्हे बिपीन | राष्ट्रवादी |
| राहुरी | कदम चंद्रशेखर | भाजपा | तनपुरे प्रसाद | राष्ट्रवादी |
| पारनेर | औटी विजयराव | शिवसेना | पाटील वसंतराव | राष्ट्रवादी |
| संगमनेर | थोरात बाळासाहेब | काँग्रेस | थोरात संभाजीराव | शिवसेना |
| अकोले | पिचड मधुकर | राष्ट्रवादी | भांगरे अशोक | शिवसेना |

आधार : निवडणूक आयोग अहवाल २००४

## २००९ ची विधानसभा निवडणूक आणि अहमदनगर जिल्हा

२००९ च्या निवडणुकीपूर्वी मतदारसंघ पुर्नरचना झाली होती. या मतदारसंघ पुर्नरचनेत अनेक मतदारसंघाची चांगल्याच प्रकारे मोडतोड करण्यात आली होती. परिणामी नेतृत्वाला देखील निवडणुकीला सामोरे जाताना तारेवरची कसरत करावी लागणार होती. अहमदनगर जिल्ह्याचा विचार करता १३ मतदारसंघाऐवजी जिल्ह्यात १२ मतदारसंघ झाले होते. एक मतदारसंघ कमी करण्यात आला होता. दुसरे असे की, कर्जत या अनुसूचित जातींसाठीच्या राखीव मतदारसंघ खुला करत श्रीरामपूर हा खुला मतदारसंघ राखीव करण्यात आला होता. तिसरे असे की, अनेक मतदारसंघाची मोडतोड

झालेली होती. त्यामुळे नेतृत्वाचा निवडणुकीत कस लागणारा होता. पाथर्डी हा मतदारसंघ उडवण्यात आला होता. हा मतदारसंघ राहुरी आणि शेवगाव या मतदारसंघात समावेश करण्यात आला होता. अहमदनगर उत्तर ऐवजी नेवासा हा नव्याने मतदारसंघ निर्माण करण्यात आला होता. अशा प्रकारे अहमदनगर जिल्ह्यातील मतदारसंघातील नेतृत्वाचे चांगले चित्र बदलणारी ही मतदारसंघ पुर्नरचना होती. या मतदारसंघ पुर्नरचनेनुसार २००९ची विधानसभा निवडणूक झाली होती. या निवडणुकीत पुन्हा काँग्रेस पक्षाला केवळ ३ जागा मिळाल्या. भाजपा २, शिवसेना ३, राष्ट्रवादी ४ अशा प्रकारे पक्षीय पातळीवर जागा मिळण्याचे स्वरूप राहिले. मतदारसंघ पुर्नरचना झाली तरी पक्षीय पातळीवरील चित्र गेल्या निवडणुकीतील कायम राहिल्याचे पुढे आले. मात्र पाथर्डी मतदारसंघ कमी करण्यात आलेल्या जागेवर काँग्रेसला आपली जागा गमवावी लागली. परिणामी काँग्रेसची एक जागा कमी झाली. (पहा तक्ता क्र. ४.२१)

**तक्ता क्र. ४.२१**

**२००९ च्या विधानसभा निवडणुकीतील निकाल**

| **अ.क्र** | **राजकीय पक्ष** | **मिळालेल्या जागा** |
|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०३ |
| २ | भाजपा | ०२ |
| ३ | शिवसेना | ०३ |
| ४ | राष्ट्रवादी | ०४ |
| ५ | एकूण | १२ |

आधार : निवडणूक आयोग अहवाल २००९

२००९ च्या निवडणुकीचे मतदारसंघ पातळीवर चित्र पाहता असे दिसून येते की, काँग्रेस नेतृत्वाला शिर्डी, संगमनेर आणि श्रीरामपूर या पारंपारिक मतदारसंघाशिवाय इतर एकाही मतदारसंघात विजयी होता आले नाही. राष्ट्रवादीला नगर–अकोले, नेवासा, शेवगाव, श्रीगोंदा या मतदारसंघात आपली ताकद दाखवता आली. भाजपला कर्जत–जामखेड आणि राहुरी या मतदारसंघात विजयी होता आले.

शिवसेनेला अहमदनगर शहर, पारनेर आणि कोपरगाव या तीन मतदारसंघात पुन्हा विजय मिळवता आला. एक प्रकारे भाजपा आणि शिवसेना या मतदारसंघात प्रस्थापित पक्ष असल्याचे पुढे येते. राष्ट्रवादी कॉंग्रेस या पक्षाला नगर, अकोले, नेवासा, शेवगाव या मतदारसंघात यश मिळवता आले. मात्र या मतदारसंघात सातत्य राखता येत नाही. राष्ट्रवादीला बंडखोर आणि गटबाजी या कारणांनी कोणत्या मतदारसंघात ताकद आहे हेच समजून येत नाही. मात्र निवडणुकीच्या राजकारणात मर्यादित यश मिळत असल्याचे दिसून येते. २००४च्या निवडणुकीप्रमाणे २००९ च्या निवडणुकीत देखील पुन्हा या चार पक्षांच्या नेतृत्वामध्ये स्पर्धा झाल्याचे दिसून येते. (पहा तक्ता क्र. ४.२२)

**तक्ता क्र. ४.२२**

**२००९ च्या विधानसभा निवडणुकीतील अहमदनगर जिल्ह्यातील मतदारसंघनिहाय निकाल**

| मतदारसंघ | विजयी नेतृत्व | पक्ष | स्पर्धक नेतृत्व | पक्ष |
|---|---|---|---|---|
| अकोले | पिचड मधुकर | राष्ट्रवादी | तलपडे मधुकर | शिवसेना |
| संगमनेर | थोरात बाळासाहेब | कॉंग्रेस | कुटे बाबासाहेब | शिवसेना |
| शिर्डी | विखेपाटील राधाकृष्ण | कॉंग्रेस | पिपाडा राजेंद्र | शिवसेना |
| कोपरगाव | काळे अशोकराव | शिवसेना | कोल्हे बिपिनदादा | राष्ट्रवादी |
| श्रीरामपूर | कांबळे भाऊसाहेब | कॉंग्रेस | डोळस भाऊसाहेब | शिवसेना |
| नेवासा | गडाख शंकरराव | राष्ट्रवादी | लंघे विठठ्ल | भाजप |
| शेवगाव | घुले चंद्रशेखर | राष्ट्रवादी | ढाकणे प्रताप | भाजप |
| राहुरी | कर्डिले शिवाजी | भाजप | तनपुरे प्रसाद | राष्ट्रवादी |
| पारनेर | औटी विजयराव | शिवसेना | झावरे वसंतराव | अपक्ष |
| अहमदनगर शहर | अनिल राठोड | शिवसेना | गुंडेचा सुवलाल | कॉंग्रेस |
| श्रीगोंदा | पाचपुते बबनराव | राष्ट्रवादी | नागवडे राजेंद्र | भाजप |
| कर्जत जामखेड | शिंदे राम शंकर | भाजप | देशमुख केशवराव | कॉंग्रेस |

आधार : निवडणूक आयोग अहवाल २००४

## १९६२ ते २००९ या काळातील विधानसभा निवडणुका आणि अहमदनगर जिल्हा

१६६२ ते २००९ या काळातील एकूण ११ विधानसभा निवडणुकीचा विचार करता असे दिसून येते की, अहमदनगर जिल्ह्यात सुरूवातीच्या काळापासून १९९५च्या निवडणुकीपर्यंत काँग्रेस पक्षाचे पुर्णपणे वर्चस्व होते. १९९८च्या निवडणुकीनंतर शरद पवार यांच्या पुलोदच्या प्रयोगापर्यंत तर अनेक मतदारसंघात काँग्रेसला कोणत्याही पक्षाने आव्हान दिले होते असे दिसून येत नाही. १९७२च्या निवडणुकीत देशभरात काँग्रेस पक्षाच्या विरोधात असलेल्या लाटेत जिल्ह्यामध्ये काँग्रेस पक्ष नेतृत्व तग धरून होते. दुसऱ्या बाजूने असे दिसून येते की, या निवडणुकीत मतदारांनी अपक्ष उमेदवारांना जवळ केले. मात्र इतर पक्षाला मतदान केले नाही. परिणामी ४ अपक्ष उमेदवार निवडून आले होते. मात्र पुन्हा १९७८ पासून पकड पकडल्याचे दिसून येते. १९८५मध्ये संयुक्त काँग्रेस या शरद पवार यांच्या पक्षांचा प्रभाव काही मतदारसंघात दिसून येतो. मात्र २ जागा वगळता इतर मतदारसंघात प्रभाव पाडता आला नाही. १९९० मधील निवडणुकीत शरद पवार यांनी पुन्हा काँगेस पक्षात प्रवेश केल्यामुळे काँग्रेसला ताकद दाखवता आली. पण या काळात काँग्रेसला पर्याय शिवसेना–भाजप युती होऊन निवडणुकीच्या राजकारणात उतरलेली होती. त्यास अहमदनगर जिल्हा अपवाद नव्हता. १९९५च्या निवडणुकीत पुर्ण राज्यात काँग्रेस विरोधी आणि शिवसेना–भाजपाच्या बाजूने कल मिळेल असे वाटत असताना अहमदनगर जिल्ह्यातील काँग्रेसच्या जागा वाढल्या. या निवडणुकीत शिवसेना आणि भाजपाला प्रत्येकी १ जागा मिळाली. यावरून काँग्रेस पक्ष तळागाळात पोहचलेला दिसून येतो. दुसरे असे की, या काळापर्यंत काँग्रेसला नेतृत्व देखील चांगले लाभले असल्याचे दिसून येते. प्रत्येक मतदारसंघात काँग्रेसचे नेतृत्व पुढे आले होते. पण त्याचवेळी प्रत्येक मतदारसंघात काँग्रेसतंर्गत गटबाजी निर्माण होत होती. घराणेशाही पुढे येत होती. १९९९ साली राज्य पातळीवर काँग्रेस विभाजनातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष निर्माण झाला. या पक्षामध्ये महाराष्ट्रात काँग्रेसची मोठी हानी झाली. त्याचप्रमाणे

अहमदनगर जिल्ह्यात देखील हानी झालेली दिसून येते. या निवडणुकीत काँग्रेसला केवळ ३ जागावर समाधान मानावे लागले. अर्थात १३ पैकी १० जागेवर काँग्रेसच्या विरोधात कौल गेला होता. काँग्रेसचे नेतृत्व ज्या प्रकारे राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षात गेले होते. त्याचप्रमाणे मतदारांचा कौल देखील राष्ट्रवादीकडे गेला असल्याचे दिसून येते. २००४ आणि २००९ या काळात अशा प्रकारे काँग्रेस पक्षाची स्थिती राहिल्याचे दिसून येते. २००४ व २००९ च्या निवडणुकीत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाची आघाडी झाली होती. पण ही आघाडी पूर्वीचे वर्चस्व काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मिळवून देऊ शकल्याचे दिसून येत नाही. १९९९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला ५ जागा मिळाल्या होत्या. मात्र २००४ आणि २००९ या निवडणुकीत आघाडीच्या कारणांनी जागांचे सातत्य राखता आले नाही. परिणामी काही मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस नेतृत्वाला मर्यादित राहावे लागल्याचे दिसून येते.

अहमदनगर जिल्हा राजकारणात शिवसेना भाजपा या पक्षांचा उदय हा १९९०च्या निवडणुकीपासून झाला. १९९०च्या निवडणुकीत पक्ष निवडणुकीच्या राजकारणात उतरलेले होते. मात्र पक्षांच्या नेतृत्व प्रभावी होते असे नाही. परिणामी या निवडणुकीत दोन्ही पक्षाच्या युतीला केवळ १ जागेवर समाधान मानावे लागले होते. १९९५ साली झालेल्या निवडणुकीत २ जागा, प्रत्येक १ जागा मिळाली. १९९९ साली मात्र शिवसेना आणि भाजप युतीला ४ जागा मिळाल्या. अर्थात संथगतीने शिवसेना आणि भाजप अहमदनगरच्या राजकारणात उतरत होते. या पक्षाकडून काही नवीन तर काही काँग्रेस नेतृत्वाला पक्ष प्रवेश देत प्रवेश करण्यात आला होता. शिवसेनेकडून काही मतदारसंघात शिवसैनिक तर काही मतदारसंघात काँग्रेस नेतृत्वातंर्गत नेतृत्वाला हाताशी धरत राजकारण करण्यात येत होते. उदा. कोपरगाव मतदारसंघात पुर्वाश्रमीच्या शंकरराव काळे घराण्याला शिवसेनेत प्रवेश देत मतदारसंघात विजय मिळवला. तर पारनेर मतदारसंघात काँग्रेसच्या नेतृत्वाच्या मुलांला शिवसेनेत प्रवेश देत स्थान मिळवल्याचे दिसून येते. भाजपा मात्र दुष्काळी आणि ओबीसी संख्येने जास्त असलेल्या प्रवेशात

हळूहळू उतरला होता. शिवसेना आणि भाजपची या दोन्ही पक्षांच्या अंतर्गत तुलना करता असे दिसून येते की, अहमदनगर जिल्ह्यात भाजपपेक्षा शिवसेनेला जास्त पाठिंबा मिळालेला दिसून येतो. त्याचे कारण शिवसेनेने अहमदनगर जिल्ह्यातील घराणेशाहीच्या विरोधात आवाज उठवला होता. परिणामी मतदारांकडून कौल मिळत होता. पण त्याच वेळी शिवसेनेचे नव्याने नेतृत्व पुढे येत होते. शिवसेनेकडून विकासाच्या राजकारणापेक्षा घराणेशाहीच्या विरोधात उठवलेला आवाज हा शिवसेनेला पाठिंबा देणारा होता.

इतर पक्षाचा विचार करता असे दिसून येते की, सीपीआय, जनता दल आणि आरपीआय या पक्षाला निवडणुकीत यश मिळाले आहे. स्वातंत्र्यपुर्व काळापासून अहमदनगर जिल्ह्यात डाव्या चळवळी आणि राजकीय पक्षांचे चांगले संघटन होते. त्यामुळे सीपीआय या पक्षाला १९८२ ते १९८० या काळात यश मिळाल्याचे दिसून येते. १९७२ च्या निवडणुकीत तर २ जागांवर सीपीआय या पक्षाला यश मिळाले होते. स्वांतत्र्येतर काळातील पहिल्या निवडणुकीपासून ते १९८० पर्यंत सीपीआयने कॉंग्रेस पक्षाला मुख्य स्पर्धक राहण्याचा प्रयत्न केला. काही मतदारसंघात दुसऱ्या क्रमांकाची मते मिळवत अनेक कामे, निर्णय कॉंग्रेस नेतृत्वाला सर्वसामान्याच्या बाजूने घेण्यास भाग पाडल्याचे दिसून येते.

जनता दल या पक्षाचा उदय हा १९७८च्या निवडणुकीपासून झालेला दिसून येतो. जनता दलाला १९७८च्या निवडणुकीत २ जागा मिळाल्या. तसेच अनेक मतदारसंघात कॉंग्रेसला स्पर्धक राहिल्याचे दिसून येते. सीपीआयची जागा जनता दलाकडे प्रथम सरकलेली दिसून येते. १९७८ ते १९९० या काळातील चार निवडणुकीमध्ये जनता दलाने प्रत्येक निवडणुकीत २ जागा मिळवलेल्या आहेत. जनता दलाला बबनराव ढाकणे यांचे नेतृत्व मिळाले होते. त्याचबरोबर कुमार सप्तर्षी, बबनराव पाचपुते व इतर काही नेतृत्व मिळाले होते. मात्र या काळात जनता दलाला कॉंग्रेसचे मुख्य स्पर्धक या

पातळीवर उतरवण्यास अपयश आल्याचे दिसून येते. जनता दलाला कोरडवाहू व दुष्काळी परिसरातून पाठिंबा मिळाला असल्याचे दिसून येते. (पहा तक्ता क्र. ४.२३)

१९६२ ते २००९ या काळाचा विचार करता असे दिसून येते की, मुख्य पक्ष म्हणून १९९५ पर्यंत अहमदनगर जिल्ह्यात काँग्रेस पक्ष राहिला. तर १९९९ नंतर काँग्रेस विभाजनानंतर राष्ट्रवादीची ताकद पुढे आली. काँग्रेस पक्ष काही विशिष्ट मतदारसंघात मर्यादित झालेला दिसून येतो. राष्ट्रवादीला देखील नगर–अकोले मतदारसंघ वगळता कोणताही हक्काचा मतदारसंघ आहे असे नाही. शिवसेना–भाजप या पक्षांनी जिल्हा राजकारणात प्रवेश करत काँग्रेस आणि राष्ट्रवादीला चांगलीच स्पर्धा देण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र पुर्णपणे पर्याय देण्यास शिवसेना–भाजपा अपयशी ठरल्याचे दिसून येते. एक प्रकारे इतर पक्षांचे वर्चस्व कमी होते. तीच जागा शिवसेना–भाजप घेत असल्याचे चित्र अहमदनगरच्या राजकारणात दिसून येते. अर्थात स्थानीय पक्षीय राजकारणाकडून स्पर्धात्मक राजकारणाकडे वाटचाल चालू असल्याचे दिसून येते.

## तक्ता. क्र. ४.२३

## १९६२ ते २००९ निधानसभा निवडणूक आणि राजकीय पक्षाचे चित्र

| राजकीय पक्ष | १९६२ | १९६७ | १९७२ | १९७८ | १९८० | १९८५ | १९९० | १९९५ | १९९९ | २००४ | २००९ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| काँग्रेस | १० | १० | ६ | ८ | ९ | ७ | ९ | १० | ३ | ४ | ३ | ७९ |
| भाजपा | — | — | — | — | — | — | — | १ | २ | २ | २ | ७ |
| शिवसेना | — | — | — | — | — | — | १ | १ | २ | ३ | ३ | १० |
| राष्ट्रवादी | — | — | — | — | — | — | — | — | ५ | ३ | ४ | १२ |
| सीपीआय | १ | १ | २ | १ | १ | — | — | — | — | — | — | ६ |
| आरपीआय | — | — | — | १ | — | — | — | — | — | — | — | १ |
| जनता दल | — | — | — | २ | २ | २ | २ | — | — | — | — | ८ |
| काँग्रेस(यु) | — | — | — | — | १ | २ | — | — | — | — | — | ३ |
| अपक्ष | १ | १ | ४ | १ | — | २ | १ | १ | १ | १ | — | १३ |
| एकुण | १२ | १२ | १२ | १३ | १३ | १३ | १३ | १३ | १३ | १३ | १२ | १३९ |

आधार : निवडणूक आयोग अहवाल १९६२ ते २००९

# अहमदनगर जिल्ह्यातील १९९० ते २००९ या काळातील विधानसभा पातळीवरील नेतृत्व आणि त्यांचा जातीगट

१९९५ च्या विधानसभा निवडणुकीसाठी विधानसभेचे एकूण १३ मतदारसंघ होते. कर्जत हा विधानसभेचा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव होता. तर अकोले मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी राखीव होता. काँग्रेस, भाजप व शिवसेना अशी पक्षीय स्पर्धा होती. काँग्रेस पक्षाशी भाजप व शिवसेना यांची स्वतंत्रपणे निवडणुकीतील

स्पर्धा होती. या जिल्ह्यावर या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे नियंत्रण होते. १३ विधानसभा मतदारसंघापैकी ११ विधानसभा मतदारसंघावर काँग्रेस पक्षाचे नियंत्रण होते. शेवगाव येथून माळी जातीगटाला स्थान दिले तर अकोले येथून महादेव कोळी जातीगटांचा उमेदवार निवडून आला. ९ विधानसभा मतदारसंघावर मराठा जातीगटाचे नियंत्रण होते. (तक्ता. क्र. ४.२४)

**तक्ता क्र. ४.२४**

**अहमदनगर जिल्ह्यातील आमदारांचे पक्ष व जातीगटांचे वर्गीकरण : (१९९० निवडणूक)**

| अ क्र | मतदारसंघ | राजकीय पक्ष | जाती |
|---|---|---|---|
| १ | कर्जत (अ.जा) | काँग्रेस | नवबौध्द |
| २ | श्रीगोंदा | जनतादल | मराठा |
| ३ | अहमदनगर उत्तर | शिवसेना | राजपुत |
| ४ | अहमदनगर दक्षिण | काँग्रेस | मराठा |
| ५ | पाथर्डी | काँग्रेस | मराठा |
| ६ | शेवगांव | अपक्ष | मराठा |
| ७ | श्रीरामपूर | जनतादल | मराठा |
| ८ | शिर्डी | काँग्रेस | मराठा |
| ९ | कोपरगांव | काँग्रेस | मराठा |
| १० | राहुरी | काँग्रेस | मराठा |
| ११ | पारनेर | काँग्रेस | मराठा |
| १२ | संगमनेर | काँग्रेस | मराठा |
| १३ | अकोले (अ.ज) | काँग्रेस | महादेव कोळी |

आधार : विविध राजकीय नेतृत्वाच्या मुलाखतीच्या आधारे जमवलेली माहिती

कर्जत या अनुसूचित जाती विधानसभा मतदारसंघात भाजपने चर्मकार जातीगटाला स्थान देऊन या मतदारसंघावर वर्चस्व मिळविले. तर अहमदनगर दक्षिणमधून शिवसेना

पक्षाचा राजपुत जातीगटाचा सदस्य निवडून आला. पक्षीय पातळीवर काँग्रेस पक्षाने या निवडणुकीत या जिल्ह्यावर नियंत्रण ठेवले व भाजप या पक्षाचा एक सदस्य निवडून आल्यामुळे या पक्षाचे अस्तित्व पुढे आले. (पहा तक्ता क्र. ४.२५)

**तक्ता क्र. ४.२५**

**अहमदनगर विधानसभा निवडणूक (१९९५)**

| अ क्र | मतदारसंघ | राजकीय पक्ष | जाती |
|---|---|---|---|
| १ | अहमदनगर (दक्षिण) | शिवसेना | राजपुत |
| २ | अहमदनगर (उत्तर) | काँग्रेस | मराठा |
| ३ | कर्जत (अ.जा) | भाजप | चर्मकार |
| ४ | श्रीगोंदा | काँग्रेस | मराठा |
| ५ | पाथर्डी | काँग्रेस | मराठा |
| ६ | शेवगांव | काँग्रेस | माळी |
| ७ | श्रीरामपूर | काँग्रेस | मराठा |
| ८ | शिर्डी | काँग्रेस | मराठा |
| ९ | कोपरगांव | काँग्रेस | मराठा |
| १० | राहुरी | काँग्रेस | मराठा |
| ११ | पारनेर | काँग्रेस | मराठा |
| १२ | संगमनेर | काँग्रेस | मराठा |
| १३ | अकोले (अ.ज) | काँग्रेस | महादेव कोळी |

आधार : विविध राजकीय नेतृत्वाच्या मुलाखतीच्या आधारे जमवलेली माहिती

१९९९ च्या विधानसभा निवडणुकीत अहमदनगर जिल्ह्यात १३ विधानसभेचे मतदारसंघ होते. या विधानसभा निवडणुका काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप व शिवसेना अशा चौरंगी स्वरूपाच्या होत्या. १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली. काँग्रेस पक्षाला या पक्षाची पक्षीय स्पर्धा या निवडणुकीत होती. शरद पवार यांना

मानणारा या जिल्ह्यातील गट राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून काँग्रेससमोर पक्षीय स्पर्धक झाला. बबनराव पाचपुते, शिवाजी कर्डिले, गोंविदराव आदिक, वसंतराव घुले, शंकरराव काळे हे गट बाळासाहेब विखे व थोरात यांच्या विरोधी राजकीय स्पर्धक म्हणून पुढे येऊ लागले.

१३ विधानसभा मतदारसंघापैकी काँग्रेस ०४, राष्ट्रवादी काँग्रेस ०५, शिवसेना ०२, भाजप ०२ असे पक्षीय स्वरूप होते. तर काँग्रेस पक्षातर्फे मराठा जातीगटाचे ०४, राष्ट्रवादी काँग्रेस ०४ व महादेव कोळी ०१, शिवसेना राजपुत ०१ व मराठा ०१, भाजप चर्मकार ०१ व वंजारी ०१ असे जातीगटांचे सदस्य निवडून आले होते. त्यामुळे राजपुत, चर्मकार, वंजारी हे जातीगट काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाच्या विरोधी गेल्याचे दिसून येते. (पहा तक्ता क्र. ४.२६) अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या मतदारसंघातून मुख्यत: राजकीय पक्षाकडून बौध्दत्तेर दलित जातींतील नेतृत्वाला प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली होती. दुसरे असे की, बौध्द दलितापेक्षा हिंदू दलित बरा या अटीवर नेतृत्व संधी देण्यात येत होती. तर अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या मतदारसंघातून सातत्याने महादेव कोळी जमातीचे नेतृत्व निवडून येत आलेले आहे. हीच परंपरा कायम राहिलेली आहे.

## तक्ता क्र. ४.२६

## अहमदनगर विधानसभा निवडणूक (१९९९)

| अ क्र | मतदारसंघ | राजकीय पक्ष | जाती |
|---|---|---|---|
| १ | अहमदनगर (दक्षिण) | शिवसेना | राजपुत |
| २ | अहमदनगर (उत्तर) | काँग्रेस | मराठा |
| ३ | कर्जत (अ.जा) | भाजप | चर्मकार |
| ४ | श्रीगोंदा | काँग्रेस | मराठा |
| ५ | पाथर्डी | भाजप | वंजारी |
| ६ | शेवगांव | राष्ट्रवादी | मराठा |
| ७ | श्रीरामपूर | काँग्रेस | मराठा |
| ८ | शिर्डी | शिवसेना | मराठा |
| ९ | कोपरगांव | राष्ट्रवादी | मराठा |
| १० | राहुरी | राष्ट्रवादी | मराठा |
| ११ | पारनेर | राष्ट्रवादी | मराठा |
| १२ | संगमनेर | काँग्रेस | मराठा |
| १३ | अकोले (अ.ज) | राष्ट्रवादी | महादेव कोळी |

आधार : विविध राजकीय नेतृत्वाच्या मुलाखतीच्या आधारे जमवलेली माहिती

अहमदनगर जिल्ह्यातील २००४ ची विधानसभा निवडणूक ही मतदारसंघ पुनर्रचनेची शेवटची निवडणूक होती. १९९९ च्या निवडणुकीत आणि या निवडणुकीत विशेष फरक झाल्याचे दिसून येत नाही. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस यांची राज्यातील आघाडी व सत्तेतील भागीदारी असाच पॅटर्न या निवडणुकीतही मतदारासाठी नवीन नव्हता. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप व शिवसेना अशी चौरंगी पक्षीय लढत या

जिल्ह्यात झाली. त्या चौरंगी लढतीचा फायदा १९९९च्या निवडणुकीपेक्षा पक्षीय व जातीगटांचा प्रभाव दिसून आला नाही. काँग्रेस पक्षाचे ०४ सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ०४, भाजपाचे ०२ व शिवसेनाचे ०३ सदस्य या निवडणुकीत वाढीव निवडून आले. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या गटाचा पाठिंबा या पक्षाच्या यशाला कारणीभूत ठरला. भाजपचे ०२ सदस्य निवडून आले. १० मराठा जातीगटाचे आमदार होते. ०१ राजपुत, ०१ चर्मकार व ०१ महादेव कोळी असे जातीगटांचे स्वरूप होते. मराठा जातीगटांच्या नियंत्रणातील ही विधानसभा निवडणूक होते असे दिसते. (पहा तक्ता क्र. ४.२७)

**तक्ता क्र. ४.२७**

**अहमदनगर विधानसभा निवडणूक (२००४)**

| अ क्र | मतदारसंघ | राजकीय पक्ष | जाती |
|---|---|---|---|
| १ | अहमदनगर (उत्तर) | शिवसेना | राजपुत |
| २ | अहमदनगर (दक्षिण) | राष्ट्रवादी काँग्रेस | मराठा |
| ३ | कर्जत (अ.जा) | भाजप | चर्मकार |
| ४ | श्रीगोंदा | राष्ट्रवादी काँग्रेस | मराठा |
| ५ | पाथर्डी | काँग्रेस | मराठा |
| ६ | शेवगांव | राष्ट्रवादी काँग्रेस | मराठा |
| ७ | श्रीरामपूर | काँग्रेस | मराठा |
| ८ | शिर्डी | काँग्रेस | मराठा |
| ९ | कोपरगांव | शिवसेना | मराठा |
| १० | राहुरी | भाजप | मराठा |
| ११ | पारनेर | शिवसेना | मराठा |
| १२ | संगमनेर | काँग्रेस | मराठा |
| १३ | अकोले (अ.ज) | राष्ट्रवादी काँग्रेस | महादेव कोळी |

आधार : विविध राजकीय नेतृत्वाच्या मुलाखतीच्या आधारे जमवलेली माहिती

२००९ ची विधानसभा निवडणूक मतदारसंघ पुनर्रचनेनुसार झाली. या विधानसभा निवडणुकीसाठी विधानसभेचे १२ मतदारसंघ झाले. एक मतदारसंघ कमी झाला. अकोले, संगमनेर, शिर्डी, श्रीरामपूर, नेवासा, शेवगांव, राहुरी, पारनेर, अहमदनगर शहर, श्रीगोंदा व कर्जत जामखेड असे मतदारसंघ होते. त्यापैकी अकोले हा पूर्वीचा होता तसाच अनुसूचित जमातीसाठीचा मतदारसंघ राहिला तर पूर्वीचा कर्जत बदलून श्रीरामपूर हा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव झाला.

शेवगाव विधानसभा मतदारसंघ पाथर्डी व शेवगाव असा मिळून झाला. त्यामुळे या दोन तालुक्यांची स्पर्धा उदयास आली. शेवगाव तालुका लोकसंख्येने पाथर्डी तालुक्यापेक्षा वरचढ ठरणार आहे. (२,०३,६७६) या मतदारसंघातून मराठा, माळी जातीचे उमेदवार निवडून आले होते. भारतीय कम्युनिस्ट पक्षाकडून काँग्रेसकडे (१९९९) काँग्रेसकडून राष्ट्रवादीकडे (१९९९, २००४, २००९) हा मतदारसंघ या पक्षाकडे कायम राहिला.

राहुरी विधानसभा मतदारसंघात राहुरी नगरपालिका, अहमदनगर तालुक्यातील एका मंडलांचा व पाथर्डी तालुक्यातील एका मंडलांचा समावेश करण्यात आला. राहुरीतील देवळालीप्रवरा ही नगरपालिका या मतदारसंघातून वगळण्यात आली. त्यामुळे हा मतदारसंघ राहुरी, अहमदनगर व पाथर्डी यांच्याशी संबंधित तयार झाला. या मतदारसंघातून सातत्याने मराठा समाजाचे उमेदवार निवडून आले होते. मराठा समाजाअंतर्गत राजकीय स्पर्धा या विधानसभा मतदारसंघात आहे. त्यामुळे अपक्षाकडून काँग्रेसकडे (१९९० व १९९५) काँग्रेसकडून राष्ट्रवादीकडे (२००४) व राष्ट्रवादीकडून भाजपकडे (२००९) हा मतदारसंघ सरकला आहे.

पारनेर विधानसभा मतदारसंघात पारनेर तालुक्याखेरीज अहमदनगर तालुक्यातील दोन मंडलांचा समावेश करण्यात आला. त्यामुळे पारनेर, अहमदनगर यांचा मतदारसंघ तयार झाला. पारनेर विधानसभा मतदारसंघातून मराठा जातीचे उमेदवार

सातत्याने निवडून आले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाकडून काँग्रेसकडे (१९९०, १९९५), काँग्रेसकडून राष्ट्रवादीकडे (१९९९), राष्ट्रवादीकडून शिवसेनेकडे (२००४, २००९) हा मतदारसंघ सरकलेला आहे.

अहमदनगर शहर या विधानसभा मतदारसंघात अहमदनगर महापालिका व अहमदनगर सी. बी. चा समावेश केला आहे. या मतदारसंघात फार मोठे बदल झाले नाहीत. अहमदनगरची शहरी लोकसंख्या ३,७५,९५७ आहे. त्यामुळे हा मतदारसंघ शहरी आहे. अनुसूचित जातींची लोकसंख्या ४६,६९२ आहे. या शिवाय शहरात ख्रिश्चन, मुस्लिम समाजाची लोकसंख्या प्रभावी ठरते. शिवाय शहरात सिंधी, मारवाडी, मराठा, माळी हे समाजघटक प्रभावी ठरतात. परंतु या शहरात हिंदू व मुस्लिम असे धार्मिक मुद्दावर मतदारांचे ध्रुवीकरण घडते. या मतदारसंघावर शिवसेनेचे नियंत्रण होते. (१९९० ते २००९) या मतदारसंघात एकदाही मराठा समाजाचा उमेदवार निवडून आला नाही तर राजपूत समाजाचे उमेदवार निवडून आले आहेत.

श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघात श्रीगोंदा तालुक्याखेरीज अहमदनगर तालुक्यातील दोन महसूल मंडलांचा समावेश करण्यात आला आहे. जुन्या श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघातील कर्जत तालुक्यातील मिरजगाव हे मंडल वगळण्यात आले. या दोन बदलामुळे या मतदारसंघाचे स्वरूप जवळजवळ ५० टक्कापर्यंत बदलले. श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघातून मराठा जातीचा उमेदवार सातत्याने निवडून आलेला होता. मात्र पक्षीय पातळीवर या मतदारसंघात सतत बदल झालेला दिसतो. काँग्रेसकडून जनता दलाकडे (१९९०) जनता दलाकडून काँग्रेसकडे (१९९५ व १९९९) व काँग्रेसकडून राष्ट्रवादीकडे (२००४ व २००९) असे पक्षीय बदल येथे झाले. परंतु या मतदारसंघात राजकीय स्पर्धा मराठा जातीअंतर्गत राहिली असे दिसते.

कर्जत—जामखेड या दोन तालुक्यांचा मिळून हा मतदारसंघ तयार झाला आहे. या विधानसभा मतदारसंघात जामखेडची लोकसंख्या १,३४,२१६ आहे. तर कर्जतची लोकसंख्या २,०५,६३४ आहे. म्हणजे जामखेडपेक्षा कर्जत वरचढ आहे. परंतु जामखेड

व कर्जत अशी नेतृत्वाची राजकीय स्पर्धा राहण्याची चिन्हे दिसतात. जामखेड तालुक्यात २७,६५४ (२०.६ टक्के) लोकसंख्या शहरी आहे, तर कर्जतची संपूर्ण लोकसंख्या ग्रामीण आहे. त्यामुळे या मतदारसंघाचे स्वरूप ग्रामीण असेल. या अगोदर कर्जत हा मतदारसंघ अनुसूचित जातींसाठी राखीव होता. कर्जत तालुक्यात २७,८२० (१३.५ टक्के) लोकसंख्या अनुसूचित जातींची आहे. तर जामखेडमध्ये १६,०७१ (१२ टक्के) आहे. ती या मतदारसंघात प्रभावी ठरणारी आहे. कर्जत व जामखेड या दोन्ही तालुक्यांत अनुसूचित जमातींची लोकसंख्या प्रभावी ठरणारी नाही. या मतदारसंघावर काँग्रेस पक्षाचे नियंत्रण होते (१९९०). काँग्रेस पक्षाकडून हा मतदारसंघ भाजपकडे सरकला. (१९९५ ते २००९) नवबौध्द (१९९०) व चर्मकार (१९९५ ते २००४) या समाजाचे उमेदवार या मतदारसंघातून निवडून आले होते. (२००९) मध्ये भाजपतर्फे मराठा समाजाचा उमेदवार निवडून आला.

अहमदनगर जिल्ह्यातील अकोले विधानसभा मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे. पुनर्रचनेनंतरही तो तसाच राखीव राहिला. या मतदारसंघात संगमनेर तालुक्यातील एका मंडलांचा समावेश करण्यात आला. या मतदारसंघात बदल झाला नाही. अकोले तालुक्यातील लोकसंख्या २,६६,६३८ आहे. ती ग्रामीण आहे. तर अनुसूचित जातींची ११,२३४ (४५.६ टक्के) लोकसंख्या अनुसूचित जमातींची आहे. या दोन घटकाखेरीजची लोकसंख्या १,३३,८३८ (५० टक्के) आहे. यामुळे अनुसूचित जमातींच्या नेतृत्वावर अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीखेरीजच्या जाती गटांचे नियंत्रण राहणार, असे स्पष्टपणे दिसते. त्यामुळे अकोले विधानसभा मतदारसंघाकडून पुढे येणारे नेतृत्व प्रस्थापित पक्षावर अवलंबून राहिल. या मतदारसंघाकडून काँग्रेस पक्षाचे नियंत्रण होते. (१९९० ते १९९५) काँग्रेसकडून हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसकडे सरकला होता. (१९९९ ते २००९)

संगमनेर तालुक्यातील लोकसंख्या ४,४१,४३९ आहे. यापैकी अकोले मतदारसंघास एक मंडल व शिर्डी मतदारसंघास एका मंडलाचा समावेश केला. संगमनेर ग्रामीण व नगरपरिषदेतील शहरी लोकसंख्या या विधानसभा मतदारसंघात समाविष्ट केली. जुन्या मतदारसंघातील फक्त एक मंडल वगळले. हा एकमेव बदल या मतदारसंघात झाला. संगमनेर तालुक्यात ८१,२३५ (१८.४ टक्के) लोकसंख्या शहरी आहे. त्यामुळे संगमनेरमधील शहरी लोकसंख्येचे महत्त्व वाढले. यामुळे या मतदारसंघाचे स्वरूप निमग्रामीण, निमशहरी स्वरूपाचे दिसते. या मतदारसंघात शहरी व ग्रामीण अशी राजकीय स्पर्धा राहणार असे दिसते. संगमनेरमध्ये अनुसूचित जातींची लोकसंख्या ८.१ टक्के व अनुसूचित जमातींची लोकसंख्या ९.४ टक्के आहे. संगमनेर विधानसभा मतदारसंघातून मराठा समाजाचे उमेदवार सातत्याने निवडून आले. (१९९० ते २००९) या मतदारसंघावर काँग्रेस पक्षाचे नियंत्रण राहिले आहे.

शिर्डी विधानसभा मतदारसंघात मुख्यत: राहता तालुक्याचा समावेश केला गेला. राहता मधील तीन मंडले ग्रामीण आहेत. तर शिर्डी व राहता दोन नगरपरिषदा शहरी आहेत. याशिवाय संगमनेर तालुक्यातील एका मंडलाचा समावेश करण्यात आला. या मतदारसंघात मराठा जातीअंतर्गत स्पर्धा आहे. तरीही या मतदारसंघातून सातत्याने मराठा जातीचे उमेदवार निवडून आले. या मतदारसंघावर काँग्रेस पक्षाचे नियंत्रण होते. (१९९० ते २००९) अपवाद फक्त १९९९ चा दिसतो. शिवसेनेने १९९९ मध्ये या मतदारसंघात शिरकाव केला होता.

कोपरगाव विधानसभा मतदारसंघ हा संपूर्ण कोपरगांव तालुक्याचा आहे. त्यामुळे शिर्डी विधानसभा मतदारसंघात असलेली गावे पुनर्रचनेनंतर या मतदारसंघास जोडली गेली. कोपरगाव तालुक्याची लोकसंख्या २,७७,१७० आहे, परंतु राहता तालुक्याला या मतदारसंघात हस्तक्षेप करण्याची संधी मिळाली. कोपरगावची ७०,८३० (२५.६ टक्के) लोकसंख्या शहरी आहे. यामुळे हा मतदारसंघ ग्रामीण असला तरी शहरी मतदारांचा

प्रभाव राहिल. या मतदारसंघात अनुसूचित जातींची लोकसंख्या ३५,३१६ (१२.७ टक्के) तर अनुसूचित जमातींची लोकसंख्या २७,४५७ (९.९ टक्के) होती. दोन्हींचे राजकारण या मतदारसंघावर प्रभाव टाकणारे आहे. कोपरगाव विधानसभा मतदारसंघातून मराठा समाजाचे उमेदवार सातत्याने निवडून आले आहेत. या मतदारसंघावर काँग्रेसचे नियंत्रण होते. (१९९० ते १९९५) काँग्रेसकडून हा मतदारसंघ राष्ट्रवादीकडे सरकला. (१९९९) राष्ट्रवादीकडून शिवसेनेकडे (२००४, २००९) या मतदारसंघात मराठा समाजाअंतर्गत राजकीय स्पर्धा राहिली आहे.

श्रीरामपूर हा अनुसूचित जातींसाठी राखीव मतदारसंघ आहे. या मतदारसंघात श्रीरामपूर तालुक्याखेरीज राहुरी तालुक्यातील एका मंडलाचा व राहुरी नगरपरिषदेचा समावेश केला गेला. श्रीरामपूर तालुक्यातील लोकसंख्या २,५६,४५८ आहे. यापैकी ४८,७०० (१९ टक्के) अनुसूचित जातींची आहे. त्यामुळे हा मतदारसंघ राखीव झाला. श्रीरामपूर तालुक्यात २००१च्या जनगणनेनुसार १४,०१६ (५.५ टक्के) लोकसंख्या अनुसूचित जमातींची होती. या तालुक्यात ८८,७६१ (३४.६ टक्के) लोकसंख्या शहरी आहे. याशिवाय देवळाली प्रवरा नगरपरिषदेची ३०,३४० शहरी लोकसंख्या या मतदारसंघात गेली. त्यामुळे या मतदारसंघात ३५.४४ टक्के लोकसंख्या शहरी आहे. याचाच अर्थ हा मतदारसंघ निमशहरी व निमग्रामीण स्वरूपाचा आकाराला आला. या दोन घटकांमध्ये येथे स्पर्धा राहिल असे चित्र दिसते. श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघातून मराठा (१९९०, १९९५), माळी (१९९९, २००४) व चर्मकार (१९९०) समाजाचे उमेदवार निवडून आले होते. काँग्रेस पक्षाकडून हा मतदारसंघ जनता दलाकडे (१९९०) व जनता दलाकडून काँग्रेसकडे (१९९५, २००४, २००९) सरकला होता. या मतदारसंघात मराठा, माळी व चर्मकार जातीगटांचे उमेदवार निवडून आले. (पहा तक्ता क्र. ४.२८)

नेवासा विधानसभा मतदारसंघ केवळ एका तालुक्याचा तयार झाला आहे. तो नव्याने तयार झाला आहे. या अगोदर नेवासा तालुक्याचा समावेश अहमदनगर उत्तर व शेवगाव विधानसभा मतदारसंघात होता. नेवासा तालुक्याची संपूर्ण लोकसंख्या ग्रामीण आहे. (३,२६,६९८) या तालुक्यात शहरी व ग्रामीण अशी स्पर्धा नसेल. मात्र या मतदारसंघात ४५,७५७ (१४ टक्के) लोकसंख्या अनुसूचित जातींची आहे. तर १५,७२० लोकसंख्या अनुसूचित जमातींची आहे. (४.८टक्के) त्यामुळे हे दोन्ही घटक प्रभावी ठरणारे दिसतात. हा मतदारसंघ नव्याने तयार झाल्यामुळे मराठा समाजाचा राष्ट्रवादी काँग्रेसकडून (२००९) हा मतदारसंघ राहिला.

**तक्ता क्र. ४.२८**

**अहमदनगर विधानसभा निवडणूक (२००९)**

| **अ.क्र** | **मतदारसंघ** | **राजकीय पक्ष** | **जाती** |
|---|---|---|---|
| १ | अकोले (अ.जा) | राष्ट्रवादी काँग्रेस | महादेव कोळी |
| २ | संगमनेर | काँग्रेस | मराठा |
| ३ | शिर्डी | काँग्रेस | मराठा |
| ४ | कोपरगांव | शिवसेना | मराठा |
| ५ | श्रीरामपूर (अ.जा) | काँग्रेस | चर्मकार |
| ६ | नेवासा | राष्ट्रवादी काँग्रेस | मराठा |
| ७ | शेवगांव | राष्ट्रवादी काँग्रेस | मराठा |
| ८ | राहुरी | भाजप | मराठा |
| ९ | पारनेर | शिवसेना | मराठा |
| १० | अहमदनगर (शहर) | शिवसेना | राजपुत |
| ११ | श्रीगोंदा | राष्ट्रवादी काँग्रेस | मराठा |
| १२ | कर्जत—जामखेड | भाजप | मराठा |

आधार : विविध राजकीय नेतृत्वाच्या मुलाखतीच्या आधारे जमवलेली माहिती

## लोकसभा निवडणूक आणि अहमदनगर जिल्हा

१९९१च्या लोकसभा निवडणुकीत कोपरगाव व अहमदनगर हे दोन मतदारसंघ होते. दोन्हीही मतदारसंघात काँग्रेस पक्षाचे व मराठा जातीगटांचे खासदार निवडून आले होते. काँग्रेस पक्षाचे या दोन मतदारसंघात पक्षीय नियंत्रण दिसते तर मराठा प्रभुत्वशाली जातीगटाचे नियंत्रण खासदार होते. १९९६च्या लोकसभा निवडणुकीत कोपरगाव मतदारसंघातून भाजपाचा उमेदवार निवडून आला तर अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून काँग्रेस पक्षाचा उमेदवार निवडून आला. दोन्हीही पक्षांनी पक्षीय पातळीवर स्वतंत्रपणे निवडणुका लढविल्या. काँग्रेसच्या गटाने भाजपाला मदत केल्यामुळे काँग्रेसचा पराभव झाला. परंतु जातीगटांच्या पातळीवर दोन्ही मतदारसंघातून मराठा जातींचे उमेदवार निवडून आले होते.

१९९९च्या लोकसभा निवडणुकीत अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव व अहमदनगर लोकसभा मतदारसंघाकडून शिवसेना, भाजपा या दोन पक्षाचे उमेदवार निवडून आले होते. पक्षीय पातळीवर दोन्ही पक्षांनी स्वतंत्रपणे निवडणुका लढविल्या. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या पक्षीय गटातून शिवसेना व भाजप पक्षाचे सदस्य निवडून आले. शिवसेनेच्या उमेदवारास काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या नाराज कार्यकर्त्यांनी निवडून दिले. तर अहमदनगर येथून भाजपच्या उमेदवारास काँग्रेसच्या गटांनी पाठिंबा दिला. मराठा व मारवाडी जातीगटांच्या या निवडणुकीत प्रभाव दिसून येतो. जिल्हा राजकारणात प्रभावी नेतृत्व असणारे विखे पाटील बाळासाहेब यांनी शिवसेनेकडून उमेदवारी केली असल्याने कोपरगाव मतदारसंघातून त्यांचा सहज विजय झाला होता. २००४ च्या लोकसभा निवडणुकीत कोपरगाव मतदारसंघातून काँग्रेसचे मराठा जातींगटाचे उमेदवार निवडून आले. तर अहमदनगर मतदरासंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे मराठा जातीगटाचे सदस्य निवडून आले. (पहा तक्ता क्र. ४.२९)

२००९ च्या लोकसभा निवडणुकीसाठी कोपरगांव मतदारसंघ रद्द होऊन शिर्डी हा मतदारसंघ तयार झाला. तर अहमदनगर मतदारसंघात चार बदल झाले. शेवगाव, राहुरी, पारनेर, अहमदनगर शहर, श्रीगोंदा, कर्जत—जामखेड या सहा विधानसभा मतदारसंघाचा समावेश झाला. राहुरी व पारनेर हे दोन विधानसभा मतदारसंघ या मतदारसंघात समाविष्ट करण्यात आले. अहमदनगर शहर व पाच ग्रामीण विधानसभा मतदारसंघात अशी रचना तयार झाली. शहर व ग्रामीण असे मतांचे ध्रुवीकरण बदलले जाईल. त्यामुळे अहमदनगर लोकसभा मतदारसंघात भाजप पक्षाचा व मारवाडी जातीगटाचा उमेदवार निवडून आला.

शिर्डी लोकसभा मतदारसंघात अकोले, संगमनेर, शिर्डी, कोपरगाव, श्रीरामपूर व नेवासा या सहा विधानसभा मतदारसंघाचा समावेश केला आहे. जुन्या कोपरगाव लोकसभा मतदारसंघाऐवजी शिर्डी हा लोकसभा मतदारसंघ तयार केला. हा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव झाला. संगमनेर, शिर्डी, कोपरगांव व श्रीरामपूर हे जुन्या लोकसभा मतदारसंघातील विधानसभा मतदारसंघ कायम राहिले. त्यामुळे या मतदारसंघात केवळ ३० टक्के बदल झाले. अकोले व नेवासा या दोन विधानसभा मतदारसंघात समावेश करण्यात आला. राहुरी व पारनेर विधानसभा मतदारसंघ वगळण्यात आले. अकोले विधानसभा मतदारसंघ समाविष्ट करण्यात आला. अकोले अनुसूचित जमातीसाठी व श्रीरामपूर अनुसूचित जातीसाठीचे राखीव मतदारसंघ शिर्डी लोकसभा मतदारसंघात समाविष्ट करण्यात आले. त्यामुळे या मतदारसंघात शिवसेनेचा चर्मकार जातीगटाचा कॉंग्रेस पक्षाच्या मदतीने उमेदवार निवडून आला आहे. (पहा तक्ता क्र. ४. २९)

## तक्ता क्र. ४.२९

## अहमदनगर जिल्ह्यातील खासदारांचे राजकीय पक्ष व जातीगटाचे वर्गीकरण

| निवडणूक वर्ष | राजकीय पक्ष | मतदारसंघ | जाती |
|---|---|---|---|
| १९९१ | कॉंग्रेस | कोपरगाव | मराठा |
| | कॉंग्रेस | अहमदनगर | मराठा |
| १९९६ | भाजप | कोपरगाव | मराठा |
| | कॉंग्रेस | अहमदनगर | मराठा |
| १९९९ | शिवसेना | कोपरगाव | मराठा |
| | भाजप | अहमदनगर | मारवाडी |
| २००४ | कॉंग्रेस | कोपरगाव | मराठा |
| | राष्ट्रवादी कॉंग्रेस | अहमदनगर | मराठा |
| २००९ | शिवसेना | शिर्डी (अ.जा) | चर्मकार |
| | भाजप | अहमदनगर (शहर) | मारवाडी |

आधार : विविध राजकीय नेतृत्वाच्या मुलाखतीच्या आधारे जमवलेली माहितीचा आधार

टीप : अहमदनगर लोकसभा मतदारसंघ शेवगाव, राहुरी, पारनेर, अहमदनगर शहर, श्रीगोंदा, कर्जत–जामखेड या सहा विधानसभा मतदारसंघाचा समावेश केला आहे. या लोकसभा मतदारसंघात चार बदल झाले. १. राहुरी व पारनेर या दोन विधानसभा मतदारसंघाचा नव्याने समावेश करण्यात आला. २. एक विधानसभा मतदारसंघ शहरी व पाच ग्रामीण अशी नवीन रचना निर्माण झाली. ३. ग्रामीण भाग वाढल्यामुळे हिंदु–मुस्लिम ध्रुवीकरण जुने धोरण बदलले जाईल. ४. शिर्डी लोकसभा मतदारसंघ राखीव असल्यामुळे बागायती भागातील नेतृत्व जिरायती भागाकडे सरकल्याने येथे नवे समीकरण घडणार आहे.

## पक्षीय कार्यकारणीतील नेतृत्व

अहमदनगर जिल्ह्यात २०१०—२०११ मधील प्रमुख राजकीय पक्षांचे अध्यक्ष व त्यांच्या जातीगटाचे वर्गीकरण (पहा तक्ता क्र. ४.३०) मध्ये नमूद केले आहे. महाराष्ट्राचे राजकारण मराठा वर्चस्वासाठी प्रसिध्द् आहे. वसाहती काळाच्याही आधीपासून मराठा समाजात जातिभान आणि नेतृत्वाची महत्त्वकांक्षा कशी होती हे जयंत लेले यांनी दाखविले आहे. अहमदनगर जिल्ह्याच्या राजकारणात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, भाजप, मनसे, समाजवादी पक्ष, बसपा व जनता दल असे पक्षीय राजकारण दिसते. १९९९ मध्ये शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली व काँग्रेस पक्षातील शरद पवार यांना मानणारा गट राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आला. त्यामुळे दोन्ही पक्ष सामाजिक व आर्थिक आधारावर जिल्ह्याचे राजकारण करू लागले. भाजप, शिवसेना या पक्षांनी स्वतंत्रपणे पक्षीय राजकारण केले. काँग्रेस विरोधी भूमिका घेऊन जिल्ह्याचे राजकारण केले. मनसे, समाजवादी पक्ष व बहुजन समाज पक्ष यांचे सुध्दा स्वतंत्रपणे पक्षीय राजकारण पुढे येते.

जिल्ह्यातील प्रमुख राजकीय पक्षांच्या अध्यक्षांचे जातीगट हे प्रभावीशाली जातीतून पुढे आले. काँग्रेस पक्षांने भास्करराव डिक्कर यांना कोष्टी जातीगटांतून पुढे आणले. तर राष्ट्रवादी, भाजप, शिवसेना, मनसे यांनी मराठा जातीगटांकडे जिल्ह्याचे नेतृत्व दिले. समाजवादी पक्ष मुस्लिम तर बसप नवबौध्द जातीगटातून जिल्ह्याचे पक्षीय राजकारण करताना दिसून येतात.

### तक्ता क्र. ४.३०

## अहमदनगर जिल्ह्यातील प्रमुख राजकीय पक्षांचे अध्यक्ष : जातीगटांचे वर्गीकरण (२००९—२०१०)

| अ.क्र | राजकीय पक्ष | जिल्हा अध्यक्ष | जाती |
|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | डिक्कर भास्करराव | कोष्टी |
| २ | राष्ट्रवादी काँग्रेस | शेलार घन:श्याम | माळी |
| ३ | शिवसेना | गाडे शशिकांत | मराठा |
| ४ | भाजप | लंघे विठ्ठलराव | मराठा |
| ५ | मनसे | शेळके आनंदराव | मराठा |
| ६ | समाजवादी पक्ष | खान अबिद | मुस्लिम |
| ७ | बसपा | मोहोळ अनिल | नवबौध्द |

आधार : विविध राजकीय नेतृत्वाच्या मुलाखतीच्या आधारे जमवलेली माहिती

**सारांशरूपाने** असे दिसून येते की, अहमदनगर जिल्हा राजकारणातील नेतृत्वामध्ये काँग्रेस पक्षाचे १९९० पर्यंत पुणेपणे वर्चस्व राहिले असल्याचे दिसून येते. इतर पक्षामध्ये सीपीआय, जनता दल आणि भारतीय जनसंघ या पक्षाच्या नेतृत्वाने स्पर्धा करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. मात्र या पक्षाच्या नेतृत्वाला काही मतदारसंघातील अपवाद वगळता नेतृत्व यशस्वी करता आले नाही. काँग्रेस पक्षामध्ये देखील विधानसभा मतदारसंघ पातळीवरील नेतृत्व मर्यादित होत असतानाच विविध माध्यमातून संस्थात्मक बांधणी, विकास कामाच्या आधारे सातत्याने निवडून येत असल्याचे दिसून येते. मात्र त्याच एकाच मतदारसंघ पातळीवर दोन घराण्यातून नेतृत्व पुढे येत होते. परिणामी १९७८ नंतर प्रत्येक मतदारसंघ पातळीवर स्पर्धा निर्माण होत होती. एक प्रकारे नेतृत्वाच्या माध्यमातून लोकशाहीकरण होत असल्याचे स्पष्ट होत होते. पण त्याचवेळी

नेतृत्वाच्या माध्यमातून हळूहळू घराणेशाही पुढे येत गेली. परिणामी १९९० नंतर मतदारसंघ पातळीवर घराणेशाही आणि पक्षनिष्ठा कमी पडत गटबाजी आणि पक्षांतर घडून येण्याचे प्रमाण वाढले. त्यास घराणेशाही हे एक कारण होते. त्याच प्रमाणे भाजप आणि घराणेशाहीच्या विरोधात उभे राहिलेला शिवसेना या पक्षाचा प्रवेश हा १९९० नंतर राजकीय नेतृत्वातील स्पर्धा तीव्र करण्यास पुढे आला. मात्र शिवसेनेच्या माध्यमातून देखील नेतृत्वाचा प्रस्थापित नेतृत्व आणि घराणेशाही ही काँग्रेसकडून आलेली दिसून येते. कारण शिवसेनेतील अनेक नेतृत्व हे काँग्रेसच्या घराणेशाहीकडून आले होते. अपवाद काही मतदारसंघाचा होता. मात्र घराणेशाहीकडून न आलेले नेतृत्वाला राजकारणात जम बसवता आला नाही. १९९० नंतर असे दिसून येते की, पक्ष निष्ठेपेक्षा राजकीय सत्ता, अधिकार टिकवणे ह्या बाबी पुढे आलेल्या आहेत.

# प्रकरण – ५

# अहमदनगर जिल्ह्यातील आर्थिक विकास आणि नेतृत्व

अहमदनगर जिल्ह्यातील आर्थिक विकासाचा विचार करता तीन क्षेत्रात वाढ झालेली दिसून येते. एक म्हणजे शेती क्षेत्र आणि दुसरे सहकार क्षेत्र आणि तिसरे म्हणजे औद्योगिक विकास. शेती क्षेत्रातील उत्पादन वाढ आणि नगदी पिकांच्या वाढीने आर्थिक क्षेत्र वाढलेले आहे. त्याचे कारण म्हणजे विविध पाणी प्रकल्प तयार करण्यात आले. त्या प्रकल्पाच्या आधारे शेतीक्षेत्रातील सिंचन वाढले. परिणामी लोक शेतीत नगदी पिकांकडे वळलेला दिसून येतो. त्याच बरोबर सहकार क्षेत्र दोन माध्यमातून वाढलेले आहे. एक म्हणजे साखर कारखाने आणि दुसरे म्हणजे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक. या दोन माध्यमातून अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्र वाढलेले आहे.

अहमदनगर जिल्हा राजकीय नेतृत्व विकसित होण्यासाठी सहकार क्षेत्राचे मोठे योगदान आहे. सहकारी क्षेत्रात जिल्ह्यात एकूण १८ सहकारी साखर कारखाने आहेत. तर दोन खाजगी सहकारी साखर कारखाने आहेत. या शिवाय कृषि क्षेत्राचा देखील विकास हा चांगल्या प्रकारे घडून आला आहे. जिल्हात कृषि क्षेत्रात नगदी पिके घेण्याचे प्रमाण जास्त असताना दिसून येते. कर्जत, जामखेड, पाथर्डी, अहमदनगर, पारनेर हे तालुके कोरडवाहू शेती करणारे आहे. इतर तालुक्यात सिंचन क्षेत्राचा विकास हा झाल्याने बागायती पिके घेण्याचे प्रमाण जास्त आहे.

## संस्थात्मक आर्थिक विकास

अहमदनगर जिल्हा जरी कृषि क्षेत्रात जास्त प्रमाणावर मोडत असला तरी संस्थात्मक आधारे चांगल्या प्रकारे विकास साधन्याचा प्रयत्न झालेला आहे. त्यात सहकारी संस्थाचा विकास हा जास्त प्रमाणात झालेला आहे. त्याच प्रमाणे काही परिसरात खाजगी क्षेत्राचा देखील विकास हा झालेला दिसून येतो. दूध आणि साखर उद्योगाचा

विकास सहकार क्षेत्रात झालेला असला तरी इतर उद्योग हे खाजगी क्षेत्रातून वाढलेले आहेत. काही उद्योग हे राजकीय नेतृत्वाच्या माध्यमातून खाजगी तत्वावर पुढे आले आहेत. उदा. तेल उत्पादन.

अहमदनगर जिल्हा हा कृषि प्रधान असल्याने या जिल्ह्यात प्रामुख्याने कृषि क्षेत्राशी संबंधित असलेल्या संस्थाची वाढ झालेली दिसून येते. त्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही एक आहे. तर प्राथमिक कृषि सहकारी संस्था ह्या १२८५ आहेत. आदिवासी सहकारी संस्था ३८ व इतर संस्था २ अशा जिल्ह्यात कार्यरत आहेत. एकूण १३२६ कृषि संस्था ह्या कार्यरत आहेत. एक प्रकारे कृषि क्षेत्रातील संस्थात्मक विकास हा झालेला दिसून येतो. या संस्थाची अंतर्गत कार्यप्रणाली ठरवून कृषि क्षेत्राशी संबंधित कर्ज देण्याचे कार्य ह्या संस्था करत आहेत. (पहा तक्ता क्र. ५.१)

**तक्ता. क्र. ५.१**

**जिल्ह्यातील एकूण कृषि पतसंस्था**

| अ.क्र | कृषि पतसंस्था | संस्था संख्या |
|---|---|---|
| १ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | ०१ |
| २ | प्राथामिक कृषि सहकारी संस्था | १२८५ |
| ३ | आदिवासी सहकारी संस्था | ३८ |
| ४ | इतर | ०२ |
| ५ | एकूण | १३२६ |
| आधार : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१०–२०११ | | |

## बिगर कृषि पतसंस्था

अहमदनगर जिल्हा हा जरी कृषि क्षेत्राचा जिल्हा अशी ओळख असली तरी एकूण ११४९ बिगर कृषि संस्था ह्या कार्यरत आहेत. त्यात नागर बँकांची संख्या ही २० आहे. तर नागर पतसंस्थाची संख्या ही ९१२ आहे. या शिवाय कर्मचारी पतसंस्था २१७ आहेत. या संस्था हा राजकीय नेतृत्वाच्या आश्रयाने निर्माण झालेल्या आहेत. या संस्था निर्माण करण्यासाठी स्थानिक पातळीवर राजकीय नेतृत्वाने पुढाकार घेत नागरी समाजास कर्ज उपलब्ध करण्याचे कार्य करत आहेत. एक प्रकारे नागरी पातळीवर देखील संस्थात्मक उभारणी ही राजकीय नेतृत्वाच्या आश्रयाने आणि पुढाकाराने झालेली आहे.

**तक्ता क्र. ५.२**

**जिल्ह्यातील बिगर कृषि पतसंस्था**

| अ.क्र | बिगर कृषि संस्था | संस्था संख्या |
|---|---|---|
| १ | नागरी बँक | २० |
| २ | नगरी पतसंस्था | ९१२ |
| ३ | कर्मचारी पतसंस्था | २१७ |
| ४ | एकूण | ११४९ |

आधार : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१०–२०११

## उत्पादक सहकारी संस्था उभारणी

अहमदनगर जिल्ह्यात सहकार, खाजगी अशा स्वरूपात एकूण ४५१७ संस्था कार्यरत आहेत. त्यात साखर कारखाने हे प्रत्यक्षात १५ चालू आहेत. तर ५ साखर कारखाने बंद आहेत. साखर कारखान्यातून ऊस या कृषि पिकांपासून साखरेचे उत्पादन घेण्यात येते. यात जामखेड तालुक्याचा अपवाद वगळता इतर सर्व तालुक्यात साखर कारखाने आहेत. साखर कारखाना हे शेती उत्पादन वाढीतून शेतकऱ्यांना आर्थिक फायदा

करून देणारे उत्पादन संस्था आहे. ऊस उत्पादन घेणारा शेतकरी हा शेअर्सच्या आधारे साखर कारखान्यांशी जोडला जातो. परिणामी साखर कारखान्यांना त्या शेअर्सधारकांचा ऊस पिकांचे गाळप करणे अनिवार्य बनते. त्यामुळे साखर कारखान्यांच्या माध्यमातून, उत्पादक संस्थाच्या माध्यमातून अहमदनगर जिल्ह्यात निर्माण झालेले आहे. साखर कारखाना उभारणीत राजकीय नेतृत्वाचा पुढाकार राहिलेला आहे. त्यामुळे उत्पादक संस्थामध्ये शेतकरी वर्गाचे संस्थात्मिकीकरण करण्यात राजकीय नेतृत्वाचा पुढाकार राहिलेला आहे.

इतर शेती प्रक्रिया करणाऱ्या ७ संस्था आहेत. विणकर संस्था ह्या ३ आहेत . या दोन्ही संस्थाच्या माध्यमातून फार थोड्या प्रमाणात शेतकऱ्यांचे संस्थात्मिकीकरण झालेले आहे. मात्र ह्या संस्था स्थानिक पातळीवर राजकीय नेतृत्वाला पाठिंबा देण्यासाठी महत्त्वपुर्ण संस्था राहतात.

औद्योगिक वसाहती ७ आहेत. त्यात अहमदनगर, नेवासा, संगमनेर, राहता, सुपा, श्रीरामपूर, शिर्डी आणि कोपरगाव या ठिकाणी या औद्योगिक वसाहती उभारण्यात आल्या आहेत. ग्रामीण भागात औद्योगिक वसाहती उभारणी करण्याची प्रक्रिया ही राजकीय नेतृत्वाच्या पुढाकाराने चालू आहे. त्याचे उत्तम उदाहरण हे नेवासा औद्योगिक वसाहतीचे आहे. नेवासा या तालुक्यातील औद्योगिक वसाहत गडाख घराण्यातील नेतृत्वाच्या पुढाकारातून साकारत आहे. ही औद्योगिक वसाहत ही २००० नंतर विकसित होत आहे. नियोजनबध्द् अशी ही वसाहत आहे. इतर तालुक्यात राजकीय नेतृत्व पुढाकार घेत आहे. त्यात विखे पाटील घराणे, थोरात घराणे या घराण्यांनी काही प्रमाणात औद्योगिक विकास तालुका पातळीवर पुढे आणण्यासाठी प्रयत्न करत आहेत. इतर तालुक्यात पाहिजे त्या प्रमाणात औद्योगिक विकासास नेतृत्वाकडून पाहिजे त्या प्रमाणात पुढाकार झालेले नाही. ग्रामीण भागात औद्योगिक संस्था निर्माण करण्याचे श्रेय हे विखे पाटील आणि थोरात घराण्यांकडे जाते. अहमदनगर जिल्हाच्या ठिकाणावर काही प्रमाणात औद्योगिक विकास करण्यासाठीचे प्रयत्न झाले. पहिल्या टप्प्यात यश आले. मात्र

नंतरच्या काळात यश आले नाही. औद्योगिक संस्थापेक्षा सेवा क्षेत्राच्या बाजूने राजकीय नेतृत्वाचा कल राहिल्याने काहीसे अपयश आलेले दिसून येते. औद्योगिक विकास क्षेत्र संस्थामध्ये इतर संस्था ६२ कार्यरत आहेत.

अहमदनगर जिल्ह्यात सहकार आणि खाजगी अशा दोन्ही पातळीवर दूध व्यवसाय संस्था कार्यरत आहेत. दूध उत्पादक आणि संकलण करण्यामध्ये २७७० संस्था कार्यरत आहेत. या संस्थांनी संपुर्ण जिल्हा व्यापलेला आहे. अनेक तालुक्यात दूध संघ खाजगी आणि सहकारी तत्वावर कार्यरत आहे. दूध प्रक्रिया केंद्र आणि संकलण अशा दोन्ही पातळीवर या संस्था कार्यरत आहेत. तालुका पातळीवर या दूध संस्थावर तालुक्याच्या राजकीय नेतृत्वाचे वर्चस्व आहे. तालुका पातळीवर देखील राजकीय नेतृत्वाच्या पुढाकाराने हे दूध संस्था निर्माण करणे/उभारणी करण्यात आलेली आहे.

अहमदनगर जिल्ह्यात मत्सव्यवसाय संस्था ह्या देखील कार्यरत आहेत. त्यांची संख्या ही ७३ आहे. या संस्था प्रकल्प परिसर आणि गोदावरी नदीच्या काठावर असलेल्या आहेत. पाणी उपसा जलसिंचन संस्थामध्ये ५७१ संस्था कार्यरत आहेत. तर इतर उत्पादक संस्थामध्ये ८२९ संस्था आहेत. एक प्रकारे उत्पादक संस्थांनी संपुर्ण जिल्हाभर जाळे निर्माण केलेले आहे. (पहा तक्ता क्र. ५.३)

**तक्ता क्र. ५.३**

**एकूण उत्पादक सहकारी संस्था**

| अ.क्र | कृषि पतसंस्था | संस्था संख्या |
|---|---|---|
| १ | साखर कारखाने | २० |
| २ | इतर शेती प्रक्रिया संस्था | ०७ |
| ३ | विणकर संस्था (हातमाग) | ०३ |
| ४ | औद्योगिक वसाहती | ०७ |
| ५ | इतर औद्योगिक संस्था | ६२ |
| ६ | दुग्ध व्यवसाय संस्था | २७७० |
| ७ | मत्स्यव्यवसाय संस्था | ७३ |
| ८ | उपसा जलसिंचन संस्था | ५७१ |
| ९ | इतर उत्पादक संस्था | ८२९ |
| १० | एकूण | ४५१७ |
| आधार : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१०—२०११ | | |

## सामाजिक सेवा सहकारी संस्था

अहमदनगर सामाजिक सेवा संस्थांनी लोकांना एकत्र ठेवण्याचे काम व्यवस्थितरित्या केलेले आहे. कारण जिल्ह्यात एकूणे २४४७ संस्था कार्यरत आहेत. सामाजिक आधारावर देखील एक प्रकारे संस्थात्मक बांधणी करण्याचे कार्य हे या संस्थांनी केले आहे. एक प्रकारे असे दिसून येते की, सामाजिक संस्था निर्माण होताना विविध समाज गटांची जोडणी व्यवस्थिरित्या झालेली आहे. सामाजिक संस्था गटामध्ये ग्राहक भांडारे संस्था ६१, गृहनिर्माण संस्था ६६४, कामगार कंत्राटदार संस्था ८२४ आहेत. इतर सहकारी संस्था ८९८ आहेत. या संस्था ह्या राजकीय नेतृत्वाच्या आश्रयाने

वाढलेल्या आहेत. राजकीय नेतृत्वाने स्थानिक पातळीवर पाठिंबा मिळवण्यासाठी सामाजिक आणि आर्थिक स्वरूपाचे मुल्य एका बाजूला असलेले आहे. त्याच वेळी राजकीय स्वरूपाचा पाठिंबा देखील मिळेल अशा स्वरूपात तयार करण्यात आलेल्या या संस्था आहेत. या संस्था विकासामध्ये राजकीय नेतृत्वाचा पुढाकार ज्या प्रकारे आहे त्याच प्रकारे योगदान देखील मोठे आहे. (पहा तक्ता क्र. ५.४)

**तक्ता क्र. ५.४**

**सामाजिक सेवा सहकारी संस्था**

| **अ.क्र** | **सामाजिक सेवा सहकारी संस्था** | **संस्था संख्या** |
|---|---|---|
| १ | ग्राहक भांडारे | ६१ |
| २ | गृहनिर्माण संस्था | ६६४ |
| ३ | कामगार कंत्राटदार संस्था | ८२४ |
| ४ | इतर सहकारी संस्था | ८९८ |
| ५ | एकूण | २४४७ |
| आधार : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१०—२०११ | | |

## सहकार क्षेत्रातील विकास आणि राजकीय नेतृत्व

अहमदनगर जिल्ह्यात प्रामुख्याने सहकार क्षेत्राचा मोठा विकास झालेला आहे. त्यात सहकारी साखर कारखाने आणि जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून गाव तेथे सहकारी सोसायटी असा विस्तार झालेला दिसून येतो. एकूण २० सहकारी साखर कारखाने आहेत. त्यात जामखेड या एकमेव तालुक्यात सहकारी साखर कारखाना नाही. नाहीतर इतर सर्व तालुक्यात साखर कारखाने असताना दिसून येतात. सातत्याने दुष्काळ असणारे कर्जत, श्रीगोंदा, पाथर्डी, पारनेर, अहमदनगर, शेवगाव तालुके आहेत. मात्र या तालुक्यात देखील सहकारी साखर कारखाने स्थापन करण्यात आलेले आहेत. त्यात

आश्चर्याची बाब अशी दिसून येते की, श्रीगोंदा हा दुष्काळी तालुका गणला जातो. मात्र याच तालुक्यात एकूण ४ साखर कारखाने आहेत. कोपरगाव, राहता या दोन तालुक्यात प्रत्येकी २ सहकारी साखर कारखाने आहेत. तर नेवासा तालुक्यात ३ सहकारी साखर कारखाने आहेत. अकोले, संगमनेर, श्रीरामपूर, पाथर्डी, अहमदनगर, कर्जत या तालुक्यात प्रत्येकी १ साखर कारखाना आहे. (पहा तक्ता क्र. ५.५) दुसरे असे की, प्रत्येक साखर कारखान्यांची गाळप क्षमतेपेक्षा जास्त साखरेचे गाळप करत असताना दिसून येते. त्यामुळे अहमदनगर जिल्ह्यात सहकार क्षेत्राचा विस्तार मोठ्या प्रमाणावर वाढलेला दिसून येतो. (पहा तक्ता क्र. ५.५ )

अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांची वाढ राजकीय नेतृत्वाच्या प्रभावाखाली झालेली आहे. प्रत्येक तालुक्यातील राजकीय नेतृत्वाने स्वत:चा प्रभाव वाढवण्यासाठी आणि संस्थात्मक आधार वाढवण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांची संस्थापना केलेली आहे. मात्र या साखर कारखान्याच्या स्थापनेमुळे ज्या प्रकारे राजकीय नेतृत्वाला संस्थात्मक आधार मिळालेला आहे. त्याच प्रमाणे शेतीचे सिंचन क्षेत्र वाढलेले आहे. परिणामी साखर उत्पादन हे पुर्ण क्षमतेनिशी करण्यात येते. जिल्ह्यामध्ये उत्पादक संस्थामध्ये साखर कारखाने कमी असले तरी साखर उत्पादनातून खूप मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यात येते. परिणामी जिल्ह्यामध्ये आर्थिक भांडवल हे मोठ्या प्रमाणावर येते. या आर्थिक भांडवलाने शेती क्षेत्रातील विकासाला गती आलेली आहे. जिल्ह्यातील साखर कारखाने उभारणीमध्ये पुर्णपणे जिल्हा नेतृत्वाचा सहभाग राहिलेला आहे.

- टीप : सहकार क्षेत्र विकास आणि अहमदनगर जिल्हा राजकारणातील नेतृत्व याचा सविस्तर आढावा ''सहकार क्षेत्र आणि राजकीय नेतृत्व'' या प्रकरणात घेतलेला आहे.

## तक्ता. क्र. ५.५

## सहकारी साखर कारखाना आणि उत्पादन क्षमतेचा आलेख

| अ.क्र | तालुका | सहकारी साखर कारखाना | गाळप क्षमता. मे. टन |
|---|---|---|---|
| १ | अकोले | अगस्ती सह. सा. कारखाना लि. अकोले | २५०० |
| २ | संगमनेर | संगमनेर भाग स.सा.का.लि. संगमनेर | ३५०० |
| ३ | कोपरगाव | कोपरगांव स.सा.का.लि. कोळपेवाडी | २५०० |
| ४ | कोपरगाव | संजीवनी स.सा.का.लि. कोपरगांव | ३२०० |
| ५ | राहता | पद्मश्री स.सा.का.लि. प्रवरानगर | ४००० |
| ६ | राहता | गणेश स.सा.का.लि. गणेशनगर, राहाता | १७५० |
| ७ | श्रीरामपूर | अशोक.स.सा.का.लि.अशोकनगर, श्रीरामपूर | २६०० |
| ८ | नेवासा | मुळा स.सा.का.लि. शेवगांव | ३५०० |
| ९ | नेवासा | केदारेश्वर स.सा.का.लि. शेवगांव | २५०० |
| १० | पाथर्डी | वृध्देश्वर स.सा.का.लि. तिसगांव पाथर्डी | २५०० |
| ११ | अहमदनगर | नगर स.सा.का.लि. वाळकी | २५०० |
| १२ | राहुरी | तनपुरे स.सा.का.लि. राहुरी | ४२५० |
| १३ | पारनेर | पारनेर स.सा.का.लि. देवीभोयरे | १२५० |
| १४ | श्रीगोंदा | श्रीगोंदा स.सा.का.लि. पिंपळगांव | ३५०० |
| १५ | श्रीगोंदा | साईकृपा स.सा.का.लि. देवदैठण, (खाजगी) | १२५० |
| १६ | श्रीगोंदा | कुकडी स.सा.का.लि. पिंपळगाव पिसा, श्रीगोंदा | २५०० |
| १७ | कर्जत | जगदंबा स.सा.का.लि. राशीन | ८०० |
| १८ | शेवगांव | गंगामाई स.सा.का.लि. शेवगांव | — |
| १९ | श्रीगोंदा | साईकृपा स.सा.का.लि. श्रीगोंदा | — |
| २० | नेवासा | ज्ञानेश्वर स.सा.का.लि. नेवासा | — |
| आधार : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१०—२०११ | | | |

## सिंचन विकास आणि राजकीय नेतृत्व

अहमदनगर जिल्हाकडे सातत्याने दुष्काळी जिल्हा म्हणून पाहिले जात होते. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात सिंचनाचे अहमदनगर जिल्ह्यात राजकीय नेतृत्वाच्या सहाय्याने मध्यम आणि मोठे प्रकल्प तयार करण्यात आल्याने सिंचनाच्या क्षेत्राची मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे दिसून येते. याशिवाय पुणे आणि नाशिक जिल्ह्यात निर्माण करण्यात आलेल्या प्रकल्पामुळे अहमदनगर जिल्ह्याच्या अनेक तालुक्यातील शेती सिंचनाखाली आलेली दिसून येते. त्यात मुख्यतः पुणे जिल्ह्यातील शिरूर आणि जुन्नर या दोन तालुक्यात तयार करण्यात आलेल्या प्रकल्पामुळे शेजारी पारनेर आणि श्रीगोंदा तालुक्याला फायदा झालेला दिसून येतो. तर नाशिक जिल्ह्यातील दिडोंरी तालुक्यात उभारण्यात आलेल्या प्रकल्पामुळे कोपरगाव, राहता व संगमनेर या तालुक्यातील शेती सिंचन वाढलेले आहे.

## भंडारदरा प्रकल्प – अकोले तालुका

अहमदनगर जिल्ह्यातील अकोले हा तालुका डोंगराळ आणि आदिवासी तालुका आहे. हा तालुका दुष्काळी आणि डोंगराळ असा होता. मात्र राजकीय नेतृत्वाच्या पुढाकाराने १९२६ साली म्हणजे ब्रिटिश राजवटीत या धरणाची उभारणी करण्यात आली. परिणामी या तालुक्याला पाण्याचे वरदान मिळाले. या धरणाचा फायदा अकोले, संगमनेर व इतर काही तालुक्याला झाला. या तालुक्याच्या माध्यमातून अकोले आणि संगमनेर व इतर तालुक्यातील २३०७७ हेक्टर क्षेत्र हे सिंचनाखाली आले आहे. परिणामी या धरणाच्या पाण्याचा वापर हा शेती शिवाय पिण्यासाठी, औद्योगिक विकासासाठी वापरण्यात येतो. त्यामुळे या परिसरातील विकासासाठी चालना मिळालेली आहे. तसेच या पाणी क्षेत्रामुळे शेतीतील नगदी पिकांचे उत्पादन वाढलेले आहे. प्रकल्पाच्या माध्यमातून वापर आणि विकासासाठी (पहा तक्ता क्र. ५.६)

**तक्ता क्र. ५.६**

**अकोले तालुक्यातील भंडारदरा धरणाचा विकासात्मक तपशील**

| अ.क्र | तालुका | प्रकल्पाचे तपशील |
|---|---|---|
| १ | अकोले | — |
| २ | भंडारदरा धरण | — |
| ३ | प्रकल्प निर्मिती वर्ष | १९२६ |
| ४ | धरणाची उंची | ८२.३३ मी. |
| ५ | धरणाची लांबी | १३० कि. मी. |
| ६ | कमाल क्षमता (द.ल.घ.मी ) | १५०६ |
| ७ | एकूण लाभक्षेत्र (हेक्टरमध्ये ) | ८९४९१ |
| ८ | लाभ क्षेत्राखालील लागवडी लायक क्षेत्र (हेक्टरमध्ये) | ६३७४० |
| ९ | प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर प्रत्यक्षात लाभक्षेत्राखाली आलेले क्षेत्र (हेक्टरमध्ये) | २३०७७ |
| १० | पाण्याचा वापर (द.ल.घ.मी ) | ३७९.७१९ |
| ११ | पिण्यासाठी पाणी वापर (द.ल.घ.मी ) | ३४.६२ |
| १२ | शेतीसाठी पाणी वापर (द.ल.घ.मी ) | ३४३.०८२ |
| १३ | औद्योगिक वापरासाठी पाणी (द.ल.घ.मी ) | २.०१७ |
| १४ | पाणी वापर — वाटप सहकारी संस्थांची संख्या | १३९ |
| आधार : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१०—२०११ | | |

## मुळा धरण आणि शेती क्षेत्र विकास

जिल्ह्याच्या मधोमध असणारा हा प्रकल्प आहे. या प्रकल्पाची निर्मिती १९७१ साली करण्यात आली आहे. हा प्रकल्प अहमदनगर जिल्ह्यासाठी वरदान ठरलेला आहे. कारण या प्रकल्पामुळे राहुरी, अहमदनगर, नेवासा, शेवगाव या तालुक्यातील शेती सिंचनाखाली आली. या धरणाखाली ८२९२० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आहे. या प्रकल्पाच्या आधारावर राहुरी, अहमदनगर, नेवासा, शेवगाव या

परिसरातील राजकीय नेतृत्वाने सहकारी साखर कारखान्याची निर्मिती केली. तसेच या धरण क्षेत्रामुळे अनेक गावांमध्ये नगदी (ऊसाचे) पिके घेण्यास सुरूवात केली. परिणामी शेतकरी वर्गाकडे खेळते भांडवल येण्यास मदत झालेली आहे. धरण क्षेत्र परिसरातील पिक पॅटर्नमध्ये बदल झालेला दिसून येतो. या धरणामुळे अहमदनगर, नेवासा, शेवगाव या परिसरात पाण्याची चांगली सोय झालेली आहे. तसेच स्थानिक पातळीवर शेती उत्पादनावर प्रक्रिया करणारी कारखानदारी पुढे आलेली दिसून येते. तसेच शहराचा पाणी प्रश्न या कारणांनी सुटलेला आहे.

**तक्ता क्र. ५.७**

**राहुरी तालुक्यातील मुळा धरणाचा विकासात्मक तपशील**

| अ.क्र | तालुका | प्रकल्पाचे तपशील |
|---|---|---|
| १ | राहुरी | — |
| २ | मुळा धरण | — |
| ३ | प्रकल्प निर्मिती वर्ष | १९७१ |
| ४ | धरणाची उंची | ४६.६४ |
| ५ | धरणाची लांबी | ५२ |
| ६ | कमाल क्षमता (द.ल.घ.मी ) | ७३६.२३ |
| ७ | एकूण लाभक्षेत्र (हेक्टरमध्ये ) | ८२९२० हे. |
| ८ | लाभ क्षेत्राखालील लागवडी लायक क्षेत्र (हेक्टरमध्ये) | १३८७९२ हे. |
| ९ | प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर प्रत्यक्षात लाभक्षेत्राखाली आलेले क्षेत्र (हेक्टरमध्ये) | ८२९२० हे. |
| १० | पाण्याचा वापर (द.ल.घ.मी ) | ६१३.३० |
| ११ | पिण्यासाठी पाणी वापर (द.ल.घ.मी ) | ३१.६८ |
| १२ | शेतीसाठी पाणी वापर (द.ल.घ.मी ) | ५५८.४३ |
| १३ | औद्योगिक वापरासाठी पाणी (द.ल.घ.मी ) | २३.१९ |
| १४ | पाणी वापर — वाटप सहकारी संस्थांची संख्या | २७९ |
| आधार : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१०—२०११ | | |

## घोडनदी प्रकल्प आणि अहमदनगर जिल्हा विकासात झालेले बदल

प्रामुख्याने हा घोड प्रकल्प पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात आहे. या प्रकल्पाचा फायदा पुणे जिल्ह्यातील तालुक्याला होत आहे. त्याचप्रमाणे अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर, श्रीगोंदा आणि अहमदनगर तालुक्यातील काही भागाला होत आहे. या प्रकल्पाची निर्मिती १९६५ साली करण्यात आली. तर धरणाची उंची २९.६० मीटर आहे. या धरणामुळे अहमदनगर जिल्ह्यातील २०५०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. परिणामी या धरणामुळे पारनेर आणि श्रीगोंदा या दोन तालुक्यातील सहकारी साखर कारखान्यांना या धरणाचा फायदा झालेला आहे. दुसरे असे की, या धरणामुळे अहमदनगर जिल्ह्यातील काही औद्योगिक कारखानदारीच्या विकासासाठी देखील पाणी वापर करण्यासाठी मिळालेले आहे. त्यामुळे या धरणाचा औद्योगिक विकासासाठी देखील हातभार लागलेला आहे.

**तक्ता क्र. ५.८**

**शिरूर तालुक्यातील घोड प्रकल्प/धरणाचा विकासात्मक तपशील**

| अ.क्र | तालुका | प्रकल्पाचे तपशील |
|---|---|---|
| १ | शिरूर | — |
| २ | घोड प्रकल्प | — |
| ३ | प्रकल्प निर्मिती वर्ष | १९६५ |
| ४ | धरणाची उंची | २९.६० |
| ५ | धरणाची लांबी | १०० |
| ६ | कमाल क्षमता (द.ल.घ.मी ) | २१६.३० |
| ७ | एकूण लाभक्षेत्र (हेक्टरमध्ये ) | ५३००७ हे |
| ८ | लाभ क्षेत्राखालील लागवडी लायक क्षेत्र (हेक्टरमध्ये) | ४१९९३हे |
| ९ | प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर प्रत्यक्षात लाभक्षेत्राखाली आलेले | २०५०० हे |

| | | |
|---|---|---|
| | क्षेत्र (हेक्टरमध्ये) | |
| १० | पाण्याचा वापर (द.ल.घ.मी ) | ८८.०७९ |
| ११ | पिण्यासाठी पाणी वापर (द.ल.घ.मी ) | १.१८२ |
| १२ | शेतीसाठी पाणी वापर (द.ल.घ.मी ) | ८६.६१६ |
| १३ | औद्योगिक वापरासाठी पाणी (द.ल.घ.मी ) | ०.२८१ |
| १४ | पाणी वापर – वाटप सहकारी संस्थांची संख्या | ३६ |
| आधार : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१०–२०११ | | |

## उर्ध्व गोदावरी प्रकल्पाचे जिल्हा विकासासाठीचे योगदान

उर्ध्व गोदावरी प्रकल्प नाशिक जिल्ह्यातील दिडोंरी तालुक्यात आहे. या प्रकल्पाचा लाभ ज्या प्रकारे नाशिक जिल्ह्यातील काही तालुक्याला झाला आहे. त्याच प्रमाणे धरणाखालील अहमदनगर जिल्ह्यातील काही तालुक्याना या धरणाचा मोठा फायदा झालेला आहे. त्यात कोपरगाव या तालुक्याला सर्वात जास्त फायदा झालेला आहे. या धरणाची निर्मिती ही १९७४ साली करण्यात आली आहे. या धरणामुळे अहमदनगर जिल्ह्यातील १५७४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आलेले आहे. तसेच कोपरगाव तालुक्यातील दोन साखर कारखान्याला या धरणाच्या पाण्याचा लाभ झालेला आहे. या धरणाच्या पाण्याच्या आधारावर सहकार कारखाने आणि शेती क्षेत्रात नगदी पिके घेण्यात येत असल्याने राजकीय आणि आर्थिक विकासासाठी हातभार लागलेला आहे. ( पहा तक्ता क्र. ५.९)

## तक्ता क्र. ५.९

## दिडोंरी तालुक्यातील उर्ध्व गोदावरी प्रकल्प/धरणाचा विकासात्मक तपशील

| अ.क्र | प्रकल्पाचा तपशील | प्रकल्पाचे तपशील |
|---|---|---|
| १ | उर्ध्व गोदावरी प्रकल्प करंजवण | |
| २ | दिंडोरी | |
| ३ | प्रकल्प निर्मिती वर्ष | १९७४ |
| ४ | धरणाची उंची | ३९.३१ |
| ५ | धरणाची लांबी | १७ कि.मी. |
| ६ | कमाल क्षमता (द.ल.घ.मी ) | १६६.२२ |
| ७ | एकूण लाभक्षेत्र (हेक्टरमध्ये ) | २९९७ हे. |
| ८ | लाभ क्षेत्राखालील लागवडी लायक क्षेत्र (हेक्टरमध्ये) | २७४२ हे. |
| ९ | प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर प्रत्यक्षात लाभक्षेत्राखाली आलेले क्षेत्र (हेक्टरमध्ये) | १५७४ हे. |
| १० | पाण्याचा वापर (द.ल.घ.मी ) | ५४.०१३ |
| ११ | पिण्यासाठी पाणी वापर (द.ल.घ.मी ) | ०.७९० |
| १२ | शेतीसाठी पाणी वापर (द.ल.घ.मी ) | ५३.१०८ |
| १३ | औद्योगिक वापरासाठी पाणी (द.ल.घ.मी ) | ०.११५ |
| १४ | पाणी वापर – वाटप सहकारी संस्थांची संख्या | २९ |

आधार : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१०–२०११

## अहमदनगर जिल्हा आणि सिंचन क्षेत्र विकास (आर्थिक विकास)

अहमदनगर जिल्हा हा जरी कमी पर्जन्यमान क्षेत्रात येत असला तरी या जिल्ह्यात काही परिसर वगळता सिंचनाचे जाळे तयार झालेले दिसून येते. त्यात राजकीय नेतृत्वाच्या प्रभावाने लघुप्रकल्प, मध्यम प्रकल्प आणि मोठे प्रकल्प असे तिन्ही प्रकल्पाचा समावेश आहे. परिणामी अनेक तालुके हे सिंचनाखाली आलेले आहेत. त्यात नेतृत्वाच्या पुढाकाराने सिंचन क्षेत्राचा मोठा विकास अहमदनगर जिल्ह्यात झालेला दिसून येतो. मोठे प्रकल्प, मध्यम प्रकल्प आणि लघुप्रकल्पाशिवाय पाझर तलाव, कोल्हापूर पध्द्तीचे बंधारे, भुयारी साठवण बंधारे, विहिरी आणि बोअरवेल यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. मोठ्या प्रकल्पाचा विचार करता असे दिसून येते की, अकोले तालुक्यात ४, पाथर्डी १, राहुरीमध्ये १ आणि पारनेरमध्ये ३ असे एकूण ९ मोठे पाणी प्रकल्प आहेत. मोठ्या प्रकल्पाच्या तुलनेत मध्यम प्रकल्पाची संख्या ही जास्त आहे. मध्यम प्रकल्पाची संख्या ही ११ आहे. त्यात अकोले ३, श्रीरामपूर १, नेवासा १, पाथर्डी ३, पारनेर १ आणि श्रीगोंदा १ इत्यादी. लघु प्रकल्पाची संख्या ही ८६ आहे. श्रीरामपूर १५, संगमनेर ४६, पाथर्डी ११ या तालुक्यात सर्वाधिक लघुप्रकल्प आहेत. संगमनेर या मतदारसंघातील राजकीय नेतृत्वाने सर्वाधिक लघुप्रकल्प बांधण्यास प्राधान्य दिले. परिणामी लघुप्रकल्पाच्या आधारे सिंचनाचा क्षेत्र वाढवण्यावर भर दिलेला आहे. लघुप्रकल्प निर्मितीमध्ये संगमनेर तालुक्यात सर्वाधिक प्रकल्प आहेत. या प्रकल्पाचा उपयोग तालुक्यातील शेती सिंचन आणि पिण्याच्या पाणी प्रश्न मिटविण्यासाठी झालेला आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांचा पिक पॅटर्न देखील बदलण्यामध्ये झालेला आहे. संगमनेरनंतर लघुप्रकल्प सर्वाधिक श्रीरामपूर या तालुक्यात आहेत. १५ लघु प्रकल्प असणारा हा तालुका आहे. याशिवाय पाथर्डी तालुक्यात ११ लघुप्रकल्प आहेत. मात्र पावसाचे प्रमाण आणि पाणीसाठवण या कारणांनी पाथर्डी तालुक्यात पाहिजे त्या प्रमाणात उपयोग होत असताना दिसून येत नाही. तरीही या तालुक्यातील अनेक गावे पाणी टंचाईचा सामना करताना दिसून येतात. पाझर तलावाचा विचार करता असे दिसून

येते की, राहता तालुका वगळता सर्व तालुक्यात पाझर तलाव तयार करण्यात आलेले आहेत. यामध्ये सर्वाधिक ३४५ पाझर तलाव हे पारनेर तालुक्यात करण्यात आलेले आहेत. पारनेर नंतर अहमदनगर तालुक्यात २२४ पाझर तलाव आहेत. कर्जत, नेवासा, श्रीरामपूर या तालुक्यात पाझर तलावाची संख्या कमी आहे. कोल्हापूर बंधारे आणि भुयारी साठवण बंधारे देखील बांधण्यात आलेले आहेत. याशिवाय विहिरीची संख्या अहमदनगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर असताना दिसून येते. एकूण अहमदनगर जिल्ह्यात ८१२० विहिरीची संख्या आहे. यामध्ये संगमनेर, शेवगाव, पाथर्डी या तालुक्यात विहिरीची संख्या जास्त आहे. शेती सिंचनाचा विचार करता असे दिसून येते. की, मोठे प्रकल्प, मध्यम प्रकल्प, लघु प्रकल्प, पाझर तलाव, विहिरी, बंधारे या माध्यमातून संगमनेर, अकोले, श्रीरामपूर, राहता, शिर्डी, कोपरगाव, शेवगाव, नेवासा, अहमदनगर, राहुरी, पारनेर आणि श्रीगोंदा हे सर्व तालुके सिंचनाच्या क्षेत्राने वेढलेले आहेत. तर कर्जत, पाथर्डी जामखेड आणि पारनेर हे तालुके पावसाचे प्रमाण कमी आणि शेती सिंचनाचे क्षेत्र देखील कमी असताना दिसून येते. या सिंचन क्षेत्र विकासामध्ये निश्चितपणे राजकीय नेतृत्वाचा आधार अतिशय मोठा आहे. राजकीय नेतृत्वाच्या पुढाकाराने सिंचनाचा विकास या तालुक्यामध्ये झालेले आहे. (पहा.तक्ता क्र. ५.१०)

## तक्ता क्र. ५.१०

## जिल्ह्यातील सिंचनाच्या व पाणी उपसा करण्याच्या सोयी

**जिल्हा :– अहमदनगर** **संदर्भ कालावधी :– १९६०–६१ ते २००९–१०**

| अ.क्र | तालुका | सिंचनाच्या सोयी (संख्या) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मोठे प्रकल्प | मध्यम प्रकल्प | लघु सिंचन प्रकल्प | पाझर तलाव | कोल्हापूर बंधारा | भूयारी/ साठवण बंधारा | सिंचन विहिरी |
| १ | अकोले | ४ | ३ | २ | ११४ | २० | २०७ | ७२५ |
| २ | संगमनेर | ० | ० | ४६ | १७१ | १७ | १२६ | ९५० |
| ३ | कोपरगांव | ० | ० | ० | ३२ | ३ | ३९ | ५७६ |
| ४ | राहता | ० | ० | ० | ० | ० | २४ | १०४ |
| ५ | श्रीरामपूर | ० | १ | १५ | १८ | ० | ४८ | २९७ |
| ६ | नेवासा | ० | ० | २ | १२ | १० | ५८ | ५१८ |
| ७ | शेवगांव | ० | १ | १ | ४१ | ० | ५८ | ८३२ |
| ८ | पाथर्डी | १ | ३ | ११ | १४२ | ४ | १३१ | ७८२ |
| ९ | नगर | ० | ० | २ | २२४ | ६ | ७८ | ५०३ |
| १० | राहुरी | १ | ० | ० | ४४ | ६ | २७ | ३७७ |
| ११ | पारनेर | ३ | १ | १ | ३४५ | २ | ८० | ५४५ |
| १२ | श्रीगोंदा | ० | १ | २ | २०० | १ | ४९ | ४०८ |
| १३ | कर्जत | ० | ० | ३ | १ | ० | ७६ | ७४५ |
| १४ | जामखेड | ० | १ | १ | ९९ | ३ | ४९ | ७५८ |
| **एकूण** | | **९** | **११** | **८६** | **१५८३** | **७२** | **१०५०** | **८१२०** |

आधार :–१. कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग (राज्य स्तर व स्थानिक स्तर), अहमदनगर

२. कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर), अहमदनगर

# सामाजिक आणि आर्थिक संस्थात्मक बांधणी आणि राजकीय नेतृत्व

अहमदनगर जिल्ह्यातील संस्थात्मक बांधणी ही कृषि पतसंस्था, बिगर कृषि संस्था, उत्पादक संस्था, सामाजिक सेवा संस्था, पणन संस्था पाच घटकांच्या आधारे

वाढत गेली आहे. एकंदरीत ह्या संस्था ग्रामीण भागातील लोकजीवन सुधारण्यासाठी आणि सामाजिक पातळीवर संस्थात्मक रूप देण्याच्या प्रक्रियेचा भाग आहेत. कृषि क्षेत्राला हातभार लावणाऱ्या कृषि पतसंस्था १९६० साली नव्हत्या. मात्र त्याच १९७१ साली १०९४ स्थापन झालेल्या दिसून येतात. १९८० साली अनेक संस्थाची भर पडत १७५५ संख्या झाली. मात्र १९८० ते ९० च्या दरम्यान संख्येत घट होत ११२९ झाली. त्यानंतर काही प्रमाणात किरकोळ वाढ झाली. अर्थात असे दिसून येते की, सहकार क्षेत्राची वाढ १९७० ते १९८० च्या दरम्यान मोठी झाली होती. त्याच काळात या संस्थांची देखील वाढ झालेली दिसून येते. मात्र त्यानंतर सहकार क्षेत्रात पडझड सुरू झाली असता कृषि पतसंस्थाची संख्या ही स्थर स्वरूपात होत कार्यरत राहिल्या आहेत. (पहा तक्ता क्र. ५. ११) बिगर कृषि पतसंस्थाचे पाहिले असता असे दिसून येते की, १९६१ साली २१२ संस्था होती. काही प्रमाणात वाढ होत ती १९७०–७१ साली १७१ संस्था झाल्या. मात्र त्यानंतर झपाट्याने बिगर कृषि पतसंस्थाची वाढ झाली. मात्र १९९०–९१ साली या संस्थाची संख्या कमी झालेली पाहण्यास मिळते. तर त्यानंतरच्या २००१ साली या संस्थामध्ये मोठ्या प्रमाणावर म्हणजेच १०५४ संस्था संख्या झाली. तर २००१ नंतर किंचित वाढ २०१० पर्यंत झालेली दिसून येते. (पहा तक्ता क्र. ५.११) उत्पादक संस्थाचा विचार करता या संस्थाची सुरूवात ही १९७१ साली झालेली आहे. त्यानंतर सातत्याने या संस्थेमध्ये वाढ होत गेली आहे. २०१० मध्ये ४५१७ संस्था कार्यरत असताना दिसून येते. उत्पादक संस्थाची वाढ ही २००१ नंतर झपाट्याने झालेली आहे. (पहा तक्ता क्र. ५.११) पणन संस्थाचा आधार पाहिला असता १९९० नंतर या संस्थाना सुरूवात झालेली आहे. त्यांची संख्या काही जास्त झाली नाही. २०१० साली ५९ संस्था कार्यरत होत्या. (पहा तक्ता क्र. ५.११) सामाजिक सेवा संस्थाची सुरूवात जरी पूर्वीपासून दिसत असली तरी नोंदणीकृत संस्था तपासली असता असे दिसून येते की, १९९० नंतर या संस्थाला व्यवस्थितपणे आणि सक्रियपणे सुरूवात झालेली दिसून येते. १९९०साली या सामाजिक सेवा संस्थाची संख्या १०५० होती. २०१० साली २४४७

संस्था कार्यरत होत्या. सामाजिक सेवा संस्थामध्ये धर्मदाय आयुक्ताकडे नोंदणीकृत असणाऱ्या संस्था आहेत. त्यात जात संघटनांचा भरणा जास्त प्रमाणावर आहे. (पहा तक्ता क्र. ५.११) सर्व क्षेत्रातील संस्थात्मक बांधणीचा विचार करता असे दिसून येते की, १९६० साली केवळ १२१ संस्था होत्या. त्याच १९७० साली १६११ झाल्या. तर १९८० साली ३१०३, १९९० साली ३६७० अशी आकडेवारी वाढत राहिली. २००१ साली ८४७० इतकी प्रंचड प्रमाणात वाढ या संस्थामध्ये झालेली दिसून येते. तीच २०१० साली ९४९८ इतकी होती. (पहा तक्ता क्र. ५.११) ग्रामीण भागातील संस्थात्मक बांधणी करण्यात राजकीय नेतृत्वाचा सातत्याने पुढाकार राहिलेला आहे. त्याचप्रमाणे काही सामाजिक संस्था तर राजकीय नेतृत्वाच्या आश्रयाने आणि पुढाकारने संस्था उभ्या राहिलेल्या आहेत. एक या संस्था उभारणीत राजकीय नेतृत्वाचा पुढाकार आहे. त्याच प्रमाणे अर्थकारण हे संस्थामध्ये दडलेले आहे.

**तक्ता. क्र. ५.११**

**अहमदनगर जिल्ह्यातील विविध वाढत गेलेल्या संस्थाची संख्या**

| **अ.क्र** | **संस्था** | **१९६०—६१** | **१९७०—७१** | **१९८०—८१** | **१९९०—९१** | **२०००—०१** | **२००९—१०** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कृषि पतसंस्था | — | १०९४ | १७५५ | ११२९ | १२६६ | १३२६ |
| २ | बिगर कृषि पतसंस्था | १२१ | १७१ | ५४३ | ३५९ | १०५४ | ११४९ |
| ३ | उत्पादक संस्था | — | ३४६ | ८०५ | १०५५ | ४३९३ | ४५१७ |
| ४ | पणन संस्था | — | — | — | ७२ | ५१ | ५९ |
| ५ | सामाजिक सेवा संस्था | — | — | — | १०५५ | १६८६ | २४४७ |
| ६ | एकूण संस्था | १२१ | १६११ | ३१०३ | ३६७० | ८४५० | ९४९८ |

आधार : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१०—२०११

## संस्थात्मक बांधणीतील सभासद संख्या

कृषि क्षेत्रातील संस्थात्मक बांधणी सहकार क्षेत्राची वाढ आणि शेती क्षेत्रात बदलत्या पिक पध्द्तीच्या माध्यमातून घडून आलेली आहे. ज्या प्रकारे संस्थामध्ये वाढ झालेली दिसून येते त्याचप्रमाणे संस्थांमधील सभासदसंख्या वाढताना दिसून येते. कृषि क्षेत्रातील कृषि पतसंस्थाचा विचार करता १९७० साली २,५८,००० सभासद संख्या होती. या सभासदाची सभासद संख्या वाढत २००९–१० मध्ये ६,८६,६०७ इतकी झाली. अर्थात सातत्याने ही संख्या वाढत राहिल्याचे दिसून येते. यास कारणीभूत आहे ते म्हणजे शेती क्षेत्रातील वाढती गुंतवणूक. शेती क्षेत्राचा विकास होत असताना नगदी पिके घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे. त्यामुळे नगदी पिकासाठी भाग भांडवल हे कृषि पतसंस्थेकडून उपलब्ध होत असल्याने या संस्थाच्या सभासदाची संख्या सातत्याने वाढत आहे. मात्र २००१ साली ही सभासद संख्या किंचित कमी होताना दिसून येते. दुसरे असे की, बिगर कृषि पतसंस्थेचा आढावा घेतला असता १९६० साली १४८०० सभासद संख्या होती. तीच २०१० साली १०३४६२२ इतकी प्रंचड प्रमाणात सभासद संख्या वाढली आहे. १६६१ पासून ते २०१० पर्यंत बिगर कृषि पतसंस्थेच्या सभासद संख्या सातत्याने वाढत आहे. याच प्रमाणे उत्पादक संस्थाच्या बाबतीत देखील असे दिसून येते की, १९७० साली १,१०,००० सभासद संख्या होती. तर या २०१० साली २,५१,६८१ झाली. या उत्पादक संस्थेमधील सभासदाची संख्या ही देखील सातत्याने वाढत राहिलेली आहे. सामाजिक सेवा संस्थामध्ये १९९० साली १,४४,३८१ इतकी सभासद संख्या होती. तीच २०१० साली १,५५,५५७ इतके सभासद झालेले दिसून येते. या सर्व संस्थामधील सभासद संख्येचा विचार करता असे दिसून येते की, १६६० सालापासून २०१० सालापर्यंत सभासदामध्ये सातत्याने वाढ होत गेली आहे. या सभासद संख्या वाढवण्यामध्ये राजकीय नेतृत्वाचा पुढाकार सातत्याने राहिलेला आहे. परिणामी असे म्हणावे लागेल की, राजकीय नेतृत्वाच्या पुढाकारानेच विविध

अर्थकारणाच्या आणि सामाजिक क्षेत्रातील संस्थाच्या माध्यमातून अहमदनगर जिल्ह्यातील जनतेचे संस्थात्मीकीकरण होत आहे.

**तक्ता क्र. ५.१२**

**अहमदनगर जिल्ह्यातील विविध संस्थामधील सभासदाचे प्रमाण**

| **संस्था** | **१९६०–६१** | **१९७०–७१** | **१९८०–८१** | **१९९० –९१** | **२०००–०१** | **२००९–१०** |
|---|---|---|---|---|---|---|
| कृषि पतसंस्था | – | २५८००० | ४०३००० | ५१९०९८ | ७२८८७१ | ६८६६०७ |
| बिगर कृषि पतसंस्था | १४८०० | ५२००० | १८२००० | १३८१११ | ६६९६२१ | १०३४६२२ |
| उत्पादक संस्था | – | ११०००० | २४१००० | २९४७३५ | ५६०६३४ | २५१६८१ |
| पणन संस्था | – | – | – | २६०१६ | ३०९०३ | ३२१७३ |
| सामाजिक सेवा संस्था | – | – | – | १४४३८१ | १६८६ | १५५५५७ |
| **एकूण** | **१४८००** | **४२००००** | **८२६०००** | **११२२३४१** | **१९९१७१५** | **२१६०६४०** |
| आधार : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१०–२०११ | | | | | | |

## राजकीय नेतृत्व आश्रीत सेवा क्षेत्राचा विकास

१९९० पर्यंत अहमदनगर जिल्ह्यात सेवा क्षेत्राला फारसे काही महत्त्व नव्हते. सेवा क्षेत्र हे शहरी भागात एक बाजारपेठ या आधारावरच होते. पण बांधकाम व्यवसाय, दुकानदारी व्यवसाय, बँकींग क्षेत्र, विविध सेवा पुरवठा करणाऱ्या एजन्सीस् पुढे आल्या. या एजन्सीस्कडून सर्वसामान्यांना विविध साधने ही वेळेवर आणि बाजार स्थळी उपलब्ध होत गेली. मात्र सेवा क्षेत्र विकास हा राजकीय नेतृत्वाने दिलेल्या आश्रय आणि पुढाकारातून पुढे आला आहे. परिणामी अहमदनगर शहर एक मोठी कापड, धान्य व इतर क्षेत्रातील केंद्र रूपाने १९९० नंतर पुढे आलेले दिसून येते.

## महानगरपालिकेचा अर्थसंकल्प :

अहमदनगर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात जमा रक्कम ८९ कोटी ७६ हजार दाखवली आहे. (अहमदनगर महानगरपालिका अंदाजपत्रक, २००६–२००७, पृ. १५) यापैकी कर ५२ टक्के, कराव्यतिरिक्त ०.१४ टक्के, मालमत्ता व सेवा ३.९९ टक्के, अनुदाने १२.१३ टक्के व १६.११ टक्के रक्कम संकीर्ण क्षेत्रातून एकत्र केली जाते. (अहमदनगर महानगरपालिका अंदाजपत्रक, २००६–२००७, पृ. ५९) यापैकी ५३. २४ टक्के रक्कम प्रशासन व आस्थापनावर खर्च केली जाते. थोडक्यात ४७ टक्के रक्कम सार्वजनिक सुरक्षितता, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक शिक्षण, जलनि:सारण व पाणीपुरवठा या क्षेत्रात खर्च होते. या क्षेत्रातील आस्थापनावरील खर्च या रक्कमेतून कमी केला तर केवळ ३२.२६ टक्के रक्कम सार्वजनिक सुरक्षितता (४.२१), सार्वजनिक आरोग्य (१४.०७), सार्वजनिक शिक्षण (१.६८), जलनि:सारण व पाणीपुरवठा (१३.९८) या क्षेत्रात खर्च होते. हा पैसा लोकांच्या सार्वजनिक बाबींवर खर्च केला जातो. (अहमदनगर महानगरपालिका अंदाजपत्रक, २००६–२००७, पृ. ६०)

भांडवली क्षेत्रात २३.३४ टक्के गुंतवणूक केली आहे. (२००६–२००७) भांडवली क्षेत्रात नवीन रस्ते, नविन इमारती बांधकाम, रस्ते विकास, भूसंपादन, गाळे बांधणे, उर्जा प्रकल्प उभारणी व भुयारी गटार अशा क्षेत्रात गुंतवणूक केली जाणार आहे. या भांडवली प्रकल्पामध्ये दलित वस्ती सुधारणा व गलिच्छ वस्ती सुधारणा या प्रकल्पांचा समावेश आहे. या प्रकल्पासाठी ०.८४ टक्के रक्कमेची तरतूद केली आहे. थोडक्यात भांडवली स्वरूपाच्या पैशातून उभारल्या जाणाऱ्या कामावर निर्णय घेणे हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. म्हणून भांडवली क्षेत्रातील रक्कम निवडून आलेल्या नगरसेवकाच्या दृष्टीने जास्त महत्त्वाची आहे.

**सारांशरूपाने** असे दिसून येते की, अहमदनगर जिल्ह्यात आर्थिक, सामाजिक आणि सहकारी संस्थाची सुरूवात ही स्वातंत्र्यपुर्व काळात झालेली होती. १९४७ ते १९८० या काळात सहकारी साखर कारखाने आणि जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या आधारे चालणारी सहकार पाया असणारी आर्थिक चळवळ होती. या काळात अनेक साखर कारखान्यांचा विकास हा राजकीय नेतृत्वाच्या प्राधान्याने, पुढाकाराने झालेला आहे. परिणामी सिंचन क्षेत्र वाढीला आणि विकासास प्राधान्य देखील राजकीय नेतृत्वाकडून दिलेले दिसून येते. आर्थिक घटकांचा विकास हा सहकार संस्थाच्या माध्यमातून होत असल्याचे दिसून येते. मात्र १९९० नंतर या संस्था वाढीस वेग आला. तसेच आर्थिक विकासास जास्त प्रमाणावर प्राधान्य दिले आहे. आर्थिक विकास आणि राजकीय नेतृत्वाचे हितसंबंधांना अनुसरून संस्था उभारणी करण्यात येऊ लागली. परिणामी संस्थात्मक बांधणी आणि पाठिंबा मिळवण्याचे आधार बदलत गेलेले दिसून येतात. त्यामुळे सहकार व्यतिरिक्त इतर संस्था वाढीला वेग आला. थोडक्यात कृषि संस्था उभारणीचा जो वेग होता त्याचबरोबर बिगर कृषि पतसंस्था, उत्पादक संस्था, पणन संस्था आणि सामाजिक सेवा संस्था या पुढे आल्या. या संस्थेची उभारणी ही राजकीय नेतृत्वाच्या पुढाकाराने आणि हितसंबंधाच्या आधारे होत गेली. परिणामी संस्था उभारणीत राजकीय नेतृत्वाला पुढे महत्त्व आले. तसेच संस्था चालवणे आणि विकास करणे अशा बाबी पुर्णपणे राजकीय नेतृत्वाच्या आश्रयाने घडत आहेत. त्यामुळे संस्था उभारणी होते. त्याचप्रमाणे संस्था उभारणी आणि आर्थिक विकासास प्राधान्यक्रम हा राजकीय नेतृत्वाकडूनच आलेला दिसून येतो. त्यामुळे या संस्थात्मक आर्थिक विकासामध्ये राजकीय नेतृत्वाचे योगदान अमुल्य असे राहिलेले आहे.

# प्रकरण — ६

# सहकाराचे राजकारण आणि नेतृत्व

अहमदनगर जिल्ह्याचे राजकारण कशाच्या आधारावर उभे आहे याचा आढावा घेतला तर सहकार क्षेत्राची मुख्य भूमिका राहिलेली आहे. सहकार क्षेत्रामध्ये सहकारी साखर कारखान्याची भूमिका ही प्रमुख राहिलेली आहे. याशिवाय जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सहकारी विविध बँका, सहकारी कार्यकारी सोसायट्यां, सहकारी कृषि उत्पन्न बाजार समिती, सहकारी दूध उत्पादन संघ नागरी आणि बिगर सहकारी पतसंस्था, सहकारी फलोत्पादन संस्था, कृषि सहकारी प्रक्रिया संस्था, कामगारांची सोसायटी, औद्योगिक संस्था, इतर ग्रामीण उद्योग, बलुतेदार संघ, प्राथमिक विद्यार्थी ग्राहक सहकारी संस्था, सहकारी गृहरचना संस्था, मजूर सहकारी संस्था, वाहतूक संस्था, तालुका देखरेख संघ, पाणी पुरवठा सहकारी संस्था, कुक्कुटपालन सहकारी संस्था, मत्सोद्योग सह. संस्था आहेत. या संस्थामध्ये मराठा जातीचे प्राबल्य आढळते. मराठा जातीच्या लोकांनी आर्थिक संस्था स्थापन करून स्वत:चा जम राजकारणामध्ये बसविला आहे. सहकारी संस्था उभ्या करून शेतकरी किंवा सर्वसामान्य लोकांचे हित जोपासले जाते. सहकारी संस्थाना होणारे फायदे हे सर्व सभासदांना मिळतात. त्यामुळे लोकांची अर्थव्यवस्था सुरळीत होण्यास मदत होते. सहकारी साखर कारखान्यांमुळे असंख्य शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारते. सहकारी संस्थाच्या राजकारणामध्ये सर्वसामान्य सभासदासही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. कारण तो मतदार म्हणून आपली भूमिका बजावत असतो. अहमदनगर जिल्ह्यातील अकोले, संगमनेर आणि राहुरी या भागातील महादेव कोळी, भिल्ल, ठाकर व कातकरी जातीचे आदिवासी अधिक प्रमाणात आढळतात. त्यांच्या विकासाच्या दृष्टिकोनातून विविध कार्यकारी सोसायट्यां सुरू झाल्या आहेत. सत्तेची संधी आरक्षणाच्या नियमामुळे आदिवासी लोक सहकारी तत्वावर विविध

लघुउद्योग करू लागले आहेत. राज्यपातळीवरून मिळणाऱ्या अनुदानाचा उपयोग त्यांच्या विकासासाठी होताना दिसतो. सहकारी पाणी पुरवठा संस्थामुळे शेती सिंचनाखाली येऊन त्यातून चांगली पिके निघू लागली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची अर्थव्यवस्था सुधारताना दिसते. आर्थिक उत्पादनाच्या दृष्टीने चांगल्या पिकांमुळे शेतकरी लोकांचे राहणीमान सुधारते. जिल्ह्यामधील प्रत्येक तालुक्यामध्ये फलोत्पादन संघ सुरू झालेले आहेत. (दैनिक सकाळ, दि. २२.०२.२०११) फलोत्पादन संघामुळे शेतकऱ्यांच्या शेतीमालास योग्य तो भाव मिळण्यास मदत होते. विविध तालुक्यांमध्ये दूध शीतकरण केंद्रामार्फत दूध गोळा केले जाते. त्यासाठी चिलिंग प्लॅन्टची सोय तयार केली आहे. या शीतकरण केंद्रामध्ये संकलित केलेले दूध शहरामध्ये विविध वाहतूक संस्थांच्या मार्फत शहरांमध्ये रवाना केले जाते. त्याचप्रमाणे कुक्कुटपालन संस्थाच्या मार्फत कोंबड्या पाळल्या जातात. कुक्कुटपालन सहकारी तत्वावर कमी आढळते. विविध कार्यकारी विकास सोसायटी ही गाव पातळीवर जास्त प्रमाणात कार्यरत असलेल्या दिसतात. ही सोसायटी जिल्हा बँकेकडून बैलजोडी, पाईपलाईन, शेतघर इ.साठी कर्ज मिळवून देण्याचे महत्त्वाचे काम करते. या सोसायटीमार्फत शेतीची अवजारे, बी–बियाणे, ट्रक्टर, औषध मारण्याचा पंप इ. गोष्टी मिळवून दिल्या जातात. आदिवासी विविध कार्यकारी सोसायट्यांमधून अनुदान देणे, जीवनोपयोगी वस्तूंचे उत्पादन केले जाते. ज्या दूध उत्पादक संस्था आहेत. त्या संस्थांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे दूध संकलन करून ते शीतकरण केंद्रापर्यंत पोहचविण्याचे काम केले जाते. सर्व शीतकरण केंद्राचे मुख्य कार्यालय संगमनेर येथे आहे. दूध व्यवसायामध्ये भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणावर चालू आहे. राजकीयदृष्ट्या या संस्थाचे चेअरमन हे प्रस्थापितांच्या बाजूने असलेले दिसतात. नागरी पतसंस्थाकडून सर्वसामान्य लोकांना काही तरी तारण ठेऊन नागरी बँका व पतसंस्था कर्जे देत असतात. या कर्जातून त्यांना विकासाच्या दृष्टीने सकारात्मक पाऊल टाकता येते. पगारदार नोकर सहकारी पतसंस्था पैसा पगारातील काही अल्प भाग संकलित करण्याचे काम करतात. पणन संस्था या शेतमालाच्या विक्री संबंधिचे काम करतात. उदा. कांदा, बटाटा इ.

फलोत्पादन संघाच्या कार्यामध्ये कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये असलेला माल, शेतकऱ्यांकडे असलेल्या मालास, मार्केटमध्ये आल्यास त्या मालाला जास्तीत जास्त भाव मिळवून देण्याचे काम करतात.

शेतजमिनीमधून निघणारा जो माल असतो त्यावर योग्य रितीने प्रक्रिया करून त्यापासून जास्तीत जास्त पैसा मिळवून देता येतो. त्यावर प्रक्रिया घडून येते म्हणजे विविध पदार्थ तयार करण्याचे काम चालते, सहकारी साखर कारखान्याचा कच्चा माल ऊस त्याला सहकारी चळवळीमध्ये कल्पतरू म्हणतात. कारण उपपदार्थ निर्मितीमुळे ऊसाचा कोणताही भाग वाया जात नाही. सहकारी साखर कारखान्यांमध्ये मळीपासून मद्यार्कनिर्मिती, भूश्यापासून कागद तयार केला जातो. सहकारी साखर कारखान्यांमधील कामगारांच्या पतसंस्था असतात. त्या पतसंस्थेमधून नफ्याचा वाटा हा कामगार सभासदास मिळवून दिला जातो. औद्योगिक सहकारी संस्था कामगारास वेतनवाढ, विमापध्द्त, कामगारांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळतो की नाही याकडे कामगार संस्था संचालकाचे लक्ष असते. व्यवस्थापनाबरोबर चर्चा करून निर्णय घेतला जातो. जिल्ह्याच्या ग्रामीण भागामध्ये मजूर अड्डे व कामगारांच्या सोसायट्या इ. काम करून विकासाच्या दृष्टीकोनातून प्रयत्न केले जातात. बलुतेदार संघ हा गट जास्तीत जास्त ग्रामीण भागात दिसतो. प्राथमिक शिक्षकांच्या पतसंस्था, हायस्कूल व महाविद्यालयीन पातळीवर काम करणाऱ्या पतसंस्था सक्रिय असलेल्या दिसतात. नोकरी करणाऱ्या व्यक्तीला, त्या व्यक्तींच्या कुटुबियांना आर्थिक मदत करण्याचे काम या संस्था करतात. प्राथमिक विद्यार्थ्यांच्या पतसंस्था अथवा पतपेढी असलेली दिसते. बलुतेदार संघाच्या माध्यमातून गावातील बलुतेदार लोकांना आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जाते. सहकारी गृहरचना संस्थाकडून लोकांना घर बांधून देण्याचे काम सहकारी तत्वावर चालते. दुधासारख्या वस्तू शहरापर्यंत पोहचविण्यासाठी वाहतुक संस्था या तालुका पातळीवर कार्यरत आहेत. तालुका देखरेख संघ हा गावातील विविध सोसायट्यांना आर्थिक मदत करतो, त्यांच्या

समस्या सोडविण्याचे काम करतो. पाणी पुरवठा संस्था शेतकऱ्यांना पाणी मिळवून देण्याचे काम सहकारी तत्वावर करतात.

अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी क्षेत्रातील महत्त्वाच्या संस्था म्हणजे अहमदनगर जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँक, सहकारी साखर कारखाने, दुधसंघ ह्या सहकारातील महत्त्वाच्या संस्था होत. अहमदनगर जिल्ह्यासाठी एक मध्यवर्ती सहकारी बँक आहे. या बँकेची सभासद संख्या ६,८३० इतकी असून या बँकेने २००९—२०१० या वर्षात २३१९.१७ कोटी रूपये कर्जवाटप केले आहे. बँकेची दर पाच वर्षानी निवडणूक होते. जिल्ह्यातून संचालक मंडळ निवडले जाते. जिल्हा बँकेचा अध्यक्ष संचालक मंडळातून निवडला जातो. काँग्रेस पक्षाचे या बँकेवर अध्यक्षांमार्फत नियंत्रण आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी कृषिग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक या जिल्ह्यात आहे. ग्रामीण भागातील शेतीला कर्जपुरवठा या बँकेमार्फत केला जातो. जिल्ह्यातील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नियंत्रण या बँकेवर आहे. या बँकेने २०१०—२०११ या आर्थिक वर्षात १५२.८० कोटी कर्जवाटप केले आहे. बँकेची सभासद संख्या ५९,५८३ इतकी आहे. (सामाजिक आर्थिक पाहणी अहवाल, अहमदनगर २०१०—२०११)

जिल्ह्यात ग्रामीण भागातील शेतीसाठी कर्जपुरवठा प्राथमिक कृषि पतसंस्था २०११ या वर्षात १२८७ आहेत. २०११—२०१२ या वर्षात कर्जवाटप ६७३.६४ कोटी इतके केले आहे. या पतसंस्थावर मोठया प्रमाणात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नियंत्रण आहे. त्यामुळे स्थानिक राजकारण ते जिल्हा राजकारण या पक्षाच्या नियंत्रणाखाली सहकार क्षेत्राच्या माध्यमातून साकारले जाते.

## साखर उद्योगः—

सहकारी साखर कारखान्यामध्ये साखरेबरोबर इथेनॉल निर्मिती, मद्यार्क सारख्या उपपदार्थ निर्मिती करण्याची गरज आहे असे काही समित्यांनी सुचविले आहे.

सध्याचा साखर धंदा हा अडचणीत आलेला आहे. कारण साखर उठाव नाही. राज्यात दरवर्षी सरासरी १२ हजार कोटी रूपये किंमतीने साखर विक्री होते. त्यापासून कराच्या माध्यमातून २००० कोटी रूपये केंद्रास व ४५० कोटी रूपये राज्य सरकारला मिळतात. यामुळे राज्य सरकारची व शेतकरी वर्गाची अडचण झाली आहे. साखर उद्योग अडचणीत आल्यामुळे प्रत्येक सहकारी साखर कारखान्यास आठ ते दहा कोटी रूपये तोटा सहन करावा लागणार आहे. त्यामुळे ऊस उत्पादकांना योग्य तो भाव मिळू शकणार नाही. बँकाकडून विविध साखर कारखान्यांनी क्षमता वाढ इ. कारणांसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी कारखान्यांकडे पैसे नाहीत. व्यवस्थापन खर्च कमी करणे हा पर्याय असू शकतो. वाहतूक खर्च कमी करणे, वीजनिर्मिती करणे इ. पर्याय वापरले जातात.

त्याचप्रमाणे सहकार चळवळीला शिस्त ही आर्थिक बाबींमध्ये लागणे महत्त्वाचे आहे. सर्वसामान्य शेतकरी हा साखर कारखान्याच्या आधारे स्वत:ची अर्थव्यवस्था सांभाळत असतो. साखर धंद्यात सध्या असलेल्या अडचणींची सोडवणूक करण्यासाठी केंद्रसरकारच्या अर्थ विभागाचे सल्लागार विजय केळकर यांच्याशी शरद पवार यांची अलिकडे चर्चा झाली आहे. मुख्यत: केंद्रसरकारने या प्रश्नाकडे अधिक लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. शिल्लक साखरेचे उत्पादन विक्री होत नाही. केंद्र सरकारने किमान २५ लाख टन साखर राखीव साठा करणे गरजेचे आहे. निर्यातीसाठी अनुदान देणे आवश्यक आहे.

मळीवरील व साखरेवरील सीमा शुल्कामध्ये केंद्र सरकारने कपात करणे गरजेचे आहे. साखर धंद्यातील अडचणींमुळे जिल्हा मध्यवर्ती बँक व शिखर बँक अडचणीत आली आहे. दुसऱ्या बाजूला ऊसावर मोठया प्रमाणावर लोकरी माव्यांचा प्रार्दुभाव झालेला असल्याने ऊस उत्पादक शेतकरी कारखाना अनुदानाने मिळणारी फॉलिडॉल पावडर वापरत आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणावर नुकसान होत आहे. अहमदनगर जिल्ह्यामध्ये पांढऱ्या लोकरी माव्याचे प्रमाण अधिक आहे. साखरेचा खप हा

जगात सर्वत्र कमी होतो आहे. कारखान्यांनी लॅक्टीक ॲसिड, सेल्यलोजच्या उत्पादनाकडे लक्ष द्यावे अशी चर्चा चालू आहे. बदलती जीवनपध्द्ती व साखर वापरामुळे होणारा मधुमेह यांच्या वाढत्या प्रमाणामुळे जगात साखरेचा वापर कमी होतो आहे. साखर उद्योगातील प्रत्येक घटक महत्त्वाचा आहे. बगॅसपासून सेल्युलोज, मळीपासून मद्याक्र, चिपाडापासून सल्फरयुक्त लिग्निल इ. उपपदार्थ बनविणे हिताचे आहे. साखर व्यवसायाला प्राप्ती करापासून वाचवयाचे असल्यास सर्वपक्षीय समन्वयाची गरज आहे.

राज्यातील सर्व साखर कारखान्यांसाठी मोठया प्रमाणावर प्राप्ती सूट मिळवणे महत्त्वाचे आहे. कारण प्राप्ती कराचे दर अधिक आहेत. शेती धंदाही अडचणीत आहे. अतिरिक्त साखर निर्मिती होत आहे. साखर व दूध धंदाही दरामुळे अडचणीत आहे. या संकटातून मार्ग काढण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्याची गरज आहे. शासनाला परकीय चलन मिळण्यासाठी इथेनॉल, वीजनिर्मिती, कागद इ. उपपदार्थ निर्मिती करणे आवश्यक आहे.

एक प्रकारे ऊस उत्पादनापासून अनेक उद्योग चालवण्यात येत आहेत. ऊसाच्या उत्पादन आणि साखर कारखाने यांच्या माध्यमातून ग्रामीण भागात उद्योगाने ग्रामीण भागात आर्थिक वृध्दीकरणाचे सत्र निर्माण झालेले आहे. साखर उद्योगापासून अनेक दुय्यम प्रकारचे उद्योग चालू असल्याने एक प्रकारची आर्थिक बळकटी असणारा वर्ग निर्माण झालेला दिसून येतो. या वर्गाच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप झालेला दिसून येतो. ज्या प्रकारे हा हस्तक्षेप दिसून येतो त्याचप्रमाणे आर्थिक बाबतीतील स्थित्यांतर घडून आलेली दिसून येतात.

## अहमदनगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्र आणि राजकीय नेतृत्व

महाराष्ट्रातील राजकारण आणि उद्योग या दोन्हींचा विचार करण्यात येतो. त्यात साखर उद्योगाशिवाय विचार करता येणे शक्य होत नाही. कारण स्वातंत्र्यपुर्व काळापासून महाराष्ट्रातील काही भागात सहकार क्षेत्र सुरू करण्यात आले होते. त्यामुळे या क्षेत्राच्या

माध्यमातून ग्रामीण भागात उद्योग येणे सुरू झाले होते. त्यात सहकारी साखर कारखाना हा ग्रामीण भागातील शेती क्षेत्रावर आधारित उद्योग पुढे आलेला दिसतो.

महाराष्ट्राला सहकार क्षेत्राची मोठी पार्श्वभूमी लाभलेली आहे. ज्यावेळी सहकार उद्योगाचा विचार करण्याची वेळ येते आणि इतिहास तपासून पाहिला तर स्वातंत्र्यपुर्व काळातील वैकुंठराय मेहता यांचा विचार प्रथम पुढे येतो. त्यांनी १९२३ साली राज्य पातळीवर सहकारी बँकेच्या माध्यमातून सहकार क्षेत्राची सुरूवात केली होती. त्यांनी ''बॉम्बे पॉव्हिन्शिअल को–ऑपरेटिव्ह बॅक'' पुढे आणत मुंबई प्रांतात शिखरावर पोहचवली होती. त्या शिवाय या बँकेने वऱ्हाड, उत्तर प्रदेश, मद्रास व इतर प्रांतातील बँकांना आर्थिक सहाय्य केले होते. या बँकेने विविध स्तरातील अनेकांना मदत करण्याची भूमिका घेतली होती. (पाटील गुलाबराव, १९६४, पृ.२८ ते ३०) सांगण्याचे तात्पर्य असे की, बँकेच्या माध्यमातून सहकार क्षेत्र ग्रामीण भागात मदत करणारे केंद्र म्हणून पुढे येत होते. दुसरे असे की, या माध्यमातून ग्रामीण भागात कर्जपुरवठा करणारे संस्था म्हणून पाहण्यात येत होते. परिणामी ग्रामीण भागातील नेतृत्वाला देखील सहकार क्षेत्रात उद्योग निर्माण करणारे संस्था उभा करता येऊ शकतात ही जाणीव पुढे आली होती.

१९३० ते ४० च्या दरम्यान शेती मालांचे भाव चांगलेच कोसळलेले होते. त्यात शेतीत ऊसाच्या आधारावर गुळ निर्माण करण्यात येत होता. या गुळाचे भाव देखील कोसळलेले होते. अशा परिस्थितीत गुळाऐवजी साखर निर्मिती करण्यासाठी बारामती तालुक्यातील ऊस उत्पादकांना 'ओपन पॅन' पध्द्तीने आर्थिक सहाय्य देण्यात आले होते. मात्र यावेळी हे आर्थिक सहाय्य करण्याचे प्रयत्न असफल झाले. परंतु या मार्गाने महाराष्ट्रात साखर कारखाने काढण्याचे सूत्र अनेक राजकीय नेतृत्वाच्या मनामध्ये पुढे आले.

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने काढण्यासाठी तसेच साखर उद्योग उभा राहण्यासाठी शेतकऱ्यांचे हित लक्षात घेत राज्य सहकारी बँकेने शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्याची भूमिका त्यावेळी घेत अनेक शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य केले. एक

प्रकारे राज्य सहकारी बँकेने साखर कारखाने निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य केलेले होते. परिणामी राज्य बँक आणि राज्य सहकारी बँकेच्या सहकार्याने साखर उद्योग पुढे आलेला दिसून येतो.

## महाराष्ट्रातील पहिला साखर कारखाना : अहमदनगर जिल्ह्यातील पहिला सहकारी साखर कारखाना

स्वातंत्र्येत्तर काळात उच्च पातळीवर साखर कारखाने शेतकरी कशा प्रकारे चालवतात या विषयी अनेक राजकीय नेतृत्व आणि प्रशासकीय पातळीवर चुकीचे समज निर्माण झाले होते. शेतकऱ्यांना एकत्रित येऊन साखर कारखाना चालवणे शक्य होणार नाही अशा कल्पनेने प्रशासकीय पातळीवरून सहकारी साखर कारखाना निर्मितीस परवानगी देण्यात येत नव्हती. मात्र या सर्व काळात शेतकऱ्यांविषयी आस्था ही तत्कालीन सहकार मंत्री वैकुंठराय मेहता यांना वाटली. त्यांना सहकार क्षेत्राचा शेतकऱ्यांना मदत करण्याचा धर्म आहे असे वाटत होते. (पाटील गुलाबराव, १९८२ पृ. २९) वैकुंठराव मेहता यांनी सहकाराची कास स्वातंत्र्यपुर्व काळातील १९१२ ते १९४६ या काळात विविध सहकारी बँकामध्ये कार्यरत असल्यापासून धरली होती. त्यांचा बेलापूर–कोपरगाव या परिसराशी सुरूवातीपासून चांगला परिचय आलेला होता. त्याच प्रमाणे त्यांना या परिसरात काहीतरी सहकार क्षेत्राच्या माध्यमातून करावे असे वाटत होते. त्यात लोणी बुद्रक येथील विठ्ठलराव विखे पाटील यांनी चालवलेली सोसायटी तसेच पोहेगावची गणपतराव औताडे यांची सोसायटी सहकार क्षेत्राच्या माध्यमातून आदर्श कामे करत होती. विठ्ठलराव विखे पाटील यांनी साखर कारखान्याचे नियोजन केले. त्यास सहकारी साखर कारखान्याचे प्रवर्तक धनंजयराव गाडगीळ त्यांची प्रेरणा, प्रोत्साहन, मार्गदर्शन आणि समन्वय मिळाले. परिणामी सहकारी साखर कारखान्यांची कल्पना पुढे आली. ही कल्पना वैकुंठराव मेहता यांना कळल्यावर आनंद झाला. तसेच वेगळ्या शास्त्रज्ञांची साखर कारखाना उभारणीसाठी पाठवण्याची आवश्यकता नाही असे सांगण्यात आले. वैकुंठराव मेहता यांनी शेतकऱ्यांची एकी पाहून आणि सोसायटीचा

आदर्श कारभार पाहून १९४८ साली काही रक्कम जमा होती. तसेच शेतकऱ्यांकडून काही रक्कम जमली होती. विठ्ठलराव विखे पाटील यांनी त्यावेळचे शेअर भांडवलामधील सहकारी बाबा टेकावडे यांना विनंती करून ४० हजार, सखाराम हरी भोसले यांच्याकडून १० हजार असे पैसे जमा करून बँकेत भरले. वैकुंठराव मेहता यांचे प्रयत्न आणि बँकेत भरलेली रक्कम या आधारावर १४ डिसेंबर १९४८ रोजी केंद्र सरकारने सहकारी साखर कारखाना उभारणीस परवानगी दिली. या सहकारी साखर कारखान्यापाठोपाठ ३१ डिसेंबर १९४८ रोजीच १९२५ च्या सहकारी कायद्याखाली '' दि बागायतदार कोऑफरेटिव्ह शुगर प्रोड्यूसर्स सोसायटी लि. लोणी'' या नावाने संस्था रजिस्टर करण्यात आली. पुढे १९५२ मध्ये '' दि. प्रवरा सहकारी साखर काराखाना लि'' असे नामकरण करण्यात आले. तर या साखर कारखान्याच्या परिसरात वसाहती उभारण्यात आल्या. त्या वसाहतीला '' प्रवरानगर '' असे नाव देण्यात आले. या साखर कारखान्याच्या ०६—०५—१९४९ रोजी झालेल्या पहिल्या संचालक सभेत धनंजयराव गाडगीळ यांची अध्यक्ष तर विठ्ठलराव विखे पाटील यांची उपाध्यक्ष पदावर निवड करण्यात आली होती. या साखर कारखान्याचे ११ वर्षे धनंजय गाडगीळ हे अध्यक्ष होते.

एक प्रकारे प्रवरानगर येथे सहकारी तत्वावरील शेतकऱ्यांच्या मदतीने सुरू करण्यात आलेल्या साखर कारखान्यांची सुरूवात झाली होती. शेतकरीच मालक असलेल्या पहिला साखर कारखाना म्हणून या साखर कारखान्यांकडे पाहिले जाते. या सहकारी साखर कारखाना उभारणीसाठी वैकुंठराव मेहता, धनंजयराव गाडगीळ व विठ्ठलराव विखे पाटील यांचे मोठे योगदान होते. एक प्रकारे असे म्हणावे लागेल की, जरी मार्गदर्शन, समन्वय, प्रेरणा जरी धनंजयराव गाडगीळ यांची असली तरी शेतकरी वर्गाला तयार करणे, समन्वय घडवून आणणे, शेतकऱ्यांकडून साखर कारखाना उभारणीसाठी निधी तयार करणे याबाबीमध्ये विठ्ठलराव विखे पाटील यांचे मोठे योगदान आहे.

अहमदनगर जिल्ह्यात सहकार क्षेत्राची परंपरा ही विठ्ठलराव विखे पाटील, धनजंयराव गाडगीळ यांच्या नेतृत्वाने सुरू झालेली आहे. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या नेतृत्वामुळे नंतरच्या काळात सहकारी साखर कारखान्याला आलेल्या अडचणीवर शेतकरी कशा प्रकारे मात करू शकतात याचा एक आदर्श निर्माण करून दिला. या सहकारी साखर कारखान्यांतून डिसेंबर १९५० साली पहिला गळीत हंगाम सुरू करण्यात आला. तो हंगाम यशस्वी झाला. परिणामी अनेक ऊस उत्पादकांनी त्यांचे ऊस गुळ तयार करण्यासाठी न देता साखर कारखान्यांकडे पाठविले. या सहकारी साखर निर्मितीमध्ये नेतृत्वाप्रमाणे अनेक शेतकऱ्यांनी स्वार्थत्याग करीत सहकार्य केल्याचे दिसून येते. या सहकारी साखर कारखान्यांच्या गळीत हंगाम यशस्वी झाल्यानंतर धनंजयराव गाडगीळ यांनी १९५४ साली सहकारी साखर कारखान्याचा अहवाल तयार केला. या अहवालात म्हणतात की, '' पाणीवाटपाबद्‌ल बोर्डाने निपक्षपातीपणाने ठरविलेल्या धोरणाचे सर्व सभासदांनी आनंदाने स्वागत केले. मनुष्य गरीब किंवा श्रीमंत असो, दुसऱ्याच्या मालकीचे आपणास मिळाव, अशी तो अपेक्षा करतो व त्या दिशेने त्याचे अनेक वेळा वेडेवाकडे प्रयत्नही चालू राहतात. परंतु आपल्या कारखान्यांच्या अधिकारावरील सभासदांनी मात्र, सरकारकडून मिळालेल्या पाण्याची स्वत:साठी हाव न धरता, ते लहानातल्या लहान सभासदांना वाटून दिले. अगदी गरीब सभासदांचा उत्कर्ष सहकाराद्वारा साधणे, हेच कारखान्याचे प्रथमपासून ध्येय आहे., या दृष्टीने चालकांनी पाणी वाटपाबद्‌ल जे धोरण स्वीकारले ते स्पृहणीय व आपणा सर्वांना अभिमानास्पद आहे.'' (पाटील गुलाबराव, १९८२, पृ. ३० ते ३१) एक प्रकारे शेतकरी आणि सहकार साखर कारखान्यातील सर्व सभासद यांनी सहकार्य केले. त्याचप्रमाणे या सहकारी साखर कारखाना उभारणी आणि यशस्वी करण्यासाठी महत्त्वाचे होते ते नेतृत्व. विठ्ठलराव विखे पाटील यांच्यासारखे यशस्वी असे नेतृत्व लाभल्याने अहमदनगर जिल्ह्यात साखर कारखान्याच्या माध्यमातून एक यशस्वी परंपरा निर्माण झालेली दिसून येते.

विठ्ठलराव विखे पाटील यांनी सहकारी साखर कारखाना यशस्वी केल्यानंतर अहमदनगर जिल्ह्यातच कोपरगाव, कोरेगाव, राहता, राहुरी हे चार सहकारी साखर कारखाने १९५४ –१९५५ या काळात काढण्यात आले. या सर्व साखर कारखान्यांना विठ्ठलराव विखे पाटील यांनी मार्गदर्शन केले होते. या सहकारी साखर कारखान्यानंतर महाराष्ट्रातील इतर परिसरात कारखाने काढण्यात येऊ लागली होते.

अहमदनगर जिल्ह्यातील साखर कारखान्याचा विचार करता असे दिसून येते की, १९६० ते १९८० या दोन दशकातील काळ हा सुवर्ण काळ होता. या काळात सहकार क्षेत्र ज्या प्रकारे विकसित होत होते. तसेच राजकीय नेतृत्व देखील विकसित होत होते. सहकार क्षेत्राच्या माध्यमातून समाजाची आर्थिक आणि राजकीय पातळीवर संस्थात्मक बांधणी करण्यास नेतृत्वाला अवकाश मिळालेला होता. राज्य पातळीवर १९७८ सालापासून सहकार क्षेत्राला घसरण लागलेली दिसून येते. ही घसरण साखर कारखाने तोट्यात जाण्याच्या पातळीवरील आहे. मात्र अहमदनगर जिल्ह्यात सहकार क्षेत्राच्या माध्यतातून साखर कारखाने निर्मिती झालेली दिसते. मात्र या निमिर्तीमध्ये जे जुने सहकारी साखर कारखाने होते त्याच्या तुलनेत व्यवस्थित चालवलेले दिसून येत नाहीत. ही नेतृत्वाची उणीव होती.

## नवी सत्ता केंद्र आणि राजकीय नेतृत्वाचे शक्तीस्थाने

साखर कारखान्यांच्या माध्यमातून सत्तास्थाने निर्माण करण्याचे कार्य राजकीय नेतृत्वाकडून जोरदारपणे चालू असतानाच १९६२ मध्ये स्थानिक पातळीवर पंचायत राजची सुरूवात झाली. ही सत्तास्थाने जिल्हापरिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत या तीन पातळ्यावर होती. परिणामी सहकार क्षेत्र हे मागे पडेल असे वाटत होते. स्थानिक पातळीवर सत्ताकेंद्र विकेंद्रीत होतील असे वाटत होते. मात्र तसे झाले नाही. त्याचवेळी सहकारी साखर कारखान्यांचे महत्त्व देखील नेतृत्वाने कमी होऊ दिले नाही. अहमदनगर जिल्ह्यात तत्कालीन काळात काँग्रेस पक्ष हा सर्वव्यापी होता. काँग्रेस पक्षाचा

त्या काळात पुर्ण जिल्हाभर अंमल होता. त्यामुळे काँग्रेस नेतृत्वाला सहकाराच्या राजकारणात आणि विकासासाठी वातावरण पुरक होते. त्यामुळे काँग्रेस पक्ष ज्याप्रकारे वर्चस्वशाली होता त्याचप्रमाणे काँग्रेस पक्ष सहकारात देखील रूजला. परिणामी सहकार क्षेत्रातून राजकीय नेतृत्व हे स्थानिक व राज्य पातळीवरील पुढे आले. स्थानिक पातळीवर नेतृत्व हे सहकार सम्राट म्हणून पुढे आले. मात्र त्याच वेळी स्थानिक पातळीवर व विधानसभा पातळीवर काही नेतृत्वामध्ये गटबाजी आणि राजकीय सत्तेसाठी स्पर्धा निर्माण झालेली दिसून येते. त्यासंदर्भातील कोपरगाव, राहुरी, शेवगाव या तालुक्याची उदाहरण म्हणून पाहता येईल.

१९९० नंतर सहकार क्षेत्राच्या माध्यमातून जिल्ह्यातील नेतृत्व हे सहकार आणि तालुक्यातील राजकारण यामध्ये गुंतून गेलेले दिसून येते. सहकार क्षेत्र हे एक राजकीय नेतृत्वाला पाठिंबा देणारे आणि सत्तेत कायम राहणारे एक साधन म्हणून पाहण्यात येऊ लागले. उदा. कोपरगाव या तालुक्यातील शंकरराव काळे हे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असतानाच कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन देखील होते. दुसरे उदाहरण पहावयाचे झाले तर के. बी रोहमारे हे आमदार असतानाच अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष होते. त्याच वेळी गोदावरी प्रवरा सहकारी खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष देखील होते. एक प्रकारे सहकार क्षेत्र आल्याने ज्या प्रकारे सत्तेचे विकेंद्रीकरण होत आहे असे वाटत होते त्याच वेळी सत्तेची अनेक केंद्रे ही एकाच नेतृत्वाच्या अधीन होत होती.

सहकारी साखर कारखाने आणि सहकार क्षेत्रातील इतर संस्था ह्या मराठा समाजाच्या ताब्यात होत्या. लोकसंख्येच्या कारणानी आपोआप वर्चस्व येत होते. अहमदनगर जिल्ह्यातील सर्वच्या सर्व सत्ता केंद्रे ही मराठा समाजाच्या नेतृत्वाच्या आधीन राहत आलेली होती. १९९० नंतर काही शेतकरी ओबीसी समाजातील नेतृत्वाकडून स्थानिक पातळीवर आव्हाने निर्माण झालेली दिसून येते. परिणामी शेतकरी ओबीसी जातींना विशिष्ट मर्यादित प्रमाणावर राजकीय सत्तेत वाव देण्याचे धोरण मराठा

नेतृत्वाकडून आले. सहकार क्षेत्रात अकोले आणि पाथर्डी या परिसरातील अपवाद वगळता इतर ठिकाणी ओबीसी समाज घटकाला राजकारणात फारसा वाव निर्माण होऊ दिला नाही.

शेतकरी ओबीसी समाज नेतृत्वाला राजकारणात वाव देत असताना दुय्यम पातळीवर स्थान देण्यात आल्याचे दिसून येते. माळी, धनगर आणि वंजारी समाजाच्या नेतृत्वाला साखर कारखान्याचे चेअरमन, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, पंचायत समितीचे अध्यक्ष अशा प्रकारेच स्थान देण्यात येते. तर आमदार, खासदार, मंत्रीपदी मराठा समाजाचे वर्णी ही निश्चित असल्याचे दिसून येते.

अहमदनगर जिल्हा राजकारणात सहकार क्षेत्राचा विकास आणि त्याचा आर्थिक विकास आणि राजकीय क्षेत्राशी व्यवस्थितरित्या सांगड ही मराठा नेतृत्वाने घातली. त्यामुळे स्थानिक पातळीवर नेतृत्वाच्या विरोधातील जी खदखद असते ती कमीच राहिलेली आहे. राज्य पातळीवरील आणि देश पातळीवरील नेतृत्वाच्या गटबाजीचा फटका हा अहमदनगर जिल्हा राजकारण आणि नेतृत्वाला बसेल असे वाटत होते. मात्र सहकार क्षेत्राच्या माध्यमातून संस्थात्मिकीकरण जे करण्यात आले आहे त्यामुळे फटका बसला नाही. उदा. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राच्या राजकारणातून देश पातळीवरील राजकारणात गेले. त्याच वेळी इंदिरा गाधी यांच्यामुळे त्यांना सिडिकेंट काँग्रेसमध्ये बरोबर राहावे लागले. त्यावेळी अहमदनगर जिल्हा काँग्रेस नेतृत्व कोणाबरोबर हा प्रश्न निर्माण झाला होता. अहमदनगर जिल्हातील अनेक नेतृत्व हे यशवंतराव चव्हाण यांच्याबरोबर गेले. मात्र तरीही काँग्रेस पक्षाला अहमदनगरच्या राजकारणात फटका बसला नाही. दुसरे उदा. शरद पवार यांच्या पुलोद या शासनाच्या काळात काँग्रेसमधील अनेक नेतृत्व हे शरद पवार यांच्याबरोबर गेले होते. तरीही १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत मुख्य स्पर्धा पुलोद आणि काँग्रेस या पक्षामध्ये राहिली. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला सर्वाधिक जागा मिळाल्या. काँग्रेस पक्षाची केवळ एक जागा कमी झाली. यावरून सहकार क्षेत्र काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून पुर्णपणे रूजलेले असल्याचे दिसून येते. मात्र

१९९९ साली शरद पवार यांचे दुसरे बंड झाले. त्यावेळी मात्र काँग्रेस पक्ष आणि सहकार क्षेत्रातील नेतृत्व देखील मोडकळीस आले. कारण काँग्रेस पक्षाला हक्काच्या केवळ तीन मतदारसंघात वर्चस्व ठेवता आलेले दिसून येते.

## सहकार क्षेत्रातील घराणेशाहीचा उदय

सहकार क्षेत्रात घराणेशाही पुढे आली. सहकाराच्या राजकीय पक्षाच्या माध्यमातून एकदा घराण्यात सत्ता आल्यानंतर ती सोडलेली असे उदाहरण अहमदनगर जिल्ह्याच्या राजकारणाात झालेले दिसून येत नाही. उलट घराणेशाही ज्या प्रकारे पुढे आली त्याप्रमाणे घराणेशाहीची संख्या देखील वाढलेली दिसून येते. एकदा सत्ता हाती आली किंवा सहकारी साखर कारखाना उभारणी केली असता नेतृत्वाकडून त्यांचा वारस म्हणून मुलाची सोय केल्याचे सर्रास अहमदनगर जिल्ह्यात घडून आल्याचे दिसून येते. अहमदनगर जिल्ह्याच्या राजकारणात राजकीय नेतृत्वाने स्वत:च्या वारसाची व्यवस्थितरित्या सोय केल्याचे दिसून येते. परिणामी प्रत्येक तालुक्यात राजकीय घराणे उदयाला आल्याचे दिसून येते. परिणामी सहकार क्षेत्राने ज्या प्रकारे आर्थिक आणि राजकीय विकासाचे संस्थात्मक विकास होण्यास भाग पाडले त्याचप्रमाणे विकृत स्वरूप देखील दिल्याचे दिसून येते. घराणेशाही ही अहमदनगर जिल्हा नेतृत्वामध्ये विखे पाटील, थोरात, घुले, गडाख, ससाने, तनपुरे असे अनेक नावे सांगता येतील. सहकारी साखर कारखाने ही राजकीय नेतृत्व टिकवण्यासाठी कवचकुंड बनले आहेत. ही कवचकुंड शासकीय योजनामधील अनुदान घेण्यापासून सामाजिक नेतृत्व टिकवण्यापर्यंत आहेत. सहकार क्षेत्रात राजकीय नेतृत्वाच्या तीन ते चार पिढया आता आल्याच्या दिसून येतात.

सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून साखर कारखान्यांच्या अंतर्गत कामगार, बाह्य कामगार आणि ऊस उत्पादक शेतकरी अशा तिन्ही पातळीवर वर्चस्व निर्माण करण्याचे साधन असल्याचे राजकीय नेतृत्वाला दिसून येते. परिणामी राजकीय नेतृत्व हे कोणत्याही स्वरूपातील संकट आले तरी सहकार क्षेत्र त्यास तोंड देईल अशा भ्रमात वावरत असल्याचे दिसून येते. परिणामी आता अहमदनगर जिल्ह्यातील प्रत्येक

सहकारी साखर कारखाना हा तोट्यात आहेत. २० पैकी दोन सहकारी साखर कारखाने ऊस उत्पादना अभावी बंद पडलेले आहेत. १८ पैकी दोन खाजगी असल्याने त्या साखर कारखान्यांवर नियत्रंण आहे. उरलेले १६ सहकारी साखर कारखाने २०१० च्या अहवालानुसार कर्जात असल्याचे दिसून आले. त्याच अनेक पातळीवरून पाहिले असता, व्यवस्थापन आणि राजकीय नेतृत्व जबाबदार आहे. त्याच प्रमाणे घराणेशाही देखील जबाबदार आहे. कारण वारसा हक्काने नेतृत्व आल्याने जबाबदारी स्वीकारणे आणि नेतृत्व करणे या बाबीची उणीव असल्याचे दिसून येते.

## अहमदनगर जिल्ह्यातील सहकार साखर कारखाने आणि नेतृत्व वर्चस्वाचे स्वरूप

अहमदनगर जिल्ह्यात सहकाराचे आणखी एक मोठे क्षेत्र म्हणजे सहकारी/खाजगी साखर कारखाने होय. जिल्ह्यात २० साखर कारखाने आहेत. सहकारी साखर कारखाने १७ आहेत. तर ०३ साखर कारखाने खाजगी आहेत. या साखर कारखान्यांनी १२,६६३ लाख मे. टन २०१०—२०११ या वर्षात साखरेचे उत्पादन केले. अहमदनगर जिल्ह्याचा विचार करता असे दिसून येते की, सिंचन क्षेत्राचा विकास ज्या तालुक्यात झालेला आहे. त्या तालुक्यात सहकारी साखर कारखाने निर्मितीची संख्या जास्त प्रमाणावर होती. ही निर्मिती १९८० पर्यंत होती. मात्र १९८० नंतर दुष्काळी परिसरात देखील सहकारी साखर कारखाने हे राजकीय सत्तेवर जाण्यासाठीचे साधन असल्याचे नेतृत्वाकडून पाहण्यात आल्याने संख्या वाढलेली दिसून येते. त्यात देखील शेवगाव, श्रीगोंदा या दोन तालुक्यात सहकारी साखर कारखान्याची संख्या जास्त आहे. हे दोन्ही तालुके हे दुष्काळी यादीत मोडतात. यावरून विचार पुढे येतो की, सहकारी साखर कारखाने हे राजकीय नेतृत्वाच्या पुढाकाराने दुष्काळी परिसरात पुढे येत आहेत. दुसरे असे की, अति कोरडवाहू तालुक्यात देखील सहकारी साखर कारखाने काढण्यात आलेले आहेत. (तक्ता. क्र. ६. १)

**तक्ता क्र. ६.१**

**अहमदनगर जिल्ह्यातील साखर कारखाने असणारे तालुके व संख्या**

| अ.क्र | साखर कारखाना असणारे तालुका | साखर कारखान्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | अकोले | १ |
| २ | संगमनेर | १ |
| ३ | कोपरगांव | २ |
| ४ | श्रीरामपूर | १ |
| ५ | नेवासा | २ |
| ६ | राहता | १ |
| ७ | शेवगांव | ३ |
| ८ | पाथर्डी | १ |
| ९ | नगर | १ |
| १० | राहुरी | १ |
| ११ | पारनेर | १ |
| १२ | श्रीगोंदा | ४ |
| १३ | कर्जत | १ |
| १४ | एकूण | २० |
| आधार : साखर आयुक्त, पुणे, अहवाल – २०१० | | |

अहमदनगर जिल्ह्यात एकूण २० सहकारी/खाजगी साखर कारखाने आहेत. साखर कारखान्याच्या अध्यक्षांच्या जाती महादेव कोळी ०१, मराठा १८, वंजारी ०१ असे जातीयांचे अध्यक्ष पातळीवर स्वरूप आहे. पक्षीय पातळीवर कॉंग्रेस १०,

राष्ट्रवादी काँग्रेस ०८, शिवसेना ०१ व भाजप ०१ असे पक्षीय स्वरूप या सहकार क्षेत्राचे आहे. (तक्ता क्र. ६.२)

जिल्ह्यातील सहकारी व खाजगी साखर कारखान्यावर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना व भाजप या पक्षांचा प्रभाव आहे. हा प्रभाव मराठा समाजाच्या नेतृत्वाच्या माध्यमातून आहे. अहमदनगर जिल्ह्यात माळी, धनगर आणि वंजारी हे ओबीसी समाजातील जातीं प्रभावी आहेत. मात्र यापैकी वंजारी समाजाच्या नेतृत्वाने साखर कारखाना उभारणी केली आहे. माळी आणि धनगर समाजाच्या नेतृत्वाला साखर कारखाना उभारणी करता आलेली नाही. वंजारी समाजाच्या नेतृत्वाने साखर कारखाना उभारणी ही मराठा आणि वंजारी या स्पर्धक असलेल्या भौगोलिक परिसरात साखर कारखाना उभारणी केली आहे. मात्र या साखर कारखान्याच्या माध्यमातून अपेक्षित असलेले राजकारण उभे करता आले नाही. कारण हा साखर कारखाना दुष्काळी परिसरात उभारणी केली असल्याने ऊसाअभावी बंद पडणारे वर्ष जास्त आहेत. धनगर आणि माळी समाजाने मराठा नेतृत्वाने उभारणी केलेल्या साखर कारखान्यावर शेअर धारक राहणे पसंत केल्याचे दिसून येते. (पहा तक्ता क्र. ६.२)

**तक्ता क्र. ६.२**

**अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखाने, राजकीय पक्ष व जातीगटांचे वर्गीकरण : (२००९–२०१०)**

| अ.क्र | सहकारी साखर कारखाने | राजकीय पक्ष | जातीचा प्रभावी नेतृत्व |
|---|---|---|---|
| १ | अगस्ती सह. सा. कारखाना लि. अकोले | राष्ट्रवादी काँग्रेस | महादेव कोळी |
| २ | संगमनेर भाग स.सा.का.लि. संगमनेर | काँग्रेस | मराठा |
| ३ | कोपरगांव स.सा.का.लि. कोळपेवाडी | शिवसेना | मराठा |
| ४ | संजीवनी स.सा.का.लि. कोपरगांव | राष्ट्रवादी काँग्रेस | मराठा |
| ५ | पद्मश्री स.सा.का.लि. प्रवरानगर | काँग्रेस | मराठा |
| ६ | गणेश स.सा.का.लि. गणेशनगर, राहाता | काँग्रेस | मराठा |
| ७ | अशोक स.सा.का.लि.अशोकनगर, श्रीरामपूर | काँग्रेस | माळी |
| ८ | मुळा स.सा.का.लि. शेवगांव | राष्ट्रवादी काँग्रेस | मराठा |
| ९ | केदारेश्वर स.सा.का.लि. शेवगांव | भाजप | वंजारी |
| १० | वृध्देश्वर स.सा.का.लि. तिसगांव पाथर्डी | काँग्रेस | मराठा |
| ११ | नगर स.सा.का.लि. वाळकी | काँग्रेस | मराठा |
| १२ | तनपुरे स.सा.का.लि. राहुरी | काँग्रेस | मराठा |
| १३ | पारनेर स.सा.का.लि. देवीभोयरे | काँग्रेस | मराठा |
| १४ | श्रीगोंदा स.सा.का.लि. पिंपळगांव | काँग्रेस | मराठा |
| १५ | साईकृपा सा.का.लि. देवदैठण, श्रीगोंदा | राष्ट्रवादी काँग्रेस | मराठा |
| १६ | कुकडी स.सा.का.लि. पिंपळगाव पिसा, श्रीगोंदा | काँग्रेस | मराठा |
| १७ | जगदंबा स.सा.का.लि. राशीन | राष्ट्रवादी काँग्रेस | मराठा |
| १८ | गंगामाई स.सा.का.लि. शेवगांव | काँग्रेस | मराठा |
| १९ | साईकृपा स.सा.का.लि. श्रीगोंदा | राष्ट्रवादी काँग्रेस | मराठा |
| २० | ज्ञानेश्वर स.सा.का.लि. नेवासा | राष्ट्रवादी काँग्रेस | मराठा |

आधार : प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर (२०११)

## जात आणि सहकारी साखर कारखाने

जात आणि सहकारी साखर कारखाने याचा विचार करता असे दिसून येते की, मराठा समाजाच्या राजकीय नेतृत्वाचे साखर कारखान्यावर प्रचंड प्रमाणावर वर्चस्व आहे. मराठेतर सहकारी साखर कारखान्यात माळी आणि वंजारी समाजाचे नेतृत्व आहे. श्रीरामपूर तालुक्यातील एका साखर कारखान्यावर माळी समाजाचे वर्चस्व आहे. मात्र हे वर्चस्व निर्माण करण्यासाठी माळी समाजाच्या नेतृत्वाला मराठा समाजाच्या नेतृत्वाशी हात मिळवणी करावी लागलेली आहे. चेअरमन आणि उपचेअरमन पद हे मराठा समाजाला सातत्याने देण्यातून माळी समाज नेतृत्वाला वर्चस्व निर्माण करता आहे. दुसरे म्हणजे माळी समाज नेतृत्वाने आर्थिक शक्तीच्या जोरावर साखर कारखान्यावर वर्चस्व मिळवले आहे. वंजारी समाजाचे नेतृत्वाने साखर कारखाना निर्माण करण्यात पुढाकार घेतला. मात्र दुष्काळी परिसरात हा साखर कारखाना असल्याने ऊसाची कमतरता आणि प्रभावी असे व्यवस्थापन आणि नियोजना अभावी नेतृत्व विकसित करता आले नाही. अकोले तालुक्यात आदिवासी समाजाचे संख्या जास्त आहे. तसेच आदिवासी समाजातून पुढे आलेले नेतृत्वाने साखर कारखाना स्थापन करण्यापासून पुढाकार घेत साखर कारखान्यावर वर्चस्व मिळवलेले आहे. मात्र मराठा समाजाचे नेतृत्व एकत्र येत आदिवासी नेतृत्वाला विरोध करण्यात आला. परिणामी आदिवासी नेतृत्वाला सत्ता गमवावी लागली. मात्र नंतरच्या काळात ओबीसी आणि मराठा समाजाच्या नेतृत्वाशी समन्वय घडवत सत्ता पुन्हा हस्तगत करता आली. त्यामुळे या साखर कारखान्यावर सत्ता टिकवता आली आणि सहकार क्षेत्रातील राजकारणात राहता देखील आले. इतर १७ साखर कारखान्यावर मराठा समाजाच्या नेतृत्वाने पुर्णपणे वर्चस्व मिळवलेले आहे. दुष्काळी परिसरातील केवळ वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना लि. तिसगाव, ता. पाथर्डी हा साखर कारखाना यशस्वीपणे चालवण्यात आला. मात्र आता हा साखर कारखाना देखील कर्जाच्या बोजाखाली दबलेला आहे. इतर दुष्काळी तालुक्यातील साखर कारखाने बंद पडलेले आहेत.

## काही निवडक सहकारी साखर कारखाने आणि राजकीय नेतृत्व विकास

## अगस्ती सहकारी साखर कारखाना लि. अकोले

अगस्ती सहकारी साखर कारखाना हा आदिवासी परिसरातील साखर कारखाना असला तरी या साखर कारखान्याची स्थापना ही आदिवासी नेतृत्व मधुकर पिचड यांनी केली. या साखर कारखान्याची स्थापना १९८९ साली करण्यात आली आहे. तर या साखर कारखान्याचा गळीत हंगाम हा १९९२—१९९३ साली पहिला झाला. या साखर कारखाना आदिवासी परिसरात असल्याने मधुकर पिचड यांचेच वर्चस्व राहत आलेले आहे. आदिवासी परिसरातील साखर कारखाना असला तरी सिंचन क्षेत्राचा विकास आणि पाणी उपलब्धता या कारणाने या साखर कारखाना सातत्याने व्यवस्थितरित्या चालवण्यात आलेला आहे. या साखर कारखान्याच्या निवडणुकीत आदिवासी आणि इतर काही स्थानिक नेतृत्वाने मधुकर पिचड यांच्या वर्चस्वाला आव्हान देण्याचा प्रयत्न केला. मात्र मधुकर पिचड यांनी तो विरोधकांचा प्रयत्न यशस्वी होऊ दिला नाही.

आदिवासी परिसरातील या साखर कारखान्याला नवबौध्द समाजाचे नेतृत्व दादासाहेब रूपवते यांना या साखर कारखान्यावर प्रशासक नेमण्यात आले होते. हे प्रशासकीय मंडळ पुर्ण एक वर्ष अस्तित्वात राहिले. त्यानंतर या प्रशासकीय मंडळानंतर साखर कारखान्यावर संचालक मंडळाच्या निवडणुका घेण्यात आल्या. त्यानुसार पुन्हा आदिवासी नेतृत्व मधुकरराव पिचड यांच्या नेतृत्वाखालील संचालक मंडळ अस्तित्वात आले. १९९३ ते २००१ या काळात साखर कारखान्यावर मधुकर पिचड यांचे वर्चस्व राहत आले. मात्र २००१ नंतर मधुकर पिचड यांचे सर्व विरोधक एकत्र येत साखर कारखान्यावर वर्चस्व मिळवण्यासाठी प्रयत्न करू लागले. मधुकर पिचड या आदिवासी नेतृत्वाला तालुक्यातील मराठा नेतृत्व एकत्र येत आदिवासीचे दुसरे नेतृत्व अशोक भांगरे यांच्या रूपाने विरोध प्रथम पुढे आला. विरोध करण्यासाठी शेतकरी जागृती मंडळ नावाने पॅनल तयार करण्यात आला होता. या पॅनलला पहिल्याच निवडणुकीत २२ पैकी ११ जागा मिळाल्या होत्या. तर मधुकर पिचड यांच्या पॅनलला देखील ११ जागा मिळाल्या

होत्या. मात्र भांगरे यांच्या शेतकरी जागृती पॅनलला मिळालेल्या जागा शेतीतील ऊस उत्पादक गटातील होत्या. तर मधुकर पिचड गटाला चार जागा ऊस उत्पादक गटातील होत्या व इतर जागा इतर गटातून मिळाल्या होत्या. शेतकरी जागृती विकास पॅनलच्या सदस्यांनी ऊस उत्पादक गटातील सर्वाधिक जागा जिंकल्या असल्याने सत्ता स्थापनेसाठीचा दावा केला. सर्वांनी तो मान्य केला. परिणामी या साखर कारखान्यावर प्रथमच मराठा समाजाचे प्रकाश मालुंजकर यांना अध्यक्ष करण्यात आले. मात्र संचालक मंडळात अनेक मतभेद पुढे आले. परिणामी दोन वर्ष साखर कारखाना बंद करावा लागला. पुढच्याच निवडणुकीत पुन्हा मधुकर पिचड यांच्या बाजूने कौल मिळत सत्ता आदिवासी नेतृत्व मधुकर पिचड यांच्याकडे आली. ही सत्ता कायम त्यांच्याकडेच राहिलेली आहे. मात्र मधुकर पिचड यांनी मराठा नेतृत्वाच्या विरोधाने विरोधी पॅनल तयार होत विरोध झाल्याने त्यांनी मराठा नेतृत्वाला हाताशी धरत साखर कारखान्यावरील वर्चस्व कायमस्वरूपी राहिल अशा स्वरूपात बांधणी केली आहे. तसेच उपाध्यक्ष पदासाठी मराठा नेतृत्वाला संधी देत राहिले. मधुकर पिचड हे अध्यक्ष आहेत. नंतर मधुकर पिचड यांनी उपाध्यक्ष पद हे मराठा समाजाला राहिल अशा स्वरूपात अलिखित स्वरूपातील निमय केला आहे. मात्र तरीही त्यांनी गुरव समाजाचे मिनानाथ पांडे यांना केले. पिचड यांचे प्रमुख विरोधक महादेव कोळी समाजातील अशोक भांगरे, किरण लहामटे आणि मधुकर पळपाडे हे सातत्याने राहत आलेले आहेत. मात्र मधुकर पिचड यांचे वर्चस्व सर्वसामान्यामधून आलेले असल्याने त्या वर्चस्वाला विरोधकांकडून हात लावण्यात सातत्याने अपयश आले. मधुकर पिचड यांना सातत्याने शिवाजी धुमाळ, जालींदर वाकचौरे या मराठा नेतृत्वाची साथ राहिलेली आहे.

## संगमनेर भाग सहकारी साखर कारखाना लि. संगमनेर

संगमनेर तालुक्यातील भाग सहकारी साखर कारखाना हा भाऊसाहेब थोरात यांनी १९६७ साली हा स्थापन केला. हा साखर कारखाना स्थापन करण्यात विठ्ठलराव विखे पाटील आणि भाऊसाहेब थोरात या दोन नेतृत्वाने पुढाकार घेत या सहकारी साखर

कारखान्याची स्थापना केली. विठ्ठलराव विखे पाटील हे राहता येतील आणि भाऊसाहेब थोरात हे संगमनेर येथील असल्याने स्थानिक असल्याने कारखान्यातील भागीदारांकडून भाऊसाहेब थोरात यांना पाठिंबा मिळाला. सुरूवातीला भाऊसाहेब थोरात आणि विखे पाटील यांचे चांगले सूत्र असल्याने विरोध आणि मतभेद झाले नाहीत. मात्र विठ्ठलराव विखे पाटील यांनी हे राहता आणि प्रवरा येथील सहकारी साखर कारखाना यामध्ये लक्ष घातल्याने संगमनेर येथील सहकारी साखर कारखान्याकडे दुर्लक्ष करत राहिले. मात्र पहिल्या संचालक मंडळात विठ्ठलराव विखे पाटील होते. दरम्यानच्या काळात भाऊसाहेब थोरात यांना त्यांचे मेव्हणे आण्णासाहेब शिंदे यांचा पाठिंबा मिळत राहिला. अहमदनगर जिल्हा राजकारणात आण्णासाहेब शिंदे यांचे उच्च दर्जाचे नेतृत्व तत्कालीन काळात मानण्यात येत होते. त्यांच्या नेतृत्वाला इतर नेतृत्वाची देखील मान्यता होती. परिणामी आण्णासाहेब शिंदे यांच्या पाठिंब्याने भाऊसाहेब थोरात यांनी सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून भक्कम असा स्थानिकांचा पाठिंबा मिळवला.

१९८० च्या दरम्यान भाऊसाहेब थोरात यांचे चिरंजीव बाळासाहेब थोरात यांनी राजकारणात प्रवेश करत भाऊसाहेब थोरात यांच्या नेतृत्वाला पाठिंबा देत राहिले. परिणामी साखर कारखान्यावर विरोधक निर्माण होणार नाही अशी काळजी भाऊसाहेब थोरात हे घेत आले होते. ज्या प्रमाणे विरोधक निर्माण होणार नाहीत अशी काळजी घेत होते त्याच प्रमाणे सहकारी साखर कारखान्यातील शेअरधारकांना देखील खुष करत होते. त्यामुळे या शेअर धारकाकडून विरोधक निर्माण झाले नाहीत. परिणामी सहकारी साखर कारखान्यावर संचालक मंडळाच्या रूपाने थोरात घराण्याचे वर्चस्व राहिले. मात्र २००० नंतर विखे घराणे आणि थोरात घराणे असे अहमदनगरच्या राजकारणात काँग्रेस पक्षांतर्गत गट निर्माण झाले. त्याचा परिणाम हा सहकार क्षेत्रावर देखील झालेला दिसून येतो. कारण जोपर्यंत असे गट नव्हते तो पर्यंत भाग सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळात आणि बाह्यरूपाने विरोधक नव्हते. मात्र विखे पाटील गटाचे समर्थक असलेले बापूसाहेब गुळवे यांनी बाळासाहेब थोरात यांना भाग सहकारी साखर कारखान्यावरील

राजकारणात विरोध करण्याची भूमिका घेण्यात आली. परिणामी २००० नंतर सहकार साखर कारखान्यावर वर्चस्वासाठी विरोध होत आहे. मात्र हा विरोध बाळासाहेब थोरात यांनी टोकाला जाऊ दिलेला नाही. सहकारी साखर कारखान्यावर वर्चस्व हे ठेऊन आहे. या सहकारी साखर कारखान्यात मराठा, माळी, वंजारी, धनगर या समाजाचे शेअरधारक जास्त प्रमाणात आहेत. मात्र सातत्याने या सहकारी साखर कारखान्यावर मराठा समाजाच्या नेतृत्वाचे संचालक आणि चेअरमनपदी वर्चस्व राहिलेले आहेत. मराठेतर सहकारी साखर कारखान्यावर चेअरमनपदी मराठेतर नेतृत्वाला संधी मिळालेली नाही. परिणामी या सहकार साखर कारखान्यावर मराठा समाज नेतृत्वाचे वर्चस्व राहत आलेले आहे.

## कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि. कोळपेवाडी

कोपरगाव सहकारी साखर कारखाना लि. कोळपेवाडी या साखर कारखान्याची स्थापना ही शंकरराव काळे या नेतृत्वाच्या पुढाकाराने १९५६ साली करण्यात आली. म्हणजे भारतीय स्वातंत्र्योनंतर ९ वर्षात करण्यात आली. अर्थात या काळात सर्वांत कठीण असे होते की, नेटकेच स्वातंत्र मिळाल्यानंतर ग्रामीण भागात सहकार क्षेत्र हे परिचित नसताना देखील असा पुढाकार घेण्याचे धाडस हे शंकरराव काळे नेतृत्वाने दाखवले. त्यांच्या या धाडसाला स्थानिक जनतेचा भक्कम असा पाठिंबा त्यांना मिळाला होता. परिणामी या सहकारी साखर कारखान्यावर त्यांचे एकहाती वर्चस्व निर्माण होण्यास काही अडचण आली नाही. शंकरराव काळे यांना या साखर कारखाना उभारणीत स्थानिक शेतकरी वर्ग आणि तत्कालीन राजकीय नेतृत्व अशा दोन्हींची मदत झाली होती. स्थानिक शेतकऱ्यांचा भक्कम असा पाठिंबा असल्याने त्यांना पहिल्या संचालक मंडळावर वर्चस्व मिळवण्यात काहीच अडचण आली नाही.

शंकरराव काळे यांनी या सहकारी साखर काखान्यावर वर्चस्व मिळवल्यानंतर साखर कारखान्याच्या माध्यमातून स्थानिक परिसरातील ग्रामीण विकास करण्यावर लक्ष केंद्रीत केले. त्याचप्रमाणे स्थानिक पातळीवर नगदी पिक पध्दतीत बदल घडवून

आणण्यात पुढाकार घेतला. एक प्रकारे त्यांनी कोपरगाव परिसरात नगदी पिके घेण्याची संस्कृती शेतकरी वर्गामध्ये रूजवण्यात पुढाकार घेतला. परिणामी या साखर कारखान्यावर त्यांचे नेतृत्व हे शेअरधारकाकडून अधिमान्य मिळवणारे निर्माण झाले. शंकरराव काळे यांच्यानंतर त्यांचा मुलगा अशोक काळे यांचे नेतृत्व हे या साखर कारखान्यावर प्रस्थापित झाले.

या सहकारी साखर कारखान्यावर कोपरगाव तालुक्यातील दुसरे नेतृत्व बिपिन कोल्हे यांच्या गटाचा शंकरराव काळे आणि अशोक काळे या गटाला विरोध राहिला. कोपरगाव तालुक्यात कोल्हे घराणे आणि काळे घराणे १९७८ पर्यंत एकाच पक्षात होते. या पक्षामध्ये हे दोन गट कार्यरत होते. एका गटाने कोपरगाव मतदारसंघावर नेतृत्व करावयाचे आणि दुसऱ्या गटाने लोकसभेला व इतर स्थानिक राजकारणात वर्चस्व निर्माण करत वर्चस्व नेतृत्वरूपाने टिकवायचे हे अलिखित संकेत होता. १९७८ साली पुलोदचा प्रयोग राज्य पातळीवर शरद पवार यांच्याकडून करण्यात आला. या पुलोद प्रयोगात प्रथम या दोन्ही घराण्यातील संघर्ष चव्हाट्यावर आलेला दिसून येतो. त्याचा परिणाम हा देखील साखर कारखान्यावर वर्चस्व निर्माण करण्यात दिसून येतो. शरद पवार यांच्या पुलोद पक्षामध्ये काळे घराणे गेले. तर कोल्हे घराणे हे काँग्रेस पक्षामध्येच राहिले. एक प्रकारे या दोन्ही घराण्याच्या संघर्षाला पुलोदने वाट तयार करून दिली होती. १९८५ नंतर शरद पवार हे पुन्हा स्वगृही परतले. मात्र ही दोन घराणी एकत्र आलेली दिसून येत नाहीत.

काळे घराण्याला कोल्हे घराण्यापुढे फारशी नेतृत्व टिकवण्यासाठी संधी मिळाली नाही. परिणामी काळे घराण्याने १९९० मध्ये शिवसेनेत प्रवेश केला. त्यामुळे काळे घराणे आणि कोल्हे घराणे ही एकमेकांना पारंपारिक विरोध करणारी व पुढे पक्षीय पातळीवर देखील विरोध करणारी घराणे झाली. या विरोधाचा परिणाम हा सहकारी साखर कारखान्यावरील वर्चस्व मिळवण्यासाठी देखील अशाच प्रकारे राहिलेला दिसून येतो. १९५६ ते २०१० या काळात कोल्हे घराण्याकडे सहकारी साखर कारखाना स्थापनेपासून

केवळ पाच वर्ष सत्ता राहिलेली आहे. २००० नंतर कोल्हे, काळे या घराण्याच्या जोडीला राष्ट्रवादीकडून नितिन औताडे यांचा देखील या दोन्ही घराण्याला विरोध असल्याचे पुढे आले आहे. त्यामुळे या तीन घराण्याच्या नेतृत्वामध्ये वर्चस्वासाठी स्पर्धा असताना दिसून येते. मात्र आतापर्यंत शंकरराव काळे व त्यानंतर त्याचा मुलगा अशोक काळे यांचे वर्चस्व राहत आलेले आहे. दुसरे असे की, या साखर कारखान्यावर मराठा, माळी, धनगर समाजाचे शेअरधारक मोठ्या प्रमाणावर आहेत. मात्र मराठा समाजाचे सर्वाधिक शेअर असल्यामुळे या साखर कारखान्यावर मराठा समाजाचे वर्चस्व राहिलेले आहे. मराठा समाजाचे नेतृत्व टिकण्यास देखील मदत झालेली दिसून येते.

## संजीवनी सहकारी साखर कारखाना लि. कोपरगांव

संजीवनी सहकारी साखर का. लि. कोपरगाव या साखर कारखान्याची स्थापना १९६० साली करण्यात आली. हा साखर कारखाना स्थापन करण्यासाठी कोल्हे आणि रोहमारे या दोन घराण्यातील नेतृत्वाने पुढाकार घेतला. १९८० पर्यंत या सहकारी साखर कारखान्यावर कोल्हे आणि काळे गटाचे वर्चस्व होते. मात्र १९८० मध्ये दादासाहेब रोहमारे यांचे नेतृत्व तालुक्यात पुढे आले. दादासाहेब रोहमारे यांनी या साखर कारखान्यावर वर्चस्व निर्माण करत तालुक्याचे नेतृत्व केले. मात्र कोल्हे आणि काळे हे पारंपारिक स्पर्धक घराण्यातील नेतृत्वाने साखर कारखान्यावरील राजकारणात रस घेण्यात सुरूवात केल्यानंतर दादासाहेब रोहमारे यांचे नेतृत्व मागे पडत साखर कारखान्यावर कोल्हे आणि काळे घराण्याचे वर्चस्व आले. सातत्याने साखर कारखान्यामध्ये सत्तांतर होत आले. मात्र कोल्हे घराणे या साखर कारखान्यावर हक्क सांगताना दिसून येते. मात्र त्यास काळे घराण्यातील प्रथम शंकरराव काळे आणि नंतर अशोक काळे यांच्याकडून या हक्काचे खंडन करत वर्चस्वासाठी विरोध करण्यात येतो. या साखर कारखान्यावर काळे आणि कोल्हे याच दोन घराण्याचे वर्चस्वासाठी तीव्र अशी स्पर्धा असताना दिसून येते. या साखर कारखान्यावर सातत्याने मराठा समाजाच्या नेतृत्वाचे वर्चस्व राहिलेले

आहे. धनगर आणि माळी समाजाचे शेअर्स आहेत. मात्र नेतृत्व करण्याची संधी मिळालेली नाही.

## पद्मश्री सहकारी साखर कारखाना लि. प्रवरानगर

राहता तालुक्यात दोन साखर कारखाने आहेत. त्यात अहमदनगर जिल्ह्यातील सर्वात जुना आणि प्रथम स्थापन करण्यात आलेला पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना लि. प्रवरानगर होय. या साखर कारखान्याची स्थापना १९५० साली विठ्ठलराव विखे पाटील यांच्या पुढाकाराने करण्यात आली आहे. या साखर कारखान्यासाठी धनंजयराव गाडगीळ यांचे मार्गदर्शन लाभलेले आहे. मात्र या साखर कारखान्याने या परिसरातील केवळ शेतकरी वर्गाचा आर्थिक पातळीवरील विकास झाला आहे असे नाही. तर सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय अशा विविध बाजूने विकास झालेला दिसून येतो. या साखर कारखान्यामुळे प्रवरानगर नावाने नव्याने नियोजित असे शहर वसवण्यात आले. या शहरात शैक्षणिक संस्था आणि इतर प्रकारचा औद्योगिक उद्योग निर्माण करत औद्योगिक क्षेत्र ग्रामीण भागात घेऊन जाण्याचे श्रेय विठ्ठलराव विखे पाटील यांच्याकडे गेले आहे.

सहकारी साखर कारखान्याचा विचार करता असे दिसून येते की, या साखर कारखान्यावर एकहाती विखे घराण्याचे वर्चस्व असले तरी डाव्या विचाराचे आणि चळवळीत वाढलेले नेतृत्व म्हणजे पी. के. कडू यांनी विरोध करत एकदा सत्ता हस्तगत केली. मात्र १९८० नंतर पुन्हा केवळ विरोध करण्याची भूमिका राहिली. मात्र सत्ता हस्तगत करता आली नाही. विखे पाटील घराण्यात बाळासाहेब विखे पाटील यांच्या नंतर राधाकृष्ण विखे पाटील यांनी साखर कारखान्यावर वर्चस्व मिळवले. त्याचप्रमाणे पी. के कडू यांच्या नंतर त्यांचा मुलगा अरूण कडू यांनी या साखर कारखान्याच्या बाबतीत विखे पाटील यांना विरोध करण्याची भूमिका घेतली. मात्र विखे पाटील घराण्याने कडू घराण्याला यश मिळू दिलेले नाही. विखे पाटील या घराण्याचे सातत्याने वर्चस्व असल्याने या साखर कारखान्यावर मराठा समाजाच्या नेतृत्वाचे वर्चस्व राहिलेले आहे.

## गणेश सहकारी साखर कारखाना लि. गणेशनगर, राहाता

राहता तालुक्यातील हा एक प्रमुख साखर कारखाना आहे. या साखर कारखान्याची स्थापना १९५६ साली विठ्ठलराव विखे पाटील यांच्या पुढाकारानेच करण्यात आलेली आहे. साखर कारखान्यावर सातत्याने विखे पाटील घराण्यातील नेतृत्वाचे वर्चस्व सातत्याने राहत आलेले आहे. विखे पाटील घराण्यातील नेतृत्वाच्या मर्जीने सुरूवातीच्या काही काळ चेअरमनपद इतर व्यक्तीला देण्यात आले होते. मात्र बाळासाहेब विखे पाटील यांनी या साखर कारखान्यात लक्ष घातल्यानंतर सातत्याने त्यांचेच वर्चस्व आतापर्यंत राहिलेले आहे. या साखर कारखान्याच्या बाबतीत बाळासाहेब विखे पाटील यांनी सातत्याने आर्थिक आणि सहकाराच्या उपयोगाच्या ज्या कल्पना वाटत होत्या त्या साखर कारखान्याच्या माध्यमातून राबवण्याचा प्रयत्न केला आहे. परिणामी त्यांना या साखर कारखान्यावर माजी खासदार शंकरराव काळे यांनी विरोध करत सत्ता हस्तगत केली होती. मात्र या साखर कारखान्यावर जास्त काळ ही सत्ता टिकवता आली नाही. त्याचप्रमाणे कोपरगाव तालुक्यातील कॉंग्रेस नेतृत्व शंकरराव कोल्हे यांनी देखील विखे पाटील यांच्या विरोधात या साखर कारखान्याच्या माध्यमातून राजकारण करण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न केवळ एकवेळेस यशस्वी करता आला. त्यानंतर साखर कारखान्यावरील प्रभाव त्यांना टिकवता आला नाही. २००० नंतर हा साखर कारखाना विखे पाटील यांच्याकडे सातत्याने राहिलेला आहे. या साखर कारखाना राजकारणात कोपरगाव तालुक्यातील कोल्हे घराणे आणि काळे घराणे या दोन घराण्याने विखे पाटील घराण्यातील नेतृत्वाला सातत्याने विरोध करण्याचा प्रयत्न केला. मात्र या तिन्ही नेतृत्व स्पर्धेत साखर कारखाना कर्जबाजारी होत गेल्याचे दिसून येते. परिणामी आता हा साखर कारखाना पद्मश्री विखे पाटील सहकारी साखर कारखान्याने सहभागी करार तत्वावर चालवण्याच्या अटीवर घेतलेला आहे. त्यामुळे विखे पाटील घराण्याच्या नेतृत्वाचे वर्चस्व या साखर कारखान्यावर राहिलेले आहे.

## अशोक सहकारी साखर कारखाना लि.अशोकनगर, श्रीरामपूर

अशोक सहकारी साखर कारखाना १९५२ मध्ये माजी आमदार भास्करराव गलांडे यांच्या पुढाकाराने स्थापन करण्यात आला. या साखर कारखाना स्थापन करण्यात ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा आर्थिक विकास करण्याचे ध्येय होते. त्याचप्रमाणे राजकीय नेतृत्व विकसित करणे हे ध्येय देखील होते. या साखर कारखान्याची स्थापना मराठा नेतृत्वाच्या पुढाकाराने झाल्याने या साखर कारखान्यात शेअरधारक देखील मराठा समाजाचे जास्त आहेत. परिणामी या साखर कारखान्याच्या परिसरात नगदी पिकांचे क्षेत्र वाढले. त्याचप्रमाणे शेती क्षेत्रातील सिंचन क्षेत्र देखील वाढले. दुसऱ्या बाजूने असे दिसून येते की, मराठा समाजाचे शेअर जास्त असल्याने या साखर कारखान्यावर मराठा समाजाचे नेतृत्वाचे वर्चस्व राहात आलेले आहे. साखर कारखाना स्थापनेत भास्करराव गलांडे यांनी जरी पुढाकार घेतला असला तरी साखर कारखान्याचे पहिले अध्यक्ष निवृती बनकर हे राहिले. मात्र भास्करराव गलांडे यांना विरोध पुढे आला. यातून १९७० च्या दरम्यान साखर कारखान्याची सत्ता ही गोविंदराव आदिक यांच्याकडे आली. ते १९७३ ते १९८३ या दहा वर्षाच्या काळात साखर कारखान्याचे अध्यक्ष राहिले. मात्र नंतर च्या काळात साखर कारखान्यातील अंतर्गत संघर्षामुळे १९८४ ते १९८७ या काळात प्रशासकाच्या नियत्रंणाखाली साखर कारखाना राहिला. गोविंदराव आदिक यांच्या नेतृत्व साखर कारखान्यावर असताना त्यांना प्रमुख विरोधक हे मराठा समाजातील भानुदास मुरकुटे हे राहिले. १९८७ साली त्यांनी या साखर कारखान्यावर वर्चस्व मिळवले. १९८७ ते २०१० या काळात मुरकुटे घराण्याचे वर्चस्व सातत्याने या साखर कारखान्यावर राहत आलेले आहे. मात्र याच काळात माळी समाजातील जयंत सासणे यांचे नेतृत्व पुढे आले. ते मुरकुटे घराण्याला विरोध करत राहिले. पण साखर कारखान्याची सत्ता हस्तगत करता आली नाही. परिणामी साखर कारखान्यावर जरी माळी समाजाच्या नेतृत्वाचा पॅनल असला तरी वर्चस्व निर्माण करण्यात अपयश आल्याने साखर कारखान्यावर सातत्याने

मराठा समाजाचे वर्चस्व राहिले आहे. या साखर कारखान्याने श्रीरामपूर तालुका पुर्णपणे ऊस बागायत झालेला आहे.

## मुळा सहकारी साखर कारखान लि. शेवगाव

मुळा सहकारी साखर कारखाना हा शंकरराव गडाख यांच्या पुढाकाराने १९७० साली उभारण्यात आला. या साखर कारखान्याचे पहिले अध्यक्ष हे यशवंतराव गडाख हेच राहिले. त्यांनी साखर कारखाना आणि या साखर कारखान्याच्या परिसरात शैक्षणिक संस्थाची उभारणी केली. परिणामी या परिसरात त्यांचे नेतृत्वास बळकटी मिळाली. एक प्रस्थापित नेतृत्व रूपाने नेतृत्व पुढे आले. परिणामी साखर कारखाना स्थापनेपासून म्हणजेच १९७० ते २०१० या काळात एकहाती गडाख घराण्याकडे सत्ता राहिलेली आहे. एका बाजूने गडाख घराणे आणि त्यांना विरोधक अनेक राहिले. विरोधक सातत्याने बदलत राहिले मात्र सत्तांतर करता आले नाही. विरोधकामध्ये माजी खासदार दादा पाटील शेळके, माजी खासदार तुकाराम गडाख, माजी आमदार संभाजीराव फाटके, जिल्हा परिषद अध्यक्ष विठ्ठल लंघे व बाळासाहेब मुरकुटे यांनी विरोध केला. मात्र हे सर्व विरोधक त्यांना एकत्र येत विरोध न करता एक एक असे विरोध करत राहिले. परिणामी प्रबळ असे विरोधक मिळाले नाहीत. यशवंतराव गडाख यांच्यानंतर त्यांच्या मुलगा शंकरराव गडाख यांचे या साखर कारखान्यावर वर्चस्व आहे.

हा साखर कारखान्याना प्रवरा धरण आणि गोदावरी नदीच्या कडेच्या पाणी परिसरात ऊस मिळतो. या साखर कारखान्याने नेवासा परिसरातील अनेक गावांतील पिक पध्द्ती बदलण्यास मदत झाली आहे. या परिसरात ऊस या नगदी पिकांचे उत्पादन घेण्यात येत असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक विकास होण्यास मदत झालेली आहे. दुसरे असे की, या साखर कारखाना परिसरात कॉलेज आणि शाळा उभारणीचे काम करण्यात आल्याने एक शिक्षण संकुल तयार करण्यात आले आहे. हे शिक्षण संकुल देखील गडाख घराण्याकडून चालवण्यात येत आहे. त्यामुळे या साखर कारखाना परिसरातील

एक प्रभावी आर्थिक आणि राजकीय विकासासाठी योगदान देणारे गडाख घराणे असल्याचे मानण्यात येते.

## ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना भेंडे , ता. नेवासा

नेवासा तालुक्यातील हा दुसरा साखर कारखाना आहे. या साखर कारखान्याची उभारणी १९७६ साली कॉंग्रेस नेतृत्व मारूतीराव घुले यांच्या पुढाकाराने करण्यात आली. साखर कारखान्याचे पहिले अध्यक्ष मारूतीराव घुले हेच होते. या साखर कारखाना परिसरात ऊसाच्या बाबतीत स्वयंपुर्णता मानण्यात येते. परिणामी साखर कारखाना परिसरात ऊस शेती पिकांची लागवड मोठ्या प्रमाणात झालेली आहे. साखर कारखाना उभारणीपासून या साखर कारखान्यावर घुले घराण्याची सत्ता राहिलेली आहे. मारूतीराव घुले यांच्या नंतर त्यांचा मुलगा नरेंद्र घुले यांचे नेतृत्व सहकारी साखर कारखान्यावर राहिलेले आहे. आता त्यांचा मुलगा चंद्रशेखर घुले यांच्या नेतृत्वाखाली साखर कारखाना आहे. परिणामी या साखर कारखान्यावर घुले घराण्याच्या तिसऱ्या पिढीचे नेतृत्व प्रस्थापित झालेले आहे. दुसरे असे की, या साखर कारखान्यावर प्रमुख विरोधक आणि सत्ताधारी हे मराठा समाजाचे नेतृत्वच राहिलेले आहे. या साखर कारखान्याचे पारंपारिक विरोधक हे आप्पासाहेब राजळे राहिलेले आहेत. त्यांच्या नंतर त्याचा मुलगा राजीव राजळे हे विरोधक राहिलेले आहेत. या साखर कारखान्याच्या माध्यमातून घुले घराण्याचे नेतृत्व हे स्थायी स्वरूपात पुढे आले. त्याचप्रमाणे निवडणुकीच्या राजकारणात त्यांना सातत्य राखता आले नाही. मात्र साखर कारखान्याच्या माध्यमातून सातत्य राखण्यात यश आलेले आहे. भेंडे या साखर कारखान्यामुळे नेवासा तालुक्यातील ग्रामीण भागातील विकास होण्यास मदत झाल्याचे दिसून येते.

## केदारेश्वर सहकारी साखर कारखाना, लि. बोधेगाव, ता. शेवगाव

अहमदनगर जिल्हा राजकारणात सहकार नेतृत्व यशस्वी होण्याची एक स्पर्धा चालू होती. या स्पर्धेत मागे राहणार नाही असे नेतृत्वाच्या कल्पनेतून काही साखर कारखाने उभारणी करण्यात आली. मात्र नंतरच्या काळात हे साखर कारखाने

चालवण्यात आले नाहीत. कारण हे साखर कारखाने उभारणी करताना साखर कारखान्याचे भौगोलिक स्थान आणि सभासद यांचा ताळमेळ घालता आलेला नाही. अशा पैकीच एक साखर कारखाना उभारण्याचा प्रयत्न हा जनता दलाचे नेतृत्व बबनराव ढाकणे यांनी केलेला दिसून येतो. बबनराव ढाकणे यांनी केदारेश्वर सहकारी साखर कारखाना लि. बोधेगाव, ता. शेवगाव येथे १९९८ साली उभारणी केली. या साखर कारखान्याची उभारणी बबनराव ढाकणे यांनी त्यांच्या नेतृत्व उतरत्या काळात केली. दुसरे असे की, साखर कारखान्याची उभारणी ही दुष्काळी परिसरात केली. राजकीय नेतृत्वाने प्रभाव वाढवण्यासाठी कमी ऊसाचे गळीत होत असताना देखील चालवण्याचा प्रयत्न केला. मात्र दुष्काळी परिसरामुळे या साखर कारखान्याला पाहिजे त्या प्रमाणात यशस्वी होता आले नाही. काही वर्ष तर साखर कारखाना बंद पडू नये यासाठी नगन्य असे गळीप करण्यात आले. साखर कारखान्याची उभारणी करण्यात आली मात्र पाहिजे त्या प्रमाणे हा साखर कारखाना शेअरधारक आणि गळीत या उभारणीत उतरले नाहीत. परिणामी साखर कारखान्याचे व्यवस्थापन बिघडले. हा साखर कारखाना काही वर्ष तर केवळ निवडणूक तोंडासमोर ठेवून चालवण्याचा प्रयत्न केला. या साखर कारखान्याला वैद्यनाथ पॅटर्न वापरण्यात आला. हा पॅटर्न देखील यशस्वी झाला नाही. २०१० च्या काळात साखर कारखान्यावर मोठ्या प्रमाणावर कर्ज असल्याचे पुढे आले. १९९८ ते २०१० या काळात या साखर कारखान्यावर बबनराव ढाकणे या वंजारी समाजातील नेतृत्वाचे वर्चस्व राहिलेले आहे. तर या नेतृत्वास पाथर्डी तालुक्यातील मराठा समाजाचे राजळे घराणे विरोधक राहिले आहे. मात्र राजीव राजळे घराण्याला या साखर कारखान्यावर वर्चस्व मिळवण्यासाठी अपयश आले होते. हा साखर कारखाना उभारणी करताना ज्या प्रमाणे ग्रामीण भागात नेतृत्व विकसित करणे हे ध्येय होते त्याचप्रमाणे दुष्काळी भागात देखील साखर कारखान्याच्या माध्यमातून विकास घडवून आणता येईल असा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र हे दोन्ही प्रयत्न अपयशी झाले.

## वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना लि. तिसगांव, ता. पाथर्डी

वृध्देश्वर सहकारी साखर कारखान्याची स्थापना पाथर्डी तालुक्यातील मराठा नेतृत्व दादा दाटील राजळे यांच्या पुढाकाराने १९७६ साली उभारणी करण्यात आली. अहमदनगर जिल्ह्यातील जुन्या साखर कारखान्यापैकी एक साखर कारखाना आहे. या परिसरात पाणी कमतरता असताना देखील साखर कारखान्याची उभारणी करण्यात आली होती. त्यामुळे हा साखर कारखाना चालवण्यासाठी नेतृत्व करणाऱ्याला तारेवरची कसरत करावी लागणार होती हे उघड होते. तरी हा साखर कारखाना यशस्वीरित्या नेतृत्वाने चालवलेला आहे. मात्र २०१० च्या वेळी साखर कारखाना कर्जाखाली गेलेला आहे. या साखर कारखान्यावर उभारणीपासून राजळे घराण्याचे वर्चस्व आहे. साखर कारखाना स्थापनेच्या वेळी दादा पाटील राजळे यांचे वर्चस्व होते. तर त्यांच्या नंतर त्यांचा मुलगा राजीव राजळे यांचे वर्चस्व राहत आलेले आहे. या साखर कारखान्यावर बबनराव ढाकणे आणि त्यांचे पुत्र प्रताप ढाकणे हे वंजारी समाजाचे पारंपारिकरित्या विरोध करत आलेले आहेत. मात्र एकदाही या साखर कारखान्यावर वर्चस्व निर्माण करता आले नाही. थोडक्यात या साखर कारखान्यावर वंजारी नेतृत्व विरोधी मराठा नेतृत्व असे पारंपारिक विरोधाचे स्वरूप राहिलेले आहे. मात्र वंजारी नेतृत्वाला यशस्वी होता आले नाही.

## नगर सहकारी साखर कारखाना लि. वाळकी

अहमदनगर तालुक्यातील नेतृत्व दादा पाटील शेळके यांच्या पुढाकारातून २००१ साली नगर सहकारी साखर कारखाना उभारण्यात आला. हा साखर कारखाना पुर्णपणे दुष्काळी परिसरात आहे. या साखर कारखाना स्थापन करताना ऊस उत्पादन फार कमी असताना देखील उभारण्यात पुढाकार घेण्यात आला होता. यामागे केवळ नेतृत्वाची संस्थात्मक बांधणी करण्याचे कारण होते. दादा पाटील शेकळे यांच्या केवळ राजकीय सत्तेच्या महत्त्वकांक्षेतून या साखर कारखान्याची उभारणी झाली असल्याचे नंतरच्या काळात पुढे आले. कारण त्यांचे नेतृत्व पुढे आले नाही. साखर कारखाना उभारणी करण्यात आली मात्र साखर कारखाना चालवण्यासाठी प्रबळ असे प्रभावी आणि

प्रयत्नशिल असे नेतृत्व असणे अपेक्षित होते ते मिळाले नाही. परिणामी साखर कारखाना कधीच व्यवस्थितरित्या चालवता आला नाही. कर्जामध्ये जात राहिला. त्यामुळे या साखर कारखान्यातून नेतृत्व पुढे आले नाही आणि कारखाना देखील व्यवस्थिरित्या चालला नाही. या साखर कारखान्यामुळे अहमदनगर तालुक्यात कारखाना असताना देखील शेती विकास पाहिजे त्या प्रमाणात झालेला नाही.

दादा पाटील शेळके यांनी जरी साखर कारखाना उभारणी करण्यास पुढाकार घेतला तरी त्यांना सुरूवातीपासून शिवसेनेचे तालुक्यातील नेतृत्व शशिकांत गाडे यांचा विरोध राहिलेला आहे. साखर कारखाना व्यवस्थितरित्या चालवणे आणि पुरेषा प्रमाणात ऊस उत्पादन नसल्याने या साखर कारखान्याच्या विकासात नेतृत्वाने पाहिजे त्या प्रमाणात पुढाकार घेतलेला दिसून येत नाही. त्यामुळे कारखान्याच्या नेतृत्वाच्या स्पर्धेत चुरस कधीच दिसून आली नाही. या साखर कारखान्यावर पुर्णपणे मराठा समाजाचे नेतृत्वाचे वर्चस्व राहिलेले आहे. स्पर्धा देखील मराठा समाजाच्या नेतृत्वात राहिलेली आहे.

## तनपुरे सहकारी साखर कारखाना लि. राहुरी

राहुरी तालुका हा पाणी आणि सिंचनासाठी परिपुर्ण असल्याचे मानण्यात येते. सिंचनाचा विकास स्वातंत्र्योतर काळात झालेला हा तालुका आहे. या तालुक्यातील बाबुराव तनपुरे यांच्या नेतृत्वाने १९५४ साली तनपुरे सहकारी साखर कारखाना लि. राहुरी या साखर कारखान्याची उभारणी करण्यात आली. या साखर कारखान्याची स्थापना करण्यात आली मात्र अतिशय ढिसाळ असे व्यवस्थापन राहत आलेले आहे. परिणामी अहमदनगर जिल्हा नेतृत्वामध्ये तनपुरे घराण्याचा वावर मोठा असताना देखील साखर कारखाना व्यवस्थित चालवता आला नाही. परिणामी अनेक वेळा साखर कारखान्यावर प्रशासक नेमण्यात आला. तनपुरे सहकारी साखर कारखाना हा डबघाईला येण्यास काही अंशी तनपुरे घराण्याकडून खाजगी साखर कारखाना काढणे हे देखील एक कारण मानण्यात येते. तनपुरे घराण्याकडून प्रसाद शुगर मिल लि. राहुरी हा साखर कारखाना स्थापन करण्यात आलेला आहे.

या साखर कारखान्याला ऊस उत्पादन जास्त प्रमाणावर असताना देखील साखर कारखाना कर्जबाजारी होत बंद करण्याची वेळ आली आहे. त्यास ढिसाळ असे नेतृत्व कारणीभूत आहे. साखर कारखान्यावरील ढिसाळ अशा नेतृत्वामुळे तनपुरे घराण्याने जरी साखर कारखाना स्थापन करण्यात पुढाकार घेतला असला तरी कायमस्वरूपी वर्चस्व निर्माण करण्यात अपयश आलेले आहे. तनपुरे घराण्याला या साखर कारखान्याच्या बाबतीत रामदास धुमाळ घराण्याचा विरोध राहिलेला आहे. मात्र रामदास धुमाळ आणि तनपुरे घराण्याची सत्ता अलटून पलटून सत्ता राहिलेली आहे. रामदास धुमाळ यांचे नेतृत्व पुढे येण्यापूर्वी या साखर कारखान्यावर तनपुरे घराण्याच्या नेतृत्वाला माजी आमदार पी. बी. कडू पाटील आणि आण्णसाहेब कदम यांचे विरोध राहिलेला आहे. अर्थात एका बाजूने तनपुरे घराणे आणि दुसऱ्या बाजूने कडू, पाटील आणि धुमाळ अशा स्वरूपात नेतृत्व राहिलेले आहे. या साखर कारखान्यावर साखर कारखाना स्थापनेपासून मराठा नेतृत्वाचे वर्चस्व राहिलेले आहे. त्याचप्रमाणे स्पर्धेत देखील मराठा समाजाचे राहिलेले आहे.

## पारनेर सहकारी साखर कारखाना लि. देवीभोयरे

पारनेर सहकारी साखर कारखाना हा दुष्काळी परिसरात असणारा साखर कारखाना आहे. या साखर कारखान्याची उभारणी १९८२ मध्ये बाळासाहेब विखे पाटील यांच्या पुढाकाराने करण्यात आलेली आहे. या साखर कारखान्याचे पहिले प्रशासकीय अध्यक्ष हे माजी आमदार बाळासाहेब भगत होते. इ. स १९८५ साली साखर कारखान्याची पहिली सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली. या साखर कारखान्यावर तालुक्यातील नेतृत्व बाळासाहेब ठुबे पाटील यांच्या वर्चस्वाखालील पॅनल विजयी झाला. बाळासाहेब ठुबे पाटील हेच या निवडणुकीनंतर चेअरमन झाले. मात्र साखर कारखान्यावर पाहिजे त्या प्रमाणात वर्चस्व टिकवता आले नाही. त्यास कारणीभूत गैरव्यवस्थापन आणि व्यवस्थापन होते. परिणामी हा साखर कारखाना कर्जाच्या बोझाखाली गेला. त्यामुळे बंद करावा लागला. नंतरच्या काळात गोपीनाथ मुंडे यांनी हा साखर कारखाना करार तत्वावर

चालवण्यास घेतला. त्यांनी या साखर कारखान्यावर वैद्यनाथ पॅटर्ननुसार चालवण्याचा प्रयत्न केला. या वैद्यनाथ पॅटर्नला काही प्रमाणात यश आले. मात्र या साखर कारखान्यात पुढील काळात राजकारण आल्याने त्यांनी नंतरच्या काळात हा साखर कारखाना चालवण्याचे सोडून दिले. परिणामी हा साखर कारखाना बंद पडला. २००८ साली हा साखर कारखाना माजी खासदार विदूरा नवले यांनी विकत घेतला आहे. मात्र विकत घेण्याअगोदर या साखर कारखान्यावर मराठा समाजाच्या नेतृत्वाचे वर्चस्व राहिले. तसेच स्पर्धेत देखील मराठा समाजाचे नेतृत्व राहिलेले आहे.

## जगदंबा सहकारी साखर कारखाना लि. राशीन

जगदंबा सहकारी साखर कारखाना लि. राशीन, ता. कर्जत या साखर कारखान्याची उभारणी १९७० साली आण्णासाहेब शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या साखर कारखाना हा दुष्काळी परिसरातील आहे. साखर कारखाना उभारणी करण्यासाठी या परिसरात ऊसाचे उत्पादन नसतानाही करण्यात आला आली आहे. केवळ राजकीय नेतृत्वाची बांधणी करण्यासाठी हा साखर कारखाना उभारण्यात आलेला आहे. या साखर कारखाना उभारणीत बापूसाहेब देशमुख, भालचंद्र पाटील, गुलाबनबी चाँद व आनंदराव फाळके यांची साथ आण्णासाहेब शिंदे यांना राहिलेली आहे.

हा साखर कारखाना उभारणी करण्यात आल्यापासून या साखर कारखान्याची सत्ता बापूसाहेब देशमुख यांच्याकडे राहिलेली आहे. साखर कारखान्याचे व्यवस्थापन आणि नियोजन संचालक मंडळाकडून व्यवस्थितरित्या ठेवण्यात आले नाही. परिणामी हा साखर कारखाना १९९० नंतर आर्थिक अरिष्ठामध्ये आला. परिणामी १९९७ साली तर साखर कारखाना बंद देखील करण्यात आला. या साखर कारखान्यावर मराठा समाजाच्या नेतृत्वाचे वर्चस्व सातत्याने राहिलेले आहे. तसेच स्पर्धेत देखील मराठा समाजाचे नेतृत्व राहिलेले आहे. राष्ट्रवादीच्या नेतृत्वाकडून खाजगी ''अंबालिका साखर कारखाना'' स्थापन करण्यात आल्याने हा साखर कारखाना बंद करण्याची वेळ आलेली दिसून येते. कारण या साखर कारखान्याच्या ऊस खाजगी साखर कारखान्याकडे शेतकऱ्यांनी वळवलेला

आहे. थोडक्यात नेतृत्व विकास आणि मतदारांची बांधणी करण्याच्या उद्देशाने या साखर कारखान्याची उभारणी करण्यात आली होती. मात्र ही खेळी नेतृत्वाला यशस्वी करता आली नाही. परिणामी या परिसरातील शेतकऱ्यांचा आर्थिक विकास पाहिजे त्या प्रमाणात झालेला दिसून येत नाही.

## ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना लि. नेवासा

श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना लि. श्रीगोंदा या साखर कारखान्याला सहकारी महर्षी शिवाजी नारायण नागवडे सहकारी साखर कारखाना लि. श्रीगोंदा या नावाने देखील ओळखण्यात येते. या साखर कारखान्याची उभारणी १९६५ मध्ये शिवाजीराव नागवडे, आबासाहेब निंबाळकर, खासेराव वाबळे, रंगराव पंधरकर यांच्या पुढाकारातून करण्यात आली आहे. या साखर कारखान्याच्या पहिल्या पंचवार्षिक निवडणुकीत शिवाजीराव नागवडे यांनी सत्ता हस्तगत केली. १९८४ ते १९९२ या काळात या साखर कारखान्यावर बबनराव पाचपुते या तालुक्यातील दुसऱ्या मराठा नेतृत्वाचे देखील पॅनेल सत्तेवर राहिले. मात्र १९९३ च्या निवडणुकीत पुन्हा शिवाजी नागवडे यांच्या नेतृत्वाखालील पॅनलने सत्ता हस्तगत करत २०१० पर्यंत सातत्याने सत्ता टिकवली आहे. या साखर कारखान्यावर सातत्याने नागवडे घराण्याचेच वर्चस्व राहिलेले आहे. कारण शिवाजीराव नागवडे यांच्या नंतर त्यांचे पुत्र राजेंद्र नागवडे यांनी या साखर कारखान्यावर वर्चस्व निर्माण केलेले आहे. या साखर कारखान्याने श्रीगोंदा तालुक्याच्या विकासात भर टाकलेली आहे. कारण श्रीगोंदा तालुका दुष्काळग्रस्त असताना देखील सिंचनक्षेत्र साखर कारखान्यामुळे वाढलेले आहे. दुसरे असे की, तालुक्यात नगदी पिके घेण्याचे प्रमाण देखील वाढलेले आहे. साखर कारखान्यावर सातत्याने मराठा समाजाच्या नेतृत्वाचे वर्चस्व राहिलेले आहे. तसेच स्पर्धेत देखील मराठा समाजाचे नेतृत्व राहिलेले आहे. तालुक्यात धनगर आणि माळी समाजाचे प्रमाण जास्त आहे. मात्र मराठा समाजाच्या तुलनेत कमी असल्याने या समाजातील नेतृत्वाला साखर कारखान्याच्या

राजकारणात प्रवेश करता आला नाही. मात्र संचालक मंडळात स्थान मिळवण्यात आलेली उदाहरणे सापडतात.

या साखर कारखान्याचा इतिहास तपासता असे दिसून येते की, हा खाजगी साखर कारखाना होता. हा साखर कारखाना डहाणूकर यांच्या मालकीचा होता. मात्र शिवाजी नागवडे यांच्या पुढाकाराने हा साखर कारखाना सहकारी करत यशस्वीरित्या चालवण्यात आला. या साखर कारखाना १९७२ मध्ये ढोकराई येथे हालवण्यात आला. पण यशस्वीरित्या चालवण्याने नेतृत्व तसेच तालुक्यातील विकासात्मक विचार करता फायदेशीर राहिलेला हा साखर कारखाना आहे. तालुक्यातील या सहकार साखर कारखान्याने नेतृत्व विकासात मोलाची भर टाकलेली असल्याने नागवडे घराण्याचे विरोधक बबनराव पाचपुते यांनी स्वतःचे नेतृत्वाला पाठिंबा मिळवण्यासाठी ''साईकृपा साखर कारखाना'' हा खाजगी साखर कारखाना काढला. मात्र प्रभावी अशा स्वरूपात प्रशासन आणि व्यवस्थापन न ठेवल्याने बबनराव पाचपुते यांना हा साखर कारखाना बंद करावा लागला. साखर कारखाना आता कर्जबाजारी झालेला आहे.

## कुकडी सहकारी साखर कारखाना लि. श्रीगोंदा

या साखर कारखान्याची उभारणी २००२ मध्ये तालुक्यातील कुंडलिकराव जगताप यांनी पुढाकार घेत करण्यात आली. राहुल जगताप या युवा नेतृत्वाचे या साखर कारखान्यावर वर्चस्व राहिलेले आहे. साखर कारखाना हा उत्तम व्यवस्थापन आणि नियोजन असण्याचे एक नमुना आहे. २००२ साली म्हणजे अलीकडच्या काळात या साखर कारखान्याची उभारणी करण्यात आली असली तरी उत्तमरित्या चालवण्यात येत आहे. दुसरे असे की, या साखर कारखान्याच्या उभारणीपासून जगताप घराण्यातील नेतृत्वाला नेतृत्व विकासासाठी लाभ झालेला आहे. या साखर कारखान्यावर मराठा समाजाच्या नेतृत्वाचे वर्चस्व राहिलेले आहे. तसेच स्पर्धेत देखील मराठा समाजाचे बबनराव पाचपुते राहिलेले आहेत. मात्र विरोधकांना या साखर कारखान्यावर सत्ता हस्तगत करण्यात यश आलेले नाही.

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि राजकीय नेतृत्व विकास

जिल्हा राजकारणात नेतृत्व विकास आणि जिल्हातील आर्थिक विकासासाठीचे साखर कारखान्यानंतर मध्यवर्ती सहकारी संस्था म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे पाहण्यात येते. १९६२ पासून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही सहकार राजकारणाच्या मध्यवर्ती राहिलेली आहे. अहमदनगर जिल्हा आर्थिक विकासात या बँकेचे फार मोठे योगदान आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक: अहमदनगर आणि नेतृत्व रोहमारे कारभारी, थोरात भाऊसाहेब, विखे विठ्ठलराव, घुले मारूती, यशवंतराव गडाख, विखे राधाकृष्ण, गडाख शंकरराव, कर्डिले शिवाजी, पांडुरंग अभंग यांचे नेतृत्व पुढे राज्य पातळीवरील राजकारणात पुढे आले. तर इतर नेतृत्व स्थानिक पातळीवर कार्यरत राहिले. माळी आणि धनगर समाजातील नेतृत्व हे १९९० नंतर पुढे आलेले दिसून येते. तोपर्यंत १९५८ ते १९६२ या काळातील जैन समाजातील मोतीलाल फिरोदिया यांचा सरकार नियुक्तीचा अपवाद वगळता २००९ पर्यंत चेअरमनपदी मराठा समाजाचे नेतृत्व राहिले. जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेवर पुर्णपणे मराठा समाजाचे वर्चस्व राहिलेले आहे. एक प्रकारे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही स्थानिक राजकारणात नेतृत्व निर्मितीचे केंद्र ज्या प्रकारे राहिलेली आहे त्याच प्रमाणे राज्य पातळीवरील नेतृत्वाला स्पर्धेत कमी करणारी संस्था देखील राहिलेली आहे. मुख्यत: जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर घुले घराणे, गडाख घराणे, थोरात घराणे, विखे घराणे या चार घराण्याची सत्ता दिर्घकाळ राहिलेली आहे. (पहा तक्ता क्र. ६.३)

## तक्ता क्र ६.३

## अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन आणि व्हाईस चेअरमन

## १९५८ ते २०१०

| अ.क्र | सन | मा. चेअरमन | मा. व्हाईस चेअरमन |
|---|---|---|---|
| १ | ५८ ते ६२ | मोतीलालजी कुंदलमलजी फिरोदिया (सरकार नियुक्त) | रोहमारे कारभारी भिमाजी |
| २ | १९६३—६४ | रोहमारे कारभारी भिमाजी | आव्हाड नामदेवराव (वंजारी) |
| ३ | १९६४—६५ | पाटील साहेबराव बबनराव | आव्हाड नामदेवराव (वंजारी) |
| ४ | १९६५—६६ | थोरात भाऊसाहेब संतुजी | देशमुख भाऊसाहेब नारायण |
| ५ | १९६६—६८ | थोरात भाऊसाहेब संतुजी | कांबळे खासेराव लक्ष्मणराव |
| ६ | १९६८—७० | विखे विठ्ठलराव एकनाथ | थोरात भाऊसाहेब संतुजी |
| ७ | १९७०—७१ | हारदे केशवराव भिकाजी | होंडे वसंतराव काकाजी |
| ८ | १९७१—७२ | विखे विठ्ठलराव एकनाथ | भगत दत्तात्रय कोंडाजी |
| ९ | १९७२—७३ | विखे विठ्ठलराव एकनाथ | सोले पाटील गोरक्षराव बाबुराव |
| १० | १९७३—७४ | थोरात भाऊसाहेब संतुजी | हराळ किसनराव राजाराम |
| ११ | १९७४—७७ | थोरात भाऊसाहेब संतुजी | पाटील भालचंद्र रामचंद्र |
| १२ | १९७७—७८ | घुले मारूतराव शंकरराव | निखळ श्रीकृष्ण विश्वनाथ |
| १३ | १९७८—७९ | घुले मारूतराव शंकरराव | हांडे भाऊसाहेब महादेव |
| १४ | १९७९—८० | रोहमारे दादा शहाजी | सोले पाटील गोरक्षराव बाबुराव |
| १५ | १९८०—८१ | हराळे किसनराव राजाराम | म्हस्के चंद्रकांत गणपतराव |
| १६ | १९८१—८४ | हांडे भाऊसाहेब महादेव | साबळे रावसाहेब कोंडाजी |
| १७ | १९८४—८५ | साबळे रावसाहेब कोहाजी | नवले नामदेवराव रखमाजी |
| १८ | १९८५—८६ | साबळे रावसाहेब कोहाजी | पाचपुते शिवाजीराव दिनकरराव |
| १९ | १९८६—८७ | घुले मारूतराव शंकरराव | म्हस्के चंद्रकांत गणपतराव |
| २० | १९८७—८८ | घुले मारूतराव शंकरराव | शेळके विठ्ठलराव श्रीपतराव |
| २१ | १९८८—९० | घुले मारूतराव शंकरराव | नागवडे शिवाजीराव नारायणराव |
| २२ | १९९०—९१ | घुले मारूतराव शंकरराव | सोले गोपाळराव बाबुराव |
| २३ | १९९१—९२ | शेळके मारूती देवराम | रूपवते प्रभाकर हरी (महार) |
| २४ | १९९२—९३ | निंबाळकर एकनाथ बुवासाहेब | हांडे भाऊसाहेब महादेव |
| २५ | १९९३—९६ | गडाख यशवंतराव पाटील | औताडे गणपतराव गंगाधर |
| २६ | १९९६—९७ | थोरात भाऊसाहेब संतुजी | सोले गोपाळराव बाबुराव |
| २७ | १९९७—९९ | थोरात भाऊसाहेब संतुजी | म्हस्के चंद्रकांत गणपतराव |
| २८ | १९९९—२००२ | गडाख यशवंतराव | पठारे ज्ञानदेवराव दौलतराव |

| | | | |
|---|---|---|---|
| २९ | २००२—२००३ | गडाख यशवंतराव | विखे राधाकृष्ण एकनाथराव |
| ३० | २००३—२००४ | गडाख यशवंतराव | कोल्हे बिपीनराव शंकरराव |
| ३१ | २००४—२००५ | गडाख यशवंतराव | रायकर सिताराम कोंडाजी |
| ३२ | २००५ | पठारे ज्ञानदेवराव | रायकर सिताराम कोंडाजी |
| ३३ | २००५—२००६ | विखे राधाकृष्ण एकनाथराव | रायकर सिताराम कोंडाजी |
| ३४ | २००६—२००७ | विखे राधाकृष्ण एकनाथराव | देशमुख बापूसाहेब |
| ३५ | २००७—२००८ | गडाख शंकरराव यशवंतराव | रायकर सिताराम कोंडाजी |
| ३६ | २००८—२००९ | कर्डिले शिवाजीराव भानुदास | राजळे राजीव अप्पासाहेब |
| ३७ | २००९—२०१० | पांडुरंग अंभग (माळी) | म्हस्के संपतराव बन्सीभाऊ |
| ३८ | २०१०—२०११ | पांडुरंग अंभग (माळी) | म्हस्के संपतराव बन्सीभाऊ |
| ३९ | १.१२.२०१५ ते ४.६.२०१५ | खेमनर बाजीराव खंडूजी (धनगर) | शेळके गुलाबराव |
| ४० | १२.५.२०१५ ते | गायकर सिमाराम कोंडाजी | वाघ रामदास काशिनाथ |

## दूधसंघ :

अहमदनगर जिल्ह्यात २०१०—२०११ या वर्षात २९५४ इतक्या दुधसंस्था आहेत. या दुधसंस्थामार्फत वर्षात २,१२,३५८ लाख लिटर दूध संकलन केले जाते. या वर्षात दररोज ५.८२ लाख लिटर दूध संकलित केले जाते. यामुळे दर दहा दिवसांनी दुधसंस्थाना व सभासदांना लाखो रूपये मिळतात. या दूध संस्थांशी संबंधित १,५०,६५४ सभासद संख्या आहे. अहमदनगर जिल्ह्यासाठी एक दूधसंघ आहे. सरकारी अनुदान या दुधसंघास मिळते. परंतु संगमनेर, राहता, प्रवरानगर, राहुरी, कोपरगांव, श्रीगोंदा येथे खाजगी दुधसंस्था आहेत. दुधप्रक्रिया करून दुधापासून उपपदार्थ तयार करून जिल्ह्यातील हे दुधसंघ आपले पदार्थ राज्यभर पाठवितात. बाळासाहेब विखे पाटील, बाळासाहेब थोरात, प्रसाद तनपुरे, बबनराव पाचपुते यांनी १५ दुधसंस्थांच्या माध्यमातून जिल्ह्यात आर्थिक जाळे तयार केले.

दूध उत्पादनात अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रात प्रथम क्रमाकांवर आहे. जिल्ह्यात १८ दूध शितकरण केंद्रे आहेत. या शितकरण केंद्रातील बहुतांशी दूध मुंबईत पाठविले जाते. दूध संकलन प्रक्रिया व वाहतुक या व्यवसायात सुमारे दररोज ५ हजार व्यक्तींना रोजगार उपलब्ध झाला आहे.

अहमदनगर जिल्ह्यात नगर–मनमाड रोडवर वसलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योगक्षेत्रात किर्लोस्कर, बोअरिंग, गरवारे, इंडीयन सिमलेस, क्रॉम्प्टन ग्रिव्हज, रॅलिज इंडिया, इंडिया फोर्जिंग, चाकण ऑईल मिल, सह्याद्री स्ट्रक्चरल्स्, बुट्स इंडीया इत्यादी नामवंत कंपन्या आपले उत्पादन करतात. अहमदनगर, श्रीरामपूर, सुपा–पारनेर, जामखेड, नेवासा व राहुरी येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या अंतर्गत उद्योग सुरू आहेत. यातून दररोज ९ हजार व्यक्तींना रोजगार मिळतो. जिल्ह्यात सहकारी सूतगिरण्या अस्तित्वात नाहीत. मत्सव्यवसाय संस्था ७६ आहेत. त्या सहकारी तत्वावर चालवल्या जातात व ग्रामीण भागातील लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला जातो. या दुधसंस्था, औद्योगिक संस्था ह्या जिल्ह्याच्या अर्थकारणास चालना देतात. जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न ४२२८२ लाख रूपये आहे. राज्याच्या एकूण स्थूल उत्पन्नापेक्षा जिल्ह्याचा स्थूल उत्पन्नाचा वाटा २.९७ आहे. (सामाजिक, आर्थिक पाहणी अहवाल, अहमदनगर २०११)

विठ्ठलराव विखे पाटील यांना त्या काळात एक उद्योजक आणि औद्योगिक विकास होणे गरजेचे वाटत होते. त्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशिल राहत होते. त्यांना औद्योगिक विकास हा शहरापेक्षा ग्रामीण भागात व्हावा असे वाटत होते. शेतीसाठी लागणारी मशीनरी ही शहरात तयार होण्याऐवजी ग्रामीण भागात तयार होणे अपेक्षित होते. औद्योगिक विकास करण्यासाठी ग्रामीण भागातील तरूणांना इजिनअरिंगचे शिक्षण मिळण्यासाठी आणि साखर कारखान्यासाठी लागणारी मशीनरी ही ग्रामीण भागातच तयार करावी असे त्यांना वाटत होते. त्यासाठी ग्रामीण भागात औद्योगिक यंत्रे निर्माण

करणाऱ्या कारखान्यासाठी संस्था स्थापन केली होती. पण पुढे ही कल्पना यशस्वी करता आली नाही. मात्र विदेशी तंत्रज्ञान आणि सहकार्याच्या आधारे विठ्ठलराव विखे पाटील यांनी राज्यातील सहकारी साखर कारखान्यांनंतर राज्यातील पहिला कागद कारखाना प्रवरानगर येथे काढला. आणि तो यशस्वी केला. एक प्रकारे हे कारखाने यशस्वीरित्या चालवल्यानंतर ग्रामीण भागात देखील यंत्रे निर्मिती आणि आर्थिक विकास होण्यासाठीचे कारखाने हे चालवू शकतो असा आत्मविश्वास आला होता. प्रवरानगर परिसरात त्यानंतर त्यांनी रस्ते, दवाखाने, शाळा, कॉलेज निर्माण करत चांगल्याप्रकारे आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**सारांशरूपाने** असे दिसून येते की, अहमदनगर जिल्ह्यात सहकारी साखर कारखाने, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, जिल्ह्यातील विविध सहकारी दूध संघ, जिल्हा मध्यवर्ती सहकारी कृषि उत्पन्न बाजार समिती आणि विविध तालुका पातळीवरील तालुका सहकारी कृषि उत्पन्न बाजार समिती या माध्यमातून सहकारी क्षेत्राचा खूप मोठ्या प्रमाणावर विकास झालेला आहे. या सहकार क्षेत्र विकासासाठी अहमदनगर जिल्ह्यातील नेतृत्वाचे मोठे योगदान आहे. सहकार क्षेत्राच्या माध्यमातून जनतेची संस्थात्मक बांधणी नेतृत्वाने केलेली आहे. त्याचप्रमाणे सहकाराचे साधन हे नेतृत्व विकासासाठी वापरलेले आहे. दुसरे असे की, सहकाराच्या माध्यमातून (सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून) प्रत्येक मतदारसंघातून राजकीय घराण्याचा उदय झालेला पाहण्यास मिळतो. सहकाराच्या माध्यमातून नेतृत्व केलेले अनेक नेतृत्व पुढच्या काळात राज्य पातळीवर नेतृत्व रूपाने पुढे आलेले आहे. तिसरे असे की, असंतुष्ट नेतृत्वाला सहकार क्षेत्रात स्थान देत शांत करत ठेवण्यास राजकीय नेतृत्वाला सोयीचे असल्याचे पुढे आहे. चौथे असे की, सहकार क्षेत्राने राजकीय अभिजनांना सहकारी साखर कारखाने, सहकारी बँक आणि कृषि उत्पन्न बाजार समिती अशा संस्थामध्ये स्थान देत राजकीय क्षेत्राची मोठी व्याप्ती वाढवलेली आहे. त्यामुळे सहकार क्षेत्राने राजकीय विकासासाठी देखील योगदान दिलेले दिसून येते.

# प्रकरण – ७

# अहमदनगर जिल्ह्यातील सामाजिक आणि आर्थिक चळवळी

अहमदनगर जिल्ह्यात सहकार चळवळ ही मोठी सामाजिक आणि आर्थिक आधारावर चालणारी चळवळ असल्याचे मानण्यात येते. मात्र अहमदनगर जिल्ह्याला डाव्या विचारांच्या चळवळीची खुप मोठी पार्श्वभूमी राहिलेली आहे. दुसरे असे की, डाव्या विचारांने चालणाऱ्या चळवळीला चांगल्या प्रकारे राजकीय नेतृत्व लाभले होते. ही एक परिणामी डाव्या विचारांच्या चळवळीने स्वातंत्र्योत्तर काळात चांगला जोर धरलेला होता. मात्र १९९० नंतर या डाव्या विचारांच्या चळवळीला काहीसे अपयश आल्याचे दिसून येते. हे अपयश चळवळीच्या अंतर्गत असलेल्या उणीवामधून आलेले आहे. या सर्वाचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

डाव्या विचाराच्या चळवळीचा आढावा घेत असताना कामगार आणि व्यवसाय यांच्या आधारे संघटन बांधणी ही डाव्या नेतृत्वाकडून करण्यात आलेली दिसून येते. त्यात विडी व्यवसाय, विद्युत क्षेत्रातील कामगार असे महत्त्वाच्या व्यवसायात ही चळवळीने चांगलाच जोर पकडलेला होता. त्या अनुषंगाने विडी उत्पादकाचा आढावा थोडक्यात पुढील प्रमाणे आहे.

भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळापासून विडी उद्योगाची सुरुवात झाली आहे. देशातील असंघटित कामगारांपैकी विडी कामगार हा एक घटक आहे. महाराष्ट्रातील भंडारा, गोंदिया, सोलापूर, मुंबई, जालना, सिन्नर, अहमदनगर, संगमनेर इत्यादी भागामध्ये विडी उद्योग चालतो. स्वातंत्र्यपुर्व काळापासून संगमनेर, अकोला, सिन्नर तालुक्यात विडी उद्योगाला सुरुवात झाली. विडी उद्योगातील कामगारामध्ये समाजवादी, कम्युनिस्ट, लाल निशाण पक्षाच्या कामगार संघटना काम करतात. कॉ. दत्ता देशमुख

यांनी लाल निशाण पक्षाच्या माध्यमातून संघटित आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांचे संघटन करुन त्यांच्या न्याय हक्कासाठी चळवळी चालवल्या. या चळवळीला नेतृत्व देखील चांगलेच लाभलेले दिसून येते. अहमदनगर जिल्ह्यातील उत्तरेकडील काहीसा दुष्काळी आणि डोंगराळ भागातील असंघटित क्षेत्रातील असलेल्या विडी कामगारांचे संघटन करुन कॉ. दत्ता देशमुख यांनी त्यांची चळवळ चालवली. त्यांनी असंघटित क्षेत्रातील कामगारांमधील असलेल्या कामाचा संबंध म्हणुन विडी कामगार संघटनेच्या माध्यमातून ही चळवळ जोमाने चालवली.

संगमनेर, अकोले, सिन्नर तालुक्यातील विडी कामगार नेतृत्वाने विडी कामगार चळवळीचे राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर नेतृत्व केलेले आहे. यामध्ये कॉ. रामभाऊ नागरे, भास्करराव दुर्वे, कॉ. दत्ता देशमुख हे नेतृत्व केंद्रस्थानी होते. विडी कामगार चळवळीच्या नेतृत्वाने संप, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, घेरावा, सत्याग्रह, जेलभरो, सभा, परिषदा, मेळावे इत्यादी साधनाचा लोकशाही मार्गाचा अंवलब करुन अनेक कामगार कायदे लागू करुन घेतले आहेत. विडी कामगारांच्या संघटित शक्तीमुळे आर्थिक मागण्याबरोबर कल्याणकारी कायदे आणि योजना आखण्यास राज्यसंस्थेला भाग पाडले आहे. विडी कामगार चळवळीच्या माध्यमातून मागण्या पुढे रेटून मान्य करुन घेतल्या. कायदे कल्याणकारी योजनाच्या अंमलबजावणीसाठी लढे अजून चालू आहेत. सुरुवातीला हा लढा आर्थिक मागणी भोवती फिरत होता. परंतु त्याचे स्वरुप शेवटी राजकीय बनले. या भागामधील अनेक राजकीय चळवळींमध्ये विडी कामगारांनी सक्रिय सहभाग घेतला. विडी कामगार वर्गाने ग्रामपंचायत ते विधानसभेच्या निवडणुकामध्ये भाग घेतलेला दिसून येतो. १९९० नंतर डाव्या पक्षाचे निवडणुका लढविण्याचे प्रमाण कमी होताना दिसून येते.

नव्वदच्या दशकात भारताने जागतिकीकरणाचा स्वीकार केला. त्याचा उद्योग – धंद्यावरील धोरणावर परिणाम झाला. तसेच राजकीय, सामाजिक, आर्थिक घटकांमध्ये

बदल घडून आले. हे बदल समजून घेण्यासाठी १९९० पूर्वी विडी व्यवसायाचे आणि विडी कामगार चळवळीचे मोठे योगदान होते. विडी कामगार चळवळीने अनेक सामाजिक प्रश्न निर्माण केले. ८०च्या दशकामध्ये या भागातील विडी व्यवसायात बदल होण्यास सुरुवात झाली. त्याचे कारण म्हणजे संगमनेर, अकोले व सिन्नर तालुक्यातील शेतीला धरणाचे पाणी कालव्याद्वारे उपलब्ध झाले. ग्रामीण भागातील विडी कामगार बागायती शेतीकडे वळला. परंतु नव्वदनंतर उद्योगधंद्यावर जो परिणाम झाला तो विडी उद्योगावर धोरणात्मक पातळीवर सुध्दा झाला. बागायती शेतीमुळे पर्यायी व्यवसाय उपलब्ध झाला. त्यामुळे घरखेपीचे प्रमाण वाढले. कच्चा माल कमी देणे, काम कमी देणे, विडी कारखाने बंद करणे, सहकारी सोसायट्याची स्थापना करणे, ठेकेदारी पध्द्त सुरु करणे यासारखे बदल विडी उद्योगात घडवून आले. यामुळे विडी कामगार चळवळ विस्कळीत होण्यास सुरुवात झाली. १९७०च्या दशकात भारतीय राजकारणात हस्तक्षेप करणाऱ्या सामाजिक चळवळी नव्वदच्या दशकात उतरणीला लागलेल्या दिसतात. विडी कामगार चळवळीला देखील हे लागू पडते. आर्थिक मागण्याबरोबर राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात हस्तक्षेप करणारी विडी कामगार चळवळ संकुचित आर्थिक मागण्या भोवती फिरताना आणि कुंठित होताना दिसून येते. यास मुख्यत: नेतृत्वामध्ये असलेले एकाकीपणा आणि गटबाजी कारणीभूत असताना दिसून येते. विडी कामगारांच्या मुळाशी जाऊन नेतृत्वाकडे पाहिले असता नेतृत्व पुढे येण्यास तत्कालीन काळातील स्थिती ही परिणामकारक होती.

## विडी उद्योगाचा उदय :—

अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर, अकोले तालुक्यातील उत्तरेकडील भाग हा अवर्षणग्रस्त पट्ट्यात येतो. त्यामुळे येथे नेहमीच दुष्काळाची परिस्थिती निर्माण होत होती. येथील शेती जिरायती असल्यामुळे मुख्यत: पावसाच्या पाण्यावर अंवलबून होती. पावसाचे प्रमाण कमी, नेहमीची दुष्काळी स्थिती या भौगोलिक परिस्थितीमुळे संगमनेर, अकोले आणि शेजारील सिन्नर तालुक्यातील शेतीला पुरक म्हणून विडी उद्योगाची

सुरुवात १९१०–११ मध्ये झाली. शेतीला पर्यायी आणि उपजीविकेचे साधन म्हणून लोक या व्यवसायाकडे आकर्षित झाले. हरीभाऊ वर्पे यांच्या मतानुसार ‘‘विडी उद्योगाची सुरुवात संगमनेर तालुक्यातील चिकणी या गावी छोट्या विडी कारखान्याने झाली. परंतु हा कारखाना लवकर बंद झाला. या काळात सिन्नरला बाळाजी गणपत वाझे यांनी विडी कारखाना सुरु केला होता. शेतीमध्ये दुष्काळी परिस्थिती होती. त्यामुळे चिकणीमधून विडी बांधण्यासाठी कामगार सिन्नरला गेले. त्यावेळी राहता येथील कुंभार म्हणून विडी कारखानदार होते. त्यांनी चिकणीमध्ये कामगार आहेत म्हणून चिकणीला विडी कारखाना सुरु केला. संगमनेर, अकोले तालुक्यातील चिकणी शेजारील गावातील विडी कामगार येऊ लागले. १९२२ मध्ये बस्तीराम नारायणदास सारडा यांनी चिकणीला विडी कारखाना काढला. परंतु सारडाच्या मालकांनी पानाची कपात केली. म्हणुन सारडाचा कारखाना बंद पडला. याच काळात भिकुसा यमासा क्षेत्रिय यांनी चिकणीला कारखाना चालू केला होता. १९४७–४८ मध्ये चिकणीला ४०० विडी कामगार होते. (मुलाखतः वर्पे हरिभाऊ, दि. २०.०३.२०१३) संगमनेर तालुक्यातील चिकणी हे गाव विडी कामगाराचे केंद्र बनले होते. चिकणी येथे कामासाठी शेजारील गावातील कामगार राहात होते. अल्प भांडवल, जास्त नफा आणि दुष्काळी परिस्थितीमुळे अल्पमंजुरीत मोठ्या प्रमाणात मिळणारा कामगार याकडे विडी मालकांचे लक्ष गेले. त्यामुळे विडी कामगारांची संख्या वाढत गेली. ग्रामीण भागात शेतीला पर्यायी आणि उपजीविकेचे प्रमुख साधन म्हणून विडी व्यवसाय हळूहळू विस्तारत गेला. संगमनेर, अकोले तालुक्यातील तळेगाव ते समशेरपूरपर्यंत विडी व्यवसायाचा पाया ग्रामीण भागात विस्तारत गेला. परंतु ८०च्या दशकामध्ये या भागात शेतीला पाटपाणी उपलब्ध झाल्यामुळे विडी व्यवसायात बदल होण्यास सुरुवात झाली.

## विडी कामगार चळवळीचा आढावा:—

संगमनेर, अकोले तालुक्यातील ग्रामीण भागात विडी व्यवसायाचा विकास होत गेला. कामगारांची संख्या वाढत गेली. शेतीपासून मिळणारे उत्पादन सोडून दुसरा

कोणताही व्यवसाय नव्हता. त्यामुळे शेतकरी विडी व्यवसाय करत होता. ''प्राथमिक अवस्थेत अतिशय कमी मजुरी, वेळेचे बंधन नाही, कामाचे नियम नाहीत, कायद्याची शाश्वती नाही, संघटितपणा नाही, तसेच मालकांची लहरीपणाची प्रवृत्ती यामुळे केवळ पोट भरण्याचे साधन म्हणून मिळेल. त्या मजुरीत काम करण्यावर मजुरात हा धंदा आपल्याकडे सुरु झाला. परंतु त्याचे स्वरुप अतिशय विस्कळीत आणि अल्प असे होते.'' (मुलाखत: सोनवणे. टी. जी., दि. २०.०४.२०१४) १९४० मध्ये संगमनेर, अकोले तालुक्यातील विडी कामगारांची संख्या तीन हजारांपर्यत गेली होती. कमी भांडवलामध्ये जास्त नफा आणि कमी मजुरीत मोठ्या प्रमाणावर मिळणारा कामगार या परिस्थितीमुळे विडी कामगार व्यवसायाचा विस्तार झाला होता. यामुळे विडी व्यवसायाच्या प्रश्नांचे स्वरुप बदलले होते. विडी व्यवसायामध्ये एकत्र बसून काम करण्याच्या पध्द्तीमुळे सततपणे वेगवेगळ्या विषयांवर चर्चा चालत असे. विडी कामगारामध्ये एकोप्याची भावना होती. विडी कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी विडी कामगारांची संघटना असे विडी कामगारांना वाटू लागले.

संगमनेर, अकोले तालुक्यातील राष्ट्रीय चळवळ सुरु होती. त्याचप्रमाणे स्थानिक जनतेच्या जिव्हाळ्याचे प्रश्न शोधून त्याद्वारे राष्ट्रीय चळवळी उभी करणे हा हेतु होता. १९३२चा जंगल सत्याग्रह सावकारशाही विरोधी 'कर्ज रोखे' फाडण्याची चळवळ, १९३९–४० मध्ये वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ जेधे बाई, बुवासाहेब नवले, नानासाहेब पिंगळे यांच्या नेतृत्वाखाली झाली. या चळवळीमध्ये विडी कामगार सहभागी झाले होते. राजकीयदृष्ट्या जागृत झालेला विडी कामगार वर्गाला त्यांनी संघटित केले. ''संगमनेर अकोले तालुक्यात चळवळीचा पाया घातला गेला. काँग्रेसच्या तिरंगी झेंड्याखाली विडी कामगारांची पहिली युनियन श्री. नानासाहेब पिंगळे यांच्या अध्यक्षतेखाली सुरु झाली. या युनियनचे सेक्रेटरी श्री. रामभाऊ नागरे हे होते. १९४५ साली या कामगारांच्या संपात सर्व कामगार सामील झाले होते. मात्र या संपात श्रमिक संघवादी विचाराच्या कार्यकर्त्यांनी विडी पाने जाळणे, तंबाखूची पोती फेकून देणे इ.

घातपाती कृत्ये सुरु केल्याने राष्ट्रीय विचाराचे मानले गेलेले व दहशतवाद पसंद नसणारे समाजवादी कामगार त्यातून बाहेर पडले व १९४५ सालीच त्यांनी समाजवधाच्या नेतृत्वाखाली नवी विडी कामगार संघटना सुरु केली. (मुलाखत: वकील अलीम, दि. १२.१०.२०१२)

१९४५ मध्ये समाजवादी पक्षाचे भास्करराव दुर्वे यांनी विडी मजदूर सभेची स्थापना केली. तर कम्युनिस्ट पक्षाने विडी कामगारांना संघटित करुन १९४५ मध्ये मजुरी वाढवावी म्हणून संप केला. परंतु संप दीड महिना चालून शेवटी फुटला. १९४८ मध्ये कामगारांसाठी किमान वेतन कायदा अस्तित्वात आला. हा कायदा विडी कामगारांना लागू झाला. १९५३ मध्ये कम्युनिस्ट पक्षांचे कॉ. रामभाऊ नागरे, कॉ. परब यांनी संगमनेर अकोला तालुका विडी कामगार युनियन (लाल बावटा) या संघटनेची स्थापना केली. त्यापूर्वी विडी कामगारांमधील काम कम्युनिस्ट पक्षाचे चालू होते. ''मजुरीत आणि फॅक्टरी अॅक्ट सारख्या कायद्याची अंमलबजावणी टाळण्यासाठी खेडेगावी कारखाने उघडले होते. या काळात दुष्काळ पडला होता. तर दुसरीकडे सरकारने दडपशाही करुन सक्तीची लेव्हीला कम्युनिस्ट आणि शेतकरी कामगार पक्षांनी विरोध केला होता. शेतकरी हा विडी कामगार असल्यामुळे आणि विडी कामगाराचे नेतृत्वानी सक्तीच्या लेव्ही विरोधी भूमिका घेतली होती. त्यामुळे विडी कामगारांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

## सक्तीच्या लेव्ही विरोधी आंदोलन:—

दुष्काळी परिस्थिती आणि लेव्हीच्या सक्तीमुळे लोकांना अन्नधान्याच्या तुटवड्यामुळे अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट आणि शेतकरी कामगार पक्षाने सरकारी गोदामातील धान्य ताब्यात घेऊन गरिबांना वाटत होते. शेवगाव तालुक्यातील एरंडगाव या ठिकाणी धान्यवाटप चालू असताना पोलिसांनी गोळीबार केला. त्यामध्ये नऊजण ठार झाले. संगमनेर अकोले तालुक्यातही धान्याचा तुटवडा जाणवत होता. अकोले येथील सरकारी कार्यालयावर आण्णासाहेब शिंदे, दत्ता देशमुख, बुवा नवले वगैरेनी चारपाच

हजार लोकांचा मोर्चा नेला. आण्णासाहेब शिंदे आणि सावरगावपाटचे सात–आठ शेतकरी यांना अटक करुन येरवडा येथे स्थानबध्द करण्यात आले. दत्ता देशमुख ही मोर्चानंतर पकडले गेले. (फडके य. दी, २००८, पृ. २०८) एरंडगाव नंतर संगमनेर तालुक्यातील राजापूर येथे सक्तीच्या लेव्ही विरोधी आंदोलनावर ९ मार्च १९५० रोजी गोळीबार झाला. त्या विषयी कॉ. साहाणे मास्तर यांनी आठवण सांगितली की, ''राजापूर हे गाव कम्युनिस्टांचे येथे शेतकरी परिषद बोलावली होती. या परिषदेचा ठराव लिहिण्यास मला बोलविले होते. त्याप्रमाणे रात्रभर ठराव लिहिला. ९ मार्च १९५० रोजी पोलिसांनी ठराव लिहित असलेल्या खोलीला गराडा घातला. या वेळी पोलिसांनी गोळीबार केला. त्यामध्ये तीन लोक ठार झाले. माझी शिक्षकांची नोकरी गेली. सरकारच्या गोळीबारचा निषेध कॉ. दत्ता देशमुख यांनी केला''. सक्तीच्या लेव्ही विरोधी आंदोलनामध्ये विडी कामगारांनी सहभाग घेतला होता. कारण विडी कामगारांचे नेतृत्व करणारे नेते शेतकरी वर्गाच नेतृत्व करत होते. ही सकारात्मक बाजू होती. परिणामी शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी चांगली जाण या नेतृत्वाला होती.

सक्तीच्या लेव्ही विरोधी आंदोलनानंतर दडपशाही केली होती. गावागावांवर सामुदायिक दंड बसविण्यात आले होते. यामध्ये शेकापचे व कम्युनिस्टांचे अनेक कार्यकर्ते होते आणि काही भूमिगत होते. राजापूर गोळीबार नंतर सहा महिन्यांनी शेतकरी व विडीकामगार यांची अकोले तालुक्यातील गणोरे येथे ४ नोंव्हेबर १९५० रोजी कॉ. दत्ता देशमुख यांच्या नेतृत्वाखाली परिषद झाली. या परिषदेला क्रांतीसिंह नाना पाटील, कॉ. रामभाऊ नागरे उपस्थित होते. या परिषदेमध्ये विडी कामगारांच्या मागण्याचा ठराव मांडला गेला. या ठरावातील मुद्दे पुढीलप्रमाणे होते.

१. अकोले व संगमनेर तालुक्यातील विडी कामगारांना कोणताही भेदभाव न करता दर हजारी अडीच रुपये या प्रमाणे मजुरी द्यावी.

२. प्रत्येक कामगाराला त्यांच्या जरुरी प्रमाणे भरपुर पुडे द्यावेत.

३. प्रत्येक कामगाराला कामाची शाश्वती मिळावी.

४. राजापुर, सावरगांव ठिकाणाचे बंद केलेले विडीचे कारखाने ताबडतोब सुरु करण्यात यावे.

५. राजकीय कार्यकर्त्यांना बऱ्याच कारखान्यांतून बडतर्फ करण्यात आले आहे. त्यांना पुन्हा कामावर घेण्यात यावे.

६. प्रत्येक कामगाराला वार्षिक दोन महिन्यात बोनस देण्यात यावा.

७. अस्पृश्यांना विड्या बांधण्याचे काम मिळण्याबाबत बंधन नसावे.

८. फॅक्टरी ॲक्ट प्रमाणे मिळणारी कामगारांची हक्कांची भर पगारी रजा सुरु करण्यात यावी. (जनसत्ता, ११ नोव्हेंबर १९५०)

सक्तीच्या लेव्ही विरोधी आंदोलनामध्ये शेतकरी कामगार पक्ष आणि कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाने शेतकरी कामगार वर्गाला संघटित करुन सरकारला विरोध केला. गणोरे परिषदेमध्ये विडी कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी विडी कामगार संघटनाना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला गेला. तसेच शेतकरी व विडी कामगारांसाठी हे दोन्ही पक्ष एकत्र काम करताना दिसून येते. १९४६ मध्ये मुंबई विधानसभेत दत्ता देशमुख निवडून गेले होते. परंतु त्यांनी सरकार विरोधी दुष्काळी शेतकऱ्यांचा मोर्चा केल्यामुळे त्यांना स्थानबध्द करुन नंतर त्याचे विधानसभेचे सभासदत्व रद्द करण्यात आले होते. सभासदत्व रद्द झाल्यामुळे १९५१ मध्ये त्या जागेसाठी पोटनिवडणूक झाली. या पोटनिवडणुकीमध्ये कॉ. दत्ता देशमुख यांनी शेतकरी कामगार पक्षाकडून निवडणूक लढविली. या निवडणुकीत विडी कामगारांनी प्रचार व निवडणूक निधी जमा केला होता. (शेवाळे विठ्ठल, १९९३) डाव्या विचारांच्या आणि कामगारांच्या संघटन या आधारावर दत्ता देशमुख यांचे नेतृत्व यशस्वीरित्या पुढे आले होते. ही स्वातंत्र्योपुर्व काळातील मोठी जमेची बाजू होती.

## डाव्या चळवळीचे नेतृत्व आणि निवडणुकीचे राजकारण

विडी कामगारांच्या प्रश्नावर सर्व विडी कामगार संघटनानी एकत्र काम करण्याची सुरुवात गणोरे परिषदमध्ये झाली. ''१९५२ साली कॉ. दत्ता देशमुख, कॉ. भास्करराव दुर्वे, कॉ. रामभाऊ नागरे या नेतृत्वाने पहिली महाराष्ट्र व्यापी विडी कामगारांची परिषद

संगमनेरला घेतली. या परिषदेमध्ये कामगारांच्या हिताच्या अनेक मागण्या मांडल्या गेल्या व संपुर्ण कामगार संघटित झाला पाहिजे अशी एकोप्याची भावना मांडली'' (सोनवणे टी. जी, दर्शन पृ. ३५) विडी कामगारांची संख्या मोठी असल्यामुळे डाव्या पक्षांच्या संघटना त्यामध्ये काम करत होत्या. १९५२ मध्ये कम्युनिस्ट, समाजवादी आणि शेकाप मधून बाहेर पडून कॉ. दत्ता देशमुख यांनी ''कामगार किसान पक्ष'' स्थापन केला. हे तिन्ही पक्ष विडी कामगारांसाठी काम करत होते. त्यामुळे १९५२ च्या निवडणुकीविषयी कॉ. साहाणे मास्टर यांच्या मतानुसार विधानसभा निवडणूक आली. कॉ दत्ता देशमुख यांना उभे करावे असा ठराव कम्युनिस्ट पक्षाने घेतला. दत्ता देशमुख उभे राहिले. त्याच्या प्रचाराची तयारी सर्व डाव्या विचारांच्या बांधीलकी असलेल्यांनी केली. गावोगाव प्रचार केला व दत्ता देशमुख यांना श्री. खताळ पाटील यांच्या विरोधात प्रचंड मताने निवडून आणले. (मुलाखतः सहाणे मास्तर, ०५.०३.२०१४) कम्युनिस्ट पक्षाने कॉ. दत्ता देशमुखांना विडी कामगारामध्ये एकत्र काम करत असल्यामुळे पाठिंबा दिला असावा. कारण १९५७ मध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीने संगमनेर मधून कॉ. दत्ता देशमुखांना उमेदवारी दिली होती. त्यांच्या विरोधात समितीमधील कम्युनिस्ट पक्षांचे रामभाऊ नागरे यांनी बंड करुन निवडणूक लढविली, तर १९६२ मध्ये भास्करराव दुर्वे यांनी निवडणूक लढविली होती. या निवडणुकीत कॉ. दत्ता देशमुख यांचा पराभव झाला. १९६५ मध्ये लाल निशाण पक्षांने निवडणुका न लढविण्याचे धोरण स्वीकारले. परंतु विडी कामगारांमध्ये संघटनात्मक काम असलेल्या समाजवादी आणि कम्युनिस्ट पक्षांनी स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभेच्या निवडणुका लढविल्या. परंतु १९९० नंतर त्यांचे प्रमाण कमी झालेले दिसून येते. कारण पुर्वी प्रत्येक गावामध्ये विडी कामगार कार्यकर्त्यांचा संच होता. परंतु १९८० दशकात शेतीला पाणी आल्यामुळे विडी कामगार कमी झाला. लाल निशाण पक्षाने निवडणूक लढविणे बंद केल्यामुळे त्यांचे कार्यकर्ते इतर पक्षात गेले. तर बागायती शेतीमुळे शेतकरी तालुक्यातील सहकाराच्या राजकारणांशी जोडला गेला. विडी कामगारांमध्ये स्त्रियांचे प्रमाण जास्त राहिले. प्रत्येक

कुटूंबात वेगवेगळ्या पक्षाचे कार्यकर्ते निर्माण झाले. त्यामुळे विडी कामगार कार्यकर्त्यांना नव्वदनंतर निवडणुका लढवून सुध्दा अपयश आलेले दिसून येते.

संगमनेर अकोले तालुक्यात १९४० च्या दशकात कम्युनिस्ट व समाजवादी पक्षांनी विडी कामगारांचे संघटन केले. या दोन्ही संघटनाची एकजुट करण्याचे प्रयत्न कॉ. दत्ता देशमुख यांनी केले. १९५७ च्या निवडणुकीमध्ये दत्ता देशमुखांच्या विरुध्द कॉ. रामभाऊ नागरे यांनी निवडणूक लढविली. या निवडणुकीनंतर त्यांच्यामध्ये मतभेद वाढत गेले. १९५७ च्या विधानसभा निवडणुकीत कॉ. दत्ता देशमुखांच्या विरुध्द कॉ. रामभाऊ नागरे उभे राहिले. आम्ही कम्युनिस्ट पक्षाचे म्हणुन कॉ. रामभाऊ नागरे यांचा प्रचार केला. त्यातच संघर्ष वाढला. नागरे हे दत्ता देशमुख यांच्यापासून दूर गेले. कॉ. रामभाऊ नागरे आणि कॉ. दत्ता देशमुख संघर्ष अटळ राहिला. हा संघर्ष विडी कामगार संघटनेतही वाढीला लागला.'' विडी कामगारामध्ये कॉ. दत्ता देशमुख यांचे प्रत्यक्ष काम नसले तरी लाल बावटा युनियनमध्ये त्यांना मानणारा कामगारवर्ग होता. या निवडणुकीमुळे कामगारामध्ये मतभेद वाढत गेले.

१९६१ मध्ये राज्यव्यापी विडी कामगारांची परिषद सिन्नर येथे झाली. या परिषदेमध्ये ''महाराष्ट्र राज्य विडी कामगार फेंडरेशन''ची स्थापना करण्यात आली. या फेंडरेशनचे अध्यक्ष कॉ. रामभाऊ नागरे होते. या भागात विडी कारखानदारी वाढल्यामुळे कामगाराच्या संख्यात वाढ होऊन कामगार संघटित झाला होता. विडी कामगार चळवळीच्या नेतृत्वाने शिक्षणाचे महत्त्व ओळखुन या संघटित कामगाराला शिक्षणाच्या कार्यात सहभागी करुन घेतले. विडी कामगार व कारखानदार यांनी संगमनेर महाविद्यालयाला भरीव मदत केलेली दिसून येते. त्याचबरोबर इतर शिक्षण संस्थाना देखील मदत केलेली आहे.

## शिक्षण क्षेत्राला डाव्या चळवळीच्या नेतृत्वाने दिलेले योगदान

शिक्षणाचे महत्त्व सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्यानी ओळखले होते. विडी कामगार चळवळीतील नेतृत्त्व मुळात राजकीय असल्यामुळे त्यांनी संगमनेर,

अकोले तालुक्यातील शिक्षणक्षेत्रात आपले योगदान दिलेले आहे. यामध्ये भास्करराव दुर्वे, कॉ. दत्ता देशमुख, कॉ. रामभाऊ नागरे, आमृतभाई मेहता यांनी विद्यालय व महाविद्यालय उभारणीसाठी विडी कामगारांना सहभागी करुन घेतले. १९६१ मध्ये संगमनेर शहरामध्ये संगमनेर महाविद्यालयाची स्थापना व्यापारी वर्गानी केली. त्यामध्ये मालकांचा सहभाग होता. विडी कामगारांनी दोन दिवसाची काम करुन त्यांची मजुरी महाविद्यालयाच्या उभारणीसाठी आर्थिक मदत केली. अकोले तालुक्यातील देवठण येथील आढळा विद्यालयासाठी विडी कामगारांनी आर्थिक मदत केली. ग्रामीण भागामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा, उच्च शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध व्हावे म्हणून शैक्षणिक क्षेत्रात विडी कामगार नेतृत्त्वाने लक्ष पुरविलेले दिसून येते. शिक्षणाची सोयीमुळे विडी कामगारांच्या मुलांनी उच्च शिक्षण घेतले. त्यामुळे विडी कामगारांची मुले विडी व्यवसायात आली नाही. शिक्षणामुळे त्यांना रोजगाराच्या नवीन संधी मिळाली असे दिसून येते. या भागात स्त्रियांचे प्रमाण विडी व्यवसायात जास्त दिसत असले तरी नव्याने शिक्षण घेतलेल्या मुली विडी व्यवसायात दिसून येत नाही.

## विडी कामगार समिती निर्मितीची पार्श्वभूमीः—

१९६३ मध्ये किमान वेतन समिती नेमावी म्हणून विडी कामगारांनी राज्यव्यापी संप केला. या संपानंतर शासनाने किमान वेतन समिती नेमली. या समितीविषयी हरिभाऊ वर्पे यांच्या मतानुसार ''शासनाने नेमलेल्या वेतनवाढ समितीवर दत्ता देशमुख यांना विडी कामगार विभागातील प्रतिनिधी म्हणून घेतले. परंतु त्यांना प्रतिनिधी म्हणून घ्यावे की, नाही यापेक्षा ते आमचे प्रतिनिधी नाही. त्यांच्या ऐवजी रामभाऊ नागरे यांना सदस्य म्हणून वाढविले. तो विषय समितीमध्ये मिटला परंतु अंतर्गत मतभेद तसेच राहिले. त्यामुळे दत्ता देशमुखांना आपली स्वतःची संघटना असावी असे वाटत होते.'' (मुलाखतः वर्पे हरिभाऊ, दि. २४.०३.२०१३)

या समितीने किमान वेतन आणि बोनसचा हक्क मान्य केला. १ एप्रिल १९६४ शासनाने नोटीफिकेशन काढून १ एप्रिल १९६३ पासून लागू केला. एक हजार विडीला

२.५० पैसे वेतन लागले. ‘‘१९६५ मध्ये केंद्र सरकारने बोनसचा कायदा केला. या कायद्यातंर्गत ४ टक्के बोनस किंवा ४० रुपये असावा अशी तरतुद केली. फॅक्टरी ॲक्टनुसार २० कामगार असतील त्या कामगारांना बोनस देऊ. घरखेप कामगारांना बोनस देणार नाही अशी भूमिका घेतली. परंतु कामगार कायद्याप्रमाणे बोनस मिळावा म्हणून चळवळ सुरु केली. त्यानंतर विडी कारखानदारांनी कायद्याप्रमाणे बोनस देण्यास सुरुवात केली. (न्यायपेल्ली शंकर, १९८८ पृ. २७) ६ मे १९६६ रोजी विडी कामगार फेंडरेशनचे दुसरे अधिवेशन सिन्नर येथे झाले. या अधिवेशनाचे अध्यक्ष कॉ. रामभाऊ नागरे होते. तर उद्घाटक एस्. एम्. जोशी आणि प्रमुख पाहुणे कॉ. दत्ता देशमुख होते. या अधिवेशनामध्ये विडी सिगार कायदा, किमान वेतनात वाढ व महागाईशी निर्देशकांशी निगडीत किमान वेतन, ग्रॅच्युइटी, पानपुडा, किमान वेतनाची अंमलबजावणी, ४ टक्के बोनस, देशपातळीवर एकच किमान वेतनाची मागणी, भाववाढीला आळा घालण्याबाबतच्या मागण्याचा ठराव केला होता. देशभरातील विडी कामगाराकडून विडी सिगार कायद्याची मागणी होत होती. १९६६ मध्ये विडी सिगार कामगार कायदा केला. या संम्मेलनामध्ये कम्युनिस्ट, लाल निशाण आणि समाजवादी पक्ष सहभागी झाला होता.

विडी कामगारांचे काम पाचशे किंवा एक हजार विड्याचे माप असेल तरी प्रत्येक कामगारांकडून सात विड्या मालकांकडून घेतल्या जात होत्या. परंतु १९६८ नंतर मालकांनी पंचवीस विड्याचा बंडल घेण्यास सुरूवात केली. त्या विरोधात कॉ. रामभाऊ नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली विडी बंडल मागे घेण्याचा लढा दिला. कामगारांनी १३ दिवस संप केल्यानंतर मालकांनी विडी बंडल मागे घेतला. हा संप यशस्वी झाला होता. परंतु लाल बावटा युनियनमध्ये शिथिलता आली होती. युनियनचे अध्यक्ष कॉ. रामभाऊ नागरे थकले होते. कामगारांना पानाची वाढीव वाटप मिळाली पाहिजे. या प्रश्नांवर काम सुरू होते. त्यावेळी कॉ. दत्ता देशमुखांनी कामगार कोणत्याही पक्षात असो परंतु कामगारांचे प्रश्न सुटले पाहिजे. कामगारांचे किमान वेतन, बोनसचा प्रश्न, भविष्य निर्वाह

निधी आणि पेन्शन हे चार प्रश्न घेऊन १३ जून १९७४ मध्ये संगमनेर, अकोला, सिन्नर विडी कामगार समितीची स्थापना केली. (मुलाखत: वर्पे सुखदेव, दि. २४.०३.२०१४)

हरिभाऊ वर्पे यांच्या मते, ''विडी मजदूर सभा आणि लाल बावटा युनियन होत्या. परंतु लाल बावटा युनियनमधून बाहेर पडून मी इंटक युनियन काढली होती. विडी कामगार विभागला होता. कामगारामध्ये मतभेद सुरू होते. कामगारांचा संप सात गावामध्ये चालू होता. सारडा कंपनीच्या मालकांनी ७५ विड्याचे काम दिले होते. कॉ. दत्ता देशमुख यांनी ७५ विड्यांचे माप द्या असे सांगितले. आम्ही आठ दिवस मापे दिली. त्या विरोधात काही मुंबई पर्यत संघटित लढा दिला. दत्ता देशमुखांनी नगर, नाशिक, सोलापूरच्या कामगारांना एकत्र आणले. किमान वेतन मिळविले. इंटक युनियनचे काम चालले नाही. तेव्हा दत्तांनी आपण श्रमिक विडी कामगार संघटना काढू अशी कल्पना मांडली होती. त्यांना आम्ही पाठिंबा दिला. (मुलाखत: वर्पे हरिभाऊ, २४.०३. २०१३)

१९७३ मध्ये मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण संगमनेरला आले होते. त्यांच्याकडे कॉ. दत्ता देशमुख यांनी विडी कामगारांची तक्रार मांडली. तक्रारीमध्ये त्यांनी म्हटले की, आणीबाणी असल्यामुळे भिकुसा विडी मालकांनी सात आठवडे पगार कामगारांचा केला नव्हता. आणीबाणीमुळे त्या विरोधात निदर्शन करता येत नव्हती. विडी कामगारांना किमान वेतन पाच रूपये ठरले होते. परंतु पाच रूपयाचे काम देण्याची कायद्यात तरतुद नव्हती. त्यामुळे मालक २.५० अडीच रूपयाचे काम देत होते. त्यामुळे कामगाराची उपसमार होत होती. अशा स्वरूपाची तक्रार मुख्यमंत्र्याकडे केली होती. (मुलाखत: शेवाळे विठ्ठल, १९९३, पृ. ६ )

किमान वेतन, विडी सिगार कायद्याची अंमलबजावणी, बोनस, भविष्य निर्वाह निधी, पेन्शन इत्यादी कामगारांचे प्रश्न होते. समाजवादी, कम्युनिस्ट पक्षांच्या युनियन काम करत होत्या. तर बी. जे. खताळ आणि हरिभाऊ वर्पे यांनी कॉंग्रेसची

इंटक युनियन काढली होती. कामगार विभागला गेला होता. १९५७ च्या निवडणुकीमध्ये झालेले मतभेद, किमान वेतन समितीवर कॉ. दत्ता देशमुख यांना घेण्यास विरोध झाला. या सर्व घटनांचा परिणाम कामगारांवर झाला होता. लाल बावटा युनियनमध्ये दत्ता देशमुखांना मानणारा कामगार होता. कामगारांचे प्रश्न आणि त्यांना झालेला विरोध यामुळे त्यांनी विडी कामगार संघटना स्थापन करण्याचे ठरविलेले दिसून येते.

## संगमनेर अकोले सिन्नर तालुका विडी कामगार समिती :—

कॉ. दत्ता देशमुख यांनी लाल निशाण पक्षाप्रेणित संगमनेर, अकोले, सिन्नर तालुका विडी कामगार समिती स्थापन केली. विडी कामगारांची युनियन १३ जून १९७४ मध्ये स्थापन केली. विडी कामगारानी कम्युनिस्ट पक्षांच्या लाल बावटा युनियनमधील कामगारांनी बाहेर पडून कॉ. दत्ता देशमुखांच्या नेतृत्वाखाली युनियन स्थापन केली होती. त्या विषयी कारभारी कडलग यांनी सांगितले की, ''मतभेद झाले नाही. परंतु कामगारांच्या हिताचे काम झाले पहिजे म्हणून, आम्ही विडी कामगाराची युनियन काढायची कॉ. दत्ता देशमुखांना विंनती केली. दत्ता देशमुखांचे लाल बावटा युनियनमध्ये समर्थक होते. संगमनेर तालुक्यातील चिखली येथे विडी कामगारांची बैठक झाली. या सभेला कॉ. दत्ता देशमुख, कॉ. मधुकर कात्रे, कॉ. दादाभाऊ हासे, सुकदेव वर्पे हे उपस्थित होते.'' (मुलाखत: वर्पे हरिभाऊ, २४.०३.२०१३)

कॉ. दत्ता देशमुख यांच्या नेतृत्वाखाली विडी कामगार समितीचे काम सुरू झाले होते. त्यांच बरोबर समाजवादी पक्षाची विडी मजदूर सभा, कम्युनिस्ट पक्षांची लाल बावटा युनियन आणि काँग्रेसची इंटक अशा चार युनियन विडी कामगारामध्ये काम करत होत्या. विडी कामगार समिती स्थापन करण्यामागे कोणतेही मतभेद नव्हते असे विडी कामगार समितीच्या कामगार कार्यकर्त्यांनी म्हटले असले तरी, १९७६ मध्ये संगमनेर येथे लाल बावटा आणि इंटक युनियनने विडी कामगाराचे अधिवेशन घेतले होते. या अधिवेशनामध्ये कॉ. दत्ता देशमुख यांच्या नेतृत्वाखाली विडी कामगार, शेतकरी,

शेतमजुर, धरणावरील कामगार असे २५०० हजार कामगार सहभागी झाले होते. परंतु कॉ. दत्ता देशमुख यांना अधिवेशनामध्ये बोलु दिले नाही. त्यांना उजव्या कम्युनिस्ट पक्षाचे नेते रामभाऊ नागरे यांनी 'दुसरा मांडव घाला' अशी सूचना केली. या अधिवेशनाला केंद्रिय कामगार मंत्री रघुनाथ रेड्डी उपस्थित होते. त्यांनी म्हटले की, ''मला कामगार एक दिसतात. पण पुढाऱ्यांमध्ये मतभेद दिसतात.'' (मुलाखतः वर्पे हरिभाऊ, २४.०३.२०१३) या विधानवरून असे दिसते की, अधिवेशनामध्ये कामगार नेत्यांमध्ये मतभेद होते. या अधिवेशनात विडी कामगार समितीने कामगारांचे खालील प्रश्न मांडले.

१. किमान वेतन ठरले पाहिजे.

२. मालकांनी पाने कापून दिली पाहिजे.

३. १९७५ पासून किमान वेतन सुधारणेचे आश्वासन अंमलात आले पाहिजे.

४. विडी व सिगार कायद्यातील भर पगारी रजा, ओव्हरटाईम, साप्ताहिक सुट्टी इत्यादी व बाळंतपणाची रजा, बोनस व ग्रॅच्युइटी कायद्याची अंमलबजावणी.

५. प्रॉव्हिडड फंड, विमा योजना लागू करणे.

६. पगार थकविणे, इमारत व इतर निधीचे पैसे कापण्याला प्रतिबंध करणे.

या मागण्या केल्या होत्या. (श्रमिक, १ ऑगस्ट १९७६, पृ. ८) या अधिवेशनामध्ये विडी कामगार कायद्याची अंमलबजावणी आणि नवीन मागण्या केलेल्या दिसून येतात.

१९७४ नंतर कॉ. दत्ता देशमुख यांच्या नेतृत्वाखाली कॉ. मधुकर कात्रे, दादाभाऊ हासे यांनी भविष्य निर्वाह निधीची आणि किमान वेतन निश्चितीच्याबरोबर इतर मागण्या केल्या. या मागण्यासाठी संप, मोर्चे, आंदोलने केली. कामगारमंत्री नरेंद्र तिडके यांच्याकडे शिष्टमंडळ नेले. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने १९७७ मध्ये भविष्य निर्वाह निधी कायदा केला. १९७८ मध्ये किमान वेतनाची चळवळ झाली. या लढ्यासाठी कामगारांना जेलमध्ये जावा लागले. त्यावेळी मुख्यमंत्री शरद पवार होते. त्यांनी ५ रूपये २५ पैसे वेतन वाढ दिली. परंतु त्यांना निर्णय मागे घ्यावा लागला. त्यांनी ६ रूपये वेतनवाढ

केली. कामगारांनी महागाईशी निगडीत वेतन असावे अशी मागणी केली होती. मुख्यमंत्री शरद पवार यांनी विडीकामगार प्रश्न सोडविण्यासाठी आमदार भाऊसाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली किमान वेतन समिती नेमली. १९८०मध्ये थोरातांनी किमान वेतन समितीचा राजीनामा दिला. (मुलाखत: वर्पे सुकदेव, ४ मार्च २०१३)

१९७६ मध्ये केंद्रसरकारने विडी कामगार कल्याण कर व कल्याणनिधी असे कायदे झाले. दोन्ही कायदे १९७८मध्ये लागू केले. या कायद्यातंर्गत घरकुल, मुलांना शिष्यवृत्ती, विडी कामगारांना दवाखाना आणि मोफत औषधे इत्यादी योजना राबविण्यात येतात. १९८१मध्ये बोनस आणि १९८३मध्ये मालकानी पानपुडा (कच्चामाल) कमी असल्यामुळे काम कपात सुरू केली होती. तर ''१९७८ मध्ये किमान वेतनाचा लढा १९८९पर्यत चालू होता. विडी कामगारांनी किमान वेतन महागाईशी निगडीत असावी अशी मागणी केली होती. त्यामध्ये विडी कामगार समितीबरोबर विडी मजदूर सभा, लाल बावटा सहभागी झाल्या होत्या. (पत्रक, ९/१/१९८७) मुख्यमंत्री शरद पवार यांनी आमदार बाळासाहेब थोरात यांच्या अध्यक्षतेखाली किमान वेतन समिती नेमली. या समितीने महाराष्ट्रातील सर्व भागातील कामगार, मालक, प्रतिनिधी यांच्याशी चर्चा केली. किमान वेतन १६ रूपये आणि दोन पैसे महागाई भत्त्याची शिफारस केली. २० सप्टेंबर १९९० मध्ये किमान वेतन व महागाई भत्ता लागू झाला.'' (मुलाखत : वर्पे सुखदेव, दि.४/३/२०१३)

या काळात भविष्य निर्वाह निधी, विडी कामगार कल्याण कर व निधी कायदा, किमान वेतन, बोनस कायदे झाले. किमान वेतन, बोनस, पानपुडाविषयी लढा दिला. परंतु १९७५मध्ये अकोले तालुक्यातील आढळा नदीवर देवठण धरण झाले. या धरणाचे पाणी तिन्ही तालुक्यातील विडीक्षेत्र असलेल्या काही भागाला कालव्याद्वारे शेतीला मिळाले. त्यामुळे पुरूष विडी कामगार शेती व्यवसाय करू लागल्यामुळे पुरूष कामगारांचे प्रमाण कमी – कमी होत गेले. शेतीला पाणी आल्यामुळे विडी मालकांनी कामगारांना घरखेप देण्यास सुरूवात केली. १९७६ मध्ये विडी कामगार कल्याण निधी

कायदा केंद्र सरकारने बनविला. या कायद्यातंर्गत विडी कामगारासाठी विविध कल्याणकारी योजनासाठी विडी कामगारांची मागणी वाढत गेली. त्यामुळे घरकुल, शिष्यवृत्ती, मोफत दवाखाना व औषधोपचार, विमा यासारख्या मागण्या विडी कामगार संघटनानी केलेल्या दिसून येतात.

## विडी कामगारांसाठी कल्याणकारी योजनाः—

केंद्रसरकारने विडी कामगार कर व विडी कामगार कल्याणनिधी कायदा १९७७ — ७८ मध्ये अंमलात आणला. या कायद्यातंर्गत प्रत्येकी एक हजार विडीमागे ५० पैसे कामगार कल्याणनिधी म्हणून जमा केले जात होते. परंतु एप्रिल २००६ पासून एक हजार विडी मागे पाच रूपये जमा केले जातात. कल्याणनिधीच्या माध्यमातून विडी कामगारासाठी कल्याणकारी योजना राबविल्या जातात. यामध्ये मुलांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, चष्मा घेण्यासाठी अनुदान, जनश्री विमा योजना, कुंटुबनियोजन करण्यासाठी प्रोत्साहनपर आर्थिक मदत, मोफत दवाखाण्याची सुविधा, महिलांना प्रस्तुती लाभ योजना, घरकुल योजना इत्यादीचा समावेश होतो.

या योजनाचा लाभ मिळवण्यासाठी विडी कामगाराकडे ओळखपत्र असणे आवश्यक असते. विडी सिगार १९६६ कायद्यानुसार विडी व्यवस्थापनाने त्यांच्याकडील विडी कामगारांना ओळखपत्रे द्यावीत अशी स्पष्ट तरतुद आहे. परंतु विडी कामगारांना ओळखपत्र दिल्यामुळे सर्व कायदे व योजना त्यांना लागू होतात. त्यामुळे ओळखपत्र देण्यास विडी व्यवस्थापनाने नकार दिलेला दिसून येतो. मुंबई मधील प्रभादेवी भागातील महिला विडी कामगारांनी १९८५मध्ये ओळखपत्र मिळविण्यासाठी संप केला होता. विडी कामगारांकडे ओळखपत्र नसल्यामुळे अनेक योजना आणि हक्कापासून वंचित राहावे लागते. संगमनेर भागातील विडी कामगारांनी चळवळीच्या माध्यमातून ओळखपत्र मिळविली आहेत. विविध योजना आणि कायदे विडी कामगारासाठी निर्माण झालेले असले, तरी विडी मालक आणि सरकारी यंत्रणा अंमलबजावणी करत नाही.

## घरकुल योजना :–

विडी कामगारासाठी कल्याणनिधी कायद्यातंर्गत घर बांधण्यासाठी बिनव्याजी कर्ज व अनुदान दिले जाते. १९८७ पासून ६००० हजार बिनव्याजी कर्ज व १००० हजार अनुदान स्वरूपात देण्यात येत होते. २७ एप्रिल २००७ मध्ये अनुदानात वाढ झाली. केंद्र सरकार ४० हजार तर राज्यसरकार २० हजार रूपये अनुदान देते. महाराष्ट्रामध्ये विडी कामगारांसाठी घरकुल योजनेची सुरूवात संगमनेर येथे झाली. घुलेवाडीच्या महिला विडी कामगारांसाठी संगमनेर महाविद्यालयाच्या पुढाकाराने राबविलेल्या इंद्रायणी गृहनिर्माण प्रकल्पाचे भुमिपूजन नानासाहेब गोरे यांच्या हस्ते झाले. नानासाहेबांनी 'जनता' च्या अंकात या प्रकल्पावर लिहून या कामाचे कौतुक केले. प्रकल्प पुर्ण झाल्यावर त्या वसाहतीचे उद्‌घाटन कॉ. गोदूताई परूळेकर यांनी केले. "या प्रकल्पातून प्रेरणा घ्या". असा सल्ला नंतर त्यांनी आपले सहकारी नरस्या आडम यांना दिला आणि आडम मास्तरांनी विडी कामगारांच्या गृहनिर्माण संस्था राबविल्या." (लामखडे म. रा, साधना, पृ. १८, २०१३) नगर शहरामध्ये कॉ. राम रत्नाकर, कॉ. शंकर न्यालपेल्ली यांनी १९८५ मध्ये लाल बावटा युनियने ४०० घराचा प्रकल्प राबविला. तर इंटक प्रेणित विडी कामगार संघटनेनी १२० घरे बांधली. एक प्रकारे या डाव्या विचारांच्या चळवळीची आणि नेतृत्वाने १९८० च्या दशकात केलेल्या कामाचा आलेख होता.

सोलापूर, अहमदनगर नंतर संगमनेरमध्ये लाल निशाण पक्ष प्रेणित संगमनेर, अकोला, सिन्नर तालुका विडी कामगार समितीचे अध्यक्ष कॉ. गुलाबराव देशमुख यांनी १२० घराचा प्रकल्प राबविला. कॉ. दत्ता देशमुख नगर ही श्रमिक विडी कामगार सहकारी गृह निर्माण संस्था महिला विडी कामगारांची आहे. या घरकुल प्रकल्पा विषयी विडी कामगार समितीचे सरचिटणीस कॉ. कोल्हे म्हणतात की "१२० घराचा प्रकल्पापैकी ९१ घरे पुर्ण झाली आहेत. या प्रकल्पासाठी १९९१ मध्ये जागा घेतली. प्रत्येक सभासदाकडून जागेसाठी ४१०० रूपये आणि २५० रूपये शेअर्स घेतला. जागेची सर्व कायदेशीर

प्रक्रिया पुर्ण होण्यासाठी पाच वर्ष लागली. १९९७ मध्ये गृहनिर्माण संस्थेची नोंदणी केली. प्रत्येक घराला एक लाख सहा हजार पाचशे रूपये खर्च आला. २००६ मध्ये घरकुल योजनेतंर्गत केंद्र सरकारने २० हजार आणि राज्यसरकाराने २० हजार रूपये अनुदान स्वरूपात दिले. तर ४० हजार रूपये संग्राम पतसंस्थेकडून प्रत्येक सभासदाच्या नावावर कर्ज घेतले. २००८ मध्ये घरकुल प्रकल्प पूर्ण झाला.'' या प्रकल्पाला भेट दिली त्यावेळी गृह निर्माण सोसायटीच्या संचालिका शोभा आडेप म्हणाल्या की, ''कॉ. दत्ता देशमुख यांना असे वाटत होते की, विडी कामगार हा गरिब आहे. त्याचे मालकी हक्कांचे घर असावे. त्यांच्याकडून घर होणार नाही.'' संगमनेर, अकोले, सिन्नर तालुका विडी कामगार समितीचे कॉ. गुलाबराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली कॉ. दत्ता देशमुख विडी कामगार वसाहतीची स्थापना केली. त्याचबरोबर ग्रामीण भागातील विडी कामगारांना घरकुल मिळवून देण्याचे प्रयत्न केले. केंद्र आणि राज्य सरकारच्या अनुदानातून घरकुल योजना सुरू आहे. परंतु घरकुल योजना राबविताना त्यासाठी लागणारी जमीन, पैसा, कागदपत्राची पुर्तता, वाढती महागाई, सरकारी पातळीवरील मजुरी, नोकरशाहीची दिरंगाई इत्यादी कारणामुळे घरबांधणीसाठी कर्ज व अनुदान मिळण्यास अडचणी येतात.

असंघटित क्षेत्रातील कामगारांना आपल्या हिताचे कायदे व कल्याणकारी योजना लढे देऊन मिळवावे लागतात. त्याच्या अंमलबजावणीसाठी पुन्हा लढा द्यावा लागतो. त्यामध्ये नोकरशाहीचा उदासीन दृष्टिकोन दिसून येतो. त्यामळे विडीमालक कायद्याचे उल्लंघन करताना दिसून येतात. १९९० नंतर संघटित क्षेत्रातील कामगार कमी होऊन असंघटित क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर ठेकेदारी पद्धत सुरू झाली आहे. ही ठेकेदारी पद्धत विडी उद्योगात देखील सुरू झाली आहे. विडी कामगारांसाठी असलेल्या विविध योजनाची अंमलबजावणी कामगार मंत्रालयाकडून होते. परंतु काही विडी कामगार नेत्याच्या मते, अनेक संघटित आणि असंघटित क्षेत्रातील कामगाराचे काम कामगार मंत्रालयातून चालते. त्यासाठी त्याच्याकडे स्वतंत्र यंत्रणा नाही आणि पुरेसा नोकरवर्ग नाही. नोकरशाही पद्धतीने काम चालत असल्यामुळे कामाला विलंब लागतो. विडी

कामगार कल्याणनिधीच्या माध्यमातून जो निधी जमा केला जातो तो निधी कामगारांवर खर्च केला जात नाही. असा आक्षेप कामगार नेतृत्वाचा आहे. विविध कायदे आणि योजना राबविताना नोकरशाहीचा दृष्टिकोन हा नकारात्मक दिसून येतो.

## विडी कामगार नेतृत्वाची कामगिरी

२० फ्रेबुवारी १९९० रोजी महाराष्ट्र सरकारने विडी कामगारांचे किमान वेतन महागाईशी जोडून निश्चित केले. या वेतनाचा पाच वर्षांने पुर्नविचार करण्याचे मान्य केले. १ जानेवारी १९९१ मध्ये महाराष्ट्र सरकारने ७ वर्षांपेक्षा जास्त काळ उत्पादन करणारी आणि ५० पेक्षा जास्त कामगार असलेल्या कंपनीतील कामगारांसाठी एकूण पगारांच्या किमान वेतन, महागाई भत्ता, घरभाडे भत्ता यांची अंमलबजावणी निवडणुकीपूर्वी केली जाईल असे सरकारकडून स्पष्ट केले होते. या हक्कांची पुर्तता न केल्यामुळे संगमनेर, अकोले, सिन्नर तालुक्यातील विडी कामगारांच्या चारही संघटनानी ७ ऑगस्ट १९९१ रोजी विडी मालकांच्या कार्यालयावर संप केला. (पत्रक, ७ ऑगस्ट १९९१) या हक्कांच्या अंमलबजावणीसाठी विडी कामगार संघटनानी एकत्र येऊन संप, मोर्चो, निदर्शने, आंदोलने इत्यादी माध्यमातून एकत्र लढा दिलेला दिसतो.

किमान वेतन, महागाई, घरभाडे भत्ता, देशपातळीवर एक समान किमान वेतन, पानपुड्याचा प्रश्न, पेन्शन योजना, लहान सिगारेटची परवानगी रद्द करणे इत्यादी मागण्यासाठी विडी कामगारांची चळवळ चालू होती. १९९१ मध्ये भारताने खुल्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. त्याचा दृश्य परिणाम विडी उद्योगावर झालेला दिसतो. १ मार्च १९७४ मध्ये केंद्र सरकारने बहुराष्ट्रीय आणि देशी सिगारेट उत्पादनावर केंद्रसरकारने अबकारी कर सवलत दिली. लहान आकाराच्या सिगारेटमुळे विडीची मागणी कमी होऊन विडी व्यवसायावर प्रतिकुल परिणाम झाला. या व्यवसायात घरखेप, ठेकेदारी काम कपात अशा स्वरूपाचा परिणाम कामगारांवर झाला आहे. घरभाडे भत्त्यांविषयी विडी कामगार समितीने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये रिट पीटिशयन दाखल केल्यामुळे ३ सप्टेंबर १९९४ रोजी फेर आदेश काढून विडी कामगारांना घरभाडे

कायदा लागू केला. २६ ऑक्टोबर १९९४ मध्ये कामगार मंत्र्याच्या बैठकीत किमान वेतनाचा निर्णय झाला. ३ डिसेंबर १९९४ रोजी काँग्रेस सरकारने किमान वेतन ड्राफ्ट नोटिफिकेशन काढून दर हजार विडीला ३९ रुपये किमान वेतन आणि दररोज सुमारे ३ ते ३.५० रुपये महागाई भत्ता जाहीर केला. विडी कामगारांच्या किमान वेतन, महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, पेन्शन आणि विडी कामगारांना मिळत असलेल्या इतर हक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी तसेच छोट्या सिगारेटचे उत्पादन व अबकारी कर सवलत रद्द करणे, ठेकेदारी पद्धत बंद करणे, पानपुडा इत्यादी मागण्यासाठी २१ नोव्हेंबर १९९५ रोजी विडी कामगार समितीचे सरचिटणीस कॉ. गुलाबराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली मुंबई विधीमंडळासमोर उपोषण केले. या आंदोलनामध्ये इतर संघटनाना सहभागी होण्याचे आवाहन पत्रकामध्ये केले होते. (संघटनेचे पत्रक दस्तऐवज, २१ नोव्हेंबर १९९५) या मागण्यासाठी महाराष्ट्र राज्य विडी कामगार फेडरडशी संलग्न संघटनानी चळवळ सुरु केली होती. सिगारेट उत्पादनावर बंदी आणि विडी व्यवसायाला संरक्षण मिळविण्यासाठी तसेच पेन्शन योजनेसाठी दिल्लीमध्ये पंतप्रधान कार्यालयावर मोर्चा काढला होता. या आंदोनात विडी कामगार संघटना स्वंतत्रपणे काम करताना दिसतात.

विडी कामगार समितीने लहान सिगारेटला बंदी आणि अबकारी कर रद्द करुन विडी व्यवसायाला संरक्षण मिळावे या मागणीसाठी विडी मालकांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले. परंतु २० जुलै १९९६ रोजी महाराष्ट्र सरकारच्या किमान वेतन सल्लागार समितीला महाराष्ट्र राज्य उद्योग संघाने निवेदन दिले. या निवेदनामध्ये असे म्हटले की, ‘‘विडी कामगारांनी केलेल्या मागण्यांपैकी काही मागण्याची अंमलबजावणी केली आहे. तर शासनाकडून अजून घरभाडे भत्त्याचा प्रश्न राहिला आहे. विडी उद्योगाला सिगारेटशी स्पर्धा करावी लागत आहे. किमान वेतनामध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे विडी व्यवसाय चालविणे अवघड झाले आहे. (संघटनेचे पत्रक दस्तऐवज, २० जुलै १९९६ पत्रक) ३ डिसेंबर १९९४रोजी काँग्रेस सरकारने किमान वेतन महागाईसह लागू केले.

त्याच्या अंमलबजावणी दरम्यान १९९५मध्ये शिवसेना भाजपचे सरकार आल्यामुळे विंलब लागला. परंतु विडी कामगार चळवळीची किमान वेतनाची मागणी सुरु होती. त्यामुळे शिवसेना – भाजप सरकारने १८ मार्च १९९७ रोजी नवीन किमान वेतन लागू केले. त्यानुसार किमान वेतन २९ रुपये तर १८ मार्च १९९७ पासून ३० जून १९९७ पर्यत ४० पैसे, तर १ जुलै १९९७ पासून १रु ६० पैसे जाहिर केले. उंट विडी उद्योग, इस्माईल विडी उद्योग, पिस्तुल विडी उद्योगाच्या मालकांनी नवीन किमान वेतनाची अंमलबजावणी केली. परंतु बहुसंख्य विडी मालक आणि विडी उद्योग संघाने अंमलबजावणी करण्यास नकार देऊन १७ ते १९ एप्रिल १९९७ पर्यत सरकारच्या निर्णयाला विरोध करुन विडी उद्योग संघाने बंद पुकारला. या बंदचा निषेध करण्यासाठी विडी कामगारांमध्ये काम करणारे आयटक, सिटू, हिंदू मजदूर सभा, हिंदू मजदूर किसान पंचायत, विडी कामगार समिती, महाराष्ट्र राज्य विडी कामगार फेंडरेशनशी संलग्न संघटना, इंटक अशा महाराष्ट्रातील २२ संघटनांनी एका व्यासपीठावर येऊन ''महाराष्ट्र राज्य विडी कामगार हक्क संरक्षण कृति समिती'' स्थापन केली. या कृतिसमितीचे निमंत्रक नेतृत्व गुलाबराव देशमुख, कारभारी उगले, कॉ. राम रत्नाकर यांच्या नेतृत्वाखाली लढा चालू होता. संघटनेने कामगारांच्या हक्कांच्या मागण्यासाठी २३ ते २५ जुलै १९९७ रोजी विडी कामगारांनी जेलभरो आंदोलन केले. त्यामध्ये अनेक कामगारांना तुरुंगवास झाला. २० ऑगस्ट १९९७ रोजी विडी मालकांच्या कार्यालयावर निदर्शने केली. ३१ ऑगस्ट १९९७ रोजी कामगार मंत्री शेबीर शेख यांनी विडी कामगार प्रतिनिधी व विडी मालकांची बैठक बोलविली. परंतु बैठकीमध्ये कामगार मंत्र्यानी किमान वेतनासंबंधी तडजोड करावी अशी भूमिका मांडल्यामुळे किमान वेतनांचा प्रश्न सुटला नाही. परंतु विडी कामगारानी आपले आंदोलन तीव्र केले. सर्व संघटनानी कृति समितीच्या नेतृत्वाखाली लढा चालू केला. २२ सप्टेंबर १९९७ रोजी पुण्यामधील विडी उद्योग संघाचे अध्यक्ष सुधीर साबळे यांच्या कार्यालयावर दहा हजार कामगारांनी उग्र निदर्शन करुन निवेदन दिले. तर मुख्यमंत्राच्या वर्षा बंगल्यासमोर महाराष्ट्र राज्य विडी

कामगार फेंडरेशनचे अध्यक्ष कॉ. राम रत्नाकार यांनी उपोषण करण्याची घोषणा केली. त्यामळे २८ ऑक्टोबर १९९७ रोजी मुख्यमंत्र्यांनी विडी कामगार प्रतिनिधीशी चर्चा केली. मुख्यमंत्री म्हणाले की, राज्यशासन किमान वेतन निर्णय मागे घेणार नाही. तसेच विडी मालक अंमलबजावणी करणार नाही. त्याच्यावर दिपावलीनंतर आठ दिवसात कारवाई केली जाईल. घरभाडे भत्त्याविषयी कामगार मंत्र्याच्या नेतृत्वाखाली नेमलेला लवाद लवकर निर्णय देतील असे आश्वासन दिले. परंतु त्याची अंमलबजावणी झाली नाही. उलट विडी मालकांनी कामगार कपात सुरु केली. त्यामुळे १७ व १८ डिसेंबर १९९७ रोजी विधानभवनासमोर विडी कामगारांचा प्रश्नांवर विरोधी पक्षनेते मधुकर पिचड, आमदार बाळासाहेब थोरात, ॲडम मास्तर यांच्यासह विरोधी पक्षातील आमदारांनी सभात्याग केला. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी विडी कामगारांच्या शिष्टमंडळाला बोलावुन चर्चा केली. मुख्यमंत्र्यांनी किमान वेतनाची अंमलबजवणी केली जाईल असे आश्वासन दिले. (संघटनेचे पत्रक दस्तऐवज, डिसेंबर १९९७) विडी कामगारांची चळवळीने कृति समिती स्थापन करुन आपले हक्क मिळविण्यासाठी संप, निदर्शने, उपोषण, मोर्चे, जेलभरो, सत्याग्रह या लोकशाही मार्गांचा वापर करुन शासनाच लक्ष वेधून विरोधी पक्षांच्या माध्यमातून विधानसभेत प्रश्नांची चर्चा घडवून शासनावर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न विडी कामगार चळवळीच्या नेतृत्वानी केलेला दिसतो.

१९९७ – ९८ मध्ये विडी कामगार चळवळीने आपल्या हक्कांच्या अंमलबजावणीसाठी चळवळ तीव्र केली. शासकीय पातळीवरील अधिकारी, कामगार मंत्री, मुख्यमंत्री यांच्याबरोबर चर्चा करुन कामगारांचे हक्क मिळवण्यासाठी प्रयत्न केला. परंतु किमान वेतन, महागाई भत्ता हे हक्क देण्यास विडी मालकांनी नकार दिला. मुळच्या प्रश्नापासून आपले लक्ष दुसऱ्या प्रश्नांकडे वळविण्यासाठी मालकांनी विडी कामगारांची पिळवणूक सुरु केली. त्यामध्ये विडी कामगारांचे पगार थकविणे, पानपुडा तंबाखु अभावी कारखाने बंद ठेवणे, कामगार व नोकराचे राजीनामे घेऊन कामगारांना घरखेप घ्यावी, १९९५ पासून घरभाडे भत्ता देताना मागील ५७ महिन्याच्या थकबाकीवरील हक्क

सोडविण्यासाठी कामगारांच्या सह्या घेणे, लेबर पॅकींग कामांमध्ये ठेकेदारी पध्दत सुरु करणे. या प्रकारे विडी कामगारांचे शोषण सुरु केले होते. विडी कामगारांच्या हक्कांची अंमलबजावणी होण्यासाठी शासनाने मालकाना भाग पाडावे आणि न्यायालयीन लढा अशा दुहेरी पध्द्तीने विडी कामगार नेतृत्वाने लढा चालविलेला दिसतो. ३ डिसेंबर १९९७ रोजी औद्योगिक न्यायालय अहमदनगर यांनी विडी कामगारांच्या हक्कांची अंमलबजावणी करण्याचा आदेश लंगर, संभाजी, कोंबड, हत्ती छाप भिकुसा, चक्रपाणी आणि गायछाप विडी कारखानदारांना दिला होता. विडी उद्योगामध्ये किमान वेतन, घरभाडे भत्ता या हक्कांची अंमलबजावणी फक्त सिन्नर विडी देत होती. वरील पाच विडी कारखानदारांनी न्यायलयाच्या आदेशाचे पालन न करता दर हजारी ३९ रुपये किमान वेतन ३५ रुपयावर तडजोड करावी अशी भूमिका ठाकूर सावदेकर विडी मालकांनी घेतली. त्यासाठी त्यांनी डिसेंबर १९९७चे पगार वाटप केली नाही. ४५०० विडी कामगारांची उपासमार करुन कारखाने बंद करण्याची भिती घातली. साबळे वाघीरे, भिकुसा क्षेत्रिय यांचे पगार थकवुन कामगारांवर हल्ले चालू होते. सिन्नर विडी कारखानदार किमान वेतन, महागाई भत्ता, घरभाडे भत्ता देत होते. परंतु १ जानेवारी १९९७ पासून त्यांनी पूर्वीच्या दराने किमान वेतन देण्यास सुरुवात करुन ५००० हजार कामगारांवर वेतन कपात लादली आहे. (संघटनेचे पत्रक, दस्तऐवज, २५ जानेवारी १९९८)

विडी कामगारांवर होणाऱ्या अन्याय विरुद्‌ध संगमनेर, अकोले व सिन्नर तालुक्यातील विडी कामगारांनी संघटनांनी एकत्र लढा दिला. त्यांनी कामगारांचे होणारे शोषण थांबविण्यासाठी मुख्यमंत्री यांना हस्तक्षेप करुन विडी कामगार व विडी मालक प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक घेण्यासाठी निवेदन दिले. मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधण्यासाठी मुख्यमंत्री निवास, विधानमंडळासमोर उपोषण, सत्याग्रह केला. त्यामुळे १ मे १९९८ रोजी कामगारमंत्री यांनी विडी कामगारांना सुधारीत किमान वेतन देण्याची घोषणा करुन, त्याची अंमलबजावणी न करणाऱ्या मालकांवर कारवाई केली जाईल, असे विधानसभेत

सांगितले. तर ९ मे १९९८ रोजी मुख्यमंत्र्यानी विडी कामगार व मालकांची संयुक्त बैठक घेऊन किमान वेतनाच्या अंमलबजावणीचे विडी मालकांना आवाहन केले. पाच वर्ष थकलेल्या घरभाडे भत्त्याविषयी सहानुभूतीने सोडविण्यासाठी प्रयत्न करील असे स्पष्ट केले. परंतु विडी कारखानदारांनी किमान वेतन, महागाई भत्ता यांची अंमलबजावणी केली नाही. ठाकूर सावदेकर यांनी ३३ तर साबळे वाघीरे यांनी १९ विडी कारखाने ३ ते ९ महिने बंद ठेऊन कामगार विरोधात ७ सप्टेंबर ते ७ ऑगस्ट १९९८ पर्यत बेमुदत धरणे आंदोलन चालू ठेवले. कामगार मंत्री, मुख्यमंत्री यांच्याबरोबर चर्चा झाल्या. परंतु कामगारच्या हक्कांची अंमजबजावणी करण्यास विडी कारखानदारांनी नकार दिला.

विडी कामगार हा हातावरील उपजीविका असलेला असल्यामुळे तो जास्त काळ आपल्या मागण्या लांबून ठेवू शकत नाही. या आर्थिक मर्यादेमुळेच कृतिसमितीमधून इंटक विडी कामगार संघटना बाहेर पडलेली दिसते. इंटकने एक पत्रक काढून त्यामध्ये म्हटले आहे की, दहा महिन्यापासून विडी कामगारांचा जीवघेणा लढा चालू आहे. महाराष्ट्राच्या अन्य जिल्ह्यांत आणि शेजारील राज्यामधील किमान वेतन आणि आपल्याकडे मिळणारे किमान वेतन यामध्ये २५ रुपया पर्यत फरक असल्यामुळे आपल्या भागातील विडी उद्योग शेजारील राज्यात जातील असा त्यांनी इशारा देऊन पूर्वीच नेतृत्व कामगार हिताच निर्णय घेत होते. सध्याचे नेतृत्वावर टीका करुन १० रुपये विडी कामगारांकडून घेतलेल्या लढा निधीला आक्षेप घेतलेला आहे. अहमदनगर शहरातील विडी कामगारांनी तसेच संगमनेर भागातील विडी रोजगार रक्षक समितीने या प्रकारची पत्रक काढलेली दिसतात. कृति समितीचे नेतृत्व करणारे नेते यांच्यावर आक्षेप घेतले गेले. कृतिसमितीने सुध्दा मालक धार्जिणी संघटना अशी टीका केलेली आहे. यावरुन किमान वेतनाच्या चळवळीमध्ये फुट पडलेली दिसून येते.

विडी कारखानदारांनी कामगारांचे विविध पातळीवर शोषण चालू ठेवले. कामगारांच्या हक्कांची अंमलबजावणी केली नाही. काम नाकारणे, कारखाने बंद ठेवणे,

घरखेप देणे, कामगारांचे राजीनामे घेणे या सारखे हल्ले विडी कामगारावर विडी मालकांकडून वाढत गेले. या काळात कृतिसमितीमध्ये फुट पडली. २००० मध्ये महाराष्ट्र राज्य विडी कामगार फेंडरेशन संलग्न संघटना कृतिसमितीमधून बाहेर पडल्या. त्यामुळे कामगार विभागला गेला. किमान वेतन, महागाई भत्ता इत्यादी प्रश्न विषयाचे आंदोलन संगमनेर, अकोले, सिन्नर या भागातून उभे राहिले होते. परंतु कृतिसमितीमध्ये फुट पडल्यामुळे लाल बावटा आणि समाजवादी युनियनने एकत्र काम सुरु केले. कृतिसमितीमधून बाहेर पडण्यामागील कारण लाल बावटा युनियनचे अध्यक्ष कारभारी उगले यांच्या मते, ''आमच्यात मतभेद झाले नाही. परंतु कॉ. गुलाबराव देशमुख यांनी चळवळ चालविताना घेतलेल्या भूमिकेमुळे आम्ही कृतिसमितीमधून बाहेर पडलो.'' तर विडी कामगार समितीचे सरचिटणीस कॉ. कोल्हे म्हणाले की, ''किमान वेतनाची चळवळ चालू होती. त्यावेळी कृतिसमितीचे निमंत्रक कॉ. गुलाबराव देशमुख आणि कॉ. कारभारी उगले होते. मालकांनी किमान वेतन देण्यास नकार दिला. तेव्हा संघटनेने मालकाविरूध्द न्यायालयात खटले दाखल केले. परंतु कृति समितीमध्ये पदावरुन मतभेद होऊन कॉ. करभारी उगले आणि साथी सायन्ना एनगंदूल बाहेर पडले'' (मुलाखतः कोल्हे बिपिन, दि. ०३.०५.२०१४)

विडी कामगारांच्या प्रश्नाविषयी शिवसेना – भाजप आणि कॉंग्रेस – राष्ट्रवादी कॉंग्रेस यांच्या सरकारने मालकांवर कोणतीही कारवाई केली नाही. २०००मध्ये कृतिसमितीमध्ये फुट पडली. किमान वेतनाचा लढा दहा वर्षाहून अधिक काळ चालला. त्याची अंमलबजावणीसाठी शासकीय पातळीवर प्रयत्न झाले नाहीत. २०००नंतर कॉ. गुलाबराव देशमुख यांनी कृतिसमितीच्या माध्यमातून लढा चालू ठेवला. १९९७ – ९८ पासून कामगारावरती विडी मालकांचे हल्ले चालू होते. विडी कामगारांमध्ये फुट पडल्यामुळे विस्कळीत झाले होते. विडी मालकांनी चळवळ कमी करण्यासाठी घरखेप सुरु केली. २००० ते २००३ या कालावधीत घरखेप सक्तीने लागू केली. तर घरखेप

पुर्ण झाल्यानंतर २००३ पासून कामगारांचे हक्क डावलण्यासाठी सहकारी तत्त्वावर विडी उद्योग सुरु करुन ठेकेदारी पद्धत सुरु केली.

## विडी उद्योगातील कामगारांचे प्रकार आणि प्रश्न

विडी उद्योगातील कामगारांचे दोन प्रकार पडतात. एक विडी कारखान्यांमध्ये जाऊन काम  करणारा कामगार तर दुसरा कारखान्यांतून कच्चामाल घरी नेऊन विडी बनविल्या जातात. नंतर कारखान्यांमध्ये माप दिले जाते. दुसऱ्या प्रकाराला घरखेप म्हणतात. शहरी भागात प्रथम घरखेप कामगार सुरु झाली. घरखेप कामगार पद्धतीमुळे कामगारांचे हक्क डावलले जातात. तसेच कामगार संघटनात्मक दृष्ट्या विस्कळीत होतो. हे विडी कामगार चळवळीमधील नेतृत्वाच्या लक्षात आले. तेव्हा विडी कामगार चळवळीने त्याला विरोध करण्यास सुरुवात केली. १९७३मध्ये महाराष्ट्र राज्य विडी कामगार फेंडरेशनचे तिसरे अधिवेशनामध्ये प्रथम घरखेप व ठेकेदारी पद्धत रद्द् करण्याचा ठराव करण्यात आला होता.

## घरखेपीची प्रक्रिया :—

संगमनेर, अकोले, सिन्नर तालुक्यातील काही भाग अवर्षणग्रस्त पट्ट्यात येत असल्यामुळे नेहमीच दुष्काळाच्या छायेत राहिलेला आहे. येथील शेतीला पाणी नसल्यामुळे शेती एका पिकांवर अंवलबून होती. स्वातंत्रपुर्व काळात शेती सोडून दुसरा कोणताही व्यवसाय नव्हता. या काळात विडी उद्योगाची सुरुवात झाली. शेतीला पुरक असलेल्या विडी उद्योगाकडे लोक उपजीविकेचे साधन म्हणून सुरुवातीच्या काळात आकर्षित झाले होते. या व्यवसायामध्ये शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात काम करत होता. म्हणून ग्रामीण भागात विडी उद्योगाचा पाया विस्तारला आणि विडी कारखानदारीची भरभराट झाली. संगमनेर हे विडी कामगार चळवळीचे केंद्र बनले होते.

१९७५मध्ये अकोले तालुक्यातील आढळा नदीवर देवठण येथे धरण बांधले गेले. १९७८ मध्ये संगमनेर, अकोले, सिन्नर तालुक्यातील शेतीला या धरणातून

कालव्याद्वारे पाटपाण्याची सोय झाली. सततची दुष्काळी परिस्थिती आणि एका पिकावर असलेली शेती बागायती झाली. बागायती शेतीमुळे विडी कामगार शेतकरी शेतीकडे वळला. त्यामुळे विडी व्यवसायातील पुरुष कामगारांचे प्रमाण हळूहळू कमी झाले. या काळात बोनसचा कायदा १९६५, विडी सिगार कायदा १९६६, प्राव्हिडंड फंड कायदा १९७६, प्राव्हिडंड फंडातून विडी कामगारंना पेन्शन चालू करावी, विडी कामगार कल्याण निधी कायदा १९७८, किमान वेतन, विडी कामगारांना ओळखपत्राची मागणी यासारख्या कायद्याची निर्मिती आणि अंमलबजावणीसाठी महाराष्ट्रामध्ये विडी कामगारांच्या चळवळी चालू होत्या. संगमनेर, अकोले, सिन्नर तालुक्यातील विडी कामगार नेतृत्व करत होते. येथील विडी कामगार नेतृत्वाने राज्य आणि राष्ट्रीय पातळीपर्यत विडी कामगार चळवळीचे नेतृत्व केले.

विडी कामगारांच्या घरखेपीच्या प्रक्रियाविषयी कॉ. निवृत्ती दातीर यांच्या मते, ‘‘या विभागातील १९९७ पासून घरखेप सुरु झालेली असली तरी २०००मध्ये मोठ्या प्रमाणात सर्वच कारखान्यामध्ये घरखेप सुरु झाली. सिन्नर विडी उद्योगाचे मालक किसन सारडा यांनी आपल्या नोकराच्या घरातील आणि नातेवाईक विडीकामगारांना घरखेप घेण्यास भाग पाडले. घरखेप घेण्यासाठी कामगारांना काम जास्त देऊ, कच्चा माल वाढून देऊ अशा स्वरुपाचे प्रलोभन दाखविली गेली. परंतु कोतुळ, गणोरा, वीरगा, डोंगरगाव येथील विडी कामगारांनी घरखेप शेवट पर्यंत घेतली नाही. परंतु मालक आणि व्यवस्थापनानी कामगारांना काम कमी देणे. काम बंद ठेवण, काम न देणे, खराब विडी मापातून काढणे, शेजारील गावातील कारखान्यातून कच्चामाल घरी नेऊन विड्या बांधून त्याचे माप कारखान्यात देणे अशा स्वरुपाचे काम होते. कारखान्यामध्ये विडी कामगारांना १० ते ६ या वेळेत काम असल्यामुळे दुसरे कोणतेही काम करता येत नव्हते. त्यामुळे कामगारांनी घरखेप स्वीकारली. विडी कामगार एकत्र येऊन आपल्या हक्कासाठी चळवळी करतात. परंतु विडी कामगार संघटित होऊ नये तसेच विडी कारखान्यातील कारकुन, इतर कामगारांची वेळेमध्ये बदल करुन त्या कामगारांकडून

दुसऱ्या ठिकाणच्या कारखान्यामधील काम करुन घेता येते. त्यामुळे कमी कामगारांकडून जास्त काम विडी मालकांनी करुन घेता येऊ लागले. या कारणामुळे विडी मालकांनी कामगारांना घरखेप दिली. घरखेपीच्या धोरणाचा परिणाम विडी कामगार आणि पर्यायाने विडी कामगार संघटनावर झालेला दिसून येतो. ''या घरखेप व ठेकेदारी पध्दतीमुळे या कामगार कुटुंबाचे सामुदायिक आरोग्य धोक्यात येते व टी. बी. सारख्या रोगाचा कुटुंबात प्रसार होतो. कारण या पध्दतीमुळे कामावर वेळेचे बंधन नसल्यामुळे हे कामगार आपल्या लहान मुलांनाही या कामाकरीता रात्रदिवस वेठीस धरतात.'' (आंबेकर निवृत्ती, १९८८, पृ. २४.) घरखेपीचा परिणाम विडी कामगारांच्या कुटुंबावर आणि कामगार संघटनावर झाला. त्यामुळे विडी कामगार संघटनानी घरखेपीला विरोध केलेला दिसून येतो. परंतु घरखेपीपुर्वी विडी कारखान्यात काम करणारा कामगार संघटित होता. त्यामुळे कामगार वर्गाचा दबाव शासन व्यवस्थेवर आणि विडी मालकांवर पडलेला दिसतो. विडी कामगार नेतृत्वाने चळवळीच्या माध्यमातून कामगारांच्या हिताच्या मागण्या मंजुर करुन कामगार कायदे व कल्याणकारी योजना राज्यसंस्थेस करण्यास भाग पाडलेले दिसते. परंतु घरखेपीची प्रक्रिया पुर्ण झाल्यामुळे विडी कामगार विस्कळीत होऊन त्यामध्ये बदल झालेला दिसतो.

१९९० नंतर संगमनेर, अकोले, सिन्नर तालुक्यातील विडी कामगार क्षेत्र असलेल्या भागात शेतीला पाणी आल्यामुळे शेती विकसित झाली. तर घरखेपीमुळे विडी कामगार विस्कळीत झाला. या घरखेपी विरुद्ध आंदोलन उभे करण्यास येणाऱ्या अडचणीमुळे घरखेप बंद होऊ शकली नाही. त्या विषयी कॉ. कारभारी उगले म्हणाले की, ''या भागामध्ये शेतीला पाणी आले. त्याचबरोबर शेतीला पुरक दुग्धव्यवसाय विकसित झाला. यामधून आर्थिक सुबत्ता आली. विडी कामगार कल्याणनिधी कायद्यातंर्गत शिक्षणासाठी शिष्यवृत्ती सुरु झाली. ग्रामीण भागातील विडी कामगारांच्या मुलांनी शिक्षण घेतले. शिक्षण घेतल्यामुळे विडी कामगारांची मुले विडी व्यवसायात आली नाही. विडी व्यवसायातून सेवा निवृत्त झालेल्या कामगारांला शेतीमध्ये काम होत

नाही. त्यामुळे हा कामगार तात्पुरत्या स्वरुपाचा विड्या बांधण्याचे काम करतो. तर नवीन कामगार विडी व्यवसायात येत नाही. पुर्वीसारखे सध्याच्या विडी कामगारांचे कुटुंब विडी व्यवसायाबरोबर इतर व्यवसायात काम करत असल्यामुळे उपजीविकेचे एकमेव साधन आहे.'' बागायती शेतीमुळे पुरुष कामगार कमी झाला. तर स्त्री कामगाराचे प्रमाण विडी व्यवसायात जास्त असून देखील शेतीचे काम, कुटूंबिक जबाबदारी आणि घरखेपीमुळे विडी कामगारांच्या प्रश्नावर आंदोलनात सहभागी होण्याचे प्रमाण कमी झालेले दिसून येते. पूर्वी विडी कारखान्यात पुरुष आणि स्त्री कामगार एकत्र काम करत होते. त्यावेळी पुरुषाचे प्रमाण देखील जास्त होते. तेव्हा कामगाराच्या प्रश्नासाठी होणाऱ्या आंदोलनात कामगारांचा सहभाग देखील जास्त होता. यांचे एक कारण असे सांगता येईल की, विडी कारखान्यांतील कामाचे स्वरुप हे एका ठिकाणी बसून कामगारांना काम करावे लागत होते. त्यामुळे विडी कामगार हा संघटित होता. परंतु शेतीला पाणी आल्यानंतर पुरुष कामगार शेती करु लागला. त्यामुळे कामगारांचे प्रमाण कमी होत गेले. तसेच विडी मालकांनी घरखेप सुरु केल्यामुळे विडी कामगार वर्ग विस्कळीत झाला. त्यामुळे विडी कामगाराचे आंदोलनातील सहभाग कमी होताना दिसून येतो.

संगमनेर, अकोले, सिन्नर तालुक्यामधील विडी कामगारामध्ये स्त्री कामगाराची संख्या मोठ्या प्रमाणात असून देखील विडी कामगारामधून स्त्री नेतृत्व पुढे आलेले दिसून येत नाही. विडी मालकांनी घरखेप दिल्यामुळे कामगारांना संघटित करण अवघड झाले आहे. याविषयी कॉ. निवृत्ती दातीर सांगतात की, ''पूर्वी एखादी चळवळ संघटित करण्यासाठी आठ दिवस लागत होते. परंतु २००० सालापासून विडी कामगारांच्या प्रश्नावर चळवळ उभी करण्यासाठी एक महिन्यापेक्षा जास्त वेळ लागतो. एका दिवसामध्ये एकच कारखान्यांतील कामगारांना भेटता येते. त्यामुळे कामगारांना संघटित करुन चळवळ उभी करणे कठीण झाले आहे.'' कामगार असंघटित झाल्यामुळे त्यांच्या दबाव कमी झालेला दिसून येतो. त्यामुळे मालकांनी फॅक्टरी ऐवजी घरखेप देऊन कामगार असंघटित केला. परंतु विडी सिगारेट कायदा १९६६ मध्ये घरखेप कामगारांना

कामगार समजावा आणि त्यांना कारखान्यातील कामगारांना सर्व कायदे व सोयी दिल्या पाहिजे. अशी तरतुद केल्यामुळे घरखेप कामगारांना देणे मालक वर्गांवर कायद्याने बंधनकारक झाले. यामधून पळवाट काढून कामगारांचे हक्क डावलण्यासाठी सहकारी सोसायटी अंतर्गत ठेकेदारी पद्धत चालू केली.

## विडी कामगारांची सहकारी सोसायटी:—

सत्तरच्या दशकात केरळमध्ये सहकारी तत्त्वावर विडी व्यवसायाची सुरुवात झाली. केरळ मध्ये गणेश विडी नावाने विडी उद्योग सुरु होता. परंतु गणेश विडी उद्योग बंद पडला. केरळ सरकारने गणेश विडीचे नाव दिनेश विडी ठेऊन स्थानिक पातळीवर सरकारी सोसायट्याची स्थापना केली. या सहकारी सोसायट्याचे कामगार सदस्य व संचालक होते. केरळ सरकारने कामगारांना सर्व कायदे लागू केले. सहकारी तत्त्वावर विडी व्यवसाय २५ वर्षे चालू होता. नंतर बंद पडला.

महाराष्ट्रामध्ये विडी कामगार आपल्या हक्कांची मागणी करत असे. त्यामुळे विडी मालक विडी कारखाने शेजारील राज्यामध्ये स्थलांतर करत. यामुळे कामगारांवर बेकारीची परिस्थिती निर्माण होत होती. विडी व्यवसायातील स्थलांतराला आळा घालण्यासाठी केरळ सरकारप्रमाणे महाराष्ट्रात सहकारी तत्त्वावर विडी व्यवसाय प्रथम विदर्भात सुरु झाला. परंतु सहकारी पद्धतील ज्या प्रकारे प्रोत्साहन देणे आवश्यक आहे तसे झाले नाही. त्यामुळे विडी व्यवसायात ठेकेदारी पद्धत सुरु झाली. या विषयी कॉ. कारभारी उगले यांच्या मतानुसार ''विदर्भामध्ये सुरेखा कुंभारे यांनी विडी कामगारांच्या सहकारी सोसायट्या स्थापन केल्या. त्यांनी स्वत:च ठेकेदारी पद्धत सुरु केली. २००३ मध्ये पश्चिम महाराष्ट्रात विडी व्यवसायामध्ये सहकारी तत्त्वावर सुरु झाला. २००३ मध्ये संगमनेर तालुक्यातील तळेगाव भागात मोठा दुष्काळ पडला होता. तेव्हा विडी कामगारांना कोणतेही काम नव्हते. येथील विडी कामगारांनी आमदार बाळासाहेब थोरात यांच्याकडे जाऊन आम्हाला काम द्या अशी मागणी केली. तेव्हा माझ्या मतदार संघातील

विडी कामगारांना काम पाहिजे म्हणून बाळासाहेब थोरात यांनी विडी मालकांना कारखाने सुरु करण्यास लावले. तेव्हा संगमनेर तालुक्यातील चिचोंली गुरव येथे ठाकूर सावदेकर आणि सारडा कंपनी यांनी विडी कारखानदारीत सहकारी सोसायट्याची स्थापना केली.'' घरखेपीची प्रक्रिया पुर्ण झाली होती. परंतु विडी कामगारांना कायदेशीर हक्क घरखेपीनंतर मालकांवर बंधनकारक होते. म्हणून मालकांनी विडी व्यवसायात मालक कामगार संबंध संपुष्टात आणून सहकारी सोसायटी आणि ठेकेदारी पद्धत सुरु केली.

सहकारी सोसायटीच्या प्रक्रियाविषयी कॉ. निवृत्ती दातीर यांच्या मते ''सहकारी सोसायटीची स्थापना करताना विडी कारखान्यामधील जुन्या कामगारांचे राजीनामे घेतले गेले. त्यांना भविष्य निर्वाह निधी, ग्रॅच्युटीची रक्कम दिली. यांच रक्कमेतून २ हजार रुपये भाग भांडवल म्हणून प्रत्येक विडी कामगार सभासदाकडून सहकारी सोसायटीसाठी घेतले. २००३ ते २००७ पर्यत टप्पा – टप्पाने अकोले, संगमनेर, सिन्नर तालुक्यातील विडी कामगारावर दबाव निर्माण करुन त्याचे राजीनामे घेतले. ज्या कारखान्यातील कामगारांनी त्याला विरोध केला. त्या ठिकाणी व्यवस्थापनातील कामगारांच्या घरातील तसेच जवळचे नातेवाईक विडी कामगारांचे प्रथम राजीनामे घेतले. ज्या कामगारांनी राजीनामे देण्यास विरोध केला. त्यांना काम कमी देणे, शेजारील गावातील कारखान्यामध्ये काम देणे अशा प्रकारे व्यवस्थापनाकडून कामगारांना त्रास दिला गेला.''

या काळात घरखेपीमुळे कामगार विस्कळीत झाला होता. बागायती शेतीमुळे नवीन कामगार विडी व्यवसायात येत नव्हता. सेवानिवृत्त कामगार राजीनामे देऊन ठेकेदारी पद्धतीने काम करत होते. त्यामुळे घरखेपीचे प्रमाण ९५ टक्के होते. कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण ५ टक्के राहिले. त्यामध्ये स्त्री कामगारांचे प्रमाण जास्त असल्यामुळे व्यवस्थापनाच्या दबावामुळे कामगारांनी राजीनामे दिले. ठाकूर सावदेकर यांनी सिध्दी विनायक आणि स्वामी समर्थ ट्रेडींग कंपनी अशी दोन सहकारी सोसायट्या स्थापन केल्या. मालक कच्चा माल देऊन सहकारी

सोसायट्याकडून विडीची खरेदी करतात असे दाखविले जाते. त्यामुळे मालक आणि कामगार नाते संपते. कामगारांच्या सहकारी सोसायट्या स्थापन करुन मालकवर्गांने व्यवस्थापनाद्वारे त्यावर नियंत्रण ठेऊन ठेकेदारी पद्धत सुरु केली.

विडी कामगारांना कोंबडा विडी, हत्ती विडी, देसाई विडी, साबळे वाघीरे विडी या विडी कारखान्याचे मालक कामगारांना पगारी रजा, ग्रॅज्युइटी देतात, किमान वेतन, महागाई भत्त्यांची संपुर्णपणे अंमलबजावणी करत नाही. तर ठाकूर सावदेकर यांची सिध्दी विनायक आणि स्वामी समर्थ ट्रेडिंग विडी कंपनी तसेच श्रमिक विडी कामगारांना बोनस, ग्रॅज्युइटी, महागाई भत्ता, भर पगारी रजा देत नाहीत. विडी कामगारांना १०० रुपये १३. ३३ पैसे कामगारांना मिळत होता. त्यावेळी सहकारी सोसायटीमध्ये १.५० पैसे कामगारांना बोनस म्हणून न देता रेबीट म्हणून कामगारांना दिला जातो. २००३ ते २००७ पर्यत सहकारी सोसायट्यांनी दर हजार विडीला बाजारभावापेक्षा सात रुपये कमी वेतन दिले. २००८ पर्यत भविष्य निर्वाह निधी सहकारी सोसायटीमध्ये कापत नव्हते. त्या विरोधात विडी कामगार संघटनानी सतत लढा दिला. २००८ नंतर सहकारी सोसायट्यामध्ये विडी कामगारांचा भविष्य निर्वाह निधी कापण्यास सुरुवात झाली. (दातीर, २०१३)

विडी मालकांनी विडी उद्योगामध्ये कामगारांचे हक्क डावलण्यासाठी घरखेपी नंतर सहकारी सोसायटी आणि ठेकेदारी पद्धत सुरु केली. घरखेप आणि बागायती शेतीमुळे कामगारांचे प्रमाण कमी झाले. तर विडी कामगारांच्या मुलांना विडी कामगार कल्याण निधी कायद्यातंर्गत शिक्षणासाठी शिष्यवृत्तीचा फायदा झाल्यामुळे शिक्षण घेतलेली विडी कामगारांची मुले नोकरीसाठी दुसऱ्या व्यवसायात गेली. या व्यवसायात नवीन कामगार येत नाही. तसेच अल्प – भूधारक, भुमिहिन शेतकरी, स्त्री कामगार, सेवानिवृत्त कामगार काम करताना दिसून येतात. यामध्ये स्त्री कामगारांचे प्रमाण जास्त आहे. परंतु घरखेपीमुळे विस्कळीत झालेला स्त्री कामगार हा कुंटूबिक आणि शेतीच्या

दुहेरी जबाबदारीमुळे मोठ्या प्रमाणात आंदोलनात सहभागी होत नाहीत. कारण की, विडी कारखान्यातील संघटित कामगाराला आपल्यावर होणाऱ्या अन्याय विरोधी जाणीव जागृती करुन आंदोलनात उतरण्यास कामगार संघटनाना आणि विडी कामगार नेतृत्वाला सोपे जात होते. परंतु कामगारांना संघटित करण्यासाठी आधुनिक साधने असून देखील घरखेपीमुळे विस्कळीत झालेल्या कामगारांला संघटित करणे अवघड झाले आहे. त्यामुळे स्त्री कामगारांचे प्रमाण जास्त असले तरी संप, मोर्चे, आंदोलनात स्त्रियांचा सहभाग कमी झालेला आहे. सरकारने सहकारी पद्धतीच्या विडी कारखान्याना भांडवल पुरवठा व विडी विक्रीला खास संरक्षण देण्यात यावे आणि ठेकेदारी पद्धती कायद्याने बंद करण्यात यावी. यासाठी संगमनेर, अकोले, सिन्नर विडी कामगार समितीने कॉ. गुलाबराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन उभे केले. (पत्रक, २१/११/१९९५) परंतु विडी व्यवसायात सहकारी सोसायटी आणि ठेकेदारी पद्धतीमध्ये विडी व्यवस्थापनाचे नियंत्रण होते. त्या विरोधात कामगार नेतृत्वाने कामगारांना संघटित करुन विडी मालकांना आपला निर्णय मागे घेण्यास भाग पाडू शकले नाही. कामगार कमी झाल्यामुळे विडी मालक व शासनावर दबाव पडू शकला नाही.

१९९० नंतर भारताने खुल्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केला यामध्ये दिसून येते. जागतिक आरोग्य संघटनेनी तंबाखुजन्य पदार्थांवर बंधने आणली. २००३ मध्ये केंद्र सरकारने धुम्रपान विरोधी कायदा केला. त्याचा परिणाम विडी व्यवसायावर झाला. विडी मालकांनी काम कमी केले, कामगार कपात केली, कामगार कमी झाल्यावर विडी कारखाने बंद केले. तर केंद्र सरकारने बहुराष्ट्रीय कंपन्याना लहान सिगारेट बनविण्याची परवानगी दिली. परकीय कंपन्यानी सिगारेट व्यवसायात गुंतवणूक केली. त्यांना करामध्ये सवलत दिली. तर विडी उत्पादनावर अबकारी कर वाढविला. विडी उद्योगाला संरक्षण द्या अशी मागणी विडी मालक आणि विडी कामगार करत आहेत. परंतु विडी कामगारांना सिगारेटशी स्पर्धा करावी लागत आहे. त्यामध्ये विडी कामगारांचे प्रमाण कमी झाले आहे. विडी मालकांनी सहकारी सोसायटी आणि ठेकेदारी पद्धतीचा स्वीकार केला

आहे. या सर्व परिस्थितीमध्ये विडी कामगार आणि त्यांच्या संघटना आपल्या मागण्यासाठी संघर्ष करताना दिसत असल्या तरी त्यांना यश येताना दिसत नाही.

विडी कामगारांचे किमान वेतन, महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, पगारी रजा, पेन्शन, प्राव्हीडंड फंड, प्रस्तुती लाभ, ग्रॅज्युईटी, कल्याणकारी निधी मधील विविध योजनांची अंमलबजावणी विडी मालकाकडून आणि सरकारी पातळीवर होत नव्हती. २००० मध्ये कृति समितीमध्ये फुट पडल्यानंतर विडी कारखानदारांनी घरखेप आणि त्यानंतर विडी कामगारांचे हक्क डावलण्यासाठी सहकारी तत्त्वावर विडी व्यवसाय सुरु करुन त्यामध्ये ठेकेदारी पद्धत सुरु केली होती. या काळात विडी कामगारांचे प्रमाण कमी होत होते. नवीन कामगार भरती होत नव्हती. विडी कामगारांचे प्रश्न गुंतागुंतीचे झाले होते. विडी कामगार कृति समितीच्या नेतृत्वाखाली कामगारांच्या हक्काची अंमलबजावणी आणि विडी कारखानदारांनी सुरु केलेली घरखेप, सहकारी सोसायटीकरण, ठेकेदारीकरण अशा स्वरुपाचे कामगारांच्या प्रश्नांवर लढा चालू होता. २००१ मध्ये मुख्यमंत्र्यानी विडी कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी कामगार राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय समिती नेमली. कृति समितीने मागण्याचा पाठपुरावा केला. त्यानंतर दीड वर्षाने कामगार मंत्र्यानी एक बैठक घेऊन उपसमिती नेमली. किमान वेतन अधिनियम १ जानेवारी २००२च्या अधिसूचनेप्रमाणे दर हजार विडीना ३९ रुपये अधिक १४.३० महागाई भत्ता मिळून ५३.३० रुपये कायदेशीर वेतन जाहीर केले होते. परंतु विडी कारखानदार ३० ते ४० रुपये देत होते. १ जानेवारी २००३ रोजी कामगार राज्यमंत्री यांनी उपसमितीच्या बैठकीमध्ये घरभाडे भत्ता रद्द करण्याचा निर्णय मांडला. १९९१ ते ९५ पर्यतचे घरभाडे भत्ता १८ जानेवारी २००३ रोजी अध्यादेश काढून रद्द केला. १७ ऑक्टोबर २००२ रोजी किमान वेतन ५४ वरुन ४८ रुपये कपात करणारे नोटीफिकेशन सरकारने काढले. त्या विरोधात विडी कामगार समितीने औरंगाबाद खंडपीठामध्ये रिट पीटीशयन दाखल केली. १२ मार्च २००४ रोजी न्यायालयाने या निर्णयाला स्थगिती दिली. २००० नंतर विडी कामगारांच्या कायदेशीर हक्कांच्या

अंमलबजावणी होत नाही. त्यामध्ये विडी कामगारांमध्ये फुट पडली. तसेच वेगवेगळ्या कारणामुळे विडी कामगार कमी झाला. त्यामध्ये घरखेप, सहकारी सोसायटी, ठेकेदारी पद्धतीमुळे कामगार असंघटित होताना दिसून येतो. या काळात मालक वर्गांकडून कामगारांचे शोषण अधिक झाले. हत्ती छाप, कोंबड छाप, साबळे वाघीरे इत्यादी विडी कारखान्यामध्ये विडी कामगारांचे लढे चालू होते.

## विडी कामगारांचे प्रबोधन:—

विडी कामगार एक असंघटित क्षेत्रापैकी घटक आहे. विडी कामगार नेतृत्वाने कामगारांमध्ये शोषणाविषयी जाणीव जागृती केली. त्यासाठी त्यांनी कार्यकर्त्यांची बौध्दिक शिबीरे घेण, कारखान्यात वृत्तपत्र वाचन, संप, आंदोलन, सभा, परिषदा, मेळावे या माध्यमातून कामगारांना मार्गदर्शन केले जाते. विविध मुद्द्याच्या आधारे चळवळी संघटित केल्या जातात. संघटनात्मक पातळीवर कामगारांचे वैचारिक प्रबोधन केले होते. यामधून कार्यकर्त्यांची जडणघडण केली जात होती. विडी कामगार चळवळीने आर्थिक मागण्याबरोबर सामाजिक व राजकीय क्षेत्रात कामगारांना सहभागी करुन घेतले. त्यामध्ये स्वांतत्र चळवळ, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवामुक्ती चळवळ, आणीबाणी यामध्ये विडी कामगार सहभागी झाले होते. आणीबाणीमध्ये कॉ. दत्ता देशमुख यांनी शेतकरी व कामगारांचे श्रमिक कला पथकाची सुरु केले होते. सामाजिक बांधिलकी म्हणून शैक्षणिक संस्थाच्या उभारणीमध्ये विडी कामगारांनी योगदान दिलेले आहे. विडी कामगारांनी राजकारणामध्ये सक्रिय सहभाग घेतलेला आढळतो. परंतु १९९० नंतर घरखेपीचे प्रमाण वाढले, ठेकेदारी पद्धत सुरु झाली. या सर्व कारणामुळे विडी कामगार विस्कळीत आणि असंघटित झाला. विडी कामगार समितीचे सरचिटणीस कोल्हे म्हणाले की, १९९५ पासून कार्यकर्त्यांची शिबीरे घेणे बंद झाले. विडी कामगार चळवळीमध्ये कार्यकर्त्याचा संच तयार झाला होता. परंतु सध्या नवीन कार्यकर्ता विडी कामगारांमधून येत नाही. बागायती शेतीमुळे पुरुष विडी कामगाराचे प्रमाण कमी झाले आहे.'' या भागामध्ये विडी कामगार

चळवळ ६०—७० च्या दशकामध्ये जोर होता. परंतु या ठिकाणी विडी कामगार चळवळीचे संघटन हे कमी झालेले दिसून येते. कारण विडी कामगार चळवळीमध्ये पहिल्या पिढीच्या नेतृत्वाने विडी कामगारांमधून जाणीवपुर्वक नेतृत्वाची जडणघडण केली. यामधून नेतृत्व पुढे आलेले आपल्याला दिसून येते. परंतु दुसऱ्या पिढीने विडी कामगारामध्ये कार्यकर्ता निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला असला तरी त्यांना अपयश आलेले दिसून येते. तसेच महिला कामगाराची संख्या विडी व्यवसायात जास्त असून देखील त्यांच्या मधून देखील नेतृत्व पुढे आलेले नाही. यापूर्वीच्या विविध कारणामध्ये शेती जमिनीला पाणी आल्यामुळे बागायती शेती आणि दुग्ध व्यवसायामुळे आर्थिक सुबत्ता आली. पूर्वीचे उपजीविकेचे साधन म्हणून विडी व्यवसायावर येथील ग्रामीण कामगार अंवलबून होता. तर शहरी कामगार सुध्दा दुसऱ्या व्यवसाय करु लागला आहे. उदा. सहकारी उद्योग, कापड दुकान इत्यादी मध्ये काम करताना दिसून येतो. विडी व्यवसायातील कामगारांची संख्या कमी होत गेली. त्यामुळे विडी कामगाराची चळवळ ही क्षीण झालेली दिसून येते.

स्वांतत्रपुर्व काळात संगमनेर, अकोले व सिन्नर तालुक्यातील विडी व्यवसायाची सुरुवात होऊन विकास झाला. विडी कामगारांची संख्या वाढत गेली. विडी उद्योगाचा विकास होत गेला. त्यामधून कामगारांचे प्रश्न निर्माण झाले. हे प्रश्न सोडवण्यासाठी विडी कामगारांचा संघटित करण्यामध्ये नानासाहेब पिंगळे, कॉ. रामभाऊ नागरे, भास्करराव दुर्वे, कॉ. दत्ता देशमख, भाऊसाहेब थोरात यांनी प्रयत्न केला. संघटित झालेल्या विडी कामगारांमध्ये आपल्या हक्काविषयी जाणीव जागृती निर्माण केली. विडी कामगार हा असंघटित कामगार मधील एक आहे. असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी कायदे आणि कल्याणकारी योजना लढा देऊन शासनास करण्यास भाग पाडावे लागते. असंघटितासाठी तयार झालेले कायदे आणि कल्याणकारी योजनाच्या अंमलबजावणीसाठी सतत संघर्ष करावा लागतो. कायद्याचे संरक्षण मिळवून घ्यावे लागते. या भागातील विडी कामगार नेतृत्वाने चळवळीच्या माध्यमातून लोकशाही मार्गांने लढा देऊन विडी कामगारांना अनेक

हक्क प्राप्त करुन दिले आहेत. त्यामध्ये किमान वेतन, विडी सिगारेट कायदा, विडी कामगार कल्याण कर आणि कल्याण निधी कायदा यांच्या माध्यमातून मोफत दवाखाना ,शिष्यवृत्ती, घरकुल इत्यादी योजना राबविल्या जातात. पगारी रजा, बोनस, पेन्शन योजना, प्राव्हीडंड फंड, प्रस्तुती लाभ, ग्रॅज्युईटी, कल्याणकारी निधीमधील विविध योजना इत्यादी हक्क विडी कामगारांना मिळालेले आहेत. विडी कामगार नेतृत्वाने आर्थिक मागण्यापुरते मर्यादित ठेवले नाही. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात संघटित विडी कामगारांनी चळवळीच्या माध्यमातून सहभागी करुन घेतले. विडी कामगारांनी स्वातंत्र चळवळ, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती चळवळ, राष्ट्रीय आणीबाणी यामध्ये विडी कामगारांनी सहभाग घेतला. तर शैक्षणिक संस्था उभारणी आणि नैसर्गिक आपत्तीमध्ये विडी कामगारांनी आपले योगदान दिलेले आहे. परंतु १९९० नंतर मात्र यामध्ये बदल झालेला दिसून येतो.

या भागामध्ये १९७५ मध्ये आढळा नदीवर धरण झाले. संगमनेर, अकोले, सिन्नर तालुक्यातील शेतीला धरणाचे पाणी कालव्याद्वारे मिळाले. त्यामुळे शेतजमीन बागायती झाली आणि कोरडवाहू शेतीचे रुपांतर बागायती शेतीमध्ये होण्यास सुरुवात झाली. त्याचा दृश्य स्वरुपातील परिणाम हा विडी व्यवसायावर झाला. विडी व्यवसायामध्ये याच काळात बदल होण्यास सुरुवात झाली. बागायती शेतीमुळे विडी कामगार पुरुष वर्ग शेतीकडे वळला. शेतीला जोड व्यवयाय म्हणून दुग्ध आणि फळबाग विकसित झाला. त्यामधून आर्थिक सुबत्ता आली. आर्थिक सुबत्तेमुळे शिक्षणाचे प्रमाण वाढले. शेती आणि सहकारी उद्योगामधून पर्यायी रोजगार निर्माण झाला. या सर्व बदलामुळे शिक्षण घेतलेली विडी कामगारांची मुले विडी व्यवसायात आली नाही. विडी व्यवसायात ग्रामीण भागात अल्पभूधारक, भूमिहिन, दुसरा कोणताही व्यवसाय करण्याचे कौशल्य नसलेला कामगार आणि स्त्री कामगारांचे प्रमाण दिसून येते. शहरी भागात देखील महिलाचे प्रमाण या व्यवसायात अधिक दिसते. कारण या व्यवसायात काम

करणाऱ्या महिलाना दुसरे काम कमी प्रतिष्ठेचे समजतात. उदाः धुणी भांडी, हॉस्पिटल इत्यादी असे असले तरी शिक्षण घेतलेले नवीन कामगार विडी व्यवसायात येत नाही.

१९९०पर्यंत विडी व्यवसायांचे स्वरुप अधिक बदलत गेले. त्याचा परिणाम विडी कामगार आणि विडी चळवळीवर झालेला दिसून येतो. खुल्या अर्थव्यवस्थेचा परिणाम म्हणून १९९४ मध्ये केंद्र सरकारने बहुराष्ट्रीय कंपन्याना लहान सिगारेट उत्पादन घेण्याची परवानगी देऊन त्यावर अबकारी करामध्ये सवलत दिली. यांचा प्रतिकुल परिणाम विडी व्यवसायावर झालेला दिसून येतो. याच काळात किमान वेतन, महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, आणि पेन्शन योजना यासारखे कायदे सरकारने केले होते. त्यांच्या अंमलबजावणीसाठी विडी कामगार संघटनाची चळवळ चालू होती. परंतु मालकांनी अंमलबजावणी करण्यास नकार दिला. एकाच मागणीसाठी विडी कामगारांनी दहा वर्षाहून अधिक काळ विडी कामगारांनी लढा दिला. परंतु सरकार आणि विडी कारखानदार यांनी त्याला प्रतिसाद दिलेला दिसत नाही. उलट सरकारने विडी कारखानदार यांना झुकते माप दिल्याचे दिसून येते. विडी मालकांनी विडी कामगार चळवळी विरुद्ध भूमिका घेऊन विडी कामगारांची कपात करणे, काम कमी देणे, काम नाकारणे, कामगारांचे राजीनामे घेणे, विडी कारखाने बंद करणे, कामगारांच्या हक्कांची अंमलबजावणी न करणे इत्यादी प्रकारे कामगारांचे शोषण विडी कारखानदारांकडून केले जात होते. त्या विरोधात सर्व कामगार संघटनानी एकत्र येऊन लढा दिला. परंतु २००० मध्ये विडी कामगारांमध्ये फुट पडली. या काळात विडी कामगारांची संख्या कमी झालेली होती. २००० मध्ये विडी कामगारामध्ये फुट पडल्यामुळे विडी कारखानदारांनी कारखाने बंद करुन विडी कामगारांना घरखेप देण्यास सुरुवात केली. घरखेपीला विडी कामगारांनी विरोध केला. परंतु टप्पा – टप्प्याने विडी कारखानदारांकडून घरखेप लागू केली. याचा परिणाम विडी कामगार वर्ग विस्कळीत होण्यास झाला. त्याचा परिणाम कामगार आणि कामगार संघटनावर देखील झाला. घरखेपीनंतर संघटनात्मक दृष्ट्या कामगार वर्ग विस्कळीत झाल्यामुळे विडी व्यवसायामध्ये मालकांनी सहकारी तत्त्वावर

विडी कामगारांच्या सोसायट्या स्थापन करुन त्यामध्ये ठेकेदारी पद्धत सुरु केली. २००० नंतर विडी व्यवसायात मोठ्या प्रमाणात हे बदल घडून आलेले दिसून येतात. हे बदल घडण्यामागील कारणे म्हणजे यापुर्वी विडी कामगारांना सर्व कायदे व सवलती मिळत होत्या. विडी कामगारांना घरखेप दिल्यानंतर सर्व कायदे व हक्क लागू होते. या सर्व सवलती देण्यास विडी कारखानदाराचा विरोध होता. त्यामुळे घरखेपीनंतर विडी व्यवसायात सहकारी सोसायटी आणि ठेकेदारी पद्धत सुरु केली. यामुळे मालक कामगार संबंध संपुष्टात आणुन नविन कामगार ठेकेदार संबंध प्रस्थापित केला गेला. त्यामुळे विडी कामगारांचे हक्क डावलण्याचे प्रयत्न विडी मालकांकडून झाला. घरखेप, सहकारी सोसायटी आणि ठेकेदारी पद्धत यांच्या विरोधात विडी कामगार संघटनानी लढा दिला. परंतु विडी व्यवसायामध्ये सहकारी सोसायटी आणि ठेकेदारी पद्धत बंद करण्यास विडी कामगार संघटनांना अपयश आले. तरी विडी कामगारांचे हक्क मिळविण्यासाठी विडी कामगारांचा लढा चालू आहे. परंतु विडी कामगारांचे घटत जाणारे प्रमाण, सेवानिवृत्त कामगार झाला आहे. नविन कामगार विडी व्यवसायामध्ये येत नाही. विडी कामगारमध्ये महिलाचे प्रमाण अधिक असून देखील त्याच्यामधून नेतृत्व पुढे येताना दिसत नाही. तर कामगार संघटनामध्ये सध्याचे नेतृत्व सोडून नविन नेतृत्व तयार झालेल नाही. त्यामुळे विडी कामगारांचे पुर्वीसारखा दबाव दिसून येत नाही. त्यामुळे विडी कामगारांचे प्रश्न वर्षान वर्ष प्रलंबित असलेले दिसून येतात.

१९९० पूर्वी विडी कामगारांचे कारखान्यामध्ये काम करण्याचे प्रमाण जास्त होते. तेव्हा त्यांना संघटित करणे सोपे होते. त्यावेळी विडी कामगारांचे नेतृत्व करणाऱ्या नेतृत्वाने विडी कामगारांमध्ये आपल्या हक्कांविषयी जाणीव जागृती करुन संघटित केले होते. त्यासाठी विडी कामगार आणि कार्यकर्त्यांचे विविध माध्यमातून जडणघडण केली जात होती. यामध्ये विडी कामगाराची बौध्दिक शिबीरे घेऊन त्याचे प्रबोधन केले जात होते. त्यामुळे विडी कामगारांमधून कार्यकर्त्यांचा संच तयार झाला होता. परंतु सध्याचे विडी कामगारांचे नेतृत्व करणारे नेते तयार झाले आहेत. परंतु शेतजमिनीला पाणी

आल्यानंतर पुरुष कामगार कमी झाला. त्यामुळे नविन कार्यकर्त्यांचा संच विडी व्यवसायात तयार झाला नाही. यामुळे विडी व्यवसायात कार्यकर्त्यांची उणीव दिसून येते. स्त्रियांचे प्रमाण सर्वाधिक असले तरी विडी कामगार चळवळीमधून स्त्रियांचे नेतृत्व पुढे आलेले दिसून येते नाही. यासाठी पूर्वीच्या नेतृत्वाकडून प्रयत्न झालेला असला तरी स्त्रियांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी, कुंटूंबिक जबाबदारी आणि पुरुष वर्चस्व असलेली मानसिकता यामुळे महिला नेतृत्व विडी कामगार चळवळीमधून आलेले दिसत नाही.

सध्याच्या परिस्थितीमध्ये विडी कामगारांची संख्या कमी होण्याची कारणे विडी व्यवसायात नव्याने भरती होत नाही. कामगारांनी वयोवृध्दामुळे राजीनामे दिले. तर दुसऱ्या बाजूला राजीनामे मालकवर्गाने घेतले गेले. शिक्षणामुळे नव्याने विडी व्यवसायात कामगार येत नाही. शेतीमुळे पर्यायी उपजीविकेचे साधन उपलब्ध झाल्यामुळे तसेच सहकारी संस्थामध्ये रोजगार उपलब्ध झाला. त्यामुळे विडी व्यवसायातील कामगारांची संख्या कमी झालेली असली तरी आजही विडी व्यवसाय टिकून आहे. विडी कामगारांचे सध्या किमान वेतन, बोनस, पगारी रजा, महागाई भत्ता, कामगार कायद्याची अंमलबजावणी हे प्रश्न आहे. तर दुसरीकडे काम कमी, पानपुड, तंबाखु कमी, प्रत्येक मापामागे २५ विडीचा बंडल घेतला जातो. या सर्व प्रश्नावर विडी कामगार नेतृत्वाने लढा दिलेला आहे. सध्या परिस्थितीमध्ये विडी कामगारांना याच प्रश्नांना सामोर जावे लागत आहे.

स्वांतत्रपुर्व आणि नंतरच्या काळात विडी कामगार चळवळीच्या माध्यमातून कायदे लागू झाले. या कायद्याची अंमलबजावणी झाली. कारण या काळात विडी कामगार चळवळीचा दबाव होता. विडी कामगार चळवळीने चळवळीच्या माध्यमातून सामाजिक, राजकीय क्षेत्रात हस्तक्षेप केला होता. संसदीय राजकारणाचा मार्ग म्हणून विडी कामगार चळवळीच्या नेतृत्वाने निवडणूक लढवून संसदीय राजकारण सुध्दा केले. परंतु १९९० नंतर त्याचे प्रमाण कमी होत गेलेले दिसून येते. सध्याच्या परिस्थितीमध्ये विडी

कामगारांचे संघटित असे दबावाचे राजकारण घडताना दिसत नाही. त्या प्रकारचे नेतृत्वाची सुध्दा उणीव दिसून येते.

संगमनेर, अकोले, सिन्नर तालुक्यातील सध्या तीन विडी कामगार संघटना काम करतात. त्यामध्ये समाजवादी पक्षांची विडी मजदूर सभा या संघटनेचे अध्यक्ष सायन्ना ऐनगुंदल काम पाहतात. भारतीय कम्युनिस्ट पक्षाची लाल बावटा युनियनचे अध्यक्ष कॉ. कारभारी उगले त्याच बरोबर कॉ. शांताराम वांळुज, कॉ. बापुसाहेब कानवडे, कॉ. निवृत्ती दातीर काम पाहतात. तर संगमनेर, अकोले, सिन्नर विडी कामगार समितीचे काम कॉ. दत्ता देशमुख यांच्या नंतर त्याचे पुतणे कॉ. गुलाबराव देशमुख पाहत होते. त्याच्या निधनानंतर मारुती कोल्हे काम पाहतात. परतु सध्याच्या परिस्थितीमध्ये विडी कामगारांच्या संघटनामध्ये कार्यकर्त्यांचा संच नाही, कार्यकर्त्याच्या संच नसल्यामुळे संघटनात्मक पातळीवरील काम बंद झालेले दिसून येते. कामगार आपल्या अडचणी घेऊन येतात. परंतु संघटनाच्या कार्यालयात मृत कामगाराच्या वारसाच्या नोंदी, सेवानिवृत्त कामगाराच्या पेन्शन, ग्रॅच्युइटी, शिष्यवृत्ती, प्राव्हिडंड फंड इत्यादी कामे चालतात. संगमनेर, अकोले, सिन्नर विडी कामगार संघटनेची सभासद संख्या ६००० हजार होती. सध्या या संघटनेचे ५०० सभासद आहेत. गेली दोन वर्ष कार्यकारणीची बैठक झालेली नाही. एक प्रकारे कॉ. गुलाबराव देशमुखाच्या नंतर फक्त कार्यालयीन काम चालू आहे.

स्वांतत्रपुर्व काळात निर्माण झालेला विडी व्यवसाय संगमनेर, अकोले, सिन्नर तालुक्यात विकसित झाला. विडी कामगारांची चळवळीचे केंद्र बनले. या विडी कामगार चळवळीने सामाजिक, राजकीय चळवळीचे नेतृत्व केले. निवडणुकांच्या माध्यमातून संसदीय राजकारण करुन एक विडी कामगार शेतकऱ्याचा दबाव गट म्हणून आपल्या मागण्या राज्यसंस्थेला करण्यास भाग पाडले. असा वारस असलेली विडी कामगार चळवळ सध्या तरी प्रभावहीन झालेली दिसून येते.

## वीज कामगार संघटना आणि डावी चळवळीचे नेतृत्व

स्वतंत्र भारताच्या उभारणीसाठी भारत सरकारने विविध सार्वजनिक उद्योग सुरु केले. या उद्योगामध्ये वीज उद्योगाचा समावेश होतो. १९४८ मध्ये वीज उद्योग सुरु करण्यासाठी भारत सरकारने विद्युत कायदा केला. या कायद्यानुसार प्रत्येक राज्यात स्वायत्त अशी वीज मंडळाची स्थापना करावी अशी तरतूद करण्यात आली. १९५४ मध्ये मुंबई द्विभाषिक राज्याने वीज मंडळाची स्थापना केली. १ मे १९६० रोजी महाराष्ट्राची निर्मित्ती झाली. त्यामुळे वीज महामंडळाचे विभाजन होऊन २० जून १९६० रोजी महाराष्ट्र राज्य वीज मंडळाची स्थापना झाली. महाराष्ट्रातील मुंबई शहर वगळता ग्रामीण व शहरी भागामध्ये वीज मंडळाकडून वीज पुरवठा केला जातो. महाराष्ट्रातील शेती, लघुउद्योग, औद्योगिकरण आणि घरगुती वापरासाठी वीजेची मागणी वाढत गेली. वाढत्या कामगारांच्या संख्येबरोबर विविध प्रश्न निर्माण झाले. कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी कामगार संघटित झाला. या मधून कामगारांच्या संघटनेचा उदय झाला.

## वीज उद्योगातील कामगारांच्या समस्याः—

वीज उद्योगाच्या वाढत्या विस्ताराबरोबर कामगारांची संख्या वाढत गेली. या कामगारांना अनेक अडचणी आणि समस्याना सामोरे जावे लागत होते. ग्रामीण भागात काम करताना कोणत्याही सुविधा मिळत नव्हत्या. कामासाठी साहित्य मिळत नव्हते, कामाची निश्चित वेळ नव्हती, पगार अतिशय कमी होता, कोणतेही नियम, भत्ते, सेवाशर्ती, सोयी — सुविधा, कायदे नव्हते, कायम कामगारांपेक्षा रोजंदरी कामगारांचे प्रमाण जास्त होते, त्यांना नोकरीची शाश्वती नव्हती, कोणतीही सुरक्षितेची हमी नव्हती. अशा परिस्थितीमध्ये महाराष्ट्र राज्य वीज मंडळातील कामगार काम करत होता. हा कामगार असंघटित होता. या समस्या सोडविण्यासाठी वीज कामगारांना संघटित करण्याचे प्रयत्न सुरु झाले. यामधून कामगारांच्या संघटना निर्माण होण्यास सुरुवात झाली.

## वीज कामगार संघटनाचा उदय:—

१९५४ मध्ये वीज कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी डॉ. काशीकर यांच्या नेतृत्वाखाली 'विद्युत कर्मचारी' ही महाराष्ट्र राज्य वीज मंडळात पहिली संघटना स्थापन झाली. या संघटनेने विदर्भातील रोजंदारी वीज कामगारांचा प्रश्न हाती घेतला. या संघटनेचे ए. बी. बर्धन सरचिटणीस झाले. १९६५ मध्ये संघटनेचे नेतृत्व त्यांच्याकडे आले. तर कोकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र या भागातील वीज कामगार असंघटित होता. परंतु पुणे जिल्ह्यातील तळेगाव दाभाडे येथील वीज कामगार शाहू थोरात यांच्यावर वीजमंडळातील कार्यकारी अभियंता यांनी वीज मंडळाच्या मालमत्तेचा खाजगी कामासाठी वापर केला म्हणून आरोपपत्र ठेवले. या अन्यायकारक कारवाई विरोधात वीज कामगार एकत्र येऊन शाहु थोरातावरील कारवाई मागे घेण्यास भाग पाडले. त्यामधून वीज कामगारांना संघटनात्मक प्रेरणा मिळाली. १५ ऑगस्ट १९५८ रोजी 'मजदूर सभा' ही कामगार संघटना स्थापन केली. या संघटनेच्या अध्यक्षपदी समाजवादी नेते बा. न. राजहंस, सरचिटणीसपदी शाहू थोरात तर खजिनदारपदी जी. आर. तांबोळी यांची निवड करण्यात आली. 'मजदूर सभा' या नावामुळे ही संघटना समाजवादी पक्षांची म्हणून ओळखली जात होती. परंतु वीज कामगारामध्ये कोणतेही राजकारण नको म्हणून संघटनेचे नाव बदलून 'नोकर संघ' ठेवण्यात आले. १९६३ मध्ये 'कामगार संघ' आणि १९६४ मध्ये काँग्रेस पक्षाची 'इंटक' ही कामगार संघटना स्थापन झाली. १९९० नंतर विविध राजकीय पक्षाच्या कामगार संघटना स्थापन झाल्या. सध्या महाराष्ट्र राज्य वीज मंडळात ५५ वीज कामगार संघटना आहेत.

## महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड वर्कर्स फेडरेशनची स्थापना:—

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड वर्कर्स फेडरेशन ही संघटना स्थापन होण्यापूर्वी 'नोकर संघ' आणि 'विद्युत कर्मचारी' या दोन कामगार संघटना होत्या. महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती नंतर वीज मंडळाचे विभाजन झाले. या काळात खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राची उभारणी झाली. त्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांमध्ये कायम

कामगारांपेक्षा रोजंदारी कामगाराची संख्या जास्त होती. या कामगारांना कामावरुन कमी करण्याचे धोरण स्वीकारले. या रोजंदारी कामगारांचा प्रश्न अमरावती, बाल्लरशा, नाशिक, कोल्हापूर, सांगली विभागात होता. रोजंदारी कामगारांच्या प्रश्नावर विदर्भातील 'विद्युत कर्मचारी' संघटनेने लढा सुरु केला. या आंदोलनामध्ये 'नोकर संघ' या संघटनेने सहभाग घेतला. रोजंदारी कामगारांच्या प्रश्नावर दोन्ही कामगार संघटनाचे सहकार्य झाले. या सहकार्याच्या भावनेतून दोन्ही संघटनानी कामगारांच्या प्रश्नावर एकत्र येण्याचे ठरविले. जुन १९६२ मध्ये खामगाव येथील टिळक स्मारक भवन येथे दोन्ही संघटनेच्या पदाधिकऱ्याची बैठक आयोजित केली. या बैठकीला नोकर संघाचे अध्यक्ष बा. न. राजहंस, ए. बी. बर्धन, मोहन शर्मा, जी. आर. ताबोळी, पी. बी. कुलकर्णी, राजन पिल्ले, एस. मुजुमदार, अे. एस. रायडू, वि. मा. जोगळेकर, मामा पेंडसे, गुलाबराव झरबडे, पी. एस. राजनकर, जी. एस. पाली इत्यादी नेतृत्व उपस्थित होते. या बैठकीमध्ये विचारविनिमय होऊन राज्य पातळीवर कार्य करण्याच्या उद्देशाने एक युनियन असावी म्हणून '' महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड वर्कर्स फेडरेशन '' संघटनेची स्थापना करण्यात आली. या फेडरेशनच्या अध्यक्षपदी बा. न. राजहंस यांची तर सरचिटणीसपदी ए. बी. बर्धन यांची निवड करण्यात आली. १९६२ मध्ये ए. बी. बर्धन यांच्या नेतृत्वाखाली खापरखेडा औष्णिक केंद्र येथे ''ऑल इंडिया फेडरेशन ऑफ इलेक्ट्रिसिटी एम्प्लाईज'' या संघटनेच दुसरे अधिवेशन आयोजित करुन संघटनेचे पुर्नजीवन केले.

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड वर्कर्स फेडरेशनच्या माध्यमातून दोन्ही संघटनाचे काम सरु झाले. १९६३ मध्ये महाराष्ट्र राज्य वीज मंडळ आणि वीज कामगार संघटनेला वीज कामगार यांच्या मध्ये पहिला पंचवार्षिक करार झाला. तेव्हा पासून दर पाच वर्षाने वीज मंडळ आणि वीज कामगार यांच्यामध्ये करार होतो. या करारामध्ये महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड वर्कर्स फेडरेशन संघटनेला वीज कामगारांची प्रतिनिधीक संघटना म्हणून पाच वर्षासाठी मान्यता देण्यात आली. कामगारांना महागाई भत्त्यात प्रथम वाढ करण्यात आली. कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी तक्रार निवारण समित्या स्थापन केल्या.

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड वर्कर्स फेडरेशन संघटनेच्या नेतृत्वाखाली कामगारांच्या मागण्यासाठी चळवळ सुरु झाली. १९६३ मध्ये वीज मंडळाने कामाचे स्वरुप लक्षात घेऊन कामगारांची संख्या ठरविण्यासाठी मुख्य अभियंता पी. टी. शेषण यांच्या अध्यक्षतेखाली ''नार्म्स कमिट'' नेमली. या समितीचा अहवाल कामगारांवर अन्याय करणारा होता. १९६३ मध्ये महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड वर्कर्स फेडरेशनचे अधिवेशन झाले. या अधिवेशनामध्ये संघटनेनी पर्यायी समिती नेमली. या समितीने कामगारांच्या मुलाखती घेऊन अहवाल वीज मंडळाला सादर केला.

## महाराष्ट्र राज्य वीज कामगार चळवळीतील दत्ता देशमुख यांचे नेतृत्व

१९५८ मध्ये दत्ता देशमुख यांनी बाम्बे विधानसभेमध्ये दोन भाषणे करुन बॉम्बे स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्डाचे अध्यक्ष हशम प्रेमाजी यांच्या कार्यकाळातील भ्रष्टाचार, वशिलेबाजीची चौकशी करण्याची मागणी केली. त्यानंतर सरकारने चौकशी समिती नेमली. यानंतर हशम प्रेमाजी यांना पदावरुन बडतर्फ करण्यात आले. या घटनेमुळे वीज कामगारांवर दत्ता देशमुख यांचा प्रभाव पडला होता. दत्ता देशमुख यांचे लाल निशाण पक्षांच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील संघटित करण्याचे काम सुरु होते. त्यामुळे कोल्हापूर, सातारा भागातील वीज कामगार कार्यकर्त्यांनी दत्ता देशमुख यांना नोकर संघाच्या अध्यक्षपदी आणण्याचे प्रयत्न सुरु केले तर काही कार्यकर्त्यांच्या मते, '' बा. न. राजहंस अध्यक्ष असावेत. त्यामुळे नोकर संघाच्या अध्यक्षपदासाठी वीज कामगारांमध्ये चर्चा सुरु झाली. १९६३ मध्ये नोकर संघातील जनसंघाला मानणाऱ्या कार्यकर्त्यांनी भारतीय मजदूर संघाशी संलग्न संघटना स्थापन केली होती. १९६४ मध्ये काँग्रेस प्रेणित इंटक सघटनेची स्थापना झाली. १९६४ मध्ये या पार्श्वभूमीवर नोकर संघाचे अधिवेशन पुणे येथील अहिताग्री राजवाडे यांच्या वाड्यात भरले होते. या अधिवेशनामध्ये दत्ता देशमुख यांच्या नावाला विरोध करण्यात आला. दत्ता देशमुख यांच्या नावाला विरोध असणाऱ्या कार्यकर्त्यांना समाजवादी नेते एस. एम. जोशी यांनी

लोकशाही निर्णय सर्वांनी मान्य करावा आणि संघटनेमध्ये फुट न पाडण्याचा सल्ला दिला. या पार्श्वभूमीवर दत्ता देशमुख यांच्याकडे नोकर संघाचे नेतृत्व आले. अधिवेशनामध्ये दत्ता देशमुख यांनी आपल्या भाषणात म्हटले की, '' ही कामगारांची संघटना आहेच साधारणपणे धंद्याची, कामगारांची, राज्याची आर्थिक, राजकीय, सामाजिक परिस्थिती पाहून मी सल्ला देण्याचे काम करीन. संघटनेतील कार्यकर्त्यांना माझे विचार योग्य वाटले तर माझा सल्ला मानून काम करावे की बाजूला ठेवावे हे कामगारांनी ठरवावे.'' या अधिवेशनानंतर दत्ता देशमुख यांच्या नेतृत्वाखाली संघटनात्मक कामास सुरुवात झाली.

## कॉ. दत्ता देशमुख यांच्या नेतृत्वाखालील लढे :—

दत्ता देशमुख नोकर संघाचे अध्यक्ष झाल्या नंतर कोल्हापूर, सांगली भागात नोकर संघाने दत्ता देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पी. बी. कुलकर्णी, राऊत, शाम केरकर, शाम कोरोचे, बी. आर. पाटील इत्यादी कार्यकर्त्यांनी सार्वत्रिक प्रश्नावर लढा सुरु केला. या भागामध्ये रोजंदारी कामगारांना कायम कामावर न घेता, वीज मंडळामध्ये वशिलाबाजीने कामगार भरती केली जात होती. रोजंदारी कामगारांना सेवा ज्येष्ठतेप्रमाणे कामावर घेण्यासाठी नोकरसंघाने लढा सुरु केला. वंसतदादा पाटिल यांनी दखल घेतली. त्यानी आप्पासाहेब बिरनाळे यांना मध्यस्थी करायला लावली. या लढ्यामुळे १०५ रोजंदारी कामगारांना सेवा ज्येष्ठतेप्रमाणे कायम केले गेले. दुसरा तांत्रिक कामगार व ड्रायव्हर यांच्या कामाचे कोणतेही तास ठरविलेले नव्हते. १६ तास कामगारांना काम करावे लागत होते. या कामगारांचे आंदोलन दोन महिने चालविले. या प्रश्नावर तडजोड होऊन आठ तास कामाचे ठरविले. वीज मंडळाने तांत्रिक कामगारांना ओव्हर टाईमभत्ता व ड्रायव्हर कामगारांना प्रत्यक्ष जास्त कामाचा ओव्हर टाईम देण्याचे तत्त्व मान्य केले. या दोन्ही निर्णयाची महाराष्ट्रामध्ये अंमलबजावणी झाली.

## १९६७ चा वीज कामगारांचा संपः—

कॉ. दत्ता देशमुख नोकर संघाचे अध्यक्ष झाल्यानंतर 'नोकर संघ' आणि 'विद्यतु कर्मचारी' संघ यांनी कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी स्थापन केलेल्या महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड वर्कर्स फेडरेशनचे अध्यक्ष झाले. १९६४ मध्ये कॉ. दत्ता देशमुख यांच्या नेतृत्वाखाली संघटनेने वीज मंडळाकडे वेतणश्रेणी व महागाई भत्त्यात सुधारणा करण्याची मागणी सुरु केली. या मागणीवर निर्णय होऊ शकला नाही. हा प्रश्न बा. एस. कालेलकर यांच्या लवादाकडे सोपविण्यात आला. या लवादासमोर विविध कामगार संघटनानी आपले निवेदन सादर केले. महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड वर्कर्स फेडरेशनने महागाईवर आधारित जगण्यासाठी लागणारे गरजेवर आधारित किमान वेतन १७९ रुपये असले पाहिजे असे प्रतिपादन केले. ११ नोव्हेंबर १९६६ रोजी कालेलकर लवादाने आपला निर्णय जाहिर केला. त्यांनी वेतन आणि महागाई भत्त्यापोटी ५—५ रुपयांने वाढ देण्याचा निर्णय दिला. त्यामुळे कामगारांच्या वेतनात वाढ होऊन १०५ रुपये झाले. कामगार संघटनानी किमान वेतनावर आधारित १७९ रुपये अपेक्षित होते. परंतु महाराष्ट्र सरकार आणि वीज मंडळाने लवादाच्या निर्णयामुळे आर्थिक वाढ देण्याचे नाकारले. लवादाचा निर्णय उभयमान्य पक्षकारांना मान्य करणे कायद्याने बंधनकारक असतो.

कॉ. दत्ता देशमुख यांनी लवादाच्या निर्णयावर विचार विनिमय करण्यासाठी महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड वर्कर्स फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांची बैठक बोलविली. या बैठकीला इतर वीज कामगार संघटनाच्या पदाधिकारी यांना निमंत्रित केले. या बैठकीला इंटकचे अध्यक्ष यशवंत पटवर्धन उपस्थित होते. कालेलकर लवादाचा निर्णय कामगारांवर कायद्याने बंधनकारक असला तरी कामगारांवर अन्यायकारक आहे. या बैठकीमध्ये लवादाच्या निर्णयाविरोधात भूमिका घेण्याचे ठरविले. महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड वर्कर्स फेडरेशन संघटनेने वीज मंडळाने कामगारांशी बोलणी केली नाही तर कामगार संपावर जातील असा इशारा दिला. त्याकडे वीजमंडळाने दुर्लक्ष केले. २ जानेवारी १९६७ रोजी वीज कामगारांच्या सर्व संघटनानी एक दिवसाचा संप केला.

त्यानंतर वीजमंडळाने कामगार संघटना बरोबर चर्चा केली. परंतु महाराष्ट्र सरकार आणि वीज मंडळाने लवादाचा निर्णय कायद्याने बंधनकारक असल्यामुळे त्यामध्ये बदल न करण्याची भूमिका घेतली.

वीज मंडळाच्या भूमिकेमुळे 'नोकर संघ', 'विद्युत कर्मचारी', या संघटनेचे वर्कर्स फेडरेशन, 'नाशिक देवळाली कामगार सभा', 'कोयना जलविद्युत कर्मचारी युनियन' या कामगार संघटनानी व्यापक संप समिती स्थापन केली. या समितीच्या अध्यक्षपदी कॉ. दत्ता देशमुख यांची निवड करण्यात आली. ६ फेब्रुवारी १९६७ रोजी संप समितीने महाराष्ट्र राज्य वीज मंडळाला संपाची नोटीस देऊन संप सुरु केला. या संपात 'इंटक', 'कामगार संघ'या संघटना सहभागी झाल्या नाहीत. मुंबई मध्ये कॉ. एस. के. डांगे यांच्या नेतृत्वाखाली वीज कामगारांना संपात सहाय्य करण्यासाठी विविध क्षेत्रांतील कामगार संघटनानी 'संयुक्त कृती' समितीची स्थापना केली. या कृति समितीने संपात सहभाग घेऊन वीज कामगारांना आर्थिक मदत केली. कॉ. दत्ता देशमुख यांनी महाराष्ट्रामध्ये दौरे काढून वीज कामगारांचे संघटन केले. संप सुरु असताना लोकसभेच्या निवडणुका सुरु असल्यामुळे कॉंग्रेस पक्षाने वीज कामगारांच्या संपाला विरोधी पक्ष जबाबदार असल्याचा प्रचार केला. या निवडणुकीत महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड वर्कर्स फेडरेशन संघटनेचे सरचिटणीस कॉ. ए. बी. बर्धन उभे होते. त्यांचा या निवडणुकीत पराभव झाला. कॉंग्रेस सरकारने संपाबाबत ताठर भूमिका घेतली. वीज कामगार कार्यकर्त्यांवर आरोपपत्र ठेवून अटक करण्यात आली. ४३ दिवस संप लांबल्यामुळे कामगारांवर उपासमारीची वेळ आली. काही ठिकाणी कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांकडून धान्य गोळा करुन वीज कामगारांना वाटले. या परिस्थितीमध्ये संप चालू होता. संपामधून कोणताही मार्ग निघत नव्हता. १९ मार्च १९६७ रोजी मुंबई मध्ये संपात सहभागी असलेल्या वीज कामगार संघटनाच्या प्रतिनिधीची बैठक बोलविण्यात आली. या बैठकीमध्ये ४३ दिवस चालू असलेला संप एकतर्फी मागे घेण्याचे ठरविले. संप समितीच्या पदाधिकऱ्यांनी कामगारांच्या एकजूटीने कामकाज पुढे चालविण्यासाठी संप

समितीचे रुपांतर 'एकत्रिकरण समितीत' केले. या एकत्रिकरण समितीचे निमंत्रक म्हणून कॉ. दत्ता देशमुख यांची नियुक्ती केली. (लाल निशाण, ७ ऑक्टो १९६८)

४३ दिवस चालू असलेल्या वीज कामगारांचा संप मागे घेतल्यास निर्णय कामगार मंत्री नरेंद्र तिडके यांना कळविण्यात आले. त्यांनी संपावरील कामगारांना सन्मानाने कामावर घेतले जाईल असे आश्वासन मुख्यमंत्र्याच्या वतीने दिले. परंतु वीजमंडळाने आश्वासन पाळले नाही. संपात सहभागी कामगारांची खाते निहाय चौकशी सुरु केली. कामगारांवरील पोलिस केस मागे घेतल्या नाहीत. कामगारांच्या बदल्या केल्या. काही कामगारांना बडतर्फ केले गेले. महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड वर्कर्स फेडरेशनेची संघटनेची मान्यता काढून घेण्यात आली. त्या विरोधात वर्कर्स फेडरेशनेने कामगारांच्या केसेस कामगार न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढवूण कामगारांना कामावर घेण्यास भाग पाडले. संघटनेच्या कामासाठी शाम केरकर यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. शाम केरकर, शाम कोरोचे, जी. आर. ताबोळी, मोहन शर्मा, पी. बी. कुलकर्णी, राजन पिल्ले, एस.मुजुमदार, अे. एस. रायडू, वि. मा. जोगळेकर, मामा पेंडसे, गुलाबराव झरबडे, पी. एस. राजनकर, जी. एस. पाली, राऊत, व्ही. जी. आहेरकर इत्यादी कार्यकर्त्यांनी कोकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भातील कामगारांचे स्थानिक पातळीवर कामगारांचे लढे संघटित केले. महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड वर्कर्स फेडरेशनने वीज कामगारांना संघटित करण्यासाठी आणि कामगारांमध्ये जाणीव जागृती निर्माण होण्यासाठी शाम केरकर यांनी 'वीज कामगार' आणि मोहन शर्मा यांनी 'विद्युत कर्मचारी' ही मासिक चालू केली. संघटनेची ही मुखपत्र आहेत. वीज कामगारांचा संप एकतर्फी मागे घेतल्यानंतर संपाच्या अपयशावर 'लाल निशाण' पक्षाच्या 'लाल निशाण' या मुखपत्रांत चर्चा झालेली आहे. संपाचे नेतृत्व दत्ता देशमुखांनी केले होते.

**सारांशरूपाने** असे दिसून येते की, अहमदनगर जिल्ह्यात स्वातंत्र्यपुर्व काळापासून सामाजिक चळवळीची पार्श्वभूमी राहिलेली आहे. सामाजिक चळवळी, कामगार चळवळ, कामगारांचे हक्क, कामगारांचे लढे या माध्यमातून नेतृत्वाची एक फळी उभा राहिलेली दिसून येते. अहमदनगर जिल्ह्यात राजकीय आणि आर्थिक विकासात सामाजिक चळवळीच्या नेतृत्वाचे एक महत्त्वपूर्ण योगदान राहिलेले आहे. १९९० पर्यंत सामाजिक आणि डाव्या विचारांच्या चळवळीला चांगल्या प्रकारे यश आलेले होते. निवडणुकीच्या राजकारणात यश आले नाही. मात्र हे अपयश चळवळीच्या अंतर्गत असलेल्या नेतृत्वाच्या उणीवामधून आलेले आहे. सामाजिक आणि आर्थिक चळवळीच्या नेतृत्वामध्ये विडी कामगार चळवळी ही सर्वात मोठी चळवळ होती. या चळवळीने अहमदनगर जिल्ह्याला सामाजिक आणि वैचारिक पाया असणारे नेतृत्व दिलेले आहे. त्यात कॉ. रामभाऊ नागरे, साथी भास्करराव दुर्वे, कॉ. दत्ता देशमुख हे नेतृत्व केंद्रस्थानी होते. विडी कामगार चळवळीच्या नेतृत्वाने संप, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, घेरावा, सत्याग्रह, जेलभरो, सभा, परिषदा, मेळावे इत्यादी साधनाचा लोकशाही मार्गाचा अंवलब करुन अनेक कामगार कायदे लागू करुन घेतले आहेत. प्रत्यक्षात रणनितीच्या आधारे नेतृत्व विकसित झालेले दिसून येते. कोणत्याही प्रकारे नेतृत्वाची पार्श्वभूमी नसताना या चळवळीच्या माध्यमातून नेतृत्व पुढे आले. अहमदनगर जिल्ह्यात संपुर्ण डाव्या विचारांच्या पक्ष आणि चळवळीचे नेतृत्व होते. त्यात पाथर्डी, पारनेर, अहमदनगर, या तालुक्यातून तर राज्य पातळीवर नेतृत्व करणारे नेतृत्व पुढे आलेले दिसून येते. एक प्रकारे अहमदनगर जिल्ह्याला पायाभूत कार्यातुन पुढे येणार नेतृत्व या सामाजिक आणि आर्थिक चळवळीने दिलेले आहे. सर्वसामान्याचे हित लक्षात घेत आर्थिक आणि सामाजिक आधारावर विकास घडवून आणण्यात या नेतृत्वाने मोलाचे योगदान दिलेले आहे.

# प्रकरण – ८

# अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामीण राजकारण आणि राजकीय नेतृत्व

१९५१ साली निवडणुकांची पंचवार्षिक योजना आपल्या देशामध्ये प्रथमत: सुरू झाली. तर ऑक्टोबर १९५९ मध्ये पंचायत राज ही पध्द्त प्रथमत: सुरू झाली. नंतर तत्कालीन महसुल मंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. १९६१ साली या समितीच्या शिफारशीच्या आधाराने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती नावाचा कायदा अस्तित्वात आला. १ मे १९६२ पासून जिल्हा परिषद अस्तित्वात आली. ही यंत्रणा स्थानिक स्वराज्य संस्थाच्या तिन्ही बाबीमध्ये महत्त्वपुर्ण यंत्रणा आहे.

स्थापना – गुजरातचे माजी मुख्यमंत्री वसंतराव मेहता यांच्या अध्यक्षतेखाली १९५७ साली एक समिती नेमण्यात आली. १९५९ साली या समितीविषयी १० शिफारशीसह एक अहवाल दिला. त्यामध्ये एक महत्त्वाची शिफारस अशी होती की, स्थानिक स्वराज संस्थची त्रिस्तरीय यंत्रणा असावी. त्यामुळे जिल्हा परिषद, पचायत समिती व ग्रामपंचायत असे तीन स्तर असतील असा अहवाल देण्यात आला होता. त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थेची निर्मिती करण्यात आली आहे. त्यात ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद अशी तीन स्तरावर राजकीय संस्था निर्मिती करण्यात आली आहे.

## मुख्य कामे :

विहिरी दुरूस्त करणे, विहिरी खोदणे, पाण्याची सुविधा उपलब्ध करून देणे, पंप बसविणे. ज्यांचे उत्पन्न ११००० रू. पेक्षा कमी आहे अशा कुटुंबाची नोंद दारिद्रयरेषेखालील कुटुंब म्हणून केली जाते अशा कुटुंबाना विविध योजनांचे फायदे मिळू शकतात. त्यांच्या नावे विविध अनुदाने उपलब्ध करून देणे. इ. कामे जिल्हा परिषद

करते. त्याचप्रमाणे जिल्हा परिषद युवकांसाठी विविध कामे करते. त्यामध्ये बँकेकडून कर्ज उपलब्ध करून देणे, महिलांना उद्योग सुरू करण्यासाठी मदत करणे, कुक्कुटपालन, शिवणकाम, म्हशीपालन, मिरची कांडप, लोणची, पापड, खडू, बांबूपासून वेत तयार करणे. इ. कामे जिल्हा परिषद करते. पुरूषांना स्वंयरोजगार मिळावा म्हणून आर्थिक सहाय्य केले जाते. हातगाडया, शिलाई यंत्रेही पुरविली जातात. सावित्रीबाई पेढी योजना, पुस्तक पेढी योजना, पोषक आहार योजना, गणवेश व पाठ्यपुस्तकांची मोफत पुरवठा योजना, आदिवासी मुला मुलींसाठी उपस्थिती भत्ता योजना इ. योजनांची कार्यवाही जिल्हा परिषदेच्या माध्यमातून केली जाते. (जिल्हा परिषद दस्तऐवज, २०११ )

## अहमदनगर जिल्हा परिषद व पंचायत समिती रचना :

राज्य निवडणूक आयोगानुसार जास्तीत जास्त ७५ व कमीत कमी ५० असे प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडुन आलेले सभासद असतात. जिल्ह्याच्या वेगवेगळया मतदारासंघामधून हे सभासद निवडून येतात. निवडणूक झाल्यानंतर निवडून आलेल्या सदस्यांची नावे व पत्ते राज्य शासनाच्या परिपत्रकातुन प्रसिद्ध केले जातात. अशा रीतीने जिल्हा परिषदेची रीतसर स्थापना होते. मुख्य कार्यकारी अधिकारी हा जिल्हा परिषदेचा प्रशासकीय अधिकारी असतो.

जिल्हा परिषदेवर निवडून आलेला सभासद ५ वर्षे सदस्य म्हणून काम पाहतो. जिल्हा परिषदेची पहिली सभा जिल्हाधिकारी बोलवितात. नव्याने निवडून आलेल्या सभासदांमधून नवीन अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडले जातात. जोपर्यंत पहिली सभा होत नाही तोपर्यंत जुने सभासद जिल्हा परिषदेच्या कामात भाग घेऊ शकतात. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना सुरूवातीच्या काळात भत्ता अथवा मानधन मिळत नव्हते. नंतर शासनाने अध्यक्षांना भाडे न देता सुसज्ज निवासाची सोय पुरवावी असे आदेश दिले. शासनाकडून विहित करण्यात आलेला प्रवास भत्ता व इतर भत्ते देण्यात येतात. दरमहा मानधन देण्यात येतात. याशिवाय त्यांना वार्षिक अतिथ्य भत्ता मंजुर करून दिला जातो.

सध्या महाराष्ट्र शासनाने सर्व जिल्हा परिषद अध्यक्षांना राज्यमंत्राचा दर्जा बहाल केला आहे. त्यांना लाल दिव्याची गाडी दिली आहे. पूर्वी जिल्हा परिषद अध्यक्षांची मुदत ५ वर्षे होती. नंतर ती १ वर्षावर आणण्यात आली. पुन्हा नव्या धोरणाने अडीच वर्षे करण्यात आली. राज्यमंत्र्याचा दर्जा देण्यात आल्याने या पदाला महत्त्व आणि समाजात प्रतिष्ठा निर्माण झालेली आहे. त्यामुळे हे पद मिळवण्यासाठी जिल्हा परिषदेचे सदस्य प्रयत्नशील असतात.

जिल्हा परिषद उपाध्यक्षांना वार्षिक मानधन मिळते. इतर सवलती अध्यक्षांप्रमाणेच मिळतात. मात्र उपाध्यक्षांना राज्यमंत्राचा दर्जा नाही. लाल दिव्याची गाडी दिली जात नाही. जिल्हा परिषद अध्यक्ष व उपध्यांक्षाची निवड झाल्यानंतर विविध विषय समित्यांच्या सभापती पदासाठी उपजिल्हाधिकारी सर्व सभासदाची बैठक एक महिण्याच्या आत बोलवितात. (संपा : लोकसत्ता, डिसेबंर २००७, पृ. १) विषय समित्याचे सभापती हे त्या समित्याचे अध्यक्ष असतात व त्या त्या खात्यांचे मुख्याधिकारी सचिव असतात. राज्य शासनाच्या नियमाप्रमाणे जिल्हा परिषदमध्ये संबंधित समित्यांचे कामकाज चालते. जिल्हा परिषदेमध्ये असणाऱ्या समित्या पुढीलप्रमाणे १) स्थायी समिती २) अर्थ ३) शिक्षण ४) बांधकाम ५) कृषि ६) पशुसंवर्धन व दुग्धालय ७) समाजकल्याण ८) महिला बालकल्याण ९) आरोग्य १०) जलसंधारण व पिण्याचा पाणी पुरवठा इ. समित्या असतात. प्रत्येक जिल्हा परिषद मतदारसंघामधून पंचायत समितीचे दोन सभासद निवडले जातात. पंचायत समितीचे मतदारसंघामधून जिल्हा परिषदेसारखेच सदस्य निवडले जातात. उपजिल्हाधिकारी सर्व पंचायत समित्यांच्या बैठका घेतात. निवडलेल्या पंचायत समिती सभासदामधून सभापती व उपसभापती यांची निवड होते. पंचायत समितीचे सभापती हा जिल्हा परिषदचा पदसिद्ध सभासद असतो. (जिल्हा परिषदेचा कच्चा दस्ताऐवज, २००९)

पंचायत राज व्यवस्थेचे ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद ही तीन महत्त्वाची अंगे आहेत. ग्रामपंचायत ही गावपातळीवर शासनाच्या योजना राबविते,

पंचायत समिती तालुका पातळीवर व जिल्हा परिषद जिल्हा पातळीवर शासकीय योजना राबविते. पंचायत समिती हा जिल्हा व गाव पातळीमधील दुवा मानला जातो. पंचायत समिती सभापतींना मानधान मिळते. पिण्याचे पाणी योजना, आरोग्य, रस्ते, वीज अशा विविध विषयांच्या योजनेसंबधी जिल्हापरिषेदेत चर्चा होते. जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा झाल्यानंतर संबंधित विषयाचे ठराव मंजूर होतात. त्यानंतर ते ठराव कार्यवाहीसाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे पाठविले जातात.

राज्य शासनातर्फे जिल्हा परिषदच्या प्रशासनाचा कारभार पाहण्यासाठी एका मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची नेमणूक होते. तो जिल्हा परिषदेकडील फंडाचा उपयोग योग्य कामाच्या विनियोगासाठी करतो. त्याची अंमलबजावणी करतो. कर्मचाऱ्यांच्या कामकाजावर लक्ष ठेवणे, जिल्हा परिषदेच्या कामकाजाकडे लक्ष देणे, ग्रामपंचायतीच्या कामकाजाची तपासणी करणे व शासनाला जिल्हा परिषदेच्या कामाचा अहवाल सादर करणे ही कामे मुख्य कार्यकारी अधिकारी करतो.

जिल्हा परिषदेकडून आश्वासित रोजगाराची कामे, इंदिरा आवास योजना, जीवनधारा, म्हणजे विहिरी खोदण्याचा कार्यक्रम हे उपक्रम राबविले जातात. ग्रामीण भागातील कित्येक तरूण रोजगारासाठी शहराकडे वळताना दिसतात. शहरांकडे युवकांनी जाऊ नये म्हणून वरील कार्यक्रम राबविले जातात. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील युवकांना प्रशिक्षण देऊन तांत्रिक माहिती दिली जाते. शेती व शेतीसंबंधित माहितीचे धंदे, उद्योग आणि व्यवसाय यामध्ये युवकांना रोजगार सुरू करून स्वावलंबी करण्यासाठी प्रयत्न केला जातो. स्वयंरोजगारासाठी ग्रामीण युवकांना बँकेकडून कर्ज उपलब्ध करून दिले जाते. (जिल्हा परिषद माहिती पत्रक – दस्ताऐवज, २०११)

मागासवर्गीय विद्यार्थांना फी ची सवलत दिली जाते. ग्रामीण भागात ३ ते ५ वयोगटामध्ये बालवाडी योजना सुरू केली जाते. आंतरजातीय विवाहास प्रोत्साहान दिले जाते.

दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी राज्यशासनाने खालील योजना सांगितल्या आहेत. १) सावित्रीबाई फुले दत्तक योजना २) पुस्तक पेढी योजना ३) पोषण आहार योजना ४) गणवेश व पाठयपुस्तकांचा मोफत पाठपुरावा योजना ५) आदिवासी मुलांसाठी उपस्थित भत्ता योजना जिल्हा परिषदेच्या माध्यमातून समाजकल्याण खाते समाजातील दीनदुबळ्यासाठी काम करीत असते. मागासवर्गीय शेतकऱ्यांठी ऑईल रेमिन वीज पंप, शेतीची अवजारे इ. खरेदीसाठी अर्थसहाय्य पुरविले जाते. दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुंटुबातील व्यक्तींना खालील योजनांचा लाभ घेता येतो. १) घर दुरूस्तीसाठी अनुदान २) आपत्तीग्रस्तांना अर्थसहाय्य ३) वसतिगृहांना सहाय्य अनुदान ४) माताबाल संगोपन अनुदान कार्यक्रम ५) लसटोचणी कार्यक्रम ६) हिवताप निर्मूलन ७) कुटुंब कल्याण कार्यक्रम इ. कामे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून केली जातात. शेळ्यांचे वाटप केले जाते. दूध साठविण्यासठी कॅन्स पुरवितात. दूध तपासण्याचे साहित्य पुरविले जाते. दुभत्या जनावरांचे वाटप केले जाते. (जिल्हा परिषद माहिती पत्रक, २००९)

अहमदनगर जिल्ह्यातील जिल्हा परिषद सदस्यसंख्या ही सुरूवातीपासून एकच राहिलेली नाही. ती लोकसंख्येच्या आणि आरक्षणाच्या फेररचनेनुसार बदललेली आहे. अहमदनगर जिल्हा परिषदेमध्ये एकूण ७४ सदस्य आहेत. दोन पंचायत समित्यांचे मतदारसंघ मिळून एक जिल्हा परिषदचा एक मतदारसंघ असतो.

पंचायत समिती सभापतींना ३००० रू मानधन व उपसभापतींना १००० रू मानधन मिळते. पंचायत समितीचे पूर्ण जिल्हाभर जिल्हा परिषद मतदारसंघाच्या दुप्पट म्हणजे १२० जागा असतात. सभापती व उपसभापती यांचा कार्यकाल ५ वर्ष असतो. (जिल्हा परिषद माहिती पुस्तिका –२००७)

## जिल्हा परिषदेचे नेतृत्व

१९६२ ते २०१० या काळाचा विचार करता असे दिसून येते की, एकूण १८ व्यक्तींनी नेतृत्व केलेले आहे. त्यात १९९९ पर्यंत मुख्यत: काँग्रेस या पक्षाचे

नेतृत्व राहिलेले आहे. १९९९ नंतर काँग्रेस पक्षाच्या विभाजनातून राष्ट्रवादी पक्ष पुढे आल्यानंतर जिल्हा परिषदेचे नेतृत्व हे राष्ट्रवादीकडे गेले. मात्र २००७ साली पुन्हा काँग्रेसकडे नेतृत्व आले. जिल्हा परिषदेच्या राजकारणाचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, १९९० नंतर राजकीय स्पर्धेत शिवसेना – भाजप आघाडी आली. मात्र स्थानिक राजकारणात स्थान मिळवता आले नाही. परिणामी काँग्रेस पक्ष ज्या प्रकारे स्थानिक राजकारणात मुळे सोडलेली आहेत. ती मुळे तोडण्यात विरोधी पक्षांच्या नेतृत्वाला अपयश आलेले आहे. १९९९ नंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने काँग्रेस पक्षाला जोरदारपणे आव्हान तयार केलेले दिसून येते. १९९९ ते २००७ असे आठ वर्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाला जिल्हा परिषदेवर नेतृत्व करता आले. स्थानिक राजकारणात राष्ट्रवादीचे नेतृत्व वाढत आहे असे दिसून येत असताना काँग्रेस पक्षाने पुन्हा एकदा चांगल्या प्रकारे पाठिंबा मिळवत राष्ट्रवादीकडून सत्ता हस्तगत केली. त्यामुळे १९९९ नंतर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या नेतृत्वामध्ये जिल्हा परिषदेचे नेतृत्व राहिलेले दिसून येते.

## जिल्हा परिषदेच्या नेतृत्वात आलेली घराणेशाही

जिल्हा परिषदेच्या राजकारणातील नेतृत्वाला घराणेशाहीचा मोठे अंग असताना दिसून येते. अहमदनगर जिल्ह्याचे राजकारण हे काही मोजक्याच घराण्याभोवती फिरताना दिसून येते. त्यात कोपरगाव मतदारसंघातून काळे घराणे, शिर्डी–राहता मतदारसंघातून विखे पाटील घराणे, नेवासा – उत्तर अहमदनगर मतदारसंघातून गडाख घराणे, पाथर्डी मतदारसंघातून राजळे घराणे, शेवगाव मतदारसंघातून घुले घराणे ही घराणे आपआपल्या मतदारसंघात प्रभावी आहेत. जिल्हा परिषदेला मिळालेले नेतृत्व देखील या घराण्यातून आलेले दिसून येते. त्यात काळे, राजळे, विखे, कडू, घुले ही घराणे पुढे आलेले आहेत. जिल्हा परिषदेला नेतृत्व केल्यानंतर मतदारसंघाच्या माध्यमातून नेतृत्व करण्याची संधी कोणकोणत्या नेतृत्वाला मिळालेली आहे हे पाहिले असता असे दिसून येते की, शंकरराव काळे, यशवंतराव गडाख,

आप्पासाहेब राजळे, अरूण कडू, नरेंद्र घुले हे नेतृत्व जिल्हा परिषदेचे नेतृत्व करत पुढे आलेले आहे. जिल्हा परिषदेला नेतृत्व केलेल्या नेतृत्वाला राजकीय घराण्याच्या आशिर्वादाने संधी मिळालेली आहे. स्वतंत्ररित्या कोणतेच नेतृत्व जिल्हा परिषदेत पुढे आलेले आहे असे दिसून येत नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेचे नेतृत्व हे राजकीय घराण्याच्या माध्यमातून प्रभावाखाली राहिलेले आहे. दुसरे असे की, मतदारसंघात एखाद्या नेतृत्वाला विधानसभा निवडणुकीला संधी दिली गेली नाही. परिणामी नेतृत्व नाराज होते. त्या नेतृत्वाला जिल्हा परिषदेचे नेतृत्व करण्याची संधी देत ती नाराजी दूर करण्याचे प्रयत्न सातत्याने राहिलेले आहे.

## जाती आणि जिल्हा परिषदेचे नेतृत्व

जिल्हा परिषदेच्या नेतृत्वाच्या जातींचा विचार करता असे दिसून येते की, १९९८ – १९९९ या दोन वर्षाचा कालावधी वगळता जिल्हा परिषदेवर पुर्णपणे मराठा समाजाच्या नेतृत्वाचे वर्चस्व राहिलेले आहे. १९९८ – ९९ साली महादेव काळी समाजाचे अशोक भांगरे यांना संधी देण्यात आली होती. ही संधी मधुकरराव पिचड यांच्या माध्यमातून देण्यात आली होती. अहमदनगर जिल्हा परिषदेच्या राजकारणात गटबाजीचा फटका हा मराठेतर नेतृत्वाला संधी न मिळण्यात बसलेला आहे. कारण मतदारसंघात काँग्रेसतंर्गत असलेल्या गटबाजीमुळे जिल्हा परिषदेच्या नेतृत्व काही काळासाठी प्रत्येक घराण्याकडे देण्यात येत होते. त्यामुळे ज्या घराण्याकडे नेतृत्व करण्यासाठीची संधी जात होती. त्या घराण्याकडून सातत्याने मराठा समाजाच्या नेतृत्वाला संधी देण्याचे प्रयत्न झाले होते. तसेच १९९८ साली काँग्रेस आदिवासी नेतृत्व मधुकर पिचड घराण्याकडे ही संधी आली असता त्यांनी महादेव कोळी या आदिवासी व्यक्तीला नेतृत्व करण्याची संधी दिली होती.

जिल्हा परिषदेच्या राजकारणासंदर्भातील नेतृत्वाच्या बाबतीत असे दिसून येते की, ज्या प्रकारे नेतृत्व हे १९६२ ते १९९८ या काळात काँग्रेस व १९९९ ते २००७ या काळात राष्ट्रवादी या प्रस्थापित पक्षाच्या नेतृत्वाकडे राहिले. त्याचप्रमाणे मराठा

समाजाकडे राहिलेले आहे. जिल्हा परिषदेच्या नेतृत्वामध्ये जातीय नेतृत्वाचा जो समतोल असायला हवा होता तो राहिलेला दिसून येत नाही. दुसरे असे की, आदिवासी, ओबीसी आणि दलित नेतृत्व जिल्हा परिषदेच्या नेतृत्वाच्या बाबत वंचीत राहिलेले आहेत. त्यामुळे अहमदनगर जिल्हा परिषदेचे नेतृत्व हे पुर्णपणे मराठा केंद्रीत असल्याचे दिसून येते. इतर नेतृत्वाची कोंडी झालेली आहे. ही अहमदनगर जिल्हा राजकीय नेतृत्वाची विकासाची एक मर्यादा आहे. (पहा तक्ता क्र. ८.१)

**तक्ता क्र. ८.१**

**१९६२ ते २०१० या काळात जिल्हा परिषदेत नेतृत्व रूपाने राहिलेले अध्यक्ष**

| अ. क्र | नेतृत्वाचे नाव | पासून | पर्यत | राजकीय पक्ष | जात |
|---|---|---|---|---|---|
| १ | शंकरराव काळे | १२.०८.१९६२ | ११.०८.१९६७ | कॉंग्रेस | मराठा |
| २ | शंकरराव काळे | १२.०८.१९६७ | ११.०८.१९७२ | कॉंग्रेस | मराठा |
| ३ | रामनाथ वाघ | १२.०८.१९७२ | १९.०६.१९७९ | कॉंग्रेस | मराठा |
| ४ | यशंवतराव गडाख | २०.०६.१९७९ | २६.११.१९८४ | कॉंग्रेस | मराठा |
| ५ | ज्ञानदेव कसार | २७.११.१९८४ | २८.०४.१९८५ | कॉंग्रेस | मराठा |
| ६ | आपासाहेब राजळे | २९.०४.१९८५ | १८.०३.१९९० | कॉंग्रेस | मराठा |
| ७ | ज्ञानदेव कसार | १९.०३.१९९० | ११.०४.१९९० | कॉंग्रेस | मराठा |
| ८ | बाबासाहेब पवार | १२.०४.१९९० | ३०.०६.१९९० | कॉंग्रेस | मराठा |
| १० | अरूण कडू | २१.०३.१९९२ | २०.०३.१९९७ | कॉंग्रेस | मराठा |
| ११ | विमल ढेरे | २१.०३.१९९७ | २०.०३.१९९८ | कॉंग्रेस | मराठा |
| १२ | अशोक भांगरे | २१.०३.१९९८ | २०.०३.१९९९ | कॉंग्रेस | म. कोळी |
| १३ | नरेंद्र घुले | २१.०३.१९९९ | १६.०८.१९९९ | राष्ट्रवादी | मराठा |
| १४ | बाबासाहेब भोस | १७.०८.१९९९ | २८.१०.१९९९ | राष्ट्रवादी | मराठा |
| १५ | बाबासाहेब भोस | २९.१०.१९९९ | २०.०३.२००२ | राष्ट्रवादी | मराठा |
| १६ | दादा शेलार | २१.०३.२००२ | १७.०२.२००५ | राष्ट्रवादी | मराठा |
| १७ | बाबासाहेब भिटे | १८.०२.२००५ | २०.०३.२००७ | राष्ट्रवादी | मराठा |
| १८ | शालिनीताई विखे | २१.०३.२००७ | २०.०३.२०१२ | कॉंग्रेस | मराठा |

आधार: निवडणूक आयोगाचा अहवाल आणि विविध कार्यकर्ते आणि राजकीय नेतृत्वाच्या मुलाखती

## १९९२ ची जिल्हापरिषद निवडणूक आणि नेतृत्व

अहमदनगर जिल्हा व क्षेत्रफळाचा विचार करता राज्यातील सर्वात मोठा जिल्हा आहे. अहमदनगर जिल्ह्यामध्ये १ जिल्हापरिषद, १४ पंचायत समित्या तर १३०८ ग्रामपंचायती आहेत. अहमदनगर जिल्हापरिषदेची निवडणूक मार्च १९९२ मध्ये झाली. १९९२च्या निवडणुकीत एकूण ६२ सदस्य निवडून आले होते. जिल्हापरिषदेत एकूण ८ प्रवर्गानुसार सदस्य मतदारसंघातून निवडून आले होते. (पहा तक्ता क्र. ८.२) खुला पुरूष गटांतून ३२ सदस्य निवडून आले होते. खुला गटाकडून १४ महिला सदस्या निवडून आल्या होत्या. ओबीसी पुरूष ०२, ओबीसी महिला ०५, सदस्य निवडून आले होते. अनुसूचित जाती पुरूष गटांतून ०४, महिला ०२ सदस्य निवडून आले होते. अनुसूचित जमाती गटांतून पुरूष ०२, महिला ०१ सदस्य निवडून आले होते. अनुसूचित जमातींची लोकसंख्या अकोले या तालुक्यात सर्वाधिक आहे. ज्या मतदारसंघात मागास जातींचे (ओबीसी)चे प्रमाण जास्त आहे त्या तालुक्यातून जिल्हा मागास जातीतील स्थानिक नेतृत्व मोठ्या प्रमाणावर निवडून येत असताना दिसून येते. अहमदनगर जिल्ह्यात असे दिसून येत की, दुष्काळी आणि बिगर बागायती परिसरात ओबीसी समाजाचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे त्या परिसरातील ओबीसी नेतृत्व पुढे आलेले दिसून येते. तर अनुसूचित जाती आणि जमातीला राखीव जागा असल्याने त्या जागेवरून त्या समाजाचे नेतृत्व पुढे आलेले दिसून येते. (पहा तक्ता क्र. ८.२)

१९९२ साली झालेली जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत असे दिसून आले की, या निवडणुकीत ओबीसी समाजासाठी राखीव जागेचे राजकीय आरक्षण लागू नसल्याने खुल्या जागेवर मोठ्या प्रमाणावर मराठा समाजाचे उमेदवार निवडून आले. ओबीसी महिला आणि पुरूष या सामाजिक वर्गवारीतून केवळ ७ उमेदवार निवडून आलेले दिसून येते.

एक प्रकारे असे दिसून येते की, स्थानिक राजकारणात स्थानिक पातळीवरील राजकीय नेतृत्व घडण्याची प्रक्रिया जास्त प्रमाणावर घडून येत आहे. दुसरे असे की,

विधानसभा व तालुका पातळीवरील नेतृत्वाला स्थानिक पातळीवरील नेतृत्वावर अंवलबून राहण्याचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे राजकारणात अंवलबून राहणे आणि आश्रीत होत जाणे हे प्रमाण वाढलेले आहे. राजकीय छोट्या नेतृत्वाला मोठ्या नेतृत्वाच्या आश्रीत राहण्याचे प्रमाण वाढण्याने आश्रीत राजकारण होत असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र. ८.२**

**अहमदनगर जिल्हा परिषद मतदारसंघ स्वरूपानुसार वर्गीकरण : (१९९२)**

| **अ.क्र** | **प्रवर्ग** | **सदस्य संख्या** |
|---|---|---|
| १ | खुला पुरूष | ३२ |
| २ | खुला महिला | १४ |
| ३ | ओबीसी पुरूष | ०२ |
| ४ | ओबीसी महिला | ०५ |
| ५ | अ.जाती पुरूष | ०४ |
| ६ | अ.जाती महिला | ०२ |
| ७ | अ.जमाती पुरूष | ०२ |
| ८ | अ.जमाती महिला | ०१ |
| ९ | **एकूण** | **६२** |

आधार : निवडणूक आयोगाचा अहवाल १९९२

## निवडणूक निकाल :

अहमदनगर जिल्हापरिषदेच्या १९९२च्या निवडणुकीत जनतादल, शिवसेना, भाजप, भारतीय कम्युनिस्ट व अपक्ष अशा पाच गटांमध्ये निवडणुका झाल्या. पक्ष पातळीवर जनतादल, शिवसेना, भाजप, भारतीय कम्युनिस्ट व कॉंग्रेस या पक्षांनी पक्ष चिन्हावरती निवडणुका लढविल्या. अपक्ष कॉंग्रेस पक्षांशी संबंधित होते. (पहा तक्ता क्र. ८. ३)

अहमदनगर जिल्हापरिषदेत १९९२ च्या निवडणुकीत शिवसेना, भाजप, जनता दल, भारतीय कम्युनिस्ट पक्ष या राजकीय पक्षांचे प्रतिनिधी निवडून आले. सर्वात अधिक कॉंग्रेस पक्षाचे ४८ (२९.७६ टक्के) सदस्य निवडून आले होते. महाराष्ट्रातील राजकारणात कॉंग्रेस पक्षाचे स्थान मध्यवर्ती होते. हे स्थान केवळ निवडणुकीच्या यशापुरतेच मर्यादित नव्हते. निवडणुकीच्या राजकारणाबरोबरच महाराष्ट्रातील आर्थिक, संस्थात्मक रचना, सामाजिक समीकरणे आणि सांस्कृतिक–वैचारिक–राजकारणावरही एक राज्यकर्ता पक्ष म्हणून आपली पकड निर्माण करण्यात लक्षणीय यश मिळविले होते. जनतादल या राजकीय पक्षाचे ०२ (१.२४ टक्के) तर शिवसेना ०२ (१.२४ टक्के) सदस्य निवडून आले होते. भाजप ०१ (०.६२ टक्के) भारतीय कम्युनिस्ट पक्ष ०१ (०. ६२ टक्के) सदस्य तर अपक्ष ०८ (४.९६ टक्के) सदस्य निवडून आले होते. भाजप–शिवसेना यांना ग्रामीण राजकारणात फारसे यश मिळविता आले नाही. सामाजिक, आर्थिक आधार या पक्षांना कमी आहे.

**तक्ता क्र. ८.३**

**जिल्हा परिषद सदस्यांचे राजकीय पक्षनिहाय वर्गीकरण : (१९९२)**

| **अ.क्र** | **राजकीय पक्ष** | **सदस्य संख्या** |
|---|---|---|
| १ | कॉंग्रेस | ४८ |
| २ | जनता दल | ०२ |
| ३ | शिवसेना | ०२ |
| ४ | भाजप | ०१ |
| ५ | भारतीय कम्युनिस्ट | ०१ |
| ६ | अपक्ष | ०८ |
| **७** | **एकूण** | **६२** |

आधार : निवडणूक आयोगाचा अहवाल १९९२

## १९९२ च्या निवडणुकीतील नेतृत्वाचा जातीगट :

जात व उमेदवार जवळचा संबंध आहे. सर्वसाधारण जाती गटांतून मराठा, लिंगायत, मारवाडी या जातीगटाचे निवडून आले होते. मराठा जातीचे खुल्या गटांतून ४३ (२६.६६ टक्के) सदस्य निवडून आले होते. लिंगायत व मारवाडी या उच्च जातीगटांतून प्रत्येकी ०१ (०.६२ टक्के) सदस्य निवडून आले होते. ओबीसी प्रवर्गातील जातीगटांतून माळी, धनगर, कोष्टी, वंजारी या जातीचे सदस्य निवडून आले होते. माळी ०४ (२.४८ टक्के), धनगर ०२ (१.२४ टक्के), कोष्टी, वंजारी प्रत्येकी ०१ (०.६२ टक्के) सदस्य निवडून आले होते.

अनुसूचित जातीगटांतून नवबौध्द् ०४ (२.४८ टक्के), मातंग ०१ (०.६२ टक्के), ढोर ०१ (०.६२ टक्के) सदस्य निवडून आले होते. ही संधी राखीव जागेमुळे मिळालेली होती. ही संधी लोकसंख्येच्या आधारावर व नेतृत्वगुणाच्या आधारे मिळाली होती असे दिसून येत नाही. अनुसूचित जमाती प्रवर्गातून महादेव कोळी जातीगटांचे ०३ (१.८६ टक्के) सदस्य निवडून आले होते. (पहा तक्ता क्र. ८.४) नगर–अकोले या मतदारसंघात महोदव कोळी या समाजाचे प्रमाण जास्त आहे. परिणामी राजकीय पक्षाकडून याच समाजाच्या स्थानिक आणि सुशिक्षित नेतृत्वाला संधी जास्त प्रमाणात दिलेली होती. परिणामी अनुसूचित जमातीमध्ये इतर समाज घटकांचे प्रमाण आहे. मात्र त्यांचा विचार राजकीय प्रवाहामध्ये करण्यात येतो असे दिसून येत नाही. उच्च जातींगटातून जमिनधारी असणाऱ्या लिंगायत या समाजाचे देखील १ उमेदवार निवडून आले होते. तर मुळत: व्यापारी असलेल्या पण राजकारणात असलेल्या मारवाडी समाजाकडून १ नेतृत्व स्थानिक जिल्हा परिषदेसाठी निवडून आले होते. स्थानिक पातळीचा आणि निवडून आलेल्या नेतृत्वाचा अंदाज घेतला असता असे दिसून येते की, वंजारी समाजाचे पाथर्डी आणि शेवगाव या तालुक्यातून स्थानिक नेतृत्व निवडून आले होते. तर माळी समाजाचे सर्व जिल्हाभर विस्कळीत असे समाजाचे प्रमाण असल्याने काहीसे तुटक अशा मतदारसंघातून स्थानिक नेतृत्व निवडून आले होते. उदा. राहुरी, अहमदनगर, श्रीगोंदा या मतदारसंघातून

माळी समाजाचे उमेदवार निवडून आले होते. धनगर समाजाचे कर्जत, जामखेड या तालुक्यातील स्थानिक नेतृत्व पुढे आले होते. १९९२ च्या जिल्हा परिषद निवडणुकीवर एक जर नजर टाकली तर असे दिसून येते की, स्थानिक राजकीय नेतृत्व आणि सामाजिक अंगाने मिळणाऱ्या संधी ही मागास समाज घटकांना नगण्य अशा स्वरूपात मिळत होती. एकंदर स्थानिक पातळीवर देखील मराठा समाजाचे वर्चस्व अनन्यसाधारण असल्याचे पुढे आले होते. १९९२ च्या निवडणुकीतील दलित नेतृत्वाचा विचार करता असे दिसून येते की, दलित नेतृत्वामध्ये लोकसंख्या पुरेषी नसतानाही ढोर समाजाचे एक उमेदवार निवडणुकीत निवडून आला होता. ही संधी काँग्रेस या पक्षाने दिली होती. एकदंर दलितामधील छोट्या समाज घटकाला देखील या निवडणुकीत संधी मिळाली होती. अनुसूचित जमातीसाठी तीन मतदारसंघ होते. या मतदारसंघातून महादेव कोळी समाजाचे लोकसंख्या जास्त असल्याने त्याच समाजाचे नेतृत्व निवडून आले होते.

१९९२च्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचे वैशिष्ट्ये असे होते की, या निवडणुकीत ओबीसी समाज घटकाला स्थानिक राजकारणात आरक्षण देण्यात आले नव्हते. त्यामुळे उच्च आणि प्रस्थापित समाजाला राजकारणात नेतृत्व करण्यास जास्त अवकाश होता. स्थानिक पातळीवरील वर्चस्व आणि जमीन क्षेत्रातून येणारी आर्थिक प्रबळता या आधारावर सहज राजकारणात वर्चस्व मिळवता येणे शक्य होते. त्याच आधारावर या निवडणुकीत मराठा समाजाचे स्थानिक नेतृत्वबळ हे मोठे होते.

**तक्ता क्र. ८.४**

**जिल्हा परिषद सदस्यांचे जातीनिहाय वर्गीकरण : (१९९२)**

| अ.क्र | जातीगट | सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | मराठा | ४३ |
| २ | लिंगायत | ०१ |
| ३ | मारवाडी | ०१ |
| ४ | माळी | ०४ |
| ५ | धनगर | ०२ |
| ६ | कोष्टी | ०१ |
| ७ | वंजारी | ०१ |
| ८ | महार | ०४ |
| ९ | मातंग | ०१ |
| १० | ढोर | ०१ |
| ११ | म. कोळी | ०३ |
| **१२** | **एकूण** | **६२** |

आधार : विविध कार्यकर्ते आणि राजकीय नेतृत्वाच्या मुलाखती

## १९९७ ची जिल्हापरिषद निवडणूक आणि नेतृत्व

१९९७च्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीला अनन्यसाधारण असे महत्त्व असल्याचे दिसून येते. कारण या निवडणुकीपासून मागास समाज घटकांना (ओबीसी) राजकीय आरक्षण लागू करण्यात आले होते. हा एक प्रकारे उच्च नेतृत्वाला मोठा धक्का होता. कारण या राजकीय आरक्षणामुळे स्थानिक पातळीवरील मोठी समीकरणे बदलणार होते. दुसरे असे की, स्थानिक राजकारणात मराठा समाजाचे नेतृत्व कमी होत ओबीसी

समाजाचे नेतृत्व संख्या वाढणारी होती. परिणामी स्थानिक पातळीवरून या आरक्षणात उघडपणे विरोध न होता सुप्त प्रमाणात अप्रत्यक्षात मराठा समाजाकडून आणि नेतृत्वाकडून विरोध झाला होता. पण त्याच वेळी जिल्हा पातळीवरील आणि तालुका पातळीवर नेतृत्व करणाऱ्या नेतृत्वाकडून तसा मोठा विरोध झाला नाही. काही अंशी राजकीय आरक्षण लागू करण्यामुळे जिल्हा व तालुका पातळीवरील नेतृत्वाचे वर्चस्व वाढण्यास मदत झाल्याचे निरीक्षणातून पुढे आले. कारण तालुका आणि जिल्हा पातळीवरील नेतृत्वाला स्पर्धा करणारे नेतृत्व हे स्थानिक राजकारणातून पुढे येण्याची शक्यता कमी राहिली. दुसरे असे की, स्पर्धा कमी होण्यास मदत झाली. कारण स्थानिक पातळीवर एकच नेतृत्व सातत्याने निवडून येत असेल तर ते नेतृत्वाला अधिमान्यता मिळत तालुका व जिल्हा पातळीवरील नेतृत्वाला आव्हाने निर्माण होतील असे काहीसे चित्र होते. पण राजकीय आरक्षण लागू झाल्यावर मतदारसंघ प्रत्येक निवडणुकीला फिरते ठेवले. परिणामी एकच नेतृत्व सातत्याने निवडून येण्याची प्रक्रिया कमी प्रमाणात घडून येण्याची शक्यता होती. पुढे तसेच घडून आलेले दिसून येते. त्यामुळे १९९७ च्या निवडणुकीला स्थानिक नेतृत्व निर्मितीच्या प्रक्रियेला महत्त्व प्राप्त झाले होते.

ओबीसी समाज घटकांना ओबीसी आरक्षण लागू केल्यानंतर मतदारसंघ पुर्नरचनेनुसार पुढीलप्रमाणे मतदारासंघ राखीव झालेले होते. जिल्हापरिषद निवडणुकीसाठी एकूण ७४ जागा होत्या. या निवडणुकीसाठी १२ जागांची वाढ झाली. तसेच राजकीय आरक्षणानुसार ओबीसी समाज घटकानां राखीव मतदारसंघ करण्यात आले होते. त्यानुसार ओबीसी, अनुसूचित जाती व जमाती या प्रवर्गासाठी राखीव मतदारसंघाची वाढ झाली होती. एकूण जागांपैकी ३६ खुल्या गटातील समाज घटकांसाठी होत्या. या ३६ खुल्या जागेपैकी २४ जागा ह्या पुरूष गटांसाठी व १२ महिला गटांसाठी राखीव करण्यात आले होते. ओबीसी पुरूष गटांसाठी १३ जागा राखीव करण्यात आल्या होत्या. तर ओबीसी महिला सदस्य ५ सदस्य निवडून आले होते. तर अनुसूचित जाती पुरूष गटांतून ७ जागा तर अनुसूचित जाती महिला गटांतून ३ सदस्य निवडून आले

होते. अनुसूचित जमातीतील पुरूष गटासाठी ८ तर महिला गटासाठी २ जागा राखीव करण्यात आल्या होत्या. (पहा तक्ता क्र. ८.५)

**तक्ता क्र. ८.५**

**जिल्हा परिषद सदस्यांचे मतदारसंघ स्वरूपानुसार वर्गीकरण : (१९९७)**

| **अ.क्र** | **प्रवर्ग** | **सदस्य संख्या** |
|---|---|---|
| १ | खुला पुरूष | २४ |
| २ | खुला महिला | १२ |
| ३ | ओबीसी पुरूष | १३ |
| ४ | ओबीसी महिला | ०५ |
| ५ | अ.जाती पुरूष | ०७ |
| ६ | अ.जाती महिला | ०३ |
| ७ | अ.जमाती पुरूष | ०८ |
| ८ | अ.जमाती महिला | ०२ |
| ९ | **एकूण** | **७४** |

आधार : निवडणूक आयोगाचा अहवाल १९९७

१९९७ च्या निवडणुकीचा विचार करता असे दिसून येते की, खुल्या गटासाठी ३६ जागा, ओबीसीसाठी १८ जागा, अनुसूचित जातीसाठी १० आणि अनुसूचित जमातीसाठी १० अशा प्रकारे जिल्हा परिषदेचे आरक्षण तयार करण्यात आले होते. एकूण ३८ जागेचे राजकीय आरक्षण हे मागास समाज घटकांसाठी होते. खुल्या जागेचा आणि राखीव जागेचा विचार करता असे दिसून येते की, खुल्या जागेपेक्षा राखीव जागेची संख्या ही दोनने जास्त होती. अर्थात प्रस्थापित समाज घटकांपेक्षा मागास समाज घटकांतून स्थानिक राजकारणात २ ने नेतृत्व संख्या ही जास्त राहणारी होती.

म्हणजेच मागास समाज घटकांचे स्थानिक राजकारणात नेतृत्व प्रतिनिधित्व जास्त होणारे होते. ही राजकारणात एक प्रकारे क्रांती होती असे मानावे लागेल. मात्र मागास समाज घटकांतून एकच जातींगट प्रभावी नसल्याने राजकीय नेतृत्वामध्ये प्रभावी अशा एकतेच्या आणि दबावाच्या गटाने नेतृत्व पुढे येईल असे होणारे नव्हते. कारण मागास जातींगटात अनेक समाज समुह असल्याने निवडून येणारे नेतृत्व देखील विविध समाज घटकांतून येणारे होते. त्यामुळे मागास समाज घटकांची संख्या जरी जास्त असली तरी ते स्थानिक राजकारणात वर्चस्व निर्माण करतील असे नव्हते. कारणे तपासली असता असे दिसून येते की, ओबीसीमधील जे माळी, धनगर आणि वंजारी हे समुह प्रभावी आहेत. त्या समाज घटकांमध्ये ओबीसी अशी अस्मिता निर्माण झालेली नाही. हे समुह श्रेष्ठत्व आणि उच्च–निच्चतेच्या कल्पनेनुसार एकत्र येत नाहीत. हे समुह प्रस्थापित समुहातील नेतृत्वाशी स्वत:चे राजकीय आणि आर्थिक संबंध जोपासण्याचे प्रयत्न करत असतात. त्यामुळे स्थानिक राजकारणात प्रस्थापित नेतृत्वाच्या आश्रयाला राहून हे समुह राजकारणात स्पर्धा निर्माण करतात. ही बाब पुन्हा या निवडणुकीतून पुढे आलेली दिसून येते.

## निवडणूक निकाल १९९७

अहमदनगर जिल्हापरिषदेच्या १९९७च्या निवडणुकीत शिवसेना, भाजप यांनी पक्ष पातळीवर निवडणूक लढविली. कॉंग्रेस या पक्षांने पक्षीय पातळीवर स्वतंत्रपणे निवडणूक लढविली. त्यामुळे शिवसेना, भाजप, तालुका विकास आघाडी, अपक्ष यांची कॉंग्रेस या पक्षांबरोबर पक्षीय स्पर्धा होती. या चौरंगी स्पर्धेत कॉंग्रेस पक्षाला पक्षीय पातळीवर सत्तास्पर्धेला या पक्षांनी विरोध केला. त्यामुळे त्या गटाचे नेतृत्व १९९७च्या निवडणुकीत तालुक्यातील प्रबळ गट असे चित्र होते.

अहमदनगर जिल्हापरिषदेच्या १९९७च्या निवडणुकीमध्ये ७४ जि.प सदस्यांपैकी कॉंग्रेस पक्षाचे ५६, शिवसेना ३, भाजप ७, तालुका विकास आघाडी ४ व अपक्ष ५ सदस्य निवडून आले होते. (पहा तक्ता क्र. ८.६) जनतादल, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवार निवडून आले नाहीत. १९९७च्या निवडणुकीमध्ये अहमदनगर जिल्हा परिषदेची

सत्ता काँग्रेस पक्षाच्या हातामध्ये केंद्रीत झालेली होती. तालुका विकास आघाडी व अपक्ष यांचे मिळून ९ सदस्य निवडून आले होते. त्यामुळे या निवडणुकीत पक्ष पातळीवर राजकारण झाल्याचे दिसते. काँग्रेस पक्षाच्या परिघात या निवडणुकीचे राजकारण होण्याचा कल पुढे आला. एक प्रकारे जिल्हा राजकारणात काँग्रेस या पक्षाला पर्याय नसल्याचे या निवडणुकीतून पुढे आले. अर्थात स्वातंत्र्यपुर्व काळापासून जी काँग्रेस संस्कृती रूजवण्याचा प्रयत्न झालेला आहे. तोच कल पुढे आला होता. त्यामुळे व्यक्तीगत राजकारणाला व छोट्या पक्षांना सार्वजनिक राजकारण करता आले नाही. (पहा तक्ता क्र. ८.६) काँग्रेस पक्षांची स्थानिक नेतृत्वामध्ये देखील एक वर्चस्व असल्याचे दिसून आले.

**तक्ता क्र. ८.६**

**जि. प सदस्यांचे राजकीय पक्षानुसार वर्गीकरण : (१९९७)**

| **अ.क्र** | **राजकीय पक्ष** | **सदस्य संख्या** |
|---|---|---|
| १ | काँग्रेस | ५६ |
| २ | शिवसेना | ०३ |
| ३ | भाजप | ०७ |
| ४ | विकास आघाडी | ०४ |
| ५ | अपक्ष | ०५ |
| ६ | **एकूण** | **७४** |

आधार : निवडणूक आयोगाचा अहवाल १९९७

## १९९७ च्या जिल्हा परिषदेचा जातींगटानुसार नेतृत्व प्रमाण :

जात आणि राजकारण यांचा जवळचा संबंध असतो. कोणत्या जातीगटांतून जिल्हा परिषद सदस्य राजकारणामध्ये येत आहेत. याचे विश्लेषण (पहा तक्ता क्र. ८.७)

नुसार करण्यात आले आहे. मारवाडी या उच्च जातीगटांतून १ सदस्य निवडून आला. सर्वात जास्त मराठा जातीगटांचे ३४ सदस्य निवडून आले. मराठा, मारवाडी या जातीगटांचे सदस्य कॉंग्रेस, भाजप, शिवसेना या पक्षाकडून निवडून आले होते. कॉंग्रेस पक्षाला ग्रामीण भागातून मराठा जातीगटांचा पाठिंबा मिळताना दिसतो.

१९९७च्या जिल्हा परिषद निवडणुकीत ओबीसी जातीगटातील अनेक छोट्या जातींगटाचे सदस्य राजकारणात सहभागी झाल्याचे दिसून येते. ओबीसी जातींगटाचे एकूण २० सदस्य निवडून आले होते. यामध्ये माळी ४, धनगर ६, वंजारी ५, कुणबी १ या प्रामुख्याने शेतकरी जाती होत. वंजारी व कुणबी अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी, जामखेड या तालुक्यातून निवडून येतात. मुस्लिम, तेली, सोनार व गोसावी या जातींगटाचे अनुक्रमे १ सदस्य निवडून आलेले आहेत. व्यापार कौशल्य या घटकांमुळे या जातींगटांचा राजकारणात सहभाग झाला,

अनुसूचित जातींगटातून महार ३, मांतग २, चर्मकार ३ व होलार १ असे जातींगट राजकारणात सहभागी झाले, तर अनुसूचित जमाती गटातून महादेव कोळी ८, भिल्ल २ असे जातीगट होते. या सर्व जातींगटाचे राजकारण मराठा जातींगटाच्या राजकारणावर अंवलबून असते.

**तक्ता क्र. ८.७**

**जि. प. सदस्यांचे जातीगटानुसार वर्गीकरण : (१९९७)**

| **अ.क्र** | **जातीगट** | **सदस्य संख्या** |
|---|---|---|
| १ | मराठा | ३४ |
| २ | मारवाडी | ०१ |
| ३ | माळी | ०४ |
| ४ | धनगर | ०६ |
| ५ | वंजारी | ०५ |
| ६ | कुणबी | ०१ |
| ७ | मुस्लिम | ०१ |
| ८ | तेली | ०१ |
| ९ | सोनार | ०१ |
| १० | गोसावी | ०१ |
| ११ | महार | ०३ |
| १२ | मातंग | ०२ |
| १३ | चर्मकार | ०३ |
| १४ | होलार | ०१ |
| १५ | म. कोळी | ०८ |
| १६ | भिल्ल | ०२ |
| १७ | **एकूण** | **७४** |

आधार : विविध राजकीय कार्यकर्ते आणि राजकीय नेतृत्वाच्या मुलाखती

१९९७च्या निवडणुकीत खुल्या ३६ जागेचा विचार करता असे दिसून येते की, ३४ मराठा, १ मारवाडी आणि १ मुस्लिम असे नेतृत्व निवडून आले. अर्थात

खुल्यागटाच्या जागेवर मराठा समाजाचे अनिर्वाद वर्चस्व असल्याचे दिसून येते. एक प्रकारे अलिखित स्वरूपात या मतदारसंघात मराठा समाजाच्या नेतृत्वाला आरक्षण असल्याप्रमाणे हे संख्याबल निवडून आले होते. खुल्या जागेमध्ये केवळ दोन नेतृत्वाला संधी मिळवता आलेली आहे. पण ओबीसी समाज घटक प्रथमच या राजकीय आरक्षण लागू झाल्यानंतर निवडणुकीला सामोरे गेले होते. त्यात माळी ४, धनगर ६, वंजारी ५, कुणबी १, तेली १, सोनार १, गोसावी १ असे १९ उमेदवारांना प्रथम नेतृत्व करता आले. जिल्ह्यातील ओबीसी समाज घटकांचा विचार करता धनगर आणि वंजारी समाजाचे नेतृत्वामध्ये स्पर्धा असताना दिसून येते. माळी समाजाचे नेतृत्व निवडून आले मात्र माळी समाज हा जिल्ह्यात विस्कळीत असलेला आहे. तर धनगर आणि वंजारी समाज हा कोरडवाहू परिसरात संख्येने एकवटलेला आहे. परिणामी त्या एकवटलेल्या मतदारसंघातून या समाजाचे नेतृत्व स्थानिक राजकारणात पुढे येते. अनुसूचित जातीचा विचार करता महार ३, चर्मकार ३, होल्हार १ आणि मांगत समाजाचे २ असे सदस्य निवडून आले. दलितामध्ये नवबौध्द (महार) समाजाचे प्रमाण जास्त असताना देखील चर्मकार आणि मांतग समाजाचे नेतृत्व पुढे आले. कारण प्रस्थापित समाजाचा नवबौध्द समाजाच्या उमेदवारापेक्षा हिंदू दलित नेतृत्वाला मतदान करण्याचा कल जास्त असल्याचा परिणाम होता. पण तरीही समप्रमाणात नेतृत्व विभागणी झालेली दिसून येते. अनुसूचित जमातीचा विचार करता असे दिसून येते की, महादेव कोळी समाजाचे प्रमाण जास्त असताना देखील भिल्ल समाजाचे दोन सदस्य निवडून आले. एक प्रकारे १९९७ च्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील जिल्हा परिषदेच्या निवडणुकीने क्रांती करणारे राजकीय आरक्षणानुसार निवडणुका होऊन स्थानिक पातळीवर मागास समाज घटकांना राजकीय नेतृत्व करण्याची मोठी संधी मिळालेली होती. त्या संधीनुसार मागास समाज घटकांची सदस्यसंख्या वाढलेली आहे. एक प्रकारे राजकारणात मागास समाज घटकांच्या राजकीय नेतृत्वाला गतिशिलता देणारी ही निवडणूक होती. त्यानुसार स्थानिक राजकारणात मागास

समाज घटकांच्या नेतृत्वाच्या रूपाने राजकीय स्पर्धा तीव्र अशा स्वरूपात झाल्याचे दिसून येते.

## २००२ ची जिल्हापरिषद निवडणूक आणि नेतृत्व

अहमदनगर जिल्हापरिषदेच्या निवडणुकीसाठी जिल्हापरिषदेच्या ७५ जागा होत्या. त्यापैकी ४० जागा खुल्या गटातील होत्या. या ४० खुल्या जागेपैकी २७ पुरूष गटासाठी व १३ महिला गटासाठी राखीव होत्या. ओबीसी पुरूष सदस्य १२ तर ओबीसी महिला सदस्य ७ होत्या. अनुसूचित जाती पुरूष सदस्य ७ व महिला सदस्य ३ होत्या. अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ६ जागा होत्या. अनुसूचित जमाती पुरूष ४ व महिला सदस्य २ होत्या. (पहा तक्ता क्र. ८.८) १९९७ च्या तुलनेत १ जागेची वाढ झाल्याचे दिसून येते. ही जागा ओबीसी समाज गटामध्ये वाढलेली आहे. दुसरे असे की, अनुसूचित जमातीच्या ३ जागा कमी होऊन खुल्या गटाच्या जागा वाढलेल्या आहेत. तसेच २००२च्या जिल्हापरिषद निवडणुकीसाठी ७५ जागा झाल्या. एका जागेने वाढ झाली. खुला महिला गटात वाढ झाली आहे. ही या निवडणुकीतील बदल नोंदवता येईल. (निवडणूक विभाग, अहमदनगर जिल्हापरिषद—२००२)

तक्ता क्र. ८.८

जिल्हा परिषद सदस्यांचे मतदारसंघ स्वरूपानुसार वर्गीकरण : (२००२)

| अ.क्र | प्रवर्ग | सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | खुला पुरूष | २७ |
| २ | खुला महिला | १३ |
| ३ | ओबीसी पुरूष | १२ |
| ४ | ओबीसी महिला | ०७ |
| ५ | अ.जाती पुरूष | ०७ |
| ६ | अ.जाती महिला | ०३ |
| ७ | अ.जमाती पुरूष | ०४ |
| ८ | अ.जमाती महिला | ०२ |
| ९ | **एकूण** | **७५** |

आधार : निवडणूक आयोगाचा अहवाल २००२

## निवडणूक निकाल २००२ आणि राजकीय नेतृत्वाची संधी

अहमदनगर जिल्हापरिषदेच्या २००२च्या निवडणुकीत कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, भाजप, शिवसेना यांनी पक्ष पातळीवर स्वतंत्रपणे निवडणुका लढवल्या. कॉंग्रेस पक्षाव्यतिरिक्त राष्ट्रवादी कॉंग्रेस, भाजप, शिवसेना यांनी स्वतंत्रपणे पक्षीय राजकारण केले. त्यामुळे या पक्षांची कॉंग्रेस पक्षांबरोबर पक्षीय स्पर्धा होती. २००२च्या जिल्हापरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची जिल्ह्याच्या राजकारणात कॉंग्रेस पक्षाबरोबर स्पर्धा सुरू झाली. कॉंग्रेस पक्षामधील हा एक प्रबळ गट होय. स्थानिक राजकारणात पंचरंगी निवडणुका सुरू झाल्या. शेतकरी विचार दल, तालुका विकास आघाडी व अपक्ष हे

काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसमधील प्रबळ गट आपले अस्तित्व स्थानिक राजकारणात टिकवून ठेवतात. २००२च्या जिल्हापरिषद निवडणुकीत कोपरगांव शेतकरी विचार दल या गटांच्या माध्यमातून निवडणुका लढविल्या. (पहा तक्ता क्र. ८.९) २००२ च्या निवडणुकीत १९९९ साली काँग्रेस पक्षात विभाजन होऊन राष्ट्रवादी या पक्षांची निर्मिती झाल्याने जिल्हा अंतर्गत काँग्रेस पक्षावर फार मोठा आघात झाला होता. कारण काँग्रेस मधील अनेक गट हे राष्ट्रवादीमध्ये गेले होते. काही तालुक्यात तर काँग्रेसला फार मोठी हानी झाली होती. काँग्रेस पक्षातील शरद पवार यांना मानणारे सर्व नेतृत्व हे राष्ट्रवादी या पक्षात गेले होते. दुसरे असे की, शरद पवार यांची अहमदनगर जिल्ह्यात मोठी ताकद होती.

अहमदनगर जिल्हापरिषदेच्या २००२च्या निवडणुकीत ७५ जि. प सदस्य होते. त्यापैकी काँग्रेस १९, राष्ट्रवादी काँग्रेस ३०, शिवसेना ८, भाजप ८, शेतकरी विचार दल ७, अपक्ष २ तर तालुका विकास आघाडी १ असे जि. प सदस्य निवडून आले होते. (पहा तक्ता क्र. ८.९) जनता दल, भारतीय कम्युनिस्ट पक्षांचे उमेदवार निवडून आले नाहीत. १९९७च्या जिल्हापरिषदच्या निवडणुकीत काँग्रेस पक्ष पुर्ण बहुमतात होता. परंतु १९९९ला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाल्यामुळे काँग्रेस पक्षाच्या मतात विभाजन झाले व २००२च्या जिल्हापरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष क्रमांक एकचा पक्ष झाला. दोन्ही पक्षांचे सामाजिक, आर्थिक आधार सारखे असल्यामुळे २००२ जिल्हापरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सत्तेचा दावेदार झाला.

## तक्ता क्र. ८.९

## जिल्हा परिषद सदस्यांचे राजकीय पक्षानुसार वर्गीकरण : (२००२)

| अ.क्र | राजकीय पक्ष | सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | काँग्रेस | १९ |
| २ | राष्ट्रवादी काँग्रेस | ३० |
| ३ | शिवसेना | ०८ |
| ४ | भाजप | ०८ |
| ५ | शेतकरी विचार दल | ०७ |
| ६ | अपक्ष | ०२ |
| ७ | ता. वि. आघाडी | ०१ |
| **८** | **एकूण** | **७५** |

आधार : निवडणूक आयोगाचा अहवाल २००२

२००२च्या निवडणुकीचा विचार करता असे दिसून येते की, राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष जरी १९९९ साली स्थापन झालेला होता. तरी देखील या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष ठरला होता. या निवडणुकीत अपक्ष आणि तालुका विकास आघाडीच्या साह्याने सहज बहुमत मिळवण्याच्या जवळ गेला होता. दुसरे असे की, आतापर्यंत काँग्रेस पक्ष हा अहमदनगर जिल्ह्यात सर्वात मोठा पक्ष आणि सर्व पातळ्यावर वर्चस्व असणारा पक्ष असा होता. तरीही या निवडणुकीत दुसऱ्या स्थानावर जावे लागले. काँग्रेस पक्षाला ज्या मतदारसंघात प्रभावी नेतृत्व होते. त्याच मतदारसंघातून उमेदवार निवडून आणता आले. इतर ठिकाणी मतदारसंघ उमेदवार निवडून आणता आले नाहीत. तिसरी बाब म्हणजे सेना–भाजपाचे सदस्य संख्यावाढ ही या निवडणुकीतून पुढे आलेली दिसून येते. मात्र मध्यवर्ती स्वरूपात पुढे येता आले नाही. या निवडणुकीचे

वैशिष्ट्ये असे की, या निवडणुकीत जरी काँग्रेस विभाजनातून राष्ट्रवादी या पक्षाची निर्मिती झाली असली तरी मुख्य स्पर्धा ही काँग्रेस आणि राष्ट्रवादी या दोन पक्षात राहिलेली आहे. १९९७च्या निवडणुकीत सेना – भाजपाला १० जागा मिळाल्या होत्या. त्यात ६ जागांची वाढ या निवडणुकीत झाल्याचे दिसून येते. तालुका विकास आघाडीचे संख्याबळ कमी झाले.

## २००२ च्या निवडणुकीतून पुढे आलेले नेतृत्वाचे जातींगट

अहमदनगर जिल्हापरिषदेची २००२ची निवडणुकीत ७५ जागासाठी निवडणूक झाली. मराठा जातीगटांचे ३५, जैन १ सदस्य निवडून आले. मराठा जातीगटाचे सदस्य काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना या पक्षात होते. ओबीसी या जातीगटांतून एकूण २२ सदस्य निवडून आले होते. त्यापैकी माळी ६, धनगर ७, वंजारी ५, कुणबी ४ सदस्य होते. तेली जातीचा १ सदस्य निवडून आलेला होता. तेली ही जात व्यवसायामुळे आर्थिक हितसंबंधातून राजकारणात आली होती. नवबौध्द समाजाचे ८, मातंग २ सदस्य निवडून आले होते. तर अनुसूचित जमातीतील महादेव कोळी जातीचे ५ सदस्य निवडून आले होते. (पहा तक्ता क्र. ८.१०)

**तक्ता क्र. ८.१०**

**जि.प. सदस्यांचे जातीगटांनुसार वर्गीकरण : (२००२)**

| अ.क्र | जातीगट | सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | मराठा | ३५ |
| २ | जैन | ०१ |
| ३ | माळी | ०६ |
| ४ | धनगर | ०७ |
| ५ | वंजारी | ०५ |
| ६ | कुणबी | ०४ |
| ७ | तेली | ०१ |
| ८ | बौध्द | ०८ |
| ९ | मातंग | ०२ |
| १० | चर्मकार | ०१ |
| ११ | महादेव कोळी | ०५ |
| १२ | **एकूण** | **७५** |

आधार : विविध राजकीय कार्यकर्ते आणि राजकीय नेतृत्वाच्या मुलाखती

२००२च्या निवडणुकीचा विचार करता असे दिसून येते की, पुन्हा मराठा समाजाचे खुल्या जागेवर वर्चस्व सिध्द् होते. मारवाडी समाजाच्या केवळ एका जागेवरील सदस्याला निवडून येता आले. १९९७च्या तुलनेत २००२च्या जिल्हा परिषद निवडणुकीत माळी समाजाचे स्थानिक नेतृत्व संख्याबळ २ ने वाढलेले दिसून येते. तसेच धनगर समाजाचे देखील १ ने संख्याबळ वाढले. मात्र वंजारी आणि तेली समाजाचे तेवढेच संख्याबळ राहिलेले दिसून येते. कुणबी समाजाचे संख्याबळ वाढलेले आहे. मात्र

मराठा कुणबी असे एकच असल्याचे मराठा–कुणबी समाजाच्या जाणीवा असल्याने हे संख्याबळ खुल्या जागेवरून निवडून आलेले आहे. परिणामी कुणबी समाजाची भागेदारी ही खुल्या गटात झालेली आहे. अनुसूचित जातींगटामध्ये नवबौध्द समाजाचे संख्याबळ ५ ने वाढलेले आहे. विविध राजकीय पक्षाकडून नवबौध्द समाजाला जास्त प्रमाणावर वाटेकरी केल्याचे दिसून येते. मांतग आणि चर्मकार समाजाचे संख्या ही कमी झालेली दिसून येते. अनुसूचित जमातीच्या जागेवर महादेव कोळी समाज गटाने सर्व जागा मिळवल्या. एकंदर मराठा जातीगटात जास्त प्रमाणावर बदल होताना दिसून येत नाही. मात्र ओबीसी समाजातील नेतृत्वामध्ये आणि दलित नेतृत्वामध्ये बदल घडून येत असताना दिसून येतो.

## २००७ ची जिल्हापरिषद निवडणूक आणि नेतृत्व

२००७च्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत असे दिसून येते की, १९९७ साली ओबीसी जातींगटाला राजकीय आरक्षण देण्यात आले होते. त्यानंतरची ही तिसरी निवडणूक होती. या निवडणुकीत ओबीसी जातींगटाचे राजकीय आरक्षण राजकीय पक्ष आणि प्रस्थापित समाज घटक यांना अंगवळणी पडल्याचे दिसून येते. राजकीय नेतृत्वाने आरक्षणानुसार उमेदवारी देण्यात आल्याचे दिसून येते. त्यानुसार अहमदनगर जिल्हापरिषदेच्या २००७च्या निवडणुकीत ७५ जिल्हा परिषदेचे मतदारसंघ होते.

अशा प्रकारे मतदासंघाचे जिल्ह्यातील राखीव जागेचे आरक्षण पडले होते. मतदारसंघाच्या आरक्षणाची बाजू पाहत असताना दिसून येते की, राखीव मतदारसंघ जरी २००२ प्रमाणे २००७ या निवडणुकीत देखील तेवढेच राहिलेले आहेत. (पहा तक्ता क्र. ८. ११)

**तक्ता क्र. ८.११**

**अहमदनगर जि. प. सदस्यांचे मतदारसंघ स्वरूपानुसार वर्गीकरण : (२००७)**

| **अ.क्र** | **प्रवर्ग** | **सदस्य संख्या** |
|---|---|---|
| १ | खुला पुरूष | २८ |
| २ | खुला महिला | १२ |
| ३ | ओबीसी पुरूष | १३ |
| ४ | ओबीसी महिला | ०६ |
| ५ | अ.जाती पुरूष | ०७ |
| ६ | अ.जाती महिला | ०३ |
| ७ | अ.जमाती पुरूष | ०२ |
| ८ | अ.जमाती महिला | ०३ |
| ९ | **एकूण** | **७४** |

आधार : निवडणूक आयोगाचा अहवाल २००७

## निवडणूक निकाल २००७ आणि स्थानिक राजकीय नेतृत्व

अहमदनगर जिल्हापरिषदेच्या २००७च्या निवडणुकीमध्ये एकूण ७४ सदस्य होते. त्यापैकी काँग्रेस पक्षाचे ३१ सदस्य निवडून आले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे २६ सदस्य होते. शिवसेना ६, भाजप ५, तालुका विकास आघाडी ५ व अपक्ष १ सदस्य निवडून आले होते. (पहा तक्ता क्र. ८.१२) निवडणुकीत एका मतदारसंघात एका उमेदवारांचे निधन झाल्याने त्या मतदारसंघात निवडणूक घेण्यात आली नाही. परिणामी ७४ जागेवरच निवडणूक झाली.

अहमदनगर जिल्ह्यात २००७च्या निवडणुकीत पुन्हा काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात प्रमुख लढत झाली. जिल्हापरिषदेच्या ७४ जागांपैकी राष्ट्रवादी काँग्रेसनी

७२, कॉंग्रेस ६२, भाजप २६ व शिवसेना २१ जागा लढविल्या. कॉंग्रेसने मुख्यमंत्र्यांसह इतर नेते, राष्ट्रवादी कॉंग्रेसने उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांना प्रचारात उतरविले. २००२मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसची सत्ता होती. त्या काळात झालेले टॅंकर इंधन गैरव्यवहार, संगणक खरेदी गैरव्यवहार आणि आरोग्य सेवक भरती प्रकरण निवडणुकीत गाजले. या सर्व प्रकरणाचा कॉंग्रेसने प्रचारात मुद्दा केला. राष्ट्रवादी कॉंग्रेसने अडीच वर्षे कॉंग्रेस पक्ष सत्तेत होता असे प्रचारात प्रतिउत्तर दिले. पालकमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी या सर्व प्रकरणाची धार कमी केली. राष्ट्रवादी कॉंग्रेसची अशी सारवासारव करताना थेट मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी या जिल्ह्यातील सभांत राष्ट्रवादीच्या कारभारावर कडक टीका केली. त्यामुळे या दोन्ही पक्षांत या जिल्ह्यात संघर्ष अधिक वाढला.

कॉंग्रेस अंतर्गत खासदार बाळासाहेब विखे पाटील कृषीमंत्री बाळासाहेब थोरात आणि गोंविदराव आदिक या तीन गटांचा विकोपाला गेलेला वाद मुख्यमंत्र्यांनी मिटविला असे असले तरी विखे समर्थकांच्या तालुका आघाड्या कार्यरत होत्या. यातून कॉंग्रेस पक्षाला यश मिळाले व राष्ट्रवादी दुसऱ्या क्रमाकांवर गेला. कॉंग्रेसने संगमनेर, राहता, नेवासे, कोपरगांव तालुक्यात भरघोस यश मिळविले. तर राष्ट्रवादी कॉंग्रेसने अकोले, श्रीगोंदा, श्रीरामपूर, शेवगांव या तालुक्यात यश मिळविले. (सकाळ, ९ मार्च २००७) या निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाने राष्ट्रवादी कॉंग्रेस या पक्षाला मागे टाकत प्रथम क्रमांक मिळवलेले दिसून येते. कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांतर्गत गटबाजी असल्याचे या निवडणुकीतून पुढे आले. मात्र या निवडणुकीत कॉंग्रेसच्या तुलनेत राष्ट्रवादीला मोठा फटका बसल्याचे दिसून येते. दुसरे असे की, भाजपा – शिवसेना या दोन पक्षाची युती असताना देखील प्रभावीपणे निवडणुकीत स्थान मिळवता आले नाही. या निवडणुकीतून सेना भाजपाला जिल्ह्यात युती असताना देखील मुख्य स्पर्धेच्या भूमिकेत उतरता आले नाही. पुन्हा या निवडणुकीतून अहमदनगर जिल्ह्यातील स्थानिक राजकारणात कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी या दोन पक्षांचे स्थान प्रभावी आणि परिणामकारक असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र. ८.१२**

**अहमदनगर जि. प. सदस्यांचे राजकीय पक्षानुसार वर्गीकरण : (२००७ निवडणूक)**

| अ.क्र | राजकीय पक्ष | सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | काँग्रेस | ३१ |
| २ | राष्ट्रवादी काँग्रेस | २६ |
| ३ | शिवसेना | ०६ |
| ४ | भाजप | ०५ |
| ५ | अपक्ष | ०१ |
| ६ | ता. वि. आघाडी | ०५ |
| ७ | **एकूण** | **७४** |

आधार : निवडणूक आयोगाचा अहवाल २००७

## जातीगट :

अहमदनगर जिल्हापरिषदेत २००७च्या निवडणुकीत ७४ सदस्यसंख्येपैकी कोणत्या जातीगटातून किती सदस्य संख्या जिल्हापरिषदेच्या राजकारणात आली याचे विश्लेषण (पहा तक्ता क्र. ८.१३) नुसार करण्यात आले आहे. मराठा जातीचे २६ सदस्य निवडून आले होते. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, तालुका विकास आघाडी व अपक्ष अशा पक्षामार्फत व गटाकडून सदस्य निवडून आले होते. धनगर, माळी, वंजारी व कुणबी या शेतकरी जाती वरील सर्वच पक्षात थोड्या फार प्रमाणात विभागल्या गेल्या. धनगर २, माळी १, वंजारी ७ व कुणबी २२ असे सदस्य निवडून आले होते. वंजारी ही जात पाथर्डी व जामखेड या तालुक्यातून निवडून आली तर या निवडणुकीत कुणबी जातीचे प्रमाण लक्षणीय होते. त्याचे कारण कुणबी जातीचा दाखला घेऊन ओबीसी प्रवर्गातून या जाती राजकारणात आल्याचे दिसते. नवबौध्द जातीगटाचे ५, मातंग २, चर्मकार १ सदस्य होते. महादेव कोळी १, भिल्ल ४ व ठाकर २ या समाजाचे सदस्य निवडून आले होते.

## तक्ता क्र. ८.१३

### जिल्हा परिषद सदस्यांचे जातीगटानुसार वर्गीकरण : (२००७ निवडणूक)

| अ.क्र | जातीगट | सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | मराठा | २६ |
| २ | धनगर | ०२ |
| ३ | माळी | ०१ |
| ४ | वंजारी | ०७ |
| ५ | कुणबी | २२ |
| ६ | सोनार | ०१ |
| ७ | नवबौध्द | ०५ |
| ८ | मातंग | ०२ |
| ९ | चर्मकार | ०१ |
| १० | म. कोळी | ०१ |
| ११ | भिल्ल | ०४ |
| १२ | ठाकर | ०२ |
| १३ | एकूण | ७४ |

आधार : विविध राजकीय आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या मुलाखती

२००७ ची जिल्हा परिषद निवडणूक अनेक कारणांनी वैशिष्ट्पुर्ण ठरलेली दिसून येते. या निवडणुकीत ओबीसी समाजातील माळी, धनगर या समाजाचे स्थानिक नेतृत्व फार कमी झाले. तर कुणबी समाजाचे सदस्य संख्या ही २२ झाली. मराठा समाजाचे देखील सदस्य संख्या कमी होऊन ती २६ वर आली. अर्थात येथे मराठा—कुणबी ही रेषा पुसटशी असल्याने अनेक खुल्या जागेवरून कुणबी समाजाचे सदस्य निवडून आलेले दिसून येतात. दुसरी बाब अशी की, जिल्हा परिषदेच्या या निवडणुकीत मराठा—कुणबी समाजाचे एकत्रितरित्या विचार करता ७४ पैकी ४८ सदस्य

निवडून आले. खुल्या जागेचा विचार करता असे दिसून येते की, सर्वच्या सर्व जागेवर मराठा—कुणबी समाजाचे सदस्य निवडून आले होते. तर ओबीसी राखीव मतदारसंघाचा विचार करता असे दिसून येते की, १९ पैकी ११ सदस्य हे माळी, धनगर, सोनार आणि वंजारी या समाज घटातून निवडून आले होते. तर ८ सदस्य हे कुणबी समाजातून निवडून आले होते. कुणबी समाजातील निवडून आलेल्या २२ सदस्यांपैकी १४ सदस्य हे खुल्या जागेवरून निवडून आले होते. अनुसूचित जातींगटातून प्रमुख नवबौध्द, मांतग आणि चर्मकार या समाजालाच संधी मिळालेली होती. इतर जातींना संधी देण्यात आली नाही. जी संधी मिळाली होती त्यामध्ये देखील नवबौध्द समाजाचे ५ सदस्य निवडून आले होते. अनुसूचित जमातीचा विचार करता, सातत्याने महादेव कोळी समाजाचे नेतृत्वाचे वर्चस्व राहत आलेले असताना या निवडणुकीत ठाकर आणि भिल्ल समाजाला या निवडणुकीत संधी मिळालेली होती. महादेव कोळी समाजाला केवळ १ जागेवर समाधानी मानावे लागले होते.

## अहमदनगर जिल्हापरिषद आणि राजकीय नेतृत्व : १९९२ ते २००७

१९९२ ते २००७ या काळातील जिल्हा परिषदेत नेतृत्व करणाऱ्या नेतृत्वाचा एकत्रितरित्या विचार करता असे दिसून येते की, १९९७ची निवडणुकीत ओबीसीसाठी राजकीय आरक्षण लागू नसल्याने या निवडणुकीत खुल्या गटातून जास्त राजकीय नेतृत्व निवडून आल्याचे दिसून येते. तर ओबीसी वर्गवारीतून केवळ ७ सदस्य निवडून आले होते. तेच १९९७ साली झालेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत १८ सदस्य संख्या झालेले दिसून येते. त्यानंतरच्या निवडणुकीत हा आकडा १९ राहिलेला आहे. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती या वर्गवारीतील जातींगटांना त्यांच्या राखीव मतदारसंघानुसार प्रतिनिधित्व मिळालेले दिसून येते. पण १९९७ साली अनुसूचित जातींगटासाठी ६ जागा राखीव होत्या. त्याच १९९७ साली १० जागा झालेल्या दिसून येतात. अर्थात अनुसूचित जातींगटातील राजकीय नेतृत्वामध्ये ४ ने वाढ झालेली दिसून

येते. तर अनुसूचित जमातीच्या गटाचा विचार करता असे दिसून येते की, जागाच्या बाबतीत चढ उतार झालेला दिसून येतो. १९९२ साली ३ जागा राखीव होत्या. त्याच १९९७ साली १० जागा झाल्या. तर २००२ साली ६ तर २००७ साली तर ५ जागा राहिल्या. अशा प्रकारे या वर्गवारीनुसार राजकीय नेतृत्वाला जिल्हा परिषदेच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर नेतृत्व करत स्थानिक पातळीवरील कारभार करण्यास संधी मिळालेली आहे. (पहा तक्ता क्र. ८.१४)

**तक्ता क्र. ८.१४**

**जि.प.मतदारसंघस्वरूपानुसार वर्गीकरण**

**(१९९२, १९९७, २००२, २००७ निवडणुका)**

| अ.क्र | प्रवर्ग | १९९२ | १९९७ | २००२ | २००७ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | खुला पुरूष | ३२ | २४ | २७ | २८ | १११ |
| २ | खुला महिला | १४ | १२ | १३ | १२ | ५१ |
| ३ | ओबीसी पुरूष | ०२ | १३ | १२ | १३ | ४० |
| ४ | ओबीसी महिला | ०५ | ०५ | ०७ | ०६ | २३ |
| ५ | अ.जाती पुरूष | ०४ | ०७ | ०७ | ०७ | २५ |
| ६ | अ.जाती महिला | ०२ | ०३ | ०३ | ०३ | ११ |
| ७ | अ.जमाती पुरूष | ०२ | ०८ | ०४ | ०२ | १६ |
| ८ | अ.जमाती महिला | ०१ | ०२ | ०२ | ०३ | ०८ |
| **९** | **एकूण** | **६२** | **७४** | **७५** | **७४** | **२८५** |

आधार : निवडणूक आयोगाचा अहवाल १९९२ ते २००७

## जिल्हा परिषदेतील निवडणुकीत राजकीय पक्ष आणि नेतृत्व : १९९७ ते २००७

१९९७ ते २००७ या काळातील जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचा एकत्रित विचार करता असे दिसून येते की, काँग्रेस पक्षांचे वर्चस्व राहिलेले आहे. मात्र १९९९ साली काँग्रेस विभाजनातून निर्माण झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने २००२ पासून काँग्रेस पक्षाला आव्हान निर्माण केलेले आहे. २००२ साली झालेल्या निवडणुकीत राष्ट्रवादीने सर्वाधिक जागा जिंकल्या. तर २००७ साली पुन्हा काँग्रेस पक्षाने राष्ट्रवादीला आव्हाने देत सर्वाधिक जागा जिंकल्या. स्थानिक राजकारणात भाजप – सेना या पक्षाला साधे निवडणुकीच्या परिघावर देखील येता आले नाही. चारही निवडणुकीचा विचार करता भाजपाला २१ आणि शिवसेनेला १९ जागा मिळालेल्या आहेत. जनता दल या पक्षाला केवळ १९९२ साली केवळ दोनच जागा मिळाल्या होत्या. त्यानंतर एकही जागा स्थानिक राजकारणात मिळवता आली नाही. हीच अवस्था भारतीय कमुनिस्ट पक्षाची झालेली दिसून येते. या पक्षालाही १९९७च्या निवडणुकीत १ जागा मिळाली होती. शेतकरी विचार दल २००२च्या निवडणुकीत पुढे आला तसेच ७ जागा निवडून आणत राजकारणात पुढे येईल अशी अपेक्षा असताना २००७ च्या निवडणुकीत एकही जागा निवडून आणता आली नाही. तालुका विकास आघाडीला १९९७ साली चांगले यश मिळालेले दिसून येते. (पहा तक्ता क्र. ८.१५) मात्र त्यानंतर त्यामध्ये सातत्य राखता आले नाही. अपक्ष नेतृत्वाची संख्या देखील प्रत्येक निवडणुकीत कमी कमी होत गेल्याचे दिसून येते. १९९७ ते २००७ या काळाचा विचार करता निवडणुकीत काँग्रेस, राष्ट्रवादी या दोन्हीत स्पर्धा असताना दिसून येते. त्याच वेळी सेना – भाजपला मर्यादित यश मिळाले. त्यामुळे या चार पक्षांमध्ये जिल्हा परिषदेचे नेतृत्वाचे केंद्रीकरण होत असताना दिसून येते.

तक्ता क्र. ८.१५

**१९९२ ते २००७ जिल्हा परिषद नेतृत्व आणि राजकीय पक्ष**

| अ. क्र | राजकीय पक्ष | १९९२ | १९९७ | २००२ | २००७ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | ४८ | ५६ | १९ | ३१ | १५४ |
| २ | राष्ट्रवादी काँग्रेस | — | — | ३० | २६ | ५६ |
| ३ | शिवसेना | २ | ३ | ८ | ६ | १९ |
| ४ | भाजपा | १ | ७ | ८ | ५ | २१ |
| ५ | जनता दल | २ | — | — | — | ०२ |
| ६ | शेतकारी विचार दल | — | — | ७ | — | ०७ |
| ७ | भारतीय कम्युनिस्ट | १ | — | ० | — | ०१ |
| ८ | तालुका विकास आघाडी | ० | ४ | १ | ५ | १० |
| ९ | अपक्ष | ८ | ४ | २ | १ | १५ |
| १० | एकूण | ६२ | ७४ | ७५ | ७४ | २८५ |
| आधार : संशोधकाने प्रत्यक्षात जमा केलेली माहिती आणि निवडणूक आयोगाचा अहवाल १९९२ ते २००७ | | | | | | |

## जि. प. निवडणूक आणि राजकीय नेतृत्वाच्या जातींची पार्श्वभूमी

१९९२ ते २००७ या काळातील जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचा विचार करता असे दिसून येते की, सर्वच निवडणुकीत मराठा समाजाचे वर्चस्व असल्याचे स्पष्ट होते. एक मात्र १९९७ साली ओबीसी समाज घटकांना राजकीय आरक्षण लागू केल्यानंतर मराठा समाजाचे संख्याबळ कमी होत ओबीसीचे संख्याबळ वाढलेले आहे. खुल्या जागेवर मराठेतर मारवाडी, लिंगायत आणि मुस्लिम या तीनच समाज घटकांना संधी मिळाल्याचे दिसून येते. लिंगायत समाजाच्या नेतृत्वाला १९९२ साली संधी मिळाली होती. ती संधी पुढे टिकवता आली नाही. तर मारवाडी समाजाच्या नेतृत्वाला १९९२, १९९७ आणि २००२ या निवडणुकीत संधी मिळाली होती. मात्र तीच संधी २००७ च्या निवडणुकीत टिकवता आली नाही. एकदंर खुल्या जागेवर मराठा समाजाचे

नेतृत्व वर्चस्व असल्याने इतर समाजाचे नेतृत्व हे परिघाच्या बाहेर फेकले गेल्याचे दिसून येते.

ओबीसी समाज घटकांच्या नेतृत्वाचा विचार करता असे दिसून येते की, माळी, वंजारी आणि धनगर समाज घटकांना जास्त प्रमाणावर संधी मिळालेली आहे. १९९७ नंतर राजकीय आरक्षणामध्ये स्थानिक पातळीवरील ओबीसी समाज घटकांतील नेतृत्वाला पुढे येता आले. मात्र संख्येने जास्त असलेल्या माळी, धनगर आणि वंजारी या समाज घटकांना या आरक्षणाचा लाभ उठवता आला. इतर लहान समाज घटकांना राजकीय आरक्षणाचा फायदा झाल्याचे दिसून येत नाही. तरीही तेली, सोनार, कोष्टी, गोसावी या ओबीसीतील संख्येने कमी असलेल्या समाज घटकांना स्थानिक राजकारणात राजकीय प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळालेली आहे. ओबीसीला राजकीय आरक्षण लागू झाल्यानंतर वंजारी समाजाचे स्थानिक राजकारणातील नेतृत्व प्रतिनिधीत्वामध्ये सातत्य राहिल्याचे दिसून येते. त्यास स्थानिक पातळीवर काही मतदारसंघात संख्येने जास्त असल्याचे सबळ कारण आहे. त्यामुळे राजकीय पक्षांना बेरजेच्या कारणांनी संख्येने जास्त असलेल्या मतदारसंघातून उमेदवारी द्यावी लागलेली आहे. माळी आणि धनगर समाजाचे स्थानिक पातळीवरील प्रतिनिधीमध्ये सातत्याने चढउतार होत असताना दिसून येते. उदा. धनगर समाजाकडे पाहिले असता १९९२ साली केवळ २ सदस्य जि. प. निवडून आले होते. तेच १९९७ साली ६ सदस्य निवडून आले. तर २००२ साली झालेल्या निवडणुकीत एकने वाढ होत ७ सदस्य निवडून आले. मात्र २००७ साली झालेल्या निवडणुकीत केवळ २ सदस्यावर समाधान मानावे लागले. अशा प्रकारे चढउतार माळी समाजात देखील होत असताना दिसून येते. (पहा तक्ता क्र. ८.१६) ओबीसींना राजकीय आरक्षण लागू झाल्यानंतर कुणबी समाजाचे सदस्य मोठ्या प्रमाणावर वाढलेले दिसून येते. २००७ साली तर २२ उमेदवार स्थानिक राजकारणात निवडून आले. दुसरे असे की, राजकीय आरक्षण लागू झाल्यानंतर ओबीसीतील छोट्या जातींपैकी केवळ सोनार समाजाच्या एका उमेदवाराला निवडून येता आले.

अनुसूचित जातींचा विचार करता असे दिसून येते की, १९९२ नंतर राखीव जागेचे प्रमाण देखील वाढलेले आहे. त्याच प्रमाणात अनुसूचित जातींचे सदस्य देखील वाढलेले आहे. उदा. १९९२ साली ७ जागा अनुसूचित जातींगटासाठी राखीव होत्या. त्याच १९९७ साली १० जागा राखीव झाल्या. अर्थात ३ जागेने वाढ झालेली दिसून येते. अनुसूचित जातींगटामध्ये महार, चर्मकार, मांतग, ढोर, होलार या समाज घटकांना स्थानिक राजकारणात प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाली. त्यात मांतग, चर्मकार आणि नवबौध्द समाजाकडून सातत्याने उमेदवार निवडून येत राहिला. मात्र ढोर आणि होलार या दोन समाजाला सातत्य राखता आले नाही. अनुसूचित जातींमध्ये नवबौध्द समाजाचे उमेदवार जास्त प्रमाणावर निवडून येण्याचे प्रमाण राहिले आहे. चर्मकार आणि मांतग समाजाचे उमेदवार निवडून आले. मात्र प्रमाण हे कमी राहिले. अर्थात अनुसूचित जातींगटासाठी राखीव असलेल्या मतदारसंघातून नवबौध्द समाजाच्या राजकीय नेतृत्वाला फायदा मोठ्या प्रमाणावर मिळत असल्याचे स्पष्टपणे पुढे येते. इतर समाजाला त्याचा समान पातळीवर फायदा होतो असे दिसून येत नाही.

अनुसूचित जमातीचा विचार करता असे दिसून येते की, मतदारसंघात सातत्य राहिलेल नाही. १९९२ साली केवळ तीन मतदारसंघ राखीव होते. त्याच मतदारसंघातून उमेदवार निवडून आले. १९९७ साली १० जागा राखीव राहिल्या. तर २००२ साली पुन्हा राखीव मतदारसंघ कमी होत ५ झाले. तर २००७ साली पुन्हा ५ मतदारसंघ राखीव होते. अनुसूचित जमाती हे अकोले, संगमनेर आणि काही प्रमाणात पारनेर या तालुक्यात असताना दिसून येते. मात्र अकोले आणि संगमनेर या दोन तालुक्यातूनच राखीव मतदारसंघ राहत आलेले आहेत. त्यात ठाकर, महादेव कोळी आणि भिल्ल या समाजाला स्थानिक पातळीवर सत्तेत राजकीय प्रतिनिधीत्व करता आलेले आहे. महोदव कोळी या अनुसूचित जमातीमधील जातींतून सर्वाधिक राजकीय नेतृत्व निवडून आलेले आहे.

## तक्ता क्र. ८.१६

## १९९२ ते २००७ या काळातील जिल्हा परिषदेचे नेतृत्व आणि नेतृत्वाचे जातीगट

| अ.क्र | जातीगट | १९९२ | १९९७ | २००२ | २००७ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठा | ४३ | ३४ | ३५ | २६ | १३८ |
| २ | लिंगायत | १ | ० | ० | ० | १ |
| ३ | मुस्लिम | ० | १ | ० | ० | १ |
| ४ | मारवाडी | १ | १ | १ | ० | ३ |
| ५ | माळी | ४ | ४ | ६ | १ | १५ |
| ६ | धनगर | २ | ६ | ७ | २ | १७ |
| ७ | वंजारी | १ | ५ | ५ | ७ | १८ |
| ८ | कुणबी | ० | १ | ४ | २२ | २७ |
| ९ | तेली | ० | १ | १ | ० | ०२ |
| १० | सोनार | ० | १ | ० | १ | ०२ |
| ११ | गोसावी | ० | १ | ० | ० | ०१ |
| १२ | कोष्टी | १ | ० | ० | ० | ०१ |
| १३ | महार | ४ | ३ | ८ | ५ | २० |
| १४ | मातंग | १ | २ | २ | २ | ०७ |
| १५ | चर्मकार | ० | ३ | १ | १ | ०५ |
| १६ | ढोर | १ | ० | ० | ० | ०१ |
| १७ | होलार | ० | १ | ० | ० | ०१ |
| १८ | ठाकर | ० | ० | ० | २ | ०२ |
| १९ | म. कोळी | ३ | ८ | ५ | १ | १७ |
| २० | भिल्ल | ० | २ | ० | ४ | ०६ |
| २१ | एकूण | ६२ | ७४ | ७५ | ७४ | २८५ |

आधार : संशोधकाने लेखकाने प्रत्यक्षात जमा केलेली माहिती आणि विविध राजकीय नेतृत्वाच्या मुलाखती.

## जिल्ह्याचे पक्षीय राजकारण : (१९९२ ते २००७)

१९९०च्या विधानसभा निवडणुकीपासून महाराष्ट्राच्या विविध प्रदेशातील राजकीय अंतर जास्त स्पष्टपणे पुढे आले. शिवसेना, भाजप यांच्या युतीचा १९९०च्या निवडणुकीत राजकीय उदय झाला. मुंबई, विदर्भ आणि मराठवाडा या भागात युतीने काँग्रेसला दणका दिला. काँग्रेसला पर्यायी शक्तींचा पश्चिम महाराष्ट्राच्या बाहेर उदय झाला आणि या घडामोडीचा परिणाम बंडखोरीच्या रूपाने पश्चिम महाराष्ट्रावर १९९५ मध्ये झाला. परंतु जिल्हापातळीवर काँग्रेसने आपले स्थान टिकवून ठेवले आहे. काँग्रेस पक्षात १९९९मध्ये फूट पडली. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाच्या स्थानिकीकरणाला आणखी बळकटी आली. राष्ट्रवादी काँग्रेस हा निव्वळ 'मराठा पक्ष' झाला आहे. (बिरमल, १९९९) या घडामोडींमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात एक महत्त्वाचे स्थित्यांतर घडून येत आहे.

अहमदनगर जिल्हापरिषदेच्या १९९२ ते २००७ या चार निवडणुकांचा अभ्यास पक्षीय राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. काँग्रेस पक्षाला १९९२ मध्ये २९.७६ टक्के सदस्य होते. १९९७च्या निवडणुकीत ४१.४४ टक्के सदस्य होते. २००२च्या निवडणुकीत १४.२५ टक्के तर २००७ च्या निवडणुकीत ४१.९० टक्के सदस्य निवडून आले होते. चार निवडणुकात एकूण २८५ सदस्य होते. त्यापैकी काँग्रेस पक्षाचे ५४.०३ टक्के सदस्य निवडून आले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे २००२ ते २००७ या दोन निवडणुकीत १९.६४ टक्के सदस्य निवडून आले होते. अहमदनगर जिल्ह्यात काँग्रेस पक्षाचे स्थान बळकट असल्याचे दिसून येते. शिवसेनेचे चारही निवडणुकात केवळ ६.६६ टक्के सदस्य निवडून आले होते. भाजपचे देखील ७.३६ टक्के सदस्य होते. शिवसेना, भाजप यांचा स्थानिक राजकारणातील जनाधार अल्पसा दिसतो. जनता दलाचे १९९२ च्या निवडणुकीत ०.७० टक्के सदस्य होते. तीन निवडणुकात या पक्षाचे सदस्य निवडून आले नाहीत. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा ०.३५ टक्के सदस्य होते. तालुका विकास आघाडीचे चार निवडणुकात ३.५० टक्के सदस्य होते. शेतकरी विचार दलाचे २.४५

टक्के सदस्य निवडून आले होते तर अपक्ष ५.६१ टक्के सदस्य निवडून आले होते. (पहा तक्ता क्र. ८.१७)

**तक्ता क्र. ८.१७**

**जि.प. सदस्यांचे राजकीय पक्षानुसार राजकीय नेतृत्वाची संख्या आणि टक्केवारी : (१९९२, १९९७, २००२, २००७ निवडणुका)**

| अ.क्र | राजकीय पक्ष | १९९२ ते २००७ काळातील सदस्य संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | १५४ | ५४.०३ |
| २ | राष्ट्रवादी काँग्रेस | ५६ | १९.६४ |
| ३ | शिवसेना | १९ | ६.६६ |
| ४ | भाजप | २१ | ७.३६ |
| ५ | जनतादल | २ | ०.७० |
| ६ | भा. क. प | ०१ | ०.३५ |
| ७ | ता. वि. आघाडी | १० | ३.५० |
| ८ | शेतकरी विचार दल | ०७ | २.४५ |
| ९ | अपक्ष | १६ | ५.६१ |
| **१०** | **एकूण** | **२८५** | **१००** |

आधार : निवडणूक आयोगाचा अहवाल १९९२ ते २००७

## जिल्ह्याचे जातीगटाचे राजकारण (१९९२ ते २००७) :

अहमदनगर जिल्हापरिषदेच्या १९९२ ते २००७ या चार निवडणुकात जिल्ह्यातील कोणते जातीगट जिल्ह्याच्या राजकारणात सहभागी झाले याचे विश्लेषण (पहा तक्ता क्र. ८.१८) नुसार करण्यात येणार आहे. चार निवडणुकात एकूण २८५ सदस्य निवडून आले होते. मराठा जातीगटांचे १४० सदस्य निवडून आले होते. काँग्रेस ८४, राष्ट्रवादी काँग्रेस २१, शिवसेना ८, भाजप ७, जनतादल १, भाकप १, तालुका विकास आघाडी ४, शेतकरी विचार दल ५ व अपक्ष ९ असे पक्षीय स्वरूप होते. जैन जातीचा १ सदस्य भाजप पक्षाकडून निवडून आला होता. मारवाडी समाजाचे २ सदस्य काँग्रेस पक्षाचे होते. लिंगायत १ सदस्य काँग्रेस पक्षाकडून निवडून आला होता.

माळी समाजाचे एकूण सदस्य १५ निवडून आले होते. काँग्रेस ६, राष्ट्रवादी काँग्रेस ३, शिवसेना १, भाजप ३, जनतादल १, तालुका विकास आघाडी १ असे पक्षीय स्वरूप होते. धनगर जातीगटांचे एकूण १७ सदस्य निवडून आले होते. काँग्रेस १०, राष्ट्रवादी काँग्रेस ३, भाजप २, तालुका विकास आघाडी १, शेतकरी विचार दल १ असे पक्षीय स्वरूप होते. वंजारी जातीगटांचे चार निवडणुकात १८ सदस्य निवडून आले होते. काँग्रेस ७, राष्ट्रवादी काँग्रेस २, शिवसेना २, भाजप ४, अपक्ष २ असे पक्षीय स्वरूप होते.

कुणबी जातीगटांचे चार निवडणुकात २६ सदस्य निवडून आले होते. काँग्रेस १०, राष्ट्रवादी काँग्रेस ७, शिवसेना ३, भाजप ४, अपक्ष २ असे पक्षीय स्वरूप होते. कोष्टी जातीगटाचा १ सदस्य काँग्रेस पक्षाकडून निवडून आला होता. तेली गटाचे २ सदस्य निवडून आले होते. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून प्रत्येकी १ सदस्य निवडून आले होते. सोनार जातीगटाचे २ सदस्य काँग्रेस पक्षाकडून निवडून आले होते. गोसावी जातीगटाचा १ सदस्य काँग्रेस पक्षाकडून निवडून आला होता.

अनुसूचित जाती प्रवर्गातून एकूण चार निवडणूकात १९ सदस्य नवबौध्द जातीचे होते. काँग्रेस ७, राष्ट्रवादी काँग्रेस ६, शिवसेना ३, तालुका विकास आघाडी १, अपक्ष २ असे पक्षीय स्वरूप होते. ढोर जातीगटाचा १ सदस्य काँग्रेस पक्षाकडून निवडून आला होता. मातंग जातीगटाचे एकूण ७ सदस्य निवडून आले होते. काँग्रेस ३, राष्ट्रवादी काँग्रेस ४ व अपक्ष १ असे सदस्य होते. चर्मकार समाजाचे एकूण ५ सदस्य होते. काँग्रेस ४, शेतकरी विचार दल १ असे पक्षीय स्वरूप होते. होलार जातीगटाचा १ सदस्य अपक्ष निवडून आला होता.

अनुसूचित जमाती प्रवर्गातून भिल्ल जातीगटांचे ६ सदस्य निवडून आले होते. काँग्रेस ३, राष्ट्रवादी काँग्रेस २, शिवसेना १ तर महादेव कोळी जातीगटाचे १७ सदस्य निवडून आले होते. काँग्रेस १०, राष्ट्रवादी काँग्रेस ६, शिवसेना १ असे पक्षीय स्वरूप होते. ठाकर जातीगटाचे २ सदस्य निवडून आले होते. काँग्रेस १, राष्ट्रवादी काँग्रेस १ असे पक्षीय स्वरूप होते.

## तक्ता क्र.८.१८

## जिल्हा परिषद सदस्यांचे पक्ष व जातीगटांचे वर्गीकरण

| अ.क्र | जातीगट | काँग्रेस | राष्ट्रवादी | शिवसेना | भाजप | जनता दल | भाकप | ता.वि.आ | शे.वि.दल | अपक्ष | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठा | ८४ | २१ | ०८ | ०७ | ०१ | ०१ | ०४ | ०५ | ०९ | १४० |
| २ | जैन | — | — | — | ०१ | — | — | — | — | — | ०१ |
| ३ | मारवाडी | ०२ | — | — | — | — | — | — | — | — | ०२ |
| ४ | लिंगायत | ०१ | — | — | — | — | — | — | — | — | ०१ |
| ५ | माळी | ०६ | ०३ | ०१ | ०३ | ०१ | — | ०१ | — | — | १५ |
| ६ | धनगर | १० | ०३ | — | ०२ | — | — | ०१ | ०१ | — | १७ |
| ७ | वंजारी | ०७ | ०२ | ०३ | ०४ | — | — | — | — | ०२ | १८ |
| ८ | कुणबी | १० | ०७ | ०३ | ०४ | — | — | — | — | ०२ | २६ |
| ९ | कोष्टी | ०१ | — | — | — | — | — | — | — | — | ०१ |
| १० | मुस्लिम | ०१ | — | — | — | — | — | — | — | — | ०१ |
| ११ | तेली | ०१ | ०१ | — | — | — | — | — | — | — | ०२ |
| १२ | सोनार | ०२ | — | — | — | — | — | — | — | — | ०२ |
| १३ | गोसावी | ०१ | — | — | — | — | — | — | — | — | ०१ |
| १४ | नवबौध्द | ०७ | ०६ | ०३ | — | — | — | ०१ | — | ०२ | १९ |
| १५ | ढोर | ०१ | — | — | — | — | — | — | — | — | ०१ |
| १६ | मातंग | ०३ | ०३ | — | — | — | — | — | — | ०१ | ०७ |
| १७ | चर्मकार | ०४ | — | — | — | — | — | — | ०१ | — | ०५ |
| १८ | होलार | — | — | — | — | — | — | — | — | ०१ | ०१ |
| १९ | भिल्ल | ०३ | ०२ | ०१ | — | — | — | — | — | — | ०६ |
| २० | म. कोळी | १० | ०६ | ०१ | — | — | — | — | — | — | १७ |
| २१ | ठाकर | ०१ | ०१ | — | — | — | — | — | — | — | ०२ |
| २२ | एकूण | १५५ | ५५ | २० | २१ | ०२ | ०१ | ०७ | ०७ | १७ | २८५ |

टीप: १९९२=६२, १९९७=७४, २००२=७५, २००७=७४, एकूण=२८५

आधार: संशोधकाने प्रत्यक्षात जमा केलेली माहिती आणि राजकीय अभिजनाच्या मुलाखतीचा आधार

सारांश रूपाने १९९२ ते २००७ या काळातील जिल्हा परिषदेत राजकीय नेतृत्व करत असलेल्या नेतृत्वामध्ये मराठा समाजाचे सर्वच निवडणुकीत वर्चस्व राहिलेले आहे. मात्र राखीव जागेच्या सकारात्मक निर्णयामध्ये छोट्या आणि मागास समाज घटकांना देखील प्रतिनिधित्व करण्यास संधी मिळालेली आहे. राजकीय आरक्षण मिळालेल्या जातींगटातून संख्येने असलेल्या समाजघटकांना राखीव जागेतंर्गत वर्चस्व मिळवता आले आहे. उदा. अनुसूचित जातीगटातून नवबौध्द, चर्मकार आणि मांतग समाजाचे उमेदवार जास्त प्रमाणावर निवडून आले आहेत. तर अनुसूचित जमातीमध्ये महादेव कोळी, ठाकर आणि भिल्ल या समाज घटकांचे प्रतिनिधित्व जास्त प्रमाणावर निवडून आले आहे. ओबीसीमधून माळी, धनगर, वंजारी आणि कुणबी या समाजाचे ओबीसीसाठीच्या राखीव जागेवर वर्चस्व मिळवलेले आहे. दुसरे असे सकारात्मक दृष्टीने राखीव मतदारसंघ मागास आणि अनुसूचित जातीं – जमातीसाठी असल्याने स्थानिक पातळीवर प्रतिनिधित्व करण्याचा एक समतोल आलेला आहे. परिणामी स्थानिक पातळीवरील लोकशाही एक सक्षमीकरण्याच्या दिशेने जाणारे दिसून येते. किमान पातळीवर सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या समाज घटकांना स्थानिक सत्तेत सहभागी होता आले. परिणामी स्थानिक पातळीवर सर्व समाज घटकांमध्ये राजकीय आणि आर्थिक गतीशिलता निर्माण झालेली दिसून येते.

## अहमदनगर महानगरपालिकेचे राजकारण

अहमदनगर महानगरपालिकेची स्थापना ३० जून २००३ रोजी झाली. या नंतर १४ डिंसेबर २००३ रोजी महानगरपालिकेची प्रथम निवडणूक झाली.

## अहमदनगर शहराचे राजकारण :

१९६२ ते १९७२ च्या दरम्यान कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व अहमदनगर शहरात होते. त्र्यंबक शिवराम भारदे (१९६२) एस. व्ही. निसाळ (१९६७), बारसीकर नारायण दास (१९७२) यांनी अहमदनगर शहरातील कॉंग्रेस पक्षावरती नियंत्रण ठेवले होते. परंतु

अहमदनगर शहरात काँग्रेस पक्षांतर्गत एकच नेतृत्व वाढले नाही. १९६२—१९६७ व १९७२ अशा तीन वेळा नेतृत्व बदलले गेले. १९७८ मध्ये जनता पक्षाने अहमदनगर दक्षिण हा मतदारसंघ जिंकून घेतला. कुमार सप्तर्षी या मतदारसंघातून निवडून आले. त्यांनी काँग्रेस पक्षाच्या आणीबाणीला विरोध केला होता. यानंतर १९८०मध्ये अहमदनगर शहरात अंतुले गटाचे आसीर एस. एम. आय यांनी अहमदनगर मतदारसंघ जिंकून घेतला. काँग्रेस पक्षाला मुस्लिम समाजाचा पाठिंबा मिळालेला दिसून येतो. परंतु यामुळे मुस्लिम विरोधी हिंदू असे शहरात राजकारण उभे राहिलेले दिसून येते. (कळमकर दादा) १९८५च्या निवडणुकीत पुन्हा काँग्रेस पक्षाचा पराभव भारतीय समाजवादी काँग्रेसने केला. भारतीय समाजवादी काँग्रेस पक्षाकडून दादासाहेब कळमकर निवडून आले होते. १९९० ते २००४ अशा चार विधानसभा निवडणुकीत हा मतदारसंघ शिवसेनेने जिंकून घेतला. अनिल राठोड यांनी हिंदू—मुस्लिम असे मताचे विभाजन करून शहराच्या राजकारणावर नियंत्रण ठेवले. थोडक्यात अहमदनगर शहरात काँग्रेस वर्चस्व दिसून येत नाही. अहमदनगर शहराचे राजकारण १९६२ ते १९७२ पर्यंत काँग्रेस पक्षाच्या नियंत्रणाखाली होते. १९७८ ते १९८५ मध्ये जनता पक्ष व भारतीय समाजवादी काँग्रेसच्या माध्यमातून राजकारण केले गेले. या दोन्ही पक्षांना शहरात त्याचा विस्तार करता आला नाही. त्यामुळे शहराच्या राजकारणात नेतृत्वाची पोकळी शिल्लक राहिली. ही भरून काढण्याचे काम शिवसेनेने केले. थोडक्यात अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामीण राजकारण काँग्रेसच्या नियंत्रणाखाली असले तरी अहमदनगर शहरात मात्र काँग्रेसचे वर्चस्व दिसत नाही. तसेच अहमदनगर जिल्हातील ग्रामीण भागात मराठा नेतृत्व वाढले. परंतु शहराच्या राजकारणात मराठा नेतृत्वाला सामाजिक व आर्थिक पाठिंबा मिळालेला दिसत नाही. हे अहमदनगर शहराच्या राजकारणाचे एक वेगळे वैशिष्ट दिसून येते. अहमदनगरचे राजकारण ग्रामीण हितसंबंध जपण्यासाठी सतत प्रयत्नशील असलेले दिसते. परंतु याबरोबरच नव्याने उदयास आलेली निमशहरे व शहरे यांचे राजकारण ग्रामीण राजकारणापेक्षा वेगळे आहे. येथील राजकीय प्रक्रिया हिंदू—मुस्लिम यांच्यातील तणावातून घडत गेली आहे. त्यामुळे

अहमदनगरच्या राजकारणात हिंदुत्ववादी राजकारण १९९० नंतर पुढे आले. यास निमशहरांची वाढ व शहरी भागातील हिंदू–मुस्लिम तणाव कारणीभूत ठरला.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थापना जून २००३ मध्ये झाली. यानंतर १४ डिसेंबर २००३ रोजी महानगरपालिकेची प्रथम निवडणूक झाली. जून २००३ ते डिंसेबर २००३ पर्यंत राजगोपाल देवरा हे प्रशासक व बी. डी. सानप हे आयुक्त होते. त्यांनी महानगरपालिकेचा कारभार पाहिला. या काळात महानगरपालिकेच्या राजकारणाचे डावपेच आखले गेले. हा एक या निवडणुकीचा संदर्भ असण्याबरोबरच दुसरा संदर्भ हा अहमदनगर शहरातील आर्थिक वर्चस्वाला व समाजव्यवस्थेच्या रचनेचाही होता. त्यामुळे महानगरपालिकेच्या निवडणुकीत अहमदनगर शहरातील सामाजिक व आर्थिक प्रश्न पुढे आले. या प्रश्नांभोवती राजकारण उभे करण्याचा प्रयत्न भाजप, शिवसेना, दोन्ही कॉंग्रेस व इतर पक्षांनी केला.

## अहमदनगर नगरपालिका :

इतर मागासवर्गीय व महिला आरक्षणानंतर अहमदनगर नगरपालिकेची निवडणूक १९९७ व २००२ मध्ये झाली होती. १९९७ च्या नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये एकूण ५३ जागांसाठी निवडणूक झाली. या निवडणुकीमध्ये भाजप–शिवसेना युती होती. तर कॉंग्रेसने ही निवडणूक पक्षाच्या चिन्हावरती लढविली नाही. नगरपालिकेच्या या निवडणुकीमध्ये भाजप–शिवसेना युतीला ५३ पैकी १५ जागा मिळाल्या. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला १ जागा मिळाली. तर ३७ जागांवरती अपक्ष प्रतिनिधी निवडून आले. अपक्ष नगरसेवक कॉंग्रेस पक्षाशी संबंधित होते. परंतु राज्यामध्ये असलेले युतीचे सरकार व माळी समाजाची एकजूट यामुळे १९९७च्या अहमदनगर नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये भाजपला प्रथमच सत्ता प्राप्त करता आली. अभय आगरकर (माळी) यांनी अपक्ष नगरसेवकांचा पाठिंबा मिळवला. त्यामुळे अरूण जगताप गटाचा पराभव

झाला. या निवडणूक प्रक्रियेचा फटका काँग्रेस पक्षाला बसला. काँग्रेसकडून सत्ता भाजपकडे गेली. (१९९७—२००२)

डिसेंबर २००१मध्ये महाराष्ट्रात झालेल्या नगरपालिका निवडणुकांबरोबर अहमदनगर नगरपालिकेची निवडणूक घेतली नाही. कारण त्यावेळी महाराष्ट्र राज्य सरकारने अहमदनगरला महानगरपालिका घोषित केली होती. इतर महानगरपालिका निवडणूक कार्यक्रमानुसार अहमदनगर महानगरपालिकेची निवडणूक फेब्रुवारी २००२ मध्ये जाहीर केली. अहमदनगर येथील व्यापाऱ्यांनी महानगरपालिका स्थापन झाली तर जकात वाढेल या मुद्यांच्या आधारे महानगरपालिका स्थापनेविरोधी कृती समिती स्थापन केली व औरंगाबाद उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली होती. नगरपालिका निवडणूक प्रक्रिया चालू ठेवावी व १५ डिसेंबर २००१ला निवडणूक घ्यावी असा निर्णय न्यायालयाने दिला. राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. त्यानंतर १३ जानेवारी २००२ रोजी अहमदनगर नगरपालिकेची निवडणूक जाहीर झाली. (कांबळे बाळ, कुलकर्णी, २००४, पृ. २३८) महानगरपालिका निश्चित घोषित होणार म्हणून दोन्ही काँग्रेस पक्षाने निवडणुकीत सहभाग घेतला नाही. अहमदनगर नगरपालिकेची जानेवारी २००२ मध्ये एकूण ६३ जागांसाठी निवडणूक झाली. यापैकी ९ जागांसाठी एकही उमेदवारी अर्ज आला नाही. १४ जागांसाठी बिनविरोध निवडणूक झाली. केवळ ४२ टक्के मतदान झाले. (अहमदनगर मनपा निवडणूक विभाग) भाजपाच्या अनिता आगरकर (माळी) या नगराध्यक्षा झाल्या. (कांबळे बाळ, कुलकर्णी, २००४, पृ. २४०)

## अहमदनगर महानगरपालिकेची निवडणूक : २००३

अहमदनगर शहरात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना व बसप हे प्रमुख पक्ष आहेत. हे पक्ष प्रमुख हितसंबंधाचे दावे करतात. मात्र या व्यतिरिक्त ही भाकप, हिंदू एकता आंदोलन पक्ष, भारिप बहुजन महासंघ, अण्णा हजारे यांचा भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन व समाजवादी पक्ष या पक्षांची शक्ती अहमदनगर शहरात दबाव

गटाच्या स्वरूपात आहे. या पक्षांबरोबरच नगर बचाओ आघाडी, सेवा पॅनल व आनंद पॅनल यांनी ही महानगरपालिका निवडणुकीत सहभाग घेतला होता.

या निवडणुकीत भाजप व शिवसेनेची युती होती. भाजप शिवसेना यांनी मिळून ५८ उमेदवार निवडणुकीला उभे केले होते. शिवसेना ३० व भाजप २८ असे जागा वाटप या दोन्ही पक्षात झाले होते. भाजप–शिवसेना पक्षाच्या विरोधात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व भारिप यांनी युती केली. काँग्रेसने ३९ व राष्ट्रवादी काँग्रेसने २६ जागा लढवण्यासाठी जागा वाटप केले. सर्व पक्ष व अपक्षांचे मिळून ७४६ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज भरले होते. त्यापैकी २४ अर्ज अवैध ठरविण्यात आले. ६५ जागांपैकी २ जागेवरती राष्ट्रीय काँग्रेसचे उमेदवार बिनविरोध निवडून आले. त्यामुळे ६३ जागांसाठी ३५१ उमेदवारांमध्ये १४ डिसेंबर २००३ रोजी निवडणूक झाली. या निवडणुकीमध्ये ६७ टक्के मतदान झाले. (दै. समाचार, अहमदनगर, दि. १६ डिसेंबर २००३) या निवडणुकीमध्ये विविध राजकीय पक्षांकडून गुन्हेगारी व भ्रष्टाचारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना उमेदवारी देण्यात आलेली दिसून येते. काँग्रेस पक्षाकडून ६१ टक्के, राष्ट्रवादी काँग्रेस ४१ टक्के, शिवसेना ५९ टक्के व भाजप ३८ टक्के गुन्हेगारी व भ्रष्टाचारी पार्श्वभूमी असणाऱ्या व्यक्तींना उमेदवारी देण्यात आली होती. (दै. समाचार, अहमदनगर, ९ डिसेंबर २००३)

## नेतृत्वाकडून प्रत्यक्षात पाठिंबा मिळवण्यासाठी मध्यवर्ती आणलेले मुद्दे

शिवसेना व भाजप या दोन पक्षाच्या प्रचारांची सर्व जबाबदारी अनिल राठोड, दिलीप गांधी यांच्यावर होती. भाजपने राष्ट्रवादी काँग्रेसचे शंकरराव घुले यांना भाजपात प्रवेश दिला. त्यांच्यावरती प्रचाराची मुख्य जबाबदारी होती. एक आमदार, एक खासदार व राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षांतरीत शंकरराव घुले यांनी सुरूवातीपासून प्रचारात आघाडी घेतलेली होती. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रचाराची जबाबदारी अरूण जगताप, भानुदास कोतकर आणि दादाभाऊ कळमकर यांच्यावरती होती. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भारिप व भाजप शिवसेनेच्या जाहिरनाम्यात घरपट्टी, पाणीपट्टी कमी करणे, शहरात

नागरी सुविधा वाढविणे, रस्ते, भुयारी गटारे, आरोग्य स्वच्छता, पाणीपुरवठा, जकात कर लागू करणे असे समान मुद्दे मांडले. शिवसेना भाजप युतीने प्रचारात भयमुक्त नगरची घोषणा करून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व भारिप या आघाडीच्या गुंडगिरी व दहशतीवर टीका केली. नगरपालिकेतील युतीच्या भ्रष्टाचाराचा मुद्दा आघाडीने प्रचारात मांडला. काँग्रेसने प्रदेशाध्यक्ष रणजित देशमुख यांनी शिवसेना भाजपवर जातीयवादाचा आरोप केला. त्यांनी अहमदनगर शहरातील स्थानिक प्रश्न प्रचारात मांडले नाहीत. राष्ट्रवादी काँग्रेसचे दादाभाऊ कळमकर, नंदकुमार पवार, भानुदास कोतकर, शिवाजी कर्डिले, बाळासाहेब थोरात यांनी प्रचार केला. मात्र या नेत्यांमध्ये एकवाक्यता व एकसंघपणा दिसून आला नाही. ग्रामीण भागातील नेतृत्व महानगरपालिका निवडणुकीत सक्रिय नव्हते. शिवसेना व भाजप यांनी एकत्रित व नियोजनपूर्वक प्रचार केला. गोपीनाथ मुंडे यांनी सभा घेतली व शहरातील दहशतवाद व गुंडगिरी हे मुद्दे मांडले. (दै. सकाळ, अहमदनगर, १२ डिसेंबर २००३) शिवसेनेचे आमदार अनिल राठोड यांनी नगरकरांची आर्थिक परिस्थिती पाहता नगरला महानगरपालिका परवडणार नाही व जर महानगरपालिकेमध्ये युतीची सत्ता आली तर पुन्हा नगरला नगरपालिका करण्याचा प्रयत्न करणार आहोत हा मुद्दा मांडला. (दै. सकाळ, अहमदनगर, ९ डिसेंबर २००३) काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री व राज्यपातळीवरील नेते मात्र प्रचारापासून दूरच होते. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी खासदार दादा पाटील शेळके व त्यांचे समर्थक भाजप व शिवसेनेच्या उमेदवारांना निवडून द्या या पध्द्तीने प्रचार करीत होते. (दै. सकाळ, अहमदनगर, १२ डिसेंबर २००३) त्यामुळे प्रचारात शिवसेना भाजपाने आघाडी घेतली होती. तसेच लाल निशान पक्षाचे नेते मधुकर कात्रे यांनी महानगरपालिका आर्थिक साधन तातडीने उपलब्ध झाले पाहिजे यासाठी जकात सुरू करावी हा मुद्दा प्रचाराच्या दरम्यान मांडला. (दै. सकाळ, अहमदनगर, १२ डिसेंबर २००३), भाकपचे नेते ॲड. राम रत्नाकर यांनी भ्रष्टाचाराबरोबरच चारित्र्य, शिक्षण व कार्यक्षमता हे मुद्दे प्रचारामध्ये मांडले.

## नेतृत्वाकडून झालेली बंडखोरी

काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना व भारिप पक्षांना महानगरपालिकेच्या या निवडणुकीमध्ये मोठ्या प्रमाणावरती बंडखोरीला सामोरे जावे लागले. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष शंकरराव घुले, रावसाहेब अनभुले, इचरजबाई अनेचा, माजी आमदार ना. ज. पाऊलबुध्दे, माजी नगरसेवक आसाराम कावरे ह्या व्यक्ती पक्षावरती नाराज होत्या. घुले व कावरे यांनी तर पक्षाच्या विरोधी बंडखोरी केलेली दिसते. (दै. सकाळ, अहमदनगर, ४ डिसेंबर २००३)

अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाच्या तीनही उमेदवारांची एकत्रित मतसंख्या एक हजाराच्या वर नाही. तसेच समाजवादी पक्षाच्या सहा उमेदवारांची व भाकपच्या चार उमेदवारांना देखील फार कमी मतदान झाले. एकूणच अहमदनगर महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये राजकीय पक्ष वगळता इतर आघाड्या व अपक्ष उमेदवारांना कोणतेही स्थान मिळाले नाही. निवडून आलेल्या ६५ सदस्यात पैसा, गुंडगिरी अथवा जातीयवादाचा अजिबात आधार न घेता निवडून आलेला एकही सदस्य नाही. (दै. समाचार, अहमदनगर, २५ डिसेंबर २००३)

१,८६,८५७ मतदारांपैकी १,२५,६१३ इतक्या मतदारांनी मतदान केले. म्हणजे ६७.२२ टक्के मतदान झाले. पुरूषांपेक्षा महिलांचे मतदान जास्त झाले. विक्रमी मतदान झाले. पक्ष व संघटना यांना मते देण्याचा कल अहमदनगर महानगरपालिकेत जास्त आहे. ६६.३३ टक्के मतदाते पक्ष व संघटनेला मते देतात. तर ३३.६१ टक्के मतदाते बिगर पक्षीय राजकारण करतात. (पहा तक्ता क्र. ८.१९) पक्ष पातळीवर मते देणाऱ्यांचे तीन गट आहेत. दोन्ही काँग्रेस पक्षाला २७.७७ टक्के मते मिळाली आहेत. भाकप, बहुजन महासंघ, समाजवादी पक्ष व भारिप या पक्षांना एकत्रितपणे २.७५ टक्के मते मिळाली आहेत. या पक्षांची तिसरी शक्ती आहे. त्यांनी आघाडी करून निवडणूक लढविली नाही. त्यामुळे तिसरी शक्ती विखुरलेली होती.

तक्ता क्र. ८.१९

पक्षनिहाय मतांची टक्केवारी (२००३)

| अ.क्र | पक्ष | टक्के |
|---|---|---|
| १ | शिवसेना | २१.३५ |
| २ | भाजप | १५.३८ |
| ३ | हिंदू एकता आंदोलन | ०.०८ |
| ४ | काँग्रेस | १५.८८ |
| ५ | राष्ट्रवादी काँग्रेस | १०.८९ |
| ६ | भाकप | ०.५७ |
| ७ | बहुजन महासंघ | १.३३ |
| ८ | समाजवादी पक्ष | ०.६७ |
| ९ | भारिप | ०.१८ |
| १० | अपक्ष | ३३.६१ |

(संदर्भ अहमदनगर महरनगरपालिका निवडणूक विभाग – २००३ )

## निवडणूक निकाल : २००३

विक्रमी मतदानाचा फायदा शिवसेनेला झाला. शिवसेना हा सर्वात जास्त जागा घेणारा पक्ष ठरला. शिवसेनेच्या १८ (२७.६९ टक्के) जागा निवडून आल्या. या खालोखाल भाजप व काँग्रेसच्या १५ जागा निवडून आल्या. प्रत्येकी २३.०७ टक्के जागा निवडून आल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्वांत कमी म्हणजे ५ जागा निवडून आल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या केवळ ७.६९ टक्के जागा निवडून आल्या आहेत. भाजप व शिवसेनेच्या एकूण ३३ जागा म्हणजेच ५०.७६ टक्के जागा निवडून आल्या आहेत. तर दोन्ही काँग्रेसच्या मिळून २० जागा म्हणजेच ३०.७६ टक्के जागा निवडून आल्या. याचा अर्थ दोन्ही काँग्रेसचा सरळ पराभव झालेला आहे. भाजप शिवसेनेच्या

विरोधात ४९ टक्के जागा गेल्या आहेत. यामध्ये दोन्ही काँग्रेस व भारिप यांनी युती केलेल्या जागा ३१ टक्के आहेत. सेवा पॅनलचे ०२ (३.०७ टक्के) नगरसेवक निवडून आले. तर याशिवाय १० (१५.३८ टक्के) अपक्ष नगरसेवक निवडून आले आहेत.(पहा तक्ता क्र. ८.२०) थोडक्यात शहरी भागात दोन्ही काँग्रेस पक्ष मागे पडत आहेत. शहरी भागातील हितसंबंधाचा दावेदार पक्ष म्हणून अहमदनगर शहरात भाजप शिवसेना युती पुढे आली आहे. भाजप व शिवसेनेच्या जागांमध्ये ५ टक्के जागांचा फरक मात्र आहे. त्यामुळे भाजप पेक्षाही शिवसेना हा पक्ष अहमदनगर शहरातील राजकारणात प्रभावी ठरत आहे.

**तक्ता क्र. ८.२०**

**नगरसेवकांचे पक्षनिहाय वर्गीकरण (२००३)**

| **अ. क्र** | **पक्ष** | **जागा** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | १५ | २३.०७ |
| २ | राष्ट्रवादी काँग्रेस | ०५ | ७.६९ |
| ३ | भाजप | १५ | २३.०७ |
| ४ | शिवसेना | १८ | २७.६९ |
| ५ | सेवा पॅनल | ०२ | ३.०७ |
| ६ | अपक्ष | १० | १५.३८ |
| **७** | **एकूण** | **६५** | **१००** |

(आधार : निवडणूक आयोगाचा अहवाल २००३, अहमदनगर महानगरपालिका)

## अहमदनगर महानगरपालिका निवडणूक २००७

अहमदनगर महानगरपालिकेसाठी ६५ जागासाठी २००७ मध्ये दुसरी निवडणूक झाली (पहा तक्ता क्र. ८.२१) महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना—भाजप यांची युती होती, पण दोन्ही काँग्रेस पक्षांचाही आपसात युती झाली होती. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसमधील एक गट या युतीविषयी नाराज होता. काँग्रेस पक्षाने गुंडगिरीला वाव दिला आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांना उमेदवारी दिली. यावर प्रतिपक्षांकडून भर देण्यात

आली. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसच्या राज्यपातळीवरच्या आणि जिल्हा पातळीवरच्याही नेत्यांनी या निवडणुकीत फार रस घेतला नाही. या साऱ्यांचा एकत्रित परिणाम म्हणून पहिल्या व दुसऱ्या निवडणुकीत शिवसेना व भाजप युतीची सरशी झाली. शिवसेना–भाजप यांनी शहरातील हिंदू–मुस्लिम तणावात वेळोवेळी भर टाकून मतदारांमध्ये हिंदुत्वाला अनुकूल वातावरण निर्माण केले. मात्र शिवसेना–भाजप यांना काठावरचेच बहुमत मिळाले असून अपक्षांना पुढील राजकारणात महत्त्व येणार हे उघड आहे. महापालिका निवडणुकीत काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेस युतीचा प्रयोग फसल्यामुळे शहराच्या राजकारणातील समीकरणांना धक्का बसला. तसेच शिवसेना हा सर्वात मोठा पक्ष म्हणून विजयी झाल्यामुळे शहराची सूत्रे त्या पक्षांकडे राहतील असा या निवडणुकीने कौल दिलेला दिसतो.

**तक्ता क्र. ८.२१**

**अहमदनगर महानगरपालिका निवडणूक निकाल**

| **अ.क्र** | **पक्ष / निवडणूक वर्ष** | **२००७** |
|---|---|---|
| १ | काँग्रेस | १५ |
| २ | राष्ट्रवादी काँग्रेस | ०५ |
| ३ | भाजप | १५ |
| ४ | शिवसेना | १८ |
| ५ | आघाड्या | ०२ |
| ६ | अपक्ष | १० |
| **७** | **एकूण** | **६५** |

आधार : निवडणूक आयोगाचा अहवाल २००७

## निवडणूक निकाल

पक्षीय संख्याबळ पाहत काँग्रेस १५, राष्ट्रवादी काँग्रेस ०५, भाजप १५, शिवसेना १८, आघाड्या ०२, व अपक्ष १० असे आहे. यामध्ये अपक्षांना महत्त्व आले असल्यामुळे त्यांच्या पाठिंब्यावरती सत्ता अंवलबून असेल.

## जातीगट :

अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रथम निवडणुकीसाठी एकूण ६५ जागांसाठी २१ प्रभागात निवडणुका झाल्या. एकूण ६५ वॉर्डपैकी ३९ वॉर्ड सर्वसाधारण गटासाठी होते. त्यापैकी १३ वॉर्ड सर्वसामान्य महिलांसाठी राखीव होते. १८ वॉर्ड इतर मागासवर्गासाठी राखीव होते. त्यापैकी ६ वॉर्ड इतर मागासवर्ग गटातील महिलांसाठी आरक्षित होते. तर ८ वॉर्ड अनुसूचित जातींसाठी राखीव होते. त्यापैकी ३ वॉर्ड अनुसूचित जातीतील महिलांसाठी राखीव होते. (महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग रिपोर्ट : १९९४—२००३, पृ. ५१) त्या वॉर्डमधून निवडून आलेल्या उमेदवाराचे विश्लेषण पुढील प्रमाणे केले आहे.

## अनुसूचित जाती गटातील नगरसेवक :

अनुसूचित जातीगटासाठी ११ जागा राखीव होत्या. त्यापैकी ३ जागा अनुसूचित जातीगटातील महिलांसाठी राखीव होत्या. निवडून आलेल्या ८ पुरूषांच्या जागांपैकी ४ जागा भाजप—शिवसेना युतीने जिंकल्या होत्या. तर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसने प्रत्येकी ३ व अपक्ष उमेदवाराने १ जागा जिंकली होती. अनुसूचित जातीगटातूनही भाजप शिवसेनेकडून ५७ टक्के नगरसेवक निवडून आले आहेत. दोन्ही काँग्रेसचे मिळून ४३ टक्के नगरसेवक निवडून आले आहेत.

## इतर मागासवर्गीय गटातील नगरसेवक :

इतर मागासवर्गीय जातीगटासाठी १८ जागा राखीव होत्या. त्यापैकी ६ जागा इतर मागासवर्गीय जातीगटातील महिलांसाठी राखीव होत्या. १८ जागांपैकी १३ जागा

भाजप–शिवसेना युतीने जिंकल्या होत्या. तर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसने केवळ ५ जागा जिंकल्या आहेत. (पहा तक्ता क्र. ८.२२) इतर मागासवर्गीय नगरसेवकांपैकी ७२.२२ टक्के नगरसेवक भाजप शिवसेनेकडून निवडून आले आहेत. दोन्ही काँग्रेसकडून केवळ २७.७७ टक्के नगरसेवक निवडून आले आहेत. सर्वसाधारण जागेवर केवळ १ इतर मागासवर्गीय उमेदवार निवडून आला आहे. (बंडेलू निलिमा)

## सर्वसाधारण गटातील नगरसेवक :

अहमदनगर महानगरपालिकेसाठी एकूण ३९ जागा सर्वसाधारण गटासाठी होत्या. यापैकी १३ जागा महिला सर्वसाधारण गटासाठी होत्या. ३९ सर्वसाधारण जागांपैकी ब्राम्हण, मराठा, मुस्लिम व अमराठी समाजगटातील नगरसेवक निवडून आले आहेत. तर केवळ १ उमेदवार इतर मागासवर्गीय सर्वसाधारण जागेवर निवडून आला आहे. जात व निवडून येणाऱ्या नगरसेवकांचा संबंध जवळचा आहे. निवडून आलेल्या उच्चवर्णीय नगरसेवकांपैकी भाजप व शिवसेनेकडून ७५ टक्के नगरसेवक उच्चजातीय निवडून आले आहेत. मात्र दोन्ही काँग्रेसकडून एकही नगरसेवक उच्चवर्णीय निवडून आला नाही. मराठा जातीतून निवडून आलेल्या एकूण नगरसेवकांपैकी एकूण ५० टक्के नगरसेवक शिवसेना भाजपाकडून निवडून आले आहेत. ६ टक्के अपक्ष मराठा नगरसेवक निवडून येण्याचे प्रमाण आहे. याचा अर्थ मराठा जात ही त्याच्या हितसंबंधाचा वाहक पक्ष म्हणून शिवसेना भाजपकडे वळलेली दिसते. (बंडेलू निलिमा)

अमराठी समाजापैकी ८३ टक्के नगरसेवक शिवसेना भाजपचे आहेत. अपक्ष १७ टक्के नगरसेवक अमराठी निवडून आले. मात्र दोन्ही काँग्रेसचा एकही अमराठी नगरसेवक निवडून आला नाही. मुस्लिम समाजातील नगरसेवक दोन्ही काँग्रेस व अपक्ष यांच्यामध्ये निम्मे विभागले आहेत. म्हणजेच थोडक्यात उच्चजाती, मराठा, इतर मागासवर्गीय, अनुसूचित जाती व अमराठी समाजात शिवसेना भाजपला भक्कम पाठिंबा आहे. दोन्ही काँग्रेस पक्षाचा सामाजिक पाठिंबा भूसभूशित झालेला आहे. मुस्लिम समाजात धरसोड आहे. मात्र तरीही ५० टक्के मुस्लिम समाजाचा दोन्ही काँग्रेसला पाठिंबा आहे.

### तक्ता क्र. ८.२२

### नगरसेवकांचे जातीगटानुसार वर्गीकरण (२००३)

| जातीगट | काँग्रेस | रा. काँग्रेस | भाजप | शिवसेना | सेवा पॅनल | अपक्ष | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उच्च जाती | ०० | ०० | ०४ | ०० | ०० | ०० | ०४ |
| मराठा | ०७ | ०१ | ०३ | ०३ | ०२ | ०२ | १८ |
| कुणबी | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०२ |
| शे. ओबीसी | ०१ | ०१ | ०४ | ०७ | ०० | ०० | १३ |
| का. ओबीसी | ०० | ०० | ०० | ०४ | ०० | ०० | ०४ |
| सेवा ओबीसी | ०० | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०२ |
| मध्यम जाती | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ |
| अ. जाती | ०३ | ०० | ०२ | ०२ | ०० | ०१ | ०८ |
| मुस्लिम | ०३ | ०१ | ०० | ०० | ०० | ०४ | ०८ |
| अमराठी | ०० | ०० | ०१ | ०१ | ०० | ०३ | ०५ |
| **एकूण** | **१५** | **०५** | **१५** | **०८** | **०२** | **१०** | **६५** |

(आधार : नगरसेवकांची जातनिहाय माहिती एकत्र केली. त्या माहितीचे जातीगटनिहाय वर्गीकरण दिले आहे).

## व्यवसाय गट :

अहमदनगर महानगरपालिकेच्या २००३च्या निवडणुकीमध्ये निवडून आलेल्या प्रतिनिधीचे त्यांच्या व्यवसायानुसार वर्गीकरण केल्यास एकूण ६५ प्रतिनिधीपैकी १५ (२३.०७ टक्के) प्रतिनिधी शेती क्षेत्राशी संबंधित आहेत. यामध्ये काँग्रेस ०३, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप व सेवा पॅनल प्रत्येकी ०२, शिवसेना ०५ व अपक्ष ०१ असे राजकीय पक्षाचे शेती क्षेत्राशी संबंधित नगरसेवक निवडून आले. तर निवडून आलेल्या महिलांपैकी ०९ महिलांनी घरकाम व्यवसाय म्हणून सांगितला. यामध्ये काँग्रेस, भाजप व शिवसेना

प्रत्येकी ०३ महिला घरकामाशी संबंधित आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचा ०१ नगरसेवक कामगार आहे. तर भाजपच्या ०१ नगरसेवकांचा उद्योग व्यवसाय आहे. सेवा व्यवसायाशी संबंधित ३९ (६० टक्के) प्रतिनिधी निवडून आले. यामध्ये काँग्रेस ०९, राष्ट्रवादी काँग्रेस ०२, भाजप ०९, शिवसेना १० व अपक्ष ०९ असे सेवा क्षेत्राशी संबंधित राजकीय पक्षांचे प्रतिनिधी निवडून आले. (पहा तक्ता क्र. ८.२३)म्हणजेच निवडून आलेल्या पैकी निम्म्यापेक्षा जास्त प्रतिनिधी सेवा क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करतात. सर्वच राजकीय पक्षांकडून सेवा क्षेत्राशी संबंधित जास्त प्रतिनिधी निवडून आलेले आहेत. सेवा क्षेत्रामध्ये स्वस्त धान्य दुकान, इलेक्ट्रिक व किराणा माल दुकान, फोटोग्राफी, वकिली, नोकरी, हॉटेल, बांधकाम व्यवसाय, डॉक्टर, ट्रॅव्हल व्यवसाय, अल्प बचत प्रतिनिधी, शिक्षिका, इंजिनिअर इ. व्यवसायांचा समावेश केला आहे.

**तक्ता क्र. ८.२३**

**नगरसेवकांचे पक्ष व व्यवसायानुसार वर्गीकरण (२००३)**

| अ.क्र. | व्यवसाय गट | काँग्रेस | एनसीपी | भाजप | शिवसेना | सेना पॅनल | अपक्ष | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शेती | ०३ | ०२ | ०२ | ०५ | ०२ | ०१ | १५ |
| २ | दुकान | ०५ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०२ | १० |
| ३ | नोकरी | ०१ | ०० | ०२ | ०१ | ०० | ०२ | ०६ |
| ४ | हॉटेल | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०२ |
| ५ | अल्पबचत | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| ६ | व्यापार | ०१ | ०१ | ०२ | ०६ | ०० | ०४ | १४ |
| ७ | वखार | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ |
| ८ | फोटोग्राफी | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ |
| ९ | वकिली | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | डॉक्टर | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ |
| ११ | ट्रव्हल | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ |
| १२ | बिल्डर | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| १३ | घरकाम | ०३ | ०० | ०३ | ०३ | ०० | ०० | ०९ |
| १४ | कामगार | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| १५ | उद्योग | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ |
| **१६** | **एकूण** | **१५** | **०५** | **१५** | **१८** | **०२** | **१०** | **६५** |

(आधार : नगरसेवकांची व्यवसायनिहाय माहिती एकत्र केली. त्या माहितीचे व्यवसाय गटनिहाय वर्गीकरण दिले आहे).

## महिला :

अहमदनगर महानगरपालिकेच्या २००३ च्या निवडणुकीमध्ये एकूण ६५ प्रतिनिधी निवडून आले. त्यापैकी २२ महिला प्रतिनिधी निवडून आल्या तर ४३ पुरूष प्रतिनिधी निवडून आले. म्हणजेच ६६.१५ टक्के प्रतिनिधी तर ३३.८४ टक्के महिला प्रतिनिधी निवडून आल्या. विविध राजकीय पक्षांनी महिलांना उमेदवारी दिली होती. कॉंग्रेस, भाजप व शिवसेना या पक्षांकडून महिला प्रतिनिधी निवडून आल्या. तर राजकीय पक्षांखेरीज देखील ०३ महिला निवडून आल्या. १० महिला प्रतिनिधी शिवसेना पक्षाकडून निवडून आल्या आहेत. त्यानंतर कॉंग्रेसकडून ०५, भाजपकडून ०४ महिला प्रतिनिधी निवडून आल्या आहेत.

निवडून आलेल्या महिलांचे जातीनुसार वर्गीकरण केल्यास एकही उच्च जातीची महिला निवडून आली नाही. मराठा जातीच्या ०५ महिला निवडून आल्या. यामध्ये कॉंग्रेस ०२, भाजप, शिवसेना व सेवा पॅनल प्रत्येकी ०१ महिला निवडून आल्या. ओबीसी ०७ महिला निवडून आल्या. यामध्ये शेतकरी ओबीसी ०६ व सेवा ओबीसी ०१ जातीगटातून महिला निवडून आल्या. शेतकरी ओबीसी जातीगटातून सर्वात जास्त शिवसेनेच्या ०३ महिला निवडून आल्या. तर भाजप ०२ व कॉंग्रेस ०१ महिला

शेतकरी ओबीसी जातीगटातून निवडून आली. मध्यम जातीच्या ०३ महिला निवडून आल्या. अनुसूचित जाती ०३, मुस्लिम ०२ व अमराठी ०२ जातीगटातून महिला निवडून आल्या.

**तक्ता क्र. ८.२४**

**महिलांचे पक्ष व जातीनिहाय वर्गीकरण (२००३)**

| अ.क्र. | गट | काँग्रेस | भाजप | शिवसेना | सेवा पॅनल | अपक्ष | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठा | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०५ |
| २ | शेतकरी ओबीसी | ०१ | ०२ | ०३ | ०० | ०० | ०६ |
| ३ | सेवा ओबीसी | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ |
| ४ | मध्यम जाती | ०० | ०१ | ०२ | ०० | ०० | ०३ |
| ५ | अनुसूचित जाती | ०१ | ०० | ०२ | ०० | ०० | ०३ |
| ६ | मुस्लिम | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ |
| ७ | अमराठी | ०० | ०० | ०१ | ०० | ०१ | ०२ |
| **८** | **एकूण** | **०५** | **०४** | **१०** | **०१** | **०२** | **२२** |

(आधार : नगरसेविकांची जातनिहाय माहिती एकत्र केली. त्या माहितीचे जातीगटनिहाय वर्गीकरण दिले आहे).

## नातेसंबंध :

अहमदनगर महानगरपालिकेच्या पहिल्या निवडणुकीमध्ये अनेक राजकारणी व या अगोदर निवडून आलेल्या नेत्यांचा पराभव झाला. हे एक या निवडणुकीचे वैशिष्ट्य सांगता येते. नगरपालिकेतील बऱ्याच नेतृत्वाला जनतेने नाकारले. नगरपालिकेच्या ५६ पदाधिकाऱ्यांपैकी ३६ जणांचा पराभव झाला. ०१ माजी नगराध्यक्ष, ०४ माजी

उपनगराध्यक्ष व ३१ नगरसेवक इत्यादींचा पराभव झाला. १७ माजी नगरसेविकांना जनतेने या निवडणुकीमध्ये नाकारून नवीन उमेदवारांना संधी दिलेली दिसून येते. परंतु ज्या महिला या निवडणुकीमध्ये निवडून आल्या त्या महिलांचे पती या अगोदर नगरसेवक होते. ते वॉर्ड महिलांसाठी आरक्षित झाले. म्हणून त्यांना संधी मिळाली नाही. तर माजी नगरसेवकांना सत्ता मिळविण्यासाठी आपल्या पत्नीला राजकारणामध्ये सहभागी करून घेतले. उदा. प्रभाग क्रमांक १२ मधून रमेश गरूड यांनी आपली पत्नी राधा गरूड, प्रभाग क्रमांक १५ मधून राजू गंगेकर यांनी आपली पत्नी अंजना गंगेकर, प्रभाग क्रमांक १० मधून संजय शेंडगे यांनी आपली पत्नी रोहिणी शेंडगे, प्रभाग क्रमांक १३ मधून अशोक दहिफळे यांनी आपली पत्नी कविता दहिफळे, प्रभाग क्रमांक १४ मधून रवींद्र सकट यांनी आपली आई पवित्रा सकट यांना निवडून आणलेले दिसते. या निवडणुकीमध्ये एकूण ४४ नवीन चेहऱ्यांना प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळालेली दिसते. तसेच या निवडणुकीमध्ये एकाच कुटुंबांतील दोन व्यक्ती महानगरपालिकेत निवडून आलेल्या आहेत. म्हणजेच निवडून आलेल्या नगरसेवकांचे नातेसंबंध देखील दिसून येतात. उदा. भानुदास व संदिप कोतकर हे पिता–पुत्र, इंदुबाई बोरूडे व अनिल बोरूडे चुलती–पुतण्या, सोमनाथ व सुभाष लोंढे सख्खे भाऊ असे नातेसंबंध असणारे नगरसेवक निवडून आले होते.

## सत्ता आघाड्याची निर्मिती

अहमदनगर महानगरपालिकेत भाजप व शिवसेना आघाडीची सत्ता २००३ ते २००६ पर्यंत होती. या दरम्यान भगवान फुलसुंदर (महापौर), ज्ञानेश्वर खांडरे (उपमहापौर) व नरेंद्र कुलकर्णी (स्थायी समिती सभापती) यांच्याकडे सत्ता होती. या नेत्यांवर शिवसेना व भाजप पक्षांचे नियंत्रण होते. २००६ मध्ये अहमदनगर येथील शिवसेना पक्षामध्ये फुट पडली. त्यामुळे निवडून आलेल्या नगरसेवकांवरील पक्षांचे नियंत्रण कमी झाले. त्यामुळे २००६ मध्ये अहमदनगर महानगरपालिकेत सत्तांतर झाले. कॉंग्रेस पक्षाने विविध गटांचे ऐक्य केले. त्यामुळे संदिप कोतकर यांच्याकडे सत्ता गेली.

सत्ताधारी गटाला महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पासंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेण्याचा अधिकार असतो. सत्ताधारी गटाने अर्थसंकल्पात भांडवली गुंतवणूकीला जास्त महत्त्व दिले.

## राज्य व राष्ट्रीय राजकारणाशी संबंध :

अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर दक्षिण विधानसभा मतदारसंघात येते. मतदारसंघाचे नेतृत्व अनिल राठोड (शिवसेना) करतात. यांचा एक गट महानगरपालिका राजकारणात कृतीशील आहे. अनिल राठोड (शिवसेना) १९९०, १९९५, १९९९ व २००४ मध्ये महाराष्ट्र राज्य विधानसभेवर निवडून आले होते. २७ मे १९९५ ते १७ जून १९९६पर्यंत अनिल राठोड, मनोहर जोशी सरकारमध्ये अन्न व नागरी पुरवठा खात्याचे राज्यमंत्री होते. (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय, २०००, पृ. ६४८–६४९)

सारांशरूपाने असे दिसून येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या १४ डिसेंबर २००३ रोजी झालेल्या निवडणुकीमध्ये शिवसेना, भाजप, कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस या चार प्रमुख पक्षांमध्ये स्पर्धा होती. ही स्पर्धा शिवसेना व भाजप व कॉंग्रेस–राष्ट्रवादी कॉंग्रेस या दोन आघाड्यांमध्ये विभागली होती. या निवडणुकीत भारिप, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन व हिंदू एकता आंदोलन या पक्षांना नगण्य मते मिळाली. महानगरपालिका निवडणुकीनंतर महापौर व उपमहापौर पदासाठी निवडणूक घेण्यात आली. यामध्ये शिवसेनेने भगवान फुलसुंदर यांना महापौर पदासाठी उमेदवारी दिली तर राष्ट्रवादी कॉंग्रेसने कृष्णा जाधव यांना उमेदवारी दिली. या दोघांमध्ये लढत झाली. भगवान फुलसुंदर यांना ३७ मते तर कृष्णा जाधव यांना २५ मते मिळाली. शिवसेनेचे भगवान फुलसुंदर विजयी झाले. अहमदनगर महानगरपालिकेचे पहिले महापौर पद हे माळी समाजाकडे गेले. उपमहापौर भाजपकडून ज्ञानेश्वर खांडरे तर कॉंग्रेसकडून मुश्ताक कुरेशी यांनी निवडणूक लढविली. उपमहापौरपद

भाजपचे ज्ञानेश्वर खांडरे यांना मिळाले. स्थायी समितीचे सभापती म्हणून भाजपचे ॲड. अभय आगरकर यांची बिनविरोध निवड झाली.

२००६ मध्ये शिवसेना पक्षात फुट पडली. शिवसेना पक्षाच्या नगरसेवकांनी अनिल राठोड यांच्या नेतृत्वावर अविश्वास व्यक्त केला. त्यांनी अहमदनगर नागरी विकास आघाडी स्थापन केली. या आघाडीने काँग्रेस पक्षाला पाठिंबा दिला. त्यामुळे संदिप कोतकर (मराठा) अहमदनगर महानगरपालिकेचे नवे महापौर झाले.

## पंचायत समिती निवडणूक (२००७) :

अहमदनगर जिल्ह्यात १४ पंचायत समित्या आहेत. २००७ च्या पंचायत समित्या निवडणुकीत कोणत्या राजकीय पक्षांना व गटांना किती जागा मिळाल्या याचे विश्लेषण (पहा तक्ता क्र. ८.२५) मधून केले आहे. पारनेर येथे वसंतराव झावरे व नंदकुमार झावरे (दोन्ही माजी आमदार) एकत्र होते. त्यांना विखे गटांचा पाठिंबा होता. त्यांच्या विरोधात शिवसेनेचे आमदार विजय औटी गटाचे उमेदवार उभे होते. नंदकुमार झावरे यांनी काँग्रेसचे उमेदवार ज्ञानदेव वाफारे यांच्या विरोधी प्रचार केला होता. शिवसेनेला ५, राष्ट्रवादी काँग्रेसला ६ व आघाडीला १ जागा मिळाली. येथे पोपटराव पवार (राष्ट्रवादी काँग्रेस) व आझाद ठुबे (भाकप) हे सभापती व उपसभापती झाले. श्रीगोंदे येथे बबनराव पाचपुते (राष्ट्रवादी काँग्रेस) यांच्या गटाला ८ व काँग्रेसला ४ जागा मिळाल्या.

कर्जत येथे काँग्रेस व भाजप यांच्यात स्पर्धा होती. निवडणुकीनंतर काँग्रेस व भाजप यांनी युती केली. सभापती काँग्रेसचा व उपसभापती भाजपचा झाला. जामखेड येथे दोन्ही काँग्रेसचा पराभव झाला. शिवसेना–भाजप युतीकडे सत्ता गेली. पाथर्डी येथे काँग्रेस वरचढ ठरली. सभापती व उपसभापती काँग्रेसचे झाले. शेवगांवमध्ये नरेंद्र घुले (राष्ट्रवादी काँग्रेस) गटाच्या जागा निवडून आल्या. त्यांच्या गटाला दोन्ही पदे मिळाली. नेवासे पंचायत समितीवर काँग्रेस पक्षाचे नियंत्रण होते. राहुरी येथे विकास आघाडीचे पंचायत समितीवर नियंत्रण होते. कोपरगांव पंचायत समितीवर विखे गटांचे नियंत्रण होते.

श्रीरामपूर येथे दोन्ही काँग्रेसला समान जागा मिळाल्या होत्या. श्रीरामपूर येथे काँग्रेसचा सभापती व राष्ट्रवादी काँग्रेसचा उपसभापती झाला. संगमनेर येथे बाळासाहेब थोरात यांचे पंचायत समितीवर नियंत्रण होते. त्यांनी १६ पैकी १४ जागा जिंकल्या.

अकोले पंचायत समितीवर मधुकर पिचड राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नियंत्रण होते. काँग्रेस विरूध्द राष्ट्रवादी काँग्रेस अशी स्पर्धा होती. नगर पंचायत समितीमध्ये सत्ता परिवर्तन झाले. येथे शिवसेनेचा सभापती व काँग्रेसचा उपसभापती झाला. काँग्रेस जिल्हाध्यक्ष विनायक देशमुख यांनी विखे, थोरात व आदिक यांना एकत्र आणले. त्यांच्यात ऐक्य झाले नसले तरी मतविभाजन टळले. त्यामुळे जिल्ह्यात काँग्रेस पक्षाची सरशी झाली. १४ पंचायत समित्यांपैकी काँग्रेस ६, राष्ट्रवादी काँग्रेस ५, शिवसेना, भाजप व आघाडीला प्रत्येकी १ सभापतीपद मिळाले. अहमदनगर जिल्ह्यात राष्ट्रवादी विरूध्द काँग्रेस अशी स्पर्धा आहे. शिवसेना—भाजपचा प्रभाव नगर—जामखेड या दोन तालुक्यापुरता मर्यादित झालेला आहे. (कुलकर्णी सुहास, २००७, पृ. ८४ ते ८५)

**तक्ता क्र. ८.२५**

**अहमदनगर जिल्हा पंचायत समित्या निवडणूक (२००७) :**

| जिल्हा | नि.वर्ष | एकूण पंचायत | काँग्रेस | राष्ट्रवादी काँग्रेस | शिवसेना | भाजप | आघाडी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.नगर | २००७ | १४ | ०६ | ०५ | ०१ | ०१ | ०१ | १४ |

आधार : निवडणूक आयोगाचा अहवाल २००७

## अहमदनगर जिल्ह्याचे शहरी राजकारण :

जिल्ह्याच्या शहरी राजकारणाची छाप ग्रामीण राजकारणावर न पडता ग्रामीण राजकारणाची छाप शहरी राजकारणावर पडते. सहकारी साखर कारखाने, दुधसंस्था, खाजगी साखर कारखाने, औद्योगिक वसाहती यामुळे ग्रामीण राजकारणाचे आर्थिक

हितसंबंध शहरी राजकारणात दिसून येतात व अहमदनगर शहराचे राजकारण पुढे येते. अहमदनगर शहरासाठी एक महानगरपालिका आहे. जिल्ह्यात ९ नगरपालिका आहेत. शिर्डी या ठिकाणी नगरपंचायत आहे. २००२च्या नगरपालिका निवडणुकीत राजकीय पक्षांनी व प्रमुख स्थानिक नेत्यांनी आपल्या आघाड्या या निवडणुकीत तयार केल्या होत्या. २००२ मध्ये निवडून आलेले नगराध्यक्ष म्हणजे पर्यायी स्थानिक आमदार आहेत. याची राजकीय पक्षांना व उमेदवारांना त्याची जाणीव झाली होती.

जिल्ह्यात ९ नगरपालिका व १ कटकमंडळ आहे. या नगरपालिका निवडणुकीत सर्वत्र बहुरंगी लढती झाल्या. कोपरगांव, नेवासा, अहमदनगर, श्रीरामपूर येथे हिंदू, मुस्लिम असा संघर्ष तयार झाला व एकूण नगरपालिका पैकी ०४ काँग्रेस, ०१ राष्ट्रवादी काँग्रेस, ०१ शिवसेना व ०२ अपक्ष असे नगराध्यक्षपद विविध पक्षांना मिळाली होती. (पहा तक्ता क्र. ८.२६)

अहमदनगर जिल्ह्यात २००७च्या नगरपालिका निवडणुकात संगमनेर, राहुरी, श्रीरामपूर, राहता, कोपरगांव, पाथर्डी, देवळाली व पिंपळस या ८ नगरपालिका व शिर्डी ही नगरपंचायत आहे. कोपरगांव, पाथर्डी, राहता व देवळाली प्रवरा या चार नगरपालिकात सत्तांतर झाले. संगमनेर व श्रीरामपूर काँग्रेसने जिंकला. शिर्डी नगरपंचायत विखे गटाने जिंकली. नगरपालिका निवडणुकीत स्थानिक आघाड्याचे उमेदवार निवडून आले. पक्षीय पातळीवर स्थानिक आघाड्यांच्या तुलनेत कमी उमेदवार निवडून आले.

काँग्रेसने ९३ जागा लढविल्या होत्या. त्यांच्या ४९ जागा निवडून आल्या. (श्रीरामपूर २२, संगमनेर १५, पाथर्डी ६, शिर्डी ५, देवळाली प्रवरा ०१) राष्ट्रवादी काँग्रेसने ४४ जागा लढविल्या. त्यापैकी १८ जागा निवडून आल्या. (कोपरगांव १२, संगमनेर ०४, पाथर्डी ०२) भाजपने ३३ जागा लढविल्या. त्यापैकी (पाथर्डी ०६, संगमनेर ०२ व शिर्डी ०२) अशा १० जागा जिंकल्या. शिवसेनेने ३१ जागा लढवून ३ जागा जिंकल्या. (कोपरगांव, संगमनेर व राहता प्रत्येकी १) स्थानिक आघाड्यांनी १३५ जागा लढविल्या. त्यापैकी ७७ जागा जिंकून घेतल्या. विखे आघाडीच्या शिर्डी ०९ व

राहता ०९ जागा निवडून आल्या, तर राहता येथे विखे विरोधी पिपाडा आघाडीच्या ०५ जागा निवडून आल्या.

अहमदनगर जिल्ह्यातील ९ पैकी ४ नगरपालिकांचे नगराध्यक्ष काँग्रेसचे झाले. (संगमनेर, राहाता, श्रीरामपूर, शिर्डी) शिर्डी येथे विखे गटाचे वर्चस्व आहे. तर संगमनेर येथे थोरात गटाकडे नगरपरिषद गेली. भाजपकडे २ नगरपरिषदा गेल्या आहेत. (देवळाली प्रवरा, पाथर्डी) राष्ट्रवादी काँग्रेसच्या शंकरराव कोल्हे गटाचे कोपरगांव नगरपरिषदेवर नियंत्रण आहे. तर राहुरी येथे प्रसाद तनपुरे गटाचा नगराध्यक्ष झाले आहेत. शिवसेनेला मात्र सत्तेत वाटा मिळाला नाही. थोडक्यात अपक्ष व आघाड्यांमुळे पक्षीय राजकारणाला अहमदनगर जिल्ह्यात खीळ बसते व स्थानिक राजकारण म्हणजे केवळ स्थानिक नेत्यांमधील सत्ता स्पर्धा ठरते. (कांबळे बाळ, २००२, पृ. ३३४ ते ३३५)

**तक्ता क्र. ८.२६**

**अहमदनगर नगरपालिका निवडणुका (२००२, २००७)**

| **निवडणूक वर्ष** | **काँग्रेस** | **राष्ट्रवादी काँग्रेस** | **शिवसेना** | **भाजप** | **अपक्ष** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| **२००२** | ०५ | ०१ | ०१ | — | ०२ | ०९ |
| **२००७** | ०४ | ०२ | — | ०२ | ०१ | ०९ |

आधार : निवडणूक आयोगाचा अहवाल २००२ ते २००७

अहमदनगर महानगरपालिकेची स्थापना ३० जून २००३ रोजी झाली. यानंतर १४ डिसेंबर २००३ रोजी महानगरपालिकेची प्रथम निवडणूक झाली. २००१ च्या जनगणना अहवालानुसार अहमदनगर शहराची लोकसंख्या ३०७४५५ आहे. त्यामध्ये अनुसूचित जातींची लोकसंख्या ११.७३ टक्के तर अनुसूचित जमातींची लोकसंख्या ०.७५ टक्के आहे. यापैकी लक्षणीय लोकसंख्या झोपडपट्टीत राहते. अहमदनगर शहरात

२५ झोपडपट्ट्या आहेत. या लोकसंख्येचे हिंदू, मुस्लिम, अमराठी, ख्रिश्चन अशा सामाजिक गटात स्तरीकरण झाले आहे. अहमदनगर शहरात ७२.५ टक्के मध्ये हिंदू समाज आहे. तर हिंदू वगळून २७.५ टक्के समाजाची वस्ती आहे. २७.५ टक्के मध्ये १५.५ टक्के मुस्लिम, ५.५२ टक्के जैन, २.२५ टक्के बौध्द्, ३.९ टक्के ख्रिश्चन व ०. १८ टक्के शीख समाज येथे आहे. जवळजवळ ५ टक्के उर्दू भाषिक, ८९.१४ टक्के मराठी भाषिक व २.५७ टक्के हिंदी भाषिक लोकवस्ती आहे. अहमदनगर शहरात ब्राम्हण, मराठा, ख्रिश्चन, जैन, मारवाडी, गुजराथी, पारशी, साळी, माळी या जातीधर्मांची लोकवस्ती आहे. (अहमदनगर, जिल्हा गॅझेटिअर, १९७६ पृ. १८७) शहरात तांबट, बागवान, कसाई या सारख्या पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या जाती धर्मांतरीत झालेल्या आहेत. हिंदी व्यापारी वर्गाकडे व्यापार व सेवा व्यवसाय एकवटत चालला आहे. शहरातील व्यापार व सेवा व्यवसायात मुस्लिम विरोधी जैन, मारवाडी, शीख अशी स्पर्धा आहे. या आर्थिक स्पर्धेचे रूपांतर हिंदू व मुस्लिम तणावात झाले आहे. शहरी भागात जैन, मारवाडी, शीख व मुस्लिम यांच्या हितसंबंधाची स्पर्धा हा घटक शहराचे राजकारण गतिमान करणारा आहे. या गटांना १९८० नंतरच्या बदलत्या अर्थव्यवस्थेने बळ दिले आहे. अहमदनगर शहरात नव्याने विकसित होऊ घातलेल्या कारखानदारीतून ही या समाजाचे हितसंबंध बळकट झाले. या समाजाच्या हितसंबंधाचे दावेदार पक्ष काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भारिप हे आहेत. तर हिंदी भाषिक गट, जैन, मारवाडी, शीख यांच्या हितसंबंधाचे वाहक भाजप, शिवसेना हे पक्ष झाले आहेत. त्यामुळे प्रबळ हितसंबंधाचे वाहक भाजप, शिवसेना हे पक्ष झाले आहेत. त्यामुळे प्रबळ हितसंबंधाचा दावा अहमदनगर शहरात भाजप शिवसेना या पक्षांकडून केला जातो. तर हिंदी भाषिक गट, जैन, मारवाडी, शीख व मुस्लिम यांच्या हितसंबंधाचा दावा काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून केला जात नाही. त्यांच्या हितसंबंधाचा दावा केला तरी तो या वर्गातून मान्य होत नाही असे एक राजकीय चित्र अहमदनगर शहरात १९९० नंतर पुढे आले आहे. दोन्ही काँग्रेस पक्षांकडील मराठा व इतर मागासवर्गीय नेत्यांना त्यांचे

हितसंबंध जपण्याचा मार्ग दोन्ही काँग्रेस पक्षापेक्षा भाजप सेना हा आहे असे चित्र पुढे येत आहे. उदा. निवडणुकीच्या काळातच राष्ट्रवादी काँग्रेसच्या शंकरराव घुले यांनी भाजपात प्रवेश केला.

अहमदनगर शहर मुंबई, पुणे व औरंगाबाद या महाराष्ट्रातील प्रमुख शहरांशी रस्त्यांनी जोडलेले हे शहर आहे. तसेच अहमदनगर शहर रेल्वे मार्गावरील शहर आहे. यामुळे शहरात १९८० पासून औद्योगिकीकरणास सुरूवात झाली. अहमदनगर शहरात क्रॉम्प्टन ग्रीव्हज, लार्सन अॅड टुब्रो, सन फार्मा, रॅलीवुल्फ, गरवारे, न्युएज इंडीयी, अ. नगर फोर्जिंग इ. मोठे कारखाने आहेत. केडगांव (अहमदनगरपासून ३ कि.मी वर) येथे कायनेटीक उद्योगसमूह आहे. येथे ल्यूना, कायनेटीक मोटारसायकल इ.चे उत्पादन युनिटस् नगरमध्ये आहेत. त्यामुळे अहमदनगर शहराच्या आजूबाजूच्या भागाचे शहरीकरण सुरू आहे. या शहरीकरणातून भाजप व शिवसेना या पक्षांना पाठिंबा देणारा मध्यमवर्ग शहरात वाढत गेला. तो भाजप शिवसेनेकडे झुकला आहे. तर दोन्ही काँग्रेस पक्षांच्या समोर नव्या सामाजिक शक्तीच्या जुळवाजुळवीचे आव्हान उभे राहिले आहे. या पेचप्रसंगातून मार्ग काढण्यासाठी दोन्ही काँग्रेस नेतृत्वाची मर्यादा दिसून येते. त्यामुळे दोन्ही काँग्रेसकडे संघटना व कार्यकर्ते असताना भाजप व शिवसेना या दोन्ही पक्षांना राजकारण करण्यासाठी फट उपलब्ध आहे. (कांबळे बाळ, २००२, पृ. ३३३)

**सारांशरूपाने** असे दिसून येते की, अहमदनगर १९६१ साली या समितीच्या शिफारशीच्या आधाराने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती नावाचा कायदा अस्तित्वात आला. १ मे १९६२ पासून जिल्हा परिषद अस्तित्वात आली. ही यंत्रणा स्थानिक स्वराज्य संस्थाच्या तिन्ही बाबीमध्ये महत्त्वपुर्ण यंत्रणा आहे. या यत्रंणेच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर सामाजिक आणि आर्थिक विकास करण्याच्या कामाच्या आधारावर स्थानिक राजकीय नेतृत्व पुढे येत गेलेले आहे. १९६२ ते २०१० या काळाचा विचार करता असे दिसून येते की, एकूण १८ व्यक्तींनी नेतृत्व केलेले आहे. त्यात १९९९ पर्यंत मुख्यत: काँग्रेस या पक्षाचे नेतृत्व राहिलेले आहे. १९९९ नंतर

काँग्रेस पक्षाच्या विभाजनातून राष्ट्रवादी पक्ष पुढे आल्यानंतर जिल्हा परिषदेचे नेतृत्व हे राष्ट्रवादीकडे गेले. मात्र २००७ साली पुन्हा काँग्रेसकडे नेतृत्व आले. जिल्हा परिषदेच्या राजकारणाचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, १९९० नंतर राजकीय स्पर्धेत शिवसेना – भाजप आघाडी आली. मात्र स्थानिक राजकारणात स्थान मिळवता आले नाही. परिणामी काँग्रेस पक्ष ज्या प्रकारे स्थानिक राजकारणात मुळे सोडलेली आहेत. ती मुळे तोडण्यात विरोधी पक्षांच्या नेतृत्वाला अपयश आलेले आहे. १९९९ नंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने काँग्रेस पक्षाला जोरदारपणे आव्हान तयार केलेले दिसून येते. १९९९ ते २००७ असे आठ वर्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाला जिल्हा परिषदेवर नेतृत्व करता आले. स्थानिक राजकारणात राष्ट्रवादीचे नेतृत्व वाढत आहे असे दिसून येत असताना काँग्रेस पक्षाने पुन्हा एकदा चांगल्या प्रकारे पाठिंबा मिळवत राष्ट्रवादीकडून सत्ता हस्तगत केली. त्यामुळे १९९९ नंतर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या नेतृत्वामध्ये जिल्हा परिषदेचे नेतृत्व राहिलेले दिसून येते.

# प्रकरण – ९

# अहमदनगर जिल्हा नेतृत्व विकास

## जिल्ह्यातील राजकीय नेतृत्वाची पार्श्वभूमी

१९९० पासून अहमदनगरच्या राजकारणाचा विचार करता असे दिसून येते की, पक्षीय स्पर्धा तीव्र स्वरूपात होत असताना दिसून येते. १९९० पर्यंत हा जिल्हा काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला होता. पण शिवेसना – भाजपाने या मतदारसंघात काँग्रेसकडून नेतृत्व आयात करत शिरकाव केला आहे. मुख्य पक्ष आणि नेतृत्वाचा विचार करता असे दिसून येते की, सर्वाधिक नेतृत्व हे काँग्रेस पक्षात असताना दिसून येते. काँग्रेस नेतृत्वात १९९९ साली झालेल्या राष्ट्रवादी या पक्षांच्या निर्मितीने विभाजन झालेले दिसून येते. यापूर्वी शरद पवार यांच्या समाजवादी काँग्रेसच्या निर्मितीने देखील काँग्रेस नेतृत्वात विभाजन झाले होते. पण त्या विभाजनापेक्षा १९९९ चे विभाजन हे मराठा नेतृत्व आणि एकदंर काँग्रेस नेतृत्वाचे कायम विभाजन करणारे ठरले आहे. कारण या विभाजनाने अहमदनगर जिल्ह्याच्या राजकारणावर मोठा परिणाम झाला आहे. कारण मराठेत्तर समाज घटक बिगर काँग्रेस पक्षाकडे वळले. त्यामुळे इतर छोटे छोट पक्ष देखील पुढे येण्याचा प्रयत्न करत असताना दिसून येते. मात्र त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेपासून कोणत्याही निवडणुकीत यश आले नाही. पण बंडखोरी करण्यातून काही नेतृत्वाला यश आले आहे. सेना – भाजपा युती असल्याने नेतृत्व कमी राहिलेले दिसून येते. पण दोन्ही पक्षांनी मतदारसंघ वाटून घेतल्याप्रमाणे होते. त्यामुळे काँग्रेस राष्ट्रवादीला पर्याय देण्याचा प्रयत्न केला गेला दिसतो. दुसरे असे की, भाजपाने ओबीसी, मराठा, मारवाडी या समाज घटकांना स्थान दिले आहे. पण शिवसेनेने मराठा समाज केंद्रीत राजकारण केल्याचे दिसून येते. त्यास अपवाद ह अहमदनगर शहराच्या राजकारणाचा आहे. अहमदनगर शहर राजकारणात देखील पक्ष कार्यकारणी ही मराठा वर्चस्वाखाली

आणि उमेदवार हा राजपूत असा सूत्र ठेवल्याचे दिसून येते. भाजपातून मराठा समाजाचे नेतृत्व बागायती आणि सधन परिसरातून पुढे आले. तर ओबीसी नेतृत्व दुष्काळी, कोरडवाहू या परिसरातून पुढे आलेले दिसून येते. अहमदनगरच्या पक्षीय राजकारणात सधन, बागायती आणि संस्थात्मक बांधणी ज्या मतदारसंघात काँग्रेसकडून करण्यात आली आहे. त्या मतदारसंघात सेना – भाजपाला यश आल्याचे दिसून येत नाही. उदा. शिर्डी, संगमनेर, श्रीरामपूर, श्रीगोंदा या मतदारसंघात सेना – भाजपाला यश आले नाही. मात्र इतर मतदारसंघात एकवेळेस तरी सेना  भाजपा उमेदवार निवडून आल्याचे दिसून येते.

**तक्ता. क्र ९.१**

**१९९० ते २००९ या काळातील पक्षनिहाय उमेदवारी**

| अ.क्र | राजकीय पक्ष | उमेदवार टक्केवारी |
|---|---|---|
| १ | काँग्रेस | १८.० |
| २ | भाजपा | १४.० |
| ३ | शिवसेना | ११.५ |
| ४ | राष्ट्रवादी | ९.८ |
| ५ | इतर पक्ष | २९.५ |
| ६ | अपक्ष | १६.४ |
| ७ | एकूण | १०० |
| आधार : संशोधकाने राजकीय नेतृत्वच्या मुलाखतीच्या आधारे जमवलेली माहिती | | |

टीप: १९९० विधानसभा निवडणूक ही शिवसेना – भाजपा युती झाली होती. त्यामुळे सर्व निवडणुकीत शिवसेना–भाजप युती कायम होती. दुसरे असे की, दोन्ही पक्षाची जागा वाटप ही प्रभावानुसार होत होती. त्यामुळे प्रत्येक निवडणुकीत वेगवेगळे जागा वाटप राहिलेले आहे.

## सामाजिक वास्तव आणि नेतृत्व विकासाची दिशा

अहमदनगर जिल्हा हा मराठा वर्चस्वासाठी, तसेच मराठा नेतृत्वासाठी सातत्याने वर्चस्वशाली राहिला आहे. जिल्ह्यात मराठा समाजाचे प्रमाण हे अंदाजे ५० टक्क्यापेक्षा जास्त असावे असे अंदाज सांगण्यात येतात. (विविध मुलाखतीच्या आधारे हे प्रमाण सांगण्यात येते.) मात्र काही मतदारसंघात माळी, धनगर, वंजारी समाजाचे प्रमाण जास्त आहे. पण मराठा समाजापेक्षा जास्त असल्याचे दिसून येत नाही. माळी—धनगर आणि वंजारी (ओबीसी) या तीन समाज एकत्र केले असता तीन ते चार मतदारसंघात प्रमाण जास्त असल्याचे पुढे येईल. मात्र हे प्रमाण मराठा समाजापेक्षा जास्त राहिल असे होत नाही. परिणामी लोकसंख्येच्या आणि शेती मालकीच्या आधारे मराठा समाजाचे नेतृत्वाचे वर्चस्व जिल्हा राजकारणावर सातत्याने राहात आलेले आहे.

१९६२च्या राजकारणापासून विचार करता असे दिसून येते की, १९९० पर्यंत एखाद्या दुसऱ्या मतदारसंघाचा अपवाद वगळता मराठा समाजाचे वर्चस्व राहत आलेले आहे. पाथर्डी आणि कर्जत या मतदारसंघात वंजारी समाजाचे प्रमाण जास्त असल्याने पाथर्डी या मतदारसंघातून वंजारी नेतृत्व आणि जामखेड—कर्जत या मतदारसंघात धनगर समाजाचे प्रमाण जास्त असल्याने धनगर समाजाचे नेतृत्व पुढे आले. १९७८ ते २००९ या काळातील विविध पक्षाकडून उमेदवारी मिळवलेल्या नेतृत्वाचा विचार करता असे दिसून येते की, जवळपास ६४ टक्के उमेदवारी ही मराठा नेतृत्वालाच मिळालेली आहे. यावरून मराठा समाजाचे जिल्हा राजकारणावर कोठपर्यंत वर्चस्व असेल याची कल्पना येते. (पहा तक्ता क्र. ९.२) इतर कोणत्याही समाजाचे प्रमाण हे १० टक्क्यापेक्षा जास्त असल्याचे दिसून येत नाही. नगर अकोले हा मतदारसंघ सातत्याने अनुसूचित जमातीसाठी राखीव राहिलेला आहे. त्यामुळे या मतदारसंघातून महादेव कोळी या अनुसूचित जमातीचे नेतृत्व पुढे आले आहे. मात्र अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या मतदारसंघातून दलित नेतृत्व पुढे आलेले दिसून येत नाही. दलितामध्ये देखील विविध जातीं लोकसंख्येने प्रभावी आहेत. त्यात नवबौध्द आणि चर्मकार या दोन जातींना

राखीव मतदारसंघातून उमेदवारी मिळालेली आहे. नवबौध्द समाजाचे प्रमाण हे चर्मकार समाजापेक्षा जास्त असताना देखील चर्मकार समाजाचे नेतृत्वाला जास्त संधी मिळाल्याचे दिसून येते. ओबीसी अंतर्गत माळी समाजाच्या नेतृत्वाला जास्त प्रमाणात संधी मिळालेली दिसून येते. १९७८ ते २००९ या काळातील विविध पक्षाकडून उमेदवारी केल्येल्या उमेदवारांचे प्रमाण पुढीलप्रमाणे.

**तक्ता क्र.९.२**

**सर्व पक्षांची जातींनिहाय उमेदवारी**

| अ.क्र | नेतृत्वाचा सामाजिक गट | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | मारवाडी | १.६ |
| २ | राजपूत | ३.३ |
| ३ | मराठा | ६३.९ |
| ४ | वंजारी | ३.३ |
| ५ | माळी | ४.९ |
| ६ | धनगर | १.६ |
| ७ | नाव्ही | १.६ |
| ८ | महादेव कोळी | ८.२ |
| ९ | नवबौध्द | ३.३ |
| १० | चर्मकार | ४.९ |
| ११ | इतर दलित | १.६ |
| १२ | इतर | १.६ |
| १३ | एकूण | १०० |
| आधार : संशोधकाने राजकीय नेतृत्वच्या मुलाखतीच्या आधारे जमवलेली माहिती | | |

सामाजिक वर्गवारीनुसार पाहिले असता असे दिसून येते. की, मराठा समाजातील नेतृत्वाला सर्वात जास्त संधी मिळालेली आहे. तर त्यापाठोपाठ अनुसूचित जमातीच्या नेतृत्वाला संधी मिळालेली आहे. ओबीसीमध्ये शेतकरी ओबीसी (माळी, धनगर, वंजारी) या समाज गटातील नेतृत्वाला संधी मिळाली आहे. सेवा ओबीसीमध्ये देखील (नाव्ही) समाजाच्या नेतृत्वाला संधी मिळाली आहे. दलितामध्ये ६.६ टक्के नेतृत्वाला संधी मिळाल्याचे दिसून येते. पण ही संधी केवळ अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या मतदारसंघातूनच मिळालेली आहे. खुल्या मतदारसंघातून एकादाही संधी मिळालेली नाही. (पहा तक्ता क्र. ९.३)

**तक्ता क्र. ९.३**

**सर्व पक्षाची जातींगटानिहाय नेतृत्वाला मिळालेली संधी**

| अ. क्र | जातीगट | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | मराठा | ६३.९ |
| २ | उच्च जातीगट | ६.६ |
| ३ | आदिवासी | ११.५ |
| ४ | दलित | ६.६ |
| ५ | शेतकरी ओबीसी | ९.८ |
| ६ | सेवा ओबीसी | १.६ |
| ७ | एकूण | १०० |
| आधार : १९९० ते २००९ या काळात उमेदवारांच्या घेतलेल्या मुलाखती | | |

## राजकीय नेतृत्व आणि शिक्षण

१९७८ पासून राजकीय नेतृत्व आणि शिक्षण हा घटक तपासले असता असे दिसून येते की, राजकारणात शिक्षणाची कोणती अट नसल्याने अनेक नेतृत्वाचे शिक्षण हे कमी असताना दिसून येते. सर्वसाधारणपणे पायाभूत शिक्षण देखील झाले नसल्याचे काही नेतृत्व राजकारणात सक्रिय होते. मात्र १९९० नंतर राजकीय पक्षांकडून शिक्षण पाहून संधी देण्याची एक परंपरा पुढे आलेली दिसून येते. तरीही जिल्हा राजकारणात जास्त काही परिवर्तन झाल्याचे दिसून येत नाही. पदवी घेतलेले नेतृत्व हे सर्वाधिक ३९.३ टक्के आहे. सर्वसाधारणपणे मॅट्रिक आणि त्या खालचे शिक्षण असलेले नेतृत्व जास्त असताना दिसून येते. ६.६ टक्के नेतृत्व हे निरक्षर असल्याचे प्राथमिक पाहणीत पुढे येते. तर बिगर मॅट्रिक असलेले ३४.४ टक्के नेतृत्व आहे. पदवीत्तर शिक्षण असणारे ११.५ टक्के नेतृत्व येते. तर व्यावसायिक असणारे नेतृत्व हे केवळ १.६ टक्के येते. एकदंर जिल्हा राजकारण आणि राजकीय नेतृत्वाच्या शिक्षणाच्या बाबतीत असे म्हणावे लागेल की, सुशिक्षित नेतृत्व आहे. पण उच्च शिक्षण किंवा चांगले शिक्षण झालेले नेतृत्व आहे असे दिसून येत नाही. कमी शिक्षित राजकीय नेतृत्व हे पुढे आल्याचे दिसून येते. तसेच यशस्वी देखील झाल्याचे दिसून येते. (पहा तक्ता क्र. ९.४)

**तक्ता क्र. ९.४**

**राजकीय नेतृत्व आणि त्यांचे शिक्षण**

| अ.क्र | शिक्षण | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | निरक्षर | ६.६ |
| २ | बिगर मॅट्रिक | ३४.४ |
| ३ | मॅट्रिक | ६.६ |
| ४ | पदवी | ३९.३ |

| | | |
|---|---|---|
| ५ | पदवीत्तर | ११.५ |
| ६ | व्यावसायिक | १.६ |
| ७ | एकूण | १०० |
| आधार : संशोधकाने राजकीय नेतृत्वच्या मुलाखतीच्या आधारे जमवलेली माहिती | | |

## राजकीय नेतृत्व आणि त्यांचे व्यवसाय

अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय नेतृत्व कोणत्या व्यावसायिक पार्श्वभूमीतून येते हे पाहिले असता असे दिसून येते की, शेती क्षेत्रातून सर्वाधिक येताना दिसून येते. तसेच राजकीय नेतृत्व जोडव्यवसायात जास्त असताना दिसून येते. मात्र एकच असा कोणता व्यवसाय आहे हे तपासले असता असे दिसून येते की, व्यावसायिक क्षेत्रातील सर्वाधिक असताना दिसून येते. त्या पाठोपाठ नोकरी या व्यवसायातून जास्त नेतृत्व येते. जोडव्यवसायात शेती आणि व्यावसायिक या व्यवसायातून सर्वाधिक नेतृत्व येत असल्याने दिसून येते. एक प्रकारे असे म्हणता येते की, अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय नेतृत्व आणि त्या नेतृत्वाचा एक व्यवसाय असल्याचे दिसून येत नाही. अनेक नेतृत्व हे अनेक व्यवसायात कार्यरत असल्याचे दिसून येते. १३.१ टक्के नेतृत्व हे शेती, व्यावसायिक, कारखानदारी आणि व्यापार या क्षेत्रातून येते. एक मात्र खरे की, अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय नेतृत्वाचे व्यवसायात स्तरीकरण झालेले आहे. एकाच अशा कोणत्याही व्यवसायातून मोठा राजकीय नेतृत्व असलेला वर्ग पुढे येत असताना दिसून येत नाही. (पहा तक्ता क्र. ९.५)

**तक्ता क्र. ९.५**

**राजकीय नेतृत्व आणि त्यांचे व्यवसाय**

| अ.क्र | नेतृत्वाचा व्यवसाय | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | शेती | १३.१ |
| २ | व्यापार | ३.३ |
| ३ | कारखानदारी | ३.३ |
| ४ | व्यावसायिक | २९.५ |
| ५ | नौकरी | ८.२ |
| ६ | शेती आणि व्यापार | १.६ |
| ७ | शेती, व्यापार आणि व्यावसायिक | १.६ |
| ८ | शेती, व्यापार, कारखानदारी आणि व्यावसायिक | १३.१ |
| ९ | शेती आणि कारखानदारी | १.६ |
| १० | शेती आणि व्यावसायिक | १६.४ |
| ११ | शेती आणि नोकरी | १.६ |
| १२ | व्यापार आणि व्यावसायिक | ३.३ |
| १३ | इतर | ३.३ |
| १४ | एकूण | १००.० |

आधार : संशोधकाने घेतलेल्या विविध राजकीय नेतृत्वाच्या मुलाखतीच्या आधारे जमवलेली माहिती

## राजकीय नेतृत्वाचा राजकारणात असल्याचा अनुभव

राजकारणात किती वर्षापासून कार्यरत आहेत हे पाहिले असता असे दिसून येते की, १९९० नंतरच्या राजकारणात ५ ते १० वर्षापासून कार्यरत नेतृत्वाचा भरणा जास्त प्रमाणावर आहे. दुसऱ्या बाजूने विचार करता असे दिसून येते की, २० वर्षापासून राजकारणात नेतृत्व करत असलेल्या नेतृत्वाची टक्केवारी देखील ३४.२ टक्के आहे.

सर्वसाधारणपणे नवीन नेतृत्व राजकारणात येते असे दिसत असले तरी जुने नेतृत्व देखील टिकून आहे. अहमदनगर जिल्हाची राजकारणाची घराणेशाही आणि मतदारसंघ तपासले तर असे काही बोटावर मोजण्याऐवढे नेतृत्व सापडते की, त्या नेतृत्वाला राजकीय पार्श्वभूमी नाही. उदा. कर्जत—जामखेड मतदारसंघाचे नेतृत्व करत असलेले राम शिंदे यांना राजकारणाची पार्श्वभूमी नसताना नेतृत्व पुढे आले. मात्र इतर मतदारसंघात तसे असताना दिसून येत नाही. परिणामी नवीन नेतृत्व राजकारणात येते त्या नेतृत्वाला नेतृत्वाची पार्श्वभूमी आहे. (पहा तक्ता क्र. ९.६)

**तक्ता क्र. ९.६**

**राजकारणात कार्यरत असलेले नेतृत्व**

| **अ. क्र** | **राजकारणातील नेतृत्वाचे वर्ष** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १ | १ ते ५ | ४.९ |
| २ | ५ ते १० | ३९.३ |
| ३ | ११ ते २० | २१.२ |
| ४ | २० वर्षापासून जास्त | ३४.२ |
| ५ | एकूण | १००.० |
| आधार : संशोधकाने प्रत्यक्षात राजकीय नेतृत्वच्या मुलाखतीच्या आधारे जमवलेली माहिती | | |

दुसरे असे की, १९९० नंतरच्या नेतृत्वाचा निवडणुकीचा अनुभव पाहिला असता असे दिसून येते की, थेट विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीला उभे राहिलेले नेतृत्व जास्त प्रमाणात असताना दिसून येते. कारण ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचा अनुभव असणारे ५४.१ टक्के नेतृत्वाने ग्रामपंचायत निवडणुकीत भाग घेतला नाही. तर ४५.९ टक्के नेतृत्वाने ग्रामपंचायत निवडणुकीत भाग घेतला होता. (पहा तक्ता क्र. ९.७)

## तक्ता क्र. ९.७

## ग्रामपंचायत निवडणुकीत उमेदवारी केलेले नेतृत्व

| अ. क्र | ग्रामपंचायत निवडणूक लढवली | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | एकदाही नाही | ५४.१ |
| २ | एक वेळेस | ४५.९ |
| ३ | एकूण | १००.० |

राजकीय नेतृत्वाचा पंचायत समितीचा इतिहास पहाता असे दिसून येते, ८५.५ टक्के नेतृत्वाने पंचायत समितीच्या निवडणुकीत सहभागी झाले नाही. मात्र ११.५ टक्के नेतृत्वाने पंचायत समितीच्या निवडणुकीत सहभागी होत विजय संपादन केलेला होता. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत राजकीय नेतृत्व जास्त प्रमाणात उत्साही आहेत असे दिसून येत नाही. (पहा तक्ता क्र. ९.८)

## तक्ता क्र ९.८

## पंचायत समितीच्या निवडणुकीत उमेदवारी केलेले नेतृत्व

| अ. क्र | ग्रामपंचायत सदस्य झालेले नेतृत्व | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | एकदाही नाही | ८८.५ |
| २ | पंचायत समितीते नेतृत्व केले. | ११.५ |
| ३ | एकूण | १००.० |
| आधार : प्रत्यक्षात राजकीय नेतृत्वच्या मुलाखतीच्या आधारे जमवलेली माहिती | | |

विधानसभा पातळीवरील निवडणुकीत उमेदवारी करणाऱ्या नेतृत्वाचे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचा अनुभव पाहता असे दिसून येते की, ७७ टक्के राजकीय नेतृत्व हे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत देखील सहभागी होत नाही. तर २३ टक्के नेतृत्व हे सहभागी होत जिल्हा परिषदेमध्ये देखील अनुभव घेऊन नंतर राज्य पातळीवरील राजकारणाचा अनुभव घेतला आहे. एक प्रकारे स्थानिक पातळीवर मिनी आमदार म्हणून या निवडणुकीकडे पाहिले जाते, मात्र या निवडणुकीत देखील राज्य पातळीवर नेतृत्व करू इच्छिणारे नेतृत्व या निवडणुकीत तयार होत नसताना दिसून येते. (पहा तक्ता क्र. ९.९)

**तक्ता क्र ९.९**

**जिल्हा परिषद निवडणुकीतील नेतृत्वाचा अनुभव**

| **अ. क्र** | **जिल्हा परिषद सदस्य झालेले नेतृत्व** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १ | एकदाही नाही | ७७.० |
| २ | जिल्हा परिषदेची निवडणुकीत सहभागी | २३.०० |
| ३ | एकूण | १००.०० |
| आधार : राजकीय नेतृत्वच्या मुलाखतीच्या आधारे जमवलेली माहिती | | |

राजकीय पक्षांचा आणि नेतृत्वाचे पक्षनिष्ठेविषयीचा विचार करता असे दिसून येते की, ६२.३ टक्के नेतृत्वाने एकदाही पक्षांतर केलेले नाही. तर ३७.७ टक्के नेतृत्वाने पक्षांतर केलेले आहे. यावरून असे दिसून येते की, या पक्षांतर केलेल्या नेतृत्वाने पक्षनिष्ठा पाळलेली नाही. तर या नेतृत्वाने पक्षांपेक्षा सत्ता हस्तगत करण्यास प्राधान्य दिलेले दिसून येते. त्या अंतर्गत सुक्ष्म पातळीवर जाऊन कोणत्या पक्षांकडून कोणत्या पक्षांकडे पक्षांतर जास्त प्रमाणात झाले हे पाहिले असता असे दिसून येते की, काँग्रेसकडून राष्ट्रवादीमध्ये जास्त प्रमाणवर पक्षांतर झालेले आहे. यास दोन कारणे होती.

एक म्हणजे १९९९ साली शरद पवार यांनी काँग्रेसमधून बाहेत पडत नवीन पक्षांची स्थापना करणे. दुसरे म्हणजे काँग्रेसमधून पुरेषा प्रमाणावर संधी न मिळणे हे कारण होते. तसेच काँग्रेसकडून शिवसेनेत देखील अनेक नेतृत्वाने पक्षांतर केलेले होते. राष्ट्रवादी, शिवसेना, भाजपा असे पक्ष १९९० नंतरच्या राजकारणात प्रभावीपणे पुढे आले. परिणामी नेतृत्वाला राजकीय सत्तेत येण्यासाठी अनेक प्रभावी असे पर्याय निर्माण झाले. परिणामी पक्षातंर घडून आले. भाजपा आणि शिवसेना हे पक्ष अहमदनगर जिल्ह्यात काही नेतृत्वाचा अपवाद वगळता काँग्रेस, राष्ट्रवादी, जनता दल, डावे पक्ष या पक्षांतील पक्षांतरांचे पक्ष आहेत.

अहमदनगरच्या जिल्हा राजकारणाच्या स्थानिक पातळीवरील समीकरणे आणि जात वास्तवात नव्याने जरी शिवसेना, भाजपा आणि राष्ट्रवादी हे पक्ष असलेले असले तरी या पक्षातंर्गत देखील पक्षांतर घडून आलेले दिसून येते. पक्षांतरांस हे पक्ष अपवाद राहिलेले नाहीत. काँग्रेसमधून जरी अनेक नेतृत्वाने राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला असला तरी राष्ट्रवादीकडून शिवसेना, भाजपा आणि काँग्रेस या पक्षामध्ये पक्षांतर करणारे नेतृत्व देखील मोठ्या प्रमाणावर असताना दिसून येते. (पहा तक्ता क्र. ९.१०) एकदंर अहमदनगरच्या जिल्हा राजकारणाकडे पाहिले असता असे दिसून येते, काही काँग्रेसमधील काही नेतृत्वाचा अपवाद वगळता कोणताच पक्ष आणि नेतृत्व हे एकाच पक्षांत राहिले असे दिसून येत नाही. दुसरे असे की, काँग्रेसमधील थोरात, विखे पाटील, सासणे, शिवसेनेमधील विजय औटी, अहमदनगरमधील अनिल राठोड ही पाच घराणी वगळता एकही घराणे असे नाही ते पक्षनिष्ठ आहे असे म्हणता येणार नाही. कारण प्रत्येक नेतृत्वाने केव्हाना केव्हा पक्षांतर केल्याचे दिसून येते.

अहमदनगरच्या राजकारणात निवडणुकीच्या काळात पाहण्यास मिळणारी एक बाब म्हणजे उमेदवारी नाही मिळाली तर राजकीय नेतृत्व हे बंडखोरी करताना दिसून येते. ही बंडखोरी भाजपा वगळता शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी अशा

तिन्हीही पक्षांत असताना दिसून येते. भाजपामध्ये बंडखोरी न दिसण्यामागे भाजपा हा पक्षच पक्षांतरीत असलेला आहे. त्यामुळे पक्षाला स्वत:चा असा हक्काचा मतदार वर्ग तयार करता आलेला नाही. गोपीनाथ मुंडे यांच्या माध्यमातून फक्त काही वंजारी समाज हा भाजपाच्या मागे असताना दिसून येतो. तर धनगर समाज हा राम शिंदे याच्या माध्यमातून आहे. अन्यथा पक्षांतर केलेल्या नेतृत्वाला मानणारा वर्ग हा भाजपाचा मतदार होतो. नेतृत्वाने पक्षांतर केले की सर्व मतदार पक्षांतर करतो अशी स्थिती असल्याचे दिसून येते. त्यामुळे पक्षांतरांचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. बंडखोरीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षामध्ये जास्त प्रमाणावर बंडखोरी असताना दिसून येते. त्यानंतर काँग्रेस या पक्षाचा नंबर लागतो. तर शिवसेनेकडून देखील बंडखोरी होताना दिसून येते. (पहा तक्ता क्र. ९.१०) दुसरे असे की, निवडणुकीच्या काळात जरी नेतृत्वाने बंडखोरी केली. तरी ते नेतृत्वाकडून पक्षांतर घडून येत नाही. निवडणूक संपली की पुन्हा नेतृत्व स्वगृही परत असल्याचे दिसून येते. उदा. २००४च्या निवडणुकीत श्रीगोंदा तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाकडून बबनराव पाचपुते यांनी बंडखोरी केली होती. मात्र विधानसभा निवडणुकीत जिंकून आल्यानंतर त्यांनी पुन्हा राष्ट्रवादीत प्रवेश करत मंत्रीपद स्वीकारले. अशी उदाहरणे आढळून येतात.

**तक्ता क्र. ९.१०**

**राजकीय पक्षातील पक्षांतर**

| अ.क्र | राजकीय नेतृत्वामधील पक्षांतर | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | पक्ष बदलेला नाही | ६२.३ |
| २ | काँग्रेसकडून राष्ट्रवादीत | ९.८ |
| ३ | काँग्रेसकडून शिवसेनेत | ३.३ |
| ४ | राष्ट्रवादीकडून काँग्रेसमध्ये | १.६ |
| ५ | राष्ट्रवादीकडून भाजपाकडे | ६.६ |
| ६ | राष्ट्रवादीकडून शिवसेनेकडे | १.६ |
| ७ | राष्ट्रवादीकडून इतर पक्ष | १.६ |
| ८ | काँग्रेस बंडखोर | ४.९ |
| ९ | शिवसेना बंडखोर | १.६ |
| १० | राष्ट्रवादी बंडखोर | ६.६ |
| ११ | एकूण | १००.० |
| आधार : राजकीय नेतृत्वच्या मुलाखतीच्या आधारे जमवलेली माहिती | | |

अहमदनगर जिल्ह्यातील नेतृत्वाचे पक्षातील स्थान पाहिले असता असे दिसून येते की, ४४.३ टक्के नेतृत्वाला कोणतेही पक्ष कार्यकारणीत स्थान मिळालेले नाही. पण जिल्ह्याच्या राजकारणात कार्यरत राहिलेले आहे. राज्य पातळीवरील नेतृत्व करण्याचा योग ६.६ टक्के नेतृत्वाला मिळालेला आहे. त्यात पक्ष कार्यकारणी, राज्य पातळीवरील व इतर प्रकारचे स्थान मिळालेल्या पदाचा समावेश आहे. तर जिल्हा पातळीवर स्थान मिळालेल्या नेतृत्वामध्ये २७.९ टक्के आहे. या वर्गवारीमध्ये जिल्हा पक्ष कार्यकारणी, समिती व इतर प्रकारचे मानाचे पदे मिळालेल्या नेतृत्वाचा समावेश आहे. थेट पक्ष कार्यकारणीत असलेले नेतृत्वामध्ये २१.३ टक्के नेतृत्व आहे. (पहा तक्ता क्र. ९.११) या वरून असे दिसून येते की, राजकीय नेतृत्वामध्ये निम्यापेक्षा जास्त नेतृत्वाला जिल्हा

राजकारणात कोणत्यान कोणत्या प्रकारचे लाभ असणारे पदाच्या माध्यमातून नेतृत्व करण्याची संधी मिळालेली आहे.

**तक्ता क्र. ९.११**

**जिल्हा पातळीवरील नेतृत्वाला मिळालेले स्थान**

| अ. क्र | जिल्ह्यातील नेतृत्वाला मिळालेले स्थान | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | कोणते स्थान नाही | ४४.३ |
| २ | राज्य पातळीवरील स्थान मिळालेले | ६.६ |
| ३ | जिल्हा पातळीवरील स्थान | २७.९ |
| ४ | पक्ष कार्यकारणीत स्थान | २१.३ |
| ५ | एकूण | १००.० |
| आधार : १९९० नंतरच्या नेतृत्वाकडून थेट मुलाखतीच्या आधारे जमवलेली माहिती. | | |

अहमदनगर जिल्ह्यातील आणि सहकार क्षेत्राचा संबंध हा फार मोठ्या प्रमाणावर आहे. सहकार क्षेत्र हा जिल्हा राजकारणाचा आणि नेतृत्वाचा पाया राहिलेला आहे. त्यात ६०.७ टक्के नेतृत्व हे थेट सहकार क्षेत्राशी संबंधित असणारे आहे. तर ३९.३ टक्के नेतृत्व हे सहकार क्षेत्राची पार्श्वभूमी नसताना राजकारणात आलेले आहे. यावरून अहमदनगर जिल्हा राजकारणाचा विचार करता सहकार क्षेत्रात नसणारे नेतृत्व हे दुष्काळी आणि कोरडवाहू परिसरातून आलेले आहे. तर सहकार क्षेत्रात कार्यरत असलेले नेतृत्व हे पाणी, बागायती आणि ऊस उत्पादक क्षेत्रातून आलेले आहे. सहकारी संस्था, सहकारी साखर कारखाने, सहकारी बँक, सोसायटी, सहकारी पतसंस्था अशा विविध सहकारी क्षेत्रातून हे नेतृत्व आलेले आहे. (पहा तक्ता क्र. ९.१२)

**तक्ता क्र. ९.१२**

**सहकार क्षेत्रात सक्रिय असणारे नेतृत्व**

| **अ.क्र** | **सहकार राजकारणात आहे का?** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १ | होय | ६०.७ |
| २ | नाही | ३९.३ |
| ३ | एकूण | १००.० |
| आधार : राजकीय नेतृत्वच्या मुलाखतीच्या आधारे जमवलेली माहिती | | |

राजकारणात राजकीय नेतृत्वाने प्रवेश करण्याच्या वेळेस त्या नेतृत्वाच्या घरचे कोणी नातेवाईक व इतर राजकारणात होते का पाहिले असता असे दिसून येते की, ५५ टक्के नेतृत्वाला घराण्यातील राजकीय पार्श्वभूमी आहे. तर ४५ टक्के नेतृत्वाला कोणत्याही प्रकारे राजकीय पार्श्वभूमी नसल्याचे दिसून येते. यावरून एकदंर असे म्हणता येईल की, अहमदनगरच्या राजकारणात जरी मोठ्या प्रमाणावर घराणेशाही दिसत असली तरी ४५ टक्के नेतृत्वाला कोणतीही घराच्या राजकारणाची पार्श्वभूमी नसताना राजकारणात पुढे आलेले आहे. परिणामी घराणेशाहीच्या विरोधात नव्याने पुढे येणाऱ्या नेतृत्व पुढे येत असल्याचे दिसून येते. (पहा तक्ता क्र. ९.१३)

**तक्ता क्र. ९.१३**

**अहमदनगर जिल्ह्यातील नेतृत्वाला राजकीय घराण्याचा वारसा**

| अ.क्र | घराणेशाही | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | होय | ५५.० |
| २ | नाही | ४५.०० |
| ३ | एकूण | १००.० |
| आधार : राजकीय नेतृत्वच्या मुलाखतीच्या आधारे जमवलेली माहिती | | |

राजकीय नेतृत्व कोणकोणत्या संघटना आणि कार्यक्रमात भाग घेत आहे हे पाहिले असता असे दिसून येते, १९.७ टक्के नेतृत्व कोणत्याही संघटना आणि कार्यक्रमात सहभागी होत असल्याचे दिसून येत नाही. दुसरे असे की, विविध कार्यकारी बँकां आणि सांस्कृतिक संघटनाच्या माध्यमातून नेतृत्व जास्त प्रमाणात सहभागी असल्याचे दिसून येते. जात संघटना या अलिकडच्या राजकारणात मोठा हस्तक्षेप करत आहेत. पण निवडणुकीच्या राजकारणात उतरलेले नेतृत्व हे जात संघटनांच्या माध्यमातून जास्त प्रमाणात सक्रिय असताना दिसून येत नाही. किंबहुना अनेक नेतृत्वाच्या मुलाखतीत निवडणुकांच्या राजकारणात उतरलेले नेतृत्वाकडून जात संघटनांना अप्रत्यक्षात पाठिंबा देत राजकारण करण्यास प्रध्यान्य दिलेले आहे. दुसरे असे की, जात संघटनांच्या माध्यमातून लोकमत हे संकुचित स्वरूपात होईल अशा आशयाचे नेतृत्व हे जात संघटनाच्या माध्यमातून कार्यरत नाही. मात्र सर्व प्रकारच्या जात संघटनांच्या नेतृत्वाला पाठिंबा देणे तसेच राखीव फौज तयार केली आहे. अहमदनगर जिल्ह्यांचे राजकारण हे जास्त प्रमाणावर सहकार, शेती, उद्योग, शैक्षणिक संस्था यांच्या माध्यमातून चालत असल्याचे दिसून येते. परिणामी या संस्थामध्ये नेतृत्वाचा मोठा वाटा असल्याचे स्पष्टपणे दिसून

येते. दुसरी बाब म्हणजे जात संघटनापेक्षा विविध सांस्कृतिक संघटनांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर नेतृत्व कार्यरत आहे. यात गणेश उत्सव, शिवजंयती, आंबेडकर जयंती, दुर्गा उत्सव समिती, स्थानिक पातळीवरील देव – देवता यांच्या उत्सव समित्या, अशा विविध प्रकारचे उत्सव समितीच्या माध्यमातून नेतृत्व कार्यरत आहे. अर्थात सहकारी संस्था आणि सांस्कृतिक उत्सव समित्यांमध्ये नेतृत्व कार्यरत आहे. (पहा तक्ता क्र. ९.१४)

**तक्ता क्र. ९.१४**

**अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय नेतृत्व कार्यरत असलेले विविध प्रकारच्या संघटना**

| अ. क्र | विविध सामाजिक, धार्मिक आणि व्यावसायिक संघटना मधील सहभाग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | कशातच नाही | १९.७ |
| २ | सांस्कृतिक संघटना | ४१.० |
| ३ | व्यावसायिक संघ | १.६ |
| ४ | जात संघटना आणि व्यावसायिक संघ | १.६ |
| ५ | व्यापारी संघ आणि सांस्कृतिक | १.६ |
| ६ | विविध बँक, सहकारी संस्थाच्या कार्यकारणी | ३२.८ |
| ७ | जात संघटना, धार्मिक संघटना, सांस्कृतिक, व्यापारी संघटना, आणि व्यावसायिक संघटना | १.६ |
| ८ | एकूण | १००.० |
| आधार : राजकीय नेतृत्वच्या मुलाखतीच्या आधारे जमवलेली माहिती | | |

## मतदारसंघनिहाय राजकीय विकास आणि आणि नेतृत्वाचे योगदान

एकेकाळी साखर कारखान्याच्या माध्यमातून कारखानदारांचा बालेकिल्ला मानला जात होता. तसचे साखर कारखाने, शिक्षण संस्था, सहकार क्षेत्र आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या माध्यमातून हा काँग्रेसचा बालेकिल्ला बनला होता. मात्र या बालेकिल्यात प्रथम शिवसेनेने आणि आता भाजपाने चांगलेच खिंडार पाडले आहे. जिल्ह्यातील सर्व स्थानिक ताकद ही काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या बाजूने असताना देखील विधानसभेच्या माध्यमातून सर्व बाजूने भाजपाने घेरलेले दिसून येते. जिल्ह्यात काही गड काँग्रेसला संभाळता आले आहेत. मात्र राष्ट्रवादीला ते देखील संभाळता आले नाहीत. परिणामी अनपेक्षित भाजपाला यश देऊन जाणारा हा जिल्हा मानावा लागेल. १९९० नंतर विधानसभेच्या माध्यमातून या जिल्ह्यात हळूहळू भाजपाने प्रवेश केलेला पाहण्यास मिळतो. या जिल्ह्यातील नेतृत्वाला आणि काँग्रेस पक्षाला सातत्याने वाटत होते की, नगर जिल्हा हा काँग्रेसच्या ताब्यातून कधीही जाणार नाही. मात्र १९९५ सालचे राज्य पातळीवरील सत्तांतर आणि १९९९ मधील काँग्रेस या पक्षातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तयार होणे या कारणांनी काँग्रेस प्रस्थापित नेतृत्वाला जिल्हा पातळीवर वर्चस्व ठेवणे कठिण झाले. त्यामुळे स्वत:चे मतदारसंघ संभाळण्यात धन्यता मानलेली दिसून येते.

जिल्ह्यात भंडारदरा, आणि मुळा या नगर जिल्ह्यातील आणि गंगापूर आणि दारणा ह्या नाशिक जिल्ह्यातील पाणी प्रकल्पामुळे जिल्ह्यातील अकोले, संगमनेर, कोपरगाव, राहता, श्रीरामपूर राहुरी, नेवासा आणि काही प्रमाणात शेवगाव हा पट्टा शेतीच्या बाबतीत संपन्न झालेला आहे. या पट्ट्यातील ऊस उत्पादनामुळे सहकारी साखर कारखाने याच पट्ट्यात जास्त प्रमाणात आहेत. परिणामी याच पट्ट्यामध्ये साखर कारखानदारी आलेली आहे. या शिवाय पाच मध्यम आणि ६१ लघु प्रकल्प नगर जिल्ह्यात आहेत. त्यामुळे पारनेर, पाथर्डी, कर्जत, जामखेड या तालुक्यातील दुष्काळी आणि कोरडवाहू काही भाग सोडला तर जिल्हा शेतीतील बागायती क्षेत्राच्या बाबतीत

संपन्न झालेला आहे. हा जिल्हा कृष्णा खोरे विभागात येत होता. मात्र १९९९मध्ये आघाडी शासनाने गोदावरी खोरे विकास महामंडळाशी जोडण्यात आला आहे. त्यामुळे अहमदनगर शहर वगळता या जिल्ह्याचे राजकारण शेती विकासाच्या प्रश्नाच्या आधारे होते. मात्र पारनेर, पाथर्डी, कर्जत, जामखेड या तालुक्यात दुष्काळी व कोरडवाहू प्रश्नाबरोबरच जातींचा राजकारणाचा मुद्दा मध्यवर्ती राहात आलेला आहे.

अहमदनगर जिल्ह्याच्या राजकारणावर मराठा समाजाचे वर्चस्व राहत आलेले आहे. या शिवाय माळी, धनगर, वंजारी व आदिवासी (महादेव कोळी) या जातीं काही तालुक्यात प्रभावी आहेत. अर्थात विशिष्ट तालुक्यात विशिष्ट समाजाचा प्रभाव आहे. उदा. अकोले तालुक्यात आदिवासी. पाथर्डी आणि जामखेड तालुक्यात वंजारी, कर्जत तालुक्यात धनगर तर माळी समाज कमी जास्त प्रमाणात सर्वच मतदारसंघात असताना सापडतो.

अहमदनगर जिल्ह्याचे राजकारण भौगोलिक, आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या नेहमीच बहुआयामी राहात आलेले आहे. नगर जिल्हाची जशी सहकार साखर कारखान्याचा जिल्हा म्हणून ओळख आहे त्याच प्रमाणे दुष्काळी पट्ट्यातील ऊसतोड कामगारांची संख्या लक्षणीय असणारा देखील जिल्हा आहे. दुष्काळी पट्ट्यात ऊसतोड कामगारांचा प्रश्न नेहमीच निवडणुकीच्या काळात तोंड वर काढतो. नगर जिल्ह्यातील पुर्वेकडील भाग हा दुष्काळी आहे. त्यात पाथर्डी, शेवगाव, जामखेड, कर्जत, श्रीगोदा या भागाशिवाय पारनेर आणि काही प्रमाणात संगमनेर आणि अकोले या तालुक्याचा समावेश होतो.

अहमदनगर या जिल्ह्याच्या राजकारणाचे वैशिष्ट्ये असे की, या जिल्ह्याच्या राजकारणावर सहकार क्षेत्राच्या राजकारणाचे वर्चस्व राहात आलेले आहे. या जिल्ह्यात सहकार क्षेत्राच्या माध्यमातून काँग्रेस या पक्षांचे वर्चस्व राहात आलेले आहे. मात्र राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून राष्ट्रवादी या दोन पक्षांत स्पर्धा राहात आलेली होती. तर

दुष्काळी परिसरात शिवसेना – भाजप या पक्षाने १९९०च्या नंतर शिरकाव केला होता. अलीकडे बागायती परिसरातील संगमनेर, शिर्डी आणि श्रीरामपूर वगळता सर्वच मतदारासंघात भाजपा – शिवसेनेने शिरकाव केला आहे.

२००९च्या विधानसभा निवडणुकीत एकूण १२ जागापैकी काँग्रेस या पक्षाला ३, राष्ट्रवादी ४, शिवसेना ३ तर भाजपा २ अशी स्थिती होती. तर २०१४च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने ५ जागा जिंकत आघाडी घेतली आहे. त्यापाठोपाठ काँग्रेसने ३ जागा कायम ठेवल्या आहेत. तर शिवसेनेला आपल्या २ जागा गमावत एकच जागा कायम ठेवता आली आहे. तर राष्ट्रवादीला १ जागा गमावत ३ जागा जिंकता आल्या आहेत. शिवसेनेच्या आणि राष्ट्रवादी या दोन पक्षांच्या जागा भाजपाकडे सरकल्या आहेत. मात्र ह्या जागा सरकताना काही फेरफार झालेले आहेत. (त्यासंदर्भात प्रत्येक मतदारसंघनिहाय आढावामध्ये सविस्तर विश्लेषण करण्यात आलेले आहे.) आघाडी आणि युती तुटण्याचा तोटा हा राष्ट्रवादी आणि शिवसेनेला झाला आहे. तर काँग्रेस या पक्षाने आपले गड कायम ठेवले आहेत. तर भाजपाला अनपेक्षित फायदा झालेला आहे.

## अहमदनगर दक्षिण मतदारसंघाचे राजकारण आणि नेतृत्व

१९६२ ते २००९ या काळातील अहमदनगर दक्षिण विधानसभा मतदारसंघात सुरूवातील काँग्रेस या पक्षाचे वर्चस्व होते. मात्र हे वर्चस्व काँग्रेस नेतृत्वाला टिकवता आले नाही. एकूण ११ निवडणुकीत केवळ तीन वेळेस काँग्रेस नेतृत्वाला निवडून येता आहे. काँग्रेस नेतृत्व मागे पडण्यास काँग्रेस नेतृत्वाच्या वरिष्ठाकडून प्रभावी नेतृत्वाला डावलण्यात येणे आणि स्थानिक प्रश्नांचा आधार होता. या मतदारसंघात शिवसेनेने १९९० पासून चांगलाच जम बसवलेला होता. त्यामुळे शिवसेनेच्या नेतृत्वाला ११ पैकी सलग ५ निवडणुकीत निवडून येता आले आहे. काँग्रेस (समाजवादी), जनता दल, अपक्ष नेतृत्व यांना प्रत्येकी एक वेळेस संधी मिळालेली आहे. या मतदारसंघात

स्पर्धक नेतृत्वाच्या विकासाचा प्रवास पाहता असे दिसून येते की, काँग्रेस पक्षाचे नेतृत्व सातत्याने स्पर्धक राहिल्याचे दिसून येते. सुरूवातीच्या काळात अपक्ष नेतृत्व हे स्पर्धक होते. मात्र राष्ट्रवादी दोन वेळेस, समाजवादी काँग्रेस पक्षाचे नेतृत्व एक वेळेस स्पर्धक राहिलेले आहेत. (पहा तक्ता क्र. ९.१५)

**तक्ता क्र. ९.१५**

**अहमदनगर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास**

| अ.क्र | राजकीय पक्ष | विजयी नेतृत्व | स्पर्धक पक्ष नेतृत्व |
|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०३ | ०६ |
| २ | काँग्रेस (स) | ०१ | ०१ |
| ३ | राष्ट्रवादी | ०० | ०२ |
| ४ | शिवसेना | ०५ | ०० |
| ५ | जनता दल | ०१ | ०० |
| ६ | अपक्ष | ०१ | ०२ |
| ७ | एकूण | ११ | ११ |
| आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल | | | |

१९६२ साली मतदारसंघ पुर्नरचना झाली होती. या मतदारसंघ रचनेत अहमदनगर जिल्ह्यात एक मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी आणि एक मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी राखीव करण्यात आला होता. त्यानंतर १९७८च्या मतदारसंघ पुर्नरचनेनुसार अहमदनगर दक्षिण आणि अहमदनगर उत्तर असे दोन मतदारसंघ तयार करण्यात आले होते. अहमदनगर शहर हे अहमदनगर दक्षिण या मतदारसंघात समावेश असलेले होते. १९७८ ते २००४ या कालावधीत या अहमदनगर दक्षिण मतदारसंघाचे राजकारण आणि नेतृत्व शहरी राजकारण आणि प्रभावाखाली राहिलेले आहे. १९७८ पासून या दक्षिण मतदारसंघावर कोणत्याही पक्षाचा प्रभाव होता असे नाही. १९७८ पूर्वी हा मतदारसंघ काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाखाली होता. मात्र १९७८ साली काँग्रेसचे पाउलबुध्दे नाथ आणि जनता दलाचे कुमार सप्तर्षी या स्पर्धेत शहरी मतदारसंघाने कुमार सप्तर्षी

याच्या बाजूने कौल दिला होता. कुमार सप्तर्षी युक्रांतमुळे शहरी चेहरा पुढे आला होता. त्याच्या क्रांतीकारी विचारांच्या आणि तरूणांच्या मनातील बनलेले नेतृत्व असल्याने त्यांना विजय मिळवता आला होता. पाउलबुध्दे हे विडी कामगारांच्या माध्यमातून नेतृत्व पुढे आले होते. मात्र या निवडणुकीत त्यांना यश मिळवता आले नाही. १९८० साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांची पुरोगामी समाजवादी काँग्रेस आणि इंदिरा गांधी काँग्रेस या स्पर्धेत काँग्रेसचे अरिस एम. आय या मुस्लिम नेतृत्वाने विजय मिळवला. काँग्रेस पक्षांच्या विभाजनाचा फायदा हा काँग्रेस नेतृत्वाला या निवडणुकीतून झालेला दिसून येतो. हरार किसन राजाराम यांना शरद पवार यांची साथ होती. मात्र विजय मिळवण्यापर्यंत पोहचवू शकली नाही. १९८५ साली झालेल्या निवडणुकीत शरद पवार यांच्या पुरोगामी समाजवादी काँग्रेस पक्षाचे कळमकर दादासाहेब हे निवडून आले. गेल्या निवडणुकीत निवडून आलेले काँग्रेसचे असिर शेख यांना विजयी होता आले नाही. शहरी मतदारसंघ असलेला मतदारसंघात एक प्रकारे सातत्याने नेतृत्व बदल घडून येत असताना दिसून येतो. १९९० साली झालेल्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना आणि भाजप या दोन पक्षामध्ये युती झाली होती. प्रथम या निवडणुकीत सामोरे जात होते. अहमदनगर दक्षिण मतदारसंघ युतीकडून शिवसेनेला सोडण्यात आली होती. शिवसेनेकडून या मतदारसंघात राजपूत समाजाचे अनिल राठोड यांना उमेदवारी देण्यात आली होती. अनिल राठोड यांनी शहरात शिवसेनेच्या विविध माध्यमातून नेतृत्व विकास केला होता. त्यांना प्रतिस्पर्धी १९८५ साली निवडून आलेले कळमकर दादासाहेब यांना काँग्रेसकडून उमेदवारी देण्यात आली होती. मात्र शिवसेनेने तरूणांना संघटित केलेले होते. त्यात हिंदूत्वाच्या आधारे सहज विजय मिळवला. अहमदनगर दक्षिण मतदारसंघात १९९० ते २००४ या चार निवडणुकीमध्ये सातत्याने अनिल राठोड आणि कळमकर दादासाहेब अशी नेतृत्व स्पर्धा राहिली आहे. १९९९ साली काँग्रेस विभाजनातून राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाची निर्मिती झाली. तरीही नेतृत्व स्पर्धेत बदल होताना दिसून येत नाही. १९९० नंतर अहमदनगर शहरी राजकारणात शिवसेनेने चांगल्या प्रकारे पाय रोवलेले

दिसून येते. त्यास भाजपचे अभय आगरकर यांच्याकडून चांगल्या प्रकारे साथ मिळाल्याचे दिसून येते.

१९९० पासून या मतदारसंघातून पाचवेळेस शिवसेनेचे अनिल राठोड निवडून येत होते. त्यामुळे हा मतदारसंघ पारंपारिकदृष्ट्या शिवसेनेचा बालेकिल्ला निर्माण झाला आहे. त्यामागे सेना–भाजपा युती आणि मतदारसंघातील अनिल राठोड यांचा जनसंपर्कानी ही किमया केली होती. मतदारसंघातील शहरी राजकारणाने विकासाच्या राजकारणाला या मतदारसंघात नेहमीच बगल मिळत आलेली आहे. तर भावनिक राजकारण मध्यवर्ती राहत आलेले आहे. शिवसेनेने हिंदुत्व आणि ओबीसी – व्यापारी जाती – मराठा – दलित अशी आघाडी केली होती. युती तुटल्याने ओबीसी आणि दलित जाती ह्या शिवसेनेकडून भाजपाकडे वळल्या. दुसरे असे की, १९९० पासून पुन्हा या निवडणुकीत विकासाच्या राजकारणाऐवजी जात आघाडी आणि पक्षांची ताकद या आधारावर राजकारण घडले. शिवसेनेचे उमेदवार अनिल राठोड यांच्या बाजूने शहरातील मारवाडी – व्यापारी आणि शिवसेनेची संघटित स्वरूपातील ताकद आहे. तर भाजपाच्या बाजूने ओबीसी उमेदवार आणि स्थलांतर झालेला ओबीसी (वंजारी, धनगर, माळी ) समाज आहे. तर राष्ट्रवादीच्या बाजूने शहराचे महापौरपद, विधान परिषदेचे आमदार अरूण जगताप आणि मराठा समाजाची संघटित ताकद होती. सेना भाजप युती असताना दोन्ही पक्षांच्या माध्यमातून विजय मिळवणे शक्य होत आलेले आहे.

मतदारसंघातील निवडणूक विकासाच्या प्रश्नाशिवाय जातीच्या आधारे मोठ्या प्रमाणावर होते. भाजपाने माळी उमेदवार, राष्ट्रवादी आणि काँग्रेसने मराठा उमेदवार तर शिवसेनेने राजपूत उमेदवार दिला होता. अहमदनगर शहरावर व्यापारी जातीं मारवाडी, जैन, माहेश्वरी यांची संख्या लक्षणीय आहे. याच्या साथीला माळी समाज जास्त आहे. शिवसेनेचे अनिल राठोड यांनी व्यापारी जातीं आणि शिवसेनेच्या माध्यमातून मराठा समाज व भाजपाच्या माध्यमातून माळी आणि वंजारी समाज यांची

सांगड घालून विजय मिळवत आले. शहरातील पायाभूत सुविधाचा प्रश्न, नियोजित विकासाचे प्रश्न, एमआयडीसीतील उद्योगाचे प्रश्न, शहराच्या पिण्याचा पाणी प्रश्न, वीज प्रश्न, जुन्या शहरातील सांडपाणी आणि नियोजनाचा प्रश्न असे अनेक प्रश्न जातींच्या राजकारणाबरोबर सर्वच पक्षांच्या नेतृत्वाने हाताळत आहेत. (पहा तक्ता क्र. ९.१६)

**तक्ता क्र. ९.१६**

**अहमदनगर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास**

| वर्ष | विजयी नेतृत्व | पक्ष | स्पर्धक नेतृत्व | पक्ष |
|---|---|---|---|---|
| २००९ | राठोड अनिल | शिवसेना | गुंदेचा सुवालाल | काँग्रेस |
| २००४ | राठोड अनिल | शिवसेना | कळमकर दादासाहेब | राष्ट्रवादी |
| १९९९ | राठोड अनिल | शिवसेना | कळमकर दादासाहेब | राष्ट्रवादी |
| १९९५ | राठोड अनिल | शिवसेना | कळमकर दादासाहेब | काँग्रेस |
| १९९० | राठोड अनिल | शिवसेना | कळमकर दादासाहेब | काँग्रेस |
| १९८५ | कळमकर दादासाहेब | काँग्रेस (स) | असीर एम. आय | काँग्रेस |
| १९८० | असीर एम.आय | काँग्रेस | पाऊलबुध्दे नाथ | काँग्रेस (स) |
| १९७८ | कुमार सप्तर्षी | जनता दल | पाऊलबुध्दे नाथ | काँग्रेस |
| १९७२ | बार्शीकर नारायण | अपक्ष | रानडे कलाबाई | काँग्रेस |
| १९६७ | निसाल एस.व्ही | काँग्रेस | भापकर पी.के | अपक्ष |
| १९६२ | भराडे त्रिंबक | काँग्रेस | नवशेरवरन | अपक्ष |
| आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल | | | | |

## अहमदनगर उत्तर मतदारसंघ आणि राजकीय नेतृत्व विकास

१९६२ ते २००४ या काळातील उत्तर अहमदनगर मतदारसंघात एकूण १० निवडणुकीपैकी काँग्रेस पक्षाचे नेतृत्वाला सर्वाधिक ५ वेळेस नेतृत्व करण्याची संधी मिळालेली आहे. राष्ट्रवादी या पक्षाच्या नेतृत्वास एकदा संधी मिळाली. मात्र अपक्ष

नेतृत्वाने तब्बल ४ वेळेस निवडून येत संधी मिळवली. यास कारणीभूत आहे ते म्हणजे काँग्रेस नेतृत्वाला सातत्याने डावलण्यात येणे. अपक्षामध्ये सर्वाधिक वेळेस काँग्रेस बंडखोर नेतृत्व निवडून आलेले आहे. मतदारसंघातील स्पर्धेत नेतृत्वाच विचार करता असे दिसून येते, की काँग्रेस पक्षाचे नेतृत्व ३ वेळेस, समाजवादी काँग्रेस आणि सीपीआय प्रत्येकी २, राष्ट्रवादी, जनता दल, अपक्ष या पक्षाच्या नेतृत्व हे प्रत्येकी एक वेळेस स्पर्धक राहिलेले आहे. (पहा तक्ता क्र. ९.१७)

**तक्ता क्र. ९.१७**

**अहमदनगर उत्तर विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास**

| अ.क्र | राजकीय पक्ष | विजयी नेतृत्व | स्पर्धक पक्ष नेतृत्व |
|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०५ | ०३ |
| २ | काँग्रेस (स) | ०० | ०२ |
| ३ | राष्ट्रवादी | ०१ | ०१ |
| ४ | जनता दल | ०० | ०१ |
| ५ | सीपीआय | ०० | ०२ |
| ६ | अपक्ष | ०४ | ०१ |
| ७ | एकूण | १० | १० |
| आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल | | | |

अहमदनगर उत्तर मतदारसंघ हा १९७८ साली अस्तित्वात आला. मतदारसंघात अहमदनगरच्या उत्तरेकडील ग्रामीण भागाचा प्रामुख्याने समावेश असलेला होता. या मतदारसंघात स्वातंत्र्योतर काळापासून काँग्रेस या पक्षाचे वर्चस्व राहत आलेले आहे. हा मतदारसंघातील नेतृत्व हे विकासाच्या प्रश्नांपेक्षा ग्रामीण राजकारण आणि जातींय राजकारणाच्या आधारे पुढे आलेले आहे. ग्रामीण भागातील शेती प्रश्नांच्या आधार मोठा राहत आलेला आहे. दुसरे असे या मतदारसंघात सातत्याने मराठा समाजाच्या नेतृत्वाचे वर्चस्व राहिलेले आहे. १९७८ साली झालेल्या निवडणुकीत शेळके मारूती या अपक्ष

नेतृत्वाने काँग्रेसचे मस्के किसनराव यांच्यावर विजय मिळवला होता. शेळके मारूती हे काँग्रेसचे होते. मात्र पक्षाकडून उमेदवारी नाकारल्याने त्यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी केली होती. १९७८ साली झालेल्या शरद पवार यांच्या पुलोद आणि काँग्रेस या स्पर्धेत काँग्रेसच्या मस्के किसनराव यांनी विजय मिळवला. या निवडणुकीत शरद पवार यांनी हराळ किसनराव या नेतृत्वाच्या माध्यमातून स्पर्धा देण्याचा प्रयत्न केला होता. मात्र काँग्रेस पक्षांची मुळे ही खूप खोलवर रूजलेली असल्याने पुलोद उमेदवारांना विजय मिळवता आला नाही. १९८० ते १९९० या तीन निवडणुकीत इंदिरा काँग्रेसचे शेळके मारूती यांनी बाजी मारली होती. तर त्यांना सातत्याने स्पर्धक बदलत होते. १९८० साली हराळ किसनराव, १९८५ साली अशोक बापट हे होते. तर १९८५ साली जनता दलाचे मधुकर मुळे हे होते. या तीनही निवडणुकीत काँग्रेसच्या शेळके मारूती यांच्यापुढे टिकाव लावता आला नाही. १९९५ ते २००४ या तीन निवडणुकीत अपक्ष उमेदवार शिवाजी कर्डिले यांचे नेतृत्व राहिले. शिवाजी कर्डिले हे शरद पवार यांच्या जवळचे होते. मात्र १९९५ साली त्यांना काँग्रेसकडून उमेदवारी मिळण्याची इच्छा असताना देखील मिळाली नाही. १९९५ साली त्यांना काँग्रेसच्या नेत्या कुठे विजयाताई यांनी स्पर्धा दिली. तर १९९९ साली शंकरराव गडाख या साखर सम्राट यांनी स्पर्धा दिली. साखर सम्राट असताना देखील त्यांना अपक्ष नेतृत्व शिवाजी कर्डिले यांच्यापुढे टिकाव लावता आला नाही. १९९९ च्या निवडणुकीत काँग्रेस विभाजनाचा फटका हा काँग्रेस नेतृत्वाला झाल्याचे दिसून येते. २००४ साली या मतदारसंघातून अपक्ष उमेदवार शिवाजी कर्डिले यांना शेळके मारूती या काँग्रेसच्या जुन्याच नेतृत्वाने अपक्ष उमेदवारी करत स्पर्धा करण्याचा प्रयत्न केला. मात्र यशस्वी होता आले नाही. १९७८ ते २००४ या काळातील या मतदारसंघातील नेतृत्व विकास तपासला असता असे दिसून येते की, मतदारसंघात सातत्याने मराठा नेतृत्वाची स्पर्धा राहिलेली आहे. त्याचवेळी मोठी विकासकामे घेत राजकारण करण्यापेक्षा वैयक्तिक पातळीवरील संघटन आणि जनसंपर्काला या मतदारसंघात महत्त्व आले होते. कारण साखर सम्राटांनी या

मतदारसंघात स्पर्धा नेतृत्व करण्याचा प्रयत्न केला मात्र यशस्वी झालेला दिसून येत नाही. त्याचवेळी या मतदारसंघात पक्षीय राजकारणापेक्षा नेतृत्व केंद्रीत राजकारणाकडे मतदारांनी कल दिलेला दिसून येतो. (पहा तक्ता क्र. ९.१८)

**तक्ता क्र. ९.१८**

**अहमदनगर उत्तर विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास**

| वर्ष | विजयी नेतृत्व | पक्ष | स्पर्धक नेतृत्व | पक्ष |
|---|---|---|---|---|
| २००४ | कर्डिले शिवाजी | राष्ट्रवादी | मारूती शेळके | अपक्ष |
| १९९९ | कर्डिले शिवाजी | अपक्ष | गडाख यशवंत | राष्ट्रवादी |
| १९९५ | कर्डिले शिवाजी | अपक्ष | कुटे विजयाताई | काँग्रेस |
| १९९० | शेळके मारूती | काँग्रेस | मुळे मधुकर | जनता दल |
| १९८५ | शेळके मारूती | काँग्रेस | बापट अशोक | काँग्रेस (यु) |
| १९८० | शेळके मारूती | काँग्रेस (आय) | हराळ किसनराव | काँग्रेस (यु) |
| १९७८ | शेळके मारूती | अपक्ष | मस्के किसनराव | काँग्रेस |
| १९७२ | मस्के किसन | काँग्रेस | मस्के बन्सी | सीपीआय |
| १९६७ | मस्के किसन | काँग्रेस | नागवडे बाळासाहेब | सीपीआय |
| १९६२ | नागवडे बाळासाहेब | अपक्ष | कुटे विठ्ठल | काँग्रेस |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

## शेवगाव मतदारसंघ

१९६२ ते २००९ या काळातील शेवगाव मतदारसंघाचा विचार करता एकूण १३ वेळेस झालेल्या विधानसभा निवडणुकीत ६ वेळेस काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाने संधी मिळवली. तर राष्ट्रवादी ३ वेळेस, सीपीआय २, शेकाप १, अपक्ष १ अशा प्रकारे नेतृत्व करण्याची संधी मिळालेली आहे. या मतदारसंघावर सुरूवातीच्या काळात काँग्रेस आणि सीपीआय व शेतकरी या पक्षामध्ये स्पर्धा चालत होती. त्यात

काँग्रेसला चांगल्याप्रकारे आव्हाने मिळाल्याचे देखील दिसून येते. स्पर्धक नेतृत्वाचा विचार करता असे दिसून येते की, ४ वेळेस काँग्रेस आणि ३ वेळेस भाजप या पक्षाचे नेतृत्व स्पर्धक नेतृत्वामध्ये राहिलेले आहे. तसेच सीपीआय, शेकाप आणि अपक्ष नेतृत्व देखील स्पर्धक राहिलेले आहे. या मतदारसंघ भाजप शिवसेनेकडून भाजपला सोडण्यात आल्यामुळे या मतदारसंघात भाजपकडूनच नेतृत्व पुढे आलेले दिसून येते. (पहा तक्ता क्र. ९.१९)

**तक्ता क्र. ९.१९**

**शेवगाव विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास**

| अ.क्र | राजकीय पक्ष | विजयी नेतृत्व | स्पर्धक पक्ष नेतृत्व |
|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०६ | ०४ |
| २ | काँग्रेस (स) | ०० | ०१ |
| ३ | भाजप | ०० | ०३ |
| ४ | राष्ट्रवादी | ०३ | ०० |
| ५ | सीपीआय | ०२ | ०२ |
| ६ | शेकाप | ०१ | ०१ |
| ७ | अपक्ष | ०१ | ०२ |
| ८ | एकूण | १३ | १३ |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

शेवगाव मतदाससंघ हा ग्रामीण मतदारसंघ आहे. या मतदारसंघात १९६२ ते १९६७ या काळात काँग्रेस या पक्षाचे वर्चस्व होते. त्यात पहिल्याच निवडणुकीत मराठा समाजाचे मारूती घुले यांचे वर्चस्व आले होते. या मतदारसंघात वंजारी, मराठा आणि धनगर या समाज घटकांचे प्राबल्य असल्याने स्थानिक पातळीवर हे तीन समाजघटक एकमेकांना स्पर्धक या पातळीवर पाहत आहेत. त्यात मराठा आणि वंजारी या समाज घटकांतून नेतृत्व पुढे आले. तर धनगर समाजाचे या मतदारसंघातून नेतृत्व पुढे आले नाही. १९७२ साली झालेल्या निवडणुकीत शेकापचे आणि मराठा समाजाचे किसनराम

पाटील यांचे नेतृत्व पुढे आले. त्यांना मराठा समाजाची अलशी यमुनाबाई यांनी स्पर्धा दिली. शेकाप पक्षाला जास्त काळ नेतृत्व टिकवता आले नाही. कारण १९७८ साली झालेल्या निवडणुकीत सीपीआय या पक्षाच्या लंघे वकिलराव यांनी निवडणुकीत विजय मिळवला. सीपीआय या पक्षांची विचारप्रणाली आणि संघटन या आधारावर या मतदारसंघात विजय मिळवता आला होता. सीपीआय या पक्षाने ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाला पक्षाच्या कार्यकारणीत आणि व्यावहारीक पातळीवरील प्रश्न उचललेले होते. परिणामी या मतदारसंघात डाव्या विचारांच्या सीपीआय या पक्षाला विजय मिळवता आला होता. १९८० आणि १९८५ या दोन निवडणुकीत फटके संभाजी यांनी सीपीआयच्या नेतृत्वावर मात करत सत्ता हस्तगत केली होती. फटके संभाजी यांना काँग्रेस पक्षाने सक्षम अशी साथ दिली होती. १९९०च्या निवडणुकीत अपक्ष उमेदवार तुकाराम गडाख यांनी विजय मिळवला होता. त्यांना ग्रामीण प्रश्न आणि मराठा समाजाच्या संघटन आणि सहकार क्षेत्राच्या माध्यमातून यश मिळवता आले होते. १९९५च्या निवडणुकीत अंभग पांडुरंग यांनी विजय मिळवला. १९९९ व २००४ नंतर मात्र सातत्याने राष्ट्रवादीचे नेतृत्व आणि मारूतीराव घुले यांचे चिंरजीव नरेद्र घुले यांनी मतदारसंघावर सत्ता हस्तगत केली. तर २००९ साली झालेल्या निवडणुकीत नरेंद्र घुले यांचा मुलगा चंद्रशेखर घुले यांनी विजय मिळवला. या मतदारसंघात १९९५ पासून सातत्याने भाजपाच्या माध्यमातून स्पर्धा राहत आली. त्याच वेळी मराठा समाजाच्या नेतृत्वाने स्पर्धा देण्याचा प्रयत्न केला. १९९० नंतर या मतदारसंघात घुले घराण्याची सत्ता चांगल्याच प्रकारे पुढे आलेली दिसून येते. त्यांचे इतर स्पर्धक हळूहळू स्पर्धेतून बाहेर पडत असल्याचे दिसून येते. (पहा तक्ता क्र. ९.२०)

### तक्ता क्र. ९.२०

### शेवगाव विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास

| निवडणुका | विजयी उमेदवार | पक्ष | स्पर्धक उमेदवार | पक्ष |
|---|---|---|---|---|
| १९६२ | मारूतीराव घुले | काँग्रेस | भागवत एकनाथ | अपक्ष |
| १९६७ | ढाकणे टी. पी. | काँग्रेस | पाटील के. आर | शेकाप |
| १९६७ | घुले मारूती | काँग्रेस | लंघे बी. | सीपीआय |
| १९७२ | किसनराम पाटील | शेकाप | अलशी यमिनीबाई | काँग्रेस |
| १९७२ | लंघे वकिलराव | सीपीआय | गडाख यशवंत | काँग्रेस |
| १९७८ | लंघे वकिलराव | सीपीआय | निंबाळकर एकनाथ | काँग्रेस |
| १९८० | फटके संभाजी | काँग्रेस | लंघे विठ्ठल | सीपीआय |
| १९८५ | फटके संभाजी | काँग्रेस | मुनसे मुरलीधर | काँग्रेस (स) |
| १९९० | गडाख तुकाराम | अपक्ष | घुले मारूतीराव | काँग्रेस |
| १९९५ | अभंग पांडूरंग | काँग्रेस | गडाख तुकाराम | अपक्ष |
| १९९९ | घुले नरेंद्र | राष्ट्रवादी | गडाख तुकाराम | भाजपा |
| २००४ | घुले नरेंद्र | राष्ट्रवादी | लंगे विठ्ठल | भाजपा |
| २००९ | घुले चंद्रशेखर | राष्ट्रवादी | ढाकणे प्रताप | भाजपा |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

## पाथर्डी मतदारसंघ आणि राजकीय नेतृत्व विकास

पाथर्डी या मतदारसंघाचा १९६२ ते २००४ या काळाचा विचार करता एकूण १० निवडणुकीमध्ये काँग्रेस आणि जनता दल या पक्षाच्या नेतृत्वाला प्रत्येकी ४ याप्रमाणे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. सीपीआय १ वेळेस आणि अपक्ष नेतृत्वास १ वेळेस संधी मिळाली. स्पर्धक नेतृत्वाचा विचार करता असे दिसून येते की, काँग्रेस पक्षाचे नेतृत्व ५ वेळेस, भाजप २, सीपीआय १, जनता दल १ वेळेस आणि अपक्ष १ वेळेस स्पर्धक नेतृत्व राहिले. या मतदारसंघात काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वापेक्षा जनता दल आणि

इतर डाव्या विचाराचे नेतृत्वाचा प्रभाव जास्त प्रमाणात राहिलेला आहे. (पहा तक्ता क्र. ९.२१)

**तक्ता क्र. ९.२१**

**पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास**

| अ.क्र | राजकीय पक्ष | विजयी नेतृत्व | स्पर्धक पक्ष नेतृत्व |
|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०४ | ०५ |
| २ | भाजप | ०० | ०२ |
| ३ | सीपीआय | ०१ | ०१ |
| ४ | जनता दल | ०४ | ०१ |
| ५ | अपक्ष | ०१ | ०१ |
| ६ | एकूण | १० | १० |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

१९९५ पासून या मतदारसंघात सतत वेगवेगळा उमेदवार निवडून येत आलेला आहे. १९९९ साली भाजपाकडून दगडू पाटील बडे तर २००४ साली काँग्रेसचे राजीव राजळे हे निवडून आले. २००९च्या मतदारसंघ पुर्नरचनेतून पाथर्डी आणि शेवगाव या दोन तालुक्याचा एक मतदारसंघ तयार झालेला आहे. या मतदारसंघात पाथर्डी तालुक्याचा जास्त भाग तर शेवगाव तालुक्याचा कमी भाग आहे. तरीही मतदारसंघाला शेवगाव असे नाव देण्यात आले आहे. या मतदारसंघात प्रत्येक निवडणुकीत वेगळा उमेदवार निवडून दिलेला आहे. या मतदारसंघावर वंजारी समाजाचे बबनराव ढाकणे यांचे वर्चस्व होते. २००९ साली राष्ट्रवादीचे चंद्रशेखर घुले निवडून आले. या मतदारसंघात मराठा आणि वंजारी समाजाचा प्रभाव जास्त आहे. २००९ पर्यंत ढाकणे आणि राजळे यांच्या स्पर्धा असणारा मतदारसंघ म्हणून या मतदारसंघाकडे पाहावे लागत होते. २००९ पासून मतदारसंघ पुर्नरचनेमुळे घुले घराण्याची भर पडली आहे. अर्थात हा मतदारसंघ ओबीसी – मराठा अशी स्पर्धा असणारा मतदारसंघ म्हणून पाहिले जाते. मात्र २०१४च्या निवडणुकीत राष्ट्रवादी, काँग्रेस आणि भाजपाकडून मराठा समाजाचे उमेदवार

देण्यात आले होते. तर शिवसेनेकडून वंजारी उमेदवार देण्यात आले होते. मात्र खरी स्पर्धा ही भाजपा आणि राष्ट्रवादी या दोन पक्षात झाली.

मतदारसंघात पर्नरचना झाल्यानंतर काँग्रेसचे राजीव राजळे घराण्याने सातत्याने पक्ष बदलत राहिलेले दिसून येते. २००९च्या लोकसभा निवडणुकीत मतदारसंघ राष्ट्रवादीला आघाडीकडून सुटलेला असल्याने बंडखोरी केली होती. तसेच गोपीनाथ मुंडे यांच्या संघर्ष यात्रा आणि ऊसतोड कामगारांचा प्रश्न याचा वाटा मोठा होता. मतदारसंघात वंजारी समाजाचे लक्षणीय संख्या असल्याने वंजारी समाजाने भाजपाला मतदान करावे असे आव्हान केले. चंद्रशेखर घुले यांनी पूर्वीचा शेवगाव मतदारसंघावर सहकार, शिक्षण संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून संस्थात्मक बांधणीचा आधार निर्माण केला होता. मात्र हा आधार त्यांना यावेळी विजय देऊ शकला नाही. यामागे २००९च्या निवडणुकीत निवडून आल्यापासून मतदारसंघात जनसंपर्क नसणे, दुष्काळी भागाचे प्रश्न न सोडवणे, साखर कारखान्याच्या माध्यमातून वाढता असंतोष कमी न करणे हे घटक पराभूत होण्यास कारणीभूत आहेत. उलट मोनिका राजळे यांना घराण्याचा राजकीय वारसा होता. तसेच मराठा–वंजारी–धनगर–माळी–भटक्या जमाती यांची आघाडी तयार केली होती. तसेच मतदारसंघातील दुष्काळी प्रश्न, साखर कारखान्याचे प्रश्न, पाणी प्रकल्पाचे प्रश्न, रस्ते आणि वीज प्रश्न मध्यवर्ती आणण्यात आले होते. तसेच जायकवाडी प्रकल्पाचा उजवा कालवा मतदारसंघातून जातो त्या कालव्याला पाणी सोडण्याचा प्रश्न प्रकर्षाने मांडण्याचा प्रयत्न केला होता. जातींय आघाडी आणि मतदारसंघातून प्रश्न सोडवण्याचे आश्वासक घटक भाजपाला विजय देऊन गेले. शेवगाव मतदारसंघात १९६२ ते १९७८ या काळात एका नेतृत्वाची फळी होती. त्यानंतर दुसऱ्या नेतृत्वाची फळी आलेली दिसून येते. (पहा तक्ता क्र. ९.२२)

## तक्ता क्र. ९.२२

## पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास

| वर्ष | विजयी नेतृत्व | पक्ष | स्पर्धक नेतृत्व | पक्ष |
|---|---|---|---|---|
| २००४ | राजळे राजीव | काँग्रेस | ढाकणे प्रताप | भाजप |
| १९९९ | बडे दगडू | जनता दल | राजळे राजीव | काँग्रेस |
| १९९५ | राजळे आप्पासाहेब | काँग्रेस | आंधळे विक्रम | भाजप |
| १९९० | राजळे आप्पासाहेब | काँग्रेस | भापसे बाबूराव | जनता दल |
| १९८५ | ढाकणे बबनराव | जनता दल | राजळे आप्पासाहेब | काँग्रेस |
| १९८० | ढाकणे बबनराव | जनता दल | भापसे बाबूराव | अपक्ष |
| १९७८ | ढाकणे बबनराव | जनता दल | खेडकर यादवराव | काँग्रेस |
| १९७२ | मस्के गणपत | अपक्ष | गर्जे मानिकबाई | काँग्रेस |
| १९६७ | भराडे टी.एस | काँग्रेस | काकडे जे. के | सीपीआय |
| १९६२ | आव्हाड नारायण | सीपीआय | गर्जे त्रिबंक | काँग्रेस |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

## कर्जत जामखेड मतदारसंघ आणि नेतृत्व विकास

१९६२ ते २००९ या काळात या मतदारसंघातील एकूण ११ विधानसभा निवडणुकीपैकी ६ वेळेस काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाला नेतृत्व करण्याची संधी मिळालेली आहे. तर समाजवादी काँग्रेस पक्षाला १, भाजपच्या नेतृत्वास ४ वेळेस संधी मिळालेली आहे. स्पर्धक नेतृत्वाचा विचार करता असे दिसून येते की, ४ वेळेस काँग्रेस पक्ष नेतृत्व, ३ वेळेस भाजप, जनता दल १, अपक्ष नेतृत्व ३ वेळेस स्पर्धक नेतृत्वामध्ये राहिलेले आहे. १९७८ ते २००४ या काळात हा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव होता. या राखीव काळात १९९० पर्यंत काँग्रेस पक्ष नेतृत्व राहिले तर १९९५ ते २००४ या काळात भाजप या पक्षाचे नेतृत्व राहिले. एक प्रकारे काँग्रेसकडून भाजपने हा मतदारसंघ ओढून घेतला आहे. (पहा तक्ता क्र. ९.२३)

## तक्ता क्र. ९.२३

## कर्जत विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास

| अ.क्र | राजकीय पक्ष | विजयी नेतृत्व | स्पर्धक पक्ष नेतृत्व |
|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०६ | ०४ |
| २ | काँग्रेस (स) | ०१ | ०० |
| ३ | भाजप | ०४ | ०३ |
| ४ | जनता दल | ०० | ०१ |
| ५ | अपक्ष | ०० | ०३ |
| ६ | एकूण | ११ | ११ |

आधारः १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

१६६२ ते १९७२ या काळात हा मतदारसंघ खुल्या वर्गासाठी होता. मात्र १९७८ साली झालेल्या मतदारसंघ पुर्नरचनेत हा मतदारसंघ अनुसूचित जातींसाठी राखीव करण्यात आला. परिणामी या मतदारसंघातून अनुसूचित जातींतील नेतृत्व पुढे येणार हे उघड होते. १९६२ ते १९७२ या काळात हा मतदारसंघ काँग्रेस या पक्षाचा बालेकिल्ला होता. या तिन्ही निवडणुकीत या मतदारसंघात निंबाळकर एकनाथ हे निवडून आले होते. त्यांना भारतीय जनसंघाचे झरकार राजाराम यांनी स्पर्धा देण्याचा प्रयत्न केला. मात्र ग्रामीण भागात भारतीय जनसंघाला पाहिजे त्या प्रमाणात पाठिंबा मिळाला नाही. भारतीय जनसंघ हा पक्ष मुळात शहरी चेहरा असणारा पक्ष होता. मात्र ग्रामीण भागात देखील राजकारणात उतरण्याचा प्रयत्न केला होता. १९७८ साली प्रथम मतदारसंघ पुर्नरचना झाल्यानंतर कांबळे बाजीराव यांनी रिपाईच्या माध्यमातून निवडणूक लढवत विजय संपादन केला. त्यांना जनता दलाच्या बारस्कर बाबूराव यांनी स्पर्धा करण्याचा प्रयत्न केला. रिपाईने काँग्रेस पक्षाबरोबर आघाडी केली असल्याने सहज विजय नोंदवता आला होता. १९८०च्या निवडणुकीत इंदिरा काँग्रेसचे निकाळजे दगडू सखाराम यांनी विजयी होत नेतृत्व केले. १९८५ साली पुन्हा त्यांनीच नेतृत्व केले. १९९० साली मात्र काँग्रेसचे भाईलामे विठ्ठल आणि भाजपाच्या सदाशिव लोखंडे यांच्यामध्ये स्पर्धा झाली. या

स्पर्धेत भाईलामे विठ्ठल हे विजयी झाले. मात्र १९९५ साली सदाशिव लोखंडे आणि प्रेमानंद रूपवते यांच्या स्पर्धेत प्रथम भाजपचे सदाशिव लोखंडे निवडून आले. नंतर १९९९ आणि २००४ या दोन्ही निवडणुकीत सतत सदाशिव लोखंडे हे निवडून आले. त्यांना काँग्रेसच्या अरविंद काळोखे यांनी स्पर्धा करण्याचा प्रयत्न केला. मात्र यश मिळवता आले नाही.

जामखेड–कर्जत पूर्वीचा अनुसूचित जातींसाठी असलेला राखीव मतदारसंघ १९९५ पासून भाजपाचा बालेकिल्ला राहिलेला आहे. मतदारसंघ २००२ ते २००८ या काळात झालेल्या मतदारसंघ पुर्नरचनेत खुला झाला. तरीही २००९ पुन्हा शाबूत ठेवून भाजपाने बालेकिल्ला असल्याचे दाखवून दिले. हा मतदारसंघ नेहमी दुष्काळी प्रश्न आणि कोरडवाहू शेती या घटकांनी ग्रासलेला आहे. भाजपाचा बालेकिल्ला असताना देखील हे प्रश्न पाहिजे त्या प्रमाणात सोडवण्यात आले नाहीत. राखीव मतदारसंघ असताना भाजपा बालेकिल्ला होण्यामागे आमदारांने मतदारसंघात जास्त ढवळाढवळ न करता जातीय सलोखा संभाळण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे हा मतदारसंघ भाजपाच्या बाजूने झुकला होता. त्याचबरोबर या मतदारसंघातील गोपीनाथ मुंडे यांचा प्रभाव आणि वंजारी व धनगर समाजाची संख्या ही कारणे आहेत.

या मतदारसंघात ओबीसी आणि मराठा समाजाची संख्या जास्त आहे. सातत्याने मराठा आणि ओबीसी असा स्थानिक निवडणुकांत स्पर्धा होताना दिसून येते. २००९च्या निवडणुकीत मराठा विरूध्द ओबीसी (धनगर) अशी स्पर्धा झाली होती त्यात ओबीसी उमेदवार विजयी झाला होता. या निवडणुकीत भाजपा (धनगर) आणि शिवसेनेने (वंजारी) ओबीसी उमेदवार दिले होते. तर काँग्रेस आणि राष्ट्रवादीने मराठा उमेदवार दिले होते. मात्र खरी लढत ही भाजपा आणि शिवसेना या दोन पक्षात राहिली.

भाजपाचे उमेदवार राम शिंदे यांच्या मागे भाजपाच्या माध्यमातून धनगर–वंजारी–माळी–भटक्या जमाती याचा भक्कम पाठिंबा राहिला. राम शिंदे यांच्या

विजयात गोपीनाथ मुंडे यांचा मोठा वाटा आहे. मतदारसंघातील चौडी या आहिल्याबाई होळकर यांचे जन्मगाव आहे. या गावात ३१ मे रोजी मोठा मेळाव्याचा कार्यक्रम घेण्यात येतो. त्याचा फायदा धनगर नेतृत्वाला होतो. दुसरे असे की, ओबीसी समाज भाजपाशी मोठ्या प्रमाणावर जोडला गेला. या शिवाय भाजपाच्या उमेदवार विजय होण्यास आहिल्याबाईचे वंशज आणि गेल्या पाच वर्षात स्वच्छ प्रतिमा आणि विकासाची दाखवण्यात आलेली ‘व्हीजन’ या घटकांची साथ राम शिंदे यांना होती. राम शिंदे यांच्याकडून दुष्काळी प्रश्न, पाणी प्रश्न, विविध पाझर तलावाचे नियोजित प्रकल्प, रस्ते, वीज प्रश्न सोडवण्याचे आश्वासने व्यावहारीक पातळीवर देण्यात आली होती. ती विरोधकांकडून देण्यात आली नाहीत. परिणामी मतदारसंघाचा निकाल हा भाजपाच्या बाजूने आला. (पहा तक्ता क्र. ९.२४)

**तक्ता क्र. ९.२४**

**कर्जत विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास**

| **वर्ष** | **विजयी उमेदवार** | **पक्ष** | **स्पर्धक नेतृत्व** | **पक्ष** |
|---|---|---|---|---|
| १९६२ | एकनाथ बुवासाहेब निबांळकर | काँग्रेस | हिराबाई प्रभाकर भापकर | अपक्ष |
| १९६७ | ई. बी. निबांळकर | काँग्रेस | आर. एम. झरकार | भाजेएस |
| १९७२ | निबांळकर रावसाहेब | काँग्रेस | झरकार राजाराम मुरलीधर | भाजेएस |
| १९७८ | कांबळे बाजीराव दशरथ | काँग्रेस | बारस्कर बाबुराव महादेव | जनता दल |
| १९८० | निकाळजे दगडु सखाराम | काँग्रेस (U) | बुधीवंत तुकाराम | काँग्रेस (I) |
| १९८५ | दगडु सखाराम निकाळजे | काँग्रेस | प्रभाकरराव रूपवते | अपक्ष |
| १९९० | भैलुमे विठठ्ल सहादु | काँग्रेस | लोखंडे सदाशिव किसन | भाजप |
| १९९५ | लोखंडे सदाशिव किसन | भाजप | प्रेमनंद दादासाहेब रूपवते | काँग्रेस |
| १९९९ | लोखंडे सदाशिव किसन | भाजप | काळोखे शाहुराव | अपक्ष |
| २००४ | लोखंडे सदाशिव किसन | भाजप | काळोखे अरविंद शाहुराव | काँग्रेस |
| २००९ | राम शिंदे | भाजप | देशमुख केशवराव | काँग्रेस |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

## राहुरी मतदारसंघ आणि राजकीय नेतृत्व विकास

राहुरी या मतदारसंघात १९६२ ते २००४ या काळात एकूण ११ निवडणुकीत ६ वेळेस काँग्रेस पक्ष नेतृत्वाला संधी मिळालेली आहे. भाजप २ वेळेस, राष्ट्रवादी १ वेळेस आणि अपक्ष नेतृत्वास १ वेळेस संधी मिळालेली आहे. या मतदारसंघावर काँग्रेसचे वर्चस्व स्पष्टपणे होते. मात्र उत्तरोतर वर्चस्व कमी होत स्पर्धात्मक नेतृत्वाकडे सरकलेले आहे. स्पर्धक नेतृत्वाचा विचार करता असे दिसून येते की, २ वेळेस काँग्रेस, समाजवादी काँग्रेस नेतृत्व १ वेळेस, भाजप, राष्ट्रवादी, सीपीआय नेतृत्व प्रत्येकी २ वेळेस स्पर्धक राहिलेले आहे. जनता दल आणि अपक्ष नेतृत्व प्रत्येकी १ वेळेस स्पर्धक राहिलेले आहे. या मतदारसंघात जरी काँग्रेस वर्चस्व असले तरी १९९० नंतर स्पर्धेत अनेक नेतृत्वाची भर पडत स्पर्धात्मक नेतृत्वाचा मतदारसंघ झालेला आहे. (पहा तक्ता क्र. ९.२५)

**तक्ता क्र. ९.२५**

**राहुरी विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास**

| अ.क्र | राजकीय पक्ष | विजयी नेतृत्व | स्पर्धक पक्ष नेतृत्व |
|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०६ | ०२ |
| २ | काँग्रेस (स) | ०० | ०१ |
| ३ | भाजपा | ०२ | ०२ |
| ४ | राष्ट्रवादी | ०१ | ०२ |
| ५ | सीपीआय | ०१ | ०२ |
| ६ | जनता दल | ०० | ०१ |
| ७ | अपक्ष | ०१ | ०१ |
| ८ | एकूण | ११ | ११ |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

राहुरी या मतदारसंघ १९६२ ते १९६७ या काळात काँग्रेस या पक्षाचा बालेकिल्ला होता. या मतदारसंघात डाव्या विचारांचे संघटन देखील होते. मात्र काँग्रेस लाटेत या डाव्या विचारांच्या नेतृत्वाला यश मिळवता आले नाही. डाव्या विचाराचे

पंजाजी बापू कडू आणि बी.जी थोरात हे नेतृत्व होते. त्यांनी कामगार आणि शेतमजूरांना एकत्र करत संघटन करण्याचा प्रयत्न केला होता. १९६२ आणि १९६७ या दोन निवडणुकीत बाबूराव तनपुरे यांना सीपीआय पक्षाच्या पुंजाजी बापू यांनी स्पर्धा केली मात्र यश आले नाही. मात्र १९७२ साली झालेल्या निवडणुकीत पुंजाजी बापू यांना निवडून येण्यात यश आले. १९७८ साली झालेल्या निवडणुकीत काँग्रेस नेतृत्व पवार काशिनाथ आणि जनता दलाचे कदम लक्ष्मण यांच्या स्पर्धेत पवार काशिनाथ यांनी विजय मिळवत नेतृत्व केले. १९८०च्या निवडणुकीत पुन्हा तनपुरे घराण्यातील प्रसाद तनपुरे यांनी काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी मिळवली. तर पवार काशिनाथ शरद पवार यांच्या समाजवादी इंदिरा काँग्रेस या पक्षाकडून उमेदवारी मिळवत काँग्रेसतंर्गत स्पर्धा करण्याचा प्रयत्न केला. यात तनपुरे प्रसाद यांन मतदारसंघाचे नेतृत्व करण्यास संधी मिळाली. मात्र १९८५ साली झालेल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने प्रसाद तनपुरे यांना उमेदवारी नाकारल्याने त्यांनी बंडखोरी करत अपक्ष निवडणुकीला सामोरे गेले. त्यांना शरद पवार यांच्या समाजवादी काँग्रेसचे धुमाळ रामदास यांनी स्पर्धा करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांना यश मिळवता आले नाही. १९९० ते १९९९ या काळातील तीन निवडणुकीत प्रसाद तनपुरे यांनी मतदारसंघाचे नेतृत्व केले. १९९० आणि १९९५ साली काँग्रेस पक्षाकडून नेतृत्व केले. तर १९९९ साली काँग्रेस विभाजनातून निर्माण झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाकडून नेतृत्व केले. त्यांना १९९० साली भाजपकडून धुमाळ रामदास यांनी स्पर्धा दिली. तर १९९५ साली अपक्ष उमेदवारी करत स्पर्धा केली मात्र यश आले नाही. १९९९ साली भाजपकडून चंद्रशेखर कदम यांनी स्पर्धा केली. २००४च्या निवडणुकीत राष्ट्रवादीकडून प्रसाद तनपुरे आणि भाजपकडून चंद्रशेखर कदम यांच्या स्पर्धेत चंद्रशेखर कदम हे विजयी झाले. या मतदारसंघात भाजपाला प्रथम विजयी होता आले होते. २००९च्या निवडणुकीत मतदारसंघ पुर्नरचनेमुळे अहमदनगर दक्षिण मतदारसंघ काढून टाकण्यात आल्याने शिवाजी कर्डिले आणि प्रसाद तनपुरे यांच्या स्पर्धेत पुन्हा भाजपाला या मतदारसंघाने नेतृत्व करण्याची संधी दिली.

हया मतदारसंघावर मराठा समाजाचे वर्चस्व राहत आले आहे. मतदारसंघात तनपुरे आणि कर्डिले या दोन घराण्याचे वर्चस्व राहत आलेले आहे. मतदारसंघावर साखर कारखान्याच्या माध्यमातून तनपुरे घराण्याने वर्चस्व होते. मात्र पुर्नरचनेच्या माध्यमातून मतदारसंघात अहमदनगर या शहराचा काही भाग जोडण्यात आल्याने साखर कारखान्याचे वर्चस्व असताना देखील विजयापर्यंत पोहचता आले नाही. साखर कारखाना, शिक्षणसंस्था, स्थानिक स्वराज्य संस्थेतील जिल्हा परिषद व पंचायत समिती आणि राहुरी शहराच्या राजकारणावरील वर्चस्व या माध्यमातून संस्थात्मक बांधणीतून तनपुरे घराण्याने मिळवले आहे. मतदारसंघात शेतीचा पाणी प्रश्न, वाढते शहरीकरण, दुधाचा हमीभाव प्रश्न, पिण्याचा पाणी प्रश्न असे प्रश्न मतदारसंघात होते. तरीही हे प्रश्न मध्यवर्ती न येता भावनिक आधारावर निवडणूक झाली. भाजपाच्या उमेदवाराच्या बाजूने उमेदवारांचा जनसामान्यात असलेला जनसंपर्क, काही प्रमाणात केलेली विकास कामे आणि गोपीनाथ मुंडे यांचे नेतृत्व ही जमेची बाजू होती. या मतदारसंघात तनपुरे घराण्याची घराणेशाही चांगल्याप्रकारे रूजली होती. मात्र भाजपाकडून येणारे नवीन नेतृत्व तसेच राष्ट्रवादीतील नेतृत्वाची केलेली तोडफोड या कारणांनी तनपुरे घराण्यातील नेतृत्वाला २००४ पासून चांगलेच आव्हान निर्माण केलेले आहे. (पहा तक्ता क्र. ९.२६)

**तक्ता क्र. ९.२६**

**राहुरी विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूकनिहाय नेतृत्व विकास**

| वर्ष | विजयी नेतृत्व | पक्ष | स्पर्धक नेतृत्व | पक्ष |
|---|---|---|---|---|
| १९६२ | तनपुरे बाबुराव | काँग्रेस | कडु पुंजाजी | सीपीआय |
| १९६७ | तनपुरे बी. बी. | काँग्रेस | थोरात बी. जी. | सीपीआय |
| १९७२ | कडु पुंजाजी | सीपीआय | वाघ रामनाथ | काँग्रेस |
| १९७८ | पवार काशिनाथ | काँग्रेस | कदम लक्ष्मण | जनता दल |
| १९८० | तनपुरे प्रसाद | काँग्रेस (आय) | पवार काशिनाथ | काँग्रेस (स) |
| १९८५ | तनपुरे प्रसाद | अपक्ष | धुमाळ रामदास | काँग्रेस |
| १९९० | तनपुरे प्रसाद | काँग्रेस | धुमाळ रामदास | भाजप |
| १९९५ | तनपुरे प्रसाद | काँग्रेस | धुमाळ रामदास | अपक्ष |
| १९९९ | तनपुरे प्रसाद | राष्ट्रवादी | चंद्रशेखर कदम | भाजप |
| २००४ | कदम चंद्रशेखर | भाजप | तनपुरे प्रसाद | राष्ट्रवादी |
| २००९ | कर्डिले शिवाजी | भाजप | तनपुरे प्रसाद | राष्ट्रवादी |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

## श्रीगोंदा मतदारसंघ आणि राजकीय नेतृत्व विकास

श्रीगोंदा हा मतदारसंघ १९६२ ते १९७८ या काळात अनुसूचित जातीसाठी राखीव होता. या काळात या मतदारसंघातून अनुसूचित जातींचे नेतृत्व निवडून आले. मात्र या मतदारसंघावर याच काळात काँग्रेस पक्षाचे वर्चस्व राहिले होते. १९६२ ते २००९ या काळातील एकूण निवडणुकीत ५ वेळेस काँग्रेस नेतृत्वाला संधी मिळालेली आहे. तर राष्ट्रवादीचे नेतृत्व १ वेळेस, जनता दलाचे नेतृत्व ३ वेळेस आणि अपक्ष नेतृत्वास २ वेळेस संधी मिळालेली आहे. स्पर्धक नेतृत्वाचा विचार करता असे दिसून येते की, काँग्रेस नेतृत्व ५, रिपाई २, भाजप १, जनता दल १, अपक्ष नेतृत्व १ वेळेस अशी स्पर्धक नेतृत्व राहण्याची संधी मिळालेली आहे. या मतदारसंघात जरी काँग्रेस

पक्षाचे नेतृत्वाला जास्त संधी मिळाल्याचे दिसून येत असले तरी फारसा काही नेतृत्व करण्यास वाव मिळालेला नाही. कारण एकाच नेतृत्वाने अनेक पक्षात प्रवेश करता अनेकदा संधी मिळवलेली आहे. (पहा तक्ता क्र. ९.२७)

**तक्ता क्र. ९.२७**

**श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास**

| अ.क्र | राजकीय पक्ष | विजयी नेतृत्व | स्पर्धेक पक्ष नेतृत्व |
|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०५ | ०५ |
| २ | रिपाई | ०० | ०२ |
| ३ | भाजपा | ०० | ०१ |
| ४ | राष्ट्रवादी | ०१ | ०१ |
| ६ | जनता दल | ०३ | ०१ |
| ७ | अपक्ष | ०२ | ०१ |
| ८ | एकूण | ११ | ११ |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

श्रीगोंदा हा मतदारसंघ १९६२ ते १९७२ या काळात अनुसूचित जातीसाठी राखीव मतदारसंघ होता. १९६२ साली प्रथम या मतदारसंघात बाबुराव बारस्कर यांना संधी मिळाली होती. ही संधी त्यांनी १९७२ पर्यंतच्या निवडणुकीपर्यंत टिकवून ठेवली. १९७२ साली झालेल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षानं त्यांना उमेदवारी देण्यास नकार दिला तरीही त्यांनी अपक्ष उमेदवारी करत नेतृत्व करण्याची संधी मिळवली. एक प्रकारे अपक्ष उमेदवारी करत दलित नेतृत्व पुढे आले होते. मात्र १९७८ साली झालेली निवडणूक ही मतदारसंघ पुनर्रचनेत श्रीगोंदा मतदारसंघ खुला करण्यात आला. हा मतदारसंघ खुला झाल्यानंतर प्रथम नेतृत्व करण्याची संधी नागवडे शिवाजीराव या काँग्रेस नेतृत्वाला मिळाली. त्यांना जनता दलाच्या गाडे मोहन यांनी स्पर्धा करण्याचा प्रयत्न केला. मात्र यश मिळवता आले नाही. १९८० ते १९९५ या काळात जनता दलाकडून ३ तर काँग्रेस १ वेळेस नेतृत्व करण्याची संधी बबनराव पाचपुते यांना

मिळाली. मतदारसंघात बबनराव पाचपुते यांना मानणारा एक वर्ग तयार झाला आहे. या वर्गाच्या संघटन पाचपुते यांनी केले. तसेच मतदारसंघातील शेती प्रश्न आणि इतर विकास कामे या आधारे मतदारसंघात संघटन घडवून आणलेले आहे. त्याचा फायदा त्यांना मतदारसंघ बांधणीत झालेला आहे. १९८० ते १९९५ या काळात बबनराव पाचपुते यांना काँग्रेसचे शिवाजीराव नागवडे यांनी स्पर्धा करण्याचा प्रयत्न केला. मात्र यश मिळवता आले नाही. मात्र १९९९च्या निवडणुकीत मात्र शिवाजीराव नागवडे यांना काँग्रेस विभाजनाचा फायदा होत यश मिळवता आले. मात्र हे यश २००४ च्या निवडणुकीत टिकवता आले नाही. २००४च्या निवडणुकीत पुन्हा बबनराव पाचपुते हे निवडून आले. २००९च्या निवडणुकीत पुन्हा बबनराव पाचपुतेच निवडून आले.

हा मतदारसंघ नेहमी मराठा वर्चस्वाखाली राहिला आहे. मतदारसंघात मराठा समाजाचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यापाठोपाठ माळी व धनगर समाजाचे प्रमाण लक्षणीय आहे. हा मतदारसंघ नेहमीच बबनराव पाचपुते यांच्या माध्यमातून वेगवेगळ्या पक्षांच्या बाजूने निकाल देणारा राहिलेला आहे. बबनराव पाचपुते यांच्या बाजूने सहकारी साखर कारखाना, तालुक्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, बाजार समिती, शिक्षण संस्था यांच्या माध्यमातून संस्थात्मक जाळे होते. ही संस्थात्मक बांधणी बबनराव पाचपुते यांच्या बाजूने उभी राहिलेली आहे. मतदारसंघ खुला झाल्यानंतर शिवाजीराव नागवडे आणि बबनराव पाचपुते या दोन नेतृत्वाच्या भोवती या मतदारसंघाचे राजकारण फिरत असताना दिसून येते. त्यामुळे या मतदारसंघात नागवडे आणि पाचपुते या दोन घराण्याचे प्रबळ वर्चस्व असताना दिसून येते. शिवाजीराव नागवडे यांना साखर कारखाना आणि शिक्षण संस्थेचे बळ आहे. त्यामुळे बबनराव पाचपुते यांना ते स्पर्धा करू शकलेले आहेत. (पहा तक्ता क्र. ९.२८)

**तक्ता क्र. ९.२८**

**श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास**

| वर्ष | विजयी नेतृत्व | पक्ष | स्पर्धक नेतृत्व | पक्ष |
|---|---|---|---|---|
| १९६२ | बारस्कर बाबुराव | काँग्रेस | प्रभाकर जनार्दन | रिपाई |
| १९६७ | बारस्कर बी. एम. | काँग्रेस | शिंदे ए.जी | रिपाई |
| १९७२ | बारस्कर बाबुराव | अपक्ष | शिंदे प्रभाकर | काँग्रेस |
| १९७८ | नागवडे शिवाजीराव | काँग्रेस | गाडे मोहनराव | जनता दल |
| १९८० | पाचपुते बबनराव | जनता दल | नागवडे शिवाजीराव | काँग्रेस (आय) |
| १९८५ | पाचपुते बबनराव | जनता दल | नागवडे शिवाजीराव | काँग्रेस |
| १९९० | पाचपुते बबनराव | जनता दल | नागवडे शिवाजीराव | काँग्रेस |
| १९९५ | पाचपुते बबनराव | काँग्रेस | भोस बाबासाहेब | अपक्ष |
| १९९९ | नागवडे शिवाजी | काँग्रेस | पाचपुते बबनराव | राष्ट्रवादी |
| २००४ | पाचपुते बबनराव | अपक्ष | नागवडे शिवाजीराव | काँग्रेस |
| २००९ | पाचपुते बबनराव | राष्ट्रवादी | नागवडे राजेंद्र | भाजप |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

## पारनेर मतदारसंघ आणि राजकीय नेतृत्व विकास

पारनेर मतदारसंघातील राजकीय नेतृत्वाचा विचार करता असे दिसून येते की, १९६२ ते २००९ या काळातील एकूण ११ निवडणुकीत ७ वेळेस काँग्रेस पक्षाचे नेतृत्वाला संधी मिळाली होती. १९९० नंतर या मतदारसंघात शिवसेनेचे नेतृत्व पुढे येण्यास सुरूवात झाली होती. मात्र २००४ नंतर शिवसेना नेतृत्वाला संधी मिळाल्याचे दिसून येते. राष्ट्रवादी, सीपीआय या पक्षांच्या नेतृत्वाला देखील प्रत्येकी एक वेळेस संधी

मिळालेली आहे. स्पर्धक नेतृत्वाचा विचार करता या मतदारसंघात सर्वाधिक वेळेस काँग्रेस बंडखोर नेतृत्व स्पर्धक राहिलेले आहे. दुसरे असे की, या मतदारसंघात डाव्या पक्षांचा प्रभाव असल्याने २ वेळेस सीपीआय नेतृत्व देखील स्पर्धक राहिलेले आहे. काँग्रेसचे नेतृत्व १, राष्ट्रवादी पक्षाचे नेतृत्व १ आणि शिवसेनेचे नेतृत्व २ वेळेस स्पर्धक नेतृत्व राहिलेले आहे. या मतदारसंघात १९९० नंतर पक्षीय पातळीवरील नेतृत्व स्पर्धा पुढे आलेली दिसून येते. (पहा तक्ता क्र. ९.२९)

**तक्ता क्र. ९.२९**

**पारनेर विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास**

| अ.क्र | राजकीय पक्ष | विजयी नेतृत्व | स्पर्धक पक्ष नेतृत्व |
|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०७ | ०१ |
| २ | शिवसेना | ०२ | ०२ |
| ३ | राष्ट्रवादी | ०१ | ०१ |
| ४ | सीपीआय | ०१ | ०३ |
| ५ | अपक्ष | ०० | ०४ |
| ६ | एकूण | ११ | ११ |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

१९६२ ते १९७८ या काळात पारनेर मतदारसंघात सातत्याने काँग्रेस या पक्षाच्या माध्यमातून दत्ता भगत, एन. टी गुजाळ, काळे शंकर यांचे नेतृत्व राहिलेले आहे. मात्र या नेतृत्वाला डाव्या विचारांच्या नेतृत्वाने चांगल्या प्रकारे स्पर्धा दिलेली आहे. डाव्या चळवळीचे नेतृत्व हे शेती प्रश्न आणि विचारप्रणालीच्या माध्यमातून मतदारसंघात होते. १९८०च्या निवडणुकीत तर सीपीआय या पक्षाचे बाबासाहेब ठुबे यांनी काँग्रेस नेतृत्व ज्ञानदेव पठारे यांच्यावर विजय मिळवला. १९८० पासून मात्र काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून झावरे नंदकुमार यांनी १९८५ व १९९० या दोन निवडणुकीत नेतृत्व केले. १९९५ झावरे घराण्यातील झावरे वसंत यांनी काँग्रेसकडून उमेदवारी देण्यात आली. दोन वेळेस नेतृत्व करणारे झावरे नंदकुमार झावरे यांना उमेदवारी देण्यात आली नाही.

परिणामी त्यांनी काँग्रेसमध्ये बंड करत अपक्ष उमेदवारी देत स्पर्धा करण्याचा प्रयत्न केला. १९९९ साली पुन्हा शरद पवार यांनी राष्ट्रवादीच्या माध्यमातून नंदकुमार झावरे यांना उमेदवारी देण्यात आली. त्यांनी शरद पवार यांनी दाखवलेला विश्वास सार्थ केला. मात्र २००४ साली डाव्या विचाराचे औटी भास्कर यांच्या मुलगा विजय औटी यांनी शिवसेनेच्या माध्यमातून या मतदारसंघातून नेतृत्व करण्याची संधी मिळवली. २००९ साली पुन्हा विजय औटी यांनी संधी मिळवली. १९९० च्या नंतर पारनेर मतदारसंघाचा विचार करता असे दिसून येते की, झावरे आणि औटी या दोन घराण्यात सत्ता राहिलेली आहे.

पारनेर मतदारसंघात प्रामुख्याने प्रथम १९८५ पासून काँग्रेस व नंतर (१९९९) राष्ट्रवादीच्या माध्यमातून झावरे पाटील घराण्याचे वर्चस्व होते. २००४ व २००९ च्या अशा तीन निवडणुकीत या मतदारसंघातून सलग दोनदा निवडून येण्याचा पराक्रम शिवसेनेच्या विजयी औटी यांनी केला आहे. हा मतदारसंघ तसा पाणी टंचाई, दुष्काळी, कोरडवाहू परिसर असणारा आहे. या मतदारसंघात जिल्ह्यातील सर्वात कमी पाऊस पडतो. त्यामुळे दुष्काळी प्रश्नांनी ग्रासलेला मतदारसंघ आहे. पण दुष्काळाच्या नावाने जास्त प्रमाणावर राजकारण न करता विविध विकासाचा प्रश्न आणि शेतीला पाणी प्रश्न या प्रश्नांच्या आधारे राजकारण या मतदारसंघात होत राहाते.

पारनेर मतदारसंघाने झावरे पाटील वंसतराव यांना या मतदारसंघाने १९८५ ते १९९९ या काळात सलग चार वेळा विधानसभेचे प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली होती. पण त्यांना मतदारसंघात ठोस असा कोणताही विकास कार्यक्रम राबवण्यात यश आले नाही. वसंतराव झावरे पाटील यांच्यांनतर त्यांच्या दोन मुलापैकी एकाने काँग्रेस व एकाने राष्ट्रवादी पक्षात राहणे पंसत केले. परिणामी काँग्रेसमधील गटबाजी शिवसेनेला पुढे येण्यास कारणीभूत ठरली. शिवसेनेने देखील त्याचा पुरेपुर फायदा उठवला.

विजय औटी यांच्या बाजूने स्थानिक स्वराज्य संस्थेतील जिल्हा परिषद सदस्य, लोकांशी असलेला जनसंपर्क आणि राजकारणातील स्वच्छ प्रतिमा होती. शिवाय शेती विकासाच्या संदर्भातील विविध कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आलेला विकास आराखडा, पक्षीय पातळीवरील संघटनात्मक ताकद आणि वेळोवेळी आण्णा हजारे यांनी औटी यांना पाठिंबा जाहीर केला आहे. तसेच पारनेर सहकारी साखर कारखाना बंद पडलेला आहे तो साखर कारखाना चालू करण्यासाठी जो लढा औटीने दिलेला आहे तो लोकांच्या समोर होता. अशा प्रकारचे मतदारसंघ पातळीवरील प्रश्न सोडवण्यात काँग्रेस नेतृत्व कमी पडले. मात्र या मतदारसंघात झावरे आणि औटी असे दोन घराण्याभोवती राजकारण फिरताना दिसून येते. (पहा तक्ता क्र. ९.३०)

**तक्ता क्र. ९.३०**

**पारनेर विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूकनिहाय नेतृत्व विकास**

| वर्ष | विजयी नेतृत्व | पक्ष | स्पर्धक नेतृत्व | पक्ष |
|---|---|---|---|---|
| १९६२ | भगत दत्तात्रय कोंडीराम | काँग्रेस | औटी भास्कर | सीपीआय |
| १९६७ | गुंजाळ एन. टी. | काँग्रेस | औटी भास्कर | सीपीआय |
| १९७२ | काळे शंकरराव देवराम | काँग्रेस | भगत दत्तात्रय | अपक्ष |
| १९७८ | काळे शंकरराव देवराम | काँग्रेस | ठुंबे प्रभाकर | सीपीआय |
| १९८० | ठुंबे बाबासाहेब | सीपीआय | पठारे ज्ञानदेव | काँग्रेस |
| १९८५ | झावरे पाटील नंदकुमार | काँग्रेस | ठुंबे बाबासाहेब | अपक्ष |
| १९९० | झावरे पाटील नंदकुमार | काँग्रेस | गायकवाड सबाजी | शिवसेना |
| १९९५ | झावरे पाटील वसंतराव | काँग्रेस | झावरे नंदकुमार | अपक्ष |
| १९९९ | झावरे पाटील वसंतराव | राष्ट्रवादी | गायकवाड सबाजीराव | शिवसेना |
| २००४ | औटी विजयराव | शिवसेना | पाटील वसंतराव | राष्ट्रवादी |
| २००९ | औटी विजयराव | शिवसेना | झावरे पाटील वसंतराव | अपक्ष |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

## कोपरगाव मतदारसंघ आणि राजकीय नेतृत्व विकास

कोपरगाव मतदारसंघ हा १९७८च्या मतदारसंघ पुर्नरचनेत निर्माण झालेला मतदारसंघ आहे. १९७८ ते २००९ या काळात एकूण झालेल्या ८ वेळेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे नेतृत्व ५ वेळेस निवडून आले तर राष्ट्रवादी या पक्षाचे नेतृत्व १ वेळेस निवडून आले. त्याचप्रमाणे १९९० नंतर या मतदारसंघात शिवसेना ही पुढे येत होती. २००४ आणि २००९ अशा दोन निवडणुकीत शिवसेनेचे नेतृत्व निवडून आलेले दिसून येते. तर राष्ट्रवादीकडून एक वेळेस नेतृत्व निवडून आलेले आहे. स्पर्धक नेतृत्वाचा विचार करता असे दिसून येते की, शिवसेनेचे नेतृत्व सर्वाधिक ३ वेळेस स्पर्धक राहिलेले आहे. तर काँग्रेस, समाजवादी काँग्रेस आणि जनता दल या पक्षाचे नेतृत्व प्रत्येकी १ वेळेस स्पर्धक राहिलेले आहे. या मतदारसंघात काँग्रेस आणि शिवसेना नेतृत्वामध्ये स्पर्धा १९९० नंतर असल्याचे दिसून येते. मात्र राष्ट्रवादी निर्मितीनंतर राष्ट्रवादी आणि शिवसेना अशी स्पर्धा आहे. (पहा तक्ता क्र. ९.३१)

**तक्ता क्र. ९.३१**

**कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास**

| अ.क्र | राजकीय पक्ष | विजयी नेतृत्व | स्पर्धेक पक्ष नेतृत्व |
|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०५ | ०१ |
| २ | काँग्रेस (एस) | ०० | ०१ |
| ३ | राष्ट्रवादी | ०१ | ०२ |
| ४ | शिवसेना | ०२ | ०३ |
| ५ | जनता दल | ०० | ०१ |
| ६ | एकूण | ०८ | ०८ |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

कोपरगाव हा मतदारसंघ अहमदनगर जिल्ह्यातील एक महत्त्वाचा मतदारसंघ आहे. कारण या मतदारसंघातील नेतृत्वाने कोपरगाव लोकसभेसाठी देखील नेतृत्व केले आहे. दुसरे असे की, या मतदारसंघातून १९७८ साली काँग्रेस पक्षाचे कोल्हे

शंकर यांनी नेतृत्व केले होते. या मतदारसंघात जनता दलाचे नेतृत्व देखील चांगल्या प्रकारे आहे. १९८० साली कोल्हे शंकर यांनी पुन्हा नेतृत्व केले. मात्र त्यांना या निवडणुकीत माजी आमदार काळे शंकर यांनी समाजवादी काँग्रेसकडून स्पर्धा दिली होती. १९८५ साली झालेल्या निवडणुकीत काँग्रेसकडून कोल्हे यांना उमेदवारी देण्यात आली नाही. त्यांच्या जागेवर रोहमारे दादासाहेब यांना उमेदवारी देण्यात आली. दादासाहेब रोहमारे यांना काळे संभाजी यांनी समाजवादी काँग्रेस यांनी स्पर्धा दिली. १९९० नंतर मतदारसंघात शिवसेनेचे संघटन आणि ग्रामीण भागातून घराणेशाहीच्या प्रश्नावर संघटन घडवून आणले होते. या संघटनाच्या आधारे १९९०, १९९५ आणि १९९९ या तीन निवडणुकीत नेतृत्वासाठी स्पर्धा देण्याचा प्रयत्न केला. मात्र यशस्वी होता आले नाही. काँग्रेसकडून या तीन निवडणुकीत कोल्हे शंकर यांनी नेतृत्व केले. तर शिवसेनेकडून १९९०ला काळे संभाजी, १९९५ सोनवणे भगतसिंग आणि १९९९ साली नामदेव परजणे यांनी स्पर्धा दिली. २००४ च्या निवडणुकीत शरद पवार गटातील शंकरराव काळे यांचा मुलगा अशोक काळे यांनी शिवसेनेच्या माध्यमातून कोल्हे घराण्यातील नेतृत्वाला आव्हान दिले. परिणामी २००४ आणि २००९ या दोन्ही निवडणुकीत त्यांना नेतृत्व करण्याची संधी मिळाली. कोपरगाव मतदारसंघात कोल्हे आणि काळे या घराण्यामध्ये १९९० नंतर सत्ता फिरत राहिली. कोल्हे आणि काळे ही दोन घराणे कोपरगाव मतदारसंघाच्या राजकारणात वर्चस्वशाली आहेत.

हा मतदारसंघ पारंपारिकरित्या शंकरराव कोल्हे यांच्या माध्यमातून काँग्रेसचा बालेकिल्ला होता. मात्र काळे घराण्याने शिवसेनेत या मतदारसंघात प्रवेश करत २००४ व २००९ च्या विधानसभा निवडणुकीत स्वतःकडे खेचून आणला. शिवसेनेच्या माध्यमातून या मतदारसंघात अशोक काळे यांचे नेतृत्व विकसित झाले होते. या मतदारसंघाचे वैशिष्टे असे आतापर्यंत या मतदारसंघातून मराठा नेतृत्वाने वर्चस्व गाजवलेले आहे. दुसरे असे की, या मतदारसंघाचे राजकारण सहकार क्षेत्रातील प्रभावाने

व्यापलेले आहे. अर्थात साखर सम्राटामध्ये झालेली स्पर्धा होती. त्यात कोल्हे घराणे इतर घराण्याला वर्चस्वशाली ठरले.

मतदारसंघात सहकाराचे आणि मराठा वर्चस्वाचे राजकारण होत असल्याने या मतदारसंघातील निवडणुकीच्या काळात मध्यवर्ती येणारे प्रश्न बाजूला राहात आलेले आहेत. ऊसाला हमीभाव, बागायती पिकांचा पाणी प्रश्न, मतदारसंघातील विविध कार्यकारी सोसायट्यांचे प्रश्न मध्यवर्ती आणण्यात आले होते. शिवसेना आणि भाजपा या दोन्ही पक्षाकडून हे प्रश्न मध्यवर्ती आणत हाताळण्यात येत होते. मात्र कोल्हे यांच्या बाजूने असलेले सहकार क्षेत्र, शिक्षण संस्था आणि राष्ट्रवादीत असताना स्थानिक स्वराज्य संस्थांनी साथ दिलेली आहे. या मतदारसंघात विकासाच्या प्रश्नापेक्षा नेतृत्वाच्या भोवती राजकारण फिरणारा मतदारसंघ असल्याचे दिसून येते. (पहा तक्ता क्र. ९.३२)

**तक्ता क्र. ९.३२**

**कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास**

| **वर्ष** | **विजयी नेतृत्व** | **पक्ष** | **स्पर्धक नेतृत्व** | **पक्ष** |
|---|---|---|---|---|
| १९७८ | कोल्हे शंकरराव | काँग्रेस | जाधव पंडितराव | जनता दल |
| १९८० | कोल्हे शंकरराव | काँग्रेस (स) | काळे शंकरराव | काँग्रेस (यु) |
| १९८५ | रोहमारे दादासाहेब | काँग्रेस | काळे संभाजीराव | काँग्रेस (स) |
| १९९० | कोल्हे शंकरराव | काँग्रेस | काळे संभाजीराव | शिवसेना |
| १९९५ | कोल्हे शंकरराव | काँग्रेस | सोनवणे भगतसिंग | शिवसेना |
| १९९९ | कोल्हे शंकरराव | राष्ट्रवादी | परजाने नामदेवराव | शिवसेना |
| २००४ | काळे अशोकराव | शिवसेना | कोल्हे बिपिन | राष्ट्रवादी |
| २००९ | काळे अशोक | शिवसेना | कोल्हे बिपिनदादा | राष्ट्रवादी |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

## नेवासा मतदारसंघ आणि राजकीय नेतृत्व विकास

नेवासा हा मतदारसंघ २००४ ते २००६च्या मतदारसंघ पुनर्रचनेनुसार दक्षिण अहमदनगर मतदारसंघातून निर्माण झालेला मतदार संघ आहे. २००९च्या निवडणुकीत राष्ट्रवादीचे शंकरराव गडाख यांनी नेतृत्व केले होते. नेवासा हा मतदारसंघ पारंपारिक राष्ट्रवादी या पक्षांच्या बाजूने राहिलेला आहे. या मतदारसंघात गडाख घराण्याचे वर्चस्व आहे. मतदारसंघात गडाख घराण्याने साखर कारखाना, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि शिक्षण संस्था, दुध संघ, बाजार समितीच्या माध्यमातून संस्थात्मक बांधणी केलेली आहे. मतदारसंघात प्रथम यशवंत गडाख यांनी या बांधणीची सुरूवात केली होती. त्यांच्या नंतर त्यांचा मुलगा शंकरराव गडाख व प्रशांत गडाख यांच्या माध्यमातून प्रभाव टिकवून आहेत.

या मतदारसंघात अनपेक्षित असा निकाल लागलेला आहे. या मतदारसंघात भाजपा आणि राष्ट्रवादी या दोन पक्षांत स्पर्धा होती. त्यात कोणत्याही प्रकारे प्रभाव नसणारे भाजपाचे उमेदवार लंघे यांनी स्पर्धा दिली होती. मात्र त्यांना नेतृत्व करण्याची संधी मिळाली नाही. गडाख घराण्याचे सातत्याने राजकीय वर्चस्व राहात असताना देखील मतदारसंघातील शेती मालाचे प्रश्न, ऊसाचा भावप्रश्न, शेतीचा पाणी प्रश्न सोडवण्यास अपयश आलेले आहे. मात्र भाजपाला या मतदारसंघात संस्थात्मक आधार निर्माण करता आला नाही. हा मतदारसंघात ग्रामीण भागातील पायाभूत प्रश्नांनी ग्रासलेला मतदारसंघ आहे.

## श्रीरामपूर मतदारसंघ आणि राजकीय नेतृत्व

श्रीरामपूर मतदारसंघ हा कॉंग्रेस पक्षाचा बालेकिल्ला आहे. कारण या मतदारसंघात १९६२ ते २००९ या काळात एकूण ११ वेळेस झालेल्या निवडणुकीत ८ वेळेस कॉंग्रेस पक्षाचेच नेतृत्व निवडून आलेले आहे. त्यानंतर समाजवादी कॉंग्रेस पक्षाच्या नेतृत्वाला २ वेळेस आणि जनता दलाच्या नेतृत्वास १ वेळेस निवडून येण्यास संधी

मिळालेली आहे. स्पर्धक नेतृत्वाचा विचार करता असे दिसून येते की, काँग्रेसत्तेर पक्षाचे नेतृत्व निवडून येत असताना काँग्रेस पक्षाचे नेतृत्वच स्पर्धक राहिलेले आहे. राष्ट्रवादी, जनता दल, रिपाई, पीएसपी या पक्षाचे नेतृत्व प्रत्येकी १ वेळेस स्पर्धक राहिलेले होते. शिवसेनेचे नेतृत्व २ निवडणुकीत स्पर्धक राहिले होते. एक प्रकारे या मतदारसंघातील नेतृत्व आणि राजकीय विकास पाहता हा मतदारसंघ हा काँग्रेस पक्षाचा बालेकिल्लाच राहिलेला आहे. (पहा तक्ता क्र. ९.३३)

**तक्ता क्र. ९.३३**

**श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास**

| अ.क्र | राजकीय पक्ष | विजयी नेतृत्व | स्पर्धक पक्ष नेतृत्व |
|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०८ | ०३ |
| २ | काँग्रेस (स) | ०२ | ०० |
| ३ | राष्ट्रवादी | ०० | ०१ |
| ४ | रिपाई | ०० | ०१ |
| ५ | शिवसेना | ०० | ०२ |
| ६ | जनता दल | ०१ | ०१ |
| ७ | पीएसपी | ०० | ०१ |
| ८ | अपक्ष | ०० | ०२ |
| ९ | एकूण | ११ | ११ |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

१९६२च्या निवडणुकीत हा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव असल्याने या मतदारसंघात राजकारण हवे तसे दिसून आले नाही. या निवडणुकीत चर्मकार समाजाचे दोन्ही उमेदवार होते. परिणामी दलितामधील लढत असल्याने मराठा समाज शांत राहिल्याचे दिसून येते. मात्र १९६७ च्या निवडणुकीत माळी विरूध्द मराठा अशी सरळ लढत झाली होती. या निवडणुकीत माळी समाजाचे नेतृत्वाला बनकर यांना थेट काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी असल्याने सहज विजयी होता आले होते. मराठा समाजाचा उमेदवार काँग्रेस समाजवादी पक्षाकडून उतरलेला होता. या पक्षाला तत्कालीन काळात

पाहिजे त्या प्रमाणात जनाधार नव्हता. हा पक्ष शहरी भागात पाय रोवून होता. मात्र तरीही ओगले हे ग्रामीण भागातून या पक्षाकडून उतरले होते. मात्र यश मिळवता आले नाही. १९७२ साली कॉँग्रेसकडून गोविंदराव आदिक यांना उमेदवारी दिल्याने सहजरित्या मराठा नेतृत्वाअंतर्गत स्पर्धा झाल्याचे दिसून येते. तर अपक्ष उमेदवार भास्कर गलांडे यांनी उमेदवारी केली होती. या निवडणुकीत विकास कामापेक्षा पक्षाकडे लोकांचा मतदान करण्याचा कल होता. १९७८ साली पुन्हा गोविंदराव आदिक आणि जनता दलाचे तेकवडे यांच्यात नेतृत्वासाठी लढत झाली. मात्र त्या निवडणुकीत देखील गोविंदराव आदिक यांना नेतृत्व करण्याची संधी मिळाली. शरद पवार यांनी केलेल्या बंडात शरद पवार यांच्या बाजूने गेल्याने कॉँग्रेस पक्षाने मुरकुटे काशीनाथ यांना उमेदवारी देत नेतृत्व करण्याची संधी दिली. गोंविदराव आदिक यांना संयुक्त कॉँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली होती. मात्र संस्थात्मक आधार नसणे आणि पक्ष सोडणे या कारणांनी नेतृत्व मागे पडत गेले. १९८० ची विधानसभा निवडणूक ही वैशिष्ट्यपुर्ण ठरलेली दिसून येते. कारण शरद पवार यांच्या कॉँग्रेस आणि इंदिरा कॉँग्रेस या दोन्ही कॉँग्रेसकडून नवखे उमेदवार देण्यात आले होते. या निवडणुकीत शरद पवार यांच्या कॉँग्रेस पक्षाला नेतृत्व करण्यासाठी यश मिळाले. १९९० साली मुरकुटे भानुदास यांना जनता दलाकडून उमेदवारी मिळवत नेतृत्व करण्याची संधी मिळाली. मात्र १९९५ साली शरद पवार यांच्यामुळे पुन्हा मुरकुटे भानुदास यांनी कॉँग्रेसकडून उमेदवारी मिळवत नेतृत्व केले. मात्र १९९९ला पुन्हा मुरकुटे भानुदास हे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षात गेले. परिणामी कॉँग्रेस पक्षाकडून सासाणे जयंत यांना संधी दिली. जयंत सासणे यांनी शिर्डी देवस्थान आणि कॉँग्रेस या पक्षाच्या माध्यमातून संघटन कौशल्याच्या आधारावर १९९९ साली विजय मिळवला. तसेच २००४ साली देखील पुन्हा मुरकुटे भानुदास यांनी शिवसेनेतून प्रवेश करून नेतृत्व करण्याची संधी मिळवण्याचा प्रयत्न केला. मात्र यश मिळाले नाही. २००९च्या विधानसभा निवडणुकीत हा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव झाला. मात्र सासणे जयंत यांनी या मतदारसंघात वर्चस्व निर्माण करत त्यांच्याच

मर्जीतील चर्मकार समाजाचे कांबळे भाऊसाहेब यांना नेतृत्व करण्याची संधी दिली. (पहा तक्ता क्र. ९.३४)

**तक्ता क्र. ९.३४**

**श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास**

| **वर्ष** | **विजयी नेतृत्व** | **पक्ष** | **स्पर्धक नेतृत्व** | **पक्ष** |
|---|---|---|---|---|
| १९६२ | चतुर्भुज बबुराव | काँग्रेस | वाघचौरे वामन | रिपाई |
| १९६७ | बनकर जे. डब्लु. | काँग्रेस | ओगळे जी. जे. | पिएसपी |
| १९७२ | आदिक गोंविदराव | काँग्रेस | गलांडे भास्करराव | अपक्ष |
| १९७८ | आदिक गोंविदराव | काँग्रेस | तेकवडे जनार्दनराव | जनता दल |
| १९८० | मुरकुटे भानुदास | काँग्रेस (स) | आदिक गोंविदराव | काँग्रेस |
| १९८५ | पवार दौलतराव | काँग्रेस (स) | जाठर सुरेश | काँग्रेस |
| १९९० | मुरकुटे भानुदास | जनता दल | आदिक गोंविदराव | काँग्रेस |
| १९९५ | मुरकुटे भानुदास | काँग्रेस | कांबळे अनिल | अपक्ष |
| १९९९ | सासणे जयंत | काँग्रेस | मुरकुटे भानुदास | राष्ट्रवादी |
| २००४ | सासणे जयंत | काँग्रेस | मुरकुटे भानुदास | शिवसेना |
| २००९ | कांबळे भाऊसाहेब | काँग्रेस | डोळस भाऊ | शिवसेना |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

हा मतदारसंघ मराठा वर्चस्वासाठी असणारा मतदारसंघ २००२ ते २००८ मतदारसंघ पुर्नरचना आयोगानुसार अनुसूचित जातींसाठी राखीव झालेला आहे. मात्र या मतदारसंघातील मराठा वर्चस्वाचे अंतर्गत २००९ आणि २०१४ अशा दोन्ही निवडणुकीत दिसून आले. १९९०ला भानुदास मुरकुटे जनता दलाकडून या मतदारसंघात निवडून आले होते. त्यानंतर सातत्याने काँग्रेसचा उमेदवार निवडून येत आलेला आहे. या मतदारसंघातून १९९५ साली काँग्रेसचे भानुदास मुरकुटे हे निवडून आले होते. मात्र १९९९च्या राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून भानुदास मुरकुटे यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. मात्र काँग्रेसच्या माध्यमातून जयवंत सासणे यांनी १९९९ व २००४ साली विजय मिळवत

वर्चस्व निर्माण केले. त्यामुळे या मतदारसंघात मुरकुटे आणि सासणे अशा या दोन्ही मराठा घराण्याचे वर्चस्व राहात आलेले आहे.

श्रीरामपूर, शिर्डी आणि संगमनेर हे तीन मतदारसंघ सातत्याने काँग्रेसच्या बाजूने राहिलेले आहेत. श्रीरामपूर मतदारसंघात सातत्याने भानुदास मुरकुटे आणि जयवंत सासणे या दोन मराठा नेतृत्वाचे वर्चस्व होते. त्यात गोविंदराव आदिक यांची भर होती. मात्र त्यांना एकवेळेस तेवढे यशस्वी होता आले. इतर वेळी त्यांना श्रीरामपूरच्या राजकारणावर जम बसवता आला असे दिसून येत नाही. गोविंदराव आदिक हे ५ वेळा आमदार २ वेळा खासदार राहिले. तसेच परिवहन महामंडळाचे अध्यक्ष राहिले होते. आदिक यांना १९७२ आणि १९७८ या दोन विधानसभा निवडणुकीत लोकांमधून निवडून येता आले. १९९०च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसकडून असताना देखील त्यांना जनता दलाचे भानुदास मुरकुटे यांच्याकडून पराभूत व्हावे लागले. या निवडणुकीच्या राजकारणांपासून आदिक यांनी फारकत घेतल्याचे दिसून येते. कारण या निवडणुकीनंतर श्रीरामपूरच्या राजकारणत काँग्रेसचे जयवंत सासणे यांचे नेतृत्व पुढे आले. जयवंत सासणे यांनी काँग्रेसमधून राहून शरद पवार यांच्या विरोधाची भूमिका सातत्याने घेतली. या विरोधाच्या भूमिकेत त्यांनी यश मिळवलेले दिसून येते. १९९९च्या निवडणुकीत भानुदास मुरकुटे यांनी शरद पवार यांच्या बरोबर राहत राष्ट्रवादीकडून निवडणूक लढवली. मात्र जयवंत सासणे यांनी त्यांना यश येऊ दिले नाही. परिणामी भानुदास मुरकुटे यांनी २००४च्या निवडणुकीत शिवसेनेत प्रवेश करत शिवसेनेकडून उमेदवारी केली. तरीही त्यांना यश आले नाही.

या मतदारसंघाचा विचार करता असे दिसून येते की, १९६२च्या निवडणुकीत हा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव होता. तो १९६७च्या मतदारसंघ पुर्नरचनेत खुला झाला होता. परिणामी १९६७च्या विधानसभा निवडणुकीपासून २००४च्या निवडणुकीपर्यंत खुला होता. या सर्व निवडणुकीत या मतदारसंघात मराठा समाजातील

नेतृत्वामध्येच स्पर्धा राहिल्याचे दिसून येते. दुसरी बाब अशी की, स्वातंत्र्योतर काळातील १९९०चा अपवाद वगळता या मतदारसंघातून सातत्याने काँग्रेसचा उमेदवार निवडून आलेला आहे. १९७२ पासून या मतदारसंघात आदिक, मुरकुटे आणि सासणे या तीन घराण्यात राजकीय सत्ता फिरत राहिलेली आहे. त्यात ही १९९० नंतर मुरकुटे आणि सासणे या दोन मराठा घराण्यात सत्ता राहिली. मात्र २००९च्या निवडणुकीपूर्वी झालेल्या (२००२—२००६) मतदारसंघ पुर्नरचना परिसिमन आयोगानुसार हा मतदारसंघ अनुसूचित राखीव झाला. परिणामी २००९च्या निवडणुकीत जयवंत सासणे यांच्या मर्जीतील आणि अत्यंत विश्वासू भाऊसाहेब कांबळे यांची वर्णी लागली. २००९च्या निवडणुकीत मतदारसंघ राखीव झाल्यानंतर जयवंत सासणे यांनी आपल्या विश्वासातील आणि चर्मकार समाजातील भाऊसाहेब कांबळे यांनी उमेदवारी देत निवडून आणले होते. तसेच २००९च्या निवडणुकीत देखील त्यांनाच उमेदवारी देत निवडून आणले आहे. मतदारसंघात काँग्रेस आणि भाजपा अशी दुहेरीच लढत झालेली दिसून येते. मुळात मतदारसंघात भाजपाकडे उमेदवार नव्हता मात्र काँग्रेसचे बंडखोर माजी खासदार बाळासाहेब वाघचौरे यांना उमेदवारी दिली होती. स्थानिक राजकारणात कोणतीही ताकद भाजपाच्या बाजूने नव्हती, प्रचारात काँग्रेसच्या विरोधात मुद्दे उपस्थित करता आले नाहीत. उलट काँग्रेसच्या बाजूने जयंत सासणे यांच्या माध्यमातून सहकार साखर कारखाना, शिक्षण संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, कृषि उत्पन्न बाजार समिती अशा विविध घटकांच्या माध्यमातून निर्माण करण्यात आलेली संस्थात्मक ताकद होती. याच्या साथीला स्थानिक विकासाचा आराखडा आणि प्रश्न सोडवण्याची देण्यात येणारी आश्वासने होती. जंयत सासणे यांनी ऊसाचा प्रश्न आणि ऊसासाठी लागणारे पाणी मिळवून देण्याच्या हमीचा जोरदार प्रचार मतदारसंघात केला होता.

## शिर्डी मतदारसंघ आणि राजकीय नेतृत्व विकास

शिर्डी हा मतदारसंघ काँग्रेसचा बालेकिल्ला राहिलेला आहे. कारण या मतदारसंघात १९६२ ते २००९ या काळात झालेल्या ११ निवडणुकीमध्ये ८ वेळेस काँग्रेस या पक्षाच्या नेतृत्व निवडून आले आहेत. शिवसेनेना नेतृत्वाला एक वेळेस संधी मिळालेली आहे. मात्र शिवसेनेतील नेतृत्व हे काँग्रेसमध्ये पक्षांतर केलेले नेतृत्व होते. काँग्रेसचे नेतृत्वाचा प्रंचड प्रमाणावर प्रभाव असताना देखील २ वेळेस अपक्ष नेतृत्व या मतदारसंघातून निवडून आलेले आहे. ही बाब नजरेआड करता येत नाही. स्पर्धक नेतृत्वाचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, अपक्ष नेतृत्व निवडून आले होते. त्या वेळेस काँग्रेस नेतृत्व स्पर्धक नेतृत्व होते. त्यामुळे काँग्रेस नेतृत्व २ वेळेस या मतदारसंघात स्पर्धक राहिलेले आहे. समाजवादी काँग्रेस १, राष्ट्रवादी १, शिवसेना ३ जनता दल २ आणि अपक्ष नेतृत्व २ वेळेस या मतदारसंघात स्पर्धक राहिलेले आहे. एकदंर या मतदारसंघात काँग्रेस पक्ष नेतृत्व ताळागाळात जाऊन पोहचला असल्याने प्रंचड प्रमाणावर वर्चस्व आहे. (पहा तक्ता क्र. ९.३५)

**तक्ता क्र. ९.३५**

**शिर्डी विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास**

| अ.क्र | राजकीय पक्ष | विजयी नेतृत्व | स्पर्धेक पक्ष नेतृत्व |
|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०८ | ०२ |
| २ | काँग्रेस (स) | ०० | ०१ |
| ३ | राष्ट्रवादी | ०० | ०१ |
| ४ | शिवसेना | ०१ | ०३ |
| ५ | जनता दल | ०० | ०२ |
| ६ | अपक्ष | ०२ | ०२ |
| ७ | एकूण | ११ | ११ |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

शिर्डी या मतदारसंघात १९६२च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे नेतृत्व निवडून आले. मात्र काँग्रेसतंर्गत असलेल्या गटबाजीने १९६७च्या निवडणुकीत डोके वर काढले होते. कारण अपक्ष उमेदवार एम. ए गाडे हे निवडून आले. तर काँग्रेस उमेदवार एस. डी काळे यांना पराभूत व्हावे लागले. १९७२ साली देखील कोल्हे शंकर यांनी अपक्ष उमेदवारी करत मतदारसंघाचे नेतृत्व केले. त्यामुळे १९६७ ते १९७७ या दहा वर्षाच्या काळात अपक्ष नेतृत्वाला या मतदारसंघाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली होती. १९७८ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे घोंगरे चंद्रभान आणि जनता दलाचे मस्के आण्णासाहेब यांच्या स्पर्धेत चंद्रभान घोंगरे यांना नेतृत्व करण्याची संधी मिळाली. १९८०च्या निवडणुकीत जनता दलाचे मस्के आण्णासाहेब यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करत उमेदवारी मिळवली. मतदारसंघात काँग्रेस तळागाळापर्यंत पोहचला असल्याने या निवडणुकीत सहज विजय मिळवता आला. म्हस्के आण्णासाहेब यांना शरद पवार यांच्या समाजवादी काँग्रेस पक्षाचे नेतृत्व असलेल्या जाधव भास्करराव यांनी स्पर्धा करण्याचा प्रयत्न केला. मात्र यश आले नाही. म्हस्के आण्णासाहेब यांनी १९८० ते १९९० या काळातील तीन विधानसभा निवडणुकीत मतदारसंघाचे नेतृत्व केले. त्यांना १९८२ साली म्हस्के रावसाहेब, तर १९९० साली घोंगरे एकनाथ चंद्रभान यांनी स्पर्धा करण्याचा प्रयत्न केला. मात्र जनता दल आणि समाजवादी काँग्रेस या दोन्ही पक्षाच्या नेतृत्वाला नेतृत्व करण्यास संधी काँग्रेस नेतृत्वाने मिळू दिली नाही.

१९९५ साली झालेल्या निवडणुकीत विखे घराण्यातील नेतृत्व राधाकृष्ण विखे पाटील यांनी या मतदारसंघातील निवडणुकीच्या राजकारणात प्रवेश करत मतदारसंघातून नेतृत्व करण्याची संधी मिळवली. एकदा मिळालेली संधी त्यांनी ११९९, २००४ आणि २००९ अशा चार वेळेस निवडून येत सोडली नाही. विखे घराण्यातील नेतृत्वाला विरोध करण्याचा प्रयत्न १९९५ साली शिवसेनेकडून गाडेकर धनंजय, १९९९ साली राष्ट्रवादीकडून म्हस्के रावसाहेब, २००४ साली शिवसेनेकडून पुन्हा गाडेकर धनंजय व २००९ साली शिवसेनेकडून पिपडा राजेंद्र यांनी केला. मात्र यश मिळवता आले नाही.

विखे पाटील घराण्याने १९९९च्या निवडणुकीत काँग्रेसकडून अन्याय झाला या भावनेने शिवसेनेत प्रवेश केला होता. या निवडणुकीत शिवसेनेकडून राधाकृष्ण विखे पाटील यांनी निवडणूक लढली होती. या निवडणुकीत विखे घराण्याने पक्ष बदलला होता तरीही त्यांनी नेतृत्व करण्याची संधी सोडली नाही. मतदारांनी विखे पाटील यांना भरघोस मतानी पाठिंबा दिला होता. या मतदारसंघात विखे पाटील यांची निवडणूक आणि विकासकामांच्या माध्यमातून घराणेशाही निर्माण झालेली आहे. ही घराणेशाही इतकी मजबूत आहे की, इतर नेतृत्वाला या मतदारसंघात १९९५ पासून कोणत्याही प्रकारे नेतृत्व करण्याची संधी मिळालेली नाही.

या मतदारसंघाचा १९९९चा अपवाद वगळता आतापर्यत काँग्रेसचे विखे पाटील यांच्या घराण्याच्या माध्यमातून एकहाती वर्चस्व राहात आलेले आहे. १९९९च्या निवडणुकीत शिवसेनेकडून विखे पाटील घराण्यातील राधाकृष्ण विखे पाटील निवडून आले आहेत. या मतदारसंघात १९९५ पासून 'वन मॅन' शो राहिलेला आहे. सलग चार वेळेस राधाकृष्ण विखे पाटील निवडून आले आहेत. २००९च्या निवडणुकीत देखील 'वन मॅन' शो राहिलेला आहे. विखे पाटील 'वन मॅन' राहण्यामागे पारंपारिकरित्या विखे पाटील घराणे राजकारणात असणे, सहकारी साखर कारखाने, सहकारी बॅक, मतदारसंघातील सर्व जिल्हा परिषदा, पंचायत समिती, शिर्डी नगरपालिका, विविध प्रकारच्या शिक्षण संस्था, पतसंस्था, विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यां, जनसंपर्क अशा विविध माध्यमातून बळकट असा संस्थात्मक बांधणीचा जनाधार निर्माण केलेला आहे. विरोधक निर्माण होण्यासाठी जी 'पैस' लागतो तो विकास कामाच्या माध्यमातून निर्माण होऊ दिला नाही. परिणामी शिर्डी मतदारसंघात विखे पाटील घराण्याच्या विरोधात प्रभावीपणे विरोधक निर्माण झालेला नाही. विखे पाटील या घराण्याने नेहमीच मतदारसंघकेंद्रीत विकासाच्या भूमिका घेत सहकार आणि विविध खाजगी माध्यमातून विकास केला असल्याने मतदारसंघावर एकहाती वर्चस्व निर्माण केले आहे. (पहा तक्ता क्र. ९.३६)

**तक्ता क्र. ९.३६**

**शिर्डी विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास**

| वर्ष | विजयी नेतृत्व | पक्ष | स्पर्धक नेतृत्व | पक्ष |
|---|---|---|---|---|
| १९६२ | रोहमारे कारभारी | काँग्रेस | गाडे मेहनराव | अपक्ष |
| १९६७ | एम. ए. गाडे | अपक्ष | काळे एस. डी. | काँग्रेस |
| १९७२ | कोल्हे शंकरराव | अपक्ष | रोहमारे कारभारी | काँग्रेस |
| १९७८ | घोंगरे चंद्रभान | काँग्रेस | म्हस्के अण्णासाहेब | जनता दल |
| १९८० | म्हस्के अण्णासाहेब | काँग्रेस (I) | जाधव भास्करराव | अपक्ष |
| १९८५ | म्हस्के अण्णासाहेब | काँग्रेस | म्हस्के रावसाहेब | काँग्रेस |
| १९९० | म्हस्के अण्णासाहेब | काँग्रेस | घोंगरे एकनाथ | जनता दल |
| १९९५ | विखे राधाकृष्ण | काँग्रेस | गाडेकर धनंजय | शिवसेना |
| १९९९ | विखे राधाकृष्ण | शिवसेना | म्हस्के रावसाहेब | राष्ट्रवादी |
| २००४ | विखे राधाकृष्ण | काँग्रेस | गाडेकर धनंजय | शिवसेना |
| २००९ | विखे राधाकृष्ण | काँग्रेस | पिपाडा राजेंद्र | शिवसेना |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

## संगमनेर मतदारसंघ आणि राजकीय नेतृत्वाचा विकास

संगमनेर हा मतदारसंघ तर अहमदनगर जिल्ह्यातील सर्वाधिक वेळेस काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वास संधी देणारा मतदारसंघ आहे. १९६२ ते २००९ या काळातील एकूण ११ निवडणुकीत एक वेळेचा अपवाद वगळता आतापर्यंत सर्वच्या सर्व निवडणुकीत काँग्रेस पक्ष नेतृत्वाला संधी मिळालेली आहे. या मतदारसंघात सातत्याने स्वातंत्र्योतर काळात काँग्रेस पक्षच एकमेव राहिलेला आहे. स्पर्धक नेतृत्वाचा विचार करता असे

दिसून येते की, भाजप नेतृत्व १ वेळेस, शिवसेना नेतृत्व ३ वेळेस, जनता दल, एसएसपी नेतृत्व प्रत्यकी १ वेळेस आणि अपक्ष नेतृत्व ३ वेळेस असे स्पर्धक नेतृत्व राहिलेले आहे. परिणामी हा काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला राहिलेला आहे. (पहा तक्ता क्र. ९.३७)

**तक्ता क्र. ९.३७**

**संगमनेर विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास**

| अ.क्र | राजकीय पक्ष | विजयी नेतृत्व | स्पर्धक पक्ष नेतृत्व |
|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | १० | ०० |
| २ | भाजपा | ०० | ०१ |
| ३ | शिवसेना | ०० | ०३ |
| ४ | जनता दल | ०० | ०१ |
| ५ | एसएसपी | ०० | ०१ |
| ६ | अपक्ष | ०१ | ०४ |
| ७ | एकूण | ११ | ११ |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

संगमनेर मतदारसंघात १६६२ ते २००९ या काळात १९८५ साली झालेल्या निवडणुकीचा अपवाद वगळता सातत्याने काँग्रेस नेतृत्वाला नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. संगमनेर या मतदारसंघात डाव्या चळवळीचा आणि पक्षाचा सातत्याने वावर राहिलेला आहे. मात्र निवडणुकीत फारसे काही दाखवता आले नाही. विडी कामगारांच्या माध्यमातून संघटन बांधणी सीपीआय कडून करण्यात आलेली आहे. मात्र मतांच्या राजकारणात परिवर्तन करण्यात अपयश आले. १९६२ साली सीपीआय या पक्षाचे नेतृत्व दत्ता देशमुख यांनी अपक्ष उमेदवारी करत भिकाजी खटाळ यांना स्पर्धा करण्याचा प्रयत्न केला. मतदारसंघात भिकाजी जिजाबा खटाळ यांनी सुरूवातीचे १९६२ ते १९७२ या तीन निवडणुकीत काँग्रेस पक्षाकडून मतदारसंघात नेतृत्व केले. मात्र १९७८

साली काँग्रेस पक्षाकडून त्यांना उमेदवारीचे सातत्य न ठेवता थोरात भाऊसाहेब यांना उमेदवारी देण्यात आली. परिणामी भिकाजी खटाळ यांनी जनता दलाकडून उमेदवारी करत थोरात भाऊसाहेब यांना स्पर्धा देण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र मतदारांनी पक्षीय बाजूने कौल देत थोरात यांना नेतृत्व करण्याची संधी दिली. मात्र १९८०च्या निवडणुकीत पुन्हा काँग्रेस पक्षाने भिकाजी खटाळ यांनाच उमेदवारी देत नेतृत्व करण्याची संधी दिली. मात्र १९८५ साली भाऊसाहेब थोरात यांचे मुलगा बाळासाहेब थोरात यांनी अपक्ष उमेदवारी करत काँग्रेस उमेदवार थोरात शंकुतला यांना स्पर्धा करत नेतृत्व केले. १९८५ साली मिळालेल्या संधीचे सोने करत बाळासाहेब थोरात यांनी काँग्रेस पक्षात अधिकृतरित्या प्रवेश करत २००९च्या निवडणुकीपर्यंत सतत नेतृत्व करत राहिले. बाळासाहेब थोरात यांना १९९० साली भाजपकडून गुजाळ वसंतराव, १९९५ गुळवे बापूसाहेब यांनी अपक्ष उमेदवारीवर, १९९९ व २००४ गुळवे बापूसाहेब यांनी शिवसेनेकडून स्पर्धा देण्याचा प्रयत्न केला. २००९च्या निवडणुकीत शिवसेनेने नेतृत्व बदल करत कुटे बाबासाहेब यांच्या माध्यमातून स्पर्धा देण्याचा प्रयत्न केला. मात्र विरोधकांना बाळासाहेब थोरात यांनी यश येऊ दिले नाही.

या मतदारसंघात काँग्रेसच्या माध्यमातून थोरात घराण्याचे एकहाती वर्चस्व राहात आलेले आहे. १९८०च्या निवडणुकीतील खताळ भिकाजी यांचा अपवाद वगळता प्रथम भाऊसाहेब थोरात आणि त्यांच्या नंतर (१९९०पासून) बाळासाहेब थोरात यांचे वर्चस्व राहात आलेले आहे. मतदारसंघातून बाळासाहेब थोरात आतापर्यत सलग ७ वेळेस निवडून आले आहेत. मतदारसंघ युतीकडून शिवसेनेला सुटत आलेला आहे. पण प्रभावीपणे असे कोणत्याच प्रश्नावर नेतृत्व विकसित करण्याची संधी बाळासाहेब थोरात यांनी दिलेली नाही. परिणामी शिवसेना सातत्याने नेतृत्व बदल करत आली. त्याचा फटका शिवसेनेलाच बसत आलेला आहे.

मतदारसंघात बाळासाहेब थोरात यांना नेतृत्व विकसित करण्यासाठी आणि टिकवण्यासाठी मतदारसंघातील सहकारी साखर कारखाना, मतदारसंघातील सर्व जिल्हा परिषदा, पंचायत समिती, संगमनेर नगरपालिका, शिक्षण संस्था, विविध सहकारी कार्यकारी संस्था, तालुक्याची कृषि उत्पन्न बाजार समिती अशा विविध घटकांच्या माध्यमातून संस्थात्मक बांधणीचा पाठिंबा निर्माण केलेला आहे. या संस्थात्मक बांधणीचा पाठिंबा विरोधकांना तोडता आला नाही. तसेच पर्याय पाठिंबा देखील निर्माण करता आला नाही.

संगमनेर मतदारसंघात मुळात काही भाग दुष्काळी तर काही भाग हा बागायती आहे. हा बागायती परिसर हा पुर्णपणे बाळासाहेब थोरात यांच्या मागे आहे. तर दुष्काळी भागातून नेहमीच त्यांना विरोध होत आलेला आहे. पण हा विरोध त्यांना पराभूत करेल तेवढा होत नाही. दुसरे असे की, बाळासाहेब थोरात यांनी दुष्काळी भागात अनेक पाझर तलाव, मध्यम स्वरूपातील प्रकल्पाच्या माध्यमातून हंगामी स्वरूपाचे पाणी साठे निर्माण केले आहेत. त्यामुळे विरोधाला मोठी धार मिळत नाही. मतदारसंघात मराठा समाजाशिवाय ओबीसी आणि आदिवासी समाजाचे प्रमाण लक्षणीय आहे. मात्र बाळासाहेब थोरात यांनी सर्वांना बरोबर घेत संस्थात्मक बांधणीतून नेतृत्व विकसित केलेले आहे. (पहा तक्ता क्र. ९.३८)

**तक्ता क्र. ९.३८**

**संगमनेर विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास**

| **वर्ष** | **विजयी नेतृत्व** | **पक्ष** | **स्पर्धक नेतृत्व** | **पक्ष** |
|---|---|---|---|---|
| १९६२ | खटाळ भिकाजी | काँग्रेस | देशमुख दत्ता | अपक्ष |
| १९६७ | बी. जे. खटाळ | काँग्रेस | धुर्वे बी. जी. | एसएसपी |
| १९७२ | खिटाळ भकाजी | काँग्रेस | गाडे मोहनराव | अपक्ष |
| १९७८ | थोरात भाऊसाहेब | काँग्रेस | खटाळ भिकाजी | जनता दल |
| १९८० | भिकाजी जिजाबा | काँग्रेस (I) | थोरात संभाजी | अपक्ष |
| १९८५ | थोरात बाळासाहेब | अपक्ष | थोरात शंकुतला | काँग्रेस |
| १९९० | थोरात बाळासाहेब | काँग्रेस | गुंजाळ वसंतराव | भाजप |
| १९९५ | थोरात बाळासाहेब | काँग्रेस | गुळवे बापुसाहेब | अपक्ष |
| १९९९ | थोरात बाळासाहेब | काँग्रेस | गुळवे बापुसाहेब | शिवसेना |
| २००४ | थोरात बाळासाहेब | काँग्रेस | संभाजीराव थोरात | शिवसेना |
| २००९ | थोरात बाळासाहेब | काँग्रेस | कुटे बाबासाहेब | शिवसेना |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

## अकोले मतदारसंघ आणि राजकीय नेतृत्व विकास

अकोले मतदारसंघ हा आदिवासी लोकसंखेचा मतदारसंघ आहे. या मतदारसंघात अदिवासी समाजाचे प्रमाण जास्त त्यामुळे या मतदारसंघातून आदिवासीच नेतृत्व निवडून आलेले दिसून येते. १९६२ ते २००९ या काळातील एकूण ११ निवडणुकीचा विचार करता असे दिसून येते की, या मतदारसंघाचे काँग्रेस या पक्षाचे वर्चस्व राहिलेले आहे. एकूण ११ निवडणुकीपैकी ७ वेळेस काँग्रेस पक्षाचे नेतृत्व निवडून आले आहे. तर सीपीआय या डाव्या पक्षाच्या नेतृत्वाला केवळ एकवेळेस संधी मिळाली. मात्र १९९९

साली झालेल्या काँग्रेस विभाजनातून निर्माण झालेल्या राष्ट्रवादी या पक्षाचे नेतृत्व सलग निवडून आले आहे. या मतदारसंघात काँग्रेस विभाजनाचा फटका हा काँग्रेस पक्षाला बसला आहे. स्पर्धक पक्षाचा विचार करता असे दिसून येते की, ज्या वेळी इतर पक्षाचे नेतृत्व निवडून आले त्यावेळी काँग्रेस पक्ष नेतृत्व मुख्य स्पर्धक भूमिकेत राहिले. तर सुरूवातीच्या काळात डावे पक्षातील सीपीआय या पक्षाचे नेतृत्व मुख्य स्पर्धेच्या भूमिकेत राहिले. त्यानंतर जनता दल या पक्षाचे नेतृत्व देखील पुढे आले मात्र प्रतिनिधित्व करण्याचा संधी मिळाली नाही. मात्र शिवसेना नेतृत्व दोन वेळेस मुख्य स्पर्धक राहिलेले आहे. (पहा. तक्ता. क्र. ९.३९)

**तक्ता. क्र.९.३९**

**अकोले विधानसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास**

| अ.क्र | राजकीय पक्ष | विजयी नेतृत्व | स्पर्धक पक्ष नेतृत्व |
|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०७ | ०२ |
| २ | काँग्रेस (स) | ०० | ०१ |
| ३ | राष्ट्रवादी | ०३ | ०० |
| ४ | शिवसेना | ०० | ०२ |
| ५ | जनता दल | ०० | ०२ |
| ६ | सीपीआय | ०१ | ०३ |
| ७ | अपक्ष | ०० | ०१ |
| ८ | एकूण | ११ | ११ |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

जिल्ह्यातील एकमेव अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या या मतदारसंघात महादेव कोळी या आदिवासी जमातीचे प्रमाण जास्त आहे. या जमातीच्या नेतृत्वाभोवती आतापर्यंत राजकारण फिरत राहिले आहे. या मतदारसंघात राष्ट्रवादीचे मधुकर पिचड यांचे वर्चस्व राहात आलेले आहे. या मतदारसंघात विरोधकांना आतापर्यंत चांगल्या प्रकारे पर्याय देता आला नाही. त्याचा प्रत्यय या निवडणुकीत देखील दिसून

आला. मधुकर पिचड यांनी धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्यास प्रखर असा विरोध करत आदिवासी समाजाचे आणि आमदारांना स्वतःच्या बाजूने वळवण्यात महत्त्वपुर्ण भूमिका बजावली होती. परिणामी मतदारसंघातील आदिवासी त्यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा प्रभावीपणे एकवटलेला दिसून आला.

या मतदारसंघाचे वैशिष्टे असे दिसून येते की, मतदारसंघात एकही अपक्ष उमेदवार नव्हता. सर्व प्रमुख पक्षांनी उमेदवार दिलेले होते. मात्र शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन पक्षात खरी लढत दिसून आली. शिवसेनेला उमेदवारी बदलण्याचा आणि युती तोडण्याचा फटका मतदारसंघात बसलेला आहे. शिवसेनेचे स्थानिक पातळीवर राहून काम करणारे अशोक भंगारे यांना उमेदवारी न देता शिवसेनेचे तळपाडे मधुकर यांना उमेदवारी दिली. त्यामुळे अशोक भंगारे यांनी शिवसेनेला बंडखोरी करत भाजपाकडून उमेदवारी मिळवली ही बंडखोरी शिवसेनेला महागात पडलेली आहे.

मतदारसंघात आदिवासी समाजाचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. गेल्या १५ वर्ष आघाडी शासनात मधुकर पिचड हे वेगवेगळ्या पदावर कार्यरत असताना जमिनीचे मालकी हक्क, शेतीचे पाणी, दुष्काळी भागातील पाणी प्रश्न, नियोजित मध्यम प्रकल्पाचे व पाझर तलावाची कामे रखडलेली आहेत. हे प्रश्न मध्यवर्ती विरोधकांना आणता आले नाहीत. उलट मधुकर पिचड यांनी स्वतःच्या मुलाला उमेदवारी देत विविध प्रश्नांची सोडवणूक कशी करता येईल याविषयीचे व्यावहारीक आश्वासन प्रचारात करण्यात आले होते. तसेच धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्यास कायमस्वरूपी विरोध करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. परिणामी जनतेने त्यांच्यावर टाकलेला दिसून येतो.

### तक्ता. क्र. ९.४०

### अकोले विधानसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास

| **वर्ष** | **विजयी नेतृत्व** | **पक्ष** | **स्पर्धक नेतृत्व** | **पक्ष** |
|---|---|---|---|---|
| १९६२ | भांगरे यशवंत | काँग्रेस | देशमुख बी.बी | सीपीआय |
| १९६७ | देशमुख बी. के | सीपीआय | भांगरे यशवंत | काँग्रेस |
| १९७२ | भांगरे यशवंत | काँग्रेस | देशमुख बाबूराव | सीपीआय |
| १९७८ | भांगरे यशवंत | काँग्रेस | देशमुख एकनाथ | जनता दल |
| १९८० | पिचड मधुकर | काँग्रेस | सक्रु मंगल | सीपीआय |
| १९८५ | पिचड मधुकर | काँग्रेस | भांगरे राजाराम | काँग्रेस स |
| १९९० | पिचड मधुकर | काँग्रेस | भांगरे अशोक | जनता दल |
| १९९५ | पिचड मधुकर | काँग्रेस | भांगरे अशोक | अपक्ष |
| १९९९ | पिचड मधुकर | राष्ट्रवादी | भांगरे अशोक | काँग्रेस |
| २००४ | पिचड मधुकर | राष्ट्रवादी | भांगरे अशोक | शिवसेना |
| २००९ | पिचड मधुकर | राष्ट्रवादी | तालपाडे मधूकर | शिवसेना |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

सारांशरूपाने अहमदनगर जिल्ह्याचे राजकारण हे काँग्रेसचा बालेकिल्ला होता. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीतून हा जिल्हा काँग्रेसचा बालेकिल्ला राहिला आहे असे म्हणता येणार नाही. कारण या मतदारसंघात आता भाजपा, सेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस अशी चौफेर स्पर्धेचा जिल्हा असल्याचे पुढे येते. दुसरे वैशिष्टे असे की, पूर्वीपासून जे काँग्रेसचे बालेकिल्ला असणारे मतदारसंघात भाजपा आणि सेनेला कोणत्याही प्रकारे घुसता आले नाही. मात्र राष्ट्रवादीला अकोले वगळता कोणताच

मतदारसंघ भरोशाचा राहिलेला आहे असे दिसून येत नाही. राष्ट्रवादीचे बालेकिल्ले ढासळलेले आहेत. तिसरे असे की, जिल्ह्यात श्रीगोंदा आणि नेवासे या मतदासंघातून सर्वसामान्य कार्यकर्ते निवडून आले नाहीत. प्रत्येक मतदारसंघात ज्या पारंपारिक घराण्यामध्ये स्पर्धा चालत होती त्याच घराण्यातील व्यक्ती निवडून आलेले आहेत ह्या एका महत्त्वाच्या घटकांची नोंद घ्यावी लागेल. आघाडी तुटण्याचा फटका हा राष्ट्रवादीला बसला आहे. कारण त्यांना एक जागा गमवावी लागली आहे. तर युती तुटण्याचा फटका हा शिवसेनेला बसला आहे. कारण शिवसेनेला बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्यां दोन जागा गमवाव्या लागल्या आहेत. तर भाजपाला फायदा होत तीन जागा जास्तीच्या मिळालेल्या आहेत. काँग्रेसने आपले बालेकिल्ले शाबूत ठेवलेले आहेत. शेवटी असे म्हणावे लागेल की, या जिल्ह्यात भाजप नेतृत्वाला चांगल्या प्रकारे घुसता आले आहे.

## अहमदनगर जिल्ह्यातील लोकसभा मतदारसंघातील नेतृत्व

१९६२ साली संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर प्रथम लोकसभा निवडणुकीत कोपरगाव आणि अहमदनगर असे दोन मतदारसंघ होते. त्यानंतर १९७८ साली झालेल्या मतदारसंघ पुर्नरचनेत देखील हेच मतदारसंघ कायम राहिले. मात्र २००४—२००६ या काळात झालेल्या तिसऱ्या मतदारसंघ पुर्नरचनेत अहमदनगर लोकसभा मतदारसंघ कायम राहिला. मात्र कोपरगाव मतदारसंघाऐवजी शिर्डी हा नवीन मतदारसंघ करण्यात आला. शिवाय शिर्डी मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव देखील करण्यात आला.

## कोपरगाव लोकसभेच्या माध्यमातून देशपातळीवरील नेतृत्व

कोपरगाव या मतदारसंघात सातत्याने काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला राहिलेला आहे. या मतदारसंघात १९६२ ते २००९ या काळात झालेल्या एकूण ११ निवडणुकीत एकूण ९ वेळेस काँग्रेस पक्षाचे नेतृत्व निवडून आले. तर शिवसेना आणि भाजप या पक्षांच्या नेतृत्वास प्रत्येकी एक वेळेस संधी मिळाली. शिवसेनेतून संधी मिळालेल्या नेतृत्व हे काँग्रेस पक्षातील पक्षांतर करून संधी मिळवलेली होती. स्पर्धक नेतृत्वाचा

विचार करता असे दिसून येते की, काँग्रेस नेतृत्व, समाजवादी काँग्रेस नेतृत्व, शिवसेना नेतृत्व, जनता दल नेतृत्व या पक्षाचे नेतृत्व प्रत्येकी एक वेळेस स्पर्धक राहिले होते. तर भाजप नेतृत्व ३ वेळेस आणि सीपीआय नेतृत्व एक वेळेस स्पर्धक राहिले होते. एकदंर हा लोकसभेचा मतदारसंघ हा काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला राहिलेला आहे. (पहा तक्ता क्र. ९.४१)

**तक्ता क्र. ९.४१**

**कोपरगाव लोकसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास**

| अ.क्र | राजकीय पक्ष | विजयी नेतृत्व | स्पर्धेक पक्ष नेतृत्व |
|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०९ | ०१ |
| २ | काँग्रेस (स) | ०० | ०१ |
| ३ | भाजपा | ०१ | ०३ |
| ४ | शिवसेना | ०१ | ०१ |
| ५ | सीपीआय | ०० | ०३ |
| ६ | जनता दल | ०० | ०१ |
| ७ | रिपाई | ०० | ०१ |
| ८ | एकूण | ११ | ११ |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

कोपरगाव मतदारसंघात काँग्रेस या पक्षाचे सातत्याने वर्चस्व राहत आलेले आहे. १९६२ ते २००९ या काळात झालेल्या एकूण ११ निवडणुकीपैकी ९ वेळा काँग्रेस या पक्षाच्या नेतृत्वाला संधी मिळाली आहे. १ वेळेस भाजप, १ वेळेस शिवसेनेच्या नेतृत्वाने संधी मिळाली होती. १९६२ साली प्रथम आण्णासाहेब शिंदे यांनी काँग्रेस या पक्षाकडून संधी मिळवली. त्यांना रिपाईचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मुलगा यशवंत आंबेडकर यांनी स्पर्धा दिली होती. मात्र त्यांना या निवडणुकीत यश मिळवता आले नाही. १९६२ साली झालेल्या पहिल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाची मुळे ही तळागाळात मुरलेली दिसून आली होती. १९६७च्या निवडणुकीत पुन्हा आण्णासाहेब शिंदेच निवडून आले. त्यांना सीपीआय पक्षाच्या पी. बी कडून यांनी स्पर्धा दिली. पण

सीपीआयच्या अंगभूत मर्यादामुळे संघटनांचे मताच्या राजकारणात रूपांतर करता आले नाही. १९७१ साली झालेल्या इंदिरा गांधी लाटेत काँग्रेस पक्षाचे विठ्ठलराव विखे पाटील यांचे यांचा मुलगा एकनाथ विखे पाटील यांना संधी मिळाली. त्यानंतर त्यांनी १९७७, १९८० व १९८४ अशी सलग ४ वेळेस निवडून येत संधी सोडली नाही. १९७८ साली झालेल्या निवडणुकीत देशभरात इंदिरा गांधी यांच्या विरोधात लाट असताना देखील कोपरगाव मतदारसंघातून काँग्रेसचे नेतृत्वाला मतदारांनी नेतृत्व करण्याची संधी दिली होती. यावरून कल्पना येते की, काँग्रेस पक्ष कोपरगाव मतदारसंघात किती खोलवर रूजलेला होता. एकनाथ विखे पाटील यांना १९७१ साली जुजाजी कडू यांनी पुन्हा सीपीआय याच पक्षाकडून स्पर्धा देण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. मात्र १९७७ साली बीएलडी पक्षाचे पवार किशोर यांनी स्पर्धा देण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. १९८० साली झालेल्या निवडणुकीत शरद पवार यांच्या समाजवादी काँग्रेस पक्षाकडून शिंदे आण्णासाहेब या काँग्रेसच्या माजी खासदारांनी स्पर्धा दिली. मात्र विखे पाटील घराण्याचे नेतृत्व हे तळागाळात पोहचले असल्याने त्यांना सहज स्पर्धा करू शकेल असे नेतृत्व मतदारसंघात पुढे आले नाही. १९९१ च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाकडून विखे पाटील घराण्यात उमेदवारी न देता काळे शंकर यांना उमेदवारी देण्यात आली. त्यांना स्पर्धक गुंजाळ वसंत यांना भाजपकडून उमेदवारी देण्यात आली. या स्पर्धेत काळे शंकर यांना नेतृत्व करण्याची संधी मिळाली. १९९६ साली आश्चर्याची बाब अशी काँग्रेस पक्षातील गटबाजीमुळे भाजपाच्या बडदे भिमराव हे काँग्रेसचे नेतृत्व काळे शंकर यांना हरवून देश पातळीवर नेतृत्व करण्याची संधी मिळाली. या मतदारसंघातून प्रथमच धनगर समाजाच्या बडदे भिमराम यांचे नेतृत्व पुढे आले. मतदारसंघात भाजपची ताकद नसताना बडदे भिमराव यांना भाजपकडून नेतृत्व करण्याची संधी मिळाली होती. १९९८ साली झालेल्या निवडणुकीत तनपुरे प्रसाद यांना काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी देण्यात आली. त्यांना भाजपचे बदडे भिमराव यांनी स्पर्धा दिली. मात्र प्रसाद तनपुरे हे निवडून आले. १९८९ ते १९९८ या काळात विखे पाटील घराण्याला काँग्रेस पक्षाने काहीसे या मतदारसंघातून

बाजूला करण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे १९९९च्या निवडणुकीच्या तोंडावर विखे घराण्यातील बाळासाहेब विखे पाटील यांनी शिवसेनेत प्रवेश करत कोपरगाव मतदारसंघातून शिवसेनेकडून उमेदवारी मिळवली. या निवडणुकीत बाळासाहेब विखे पाटील सहज विजयी झाले. त्यांना राष्ट्रवादीकडून शेळके गुलाबराव यांनी स्पर्धा देण्याचा प्रयत्न केला. मात्र विखे पाटील घराण्यातील नेतृत्वाने पक्षीय संघटनापेक्षा वैयक्तिक पातळीवरील संघटनांच्या आधारावर मतदारसंघ शिवसेनेकडे वळवल्याचे निवडणुकीत दिसून आले. २००४च्या निवडणुकीत बाळासाहेब विखे पाटील यांनी पुन्हा स्वगृही काँग्रेसमध्ये प्रवेश करत पुन्हा नेतृत्वाची संधी मिळवली. २००९ च्या निवडणुकीपूर्वी हा मतदारसंघ पुर्नरचनेत अनुसूचित जातीसाठी राखीव झाला. या मतदारसंघाच्या जागेवर शिर्डी हा नवीन मतदारसंघ तयार करण्यात आला. या मतदारसंघावर विखे पाटील घराण्याचेच वर्चस्व असल्याने ते सांगतील तो उमेदवार निवडून येईल असे चित्र आहे. आघाडीकडून मतदारसंघ जागा वाटपात रिपाईला काँग्रेसच्या बाजूने हा मतदारसंघ सोडण्यात आला. या मतदारसंघातून रिपाईचे नेतृत्व रामदास आठवले आणि शिवसेनेकडून भाऊसाहेब वाघचौरे यांच्यात लढत होत. शिवसेनेचे भाऊसाहेब वाघचौरे निवडून आले. (पहा तक्ता क्र. ९.४२ )

**तक्ता क्र. ९.४२**

**कोपरगाव लोकसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास**

| वर्ष | विजयी नेतृत्व | पक्ष | स्पर्धक नेतृत्व | पक्ष |
|---|---|---|---|---|
| १९६२ | शिंदे अण्णासाहेब | काँग्रेस | आंबेडकर यशवंतराव | रिपाई |
| १९६७ | शिंदे अण्णासाहेब | काँग्रेस | कडु पुंजाजी | सीपीआय |
| १९७१ | विखे बाळासाहेब | काँग्रेस | कडु पुंजाजी | सीपीआय |
| १९७७ | विखे बाळासाहेब | काँग्रेस | पवार किशोर | भाजद |
| १९८० | विखे बाळासाहेब | काँग्रेस (I) | शिंदे अण्णासाहेब | काँग्रेस (U) |
| १९८४ | विखे बाळासाहेब | काँग्रेस | गायकवाड माधवराव | सीपीआय |
| १९९१ | काळे शंकरराव | काँग्रेस | गुंजाळ वसंतराव | भाजप |
| १९९६ | बडदे भीमराव | भाजप | काळे शंकरराव | काँग्रेस |
| १९९८ | तनपुरे प्रसाद | काँग्रेस | बडदे भिमराव | भाजप |
| १९९९ | विखे बाळासाहेब | शिवसेना | शेळके गुलाबराव | भाजप |
| २००४ | विखे बाळासाहेब | काँग्रेस | मुरकुटे भानुदास | शिवसेना |
| २००९ | वाघचौरे भाऊसाहेब | शिवसेना | आठवले रामदास | रिपाई |
| टीप : पूर्वीच्या कोपरगाव मतदारसंघाचे २००४—२००६ च्या मतदारसंघ पनर्रचनेनुसार शिर्डी असे नामकरण करण्यात आले आहे. | | | | |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

## अहमदनगर लोकसभा मतदारसंघाचे राजकीय नेतृत्व

अहमदनगर लोकसभा मतदारसंघाचा विचार करता असे दिसून येते की, सुरूवातीच्या काळात या मतदारसंघावर काँग्रेस या पक्षाचा प्रभाव होता. मात्र उत्तरोत्तर हा प्रभाव कमी होत भाजपाचा नेतृत्वाचा प्रभाव पुढे आलेला दिसून येतो. या मतदारसंघात १९६२ ते २००९ या एकूण ११ वेळेस झालेल्या निवडणुकीत ७ वेळेस काँग्रेस पक्षाचे नेतृत्व निवडून आले. तर शिवसेना आणि राष्ट्रवादीचे नेतृत्वास प्रत्येकी १ वेळेस संधी मिळालेली आहे. तर भाजपा नेतृत्वास २ वेळेस संधी मिळालेली आहे. स्पर्धक नेतृत्वाचा विचार करता असे दिसून येते की, समाजवादी काँग्रेस, सीपीआय या पक्षाचे नेतृत्व

प्रत्येकी १ वेळेस स्पर्धक राहिले. जनता दल, भाजप आणि राष्ट्रवादीचे नेतृत्व प्रत्येकी २ वेळेस स्पर्धक राहिले आहे. या मतदारसंघात जरी सुरूवातीच्या काळात काँग्रेस नेतृत्वाचा प्रभाव असला तरी १९९० नंतर भाजपच्या नेतृत्वाचा प्रभाव वाढलेला दिसून येतो. परिणामी शेवटच्या दोन निवडणुकी निवडून येण्यास संधी मिळाली. एक प्रकारे असे दिसून येते की, या लोकसभा मतदारसंघाची वाटचाल ही एक पक्ष वर्चस्वाकडून दोन पक्ष स्पर्धेकडे राहिलेली आहे. (पहा तक्ता क्र. ९.४३)

**तक्ता क्र. ९.४३**

**अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील पक्षनिहाय नेतृत्व विकास**

| अ.क्र | राजकीय पक्ष | विजयी नेतृत्व | स्पर्धक पक्ष नेतृत्व |
|---|---|---|---|
| १ | काँग्रेस | ०७ | ०० |
| २ | काँग्रेस (U) | ०० | ०१ |
| ३ | राष्ट्रवादी | ०१ | ०२ |
| ४ | भाजपा | ०२ | ०२ |
| ५ | शिवसेना | ०१ | ०० |
| ६ | सीपीआय | ०० | ०१ |
| ७ | जनता दल | ०० | ०२ |
| ८ | अपक्ष | ०० | ०३ |
| ९ | एकूण | ११ | ११ |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

अहमदनगर जिल्ह्यातील अहमदनगर लोकसभा मतदारसंघ हा काँग्रेस वर्चस्वसाठी २०१६ ते १९९६ या काळात अत्यंत प्रभावी राहिलेला आहे. या काळात या मतदारसंघातून सीपीआय, भारतीय लोक दल, जनता दल या पक्षाच्या नेतृत्वाने स्पर्धा देण्याचा प्रयत्न केला. मात्र जिकंण्यासाठी आणि नेतृत्व करण्यासाठी या पक्षाचे नेतृत्व कमी पडले. मात्र १९९६ नंतर या मतदारसंघातून भाजप या पक्षाकडून नेतृत्व पुढे आले. त्यात ना. स. फरांडे या माळी समाजाच्या नेतृत्व भाजपमधून होते. तोपर्यंत नेतृत्व पुढे

आले नाही. १९९८ साली हा मतदारसंघ सेना भाजपाच्या जागा वाटपात शिवसेनेने भाजपकडून घेतला आणि या मतदारसंघातून काँग्रेसमधून शिवसेनेत प्रवेश केलेले विखे पाटील बाळासाहेब यांना या मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली. परिणामी पुर्वाश्रमीचे काँग्रेस संस्कृतीत वाढलेले असल्याने विजय मिळवण्यासाठी विखे पाटील बाळासाहेब यांना अवघड गेले नाही. मुळात हा मतदारसंघ विखे पाटील बाळासाहेब यांना नवखा होता. मात्र राजकीय संपर्क यंत्रणा आणि पक्ष पाठिंबा या आधारावर निवडून आले. विखे पाटील बाळासाहेब यांच्या रूपाने प्रथम बिगर काँग्रेसी व्यक्ती या मतदारसंघातून निवडून आला होता.

१९९९ पासून या मतदारसंघातून काँग्रेस या पक्षाकडून कोणतेही काँग्रेस नेतृत्व पुढे आले नाही. १९९९च्या लोकसभा निवडणुकीत भाजप नेतृत्व दिलीप गांधी आणि राष्ट्रवादीचे नेतृत्व शेळके मारूती यांच्या स्पर्धा झाली. काँग्रेस उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला. भाजपमधून या मतदारसंघातून प्रथम बिगर मराठा व्यक्ती निवडून आला होता हे विशेष होय. या मतदारसंघातून मराठातेर नेतृत्वाला सहजासहजी पाठिंबा मिळत नसल्याचे गेल्या अनेक निवडणुकांचा अनुभव होता. मात्र पक्षीय शक्ती आणि काँग्रेस विरोधाच्या लाटेचा फायदा दिलीप गांधी यांना झाला. २००४च्या निवडणुकीत भाजपकडून दिलीप गांधी यांना संधी न देता माळी नेतृत्व ना. स फरांडे यांना देण्यात आली. त्यामुळे मराठा आणि ओबीसी असे ध्रुवीकरण होत राष्ट्रवादीचे गडाख तुकाराम हे निवडून आले. तर २००९च्या निवडणुकीत भाजपकडून पुन्हा मारवाडी नेतृत्व दिलीप गांधी यांना उमेदवारी देण्यात आली. तर राष्ट्रवादीकडून शिवाजी कर्डिले यांना संधी देण्यात आली. मात्र राष्ट्रवादीच्या अंतर्गत गटबाजी आणि उमेदवारी कोणाला या मुद्दांचा फटका बसत दिलीप गांधी यांना विजय मिळवता आला. अर्थात या मतदारसंघाने मारवाडी समाजाचे नेतृत्व स्वीकारले. मात्र ओबीसी नेतृत्व स्वीकारले नाही. (पहा तक्ता क्र. ९.४४)

**तक्ता क्र. ९.४४**

**अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील १९६२ ते २००९ या काळातील निवडणूक निहाय नेतृत्व विकास**

| **वर्ष** | **विजयी नेतृत्व** | **पक्ष** | **स्पर्धक नेतृत्व** | **पक्ष** |
|---|---|---|---|---|
| २००९ | गांधी दिलीप | भाजप | कर्डिले शिवाजी | राष्ट्रवादी |
| २००४ | गडाख तुकाराम | राष्ट्रवादी | फरांडे ना. स | भाजप |
| १९९९ | गांधी दिलीपकुमार | भाजप | शेळके मारूती | राष्ट्रवादी |
| १९९८ | विखेपाटील बाळासाहेब | शिवसेना | शेळके मारूती | काँग्रेस |
| १९९६ | शेळके मारूती | काँग्रेस | दमानिया परवेज | शिवसेना |
| १९९१ | गडाख यशवंतराव | काँग्रेस | विखे बाळासाहेब | अपक्ष |
| १९८९ | गडाख यशवंतराव | काँग्रेस | फरांडे ना. स | भाजप |
| १९८४ | गडाख यशवंतराव | काँग्रेस | ढाकणे बबनराव | जनता दल |
| १९८० | आठरे चंद्रभान | काँग्रेस (I) | निबांळकर एकनाथ | काँग्रेस (U) |
| १९७७ | शिंदे अण्णासाहेब | काँग्रेस | गाडे मोहनराव | भलोद |
| १९७१ | शिंदे अण्णासाहेब | काँग्रेस | भापकर प्रभाकर | अपक्ष |
| १९६७ | शिंदे अण्णासाहेब | काँग्रेस | भगत इ. एल. | सीपीआय |
| १९६२ | फीरोदिया मोतीलाल | काँग्रेस | भापकर प्रभाकर | अपक्ष |

आधार: १९६२ ते २००९ निवडणूक आयोग अहवाल

अहमदनगर लोकसभेचा पक्षीय पातळीवरून वियजी उमेदवारांचा विचार करता असे दिसून येते की, १९६२ ते २००९ या काळातील १३ निवडणुकीचा विचार करता ९ वेळेस काँग्रेस, २ वेळेस भाजप, शिवसेना, आणि राष्ट्रवादी या पक्षाच्या नेतृत्वाला प्रत्येकी १ वेळेस संधी मिळाली आहे.

**सारांशरूपाने** असे दिसून येते की, अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय विकास हा आर्थिक क्षेत्राशी आणि जमीन मालकीशी संबंधित असलेल्या घटकांनी राजकीय क्षेत्रात प्रवेश करत राजकीय विकास घडवून आणलेला आहे. त्यात राजकीय पक्षांचा वाट ही महत्त्वपुर्ण राहिलेली आहे. काँग्रेस पक्षांच्या माध्यमातून सर्वात जास्त राजकीय विकास घडून आलेला दिसून येतो. एक प्रकारे काँग्रेस पक्ष हा अहमदनगर जिल्ह्याच्या राजकारणात सर्वच क्षेत्रावर वर्चस्व असणारा पक्ष होता. मात्र १९९० नंतर या पक्षांची जिल्हा राजकारणावरील पकड सैल होताना दिसून येते. जिल्हा राजकारणात काँग्रेसला पहिला धक्का हा १९७८च्या निवडणुकीनंतर शरद पवार यांच्या बंडखोरीने बसला. कारण या बंडखोरीने अहमदनगर जिल्हा राजकारणात मराठा समाजात फुट पडली. १९८५ नंतर शरद पवार यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मात्र मराठा नेतृत्व शेवटपर्यंत एकत्र आली नाही. त्यात १९९९ साली पुन्हा शरद पवार यांनी काँग्रेस पक्ष सोडत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. परिणामी पुन्हा काँग्रेसमध्ये फुट पडली. १९९९ नंतर राज्यात जरी काँग्रेस आणि राष्ट्रवादी या दोन पक्षांची आघाडी असली तरी अहमदनगर जिल्ह्यात जरी एकमेकांना स्पर्धक पक्ष राहिलेले दिसून येते. विरोधी पक्षामध्ये भाजप आणि शिवसेना हे दोन हळूहळू स्पर्धेत उतरलेले दिसून येते. १९९० नंतर शिवसेनेला हळूहळू प्रतिसाद मिळण्यास सुरूवात झाली. मात्र भाजपला प्रतिसाद हा अतिशय धिम्या गतीने मिळालेला दिसून येते. त्यात दुष्काळी आणि कोरडवाहू परिसरातून भाजपाला विकास करता आलेला आहे. काँग्रेस पक्षाकडे श्रीरामपूर, शिर्डी, संगमनेर हे तीन मतदारसंघ राहिलेले आहेत. इतर मतदारसंघात सातत्याने बदल होत असलेले दिसून येते.

राजकीय विकास पाहत असताना दिसून येते की, नेतृत्व करण्यामध्ये मराठा समाजातील नेतृत्वाला संधी जास्त प्रमाणावर मिळालेली आहे. राजकीय पक्षाचा कल देखील मराठा समाजाच्या नेतृत्वाला उमेदवारी देण्याकडे राहिलेला आहे. त्यात राजकीय नेतृत्वाकडून पुढे आलेल्या घराणेशाहीने भर टाकलेली दिसून येते. १९९० नंतरच्या

अहमदनगर जिल्हा राजकारणात पुर्णपणे घराणेशाही विकसित झालेली दिसून येते. अनेक मतदारसंघात राजकीय घराण्याची पार्श्वभूमी असलेल्या नेतृत्वाच्या घरातच राजकीय पक्षांनी उमेदवारी वाटप केलेली दिसून येते. राजकीय नेतृत्व पुढे येण्यास आर्थिक विकास आणि राजकीय पक्षांची साथ मिळालेली दिसून येते. मतदारसंघनिहाय नेतृत्वाचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, दक्षिण अहमदनगर मतदारसंघात कॉंग्रेस पक्षाकडून शिवसेनेच्या नेतृत्वाला संधी मिळालेली आहे. उत्तर अहमदनगर जिल्ह्यात कॉंग्रेस पक्ष आणि अपक्ष यांचा प्रभाव राहिलेला आहे. श्रीरामपूर, शिर्डी, संगमनेर या तीन मतदारसंघात कॉंग्रेस पक्षाचा प्रभाव प्रंचड प्रमाणात राहिलेला आहे. त्यास नेतृत्वाकडून सहकाराची संस्थात्मक बांधणी कारणीभूत आहे. कोरडवाहू परिसरातील पाथर्डी, कर्जत–जामखेड, शेवगाव आणि श्रीगोंदा या मतदारसंघात मिश्र स्वरूपाचा प्रभाव राहिल्याचे दिसून येते. त्यात कॉंग्रेस, भाजप, जनता दल या पक्षांच्या नेतृत्वाने संधी मिळवलेल्या आहेत. पारनेर या मतदारसंघात कॉंग्रेस पक्षाच्या नेतृत्वाचा प्रभाव जास्त होता. मात्र अलीकडच्या काळात शिवसेना नेतृत्वाने संधी मिळवलेली आहे. १९९० नंतर अहमदनगर जिल्हा राजकारणात असे दिसून येते की, कर्जत जामखेड या मतदारसंघाचा अपवाद वगळता प्रत्येक मतदारसंघात दोन प्रभावी अशी घराणे राजकारणात पुढे आलेले आहेत. या दोन घराण्यामध्येच राजकीय नेतृत्व राहत आलेले दिसून येते.

# प्रकरण – १०

# निष्कर्ष

जिल्हा पातळीवरील आर्थिक आणि राजकीय घटक हे १९९० नंतर राज्याच्या राजकारणात मध्यवर्ती आले आहेत. कारण स्थानिक राजकारण हे जिल्हा पातळीवरील आर्थिक, सामाजिक व राजकीय घटकांचा आधार घेत आकाराला येत असताना दिसून येते. परिणामी जिल्हा पातळीवरील विकास हा राजकीय आणि आर्थिक घटकांच्या आधारे घडणे अनिवार्य झाल्याचे दिसून येते. स्थानिक प्रश्न राजकीय नेतृत्वाच्या माध्यमातून सोडवण्याचे प्रयत्न होत आलेले आहेत. अर्थात जिल्हा पातळीवरील आर्थिक आणि राजकीय विकासामध्ये राजकीय नेतृत्वाचे योगदान राहत आलेले आहे. त्याचप्रमाणे जिल्हा पातळीवर आर्थिक आणि राजकीय विकास घडताना राजकीय प्रक्रियेच्या माध्यमातून राजकीय नेतृत्वाला पाठिंबा मिळत राहिलेला आहे. त्यामुळे आर्थिक आणि राजकीय विकासात राजकीय नेतृत्वाचे स्थान असताना विशिष्ट अशा प्रकारे राजकीय आणि आर्थिक विकासाची प्रक्रिया घडून येत असताना दिसून येते. या प्रक्रियेला १९९० नंतर विशिष्ट अशी गतिशिलता निर्माण झाली असल्याचे दिसून येते.

१९९० नंतर जिल्हा पातळीवरील अभ्यासातून स्थानिक पातळीवर नेतृत्वाच्या योगदानाच्या आधारे राजकीय प्रक्रिया कोणत्या प्रकारचा आकार घेते. त्यावरून राज्य पातळीवरील राजकीय प्रक्रिया ही आर्थिक आणि राजकीय विकासाच्या दिशेने पुढे येत असल्याचे दिसून येते. जिल्हा पातळीवरील नेतृत्वाचे जिल्ह्यासाठी आर्थिक आणि राजकीय विकासात राहिलेले योगदान हे परिणामकारक राहत असल्याचे दिसून येते. या विषयीचा जिल्हा पातळीवरील राजकीय नेतृत्वाच्या योगदानाच्या अभ्यासातून उलगडा होणे शक्य आहे. अनेक अभ्यासकांकडून राज्य पातळीवरील अभ्यास करताना जिल्हा पातळीवरील आर्थिक आणि राजकीय घडामोडीचे एक युनिट राजकीय नेतृत्व असल्याचे पकडण्यात येते. अलीकडच्या काळात स्थानिक पातळीवरील राजकीय नेतृत्वाचे

योगदानाचे अभ्यास करण्यास गती मिळालेली आहे. १९७० पूर्वी देश पातळीवरील आणि राज्य पातळीवरील घटक हे राज्य पातळीवरील राजकारण घडून येण्यात प्रभाव टाकत होते. राज्यसंस्थेविषयी भाष्य करण्यात येत होते. मात्र प्रभावी असे नेतृत्व राज्यसंस्थेला दिशा कशा प्रकारे देत असतात याचा अभ्यास पुढे आला नाही. नंतरच्या काळात जसे जसे राज्य पातळी आणि जिल्हा पातळीवरील स्थानिक घटकांना नेतृत्वाने राजकारणात आग्रहीपणे सहभाग नोंदवण्यास सुरूवात केली तसे स्थानिक पातळीवरील घटक हळूहळू पुढे येत गेले आहेत.

१९९० नंतर प्रादेशिक पातळीवरील राजकारण हस्तगत करण्यास सुरूवात झाली. तशीच प्रादेशिक पातळीवरील नेतृत्वाचे वर्चस्व कमी होऊ नये यासाठी राष्ट्रीय पक्षांनी देखील जातींकेंद्री नेतृत्वाची भूमिका घेतलेली आहे. तसेच राजकीय नेतृत्व देखील स्थानिक पातळीवरील आर्थिक आणि राजकीय घटकांचा आधार मोठ्या प्रमाणावर घेत असताना दिसून येते. या सर्व माध्यमातून स्थानिक पातळीवरील राजकीय नेतृत्वाच्या प्रक्रियेच्या माध्यमातून आर्थिक आणि राजकीय योगदानाचे अभ्यास पुढे येणे अपरिहार्य झाले आहे. त्या दृष्टिकोनातून प्रस्तुत प्रबंधात ''अहमदनगर जिल्ह्याच्या राजकीय आणि आर्थिक विकासात राजकीय नेतृत्वाच्या योगदानाचा अभ्यासः १९९३ ते २०१०'' हा अभ्यास करण्यात आला आहे.

## प्रस्तुत प्रबंधाचे दहा प्रकरणात विभाजन करण्यात आले आहे. थोडक्यात पुढीलप्रमाणे

प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात अहमदनगर जिल्ह्याच्या आर्थिक—राजकीय योगदानासाठीचे अभ्यास कशा प्रकारे पुढे येत आहे याची नोंद घेण्यात आली आहे. त्याचबरोबर अभ्यासाचे उदिष्ट्ये, गृहितके, अभ्यासाचे महत्त्व, अभ्यास पध्द्ती, अभ्यासाची मर्यादा इत्यादी घटक सांगत पूर्वी झालेल्या साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे.

दुसऱ्या प्रकरणात अहमदनगर जिल्ह्याचा सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक घटकांचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्यात अहमदनगर जिल्हा हा भौगोलिकदृष्ट्या राज्यात सर्वात मोठा असा असणारा जिल्हा आहे. हा जिल्हा आर्थिक आणि राजकीय विकासाच्या बाबतीत स्वातंत्र्यपुर्व काळापासून एक वेगळे स्थान असणारा असा राहिलेला आहे. आर्थिक विकासाच्या बाबतीत असे दिसून येते की, कृषि क्षेत्रावर अवलंबून असणारा असा जिल्हा आहे. मात्र कृषि क्षेत्राच्या विकासास सहकाराची साथ दिलेली आहे. तसेच सिंचन क्षेत्र, साखर कारखाने, जिल्हा सहकारी बँक व इतर नागरी संस्थाच्या माध्यमातून विकास साधन्याचा प्रयत्न केला. सहकार क्षेत्र आणि सिंचन क्षेत्र विकास या दोन कारणांनी जिल्ह्यातील पिक पध्द्तीतील पॅटर्न पुर्णपणे बदलेला आहे. रस्ते निर्मिती, वाहतूक, रेल्वे, व्यापार, कुटीर लघुउद्योग अशा कारणांनी आर्थिक विकासास गती मिळालेली दिसून येते. त्याचबरोबर औद्योगिक विकास हा शहराप्रमाणेच ग्रामीण भागात घेऊन जाण्यास प्रभावी असे नेतृत्व लाभलेले दिसून येते. तर राजकीय विकासाच्या बाबतीत असे दिसून येते की, एक पक्षीय वर्चस्वाकडून बहुपक्षीय राजकीय विकास घडून आलेला आहे. परिणामी लोकशाहीकरण झालेले दिसून येते. दुसरे असे की, राजकीय पार्श्वभूमीप्रमाणे बिगर राजकीय पार्श्वभूमीचे नेतृत्व देखील पुढे आलेले दिसून येते. राजकीय विकास घडून येण्यासाठी सहकार क्षेत्राचा ज्या प्रकारे योगदान राहिले त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्था, कृषि उत्पन्न बाजार समिती, पक्ष कार्यकारणी, निवडणुका या कारणांनी राजकीय विकास घडून आलेला दिसून येतो.

तिसऱ्या प्रकरणात अहमदनगर जिल्ह्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र राजकारण आणि पक्षीय पातळीवरील नेतृत्वाचा आढावा घेण्यात आलेला आहे. यात प्रामुख्याने संयुक्त महाराष्ट्र चळवळीतून महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात १९६२ साली केवळ कॉंग्रेस या पक्षाचे वर्चस्व होते. तर इतर पक्षांमध्ये शेतकरी कामगार पक्ष, हिंदू महासभा, जनसंघ, भारतीय रिपब्लिकन पक्ष यांचे अस्तित्व होते. परंतु या पक्षांचा कॉंग्रेस पक्षांच्या तुलनेत जास्त प्रभाव दिसून येत नाही. हीच

स्थिती १९८० पर्यंत होती. मात्र १९६५ साली स्थापन झालेल्या शिवसेना राजकारणात उतरल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणाची स्थिती बदलत असताना दिसून येते. १९९० पर्यंत काँग्रेस पक्ष विविध समाज घटकांना हाताशी धरून वर्चस्व टिकवून होता. मात्र सेना – भाजप स्पर्धेत येत राहिल्याने काँग्रेस या पक्षाची समाजावरील पक्कड काहीसी सैल झालेली दिसून येते. महाराष्ट्राच्या राजकारणाचा १९९० नंतरचा विचार करता असे दिसून येते की, प्रत्येक विभागात काँग्रेसला स्पर्धा करणारा विरोधी पक्षातून एक पक्ष पुढे आलेला दिसून येतो. १९९९ नंतर काँग्रेस विभाजनातून चार पक्ष प्रबळ झालेले दिसून येतात. पश्चिम महाराष्ट्र विभागात काँग्रेस राष्ट्रवादी या दोन पक्षांत स्पर्धा होत होती. मात्र आता भाजपा – सेना कोरडवाहू परिसरात शिरलेला आहे. कोकण विभागात काँग्रेस आणि शिवसेना नेतृत्वामध्ये स्पर्धा राहते. उत्तर महाराष्ट्रात शिवसेना – भाजप विरोधी राष्ट्रवादी या पक्षाच्या नेतृत्वाची स्पर्धा राहते. मराठवाडा विभागात जिल्हानिहाय स्पर्धा असताना दिसून येते. मात्र काँग्रेस आणि राष्ट्रवादी नेतृत्वाची बीड जिल्ह्याचा अपवाद वगळता स्पर्धा असताना दिसून येते. विदर्भात काँग्रेस आणि भाजपा नेतृत्वाची स्पर्धा राहत आलेली आहे. मुंबईत शिवसेना आणि काँग्रेस या पक्षांच्या नेतृत्वाची स्पर्धा राहिलेली आहे. त्यामुळे राज्य पातळीवर जरी पक्षीय पातळीवरील नेतृत्व स्पर्धा असलेली दिसून येत असली तरी नेतृत्वामध्ये पाठिंबा आणि आर्थिक विकास याचा सहसंबंध राज्य पातळीवरील नेतृत्वाने घातला असल्याने राज्य पातळीवरील नेतृत्व करण्याची संधी मिळालेली आहे.

चौथ्या प्रकरणात अहमदनगर जिल्ह्यातील आर्थिक विकास आणि नेतृत्वाचा आढावा घेतला आहे. त्यात प्रामुख्याने अहमदनगर जिल्ह्यात आर्थिक, सामाजिक आणि सहकारी संस्थाची सुरूवात ही स्वातंत्र्यपुर्व काळात झालेली होती. १९४७ ते १९८० या काळात सहकारी साखर कारखाने आणि जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या आधारे चालणारी सहकार पाया असणारी आर्थिक चळवळ होती. या काळात अनेक साखर कारखान्याचा विकास हा राजकीय नेतृत्व प्राधान्याने, पुढाकाराने झालेला आहे. परिणामी सिंचन क्षेत्र

वाढीला आणि विकासास प्राधान्य देखील राजकीय नेतृत्वाकडून दिलेले दिसून येते. आर्थिक घटकांचा विकास हा सहकार संस्थाच्या माध्यमातून होत असल्याचे दिसून येते. मात्र १९९० नंतर संस्था वाढीस वेग आला. तसेच आर्थिक विकासास जास्त प्रमाणावर प्राधान्य दिले आहे. आर्थिक विकास आणि राजकीय नेतृत्वाचे हितसंबंधांना अनुसरून संस्था उभारणी करण्यात येऊ लागली. परिणामी संस्थात्मक बांधणी आणि पाठिंबा मिळवण्याचे आधार बदलत गेलेले दिसून येतात. त्यामुळे सहकार व्यतिरिक्त इतर संस्था वाढीचा वेग आला. थोडक्यात कृषि संस्था उभारणीचा जो वेग होता. त्याचबरोबर बिगर कृषि पतसंस्था, उत्पादक संस्था, पणन संस्था आणि सामाजिक सेवा संस्था या पुढे आल्या. या संस्था उभारणी ही राजकीय नेतृत्वाच्या पुढाकाराने आणि हितसंबंधाच्या आधारे होत गेली. परिणामी संस्था उभारणीत राजकीय नेतृत्वाला पुढे महत्त्व आले. तसेच संस्था चालवणे आणि विकास करणे अशा बाबी पुर्णपणे राजकीय नेतृत्वाच्या आश्रयाने घडत आहेत. त्यामुळे संस्था उभारणी होते. त्याचप्रमाणे संस्था उभारणी आणि आर्थिक विकासास प्राधान्यक्रम हा राजकीय नेतृत्वाकडूनच आलेला दिसून येतो. त्यामुळे या संस्थात्मक आर्थिक विकासामध्ये राजकीय नेतृत्वाचे योगदान अमुल्य असे राहिलेले आहे.

पाचव्या प्रकरणात अहमदनगर जिल्ह्यातील आर्थिक विकास आणि नेतृत्वाचा आढावा घेतला आहे. त्या प्रकरणात प्रामुख्याने अहमदनगर जिल्ह्यात सहकारी साखर कारखाने, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, जिल्ह्यातील विविध सहकारी दूध संघ, जिल्हा मध्यवर्ती सहकारी कृषि उत्पन्न बाजार समिती आणि विविध तालुका पातळीवरील तालुका सहकारी कृषि उत्पन्न बाजार समिती या माध्यमातून सहकारी क्षेत्राचा खूप मोठ्या प्रमाणावर विकास झालेला आहे. या सहकार क्षेत्र विकासासाठी अहमदनगर जिल्ह्यातील नेतृत्वाचे मोठे योगदान आहे. सहकार क्षेत्राच्या माध्यमातून जनतेची संस्थात्मक बांधणी नेतृत्वाने केलेली आहे. त्याचप्रमाणे सहकाराचे साधन हे नेतृत्व विकासासाठी वापरलेले आहे. दुसरे असे की, सहकाराच्या माध्यमातून (सहकारी साखर कारखान्याच्या

माध्यमातून) प्रत्येक मतदारसंघातून राजकीय घराण्याचा उदय झालेला पाहण्यास मिळतो. सहकाराच्या माध्यमातून नेतृत्व केलेले अनेक नेतृत्व पुढच्या काळात राज्य पातळीवर नेतृत्व रूपाने पुढे आलेले आहे. तिसरे असे की, असंतुष्ट नेतृत्वाला सहकार क्षेत्रात स्थान देत शांत करत ठेवण्यास राजकीय नेतृत्वाला सोयीचे असल्याचे पुढे आहे. चौथे असे की, सहकार क्षेत्राने राजकीय अभिजनांना सहकारी साखर कारखाने, सहकारी बँक आणि कृषि उत्पन्न बाजार समिती अशा संस्थामध्ये स्थान देत राजकीय क्षेत्राची मोठी व्याप्ती वाढवलेली आहे. त्यामुळे सहकार क्षेत्राने राजकीय विकासासाठी देखील योगदान दिलेले दिसून येते.

सहाव्या प्रकरणात अहमदनगर जिल्ह्यातील सामाजिक आणि आर्थिक चळवळीचा आढावा घेतला आहे. अहमदनगर जिल्ह्यात स्वातंत्र्यपुर्व काळापासून सामाजिक चळवळीची पार्श्वभूमी राहिलेली आहे. सामाजिक चळवळी, कामगार चळवळ, कामगारांचे हक्क, कामगारांचे लढे या माध्यमातून नेतृत्वाची एक फळी उभा राहिलेली दिसून येते. अहमदनगर जिल्ह्यात राजकीय आणि आर्थिक विकासात सामाजिक चळवळीच्या नेतृत्वाचे एक महत्त्वपूर्ण योगदान राहिलेले आहे. १९९० पर्यंत सामाजिक आणि डाव्या विचारांच्या चळवळीला चांगल्या प्रकारे यश आलेले होते. निवडणुकीच्या राजकारणात यश आले नाही. मात्र हे अपयश चळवळीच्या अंतर्गत असलेल्या नेतृत्वाच्या उणीवामधून आलेले आहे. सामाजिक आणि आर्थिक चळवळीच्या नेतृत्वामध्ये ‘‘विडी कामगार चळवळ’’ ही सर्वात मोठी चळवळ होती. या चळवळीने अहमदनगर जिल्ह्याला सामाजिक आणि वैचारिक पाया असणारे नेतृत्व दिलेले आहे. त्यात कॉ. रामभाऊ नागरे, साथी भास्करराव दुर्वे, कॉ. दत्ता देशमुख हे नेतृत्व केंद्रस्थानी होते. विडी कामगार चळवळीच्या नेतृत्वाने संप, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, घेरावा, सत्याग्रह, जेलभरो, सभा, परिषदा, मेळावे इत्यादी साधनाचा लोकशाही मार्गाचा अंवलब करुन अनेक कामगार कायदे लागू करुन घेतले. प्रत्यक्षात रणनीतीच्या आधारे नेतृत्व विकसित झालेले दिसून येते. कोणत्याही प्रकारे नेतृत्वाची पार्श्वभूमी नसताना या चळवळीच्या

माध्यमातून नेतृत्व पुढे आले. अहमदनगर जिल्ह्यात संपुर्ण डाव्या विचारांच्या पक्ष आणि चळवळीचे नेतृत्व होते. त्यात पाथर्डी, पारनेर, अहमदनगर या तालुक्यातून तर राज्य पातळीवर नेतृत्व करणारे नेतृत्व पुढे आलेले दिसून येते. एक प्रकारे अहमदनगर जिल्ह्याला पायाभूत कार्यातून पुढे येणार नेतृत्व या सामाजिक आणि आर्थिक चळवळीने दिलेले आहे. सर्वसामान्याचे हित लक्षात घेत आर्थिक आणि सामाजिक आधारावर विकास घडवून आणण्यात या नेतृत्वाने मोलाचे योगदान दिलेले आहे.

सातव्या प्रकरणात अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामीण राजकारण आणि राजकीय नेतृत्वाचा आढावा घेतला आहे. त्यात अहमदनगर १९६१ साली या समितीच्या शिफारशीच्या आधाराने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती नावाचा कायदा अस्तित्वात आला. १ मे १९६२ पासून जिल्हा परिषद अस्तित्वात आली. ही यंत्रणा स्थानिक स्वराज्य संस्थाच्या तिन्ही बाबीमध्ये महत्त्वपुर्ण यंत्रणा आहे. या यत्रंणेच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर सामाजिक आणि आर्थिक विकास करण्याच्या कामाच्या आधारावर स्थानिक राजकीय नेतृत्व पुढे येत गेलेले आहे. १९६२ ते २०१० या काळाचा विचार करता असे दिसून येते की, एकूण १८ व्यक्तींनी नेतृत्व केलेले आहे. त्यात १९९९ पर्यंत मुख्यत: कॉंग्रेस या पक्षाचे नेतृत्वाचे वर्चस्व राहिलेले आहे. १९९९ नंतर कॉंग्रेस पक्षाच्या विभाजनातून राष्ट्रवादी पक्ष पुढे आल्यानंतर जिल्हा परिषदेचे नेतृत्व हे राष्ट्रवादीकडे गेले. मात्र २००७ साली पुन्हा कॉंग्रेसकडे नेतृत्व आले. जिल्हा परिषदेच्या राजकारणाचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, १९९० नंतर राजकीय स्पर्धेत शिवसेना – भाजप आघाडी आली. मात्र स्थानिक राजकारणात स्थान मिळवता आले नाही. परिणामी कॉंग्रेस पक्षाने ज्या प्रकारे स्थानिक राजकारणात मुळे सोडलेली आहेत. ती मुळे तोडण्यात विरोधी पक्षांच्या नेतृत्वाला अपयश आलेले आहे. १९९९ नंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नेतृत्वाने कॉंग्रेस पक्षाच्या नेतृत्वाला जोरदारपणे आव्हान तयार केलेले दिसून येते. १९९९ ते २००७ असे आठ वर्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नेतृत्वाला जिल्हा परिषदेवर नेतृत्व करता आले. स्थानिक राजकारणात

राष्ट्रवादीचे नेतृत्व वाढत आहे असे दिसून येत असताना काँग्रेस पक्षाने पुन्हा एकदा चांगल्या प्रकारे पाठिंबा मिळवत राष्ट्रवादीकडून सत्ता हस्तगत केली. त्यामुळे १९९९ नंतर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या नेतृत्वामध्ये जिल्हा परिषदेचे नेतृत्व राहिलेले दिसून येते.

आठव्या प्रकरणात अहमदनगर जिल्हा राजकारणाच्या विकासाचे टप्प्याचा आढावा घेतला आहे. अहमदनगर जिल्हा राजकारणातील नेतृत्वामध्ये काँग्रेस पक्षाचे १९९० पर्यंत पुर्णपणे वर्चस्व राहिले असल्याचे दिसून येते. इतर पक्षामध्ये सीपीआय, जनता दल आणि भारतीय जनसंघ या पक्षाच्या नेतृत्वाने स्पर्धा करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. मात्र या पक्षाच्या नेतृत्वाला काही मतदारसंघातील अपवाद वगळता नेतृत्व यशस्वी करता आले नाही. काँग्रेस पक्षामध्ये देखील विधानसभा मतदारसंघ पातळीवरील नेतृत्व मर्यादित होत असतानाच विविध माध्यमातून संस्थात्मक बांधणी, विकास कामाच्या आधारे सातत्याने निवडून येत असल्याचे दिसून येते. मात्र त्याच एकाच मतदारसंघ पातळीवर दोन घराण्यातून नेतृत्व पुढे येत होते. परिणामी १९७८ नंतर प्रत्येक मतदारसंघ पातळीवर स्पर्धा निर्माण होत होती. एक प्रकारे नेतृत्वाच्या माध्यमातून लोकशाहीकरण होत असल्याचे स्पष्ट होत होते. पण त्याचवेळी नेतृत्वाच्या माध्यमातून हळूहळू घराणेशाही पुढे येत गेली. परिणामी १९९० नंतर मतदारसंघ पातळीवर घराणेशाही आणि पक्षनिष्ठा कमी पडत गटबाजी आणि पक्षांतर घडून येण्याचे प्रमाण वाढले. त्यास घराणेशाही हे एक कारण होते. त्याचप्रमाणे भाजप आणि घराणेशाहीच्या विरोधात उभे राहिलेला शिवसेना या पक्षाचा प्रवेश हा १९९० नंतर राजकीय नेतृत्वातील स्पर्धा तीव्र करण्यास पुढे आला. मात्र शिवसेनेच्या माध्यमातून देखील नेतृत्वाचा प्रस्थापित नेतृत्व आणि घराणेशाही  ही काँग्रेसकडून आलेली दिसून येते. कारण शिवसेनेतील अनेक नेतृत्व हे काँग्रेसच्या घराणेशाहीकडून आले होते. अपवाद काही मतदारसंघाचा होता. मात्र घराणेशाहीकडून न आलेले नेतृत्वाला राजकारणात जम बसवता आला नाही. १९९०

नंतर असे दिसून येते की, पक्ष निष्ठेपेक्षा राजकीय सत्ता, अधिकार टिकवणे ह्या बाबी पुढे आलेल्या आहेत.

नवव्या प्रकरणात अहमदनगर जिल्हा नेतृत्वाच्या विकासाचा आढावा घेतला आहे. त्यात अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय विकास हा आर्थिक क्षेत्राशी आणि जमीन मालकीशी संबंधित असलेल्या घटकांनी राजकीय क्षेत्रात प्रवेश करत राजकीय विकास घडवून आणलेला आहे. त्यात राजकीय पक्षांची वाट ही महत्त्वपुर्ण राहिलेली आहे. काँग्रेस पक्षांच्या माध्यमातून सर्वात जास्त राजकीय विकास घडून आलेला दिसून येतो. एक प्रकारे काँग्रेस पक्ष हा अहमदनगर जिल्ह्याच्या राजकारणात सर्वच क्षेत्रावर वर्चस्व असणारा पक्ष होता. मात्र १९९० नंतर या पक्षांची जिल्हा राजकारणावरील पक्कड सैल होताना दिसून येते. जिल्हा राजकारणात काँग्रेसला पहिला धक्का हा १९७८ च्या निवडणुकीनंतर शरद पवार यांच्या बंडखोरीने बसला. कारण या बंडखोरीने अहमदनगर जिल्हा राजकारणात मराठा समाजात फुट पडली. १९८५ नंतर शरद पवार यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला मात्र मराठा नेतृत्व शेवटपर्यंत एकत्र आली नाही. त्यात १९९९ साली पुन्हा शरद पवार यांनी काँग्रेस पक्ष सोडत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. परिणामी पुन्हा काँग्रेसमध्ये फुट पडली. १९९९ नंतर राज्यात जरी काँग्रेस आणि राष्ट्रवादी या दोन पक्षांची आघाडी असली तरी अहमदनगर जिल्ह्यात जरी एकमेकांना स्पर्धक पक्ष राहिलेले दिसून येते. विरोधी पक्षामध्ये भाजप आणि शिवसेना हे दोन पक्ष हळूहळू स्पर्धेत उतरलेले दिसून येते. १९९० नंतर शिवसेनेला हळूहळू प्रतिसाद मिळण्यास सुरूवात झाली. मात्र भाजपला प्रतिसाद हा अतिशय धिम्या गतीने मिळालेला दिसून येतो. त्यात दुष्काळी आणि कोरडवाहू परिसरातून भाजपाला विकास करता आलेला आहे. काँग्रेस पक्षाकडे श्रीरामपूर, शिर्डी, संगमनेर हे तीन मतदारसंघ राहिलेले आहेत. इतर मतदारसंघात सातत्याने बदल होत असलेले दिसून येते.

राजकीय विकास पाहत असताना दिसून येते की, नेतृत्व करण्यामध्ये मराठा समाजातील नेतृत्वाला संधी जास्त प्रमाणावर मिळालेली आहे. राजकीय पक्षाचा कल

देखील मराठा समाजाच्या नेतृत्वाला उमेदवारी देण्याकडे राहिलेला आहे. त्यात राजकीय नेतृत्वाकडून पुढे आलेल्या घराणेशाहीने भर टाकलेली दिसून येते. १९९० नंतरच्या अहमदनगर जिल्हा राजकारणात पुर्णपणे घराणेशाही विकसित झालेली दिसून येते. अनेक मतदारसंघात राजकीय घराण्याची पार्श्वभूमी असलेल्या नेतृत्वाच्या घरातच राजकीय पक्षांनी उमेदवारी वाटप केलेली दिसून येते. राजकीय नेतृत्व पुढे येण्यास आर्थिक विकास आणि राजकीय पक्षांची साथ मिळालेली दिसून येते. मतदारसंघनिहाय नेतृत्वाचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, दक्षिण अहमदनगर मतदारसंघात काँग्रेस पक्षाकडून शिवसेनेच्या नेतृत्वाला संधी मिळालेली आहे. उत्तर अहमदनगर जिल्ह्यात काँग्रेस पक्ष आणि अपक्ष यांचा प्रभाव राहिलेला आहे. श्रीरामपूर, शिर्डी, संगमनेर या तीन मतदारसंघात काँग्रेस पक्षाचा प्रभाव प्रंचड प्रमाणात राहिलेला आहे. त्यास नेतृत्वाकडून सहकाराची संस्थात्मक बांधणी कारणीभूत आहे. कोरडवाहू परिसरातील पाथर्डी, कर्जत–जामखेड, शेवगाव आणि श्रीगोंदा या मतदारसंघात मिश्र स्वरूपाचा प्रभाव राहिल्याचे दिसून येते. त्यात काँग्रेस, भाजप, जनता दल हे पक्षांच्या नेतृत्वाने संधी मिळवलेल्या आहेत. पारनेर या मतदारसंघात काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाचा प्रभाव जास्त होता. मात्र अलीकडच्या काळात शिवसेना नेतृत्वाने संधी मिळवलेली आहे. १९९० नंतर अहमदनगर जिल्हा राजकारणात असे दिसून येते की, कर्जत जामखेड या मतदारसंघाचा अपवाद वगळता प्रत्येक मतदारसंघात दोन प्रभावी अशी घराणे राजकारणात पुढे आलेले आहेत. या दोन घराण्यामध्येच राजकीय नेतृत्व राहत आलेले दिसून येते.

दहाव्या प्रकरणात या वरील सर्व प्रकरणाच्या आधारे निष्कर्ष मांडण्यात आलेले आहेत.

## संशोधनामधून आलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे

### प्रबळ पक्षीय अस्तित्व

अहमदनगर जिल्ह्याचा विचार करता असे दिसून येते की, सत्तेमध्ये दिर्घकाळ काँग्रेस पक्ष असलेला दिसतो. काँग्रेस नेतृत्वाला जिल्ह्याच्या राजकारणात चांगल्यापैकी एक पेस निर्माण झाली होती. त्याचा काँग्रेसने फायदा घेतल्याचे दिसून येते. मात्र १९९९ नंतर सत्ता काँग्रेसकडून राष्ट्रवादी काँग्रेसकडे गेलेली दिसते. संगमनेर, शिर्डी या दोन तालुक्यात काँग्रेस पक्ष नेतृत्व काही प्रमाणात ताकद राखून आहे. भाजप नेतृत्व (अभय आगरकर) हे शहरी भागात चांगल्या प्रकारे ताकद निर्माण करत असताना दिसून येते. पण महानगरपालिकेची सत्ता हस्तगत करण्यात आलेली नाही. भाजप नेतृत्व विधानसभेच्या दुष्काळी परिसरातील मतदारसंघ आणि अहमदनगर लोकसभा मतदारसंघात ताकद दाखवताना दिसून येते. शिवसेना नेतृत्व हे शहरात काही महानगरपालिकेच्या वार्डात प्रभाव निर्माण करून असताना दिसून येते. पण विधानसभेसाठी अहमदनगर विधानसभा मतदारसंघात या मध्यमवर्गीय संख्या जास्त असलेल्या मतदारसंघात शिवसेना बळकट असताना दिसून येते. मनसे नवीन असलेला पक्ष असताना देखील शहराच्या काही भागात शाखा आणि नगरसेवकांच्या माध्यमातून अस्तित्वात असताना दिसून येतो. पण मनसेला अहमदनगर शहरात अजूनही नेतृत्व सापडलेले नाही. रिपाई ही काँग्रेसनंतर राष्ट्रवादीबरोबर जाण्याने स्वत:चा अस्तित्व कोणत्याच वार्ड अथवा मतदारसंघात निर्माण करू शकलेली नाही. परंतु नगरसेवक व संघटनांच्या माध्यमातून अस्तित्वात आहे. डाव्या पक्षांना १९९० नंतरच्या राजकारणात जिल्ह्यातील निवडणुकीच्या आणि संघटनात्मक पातळीवर स्थान मिळवता आलेले नाही. जनता दलाला एक वेळेस ग्रामीण भागातील या विधानसभा मतदारसंघात स्थान मिळालेले होते. पण स्थान टिकवता आले नाही. जनता दल आता जिल्ह्यात केवळ शाखा आणि कार्यकारणीच्या माध्यमातून अस्तित्वात असताना दिसून येतो.

## ग्रामीण राजकारणात काँग्रेस— राष्ट्रवादीचे वर्चस्व

ग्रामीण राजकारणाचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, १९९० ते १९९९ या काळात काँग्रेस पक्षाचे वर्चस्व होते. पण १९९९ नंतर ग्रामीण राजकारणावर राष्ट्रवादीचे वर्चस्व आले आहे. संगमनेर आणि शिर्डी मतदारसंघ वगळता पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेचा विचार करता हे वर्चस्व असताना दिसून येते. काँग्रेसचे संगमनेर, श्रीरामपूर आणि शिर्डी या दोन पंचायत समितीवर वर्चस्व आहे. तर कर्जत—जामखेड आणि पाथर्डी या पंचायत समितीवर भाजपाचे वर्चस्व असताना दिसून येते. इतर सर्व पंचायत समितीवर २००४ पासून वर्चस्व आहे. त्यापूर्वी काँग्रेसचे वर्चस्व होते. २००४ आणि २००७ या दोन जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादीने स्पष्ट बहुमत मिळवलेले आहे. शिर्डी, संगमनेर, जामखेड—कर्जत, पारनेर आणि राहुरी या पंचायत समिती वगळता सर्व पंचायत समित्यावर राष्ट्रवादीचे वर्चस्व आहे. एक प्रकारे एक पक्षीय वर्चस्व विस्कळीत होत बहुपक्षीय स्पर्धा पुढे येत आहे. मात्र काँग्रेस—राष्ट्रवादी या दोन पक्षांच्या नेतृत्वाचे वर्चस्व प्रबळ असताना दिसून येते.

## ग्रामीण राजकारणात सहकार क्षेत्राचे वर्चस्व

सहकारी साखर कारखान्यामध्ये ज्या व्यक्तीने तो उभा करण्यामध्ये पुढाकार घेतलेला आहे त्याच व्यक्तीच्या घराण्यातील वर्चस्व साखर कारखान्यावर असल्याचे दिसून येते. परिणामी मतदारसंघावर त्या घराण्याला वर्चस्व मिळवण्यास वाव मिळालेला आहे. उदा. विखे पाटील घराणे, थोरात घराणे, सासणे घराणे, काळे घराणे, कोल्हे घराणे, पाचपुते घराणे इत्यादी घराणे ही सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून पुढे आलेली आहेत. ही घराणे म्हणजे मतदारसंघावरील वर्चस्व असे चित्र तयार झालेले दिसून येते. काही मतदारसंघात तर दोन—तीन राजकीय घराणे असताना दिसून येतात. एक प्रकारे या सहकार साखर कारखाने आणि सहकारी इतर संस्थाच्या माध्यमातून जिल्ह्याचे वर्चस्व निर्माण होत काही घराण्याच्या हाती संपुर्ण जिल्हा गेल्याचे दिसून येते. उदा. अनेक साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या निवडणुका होताना या पूर्णपणे एकतर्फी

होताना दिसतात. विरोधी पक्षास त्यामध्ये स्थान असलेले दिसत नाही. प्रत्येक कारखाना हा कुठल्या न कुठल्या नेतृत्वाच्या प्रभावाखाली चालताना दिसून येतो. जिल्ह्यातील अनेक साखर कारखाने कर्जाच्या बोज्याखाली अडकलेले दाखवण्यात येत आहे. पण त्यात काही साखर कारखाने कर्जामुळे बंद करण्यात आले आहेत असे उदाहरणे देखील आहेत. मात्र साखर कारखाने कर्जात बुडालेले असले तरी नेतृत्वाचे वर्चस्व कमी होत नाही. वर्षानुवर्ष एकाच नेतृत्वाच्या प्रभावाखाली साखर कारखाना असताना देखील कर्जामध्ये साखर कारखाने सापडलेले आहेत. साखर कारखाने कर्जामध्ये असल्याने या साखर कारखान्याला केंद्र आणि राज्य शासनाकडून वारंवार आर्थिक मदत मिळालेली आहे. याशिवाय साखर कारखान्यातून साखर निर्माण झाल्यानंतर जो टाकाऊ कच्चा माल असतो त्यापासून दुय्यम प्रकारची प्रक्रिया माल तयार करण्यातून कर्ज कमी करण्याचे प्रयत्न अनेक साखर कारखान्यांकडून चालू आहेत. साखर कारखान्यांच्या आधारावर इथेनॉल आणि कागद निर्मिती मोठ्या प्रमाणावर करण्यात येते. काही साखर कारखान्यात ऊसाच्या मळीपासून दारू निर्माण करण्याचा उद्योग करण्यात येतो. ऊसाची मळी ही सेंद्रिय खत म्हणून पुन्हा शेतकऱ्यांना विकण्यात येते. अशा विविध मार्गातून साखर कारखान्याला झालेला तोटा भरून काढण्याचे तंत्रज्ञान विकसित करण्यात येत आहे. त्यामुळे ग्रामीण भागात साखर कारखाने तोट्यात दिसत असले तरी पक्के पाय रोऊण असल्याचे दिसून येते. परिणामी नेतृत्वाचे वर्चस्व कमी होत नाही.

साखर कारखान्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागात राजकारणावर वर्चस्व मिळवता आलेले आहे. ग्रामीण भागातील अभिजनांपैकी ज्यांना स्थानिक आणि विधानसभा निवडणुकीत उमदेवारी देण्यात आलेली नाही अशाना साखर कारखान्यांच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीची उमेदवारी देऊन प्रभावाखाली ठेवण्यात मतदारसंघ आणि जिल्हा पातळीवरील नेतृत्व यशस्वी झालेले आहे. दुसरे असे की, निवडणुकीत ऊसाला साखर कारखान्यांकडून योग्य भाव देण्याचे आश्वासन देऊन मतदारांना संघटनात्मक आणि संस्थात्मक पातळीवर बांधून ठेवण्यात नेतृत्व यशस्वी झालेले दिसून

येते. एक प्रकारे प्रभाव निर्माण करण्याचे साधन हे साखर कारखान्यांच्या माध्यमातून वापरण्यात येत आहे.

सहकार क्षेत्रातील जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून देखील प्रभाव निर्माण करण्यात आलेला आहे. या माध्यमातून जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत संचालक आणि अध्यक्ष, उपाध्यक्ष अशा पदावर अनेक स्थानिक पातळीवरील नेतृत्वाला संधी देण्यात आली. जिल्हा परिषद आणि सहकारी साखर कारखान्यात माळी, धनगर, वंजारी समाजास संधी देत मराठा नेतृत्वाकडून जिल्ह्याच्या राजकारणात व्यवस्थितरित्या वर्चस्व राखल्याचे दिसून येते. सहकार आणि आर्थिक संस्थात्मक बांधणीच्या राजकारणात एक प्रकारे जातीच्या समीकरणातून राष्ट्रवादीकडून वर्चस्व निर्माण करण्यात यश मिळवलेले आहे. या स्थानिक पातळीवरील सहकारी संस्था राजकीय नेतृत्वाला (शरद पवार) उपयोगाचे साधन असल्याचे दिसून येते. स्थानिक स्वराज्य संस्था आणि सहकारी संस्था ह्या स्थानिक पातळीवर राजकीय प्रक्रिया घडून येण्यासाठी अनिवार्य घटक बनलेल्या आहेत.

सहकारी संस्थामधील स्थानिक पातळीवरील पतसंस्था, तालुका कृषि उत्पन्न बाजार समिती, विविध सहकारी बँका, सहकारी व्यापारी संघ अशा विविध संस्था ह्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय गतीशिलतेचे साधन बनलेल्या आहेत. सहकारी साखर कारखाने हे त्यात मोडकळीस आलेले दिसून येत आहेत. पण त्यांचे सहकारी संस्थामध्ये सर्वात वरचे स्थान कमी झाल्याचे दिसून येत नाही. ग्रामीण भागात सहकारी साखर कारखान्याविषयीची प्रतिष्ठा ही कायम मतदारांमध्ये असल्याचे दिसून येते. तसेच स्थानिक पातळीवर आर्थिक हितसंबंध व्यवस्थितरित्या जोपासताना दिसून येते.

## ग्रामीण भागातील स्थानिक राजकारणात मराठा नेतृत्वाचा प्रभाव

ग्रामीण भागात मराठा समाजाचे वर्चस्व असल्याचे दिसून येते. अहमदनगर जिल्ह्याच्या स्थानिक परिसरात मराठा समाजाची लोकसंख्या सर्वात जास्त आहे. तसेच संपुर्ण जिल्ह्यात मराठा समाजाचे वास्तव्य आहे. मराठा समाजापाठोपाठ माळी, वंजारी

आणि धनगर या ओबीसी जातींचे प्रमाण जास्त आहे. दुष्काळी तालुक्यात वंजारी आणि तत्सम समाजाचे प्रमाण जास्त आहे. इतर ओबीसी मधील अनेक जातीं आहेत पण लोकसंख्येच्या मर्यादामुळे राजकारणात येण्यास वाव मिळत नाही. दलित समाजातील नवबौध्द, चर्मकार आणि मातंग समाजाचे प्रमाण जास्त आहे. पण नवबौध्द समाजाला राजकारणात जास्त संधी मिळालेली आहे. ओबीसी समाजातील धनगर, वंजारी आणि माळी समाजाला काही मतदारसंघात खुल्या जागेवरून स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सहकारी साखर कारखाना, कृषि उत्पादन समिती, सहकारी पतसंस्था अशा मध्ये स्थान मिळवता आले. स्थानिक पातळीवरील सर्व सहकारी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मराठा समाजाचे वर्चस्व आहे. खुल्या जागेवर माळी, धनगर, वंजारी तर काही मतदारसंघात ब्राम्हण, सुतार, माहेश्वरी या समाजाला क्वचित संधी मिळालेली आहे. मात्र ही संधी मराठा समाजाच्या नेतृत्वापुढे वर्चस्व निर्माण करण्यात यश देणारी नाही. ही राजकीय विकासामध्ये स्थानिक पातळीवर मर्यादा असल्याचे पुढे येते. मात्र आरक्षणामुळे किमान प्रतिनिधित्वाच्या पातळीवर संख्याबळ वाढलेले आहे. हे राजकीय विकासाचे सकारात्मक यश आहे.

शहरातील महानगरपालिका, नगरपालिका या जागांवर मराठा समाजाचे वर्चस्व आहे. पण अलीकडे काही ओबीसी आणि मारवाडी या समाजाचे काही नगरसेवक निवडून येण्यास सुरूवात झालेली आहे. राखीव जागेची तरतूद लागू झाल्यापासून मराठा समाजाचे स्थानिक पातळीवरील संख्याबळ घटलेले दिसून येते. ग्रामीण भागात राखीव जागा वगळता काही मतदारसंघाचा अपवाद वगळता मराठा समाजातंर्गत स्पर्धा असताना दिसून येते. ओबीसी समाज बहुतेक परिसरात मराठा समाजाशी स्पर्धा करताना दिसून येतो. पण तालुका आणि जिल्हा पातळीवर मराठा समाजाचे नेतृत्वाचे वर्चस्व असल्याने सहजासहजी ओबीसी समाजातील नेतृत्व विरोधात जात नाही असे दिसून येते. ओबीसी समाजातील नेतृत्वाला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सहकारी साखर कारखाना, तालुका कृषि उत्पन्न समिती अशा स्थानिक पातळीवरील संस्थाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष

किंवा संचालक पद देण्यात येते. अर्थात ओबीसींना दुय्यम भूमिका घेण्यास भाग पाडले जाते. ओबीसीला स्थानिक संस्थामध्ये पदे देऊन प्रभावाखाली ठेवण्याची भूमिका मराठा नेतृत्वाकडून घेण्यात येते. अशा प्रकारे स्थानिक पातळीपासून ते तालुका आणि जिल्हा पातळीपर्यंत मराठा समाजाचे वर्चस्व टिकून आहे. ग्रामीण भागात मराठा समाजाच्या नेतृत्वाखाली आश्रयाने इतर मागास समाजाच्या नेतृत्वाला रहावे लागते. तर शहरी भागात काही प्रमाणात मराठा वर्चस्वाची पातळी सैल असताना दिसून येते. ब्राम्हण, मारवाडी व इतर मागास जाती मराठा समाजाच्या नेतृत्वाशी स्पर्धा करताना दिसून येतात.

## ग्रामिण स्थानिक राजकारणात पक्षीय आणि जातींय आधारावरील स्पर्धा

मराठा समाजाचे वर्चस्व जिल्हा आणि तालुका पातळीवर आहे. पण मराठा समाजातंर्गत वर्चस्वासाठी तीव्र स्पर्धा आहे. ही मराठा समाजातंर्गत वर्चस्व टिकवण्यासाठी ओबीसी आणि इतर समाजाचे नेतृत्व मराठा समाजाकडून हाताशी धरण्यात येते. त्यासाठी तालुका पातळीवरील आणि जिल्हा पातळीवरील नेतृत्वाकडून ओबीसी समाजाच्या नेतृत्वाला जिल्हा बँकेवर, सहकारी साखर कारखाने, तालुका कृषि उत्पन्न बाजार समिती यामध्ये राखीव जागा आणि खुल्या जागांच्या माध्यमातून विविध जातींना सदस्यत्व दिलेले दिसून येते. बँकेकडून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना, मागास जातीं–जमातीच्या लोकांना, व्यावसायिक, नोकरदार इत्यादींना मदत झालेली आहे.

तालुका कृषि उत्पन्न बाजार समितीमधील संचालक पदावर आमदारांच्या मर्जीतील, प्रभावाखालील लोक निवडून येण्याचे प्रमाण अधिक दिसते. दुसरे असे की, निवडून आल्यानंतर स्वतंत्रपणे काम देखील करता येत नाही. राजकीय नेतृत्व सांगेल त्या प्रमाणे काम करावे लागते. परिणामी स्थानिक संस्थामधून ग्रामीण भागात अनेक समस्याचा गुंता सोडवता आलेला नाही. उदा. विविध पातळीवरील शेतकऱ्यांची कृषि उत्पन्न मालाची होणारी फसवणूक थांबली पाहिजे, अनिष्ट प्रथा मोडल्या पाहिजते, रास्त भाव मिळाला पाहिजे. इ. गोष्टी संचालकांनी कराव्यात अशी अपेक्षा असते. परंतु जास्तीत जास्त संचालक काहीही करताना दिसत नाही. खरेदी विक्री संघावर असलेले

नेते संतुष्टता मानताना दिसतात. परिणामी स्थानिक पातळीवर अशा राजकीय नेतृत्वाचा जनाधार वाढत नाही. परिणामी तालुका आणि जिल्हा पातळीवरील नेतृत्वाचा प्रभाव हा स्थानिक पातळीवर देखील टिकून असताना दिसून येतो.

ग्रामीण भागात विविध प्रकल्पाच्या माध्यमातून कालवे काढून सिंचनाची सुविधा निर्माण केलेली आहे. त्यावर ऊसाचे पीक येते. सहकार क्षेत्र यामुळेच अहमदनगर जिल्ह्यात वाढले आहे. परंतु ज्या ठिकाणी धरणे आहेत त्या ठिकाणाचे धरणग्रस्त व कोरडवाहू शेतकरी पाण्यापासून वंचित आहेत. त्यासाठी नेतृत्वाकडून कोणतेही प्रयत्न होताना दिसत नाहीत. त्याऐवजी आपणच दीर्घकाळ सत्तेमध्ये कसे राहू यासाठी त्यांच्यामध्ये पक्षातंर्गत व विरोधी पक्षामध्ये स्पर्धा असलेली दिसते. आर्थिक संस्थाही त्यांना विशेष मदत करताना दिसत नाही. राजकीय नेत्यांची मंत्रीपदे शाबूत कशी राहतील तसेच दीर्घकाळ कशी टिकतील यासाठी स्थानिक नेते कार्यकर्तेही प्रयत्नशील असलेले दिसतात. सत्तेची फळे चाखण्याचे काम त्या त्या नेत्याचे कार्यकर्ते दिसतात. राजकारणामध्ये पक्षनिष्ठेपेक्षा व्यक्तिनिष्ठेला महत्त्व अधिक आलेले आहे.

## शहरी राजकारणात सर्व पक्षांचे अस्तित्व पण राष्ट्रवादीचे वर्चस्व

शहरी राजकारणात काँग्रेस, भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी आणि मनसे या शिवाय इतर पक्ष कार्यरत आहेत. पण पूर्ण शहराच्या राजकारणावर आणि महानगरपालिकेवर राष्ट्रवादीचे वर्चस्व आहे. राष्ट्रवादी पक्ष हा २००२ पासून २००२ व २००७ अशा दोन्ही निवडणुकीत यशस्वी पक्ष झाला आहे. २००२ साली काँग्रेसचा पाठिंबा घेऊन सत्तेत आला होता. तर २००७ साली झालेल्या निवडणुकीत सेना – भाजपाच्या साथीने सत्तेत आला होता. शहरी भागात काँग्रेसला भाजपा आणि शिवसेनेच्या तुलनेत जास्त जागा मिळाल्या असल्या तरी सत्ता स्वबळावर हस्तगत करता आली नाही. शिवसेनेला शहराच्या भोवतालच्या ग्रामीण भागातून स्थलांतरीत झालेल्या मतदारांवर अंवलबून रहावे लागत आहे. तर भाजप हा मध्यवर्ती परिसरा व्यतिरिक्त इतर ठिकाणी जास्त प्रमाणात वाढ होत नाही. काँग्रेसचा पाठिंबा हा विस्कळीत झालेला दिसून येतो. पण राष्ट्रवादी

पक्षाला सर्वत्र जनाधार असताना दिसून येतो. विशेत: नव्याने विकसित होत असलेल्या शहरी भागात राष्ट्रवादीचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर आहे. इतर पक्षाला तसा प्रभाव निर्माण करता आलेला नाही. त्यामुळे शहरी भागात जरी सर्व पक्षांचे अस्तित्व दिसून येत असले तरी राष्ट्रवादी या पक्षांचा प्रभाव जास्त प्रमाणात असताना दिसून येतो.

## विधानसभा निवडणुकीच्या राजकारणात प्रस्थापित जातींच्या नेतृत्वाला प्राधान्य

विधानसभा निवडणुकीत १९९० पासून अनेक मतदारसंघात विविध पक्षांकडून कोणत्या जातींची लोकसंख्या त्या मतदारसंघात जास्त आहे अशाच जातींच्या नेतृत्वाला उमेदवारी देताना प्राधान्य दिलेले दिसून येते. पक्षीय पातळीवरील कार्य आणि संघटनात्मक कार्य यामध्ये देखील मराठा समाजाच्या नेतृत्वाला स्थान देण्यात येते. परिणामी सर्व पातळीवर मराठा समाजाच्या नेतृत्वाला स्थान देण्यात येत असल्याचे दिसून येते. राजकीय पक्षांचा पाठिंबा इतर समाज नेतृत्वाला मिळत नसल्याने नेतृत्व पुढे येत नाही. ग्रामीण भागात प्रस्थापित असणाऱ्या मराठा समाजाला उमेदवारीमध्ये प्राधान्य दिलेले दिसून येते. शहरी भागात काहीसे आर्थिक स्थिती आणि उच्च जातींच्या जोरावर ब्राम्हण, मारवाडी समाजाच्या नेतृत्वाला उमेदवारी देण्याचे उदाहरणे पुढे आलेले आहेत. उदा. काँग्रेसकडून गुदेंचा, भाजपाकडून अभय आगरकर अशा काही मराठेत्तर समाजाचा अपवाद वगळता सर्व उमेदवारी ही मराठा समाजाकडे राहिलेली दिसून येते. अहमदनगर शहरी भागात माळी समाजाचे प्रमाण जास्त असल्याने अभय आगरकर यांना महत्त्व मिळताना दिसून येते. मात्र २००७ च्या महानगरपालिकेच्या निवडणुकीत त्यांना फारसे महत्त्व राष्ट्रवादीकडून देण्यात आले नाही. परिणामी त्यांनी राष्ट्रवादी सोडत भाजपात प्रवेश केला होता. पण भाजपाच्या माध्यमातून यश संपादन करता आले नाही. त्यामुळे मराठेतर समाजाच्या नेतृत्वाला राजकारणात पाहिजे त्या प्रमाणात यश मिळवता आले नाही. ही राजकीय विकास होत असताना मराठेतर नेतृत्व विकासात एक मर्यादा पुढे येते.

प्रत्येक मतदारसंघात असे दिसून येते की, तालुका पातळीवर नेतृत्व हे प्रस्थापित समाजातून पुढे आले आहे. पण राज्य पातळीवर नेतृत्वाच्या पाठिंब्याने ओबीसीतील माळी आणि धनगर समाजाचे नेतृत्व देखील पुढे आलेले दिसून येते. उदा. जामखेड – कर्जत, पाथर्डी मतदारसंघात वंजारी, धनगर समाजातील नेतृत्व भाजपामधून पुढे आणले होते. पण काँग्रेस फुटीपासून त्यांना राष्ट्रवादीच्या निर्मितीमध्ये ओबीसी नेतृत्वामध्ये देखील काही प्रमाणात फाटाफुट झालेली दिसून येते. त्यामुळे माळी समाजाचे काँग्रेस आणि राष्ट्रवादी अशा दोन पक्षांत विभाजन झालेले दिसून येते. एक प्रकारे एक समाज एक पक्ष असे चित्र नसल्याचे दिसून येते. एक समाज हा नेतृत्वावरून अनेक पक्षांत विभाजित झालेला दिसून येतो. पण प्रत्येक मतदारसंघात प्रत्येक पक्षांचे एक नेतृत्व असताना दिसून येते. त्यातून पक्षीय आणि नेतृत्व अशा दोन्ही पातळीवर स्पर्धा असताना दिसून येते.

## जिल्हा पातळीवरील नेतृत्वाचा प्रभाव

अहमदनगर जिल्ह्यावर १९८० नंतर शरद पवार यांचा प्रभाव असल्याचे दिसून येते. त्यांच्या नंतर जिल्हा राजकारणात त्यांच्या नेतृत्वाचा प्रभाव कायम असल्याचे दिसून येते. पण शरद पवार यांच्या प्रभावाखाली जिल्हा पातळीवरील राजकारणात १९७७ पासून अनेक नेतृत्व पुढे आलेले दिसून येतात. त्यात काँग्रेसचे बाळासाहेब विखे, विखे घराण्यातील इतर, संगमनेर मतदारसंघातून बाळासाहेब थोरात, कोपरगाव मतदारसंघातून कोल्हे घराणे, पारनेरमधून झावरे असे अनेक नेतृत्व पुढे आलेले दिसून येते. १९९९ नंतर मात्र या घराण्यांच्या नेतृत्वाला स्पर्धक पुढे येत असताना दिसून येते. काही स्पर्धक नेतृत्व हे प्रतिस्पर्धी घराण्यातून आलेले आहेत. तर काही नव्याने पुढे येत आहेत. उदा. शिवाजी कर्डिले हे राजकारणाची पार्श्वभूमी नसताना पुढे आलेले नेतृत्व आहे. तर विजय औटी, राजीव राजळे, शंकरराव गडाख हे नेतृत्व राजकारणाची पार्श्वभूमी असलेल्या घराण्यातून पुढे आलेले नेतृत्व आहे.

या प्रत्येक नेतृत्वाचा प्रभाव हा पुर्ण जिल्हाभर राहिलेला नाही. तर लोकसभेचा मतदारसंघापुरताच राहिलेला दिसून येतो. पण संपुर्ण जिल्हाभर प्रभाव हा शरद पवार यांचा राहिलेला आहे. मात्र शरद पवार हे जिल्ह्याबाहेरचे नेतृत्व असल्याने त्यांना देखील जिल्हा राजकारणात मर्यादा येताना दिसून येतात. मात्र शरद पवारांनी विधानसभा पातळीवरील इतर पक्षांच्या नेतृत्वाशी काही प्रमाणात संघर्षाचे आणि काही प्रमाणात मैत्रीचे संबंध ठेवत हा प्रभाव टिकवलेला आहे. एक प्रकारे असे दिसून येते की, जिल्हा नेतृत्वाच्या प्रभाव कमी होत विशिष्ट अशा मतदारसंघाच्या साच्यात कप्पेबध्द होत चालला आहे. त्यात नेतृत्वाकडून स्वत:चे नेतृत्व आणि स्वत:चा मतदारसंघ असे एक सुत्र पुढे येत आहे. हे सुत्र १९९९ पासून प्रबळपणे पुढे येत आहे. संपुर्ण जिल्हा राजकारणावर विखे पाटील घराण्याचे वर्चस्व होते. मात्र आता ते वर्चस्व पूर्वीप्रमाणे न राहता कमी झालेले आहे. आता सत्तेचे अनेक केंद्र जिल्हा राजकारणात पुढे येत आहेत.

## सहकारावर नियंत्रण राजकारणावर नियत्रंण

मुख्यत: अहमदनगर जिल्हयाच्या ग्रामीण भागाचा विचार करता सहकारी चळवळ, कामगार चळवळ, शेतकरी चळवळ, दलित चळवळ या मधून पुढे आलेल्या नेतृत्वाचा वेध घेतला असता असे दिसून येते की, या सर्व चळवळीत सहकारी साखर कारखान्यावर वर्चस्व असलेल्या नेतृत्वाला प्रभाव निर्माण करणे आणि टिकवणे सहज शक्य झाले आहे. सहकारामध्ये सहकारी साखर कारखाने, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पतसंस्था, नागरी बँका आणि नेतृत्व सहकार संस्थेच्या माध्यमातून यशस्वी झालेल्या नेतृत्वाला दिर्घकाळ जिल्हा राजकारणात नेतृत्व करण्याची संधी मिळालेली आहे. अहमदनगर जिल्ह्यात संस्थात्मक संघटन करण्याचे घटक हे सहकारी संस्था आहेत. या संस्था ज्या नेतृत्वाच्या ताब्यात असतील त्या नेतृत्वाचे वर्चस्व राजकारणात असताना दिसून येते. किंबहुना असे दिसून येते की, सहकारी संस्थाच्या माध्यमातून राजकारणावर वर्चस्व मिळवता येते. सहकारी संस्था ताब्यात असल्या की आपोआप राजकीय संस्था देखील ताब्यात राहत असल्याचे दिसून येते. सहकारी संस्थाच्या

माध्यमातून नव्याने पुढे येणाऱ्या नेतृत्वाला स्थानिक पातळीवर थोपवून ठेवता येते. कारण त्या नेतृत्वाला सहकाराच्या राजकारणात संधी दिल्यास अनुयाच्या आणि आश्रीत राजकारणाचे बळी करता येते. त्यामुळे मतदारसंघ पातळीवर पाहिजे त्या प्रमाणात स्पर्धा करण्यास नेतृत्व पुढे येत नाही. त्याचा फायदा हा घराणेशाही निर्माण झालेल्या नेतृत्वाला होत आलेला आहे.  दुसरे असे की, सहकारी संस्थामध्ये नवअभिजनांना स्थान देऊन आश्रीत ठेवता देखील येते. स्पर्धेच्या भूमिकेऐवजी दुय्यम भूमिका घेण्यास भाग पाडता येते. परिणामी सहकारी संस्थाच्या माध्यमातून सत्ताधारी घराणी/राजकीय नेतृत्व स्वत:ची सत्ता आपल्याकडे किंवा आपल्या अंकित असलेल्या व्यक्तीकडे सत्ता हातामध्ये ठेवताना दिसतात. अर्थात असे दिसून येते की, तालुक्यातील सहकारी संस्था ज्या नेतृत्वाच्या ताब्यात आहेत त्याच नेतृत्वाचे राजकारणावर देखील वर्चस्व आहे.

## शरद पवारांचा जिल्हा राजकारणावरील प्रभाव

अहमदनगर जिल्हयाच्या राजकारणावर पवारांचा विशेष प्रभाव असलेला दिसतो. आजही त्यांच्या म्हणण्यानुसार काही विरोधी पक्षातील कार्यकर्तेही राजकीय वर्तन करताना दिसतात. त्यांच्याशिवाय बाळासाहेब विखे, बाळासाहेब थोरात या नेतृत्वाला तालुक्यातील स्वत:चा प्रभाव टिकवण्यासाठी शरद पवारांशी छुपी युती करावी लागते, ही युती अनेकदा जिल्हा मध्यवर्ती बँक, सहकार साखर कारखाना, कृषि उत्पन्न बाजार समिती इत्यादींच्या निवडणुकीतून पुढे येताना दिसून येते. राष्ट्रवादी विरोधक नेतृत्वाला जिल्ह्याच्या राजकारणात पवारांशी सोयीस्कर राजकारण करताना दिसतात. पवारांशी संबंध चांगले ठेवून राजकारणात सक्रिय असताना दिसून येतात. ग्रामीण भागातील राजकारणात मवाळ स्वरूपात विरोध करण्यासाठी जिल्ह्यातील नेतृत्वाचा वापर पवारांकडून होताना दिसून येतो. पण विधानसभा आणि लोकसभेला आघाडीच्या जागा वाटपात साटेलोटे होताना दिसून येते. त्यामुळे या नेतृत्वाला काँग्रेसमध्ये राहून राजकारण करणे सोपे गेले आहे. दुसरे असे की, हे नेतृत्व मराठा समाजाचे असल्याने पवारांकडून तीव्र स्वरूपात विरोध झालेला नाही ही एक बाजू राहते. त्याच प्रमाणे पवार काँग्रेसमध्ये

असताना या नेतृत्वाने पवारांचे नेतृत्व मान्य केले होते. ज्यावेळी शरद पवारांनी राष्ट्रवादीची निर्मिती केली त्यावेळी मात्र पुर्वापार काँग्रेस नेतृत्वाने शरद पवार यांच्याशी समन्वयाची भूमिका घेत काँग्रेसमधून राजकारण करण्यास धन्यता मानण्यात आलेली दिसून येते.

## स्थानिक राजकारणावरील नेतृत्वाचा प्रभाव

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये बहुतांश ठिकाणी ज्या पक्षांचा तालुक्याचा आमदार असेल त्याच पक्षाला जनमताचा कौल मिळालेला आहे असे चित्र मात्र सर्व ठिकाणी दिसत नाही. विकास विषयक गोष्टींचा विचार करता थोड्याच तालुक्यांमध्ये दूध संघ, सहकारी साखर कारखाने नाहीत. अलीकडे विकासाचा मुद्दा घेऊन सर्वच राजकीय पक्षांचे नेते बोलताना दिसतात. युतीच्या काळामध्ये (१९९५—१९९९) सहकारी चळवळीला हादरा देण्याचे काम झाले म्हणजे विविध सहकारी साखर कारखान्यांना नोटीसा पाठविणे, चौकशी नेमणे इ. जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ आर्थिकदृष्ट्या अडचणीत आला आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, सहकारी साखर कारखाने, सूतगिरणी, कृषि उत्पन्न बाजार समिती, फलोत्पादन संघ इ.च्या माध्यमातून स्थानिक नेत्यांना राज्य पातळीवरील नेत्यांनी पदे दिलेली असून त्यांना संतुष्ट ठेवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला आहे.

१९९०—२००२ या कालखंडामध्ये जे विरोधी पक्ष आहेत त्यांच्या कार्यकर्त्यांनी पक्ष वाढीसाठी प्रयत्न केलेला दिसतो. परंतु युतीच्या सहकारची धोरणे पाहता नंतरच्या काळामध्ये रामदास आठवले गट (रिपब्लिकन पक्ष) अधिक जोमाने वाढताना दिसतो. परंतु त्यांना काही मर्यादा पडलेल्या आहेत. दलितांमध्ये एकजुटीचा नेहमीप्रमाणे अभाव दिसतो. रिपब्लीकन पार्टीचे इतर गट जिल्ह्यामध्ये प्रभावी नाहीत. परिणामी पर्यायी राजकारणाचा पर्याय निर्माण करण्यात आला नाही. शिवसेना — भाजपाकडून पर्यायी राजकारण करण्याचे प्रयत्न झाले मात्र पुढील काळात काँग्रेस संस्कृतीत वाढलेल्या

नेतृत्वाला पक्षाने प्रवेश दिल्याने पर्यायी राजकारणाऐवजी काँग्रेस संस्कृतीचे राजकारण या पक्षाकडून होत राहिलेले आहे.

## ओबीसी राजकारणाचा प्रभाव

ओबीसीमधील माळी, वंजारी आणि धनगर जातीचे नेतृत्व राजकारणामध्ये सक्रिय असलेले दिसते. स्थानिक स्वराज्य संस्था व तालुक्यातील पक्षाच्या पदाधिकारी पदाचे काही पदस्थाने मिळालेली दिसतात. पण निवडणुकीच्या राजकारणात फारशी काही संधी मिळते असे दिसून येत नाही. माळी लोक संख्येच्या तुलनेत राजकारणामध्ये कमी असून त्यांनी प्रभुत्वशाली मराठा जातींशी जुळवून घेतलेले दिसते. विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुकीत ओबीसी समाज घटकांना पाहिजे त्या प्रमाणात समाजाला स्थान देण्यात आलेले नाही. पण जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीतील ओबीसी राखीव जागांवर उमेदवारी विविध राजकीय पक्षाकडून देण्यात आलेली दिसून येते. माळी समाजातील अनेक नेतृत्व मराठा या प्रस्थापित समाजाच्या नेतृत्वाशी स्थानिक पातळीवर स्पर्धा करताना दिसून येते. काही विधानसभा मतदारसंघात देखील स्पर्धा करत आहे. उदा. माळी समाजाचे नेतृत्व श्रीगोंदा, अहमदनगर, राहुरी, श्रीरामपूर, वंजारी समाज हा मराठा समाजाला जामखेड, पाथर्डी, शेवगाव, अहमदनगर, कर्जत या तालुक्यात स्पर्धा करतो, तर धनगर समाज हा पारनेर, श्रीगोंदा, अहमदनगर, पाथर्डी, शेवगाव, जामखेड आणि कर्जत या तालुक्यात स्पर्धेच्या रूपाने उतरल्याचे दिसून येते. मात्र वंजारी, धनगर आणि माळी या ओबीसी जाती व्यतिरिक्त विधानसभा निवडणुकीत इतर ओबीसीतील जातीं या पुढे आलेल्या दिसून येत नाही. सोनार, वडार आणि कैकाडी या समाजाचे नेतृत्व काही विधानसभेला उमेदवारी करताना दिसून येते, पण निर्णायक निवडणुकीपर्यंत पोहचत नाही. इतर ओबीसी समाजातील नेतृत्व हे शहरी भागातील राजकारणात जास्त प्रमाणावर सहभागी असताना दिसून येते.

## महिलांचा राजकारणातील सहभाग अत्यल्प

महिलांचा सहभाग अत्यल्प प्रमाणात असताना दिसून येतो. स्थानिक राजकारणात महिला राखीव जागांची तरतूद असल्याने या मतदारसंघातून महिला राजकारणात पुढे येताना दिसून येतात. पण त्यापुढे स्तरावरील अर्थात विधानसभा आणि लोकसभा या निवडणुकीत महिला या खूप कमी प्रमाणात राजकारणात सक्रिय असताना दिसून येते. लोकसभा पातळीवर पाहिले असता महिलांमधून सुप्रिया सुळे यांचे नेतृत्व पुढे आले आहे. इतर कोणतेही नेतृत्व पुढे आलेले नाही. विधानसभा पातळीवरील विचार केला असता असे दिसून येते की, महिला नेतृत्वाला एकदा ही संधी दिलेली नाही. स्थानिक राजकारणात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या राजकारणात राजकारणाची पार्श्वभूमी असलेल्या घराण्यातून महिला नेतृत्व पुढे आलेले दिसून येते. त्यात विखे पाटील घराण्यातून तर जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदाची संधी मिळण्यापर्यंत महिला नेतृत्वाला संधी मिळालेली आहे. अर्थात अशा मोजक्याच महिलांचे नेतृत्व पुढे आले आहे. दुसरे असे की, महिला नेतृत्व हे घराणेशाहीच्या माध्यमातून पुढे आलेले आहे. उदा. कोल्हे घराणे हे कोपरगावच्या राजकारणात प्रभावी आहे.

स्थानिक राजकारणात देखील स्त्रिया या घराणेशाहीच्या सूत्रानुसार ज्या घराण्याकडे सत्ता आहे किंवा होती अशाच घराण्यातील पुढे आलेल्या आहेत. मात्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसी या समाजातील महिला ह्या सर्वसामान्य कुटुंबातील देखील जिल्हापरिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीतून पुढे आलेल्या दिसून येतात. ओबीसीतील वंजारी, धनगर आणि माळी समाजातील महिला पुढे आलेल्या आहेत तर अनुसूचित जातीतील नवबौध्द समाजातील महिला जास्त प्रमाणावर पुढे आलेल्या आहेत. अनुसूचित जमातीतील ठाकर, महादेव कोळी जमातीतील महिला पुढे आलेल्या आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसी या समाज घटकांतील ज्या जातींचे, जमातीची लोकसंख्या जास्त आहे त्याच जातींच्या महिला राजकारणात पुढे आलेल्या आहेत. इतर जाती, जमातीतील महिला पुढे

येताना दिसून येत नाही. उदा कैकाडी, कोल्हाटी, कंजारभाट, वडार इत्यादी. पण जिल्हा परिषदेच्या महत्त्वाच्या पदावर निवड होणे, अध्यक्ष पदावर निवड होणे अशा स्वरूपाचे नेतृत्व पुढे आले नाही. केवळ प्रतिनिधित्व करण्यापुरतेच मर्यादित नेतृत्व राहिलेले आहे.

स्थानिक राजकारणात पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या सदस्य पदावर महिला सक्रिय आहेत. महिलासाठी पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेसाठीचे राखीव असणारे वार्ड प्रत्येक निवडणुकीत बदलत असल्याने महिलेतून नेतृत्व पुढे येत नाही. राखीव असलेल्या मतदारसंघातून निवडून आल्यानंतर पुन्हा मतदारसंघ खुला झाला असता महिलाच निवडून येत नाही. परिणामी महिला नेतृत्व पुढे येण्यास मर्यादा येत आहेत.

## राजकीय नेतृत्वाचा जनाधार कमी होत आहे.

अहमदनगर जिल्हात राजकीय विकास तपासत असताना असे दिसून येते की, निवडणुकीच्या राजकारणात अधिक जनाधार असणारे नेतृत्व कमी प्रमाणात असताना दिसून येते. स्थानिक पातळीवर कार्यरत असणारे नेतृत्वाला स्थानिक पातळीवर जनाधार हा मोठा असताना दिसून येतो. पण विधानसभाचा विचार करता शिर्डी, संगमनेर, पारनेर, अहमदनगर, नेवासा, कोपरगाव इत्यादी मतदारसंघात ठोस असे नेतृत्व असताना दिसून येते. मात्र इतर मतदारसंघात नेतृत्वाला ठोस असे जनाधार आहे असे दिसून येत नाही. स्पर्धात्मक पातळीवर नेतृत्वामध्ये वर्चस्वासाठी चुरस निर्माण होत निवडणुका होतात. नेतृत्वाला कायम राजकारणात बळकटी देईल असा जनाधार इतर मतदारसंघात असताना दिसून येत नाही. प्रत्येक मतदारसंघात नेतृत्वाला जनाधार मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.

१९९९ साली काँग्रेस विभाजनापासून तर जिल्ह्याच्या राजकारणात एकही नेतृत्व असे सापडत नाही ज्यांना पुर्ण जिल्हाभर मान्यता आहे. प्रत्येक राजकीय नेतृत्व तालुका पातळीवर किंवा मतदारसंघ पातळीवर वर्चस्व राखून असताना दिसून येते. त्यातही एका मतदारसंघात वेगवेगळ्या पक्षांच्या नेतृत्वाकडून स्पर्धा असताना दिसून येते. अर्थात असे

दिसून येते की, एक मतदारसंघ आणि अनेक नेतृत्वामध्ये स्पर्धा आहे. नेतृत्वाचा प्रभाव हा कमी होत चाललेला आहे. नेतृत्वाचे कार्य आणि लोकसंपर्क, व्यवसाय, शिक्षण आणि स्थानिक पातळीपर्यंत संवाद कशा प्रकारे आहे यावर नेतृत्व विकासाची कसोटी असताना दिसून येते. स्थानिक पातळीपर्यत पोहचण्यात जिल्हा आणि तालुका पातळीवरील नेतृत्व कमी पडत असताना दिसून येते. स्थानिक पातळीवरील समस्या, प्रश्न सोडवणे यापेक्षा लोकांची वैयक्तिक कामे नेतृत्वाकडून किती होत आहेत यावर नेतृत्वाचा प्रभाव ठरत असताना पुढे येतो. स्थानिक प्रश्न सोडवणारे नेतृत्वच हे प्रभाव टिकून आहे. राजकीय विकासामध्ये सामुहिक हितसंबंधी प्रश्न सोडण्यापेक्षा वैयक्तिक आणि मतदारांच्या जास्तीत जास्त प्रश्न सोडवणारे नेतृत्व हे वर्चस्व टिकूवन आहे.

## औद्योगिक विकास आणि राजकीय प्रक्रिया

अहमदनगर जिल्ह्यामध्ये औद्योगिक प्रगती मोठ्या प्रमाणावर झालेली दिसून येते. ही औद्योगिक प्रगती एम.आय.डी.सी स्थापन करण्यातून होत असताना दिसून येते. अगदी अहमदनगर शहराच्या सर्व बाजूने अशा प्रकारचे प्रकल्प सुरू केलेल आहेत. हा नेतृत्वाच्या माध्यमातून औद्योगिक विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे औद्योगिक प्रकल्पासाठी राखीव केलेला परिसर हा शहरालगतचा ग्रामीण भाग असल्याने त्या परिसरातील नेतृत्वाकडून ठोस अशा स्वरूपात भूमिका घेत आर्थिक विकास झाल्याचे दिसून येत नाही. ग्रामीण भागातील राजकीय नेतृत्वाकडून औद्योगिक वसाहती ग्रामीण भागात कशा प्रकारे स्थापन करण्यात येतील अशा स्वरूपात अनुकूल भूमिका घेतल्या. उदा. विखे पाटील यांनी ग्रामीण भागात एमआयडीसी ही तालुका पातळीवर नेण्याचे भूमिका घेत प्रवरानगर सारखे औद्योगिक क्षेत्र विकास करत ग्रामीण भागात आर्थिक विकासाच्या नाड्या विकसित करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी लागणारे सर्व जबाबदारी ही नेतृत्वाकडून घेण्यात आली. विखे पाटील यांच्या प्रमाणेच बाळासाहेब थोरात यांनी संगमनेरच्या बाबतीत भूमिका घेतल्याचे दिसून येते.

ग्रामीण भागात औद्योगिक विकासाचे केंद्र निर्माण करण्यातून स्थानिकांना सुरूवातीच्या काळात संघटित आणि असंघटित क्षेत्रात कामे मिळाली. लोकांना त्याचा दीर्घकालीन आणि तात्पुरता फायदा झाल्याचे दिसून येते. पण नेतृत्वाकडून शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात औद्योगिकिकरणासाठी ठोस अशी भूमिका राहिलेली दिसून येते. त्यात विठ्ठलराव विखे पाटील, बाळासाहेब विखे पाटील, बाळासाहेब थोरात इत्यादी नेतृत्वाचे योगदान मोठे आहे. अहमदनगर शहराच्या बाबतीत असे दिसून येते की, महानगरपालिकेच्या हद्दीत येत असल्याने त्या त्या परिसरात महानगरपालिकेकडून विकास कामे हाती घेण्यात आलेली दिसून येतात. उदा. सावेडी, नागापूर या परिसरातील ग्रामपंचायती परिसरात आलेले औद्योगिक उद्योग आणि स्थानिक विकास कामे पाहिले असता सर्व बाजू पुढे येतात. या विकास प्रक्रियेत स्थानिक पातळीपासून जिल्हा पातळीपर्यंतच्या राजकीय नेतृत्वाने पुढाकार घेतलेला होता. उदा. अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील क्षेत्राचा विकास करण्यासाठी राजकीय नेतृत्वाकडून परिसर क्षेत्र निश्चित करत तो परिसर विकसित करण्यात आला. उदा. पाईपलाईन रोड या परिसरातील विकास हा स्थानिक राजकीय नेतृत्वाच्या पुढाकाराने करण्यात आलेला आहे. असे अनेक उदाहरणे सांगता येतील. औद्योगिक विकास करण्यासाठी राजकीय नेतृत्वाचा मोठा पुढाकार राहिलेला आहे.

२००० नंतर अहमदनगर शहर आणि शहराच्या जवळच्या परिसरात विविध तंत्रज्ञान आणि औद्योगिकीरणातील कंपन्या आल्या. त्यामुळे कंपन्यांच्या परिसराचा विकास होण्यास सुरूवात झाली. स्थानिक लोकांकडे तसेच कपंनीतील कामगारांकडे पैसा मोठ्या प्रमाणावर आला. त्यामुळे त्या परिसरातील बांधकाम आणि तत्सम क्षेत्राचा विकास होऊ लागला. सेवा क्षेत्र आणि तत्सम क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुतंवणूक होऊ लागली. ही गुतंवणूक थोपवणे शक्य नाही असे येथील राजकीय नेतृत्वाच्या लक्षात आल्यानंतर राजकीय नेतृत्वानेच या क्षेत्रात पुढाकार घेतलेला दिसून येतो. विशेषत: बांधकाम क्षेत्रात

स्थानिक आणि विधानसभा पातळीवरील राजकीय नेतृत्व सक्रियपणे कार्यरत असताना दिसून येते.

औद्योगिकिकरणाचा आणि राजकीय नेतृत्वाचा ग्रामीण भागातील कार्यवाह पाहिले असता असे दिसून येते की, अहमदनगर जिल्ह्यातील अगदी तालुका आणि गावपातळीवर देखील एम. आय.डी.सी स्थापन करण्यात आलेल्या आहेत. उदा. गावपातळीवर नेवासा, प्रवरानगर, शिर्डी, राहुरी इत्यादी तर प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एम.आय.डी.सी स्थापन करण्यात आलेली आहे. तालुक्याच्या ठिकाणी एम.आय.डी.सी स्थापन करून उद्योग सुरू करण्यात विधानसभा मतदारसंघातील राजकीय नेतृत्वाने पुढाकार घेतलेला दिसून येतो. उदा. नेवासा तालुक्यातील घोडेगाव परिसरात एम.आय. डी.सी आणणे आणि त्या एम.आय.डी.सी मध्ये उद्योग चालू करण्यासाठी यशवंतराव गडाख व इतर राजकीय नेतृत्वाने पुढाकार घेतलेला होता. उद्योग आणि उद्योगाद्वारे औद्योगिकरणाच्या माध्यमातून विकास करण्याचे सूत्र जनता दल, शेकाप, शेतकरी संघटना, डावे पक्ष, शिवसेना या पक्षांच्या नेतृत्वाला जमलेले नाही. या प्रकारचा विकास करण्यासाठी काँग्रेस, राष्ट्रवादी आणि भाजपा नेतृत्वाचा मोठा वाटा आहे. ग्रामीण भागात शरद पवार आणि इतर नेतृत्वाचा मोठा वाटा होता. शहराच्या भोवती भाजपाकडून पुढाकार घेतलेला दिसून येतो.

## अस्मितेच्या आणि संघटनात्मक राजकारणातून सामाजिक गतीशिलता.

१९९० नंतर जिल्ह्यामध्ये अनेक समाजाच्या संघटना, व्यावसायिक संघटना, सांस्कृतिक संघटना वाढलेल्या आहेत. प्रत्येक समाज आणि त्या समाजाच्या किमान चार संघटना असल्याचे दिसून येते. या सामाजिक संघटना अस्मिताच्या राजकारणात पुढाकार घेत आहेत. मराठा, ब्राम्हण, लिंगायत, मारवाडी, अमराठी, ओबीसी समाज, दलित, आदिवासी अशा विविध समाजाच्या विविध संघटना कार्यरत असताना दिसून येतात. त्यात एकाच समाजात सर्व पक्षांच्या संघटना असताना दिसून येतात. संघटनाकडून समाज संघटन करण्यासाठी, मेळावे घेणे, वधू–वर सुचक मेळावे घेणे, समाजाचे साहित्य

संम्मेलन घेणे, समाजाच्या प्रश्नांची मागणी लावून धरणे अशा प्रकारचे संघटन करण्यासाठी मार्ग या संघटनेकडून वापरण्यात येत आहे. उदा. धनगर समाजाच्या संघटनाकडून धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळण्यासाठी सक्रियपणे प्रचार करण्यात येत आहे. या मागणीसाठी संघटन करण्यात येत आहे. दुसरे उदाहरण म्हणजे अहमदनगर शहराच्या राजकारणावर प्रभाव टाकण्यासाठी ब्राम्हण व मारवाडी समाजाच्या संघटनाकडून समाजाचा मेळावा घेण्यात येतात. अशा प्रकारे विविध पातळीवर सामाजिक पातळीवर संघटन होताना दिसून येते. पण या संघटनांच्या माध्यमातून त्या समाजाला राजकारणात, अर्थकारण आणि समाजकारणात गतीशिलता येत असताना दिसून येते. दुसरे असे की, अस्मितेच्या भूमिका घेणारे नेतृत्व पुढे येत आहे. अस्मितेचे मुद्दे देखील राजकारणात मध्यवर्ती आणण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. मात्र आर्थिक मुद्दे घेऊन उभे राहिलेल्या नेतृत्वाच्या पुढे अस्मितेचे मुद्दे घेऊन उभे राहिलेले नेतृत्व दुय्यम ठरलेले आहेत.

## शहरी भागातील विकासाचा प्रश्न

अहमदनगर शहराच्या विस्ताराला कोणत्याही प्रकारे नियत्रंण ठेवलेले नाही. विस्तारामध्ये बिल्डर आणि राजकीय नेतृत्व यांचा वाटा मोठ्या प्रमाणावर आहे. स्वातंत्र्यापूर्वी शहरांच्या विस्तारास आळा घातला पाहिजे असे धनंजय गाडगीळ यांनी म्हटले होते. तसेच प्रशासकीय स.गो. बर्वे यांचे देखील असेच मत होते. (सकाळ, दि. ४ मे २०१५) जर स्वातंत्रपूर्व काळापासून नियोजन आणि आळा घालण्याचे धोरणाचा अवलंब केला असता तर आज शहराच्या पातळीवर ज्या विविध समस्या दिसून येतात त्या काही प्रमाणात कमी करता आल्या असत्या. पण या समस्या दूर करण्यात राजकीय नेतृत्व उत्साही दिसत नाही. शहरी विकासाचा आराखडा मांडताना असे दिसून येते की, राजकीय नेतृत्व, शहर नियोजन, आणि प्रशासन यांच्यात समन्वय नाही. हा समन्वय काही पातळीवर झाला तर काही समस्या सुटण्याची शक्यता आहे. पण यात समन्वयाची

भूमिका कोण घेणार हा प्रश्न आहे. कारण या तिन्ही बाजूची वाटचाल ही वेगवेगळ्या दिशांना असताना दिसून येते.

शहर नियोजनात शहरांतील जमिनीचा वापर, घरबांधणीचे सूत्र, आर्थिक उद्योग, रस्ते, सार्वजनिक वाहतूक, पाणी आणि मैलापाणी, घनकचरा, वीज, संपर्क साधने, माहिती सेवा, शिक्षण, आरोग्य सेवा, वाहतूक व नागरी सुविधांची सोडवणूक यासाठीची लागणारी दृष्टी ही राजकीय नेतृत्वाकडे नाही. या घटकांच्या आधारे काही प्रमाणात राजकारण उभा राहताना दिसून येते. काही प्रमाणात शहरी भागातील नागरिक जागृत आणि सुशिक्षित असल्याने भावनिक मुद्दापेक्षा भौतिक प्रश्न सोडवणूक करणारे प्रश्न मध्यवर्ती घेत राजकीय मत तयार करून राजकारणात उतरत असताना दिसून येते.

नियोजन आराखडे आणि नव्याने येत असलेले प्रकल्प यांचा ताळमेळ असताना दिसून येत नाही. शहराच्या विकास आराखड्यातील प्रकल्पाची नगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकात दखल घेणे बंधनकारक नाही. त्यामुळे पैशांची तरतूद होत नाही. तसेच कोणतेही नियोजीत वेळापत्रक राहत नाही. त्यामुळे शहर नियोजन आणि विकासाचे आराखडे हे कागदोपत्री असताना दिसून येतात.

लोकसभा निवडणुकीच्या राजकारणाचा प्रभाव हा विधानसभा निवडणुकीच्या राजकारणावर शहरी भागात पडत नाही. परंतु ग्रामीण भागात पडताना दिसून येतो. लोकसभा निवडणुकीत शहरी भागात १९९० ते १९९९ या काळात मराठा आणि उच्च जातींचा प्रभाव होता. पण मारवाडी आणि मराठा असे चित्र स्पर्धेचे असताना दिसून येते. ग्रामीण भागात मराठा समाजाचे लोकसभेसाठी वर्चस्व राहिले आहे. मुख्य पक्षांकडून मराठा समाजाच्या व्यक्तीला उमेदवारी दिलेली दिसून येते. भाजपाकडून जाणीवपुर्वक उच्च जातींना संधी देण्याचा प्रयत्न केला. त्यात मारवाडी व्यक्तीला निवडून देखील आणले.

## जिल्हा पातळीवरील नेतृत्वातील गटबाजी.

जिल्हा पातळीवरील नेतृत्वाचा प्रश्न पहाता असे दिसून येते की, अनेक नेतृत्व आहे त्यांना जिल्हा पातळीवरील राजकारणात स्थान असावे असे वाटत राहते. पण त्याचा प्रभाव हा फक्त मतदारसंघापुरता मर्यादित असताना दिसून येतो. त्यामुळे त्यांना जिल्ह्याच्या राजकारणात मध्यवर्ती न येता तालुक्याच्या/मतदारसंघाच्या राजकारणापुरते मर्यादित रहावे लागत आहे. पण मतदारसंघ पातळीवर अनेक राजकीय नेतृत्वामध्ये जातीवरून आणि पक्षीय पातळीवर स्थान मिळवण्यासाठी गटबाजी असताना दिसून येते. स्थानिक पातळीवरील नेतृत्वामध्ये एकाच मतदारसंघात अनेक गट असताना दिसून येत आहेत.

## राज्य पातळीवरील नेतृत्वाची स्पर्धा

राज्य पातळीवरील नेतृत्वामध्ये काँग्रेस पक्षाकडून बाळासाहेब थोरात आणि राधाकृष्ण विखे पाटील यांच्यात स्पर्धा होत आलेली आहे. राष्ट्रवादीमध्ये अनेक नेतृत्व आहे. मात्र स्पर्धा कशा प्रकारे आणि कशी करावयाची यामध्ये जिल्हा नेतृत्वामध्ये ताळमेळ नाही. कारण राष्ट्रवादी या पक्षामध्ये भरोशाचे एकही नेतृत्व असताना दिसून येत नाही. कधीही आणि केव्हाही नेतृत्व पक्ष सोडण्याच्या तयारीत असते. दुसरे असे की, निवडून येत राजकीय बळकटी देईल असे कोणतेही नेतृत्व नाही. केवळ सत्तेसाठी राष्ट्रवादी या पक्षामध्ये नेतृत्व असताना दिसून येते. शिवसेनेतून विजय औटी आणि अनिल राठोड यांची स्पर्धा राहिलेली आहे. मात्र ही स्पर्धा पेक्षा पक्षनिष्ठा आणि कार्य या आधारावर या दोन नेतृत्वाने जनाधार टिकवून ठेवलेला आहे. भाजपकडून राम शिंदे वळगता आता शिवाजीराव कर्डिले हे नेतृत्व सातत्याने राहिलेले आहे. मात्र शिवाजी कर्डिले हे राष्ट्रवादीतून भाजपमध्ये आलेले नेतृत्व असल्याने त्यांना पक्षामध्ये पाहिजे त्या प्रमाणात अजूनही महत्त्व मिळालेले नाही.

## अहमदनगर शहरावर नियत्रंण/वर्चस्व मिळवण्याची स्पर्धा

अहमदनगर शहरावर राजकीय वर्चस्व मिळवण्यासाठी राष्ट्रवादी, काँग्रेस आणि भाजपा अशा तीन पक्षात चांगलीच स्पर्धा असताना दिसून येते. राष्ट्रवादीकडून शरद पवार यांचा १९७० ते १९९९ या काळात प्रभाव होता, वर्चस्व होते. पण १९९९ च्या काँग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर काँग्रेस मतदार विभाजित झाल्यानंतर वर्चस्व कमी झालेले दिसून येते. पण त्याच वेळी अजित पवार यांनी राष्ट्रवादी अंतर्गत काही गट तयार करत अहमदनगर शहरावर वर्चस्व निर्माण करण्यासाठीचे प्रयत्न चालवलेले होते.

## सहकार क्षेत्राने घराणेशाही दिली

अहमदनगर जिल्हा राजकारणात सहकार क्षेत्राने घराणेशाही दिलेली आहे. कारण साखर कारखान्यांच्या माध्यमातून नेतृत्वाने मतदारसंघात प्रभाव क्षेत्र वाढण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांचा वापर केला. १९९० नंतर तर सहकारी साखर कारखाना हा राजकीय सत्ता आणि प्रभाव टिकवण्याचे एक साधन बनलेले दिसून येते. साखर कारखान्यावर मतदारसंघातील नाराज व्यक्तीला साखर कारखान्याचे चेअरमन पद देत खुष करण्याचे साधन पुढे आले. त्याचप्रमाणे साखर कारखान्यांच्या माध्यमातून साखर कारखान्यांवर असलेल्या शेअरधारकांना विश्वासात ठेवणे तसेच शेअरधारकावर प्रभाव निर्माण करणे राजकीय नेतृत्वाला शक्य झालेले आहे. साखर कारखान्यांमुळे मतदारसंघात सहकार शेअरधारक वाढलेले आहेत. त्याचप्रमाणे सहकाराच्या माध्यमातून शेतकरी आणि इतर संस्थात्मक बांधणी करण्यास साखर कारखान्यांवर वर्चस्व असलेल्या नेतृत्वाला शक्य होत गेले आहे. दुसरे असे की, सहकारी साखर कारखान्यांवर स्थापनेपासून सातत्याने एकाच घराण्याचे वर्चस्व राहिलेले आहे. त्यामुळे एकाच घरातील संचालक मंडळात वर्णी जास्त प्रमाणावर राहिलेली आहे. परिणामी साखर कारखान्यांच्या माध्यमातून वर्चस्व टिकवणे ज्या प्रमाणे शक्य झाले त्याच प्रमाणे मतदारसंघातील वर्चस्व टिकवणे देखील शक्य झाल्याचे पुढे येते. परिणामी साखर कारखान्यांने घराणेशाही टिकवण्यास पोषक वातावरण निर्माण केले.

## स्थानिक स्वराज्य संस्थेने घराणेशाही पक्की केली

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत ओबीसीसाठी आरक्षण लागू झाल्याने जिल्ह्यातील घराणेशाही पक्की होण्यास मदत झालेली दिसून येते. कारण आरक्षण लागू झाले मात्र प्रत्येक निवडणुकीला आरक्षण फिरते ठेवल्याने एकाच मतदारसंघातून एकच समाजाचे किंवा एकच उमेदवार निवडून येऊ शकले नाही. परिणामी उमेदवारी मिळवणे आणि निवडून येण्यासाठी स्थानिक नेतृत्वाला तालुका पातळीवरील किंवा जिल्हा पातळीवरील नेतृत्वाच्या प्रभावाखाली राहवे लागलेले आहे. परिणामी असे म्हणता येईल की, स्थानिक पातळीवर राजकीय आरक्षण असल्याने घराणेशाहीला कमी प्रमाणात धक्के बसलेले आहेत.

## सहकार क्षेत्र आणि राजकीय नेतृत्व विकास

सहकार क्षेत्रातून अनेक राजकीय नेतृत्व अहमदनगर जिल्हा राजकारणात पुढे आलेल दिसून येते. त्यात प्रामुख्याने विखे पाटील घराण्यातील विठ्ठलराव विखे पाटील, बाळासाहेब विखे पाटील, राधाकृष्ण विखे पाटील, कोपरगाव मतदारसंघातील कोल्हे घराणे, काळे घराणे, राहुरी मतदारसंघातून तनपुरे घराणे, श्रीरामपूर मतदारसंघातून सासणे घराणे, शेवगाव मधून घुले घराणे, नेवासा तालुक्यातील गडाख घराणे, श्रीगोंदा तालुक्यातून नागवडे आणि पाचपुते घराणे अशी काही निवडक राजकीय घराण्यातील नेतृत्व सहकार साखर कारखान्यांच्या माध्यमातून पुढे आलेले आहेत. अहमदनगर जिल्हा राजकारणात फक्त जामखेड मतदारसंघ वगळता सर्वच्या सर्व तालुक्यातून सहकारी साखर कारखाने आणि घराणेशाहीचे नेतृत्व हे सहकार क्षेत्राच्या माध्यमातून पुढे आलेले आहे. त्यामुळे सहकार क्षेत्राने अहमदनगर जिल्ह्याला नेतृत्वाची मोठी फळी तयार करून दिलेली आहे. त्याच प्रमाणे घराणेशाही देखील दिलेली आहे. ही राजकीय विकास घडून येण्यास मर्यादा आहे.

## मतदारसंघनिहाय पक्षीय नेतृत्व स्पर्धा भिन्न

अहमदनगर जिल्हा हा सहकार क्षेत्राचा विकास घडून येणारा जिल्हा म्हणून ज्या प्रकारे पाहिले जाते त्याचप्रमाणे नेतृत्वामध्ये राजकीय सत्ता आणि आर्थिक विकासाची सत्ता हस्तगत करण्यासाठी सातत्याने स्पर्धा दिसून येते. अहमदनगर जिल्हा राजकारणात सातत्याने प्रत्येक मतदारासंघात दोन नेतृत्वामध्ये स्पर्धा असताना दिसून येते. १९९० नंतर हळूहळू सहकार क्षेत्रापेक्षा इतर सहकार क्षेत्र पुढे येत असल्याने बिगर सहकार क्षेत्रातील नेतृत्व देखील पुढे येत सहकार क्षेत्रातील नेतृत्वाला स्पर्धा करत असताना दिसून येते. मात्र सहकार क्षेत्रातील नेतृत्व सातत्याने यशस्वी होत आहे. बिगर सहकार क्षेत्रातील नेतृत्व देखील यशस्वी होण्याची उदाहरणे जिल्हा राजकारणात असताना दिसून येतात. उदा. कर्जत जामखेड मतदारसंघातून राम शिंदे यांचे नेतृत्व बिगर राजकीय नेतृत्वामधून पुढे आलेले आहे. तसेच अहमदनगर शहरातून अनिल राठोड, शिवाजी कर्डिले, विजय औटी यांचे नेतृत्व बिगर सहकार क्षेत्रातून पुढे आलेले आहेत. मात्र नेतृत्व पुढे आल्यानंतर यातील काही नेतृत्वाने साखर कारखान्यांऐवजी इतर सहकार क्षेत्राचा मार्ग कोणत्यान कोणत्या माध्यमातून स्वीकारलेला आहे.

## जात राजकारण आणि राजकीय नेतृत्व विकास

## मराठा नेतृत्वाचा विकास

स्वातंत्र्येतर अहमदनगर जिल्हा राजकारणाचा विचार करता प्रंचड प्रमाणात मराठा समाजाच्या नेतृत्वाचे वर्चस्व राहिलेले आहे. प्रत्येक मतदारसंघात मराठा नेतृत्वाचे वर्चस्व राहिलेले आहे. केवळ राखीव जागा असलेल्या मतदारसंघातून अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीचे नेतृत्व पुढे आले मात्र हे नेतृत्व देखील मराठा समाज नेतृत्वाचे आश्रीत राहिलेले आहे. दक्षिण अहमदनगर मतदारसंघातून अनिल राठोड, आरिस एम आय. कुमार सप्तर्षी, निसाल एस. व्ही हे बिगर मराठा नेतृत्व पुढे आले. तर शेवगाव मतदारसंघातून ढाकणे टि. पी, पाथर्डी मतदारसंघातून ढाकणे बबनराव, कर्जत–जामखेड मधून राम शिंदे, श्रीरामपूर मतदारसंघातून जयंत सासणे हे बिगर

ओबीसी नेतृत्व पुढे आले. मात्र याच मतदारसंघातून इतर सर्व मराठा नेतृत्व पुढे आलेले आहे. उत्तर अहमदनगर, राहुरी, श्रीगोंदा, पारनेर, कोपरगाव, शिर्डी, संगमनेर या मतदारसंघातून पुर्णपणे मराठा नेतृत्वच पुढे आले. या शिवाय लोकसभेच्या कोपरगाव मतदारसंघ सर्वच्या सर्व मराठा आणि अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून दिलीप गांधी (मारवाडी) यांचा अपवाद वगळता मराठाच नेतृत्व राहिलेले आहे. जिल्हा राजकारणावर मराठा नेतृत्वाचे वर्चस्व हे मराठा समाजाकडे असलेले जमिनमालकी, लोकसंख्या आणि सहकार क्षेत्राची संस्थात्मक बांधणीच्या आधारे राहिलेले आहे.

## दलित नेतृत्वाचा विकास

दलित नेतृत्व हे जिल्हा राजकारणात स्वतंत्ररित्या पुढे आले नाही. पक्षीय आणि मतदारसंघ पातळीवरील प्रस्थापित जात नेतृत्वाच्या आश्रयाने नेतृत्व पुढे आलेले आहे. जिल्हा राजकारणात खुल्या मतदारसंघातून एकही दलित नेतृत्व निवडून आले नाही. सर्व नेतृत्व हे अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या मतदारसंघातून निवडून आले आहे. १६६२ ते १९७२ या काळात अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा आणि श्रीरामपूर हे दोन मतदारसंघ राखीव होते. तर १९७८ ते २००४ या काळात कर्जत–जामखेड हे मतदारसंघ राखीव होते. तर २००९ च्या विधानसभा निवडणुकीत श्रीरामपूर या मतदारसंघातून दलित नेतृत्व पुढे आले आहे. श्रीगोंदा, कर्जत, श्रीरामपूर हे मतदारसंघ अनुसूचित जातींसाठी राखीव असल्याने या मतदारदसंघातून अनुसूचित जातींचे नेतृत्व पुढे आले. पक्षीय पातळीवर विचार करता काँग्रेस, रिपाई आणि भाजपाकडून दलित नेतृत्व पुढे आलेले आहे.

## आदिवासी नेतृत्वाचा विकास

आदिवासी नेतृत्व हे केवळ नगर अकोले या मतदारसंघातून पुढे आले. त्यात ही स्थानिक नेतृत्व वगळता विधानसभा पातळीचा विचार करता केवळ महादेव कोळी या आदिवासी समाजाच्या नेतृत्वाला आतापर्यंत संधी मिळत आलेली आहे. नगर–अकोले हा खुला असताना या मतदारसंघातून मराठा नेतृत्व पुढे आले होते. मात्र

मतदारसंघ राखीव झाल्यानंतर आदिवासी नेतृत्व पुढे आले. दुसरे असे की, या मतदारसंघातून घराणेशाही पुढे आली. मधुकर पिचड यांची या मतदारसंघावर वर्चस्व निर्माण झाले. परिणामी आदिवासी नेतृत्वामधील इतर नेतृत्वाला पुढे येता आले नाही. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून मधुकर पिचड यांच्या प्रभावातून एकवेळेस आदिवासी समाजाचे भांगरे अशोक यांचे नेतृत्व पुढे आले. मात्र त्यांना विधानसभेच्या पातळीवर नेतृत्व विकसित करता आले नाही. ही आदिवासी नेतृत्वाची मर्यादा देखील राहिलेली आहे.

## ओबीसी नेतृत्वाचा विकास

ओबीसी नेतृत्वामध्ये धनगर आणि वंजारी या दोन समाजाचे नेतृत्व पुढे आलेले आहे. विधानसभेसाठी आणि लोकसभेसाठी माळी समाजाच्या नेतृत्वाला स्थान मिळालेले दिसून येत नाही. विधानसभेसाठी धनगर आणि वंजारी समाजाच्या नेतृत्वाला स्थान मिळालेले आहे. वंजारी समाजाचे नेतृत्व हे शेवगाव आणि पाथर्डी या दोन मतदारसंघातून पुढे आले. तर धनगर समाजाचे नेतृत्व कर्जत–जामखेड या मतदारसंघातून पुढे आले. राजकीय पक्षाचा विचार करता असे दिसून येते की, वंजारी समाजाला प्रथम काँग्रेस, सीपीआय या पक्षाने संधी दिली. तर जसे जसे काँग्रेसमधून मराठा समाजाचे नेतृत्व पाथर्डी आणि शेवगाव या मतदारसंघातून पुढे येत गेले. तसे तसे वंजारी समाजाचे नेतृत्व हे जनता दल या पक्षाकडून राजकारणात पुढे आले. मात्र जिल्हा राजकारणात जनता दलाचा प्रभाव कमी होत असताना वंजारी समाजाचे नेतृत्व हे भाजपाकडे वळल्याचे दिसून येते. तर धनगर समाजाचे नेतृत्व पुढे येण्यासाठी १९९०च्या नंतर सुरूवात झाल्याचे दिसून येते. त्यात कर्जत–जामखेड मतदारसंघ खुला झाल्यानंतर नेतृत्व पुढे आले. राम शिंदे यांचे नेतृत्व हे पारंपारिक वारसा आणि गोपिनाथ मुंडे यांच्या आश्रयाने पुढे आलेले आहे.

## मुस्लिम नेतृत्वाचा विकास

अहमदनगर जिल्हा राजकारणात मुस्लिम समाजाचे नेतृत्व अतिशय अत्यल्प प्रमाणात असताना दिसून येते. अहमदनगर शहराच्या राजकारणात मुस्लिम नेतृत्व पुढे आलेले आहे. त्यात १९८० साली काँग्रेस पक्षाने अरिस एम. आय यांना उमेदवारी देत निवडून आणले होते. त्यानंतर १९८५ साली देखील काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी देण्यात आली होती. मात्र त्यांना शरद पवार यांच्या समाजवादी काँग्रेस पक्षाचे दादासाहेब कळमकर यांनी स्पर्धा करत दुसऱ्या वेळेस नेतृत्व करण्याची संधी मिळू दिली नाही. अरिस एम. आय यांचा एकमेव अपवाद वगळता मुस्लिम नेतृत्वाला पक्षीय कार्यकारणी आणि स्थानिक राजकारणात देखील फारसे स्थान मिळू दिलेले नाही.

**सारांश रूपाने** असे दिसून येते की, अहमदनगर जिल्ह्यातील शहरी भागातील राजकीय प्रक्रिया घडून येण्याचे घटक आणि शहरी भागातील राजकीय प्रक्रिया घडून येणारे घटक वेगवेगळे असताना दिसून येतात. काही घटक समान असताना दिसून येतात. ग्रामीण भागात सहकारी साखर कारखाने, जिल्हा मध्यवर्ती बँक, तालुका सहकारी कृषि उत्पन्न बाजार समिती, विविध कार्यकारी सोसायट्या, स्थानिक स्वराज्य संस्था अशा संस्थात्मक घटक आहेत. त्याच प्रमाणे सांस्कृतिक मंडळे, सामाजिक संघटना, गाव मंडळे, तंटामुक्ती संस्था, विविध बचत गट अशा विविध घटकांच्या प्रभावातून राजकीय प्रक्रिया घडून येते. कोणत्याही एकाच घटकांच्या माध्यमातून राजकीय गतीशिलता येत नाही. शहरी भागाचा राजकीय प्रक्रियेची गतिशिलता ही महानगरपालिका, राजकीय पक्ष, व्यापारी संस्था, सहकारी छोट्या—छोट्या संस्था, सहकारी बँकां, विविध कार्यकारी सोसायट्या, विविध आर्थिक बचत गट, महिला बचत गट, विविध सेवाभावी सहकारी संस्था, औद्योगिकीकरण, रहिवासी सोसायट्या, सामाजिक संघटना, विविध पातळीवर कार्यरत असणारे मंडळे, मित्रमंडळे, सेवा क्षेत्रातील विविध संघटना इ. घटकांच्या माध्यमातून राजकीय प्रक्रियेची गतीशीलता येताना दिसून येते. या सर्वामध्ये राजकीय नेतृत्वाचा दृष्टिकोन आणि भूमिका महत्त्वपुर्ण राहात आलेली आहे. अर्थात जिल्ह्याच्या

सामाजिक आणि आर्थिक विकासात नेतृत्वाचे राजकारण हे महत्त्वपुर्ण व मध्यवर्ती राहिलेले आहे.

# संदर्भ सुची

## मराठी संदर्भ


- अकोलकर प्रकाश, १९९८, जय महाराष्ट्र, प्रभात प्रकाशन, मुंबई
- अहमदगनगर एज्युकेशन सोसायटी, २०१५, स्मारक ग्रंथ २ : शतकोत्तर रौप्य महोत्सव, अहमदगनगर एज्युकेशन सोसायटी प्रकाशन, अहमदनगर
- अनुभव, १९९५, राजकीय पक्षः प्रश्न विश्वासार्हतेचा, फेब्रुवारी.(मासिक)
- अनुभव, १९९५, निवडणूक निकालांचे निष्कर्ष, एप्रिल—मे. (मासिक)
- अनुभव १९९७, महाराष्ट्रातील निकालामागचं वास्तव, मे—जुलै (मासिक)
- अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २००९—२०१० व २०१०—२०११, मुंबई.
- अनुभव, १९९७, मराठी नेतृत्वाचा चेहरा, फेब्रवारी (मासिक)
- आसोपा योगेश, (संपा.), २००८, संवाद, यश प्रकाशन, संगमनेर
- आसोपा योगेश, (संपा.), २०१४, आशा महाराष्ट्राची : महाराष्ट्राचे कणखर नेतृत्व मा. ना. बाळासाहेब थोरात, यश प्रकाशन, संगमनेर
- आसोपा योगेश (संपा.), २०१२, संवाद : मा. ना. बाळासाहेब थोरात — गौरव विशेषांक, यश प्रकाशन, संगमनेर
- कालेलकर गोविंद., १९२८, *मुंबई इलाख्यातील जाती,* श्री सयाजी साहित्यमाला, पुष्प १३८ वे, मुंबई
- कुलकर्णी सुहास (संपा), २००१, विकास सुर्य : कर्मवीर शंकरराव काळे जीवन व कार्य, कर्मवीर शंकरराव काळे मित्रमंडळ प्रकाशन, कोपरगाव

- कोल्हे शंकरराव आणि सुधाकर जोशी, २०१२, सत्यग्रही शेतकरी, सजीवणी सहकारी साखर कारखाना, लि. सहजानंदनगर, कोपरगाव
- काळे अशोक, (वर्ष नाही) विकास सुर्य : कर्मवीर शंकरराव काळे जीवन व कार्य, अशोक काळे प्रकाशन, कोपरगाव
- काळे भानू , २०१४, अजुनी चालतोची वाट...रावसाहेब शिंदे : जीवन आणि कार्य, उर्मी प्रकाशन, पुणे
- काळे शंकरराव, २००८, समाज अभियंता, पद्मगंधा प्रकाशन, पुणे
- कांबळे उत्तम, २००८, ओबीसीचे राजकारण, लोकवाङ्मय गृह, मुबंई
- कुंभार नागोराव (संपा.), १९९१, *मंडल आयोग : शोध आणि बोध*, प्रबोधन प्रकाशन, लातूर,
- कुलकर्णी सुहास, १९९७, महाराष्ट्रात भाजपाची खरोखर ताकद किती? लोकसत्ता दिवाळी अंक.
- कुलकर्णी सुहास, १९९७ (मार्च १६), स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका, लोकसत्ता, पुणे
- कुलकर्णी सुहास, १९९९, भाजपाचे मित्रपक्ष वा भाजपाचा विस्तार, समाज प्रबोधन पत्रिका डिसेंबर—
- कृषि उत्पन्न बाजार समिती, सयुक्त वार्षिक अहवाल २०१०—११ व २०११—१२, अहमदनगर कृषि उत्पन्न बाजार समिती,
- गवडी पुंडलिक, २००४, लाल सुर्य, अमोल प्रकाशन, पुणे
- गडाख यशवंतराव, २००३, अर्धविराम, ऋतुरंग प्रकाशन, मुंबई
- गडाख यशवंतराव, २०१२, अंतर्वेध, ऋतुरंग प्रकाशन, मुंबई
- गडाख यशवंतराव, २०११, सहवास, ऋतुरंग प्रकाशन, मुंबई

- गायकवाड राजेश (संपा.) २००८, सहकार रत्न : मा. खा. काळासाहेब विखे पाटील –गौरवग्रंथ, श्री. शालिवान दादा पा.घोलप प्रकाशक, पाथरे बु.
- गेल ऑमव्हेट, १९९५, वसाहतीक समाजातील सांस्कृतिक बंड, सुगावा प्रकाशन, पुणे
- घोटाळे विवेक , २००५, *महाराष्ट्रातील आघाड्याचे राजकारण (१९८९ ते २००४)* , पुणे, एम.फिल. शोध प्रबंध, राज्यशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे,
- चव्हाण वैशाली, २००७, पश्चिम महाराष्ट्रातील महापालिकांचे राजकारण, सुहास पळशीकर आणि नितिन बिरमल संपादित, महाराष्ट्राचे राजकारण : राजकीय प्रक्रियेचा स्थानिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे
- जावडेकर शं. द. २००१, (पुर्नमुद्रण), आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
- जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन– १९९८ – ९९ दृष्टीक्षेपात अहमदनगर जिल्हा
- टेमकर राजधर, २०११, पार्थभूमीभूषण दादा पाटील राजळे, अमेय प्रकाशन, पुणे
- तागड बबनराव, २०१४, गोविंदराव आदिक : जीवन प्रवास... ,हर्षद प्रकाशक, पुणे
- थिटे दिनेश, १९९६, महाराष्ट्र विधानसभा १९७८ ते १९९५ एक अभ्यास : सत्ता व जात यांचा परस्परसंबंध, एम. फिल, प्रबंध, राज्यशास्त्र विभाग पुणे, पुणे विद्यापीठ, अप्रकाशित, पुणे.
- थिटे दिनेश, २००३(२७ जुलै), केवळ बेरजेचे काय होणार? लोकसत्ता, पुणे
- दिघे नवनाथ (संपा.), वर्ष नाही, विजयीसत्ता जय हो : ना. राधाकृष्ण विखे पाटील ५१ वा वाढदिवस, ममता ऑफसेट प्रकाशन, शिर्डी

- थोरात भाऊसाहेब, १९९९, अमृतगाथा, अमेय प्रकाशन, पुणे
- थोरात भाऊसाहेब, १९९९, अमृतमंथन, अमेय प्रकाशन, पुणे
- थोरात भाऊसाहेब संतुजी, २००६, संघर्षयात्रा : आजादी के पथ पर, अमेय प्रकाशन, पुणे.
- देशपांडे राजेश्वरी, २००२, भांडवली विकास आणि जातीप्रश्न, समाज प्रबोधन संस्था (संपा), *जाती संस्थेचे बदलते आधार*, समाज प्रबोधन संस्था, पुणे.
- देशमुख गणेश, १९९८, ग्रामवेद : महाराष्ट्रीय ग्राम जीवनाचे सर्वांगीण चिंतन – के. बी. रोहमारे स्मृती–ग्रंथ, के. बी. रोहमारे स्मृती–ग्रंथ प्रकाशन समिती, अहमदनगर
- पवार प्रकाश, २००४ (ऑक्टोबर – डिसेंबर), जात संघटना: महाराष्ट्राचे राजकारण, समाज प्रबोधन पत्रिका, वर्ष ४२.
- पवार मखराम, १९९३, बहुजन महासंघ कशासाठी – कोणासाठी?, बहुजन प्रकाशन, मुंबई.
- पठाडे संजय, २०११, स्वतंत्र्याची दुसरी लढाई, भष्टाचार विरोधी जन आंदोलन (न्यास), अहमदनगर
- प्रधान हर्षल (संपा), वर्ष नाही, कृतार्थ : रामराव आदिक, श्री गोविंदराव आदिक प्रकाशक, श्रीरामपूर
- पळशीकर सुहास, १९९६, शिवसेना : निमफॅसिस्ट मोहिणीविद्येचा प्रयोग, बाबसाहेब आंबेडकर अकादमी, सातारा
- पळशीकर सुहास आणि नितिन बिरमल (संपा), २००७, महाराष्ट्राचे राजकारण : राजकीय प्रक्रियेचे समकालीन संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे

- पळशीकर सुहास आणि सुहास कुलकर्णी (संपा) २००७, महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष : राजकीय पक्षांची वाटचाल, समकालीन प्रकाशन, पुणे
- पळशीकर सुहास, २००२, प्रादेशिकता, जात व भारतीय राजकारण, प्रकाश बाळ व किशोर बेडकीहाळ (सपा.), *भारतीय राजकीय व्यवस्था,* अबेंडकर अकादमी, सातारा,
- पळशीकर सुहास, २००४, समकालीन भारतीय राजकारण : काँग्रेस वर्चस्व ते हिंदू जमातवाद, प्रतिमा प्रकाशन, पुणे
- पळशीकर सुहास, २००४, *समकालीन भारतीय राजकारण: काँग्रेस वर्चस्व ते हिंदु जमातवाद,* प्रतिमा प्रकाशन, पुणे
- पळशीकर सुहास, २००४, *जात व महाराष्ट्रातील सत्ताकरण,* सुगावा प्रकाशन, पुणे
- पळशीकर सुहास, २००७ काँग्रेस वर्चस्वाची जडण–घडण आणि पडझड, सुहास पळशीकर आणि नितिन बिरमल (संपा) महाराष्ट्राचे राजकारण : राजकीय प्रक्रियेचे समकालीन संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे
- पळशीकर सुहास, २००९, भारतीय राजकारणाचा ताळेबंद, मराठी वाचनसाहित्य मालिका क्रं. १, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे
- पाटील जर्नादन, श्रावण देवरे व माधवराव वाघ (संपा) १९९०, मंडल आयोगः ओबीसीच्या लोकशाही मुक्तीचा जाहीरनामा, प्रकाशक जर्नादन पाटील, पुणे
- फडके य. दि. १९८२, राजकारणाचे बदलते रंगरूप, श्री. ग. मुणगेकर, (संपा) परिवर्तनाचे प्रवाहः महाराष्ट्र १९३२ ते १९८१, कॉन्टिनेन्टल, मुंबई
- फडके. य. दि. १९८९, विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १, सासवड आश्रम ट्रस्ट, पुणे

- फडके. य. दि. १९८९, विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड २, श्रीविद्या प्रकाशन, पुणे
- फडके. य. दि. १९९१, विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड ३, श्रीविद्या प्रकाशन, पुणे
- फडके. य. दि. १९९३, विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड ४, श्रीविद्या प्रकाशन, पुणे
- फडके. य. दि. १९९९, विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड ५, श्रीविद्या प्रकाशन, पुणे
- बिरमल नितिन, १९९६, महाराष्ट्रातील जमीन मालकी, जात आणि राजकीय सत्ता, पीएच.डी प्रबंध, राज्यशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे
- बिरमल नितिन, १९९९, प्रबल जातीचा प्रादेशिक पक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस, समाज प्रबोधन प्रत्रिका, ऑक्टो–डिसेंबर.
- बिलमल नितिन, १९९९, प्रबळ जातीचा प्रादेशिक पक्ष: राष्ट्रवादी काँग्रेस, *समाज प्रबोधन प्रत्रिका,* ऑक्टो– डिसेंबर.
- भगत गणेश, २०१३, एक विचार मांडव : कर्मयोगी, गणराज प्रकाशन, अहमदनगर
- भगत गणेश लक्ष्मण, २०१४, वाटचाल मराठा विद्या प्रसारकची, विद्या प्रसारक समाज, अहमदनगर
- भावे सविता, १९९४, कृषिक्रांतीचे सेनानी: आण्णासाहेब शिंदे, कल्पना प्रकाशन, पुणे
- भोळे भा.ल. १९८८, महाराष्ट्रातील डावी चळवळ, पन्नालाल सुराणा आणि किशोळ बेडकीहाळ (संपा), आजचा महाराष्ट्र, श्रीविद्या, पुणे

- भोळे भा.ल. व किशोळ बेडकीहाळ (संपा.),२००३, *बदलता महाराष्ट्र,* डॉ. बाबाारहेब अंबेडकर अकादमी, सातारा
- महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, २००४, महाराष्ट्र: राज्य निवडणूक अयोग, अहवाल १९९२ ते २००७, महाराष्ट्र शासन प्रकाशन, मुंबई
- महाराष्ट्र राज्य, २०१०, महाराष्ट्राची आर्थिक पाहाणी, २००९—२०१०, मुंबई.
- मेयर एड्रियन, १९७२, जिल्हा पातळीवरील राजकारणात जातीचा प्रभाव, समाज प्रबोधन पत्रिका, जानेवारी—फेब्रुवारी १९७२
- म्हस्के दीपलक्ष्मी (संपा), रावसाहेब: आमदार गणपतराव राजाराम उर्फ रावसाहेब म्हस्के, रामचंद्र गणपत म्हस्के प्रकाशन, तिसगाव
- मंचरकर रत्नाकर बापूराव, २००८, ध्येयासक्त : ॲड. रावसाहेब शिंदे याची जीवनगाथा, अमेय प्रकाशन, पुणे
- राजळे राजीव, २००७, विधानसभेतील लक्षवेधी भाषणे, राजीव राजळे प्रकाशन, अहमदनगर
- लेले जयंत, १९९०, विधानसभा निवडणुक आणि मराठ्यांचे धुरिणत्व, समाज प्रबोधन प्रत्रिका, एप्रिल — जून.
- वाघ रामनाथ (संपा), २००८, युगप्रवर्तक : यशवंतराव, यशवंतराव चव्हाण व्यासपीठ, अहमदनगर
- वरडुळे महादेव, १९९०, मा.ए.बु तथा आबासाहेब निंबाळकर, गतिमान प्रकाशन, पुणे
- व्होरा राजेंद्र व सुहास पळशीकर, १९९६, *महाराष्ट्रातील सत्तांतर,* ग्रंथाली, मुंबई,
- व्होरा राजेंद्र, १९९६, सत्तेचे बदलते आधार, अनुभव, पुणे

- व्होरा राजेंद्र, २०००, आधुनिकता आणि परंपरा : विसाव्या शतकातील महाराष्ट्र, य. दि. फडके गौरवग्रंथ, प्रतिमा प्रकाशन, पुणे
- शिरापूरकर महेश, २००५, महाराष्ट्रातील निवडणूक निकालांचे विश्लेषण (१९८९ ते २०००) पुणे, एम.फिल लघुशोधप्रबंध, राज्यशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.
- शेवाळे विठ्ठल, सुरेश परचुरे आणि दत्ता काळेबेरे, २०१४, संघर्ष : कॉ. दत्ता देशमुख –गौरव ग्रंथ, एम.एस.इ.बी.वर्कर्स फेडरेशन, कोल्हापूर
- शेवाळे वि. म, माधव चव्हाण आणि गलाब देशमुख (संपा), १९९६, मी दत्तूचा ‘‘ दत्ता’’ झालो त्याची गोष्ट, कॉ. दता देशमुख पुरोगामी विचार मंच, कोल्हापूर
- समाज प्रबोधन संस्था, २००२, जातिसंस्थेचे बदलते आधार, पुणे, समाज प्रबोधन संस्था.
- सरदार ग. बा. २००६, (१९५०), *संत वाङःमयाची सामाजिक फलश्रुती*, लोक वाङःमयगृह, मुंबई
- सावंत दशरथ व रमेशचंद्र खांडगे (संपा.), २००१, गरूडझेप, मा. नामदार मधुकररावजी पिचड पष्ट्यब्दीपुर्ती गौरव समिती प्रकाशन, अकोले.
- हजारे अण्णा, २०११, माझे गाव माझे तीर्थ, स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी, राळेगणसिध्दी


# English References


- Baviskar B. S., The Politics of Development: Sugar Co-operatives in Rural Maharashtra, OUP] Bombay
- Beleille Andre, 1992, "Society and Politics in India" Essays in Comparative Perspectives", OUP. New Delhi

- Carras Mary C. 1972, The Dynamics of Indian Political Factions: A Study of District Councils in the State of Maharashtra, CUP, London
- Carter Anthaony T, 1975, Elite Politics in Rural Indian : Political Stratification and Political Alliance in Western Maharashtra, VIkas Publishing House, Delhi
- Chandra, Kanchan, 2005. *Why Ethnic parties succeed: Patronage and Ethnic headcounts in India*, CUP, Cambridge
- Deshpande Rajeshwari, 2004, *Reservations to Kunbi Marathas: Backward Journey of a Caste,* Economic and Political Weekly, Vol 39, No. 14and 15, April3-10,
- Deshpande Rajeshwari, 2006, *Maharashtra: Politics of Anxieties Frustrations and Outrage*, EPW, 8th April.
- Deshpande Rajeshwari, 2010, Caste Association in the Post- Mandal Era: Notes from Maharashtra, Department of Politics and Public Administration. CAS Occasional Series: No-2. Pune
- Enthoven R.E. 1922, "Tribes and Castes of Bombay". Volume-I, Government Central Press, Bombay
- Frankel Francine and M.S.A.Rao, 189-1990, Dominance and State Power in Modern India, VOl. I&II, OUP, Delhi,
- Frankel Francine and M.S.A.Rao, 189-1990, *Dominance and State Power in Modern India*, VOl. I&II, OUP, Delhi
- Government of Maharashtra, 1976, Ahmednagar District : Gazetteer Department, Gazetteer Government of Maharashtra Publication, Bombay
- Gupta, Jaymala, Diddee Smita (2000), Pune : Queen of the Deccan, Elephant Design Pvt. Ltd., Pune
- Guru Gopal (1999), Sugar Workers' Radicalism in Maharashtra, Occasional Paper Series I No.2, Department of Politics and Public Administration, University of Pune, Pune.
- Jaffrelot , C, 2003, India's Silent Revolution : the Rise of Low Caste in North Indian Politics. Permanent Black, Delhi
- Jagzap Harsh L.,1997, Land Caste and Political Power in Maharashtra: A Case Study of Jalgon and Ahamadnagar District., Ph.D. Thesis, Department of Politics, University of Pune, Pune,

- Joshi Ram, 1968, ‘ Maharashtra’ in Myron Weiner (Ed), State Politics In India, Princeton University Press, New Jersey
- Joshi,Sudhakar (1993), “Teeming with Industries of All Hues”, Fortune India
- Kamble Bal, 1996, Political Socialization of politically Marginalized Group: Astudy of Beedi Workers in Ahmednagar District, Unpublished Ph.D Thesis, SPPU, Pune
- Kamble Bal, 2003, Political, Social and Economical Study Of Marwadi Community in Ahmednagar City, Unpublished UGC Minor Research Project, WRO, Pune
- Kamble Bal, 2008, Political Study of Sindhi Community in Ahmednagar City, Unpublished UGC Minor Research Project, WRO, Pune
- Kothari, Rajni, 1970. Caste in Indian Politics. Orient Longman, Hyderabad
- Kumar Ashutosh, 2009, Rethinking State Politics in India: Regions within Regions, EPW, VOL XLIV No-19, May 9th 2009
- Lele Jayant, 1982, *Elite Pluralism and Class Rule : Political Development in Maharashtra*, Popular Prakashan, Bombay
- Lele Jayant, 1990, Caste Class and Dominance : Political Mobilization in Maharashtra, In Francine Frankel and M.N. S.Rao (eds). *Dominance and State Power in Modern India*, Vol.II, OUP, Delhi
- Omvedt Gail (ed), 1992, Land *Caste and Politics in India States*, Delhi, Teaching Politics, Department of Political Science, University of Delhi, Delhi
- Pai Sudha, 2000, State Politics : New Dimensions , Shipra Publication, New Delhi
- Palshikar Suhas and Nitin Birmal (2003), Maharashtra: Fragmented Marathas Retain Power, in Paul Wallace and Ramashray Roy (ed.), India’s 1999 Elections and Twentieth Century Politics, Sage Publications. New Delhi
- Palshikar Suhas and Nitin Birmal (2004), Maharashtra: Towards a New party System, Economic and Political Weekly, Dec 18.

- Palshikar Suhas and Rajeshwari Deshpande (2003), Maharashtra: Challenges before the Congress System, Journal of Indian School of Political Economy, vol 15 Jan-Jun, No.1 and 2, pp97-122
- Palshikar Suhas and Rajeshwari Deshpande, 1999, *Maharashtra Electoral Competition and Structures of Domination,* Occasional paper series II , Dept.of Politics and Pub.Admn., University of Pune, Pune
- Palshikar suhas and Rajeswari Deshpande, 2008, intergenerational Occupational Mobility Across Caste Groups : A Study of Pune City, Depertment od Politics and Public Adminitration, University of Pune, Pune
- Palshikar Suhas, 1994, *Politics in Maharashtra : Arrival of " Bahujan" Idiom,* Indian Journal of Political Science, Vol.LV,No.3, July-sept
- Palshikar Suhas, 2004, Revisiting State Level Politics, EPW, Nos 14th 15th April
- Purohit .B.R . 1976 , Politics of Princely Alliances , Iqbal Narayan (ed) , *State Politics in India ,* Meenakshi Prakashan, New Delhi
- Rosenthal Donald, 1977, The Expancive Elite:District Politics and State Policy-Making in India, University of Colifornia, Berkeley
- Rudolph , Lloyd I.and Susanne H. Rudolph. 1967. *The Modernity of Tradition: Political Development in India,* Orient Longman Limited, Hyderabad
- Shah Ghanshyam (ed) (2002), Caste and Democratic Politics in India, Permanent Black, New Delhi
- Sirsikar V.M., 1970, The Rural Elite in Developing Society, New Delhi, Orient Longman.
- Srinivas M.N. (ed) 1996, *"Caste its Twentieth Century Avatar"*, Viking Penguin India, New Delhi
- Srinivas M.N. (ed) 1996, *Caste its Twentieth Century Avatar*, Viking Penguin India, New Delhi
- Srinivas M.N. 1962, *"Caste in Modern India and other Essays"*, Asia Publishing House, Bombay
- Thkkar Usha and Mangesh Kulkarani, 1995, Politics in Maharashtra, Himalaya Publishing House, Bombay

- Vora Rajendra (2009), Maharashtra or Maratha Rashtra?, in Christophe Jaffrelot and Sanjay Kumar (ed), The Rise of the Plebeians?: The Changing Face of Indian Legislative Assemblies, Routledge, New Delhi
- Vora Rajendra 2003, *Maharashtra: Virtual Reservation for Marathas?*, Occasional Paper Series-III, Department of Politics and Public Administration, University of Pune, Pune
- Vora Rajendra, 1999, Maharashtra : Shift of Power From Rural to Urban Sector, EPW, January
- Yadav Yogendra and Suhas Palshikar , 2003, From Hegemony to Convergence: Party system and Electoral Politics in the Indian State – 1952-2002, Journal of Indian School of Political Economy, Vol.15, No. 1&2, January – June.


# Websites


- http://ahmednagar.nic.in/
- http://secc.gov.in/welcome
- http://nagarzp.gov.in/
- http://amc.gov.in/
- http://drdaahmednagar.gov.in/
- http://ahmednagar.gov.in/election/elehomepage.htm
- https://ceo.maharashtra.gov.in/
- http://www.indiaenvironmentportal.org.in/files/file/economic%20survey%20of%20maharashtra%202011-2012.pdf
- http://shodhganga.inflibnet.ac.in/bitstream/10603/3427/8/08_chapter%204.pdf
- http://re.indiaenvironmentportal.org.in/files/file/Economic%20Survey%20of%20Maharashtra%202014-15.pdf
- http://www.mahasugarfed.org/images/pdf/co_op_sugar_fact.pdf
- https://www.mahasugarcom.gov.in/site/Information/listOfSugarFactories.aspx
- http://ahmednagar.gov.in/gazetteer/home.html

# वर्तमान पत्रे – नियतकालीके

## वर्तमान पत्रे

- दैनिक. सकाळ –अहमदनगर आवृत्ती
- दैनिक सकाळ – पुणे आवृती
- दैनिक लोकसत्ता –अहमदनगर वृतांत
- दैनिक लोकमत – अहमदगन आवृत्ती
- दैनिक पुढारी – अहमदनगर आवृती
- दैनिक गावकरी – श्रीरामपूर आवृती
- दैनिक सर्वमत – अहमदनगर आवृती
- दैनिक लोकवीर टाइम्स – अहमदनगर आवृती
- दैनिक पुण्यनगरी – नाशिक आवृती
- दैनिक केसरी – नगर जिल्हा वृत

## नियतकालिके

- परिवर्तनाचा वाटसरू – पुणे
- लोकप्रभा – साप्ताहिक – मुंबई
- साप्ताहिक सकाळ – पुणे
- अनुभव मासिक – पुणे
- साप्ताहिक अमृतवार्ता – संगमनेर

## मुलाखत घेतलेल्या व्यक्तींची यादी

- थोरात बाळासाहेब, दि. ११.१२.२००६
- आदिक गोविंदराव, दि. १८.०१.२००७
- पाचपुते बबनराव, दि. २२.०१.२००७
- पिचड मधुकरराव, दि. १९.०१.२००८
- कोल्हे शंकरराव, दि. २०.०५.२००५
- काळे शंकरराव, दि. २३.०३.२००४
- ढाकणे बबनराव, दि. १८.१२.२००८
- राठोड अनिल, दि. २३.०३.२००९
- राजळे अप्पासाहेब, दि. २८.०६.२००७
- बागवडे शिवाजीराव, दि. २१.१०.२००७
- तनपुरे प्रसाद, दि. १८.०९.२००८
- लोखंडे सदाशिव, दि. १९.११.२००९
- घुले नरेंद्र, दि. २३.०२.२००६
- कर्डिले शिवाजीराव, दि. २८.०६.२००९
- गांधी दिलीप, दि. ०१.०१.२०१०
- गडाख तुकाराम, दि. १०.१२.२००९
- थोरात भाऊसाहेब, दि. १२.०३.२००४
- मुरकुटे भानुदास, दि. १५.०७.२००६
- भोस बाबासाहेब, दि. १५.०३.२००९
- धुमाळ रामदास, दि. १९.०५.२०१०

- शेलार घनश्याम, दि. २२.०३.२०११
- वहाडणे सुर्यभान, दि. ०२.०१.२००६
- सासणे जयंत, दि. २१.०८.२०११
- भांगरे अशोक, दि. २७.०९.२०१२
- औटी विजय, दि. १२.०२.२०१३
- कदम चंद्रशेखर, दि. १७.१२.२०१२
- कडू अरूण, दि. २८.०३.२०१३
- फाळके राजेंद्र, दि. ३१.०४.२०१३
- वाघ रामनाथ, दि. १२.०९.२००९
- विखे राधाकृष्ण, दि. २१.११.२००८
- फरांदे ना. स, दि. १७.११.२००६
- कळमकर दादा, दि. २२.१०.२००८
- देशमुख विनायक, दि. २८.०५.२०१०
- ढाकणे प्रताप, दि. २९.०४.२००८
- गाडे शशिकांत, दि. १४.०४.२००९
- घैसास मुकुंद, दि. २८.०५.२००८
- कोयटे काका, दि. २७.०३.२०१२
- आठरे विलासराव, दि. १२.०५.२००३
- कोरपे अप्पा, दि. १८.०६.२००६
- मुनोत हस्तिमल, दि. २२.०३.२००९
- गवळी सुरेश, दि. २८.१२.२००७

- सोले गोपाळराव, दि. १५.१२.२००४
- आरोळे रजनीकांत, दि. २८.०४.२००६
- विखे शालिनी, दि. २१.०३.२०१३
- झावरे नंदकुमार, दि. २८.१२.२०१३
- शिरसाट पंकज, दि. २९.१०.२०१२
- बार्शीकर नवनीतभाई, दि. १९.१२.२००६
- कोठारी बन्सीलाल, दि. १२.१२.२००६
- आपटे कमलाबाई, दि. २७.०३.२००९
- भारस्कर बाबूराव, दि. २८.११.२००६
- मुजफ्फर खलिल, दि. २१.०३.२००३
- भास्करगिरी महाराज, दि. २२.०५.२००७
- नागवडे बाळासाहेब, दि. २१.०९.२००६
- बोपर्डीकर मधुसूदन, दि. १२.११.२००९
- पाटील जी. के., दि. १९.१२.२०१०
- जगधने मीनाताई, दि. २१.०७.२०१३
- कांबळे प्रमोद, दि. २२.०५.२००९
- खोंडे योगिराज, दि. २१.०७.२०१०
- पाटील विखे बाळासाहेब, दि. १२.१०.२०११
- ढेरे विमलताई, दि. २९.०६.२००९
- शेळके गुलाबराव, दि. २१.१२.२००८
- देशमुख बापूसाहेब, दि. ०६.०९.२००९

- धूत वेणुगोपाळ, दि. १७.०१.२००६
- शेख रईसा, दि. १५.०५.२००६
- मालपाणी संजय, दि. २९.०३.२००९
- खताळ बी. जे., दि. २१.१०.२००८
- सौदागर बाबासाहेब, दि. १८.१०.२०१२
- फिरोदिया प्रकाश, दि. २९.०२.२००९
- निमसे सर्जेराव, दि. १५.१२.२००९
- म्हस्के एस. बी., दि. २२.०३.२००९
- पाटील माणिकराव, दि. २५.०७.२००४
- घुले चंद्रशेखर, दि. २१.०५.२००९
- निंबाळकर राजेंद्र, दि. २२.०८.२०११
- फाटके संभाजीराव, दि. २५.१२.२०१२
- गुंदेचा सुवालाल, दि. २१.०३.२००९
- पाटील पांडुरंग अभंग, दि. २५.०७.२०१०
- टेकावडे ज. य., दि. २१.०५.२००९
- बेडेकर श्रीकांत, दि. २८.१०.२०१२
- शिंदे बी. एन., दि. २९.०९.२०१३
- शिंदे रावसाहेब, दि. २१.०५.२००६
- गायकवाड सबाजीराव, दि. २९.१२.२०१३
- वाघचौरे भाऊसाहेब, दि. २८.०९.२०१२

# प्रश्नावली

१. नाव :

२. पत्ता :

३. फोन नं :

४. वय :

५. शिक्षण :

६. जात :

७. तुमचा मुख्य व्यवसाय कोणता?

८. आज पर्यंत कोणत्या पदावर काम केलेले आहे?

९. आजपर्यंत आपण कोणत्या पक्षामध्ये राहून काम केले आहे? (कालखंडासह नोंदवा)

१०. आपण सहकार क्षेत्रात आहात का?

११. (होय) असल्यास कोणत्या?

१२. तुम्ही कार्यरत असलेल्या सहकार क्षेत्राचे थोडक्यात स्वरूप सांगा.

१३. सहकार क्षेत्रात आतापर्यत कोणकोणत्या निवडणुका लढवल्या आहेत.

१४. सहकार क्षेत्रात विजय मिळवलेल्या निवडणुकांचे विश्लेषण कसे कराल?

१५. तुम्ही आतापर्यंत कोणत्या निवडणुका लढवल्या आहेत?

- लोकसभा निवडणूक
- विधानसभा,
- जिल्हा परिषद, पंचायत समिती
- महानगरपालिका
- सहकारी बँक, कृषी उत्पन्न बाजार समिती, नगरपालिका

- ग्रामपंचायत
- पक्षीय कार्यकारणी

१६. तुम्ही कोणकोणत्या निवडणुका जिंकलात ?

१७. प्रचारासाठी वापरलेले मध्यवर्ती मुद्दे कोणते?

१८. निवडणुका जिंकल्यानंतर कोणते एखादे लाभाचे पद मिळाले होते का?

१९. होय असल्यास त्यांची सविस्तर माहिती सांगा.

२०. तुमच्या स्वत:च्या काही शिक्षण संस्था आहे का? उदा. शिक्षण संस्था सामाजिक संस्था, आर्थिक संस्था, धार्मिक संस्था? असल्यास संस्थाच्या स्वरूपाविषयी थोडक्यात वर्णन करा?

२१. तुमचे राजकारणात येण्याचे मुख्य कारण सांगा? तत्कालीन परिस्थिती थोडक्यात सांगा?

२२. तुम्हाला या परिसरात जो पाठिंबा मिळतो तो कोणत्या स्वरूपात आहे? त्यांचे वर्णन करा.

२३. तुम्हाला मिळणाऱ्या पाठिंब्याचा सामाजिक पाया काय आहे? उदा. जात, धार्मिक, व्यवसाय, सामाजिक संघटना इ.

२४. तुम्ही कोणकोणत्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभागी होतात? त्यात तुमची भूमिका काय राहते?

२५. तुम्ही चळवळी, आंदोलने व सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभागी होतात?

२६. (होय असल्यास) त्यात तुमची भूमिका काय राहते?

२७. तुमच्या कुटुबांची राजकीय पार्श्वभूमी आहे का?

२८. (होय असल्यास) त्यांचे थोडक्यात वर्णन करा.

२९. तुम्ही समाजाचा पाठिंबा मिळविण्यासाठी संघटन कसे करता?

३०. तुम्ही एखादी सामाजिक संघटना स्थापन केली आहे का?

३१. (होय असल्यास) कोणती?

३२. सामाजिक संघटनेविषयी थोडक्यात माहिती सांगा (सामाजिक संघटनेचे कार्ये, ध्येय धोरणे, संघटनांची रणनिती इत्यादी.)

३३. तुम्ही एखाद्या सामाजिक संघटनेचे पदाधिकारी आहेत का

३४. (होय असल्यास) कोणत्या पदावर? तुमच्यावर संघटनेची कोणत्या कार्येची जबाबदारी होती?

३५. राजकीय पाठिंबा मिळविण्यासाठी काही घोषणा, घोषवाक्य, ध्येय, धोरणे केली आहेत का?

३६. या परिसरातील सामाजिक मुख्य समस्या कोणत्या आहेत? त्या विषयीची तुमची भूमिका काय आहेत?

३७. वरिष्ठ नेतृत्वाकडून तुम्हाला मिळणाऱ्या सहकार्याचे वर्णन थोडक्यात करा?

३८. स्वत: काही सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक संघटना स्थापन केलेल्या आहेत का?

३९. या परिसरात शेतकऱ्यांच्या समस्या विषयी तुमची भूमिका काय राहते?

४०. या परिसरातील राजकारणाविषयी आपले मत काय आहे?

४१. तुम्ही आतापर्यंत कोणती मुख्य कामे केली आहेत?.

४२. तुम्ही एखाद्या व्यवसायिक संघटनेचे पदाधिकारी आहेत का?

४३. (होय असल्यास) पदाचा तपशील सांगा

४४. तुम्ही एखादी व्यवसायिक संघटना स्थापन केली आहे का?

४५. (होय असल्यास) सविस्तर माहिती सांगा

४६. मतदारसंघात मतदाराचे संघटन हे जातीच्या आधारे होते की विकास कामाच्या प्रश्नांच्या आधारे?

४७. मतदार संघात प्रमुख समस्या कोणत्या आहेत?

४८. मतदारसंघातील समस्या सोडवण्यासाठी कोणी प्रयत्न केले?

४९. तुमच्या मतानुसार मतदारसंघातील जातीय स्पर्धा कशा प्रकारे होते?

५०. सर्वसाधारणपणे मतदारांचा मत देण्याचा कल कोणत्या आधारावर निश्चित होतो असे आपणास वाटते?

# संदर्भाविषयी टीप

या संशोधन प्रबंधाविषयी संदर्भ देण्यासाठी इन टेक्स्ट ( in-text ) ही संदर्भ देण्याची पध्द्त वापरली आहे. या पध्द्तीनुसार पुढील प्रमाणे नियम पाळले आहेत.

- प्रत्येक प्रकरणामध्ये संदर्भ देताना ‘ लेखक : प्रकाशन : वर्ष : पृष्ठ क्रमांक ’ अशी पध्द्त वापरली आहे. या पध्द्तीनुसार प्रबंधाच्या शेवटी संदर्भ सूची दिली आहे. या पध्द्तीनुसार सर्व प्रकरणांतील संदर्भाचा तपशील संदर्भ सूचीमध्ये येतो.
- संदर्भ सूची देवनागरी आद्याक्षरांप्रमाणे तयार केली आहे.
- संदर्भ सूची ‘ लेखक, प्रकाशन वर्ष, ग्रथांचे नाव, प्रकाशक आणि प्रकाशन स्थळ ’ या प्रमाणे दिली आहे. तसेच ग्रंथाचे नाव इटालीकमध्ये दिले आहे.
- नियतकालातील लेख वापरला आहे. तेथे नियतकालकांचे नाव इटालीकमध्ये दिले आहे.
- वृत्तपत्रातील संदर्भ देताना ‘ वृत्तपत्राचे नाव, प्रकाशन स्थळ (विशिष्ट आवृती), दिनांक ’ या पध्द्तीचा वापर केला आहे.
- संदर्भ सूची देवनागरी आद्याक्षरांप्रमाणे तयार केली असल्यामुळे इंग्रजी भाषेतील संदर्भ ग्रंथ देवनागरी आद्याक्षरांप्रमाणे संदर्भ सूचीमध्ये दिले आहेत.
- शासकीय प्रकाशन, संस्था, पक्ष इत्यादीचे अहवाल, जाहीरनामा त्या त्या संस्था व पक्ष यांच्या देवनागरी आद्याक्षरांप्रमाणे सूचीमध्ये दिले आहेत.
- मुलाखतीचा संदर्भ देताना ‘ मुलाखतदाराचे नाव, मुलाखतीचे दिनांक ’ नोंदविला आहे. या खेरीज शेवटी मुलाखत देणाऱ्या व्यक्तींची यादी ‘ नाव, दिनांक व पक्ष किंवा संघटना ’ या पध्द्तीने दिली आहे.
- सर्व संदर्भ आद्याक्षरांप्रमाणे सूचीत केले असल्यामुळे प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी संदर्भ दिलेले नाहीत.